00044461

NOT TO BE ISSUED
OUT OF THE LIBRARY.

BOMBAY BRANCH
OF THE
ROYAL ASIATIC SOCIETY.
TOWN HALL, BOMBAY.

Digitized with financial assistance from
Hermès India
a project facilitated by the Rotary Club of Bombay
on 10 August, 2018

A

MARAT'HA DISPENSATORY.

CONTAINING,

I The natural history and medicinal properties of substances of the Materia Medica

II The Pharmaceutical preparations and compositions of the Pharmacopeia of the London College of Physicians.

44461
ou

TRANSLATED

BY

Assistant Surgeon JOHN McLENNAN, Bombay Establishment;

Superintendant of the Bombay Native Medical School.

ZZ.c5

Printed at the Government Lithographic Press

BY

F. D. RAMOS.

1828.

00044461

औषध कल्प
ना विधि.

मुंबई
शके १७५०
इंग्रेजी संन १८२८
हें पुस्तक सर्कारी छापखान्यांत दगडावर छापिलें.

औषध कल्पना विधीचे प्रथम भागाची अनुक्रमणिका·

१ ग्रंथावतरण·
१ औषधपरिभाषा·
१ तुलामानाचे प्रकार·
२ मापायाचीं मानें·
२ कुटणें·
३ घोटणें·
३ धुणें·
४ गाळणें·
४ पिळणें·
४ फेंस काढणें·
५ पातळ करणें·
५ शुष्क करणें·
५ अर्क काढणें·
७ फूल काढणें·
७ उष्णमानाचें वर्णन·
११ तुलाविशेष·
१६ औषधांचीं नावें·
४८ औषधगुण वर्णन·
४९ जाचे गुण सर्व शरीरावर होतात तीं औषधें·
४९ जाचे गुण एकदेशीं होतात·
५० पूर्वोक्त दोन प्रकारचे औषधांवांचून गुण करणारीं औषधें·
५० औषधांचें अनुक्रमें करून वर्णन·
५[illegible] मदकारी·
५२ मदकारींचीं नावें·
५२ स्पिरिटस रेक्टिफिकेटस्·
५४ आल्कहोलादिकांचीं नावें·
५७ ओप्यम अफु·
६४ फोस्तांचे फलाचीं औषधें·
६४ अफूचीं औषधें·
६५ हैयोस्यामी फोल्या·
६६ बिल्लादोन्ने फोल्या·
६६ दिजिटेलिस फोल्या·
६८ टाबर्सी फोल्या·
६९ स्त्रामोन्येसेमिना·
६९ कोन्यी फोल्या·
७० अंगग्रहनाशक·
७२ कस्तूरी·
७३ कास्तोर्यम·
७४ हिंग·
७५ गाल्बनी गम्मीरेझिना·
७५ वालीर्येनेरेदिकूस·
७५ आम्मोन्येसब्कार्बोनास
७६ ईथर रेक्टिफिकेटस्·
७६ क्युप्रीसल्फासादिक·
७६ रोचक·
७७ धातुरोचकांचीं नावें·
७७ वनस्पतीचे कडु रोचकांचीं नावें·
७७ सुगंध रोचकांचीं नावें·
७८ कडु रोचकांचीं नावें·
७९ प्युलीज्यम्

७९ आर्जेंती नैत्रास
७९ पिल्युले हैड्राजेरी
८१ कालोमेल
८२ हैड्राजेरी ओक्सिम्युर्यास
८२ लोखंडाचीं औषधें
८३ फेर्रीसब्कार्बोनास
८३ फेर्रीसल्फास
८४ टिंक्युरा फेर्रीम्युर्याटिस
८५ जिन्सीसल्फास्
८६ क्युप्रीसल्फास्
८६ लैकोर आर्सेनिकेलिस्
८७ बिस्मथीसब्नैत्रास्
८७ आसिदम नैत्रिकम्
८८ कास्कारिल्ले कोर्टेक्स
८९ कालंबेरेदिक्स
९० कार्रयेलिम्नम
९० सिंकोना
९२ जेन्त्र्येनेरेदिक्स
९२ कस्पेर्ये कोर्टेक्स
९३ नारिंगाची साल
९३ लिंबूची साल
९३ डालिंबाची साल
९४ जायफळ
९४ लवंगा
९४ मिरच्या
९५ मिरें
९५ कबाबचिनी
९५ सुंठ
९६ वेलदोडे
९६ पुदिना
९६ कोष्ठबंधक
९७ धातुचीं कोष्ठबंधक
९७ वनस्पतिचीं कोष्ठबंधक
९८ आसिदम सल्फ्युरिकम
९९ तुरटी
१०० टिंक्युरा फेर्रीम्युर्याटिस
१०० जिन्सीसल्फास
१०१ क्युप्रीसल्फास
१०१ प्लुंबी आसीटास
१०२ चुन्याचें पाणी
१०२ मायफळ
१०४ क्रेकस् कोर्टेक्स
१०४ हेमातोक्सिलिम्नम
१०४ काथ
१०५ केनो
१०५ वमक
१०७ ईपिकाक्युअन्नेरेदिक्स
१०८ ईपिकाक्युअन्नेरेदिक्स
१०९ आन्तिमोन्यम टार्टारिझेटम
१०९ जिन्सीसल्फास
११० क्युप्रीसल्फास
११० आम्मोन्येसब्कार्बोनास
११० ढाळक रेचक
११३ नम्र रेचकाचीं नावें
११४ सोदाटार्टारिझेटा
११४ चिपनळीनें सोडायाचीं रेचकें

११४ मान्या तुरंजबीज·
११४ कान्येपल्या·
११४ तामारिंडीपल्या·
११५ रिसीनी ओल्यम्·
११५ सल्फर · गंधक·
११६ मग्निश्या·
११६ सेन्ने फोल्या·
११७ रेईरेदिकस·
११८ जालेपेरेदिकस·
११८ कोलोसिंथिदिस पल्या·
११९ एलाटेरीइपेपनेस·
११९ आलोएस पिकेटे एक्स्याक्टम्·
१२० आम्मोन्येगम्मीरेझिना·
१२० गांबोज्या·
१२१ हैड्रार्जरीसब्म्युर्यास·
१२२ मग्निश्येसल्फास·
१२२ सोदेसल्फास·
१२२ पोटास्सेसल्फास·
१२२ पोटास्सेसुपर्टार्त्रास·
१२३ पोटास्सेटार्त्रास·
१२३ चिप्नळीची रेचके·
१२३ टेरेबिंथिने ओल्यम्·
१२३ म्युर्यास सोदे·
१२४ टाबसी फोल्या·
१२४ ऋतुद्रव·
१२५ कास्तोर्येम्·
१२५ हिंग·
१२५ गाल्बनी गम्मीरेझिन
१२६ कालोमेल·
१२६ एळ्याबोळ·
१२६ रेवाचिनी·
१२६ काळीकुटकी·
१२६ मूत्रल·
१३० पोटास्सेसब्कार्बोनास·
१३० पोटास्सेनैत्रास·
१३१ पोटास्से आसिटास·
१३१ पोटास्सेसुपर्टार्त्रास·
१३२ स्पिरिटस एथरिस नैत्रिस·
१३२ ओल्यम टेरेबिंथिने
१३२ कांथारिदेस·
१३३ सिल्लेरेदिकस·
१३४ कोलचिसीरेदिकस·
१३४ कोपैबा·
१३५ दिजिटेलिस फोल्या·
१३६ टाबसी फोल्या·
१३६ स्वेदकारी·
१३९ लैकोर आसिटेटिस·
१३९ सैत्रास आम्मोन्ये·
१४० आम्मोन्येसब्कार्बोनास·
१४० लैकोर सब्कार्बोनटिस आम्मोन्ये·
१४० हैड्रार्जरीसब्म्युरीटम नैयम्·
१४० आंतिमनीईसल्फ्युरेटम प्रीसिपिटेटम्·
१४० आंतिमोन्यमटार्टारिझेटम्·
१४१ वैनम आंतिमोनीईटार्टारिझेटम्·
१४१ पल्विस आंतिमोन्येलिस·

१४१ सल्फर- गंधक·
१४१ ऑप्यम अफु·
१४२ कांफोरा·
१४२ ग्युयेसी गर्म्मारेझिना
१४३ मिसेयइ कोर्टेक्स·
१४३ कफघ्न·
१४६ आंतिमोन्यम टार्टारिझेटम्·
१४६ ईपिकाक्युअन्ने पल्विस·
१४६ दिजिटेलिस फोल्या·
१४६ टाबसी फोल्या·
१४६ सिल्ले पल्विस्·
१४७ आल्लिई रेदिक्स लसून·
१४७ आमोन्यकम्·
१४८ मिर्रा. बोळ·
१४८ बाल्समम् पेरुव्येनम्·
१४८ लाळ आरबी·
१४९ पैरिथ्री रेदिक्स·
१४९ आर्मोरेइयै रेदिक्स·
१४९ सुंठ·
१४९ तंबाकू·
१५० नस्य·
१५० स्फोटकारी·
१५२ कांथारिदेस·
१५३ सिनेपिस सेमिना
१५३ लसून·
१५३ शेरां चीक·
१५३ आर्याटिस् रेझिना
१५४ [illegible]
१५४ लैक्कोर आम्मोन्ये·
१५४ मांसनाशक·
१५५ आसिदम् सल्फ्युरिकम्·
१५५ आसिदम् नैत्रिकम्·
१५६ आसिदम म्युर्याटिकम्·
१५६ आल्युमेन एक्सिकेटम्
१५६ पोटास्सा फ्युसा·
१५६ आर्जेंती नैत्रास·
१५६ क्युप्री सल्फास्·
१५७ जंगला·
१५७ हैड्रार्जेरी ओक्सिम्युर्यास·
१५७ हैड्रार्जेरी नैत्रिको ओक्सिदम्·
१५७ सोमल·
१५८ अम्लनाशक·
१५९ लैकोर काल्सिस्
१५९ क्रीटा प्रीपरेटा·
१५९ मग्निश्या·
१५९ अश्मरीहारक·
१६१ लैकोर काल्सिस्·
१६१ सेपो ड्यूरस·
१६१ आसिदम् म्युर्याटिकम्·
१६२ आसिदम नैत्रिकम्·
१६२ शीतकर·
१६२ लिंबू·
१६३ नारिंग·
१६३ चिंचेच्या गीर·
१६३ आसिटम·
१६३ क्रीमर टार्टर·

१६४ सोरा·
१६४ द्रवकर·
१६४ मृदुकर·
१६५ आकेश्येगम्मी·
१६६ त्रागाकांथा·
१६६ जवस·
१६६ ज्येष्ठीमध·
१६६ सार्सापारिल्लेरेदिकूस·
१६७ लैकेन·
१६७ आमिग्दले·
१६७ स्निग्धकर·
१६८ कृमिघ्न·
१६८ हैद्रार्जरीसल्फ्युरेटमनैग्रम·
१६८ हैद्रार्जरीसब्म्युर्यास·
१६९ सल्फासफेर्री
१६९ स्तान्नीपल्विस·
१६९ ओल्यम्टेरेबिंथिने·
१६९ कुहिलीचीं कुसें·
१७० डाळिंबीचे मूळाची साल·
१७० रेवाचिनीच्या शिरा·
१७१ दीर्घादिकृमीचें वर्णन·
१७४ दीर्घादिकृमीचे उपचार·
१७५ पूर्वोक्त सर्व औषधांचे शास्त्रार्थ·
१७६ प्रकृत्यादिभेदज्ञानावांचून औषध देण्याचा निषेध·
१७७ औषधांतील उपद्रवकारक अंशाचा पृथक्कार·
१७७ प्रमाणादिभेदें करून उपद्रवनिवारण प्रकार·
१७८ भिन्नभिन्न लक्षणाचा निवारणप्रकार·
१७८ संग्रहणीमध्यें अन्य उपद्रव असतां विशेष मेलनाची योजना·
१७८ वृद्धाचे खोखल्यांत फुफ्फुसांतील कफसंचय दूर करायाचा मेलन प्रकार·
१७९ मेलनें करून औषधाचे दुर्गुण दूर करायाचा प्रकार·
१७९ अल्पमानाचे औषधाचा देण्याचा प्रकार·
१८० पाचनादिकांमध्यें सुगंधपदार्थ घालायाचे असतां त्याचा काल·
१८० वयोवस्थादिकांवरून प्रमाण निश्चित करणें·
१८० स्त्रियानां औषधाचे प्रमाणाची योजना·
१८१ ढाळक देण्याचा काळ·
१८१ विशेषप्रकृतीचा अर्थ·
१८२ वयोभेदें करून प्राणभेद·
१८२ मलद्वारांत औषधें सोडायाचीं कार्यें·
१८३ लबदा·
१८३ धूमपान·
१८३ वाफ·
१८३ वाफारा·

रोग परिहारार्थ वैद्य विद्येचे दोन प्रकार आहेत एका प्रकारा मध्यें रोगांचे भेद प्रकार लक्षणें कारणें व उपचार सविस्तर लिहिले आहेत· आणि त्यांचे सर्व लक्षणांचे परिहारक पदार्थही लिहिले आहेत· व अमुक लक्षणांवर अमुक औषध द्यावें· आणि देणें तें जेणें करून कांहीं वाईट गुण आणि अपरिमित गुण नहोतील असें चौकशीनें द्यावें हें ही लिहिलें आहे· सांप्रत द्वितीय प्रकारा मध्यें औषधांची उत्पत्ति· व त्यांचें रूप· आकार उत्पत्तिस्थान आणि शरीरावर परिणाम कसे होतात· व आहाल्या नंतर रोगाचे कंचे लक्षणावर गुण करतात· व कंचे कंचा रोगाचे कामाचे आहेत· इत्यादिक सांगतो· या द्वितीय प्रकाराला इंग्रेजी भाषेंत मटिर्यामेदिका आणि संस्कृता मध्यें औषधकल्पना विधि ह्मणतात· औषधोत्पत्तीला इंग्रेजी भाषेंत फार्मासी ह्मणतात· कांहीं औषधांचे सर्व अवयवांचे ठायीं गुण नसतात· कांहीं अवयवांचे ठायीं असतात· यास्तव· ते अवयव पृथक् करून दिल्हे असतां गुण अधिक होतात· व कांहीं औषधांचे मेळनें करून हितकारक गुण अधिक होतो· व काहीं औषधांचे मेलनें करून त्यांचे दुर्गुण दूर किंवा न्यून होऊन औषध चांगलें होतें·

औषधपरिभाषा

औषध सिद्ध होण्याचे प्रकार दोन आहेत कांहीं औषधें **कुटणें· गाळणें· धुणें·** इत्यादिक आयासें करून सिद्ध होतात आणि कांहीं आयासा वांचून मिश्रणें करून सिद्ध होतात· औषधें सिद्ध करायासाठीं पदार्थांचें मान किती घ्यावें व सिद्ध झाल्या नंतर त्यांचें मान मनुष्यास किती द्यावें· याचा नियम कळावया साठीं त्यांचीं इंग्रेजी वजनें सांगतो·

एक पौंड·	बारा औंस·
एक औंस·	आठ ड्राम·
एक ड्राम·	तीन स्क्रुपल·
एक स्क्रुपल·	वीस ग्रेन·
एक ग्रेन·	

पौंड·	औंस·	ड्राम·	स्क्रुपल	ग्रेन·
	१२	९६	२८८	५७६०
	१	८	२४	४८०
		१	३	६०
			१	२०

या वजनें करून औषधें तोलाया साठीं ताजवा चांगला असावा तो ताजवा जसें

वजन असेल तसा लाहान· मध्यम· मोटा· घ्यावा· आणि कार्यसमयींच लोंबता ठेवावा·

पातळ पदार्थांचीं मापें सांगतो·

एक गाल्लुन·	आठ पैंट·
एक पैंट·	सोळा औंस·
एक औंस·	आठ द्राम·
एक द्राम·	साठ मिनिम·
एक मिनिम·	

गाल्लुन·	पैंट·	औंस·	द्राम·	मिनिम·
१	८	१२८	१०२४	६१४४०
	१	१६	१२८	७६८०
		१	८	४८०
			१	६०

ते पदार्थ मापायासाठीं या या मानाचीं पात्रें बिलोरी असावीं· काहीं एकावेळेस मोठ्ये चमचाचें माप सांगीतलें आहे· तें अर्ध औंस समजावें· तसें चाहा प्यावयाचे चमचाचें माप एक द्राम समजावें· तसें मध्यम चमचाचें माप दोन द्राम समजावें· तसें मद्य प्यावयाचे प्याल्याचें दीढ औंस समजावें· काहीं औषधांचे सिद्धते साठीं चूर्णादि करावें लागतें तें· **कुटणें· घोंटणें· वाटणें· किसणें·** इत्यादिक क्रियें करून होतें·

कुटणें· या क्रियें करून· भुसभुशीत व कठीन पदार्थांचें चूर्ण होतें· हें खलांत करतात· खल पितळ लोखंड बिलोर स्फटिक विलायती माती· इत्यादिकांचे असावे· व ते असे असावे किं कुट्टनादिक क्रियें करून त्यांचे अवयव औषधांत शिरत नाहींत· आणि औषधांचे रूपांतरही होत नाहीं· काहीं वनस्पतींचे कोष्ठ बंधक पदार्थ लोखंडाचे खलांत कुटले असतां कृष्णवर्ण होतात ह्मणोन त्यांत कुटूं नयेत· खल मोटे लाहान असे वेगळे वेगळे असावे· प्रायः सर्वांपेक्षां मोटा लोखंडाचा· त्यापेक्षां लाहान पितळेचा असावा या प्रमाणें सर्व जाणावे· आसिद ह्मणजे अति आंबट पदार्थ आहे· त्याचे खलनास्तव व मेलनास्तव धातूचा खल कामाचा नाहीं· बिलोरी किंवा विलायती मातीचा असावा· · बत्तेही खलांशीं समानजातीय असावे· खलांचे तळाचा आकार बत्ताउच्च त्यानंतर औषध तळास आपल्ये आपण जमे असा यत्किंचित् उतरता असावा· खलामध्यें एक कालीं पदार्थ पुष्कळ घालूं नये· थोडा थोडा घालून चूर्ण करावें· चूर्ण करायासाठीं वनस्पति पूर्वीं शुष्क कराव्या· काष्ठ मूल व त्वचा यांस बारीक बारीक कापावें· किंवा किसावें· सुंठ इत्यादिक मूळांमध्यें रेषा पुष्कळ असतात त्यांचे आड

वे कोप काढावे· तेणेंकरून केशां सारिखे पदार्थ चूर्णामध्यें राहात नाहींत· कापुराचें चूर्ण आलकोहोल किंवा प्रुफस्पिरिट यांचे थोडक्या बिंदूचे मेलनें करून होतें· जायपळ जायपत्री व इतर सुगंध तेलकट पदार्थ· यांचें चूर्ण खडी साखरेचे मेलनें करून होतें·

घोंटणें· हें ही चूर्ण करायासाठीं आहे· व खलामध्यें करतात·

वाटणें· वनस्पतिंचे पदार्थ पाण्याशीं किंवा आलकोहोलाशींच काहीं पदार्थ वसेशीं किंवा मधीशीं चौकस दगडावर वाटतात·

किसणें· हें चूर्ण करायासाठीं आहे कानस व किसणी इहीं करून होतें वनस्पतींचे पदार्थांतला गीर कानसे सारिखा वर्तुळाकार पदार्थानें किसून काढावा·

पदार्थांचे आंतले अवयव जा क्रियानी पृथक् होतात त्या क्रिया सांगतो·

चाळणें· धुणें· गाळणें· पिळणें· फेंस काढणें·

चाळणें· यासाठीं चाळणी घ्यावी· ती अश्वकेश व फार बारीक वस्त्र इत्यादिकांची असावी· या क्रियेनें जाड चूर्णापासून बारीक चूर्ण पृथक् होतें· नंतर जाड चूर्ण फिरून खलांत कुटून चाळावें· याप्रमाणें निःशेष होईतोंपर्यंत करावें· बहुत करून चाळणीला वरती टांपण व खालती सांठवण असावें· तेणेंकरून पदार्थ उधळून बाहेर जात नाहीं·

धुणें· जे पदार्थ पाण्यामध्यें विरघळत नाहींत त्यांचे जाड चूर्णापासून सूक्ष्म चूर्ण या क्रियेनें पृथक् होतें त्याची कृति सांगतात·

प्रथम पदार्थाला अति बारीक वाटून पुष्कळ पाण्यांत घालून चांगलें ढवळून अथवा घोंटून चांगलें मेलन करून क्षणभर तसेंच राहूं द्यावें· नंतर जाड चूर्ण त्वरेनें तळास बसतें· सूक्ष्म चूर्ण हलकें असतें यास्तव लवकर तळास जात नाहीं पाण्याबरोबर राहातें नंतर तें पाणी गाळ तळास राहूं देऊन युक्तीनें अन्य पात्रांत घालून तसेंच राहूं द्यावें· काहीं कालानंतर सूक्ष्म चूर्ण तळास बसतें नंतर वरलें पाणी फार सावकाशीनें काढावें जर चूर्ण फार हलकें असलें तर सुताची वात लावून पाणी काढावें· त्याचा प्रकार· वात पाण्यांत भिजवून तिचा एक शेवट त्या मेलनामध्यें घालावा दुसरा शेवट पात्राचे बाहेर लोंबूं द्यावा· तेणेंकरून पाणी बाहेर निघून चूर्ण तळास राहातें· मना योग्य न झालें तर याप्रमाणें एक दोन वेळ करावें· खडी व इतर धातूंचे पदार्थ या प्रकारें सिद्ध करतात·

गाळणें· याक्रियेनें दाट पदार्थां पासून पातळ पदार्थ वेगळे होतात· गाळायासाठीं गाळणीं ऊर्णावस्त्र व पातळ वस्त्र कागद इत्यादिकांचीं असावीं· गाळायाचे पदार्थ पुष्कळ असले अथवा त्यांत बारीक रज नसले तर कार्पास वस्त्र किंवा ऊर्णावस्त्र यांचें गाळणें चांगलें आहे तें झोळी सारिखें करून त्यामध्यें गाळायाचे पदार्थ घालावे ह्मणजे लवकर गळतात· गाळायाचे पदार्थांमधून घट्ट पदार्थ वेगळे करावयास इछितात· तर असल्या वस्त्राचें गाळणें चांगलें आहे पातळ पदार्थांचें ग्रहण करावयास इछितात तर घट्ट वस्त्राचें गाळणें चांगलें कारण स्वच्छ पदार्थ चांगला गळतो· गाळण्याला लागून फुकट जात नाहीं· जावेळेस थोडके पदार्थ गाळायाचे आहेत· तेव्हां कागदाचें गाळणें चांगलें गाळण्याकरितां कागद खळ नसून फुटत असेल तसला चौकोनी घ्यावा त्याची रुमाली घडी करून पुनः दुमडून तिकोनी पात्र होई असें करावें· नंतर त्या गाळण्याला फुनेलामध्यें ठेवून त्यांत गाळायाचा पदार्थ घालावा· तें फुनेल प्रायः धातूचें किंवा बिलोराचें असतें· परंतु औषधाविषयीं बिलोरी चांगलें· ह्या फुनेलाचे आंतल्ये आंगास शिराळ्या प्रमाणें शिरा असाव्या· नसल्या तर त्यांचे सारिख्या बारीक बारीक काड्या लावाव्या· तेणें करून त्याला कागद न चिकटून गाळायाचा पदार्थ चांगला लवकर गळतो· सर्व कागद भिजे तों पर्यंत जो पदार्थ पहिल्यानें पडतो· तो प्रायः स्वच्छ नसतो· यास्तव पुनः गाळण्यांत गाळावा·

पिळणें· याक्रियेनें वनस्पतींचे साजुक पदार्थांचा रस काढणें व तेल काढणें· प्रथम पदार्थांनां कुटून अश्वकेशांचे अथवा इतर पदार्थांचे झोळीमध्यें घालून हळु हळु पिळित पिळित बळकट पिळावे· वनस्पतींचे पदार्थ प्रथम स्वच्छ करावे आणि कुटल्यानंतर त्वरेनें पिळावे· जवस· बदाम· तीळ· एरंडी गोळे· इत्यादिकांचें तेल काढायासाठीं त्यानां उकळत्ये पाण्याचे वाफेनें उष्ण करावे· नंतर घाण्यांत घालून तेल काढावें·

फेंस काढणें· जे पदार्थ दाट आणि चिकट आहेत· गाळण्यांमधून पडत नाहींत· त्यानां ही क्रिया पाहिजे यास्तव कांहीं एक वेळेस पदार्थांनां चुलीवर ठेवून उष्ण करावे उष्ण झाल्या नंतर फेंस वर्ति येतो तो काढावा· अथवा कोंबड्याचे आंड्यांतला श्वेत पदार्थ त्यांत घालून सर्वांस उकळवावें· तेणें करून तो श्वेत पदार्थ दाट होऊन जाळ्या प्रमाणें त्यांतील वाईट पदार्थांनां वेष्टून फेंसा प्रमाणें वर्ति घेऊन येतो· वनस्पतींचे पदार्थांचे कांहीं रस असे आहेत किं उष्ण करावे लागत नाहींत वन-

स्पतींचा आंबट पदार्थ आंत घातल्यानेंच स्वच्छ होतात· अग्नि संयोगादिकें करून रूपांतर होऊन काहीं पदार्थ सिद्ध होतात· व काहीं मिश्रणें करून सिद्ध होतात· त्यांतें सांगतो·

पातळकरणें· रसकरणें· आटिवणें· शुष्ककरणें· अर्कादिककाढणें· फूलकाढणें· हीं सर्व अग्निसंयोगें करून होतात·

पातळकरणें· या क्रियेकरून पदार्थ प्रथम शिथिल होऊन पातळ होतात· उदाहरण· मेण· राळ· लाख· इत्यादिक या क्रियेनें मलमादिक सिद्ध होतात·

रसकरणें· या क्रियेकरून पदार्थ तप्त होऊन अकस्मात पातळ होतात· उदाहरण· तांबें· कथिल· इत्यादिक· काहीं पदार्थ असे आहेत किं द्रावक पदार्था वांचून त्यांचा रस होत नाहीं ही क्रिया औषधार्थ कामाची नाहीं·

आटिवणें· अग्नि संयोगानें पातळ पदार्थ घट्ट करणें· उदाहरण· काथ इत्यादिक· आटणें तीन प्रकारें करून होतें· पदार्थ पात्रांत घालून त्या पात्रास अग्निसंयोग केल्यानें होतें· पदार्थ पात्रांत घालून तें पात्र उष्ण वाळूचे पात्रांत ठेवून वाळु पात्राला अग्निसंयोग केल्यानें होतें· पदार्थ पात्रांत घालून तें पात्र जल पूरित पात्रांत ठेवून जल पात्रास अग्नि संयोग केल्यानें होतें· या विषयीं पात्र उथळ रुंदट असावें·

शुष्ककरणें· अग्नि संयोगें करून मूर्त्त पदार्थांतला आर्द्रांश दूर करणें· उदाहरण· मीठ· इत्यादिक·

अर्ककाढणें· ह्मणजे यंत्र द्वारा पदार्थांतील सारांशाचें द्रव रूपें करून ग्रहण करणें· या विषयीं पात्रें व अग्नि संयोग जसे जसे पदार्थांचे गुण असतील तसे तसे वेगळे वेगळे करावे· जा वेळेस पदार्थांचें मान अल्प आहे तेव्हां जा यंत्राचे पात्राना इंग्रेजी भाषेंत रिटोर्ट आणि रीसिवर ह्मणतात· तें यंत्र बळकूत करून घ्यावें· रिटोर्टाच्या आकार  वांग्या सारिखा आहे· त्याचे तोंडावर आडवी नळी विण्याचे दांडी प्रमाणें आहे· तें रिटोर्ट बिलोराचें व चिनी मृत्तिकेचें व लोखंडाचें असतें· बिलोराचें असलें तर त्याच्या खालच्या अर्धा भाग पातळ असावा· रिसिवराच्या आकार घागरी सारिखा आहे· हें रिटोर्टा पेक्षां मोटें व त्याशीं समानजातीय असावें कार्यसमयीं याचें तोंड रिटोर्टाचे नळीशीं जोडावें· अथवा अगत्य असल्यास या दोहोंचे मध्यें नळी लावून तिशीं दोघांचीं तोंडें जोडावीं· आणि जा स्थलीं यांच्या संयोग असेल त्या स्थलीं कपडलेप करून वाफ बाहेर न जाई असें करावें· रिटोर्टांतले पदार्थ चपल असले तर त्यांच्या घागरींत संग्रह व्हावया साठीं घागरी पेक्षां उंच स्थलाव

र शीतोदकाचें पात्र ठेवून त्याला सुताचा वाती लावून त्यांतील पाणी थेंब थेंब घागरीवर अनेक जागीं पडे असें करावें · व या कार्यासाठीं चिनी मृत्तिकेचें नलिका यंत्रही कामाचें आहे · या यंत्राचें एक पात्र कुपी सारिखें आहे · याचे तोंडावर लांब तोटीचें पात्र असतें त्याचे तोटीला घागर जोडावी · त्या उभयतांचे तोंडाचें बंधन वाफ बाहेर पडेना असें पूर्ववत् करावें · व ती घागर पूर्ववत् पाण्यानें थंड करावी · रिटोर्ट पात्र व कुपी पात्र या उभयतांचे भोंवता कापड मातीचा लेप चांगला करावा · तेणें करून अग्नि पासून त्यांचें संरक्षण होतें पात्रें फुटत नाहींत · या दोहों यंत्रानीं आसिदादिक काढितात असें जाणावें · आलकोहोल व सुगंध पाणी गुलाब आदिकरून यांचे सिध्यर्थ शुंडा यंत्र घ्यावें · याचें एक पात्र हांड्या सारिखें असतें त्यांत औषधें घालितात · व या पात्राचे तोंडावर ठेवा याचें दुसरें पात्र शुंडासहित हस्तिचे मस्तका सारिखें सें असतें · याची शुंडा दुसर्या नळीशीं मळसूत्रा सारिखी जडलेली असत्ये · ती नळी अन्य शीत जल पूरित पिंपा सारिख्या पात्रांत गेलेली असत्ये · व त्या पात्रांत तिचे अनेक वेढे नेचाचे नळी सारिखे होऊन तिचा शेवट त्या पात्रांतून बाहेर निघालेला असतो · त्या पासून आलकोहोलादिक थेंब थेंब निघतात · त्या पात्राचे खालती छिद्र असतें · त्या छिद्राला दाटा असतो त्यांतलें पाणी उष्ण झालें असतां दाटा काढून बाहेर काढावें पुनः थंड घालावें · या यंत्राचे संधीचे ठायीं कापड मातीचा लेप करावा · या यंत्राचें तें हांड्या सारिखें पात्र अगत्य असल्यास जल पूरित पात्रांत किंवा वालुका पात्रांत अर्धे पुरून तद्वारा अग्नि लावावा · तेणें करून उष्णपणा समान होतो · हें पात्र व याचे वरलें पात्र फार करून तांब्याचें असावें · व ती पुढली नळी जस्ताची असावी · ज्या पदार्थांची वाफ एका घागरींत लवकर जमत नाहीं त्या पदार्थां विषयीं यंत्रांतर सांगतात · पूर्ववत् रिटोर्ट व दोहों तोंडांची घागर घ्यावी · नंतर रिटोर्टा पासून घागरींत आलेला जो पदार्थ त्याला दुसर्ये तोंडाला नळी लावून अन्य पात्रांत न्यावा · त्यांतही जमला नाहींतर त्याला पूर्ववत् नलिका लावून तृतीय पात्रांत न्यावा · अगत्य असल्यास अशीं पात्रें लावून यावत् जमे तों पर्यंत न्यावा · व शेवटल्ये पात्राचें एक तोंड उघडें ठेवावें · व हीं सर्व पात्रें शीतोदकानें अर्ध पूरित करावीं · व जा नळीनें या पात्रांत पदार्थ येतो त्या नळीचें तोंड पाण्यांत गेलेलें असें असावें · व जा मार्गानें पदार्थ अन्य पात्रांत आतो त्या मार्गाचें तोंड उदका पासून वर व ऊर्ध्वगतिक असें असावें व या यंत्रास जाजा स्थलीं संधी आहेत त्या त्या स्थलीं कापड मातीचा लेप करावा · तेणें करून वाफ बाहेर येऊं पावत नाहीं · औषधांची वाफ धरायाचा पदार्थ · पूर्वीं एक

कुपी घेऊन तिला अपकर्याचे तोटी सारिखी नळी लावावी· नंतर दुसरें चौकोनी पेटी सारिखें व दीड हात लांबीचें एक हात रुंदीचें व अर्ध हात खोलीचें असें जस्ताचें पात्र घेऊन तें द्व्यंगुल न्यून शीतोदकानें पूरित करावें आणि वीत भर रुंदीचा जस्ताचा पत्रा घेऊन तो त्या जल पूरित पात्रांत एक अंगुल पाण्या मध्यें बुडून राही असा अर्ध्ये आंगास मारावा व त्याला तीन चार छिद्रें करावीं· नंतर एक कुपी घेऊन तिला पाण्यानें भरून त्या छिद्रा वर उपडी ठेवावी· नंतर पूर्व कुपीचे तोटीचें तोंड उदकांत त्या पत्र्याचे छिद्रा खालीं आणून योजावें· नंतर पूर्व कुपींत औषधाचें मेलन घालावें· नंतर तोटी वाटे वाफ येऊन दुसर्या कुपींत जात्ये व जशी जशी वाफ शिरत्ये तसें तसें कुपींतलें पाणी चौकोनी पात्रांत येतें· व जा औषधांची वाफ उदकाशीं मिळत्ये त्या वाफेचा विषयीं उदकाचे स्थानीं पारा घ्यावा· आणि जस्ताचा व पान्याच्या विरोध आहे या स्तव तें चौकोनी पात्र काष्ठाचें किंवा संगी मर्मराचें घ्यावें· व पारा दुर्मेल आहे· या स्तव तें लाहान घ्यावें· तितकें मोटें घेऊनये· अर्कादिक एकदां काढून चांगले उतरले नाहींत तर रिटोर्ट यंत्रानें मंदाग्नी लावून पुनः काढावे·

फूल काढणें· औषधी पदार्थां पासून यंत्र द्वारा धुरा सारिखा पदार्थ वरल्ये पात्रांत जमिवणें या विषयीं प्रायः डमरु यंत्र घ्यावें· जा पदार्थांचें फूल एका पात्रांत जमत नाहीं त्यां विषयीं वरल्ये पात्रावर दुसरें पात्र लावून त्यांत धरावें· डमरु यंत्रास अग्नि संयोग वालुका पात्र द्वारा अथवा साक्षात् करावा·

अग्नि संयोग परिमित करायासाठीं यंत्र सांगतो·

उष्ण पदार्थावर हस्त ठेविला असतां उष्ण होतो· याचें कारण उष्ण पदार्थांतील तेज हस्ता मध्यें शिरतें· व अग्नि मध्यें लोह तुला घातली असतां तापत्ये· कारण अग्नीतलें तेज ती मध्यें शिरतें· तेज व उष्ण यांचा भेद दाखवितां येत नाहीं· परंतु तेज ह्मणोन पदार्थ आहे आणि उष्ण ह्मणोन तेजाचा गुण आहे असें जाणावें· तेज सर्व पदार्थांमध्यें आहे परंतु एका पदार्थाचे ठायीं व्यक्ति भेदें करून याचें स्पर्श ज्ञान वेगळें वेगळें होतें· तें परस्परांतील तेजाचा भेदें करून होतें असें जाणावें· व याचे मानाचें ज्ञानही स्पर्श भेदें करून होतें ह्मणजे पदार्थ फार उष्ण स्पर्शास आला असतां त्या मध्यें तेज पुष्कळ आहे व अल्प उष्ण स्पर्शास आला असतां अल्प आहे· सारांश असें दोन प्रकारचें ज्ञान त्याचे न्यूनाधिक पणें करून होतें· या स्तव लोहाचा गोळा तापला असतां त्या मध्यें फार तेज

शिरतें

शिरलें आहे· असा लोकांत व्यवहार होतो· व त्याचे स्पर्शें करून जें भासतें तें उष्ण आहे· व लोहाच्या गोळा निवाला असतां त्यांतील तेज कांहीं निघालें ह्मणोन मंद उष्ण लागतो· असाही लोकांत व्यवहार आहे व अधीक तेज निघाल्यामुळें थंड लागतो· पूर्व कालीं लोक असें समजत असत कि त्यांत कांहीं शीत प्रविष्ट झालें परंतु तें मिथ्या· कारण शीत कांहीं स्वतंत्र पदार्थ नाहीं तेजाचे न्यूनते करून भासतें· पृथ्वीवर तेज असें आहे किं जाचा प्रवेश सर्व पदार्थांमध्यें आहे· व एका पदार्थांमध्यें फार प्रविष्ट असलें तर त्यामधून दुसऱ्या पदार्थांमध्यें जातें· तेणें करून त्याचें स्पर्शज्ञान पूर्ववत् होत नाहीं ह्मणजे लोखंडाचा तापलेला गोळा थंड पाण्यांत ठेविला असतां त्यांत पाण्यापेक्षां अधिक तेज शिरलेलें आहे· तें पाण्यांत जाऊन तो थंड होतो· व पाण्यामध्यें त्यापेक्षां थंड पदार्थ ठेविला असतां त्यांतील अधिक तेज निघून त्या पदार्थामध्यें शिरतें· तें परस्परांतलें तेज समान होई तोंपर्यंत शिरतें· असें सर्वत्र जाणावें· व तेजाचें ज्ञान अन्य प्रकारानें ही होतें ह्मणजे पदार्थांमध्यें तेज शिरल्यानंतर त्याची आकृति अधिक होत्ये व त्यांतलें तेज गेल्यानंतर त्याची आकृति न्यून होत्ये· हे न्यूनाधिक भेद जसें पदार्थांमध्यें तेज न्यूनाधिक असेल तसे होतात· व फार तेज शिरलें तर रूपांतर ही होतें ह्मणजे कठिण लोहादिक पदार्थ जे त्यांचा रस होतो· व पातळ पदार्थ फार उष्ण केले तर ते वायुरूप होतात· जेणें करून हे भेद होतात त्याला इंग्रेजी भाषेंत कालोरिक ह्मणजे तेज ह्मणतात· तेजाच्या प्रवेशें करून पदार्थ मोटे होतात· हा तेजाचा गुण इतर गुणांपेक्षां सर्वकाल समान आणि निश्चित आहे· यास्तव सुज्ञ या गुणें करून तेजाचें विशेष मान करितात जावेळेस दोन पदार्थांचा स्पर्शें करून तृतीय पदार्थ समानच राहातो· त्यावेळेस सर्वांस असें प्रसिद्ध होतें किं त्या दोन पदार्थांतलें तेज समान आहे· व जा कालीं तो तृतीय पदार्थ एकाचा स्पर्शें करून लाहान दुसऱ्याचा स्पर्शें करून मोटा असा होतो· त्या कालीं त्या पदार्थांतलें तेज परस्परांपेक्षां न्यूनाधिक आहे· हें स्पष्ट होतें· तेजें करून पदार्थ मोटा होतो असा अव्यभिचरित हेतु घेऊन एका वैद्यानें तेजाचें मान करणारें असें यंत्र उत्पन्न केलें त्याचें नाम इंग्रेजी भाषेंत थर्मोमेटर· व संस्कृतामध्यें उष्णमान आहे· तेणें करून तेजाचें विशेष ज्ञान होतें· त्याला उत्पन्न करून तीनशें वर्षें झालीं· त्याची सिद्ध करायाची कृति सांगतो· बिलोराचा लाहान पोकळ गोळा जाला लांब सूक्ष्म रंध्राची नळी असत्ये असा घ्यावा नंतर त्याला फार उष्ण करून त्याचे

नळीचें तोंड जा पात्रांत तांबडा पातळ पदार्थ असतो· त्यामध्यें उपडें ठेवावें नंतर तो गोळा जसा जसा शीतळ होतो तसा तसा त्यांतील व त्याचे नळींतला वायू लाहान होऊन त्या वायूनें सोडिलें जें स्थल त्यामध्यें तो तांबडा पदार्थ नळीवाटे वर्ती चढतो· पुनः जसा जसा गोळा उष्ण करावा तसा तसा वायू मोटा होऊन तो आरक्त पदार्थ खालीं उतरतो· जसा जसा थंड करावा तसा तसा वायू लाहान होऊन पुनः वर्ति चढतो· यास्तव त्या त्या स्थलीं चिन्ह करून तेजाचें मान होतें· असें जाणावें· तेजाचें मान करायासाठीं पूर्वोक्त वायूचा ऐवजीं पातळ पदार्थ· सुरा· पारा· तेल· आहेत परंतु सांप्रत कालीं प्रायः तेल घेत नाहींत· पारा व सुरा यां विषयीं उष्णमान यंत्राच्या आकार समान आहे परंतु सर्वांमध्यें पारा चांगला आहे यास्तव प्रथम पाऱ्याचे यंत्राचें वर्णन करतो· एक बिलोराचा पोकळ गोळा जाला सूक्ष्म बिलोराची नळी आहे· असा घ्यावा· आणि त्या गोळ्यांतील वायू बाहेर निघे असा त्याला उष्ण करून त्याचे नळीचें तोंड पाऱ्याशीं उलटें करून लावावें· नंतर जसा जसा गोळा शीतळ होतो तसा तसा पारा नळीमध्यें चढतो· नंतर ती नळी सुलटी करावी तेणें करून पारा खालतीं गोळ्यांत येतो· नंतर त्या गोळ्याला पुनः उष्ण करावा तेणें करून त्यांतील वायू निघून त्याचे ऐवजीं पाऱ्याची वाफ राहाते नंतर त्या नळीला पूर्ववत् पाऱ्याशीं लावावी आंतील पारा शीतळ झाल्यानंतर नळीवाटे दुसरा पारा चढतो· जों पर्यंत आंत पारा इच्छे प्रमाणें प्रविष्ट होई तों पर्यंत असें करावें नंतर त्याला असा उष्ण करावा किं आंतील पारा मोठा होऊन सर्व नळी व्याप्त होई व्याप्त झाल्यानंतर नळीचे तोंडाशीं फुंकण्याचे बळें करून तीव्र अग्नि लावून बिलोराचा रस करून नळीचें तोंड बंद करावें येणें करून कांहीं वायू आंत राहात नाहीं आंतील पारा शीतळ झाल्यानंतर खालती बसतो आणि बाहेरचा वायू आंत जात नाहीं यास्तव नळींतल्ये जा स्थलाला पारा सोडितो तें रिकामें राहातें या यंत्राला उष्णमान ह्मणतात· तेणें करून तेज मोजण्याची युक्ति सांगतो· बर्फ जा वेळेस पातळ होतें त्या वेळेस त्यांत उष्णमानाला ठेवावें· नंतर उष्णमानांत जा स्थलीं पारा स्थीर राहातो त्या स्थलीं त्या नळीवर खूण करावी नंतर त्या उष्णमानाला उकळत्ये पाण्यांत ठेवावें पारा वर्ति चढून जा स्थलीं स्थीर राहातो त्या स्थलीं ही नळीवर खुण करावी येणें करून जमायाचे योग्यतेचें जें पाणीं त्यांतील उष्णपण्याचे न्यूनतेचें व उकळतें जें पाणीं त्यांतील उष्णपण्याचे आधिक्याचें ज्ञान होतें· न्यूनपण्याचे खुणे पासून आधिक्याचे खुणे पर्यंत समानांतर अशा १८० एकशें ऐशीं खुणा कराव्या· व न्यूनतेचे खुणे पासून गोळ्याकडे पूर्ववत् ३२ बत्तीस खुणा कराव्या· यांना कक्षा ह्मणतात फारेन्हैट वैद्यानें उष्णमाना

ला इतक्या कक्षा केल्या· यास्तव त्या उष्णमानाला आतां इंग्रेजी भाषेंत फारेन्हेटस् थेर्मोमेटेर ह्मणतात· अन्य वैद्यानें दुसर्या प्रकारानें कक्षा योजिल्या आहेत· परंतु तें उष्णमान यादेशांत बहुत करून नाहीं ह्मणोन प्रायः फारेन्हेट थेर्मामेटेरच घेतात· पाणी सर्वकाल उष्णाच्या एकाच न्यूनतेकरून जमतें· व उष्णमानाला त्या उदकांत एक दिवस ठेविलें तथापि त्यांतील पारा तेथेंच राहातो खालती जात नाहीं त्या प्रकारें उकळत्ये पाण्यांत ठेविलें असतांही पारा मर्यादेपेक्षां वर्ती चढत नाहीं· हे दोन गुण उष्णमानाचे निश्चित आहेत· यास्तव तेजाचे न्यूनतेची कक्षा व आधिक्याची कक्षा यांचामध्यें समान भाग केले असतां सर्व उष्णमानांचा कक्षा बराबर होतात· उष्णमानाला उष्णपदार्थाचा स्पर्श केला असतां त्या पदार्थांतील तेज उष्णमानामध्यें शिरतें· शीतळ पदार्थाला उष्णमानाचा स्पर्श केला असतां त्यांतील तेज शीतळ पदार्थामध्यें शिरतें· उष्णमानांतील तेज दर्शनें करून प्रगट होतें· ह्मणजे पारा वर्ती चढला असतां तेज अधिक आहे खालती उतरला असतां तेज न्यून आहे· व आगचे आगीं असतां तेज समान आहे· असें जाणावें· उष्णमानाचा गोळा लाहान व नळी बारीक आहे· तेणें करून तेजाचें ज्ञान सहज लवकर आणि निश्चित होतें उष्णमानाला धातूचे किंवा हस्तिदंताचे पटीचा आधार लावून त्यावर कक्षा करतात· ती पटी कांहीं तीक्ष्ण पदार्थांचा स्पर्श करून वाईट होत्ये· यास्तव तिला मिजाग्रें करून उष्णमान पदार्थामध्यें ठेवत्ये वेळेस ती उलटावी· पदार्थास लागूं देऊं नये· पाऱ्याचें उष्णमान आलकोहोलाचे उष्णमानापेक्षां चांगलें आहे· कारण याचे गतीचे फेरे तेजाचे न्यूनाधिकपणें करून लवकर होतात व येणें करून तेजाचे आधिक्याचें मान फार चांगलें होतें· कारण आलकोहोल उष्णमानाचा १७९ एकशें एकुणऐशीं कक्षां पर्यंत वर्ती चढतें आणि पारा ६४९ साहाशें एकुणवन्नास कक्षां पर्यंत चढतो· यास्तव आलकोहोलाचें उष्णमान तेजाचे न्यूनतेचे माना विषयीं चांगलें आहे· कारण तेजाची न्यूनता कितीही झाली असतां तें जमत नाहीं आणि पारा पहिल्ये कक्षेचे खालती चाळीस कक्षा नेला असतां जमतो· तेजाचे न्यूनाधिकपण्याचे अतिसूक्ष्म ज्ञाना विषयीं वायूचें उष्णमान चांगलें आहे· यास्तव किं तेजाचे फार अल्प न्यूनाधिकपणें करून वायू लाहान मोटा होतो· औषधोत्पत्ति प्रकारामध्यें मंद उष्ण शब्द लिहिला आहे· त्याचा अर्थ नव्वदाव्ये कक्षे पासून शंभराव्ये कक्षे पर्यंत जें उष्ण तो जाणावा· औषधांचा चांगला वाईटपणा तुला विशेषें करून जाणावा· अशी आज्ञा आहे· यास्तव त्याचें वर्णन करतो·

तुला विशेष· इंग्रेजी· स्पेसिफिक ग्राविटी·

पदार्थांचा उद्भूत अवयव समुदाय समान असून वजनाचा भेद असतो· त्याला हें नाम ठेवितात· हा भेद वस्तुमात्रास आहे· तेणें करून पदार्थांचें तारतम्य कळतें· ह्मणजे दोन गोलाकार पदार्थ शिसें व काष्ठ· यांचा व्यास आणि परिधी समान असतां सर्व लोकांत प्रसिद्ध आहे किं काष्ठाचे जडत्वा पेक्षां शिशाचें जडत्व अधिक आहे यास्तव व्यवहारवेत्ते काष्ठाचे तुला विशेषा पेक्षां शिशाचा तुला विशेष अधिक आणि शिशाचे तुला विशेषा पेक्षां काष्ठाचा तुला विशेष न्यून आहे· असें ह्मणतात· जा पदार्थांचा अवयव समुदाय आणि वजन समान आहे· त्यांचे तुला विशेषाचा भेद नाहीं· जांचा अवयव समुदाय समान असून वजन समान नाहीं त्यांचे तुला विशेषाचा भेद आहे· तुला विशेषाचें ज्ञान व्हावयासाठीं एका पदार्थाचा तुला विशेष काहीं कल्पिला पाहिजे यास्तव पाण्यांचा तुला विशेष एक सहस्र १००० कल्पिला आहे· काहीं पदार्थाचा तुला विशेष ३००० आहे तर त्याशीं पाण्यांचें वजन समान व्हावया साठीं पाणी तिपट घ्यावयास पाहिजे· पाण्यांचे १००० मिनिमांचें वजन १००० ग्रेन भरलें तर त्या पदार्थाचे १००० मिनिमांचें वजन अर्थात् ३००० ग्रेन भरेल पाण्यांचा तुला विशेष १००० आहे तर आसिद मसल्फ्युरिकम या नामें करून एक पदार्थ आहे त्याचा तुला विशेष १८७५ आहे तो वक्ष्यमाण प्रकारें करून स्पष्ट होईल· पातळ पदार्थांचा तुला विशेष निश्चित कराया साठीं काहीं पात्र पाहिजे त्याविषयीं एक बिलोराची कुपी जिची लांब ग्रीवा आहे व जिचे गुडदीला खांचणी किंवा भोंक आहे· कुपीला पूर्ण करून गुडदी घातली असतां जो पदार्थ अधिक होऊन बाहेर येतो तो त्या खांचणीला किंवा छिद्राला पूर्ण करून येतो· तेणें करून वायूला आंत राहावयास अवकाश मिळत नाहीं· अशी कुपी घ्यावी· अशी न मिळाली तर दुसरी फार लाहान तोंडाची व जीमध्यें पदार्थ अमुक मावतो अशी घ्यावी· पूर्वीं रिकामी कुपी गुडदी सुद्धां घेऊन ग्रेनानीं जोखावी· अथवा अभंड करून ठेवावें· नंतर अर्का प्रमाणें कादलेलें पाणी किंवा उकळून जाचा उष्णपणा उष्णमानाचा ६० कक्षा आहे एत पर्यंत निवालेलें पाणीं घेऊन ती कुपी पूर्ण करून अभंड सहित तोलावी तीमध्लें पाणीं १००० ग्रेन भरलें तर तीमध्यें आसिद मसल्फ्युरिकम तसें घालून जोखलें असतां १८७५ ग्रेन भरतें· आसिदम सल्फ्युरिकम घाला या पूर्वीं कुपी आंतून बाहेरून पुसून शुष्क करावी· सहस्र ग्रेन पाणी राहायाची कुपी नसली तर जेवढी मिळाली असेल तेवढी मध्येंच तसलें पाणी घालून पूर्ववत् जोखून ग्रेन मनांत ठेवावे नंतर तीमध्यें पातळ पदार्थ पहिल्ये सारिखा घालून जोखून त्याचेही ग्रेन मनांत ठेवावे· नंत

र त्रैराशिकें करून तुला विशेष स्पष्ट होईल· उदाहरण· पाण्यांचे ८० तुला विशेषास पातळ पदार्थांचा १६० तुला विशेष तर पाण्यांचे १००० तुला विशेषास पातळ पदार्थांचा २००० तुला विशेष होईल· यास्तव कुपी लाहान मोटी असतां चिंता नाहीं· जा कुपींत १००० ग्रेन तसलें पाणी मावतें त्या पाण्यानें भरलेल्या अशा कुपीचें अभंड करून ठेवावें· नंतर ती कुपी रिकामी करून तीमध्यें पातळ पदार्थ घालून पूर्ण करून त्या अभंडासहित जोखावी· तेणेंकरून तो पदार्थ पाण्यापेक्षां हलका किंवा जड हें प्रसिद्ध होईल· उदाहरण· ती कुपी इथरानें पूर्ण करून त्या अभंडासहित जोखली असतां २६१ ग्रेन कमी भरल्ये· येणेंकरून असें प्रसिद्ध होतें किं इथराचा तुला विशेष पाण्यांचे तुला विशेषापेक्षां २६१ कमी ह्मणजे ७३९ आहे व आसिदमसल्फ्युरिकमानें ती कुपी पूर्ण करून त्या अभंडासहित जोखली असतां ८७५ ग्रेन अधिक भरल्ये· येणेंकरून असें प्रसिद्ध होतें किं आसिदमसल्फ्युरिकमाचा तुला विशेष पाण्यांचे तुला विशेषापेक्षां ८७५ अधिक ह्मणजे १८७५ आहे असें जाणावें·



फार सूक्ष्म भेद जाणायाचें अगत्य नसलें तर एक यंत्र आहे जाला इंग्रेजी भाषेंत एर्योमेटर ह्मणतात· तें फार दिवसांपासून प्रसिद्ध आहे त्याचा आकार याप्रमाणें आहे· एक बिलोराचा पोकळ गोळा जाचे आंल वायू व बुडांत कधीं अल्प पारा आहे· त्याला एक लांब बिलोराची नळी आहे· तिजवर कक्षांचें चिन्ह केलेलें असतें त्या यंत्राला पातळ पदार्थामध्यें उभें ठेविलें असतां जसा त्या पातळ पदार्थाचा हलकेपणा व जडपणा असतो तसें तसें तें यंत्र खालती जातें व वर्ती येतें त्या त्या स्थलींचा कक्षा मनांत ठेवाव्या· पातळ पदार्थ हलका असल्यास खालती जातें· जड असल्यास वर्ती येतें· तेणेंकरून त्या पदार्थाचे तुलाविशेषाचें ज्ञान होतें· उदाहरण· पाण्यांमध्यें ठेविलें असतां १००० सहस्राव्ये कक्षेचे चिन्हापर्यंत तरतें· आसिदमसल्फ्युरिकमामध्यें ठेविलें असतां १८७५ कक्षांपर्यंत तरतें· येणेंकरून तुलाविशेष स्पष्ट होतो· अशा ज्ञानाचें कारण दुसरे पदार्थ गिंडी सारिखे कांचेचे आहेत· त्यांजवर तुलाविशेषाचीं निरनिराळीं चिन्हें केलेलीं आहेत· ते पदार्थ जशा जशा पातळ पदार्थामध्यें घालावे तसे तसे तरून त्यांचा तुला विशेष दाखवितात· ह्मणजे ज्यावर सहस्र तुलाविशेषाचें चिन्ह केलेलें आहे तो पाण्यांवर तरतो· व जावर १८७५ चें चिन्ह आहे तो आसिदमावर तरतो असें जाणावें· पातळ पदार्थांशिवाय इतर पदार्थांचे तुलावि-

शेषाचें ज्ञान औषधार्थ प्राय: कामाचें नाहीं यास्तव त्यांचे तुला विशेषाचें वर्णन संक्षेपें करून करतो· या पदार्थांचे तुला विशेषाचें ज्ञान पूर्वी निश्चित जो पाण्याचा तुला विशेष तेणें करून करतां येईल· परंतु पाणीं व हे पदार्थ यांचे अवयव समुदायाचा समान पणा करणें फार कठिण आहे· यास्तव यांचे तुला विशेषाचे ज्ञाना विषयीं दुसरी युक्ति पाहिजे· ती तें सांगतो· पातळ पदार्थांमध्यें असे पदार्थ घातले असतां त्यां पासून यांचे अवयव समुदाया इतका पातळ पदार्थांचा अवयव समुदाय बाहेर निघतो· हें सर्वांस प्रसिद्ध आहे· यास्तव बिलोरी किंवा अन्य पात्र घेऊन पाण्यानें पूर्ण करून तोलावें नंतर अन्य पदार्थ तोलून पाण्यांमध्यें घालावा· व त्याचें अभंड दुसर्ये परड्यांत पाण्यांचे वजना बरोबर ठेवावें नंतर त्या अन्य पदार्थांचा योगानें जितकें पाणीं बाहेर निघेल तितक्यानें पहिल्या पेक्षां न्यून होईल तें निघालेलें पाणीं अन्य पदार्थांचे अवयव समुदायां बराबर आहे· तेणेंकरून अन्य पदार्थ व पाणीं या दोघांचे समान अवयव समुदायाचें वजन ठाऊक होतें· त्यावरून त्यांचा तुला विशेषही ठाऊक होतो· उदाहरण· कुपींतल्ये पाण्याचें वजन १०००० दाहा सहस्त्र ग्रेन आहे· अन्य पदार्थाचें १०० ग्रेन आहे नंतर याचें वजन पाण्यांचे वजना जवळ ठेवून तो पदार्थ पाण्यांत घालून विशिष्ट जोखलें तें ९९७० भरलें ३० ग्रेन पाणीं बाहेर निघालें तें अन्य पदार्थांचे अवयव समुदाया इतक्या पाण्याचें वजन १,०००० – ९९७० = ३०× अन्य पदार्थाचें मुळचें वजन १०० ग्रेन त्याशीं त्रैराशिकें करून अन्य पदार्थांचा तुला विशेष स्पष्ट होतो· या प्रमाणें पाण्याचे ३० ग्रेनें करून तत्सदृश अवयव समुदायक जो अन्य पदार्थ त्याचे १०० ग्रेन प्राप्त होतात· तर पाण्यांचे सहस्त्र १००० तुला विशेषें करून अन्य पदार्थांचा तुला विशेष किती प्राप्त होईल असा प्रश्न·

उत्तर· अन्य पदार्थांचा तुला विशेष· ३३३३ $\frac{१}{३}$

फार सूक्ष्म भेद जाणण्यासाठीं युक्त्यंतर सांगतो· पहिल्यानें पदार्थ नुस्ता जोखावा· नंतर पाण्यामध्यें जोखावा· येणें करून त्या पदार्थांचा तुला विशेष स्पष्ट होतो· या प्रकारें काहीं पदार्थ नुस्ता तोलावा· तो पाण्यांमध्यें तोलला असतां कमी भरतो· तो कमी पणा त्या पदार्थांचे अवयव समुदाया इतका जो पाण्यांचा अवयव समुदाय त्याचें वजन आहे· येणें करून पूर्ववत् त्रैराशिकें करून त्याचा तुला विशेष स्पष्ट होतो· उदाहरण· कांहीं पदार्थ नुस्ता जोखला तो १०० शंभर ग्रेन भरला आणि तोच पदार्थ पाण्यामध्यें जोखला तो ७५ ग्रेन भरला २५ ग्रेन उणा आला· हे पंचवीस ग्रेन त्या पदार्था इतक्या पाण्यांचें वजन आहेत· पंचवीस ग्रेन पाण्यांचे वजनें करून अन्य पदार्थांचें वजन १०० ग्रेन होतें

तर पाण्यांचे १००० एकसहस्र तुला विशेषें करून किती होईल असा प्रश्न·

उत्तर· ४००० चारसहस्र· असें जाणावें·

पाण्यांत पदार्थ जोखायाची कृति जो पदार्थ जोखायाचा त्याला अश्वकेश किंवा बारीक सूत बांधून ताजव्याचे एका परडूयाचे पुडाला लोंबता बांधावा· नंतर उदक पूरित पात्रांत जोडून जोखावा·जे पदार्थ पाण्यांमध्यें विरघळतात· ते जांत विरघळत नाहींत असले पातळ पदार्थ सुरा· ईथर· इत्यादिक त्यांमध्यें तोलावे· आणि सुरादिकांशीं त्यांचा तुला विशेष पूर्वोक्तें करून निश्चित करावा· व जे पदार्थ उभयतांमध्यें विरघळतात त्यांचा तुला विशेष जाणायासाठीं त्या पदार्थांनां पाण्यांमध्यें विरघळवून पाणीं असें करावें किं त्यांत काहीं पदार्थ विरघळायासाठीं घातला असतां न विरघळे असें करून त्यामध्यें तोलावे· तेणें करून त्या पदार्थांचा तुला विशेष पाण्याचे तुला विशेषापेक्षां किती अधिक आहे तो ठाऊक होतो· सुरादिकांचा तुला विशेष पाण्यांचे तुला विशेषापेक्षां दुपट आहे· आणि लवणादिकांचा सुरादिकांचे तुला विशेषापेक्षां दुपट आहे· अर्थात् लवणादिकांचा पाण्यांचे तुला विशेषापेक्षां चोपट होईल असें जाणावें· उदाहरण· लवणादिक पदार्थ नुस्ते जोखले ते ३५७ तीनशें सत्तावन्न ग्रेन भरले· सुरादिकांमध्यें जोखले ते २७५ ग्रेन अंतर ८२ ग्रेन· याचें त्रैराशिक· ८२ करून ३५७ प्राप्त होतात· तर १००० करून किती हा प्रश्न·

उत्तर· ४३५३ $\frac{३}{३}$

सुरादिकांचा तुला विशेष ११५७ पाण्यांचा १००० त्रैराशिक १००० करून ११५७ प्राप्त होतात· तर ४३५३ करून किती·

उत्तर· ५०३६

हा पूर्वोक्त सर्व प्रकार जांचा तुला विशेष पाण्यांपेक्षां अधिक आहे त्यां विषयीं जाणावा· जे पदार्थ पाण्यांपेक्षां हलके आहेत त्यांचा तुला विशेष जाणायाची युक्ति सांगतो· पूर्वी काहीं एक जड पदार्थ नुस्ता जोखावा तें वजन व पाण्यांत जोखावा तें वजन व त्या दोहों वजनांतलें अंतर हीं तिन्हीं मनांत ठेवावीं· नंतर हलका पदार्थ जोखून त्याशीं जड पदार्थ बांधावा· आणि दोघानां पाण्यामध्यें तोलावे· नंतर त्या दोहों पदार्थांचें मुळचें वजन व पाण्यामध्यें जोखल्याचें वजन यांतील अंतर काढून हें अंतर व पहिलें अंतर या दोन अंतरांचें अंतर काढावें· त्या अंतरावरून त्रैराशिकें करून हलक्ये पदार्थाचा तुला विशेष जाणावा· उदाहरण· काहीं एक जड पदार्थाचें वजन ३१५ ग्रेन तोच पदार्थ पाण्यांमध्यें जोखला तो २०० ग्रेन भरला· अंतर ११५ हलक्ये पदार्थाचें वजन ५ ग्रेन दोहोंनां एकत्र करून नुस्ते जोखल्याचें वजन ३२०

व

व पाण्यांत ओरवल्याचें वजन १८२ अंतर १२८ पहिलें अंतर ११५ या दोहों अंतरांचें अंतर २३ हें अंतर हलक्या पदार्थांचे अवयव समुदाया इतके जे पाण्यांचे अवयव समुदाय त्यांचें वजन आहे·यांचें त्रैराशिक· पाण्यांचे २३ करून हलक्या पदार्थाचे ५ प्राप्त होतात तर पाण्यांचे १००० करून किती असा प्रश्न·

उत्तर· २१७ $\frac{९}{२३}$

पदार्थांचा तुला विशेष निश्चित करा या विषयीं पाणीं उकळून ज्याचा उष्णपणा उष्ण मानांचा ६० कक्षा पर्यंत राहिला आहे असें निवाळेलें पाहिजे·व जो पदार्थ पाण्यांमध्यें घालावा त्याचे भोंवते वायूचे बुडबुडे येऊं देऊं नयेत·कदाचित् आले असतां पक्ष्याचे पिसानें काढावे·

पदार्थ विशेषांचे संयोगें करून अपूर्व शीत गुण उत्पन्न होतो· ह्मणजे संयोग महात्म्यें करून त्यांतील तेज न्यून होतें त्यांचा अनुक्रम·

पूर्वी मूर्त्त पदार्थ असतील त्यांचीं फारबारीक चूर्णें करून निर्निराळीं ठेवावीं·नंतर सर्वांना एककालीं पातळ पदार्थांत घालून मेलन करावें·

मेलन·	भाग	मेलन·	भाग·
नवसागर	५	ग्लोबर्स सालत्स	८
सुरा	५	आसिदमम्युर्याटिकम	५
पाणीं	१६	ग्लोबर्स सालत्स·	
नवसागर	५	आसिदमसल्फ्युरिकमदिल्युटम·	
सुरा	५		
ग्लोबर्स सालत्स	८		
पाणीं	१६		
ग्लोबर्स सालत्स	३		
आसिदमनैत्रिकमदित्युटम	२		
ग्लोबर्स सालत्स	६		
नवसागर	४		
सुरा	२		
आसिदमनैत्रिकमदित्युटम	४		

रोगनिवृत्तिपूर्वक शरीरास हितावहजे वनस्पति धातुजीव संबंधी पदार्थ

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
आब्यटिसरेझिना	रोझिन·	
आब्सिन्थ्यम·	वर्म्वुद·	
आकेश्ये गम्मी	गम्म आरबिक·	बाबळीचा गोंद
आसीटोझे फोल्या	कामन सोरेल·	
आसीटोझेल्ला	वुदसोरेल·	
आसीटम·	विनगर·	
आसिदम् सल्फ्युरिकम·	सल्फ्युरिक आसिद·	
आकोनेटि फोल्या·	मन्क्सुदलीवस·	
एदिप्स·	फेट·	
ऐरूगो + सबासिटास क्युप्री-इम्प्यूरा·	वेर्दिग्रिस·	जंगला·
आल्लिइरेदिक्स·	गार्लिकरुट·	लसुण
आलोएस स्पिकेटे एक्स्त्राक्तम	सोकोत्रैन आलोझ·	एळ्या बोळ·
आलोएस वल्गेरिस एक्स्त्राक्तम·	कोमन आलोझ·	
[illegible] फोल्या·	मार्श्मालोलीवस·	

त्यानां औषध ह्मणतात त्यांतें सांगतो·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी·व आरबी·
	मस्तारु·	अफस्तीन + रवत्रक्र·
बबूल निर्यास·	बबुल्कागुंद·	सिमघ आरबी·
अम्लवेतस· चुक्रिका·	चुका·	तुर्षक·
अम्ललोणिका·अम्ललोणी·		
	सिर्का·	सिर्कं·
वसा· मांसस्नेह्·	चर्बी ,	पीह् + शह्म·
	पत्राई·	जंगार + जंजार·
लशुण· उग्रगंधा·	लसन काजुवा·	सीर·
कन्या· कन्यका·	एल्वा·	सिबर् मुसब्बिर·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
आल्थेईरेदिक्स·	मार्श्मालोरुट·	
आल्युमेन·	आलम·	तुरटी· फटकी·
आम्मोन्यकम·	गम्म आमोन्यक·	
आम्मोन्येम्युर्यास·	साल् आमोन्यक·	नवसागर·
आमिग्दले आमेरे·	बिटर आमन्झ·	कडुबदाम·
आमिग्दले दल्सेस·	स्वीट आमंझ·	गोडबदाम·
आमिलम·	स्तार्च·	
आनीथी सेमिना·	दिल्लसीझ·	
आनीझी सेमिना·	आनिस्सीझ·	शोपा·
आंथेमिदिस फ्लोरेस·	कामोमैल फ्लोवर्झ·	
आंतिमोनीई सल्फ्युरीटम·	सल्फ्युरेट ओफ आंतिमनी·	सुर्मा·
आर्जेन्तम·	सिल्वर·	रुपें
आर्मोरेशिईरेदिक्स·	होर्सरादिश·	
आर्सेनिकम आल्बम + आर्सेनिसी ओक्सिदम·	ओक्सिद ओफ आर्सेनिक·	सोमल·
आसरी फोल्या·	आसराबाकालीवस·	

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी·व आरबी·
स्फुटी· श्वेता·	फिटकरी·	झाक·+ झाज·
	अब्राक·	अब्राक·
वज्रक· क्षारश्रेष्ठ·	नौशादर·	
तिक्तवाताद·	कर्वीबादाम·	बादामेतल्ख·
मिष्टवाताद·	मिठीबादाम·	
	कलप्+दुधी+	निशास्त·
	सोएकेबीज·	
शतपुष्पा· अतिछत्रा·	सौम्फ·	बाद्यान·+ अनीसुन·
	बाबून;	बाबूना·+ केकाश·
यामुन· कापोतांजन·	अंजन·	सुर्म+ कुहल·
रजत· चंद्रकांति·	रुपा· चांदी·	सीम + नुक्रा·
गोरीपाषाण·	समुल्खार·	मिर्गमूश·
	तगर·	असारुन·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
आस्साफेटिदे गम्मीरेझिना·	आस्साफेटिदा·	हिंग·
अविने सेमिना·	ओट्स·	
आसन्शिई कोर्टेक्स·	ओरंजपील·	नारिंगाची साल·
बाल्समम् पीरुव्येनम·	पीरुव्यन् बाल्सम·	
बाल्समम् टोल्युटेनम·	टोल् बाल्सम·	
बेल्लादोन्ने फोल्या·	नैत् शेद्ली वस·	
बेंझोयनम·	बेंझोइन	ऊद·
बिस्तोर्टे रेदिक्स·	बिस्तोर्टरुट·	
कालमी रेदिक्स·	स्वीट फ्लागरुट·	वेखंड·
कालंबे रेदिक्स·	कालंबारुट·	
कांबोज्या·	गांबोज·	रेवाचिनीचा शिरा·
कांफोरा·	कांफर·	कापूर·
कानेल्ले कोर्टेक्स·	कानेल्लाबार्क·	
कांथारिदेस·	ब्लिस्टरिंग फ्लैझ·	

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी·व आरबी·
रामठ · जातुक·	हिंग·	अंगूझ·
नारंगत्वक्·	नारंगीकी छाल·	पोस्तेनारंज·
	अंगुर रोबाह्·	अनबुथालब·
श्रीवास·	लोवान·	ऊद·
वचा·	अगर·	कसबेबवा· + अकारुन·
	कालंबाकीजर·	
	रेवंडकाशिरा·	असाररेवंद·
कर्पूर· घनसार·	कापुर·	कापुर·
		जरारीह्·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
काप्सिसीबाक्से·	कायन्नपेपर·	मिरची·
कार्बोलिग्नी·	चार्कोल·	कोळसा·
कार्दामोमीसेमिना·	कार्दमम्सीड्स·	वेलदोडा· एलची·
कारिसेफ्रक्टस·	फिग·	अंजीर·
कार्युईसेमिना·	कारावेसीड्स·	ओंवा·
कार्योफिल्ली·	क्लोवस·	लवंग·
कार्योफिल्लोरम ओल्यम·	ओइल ओफ क्लोवस·	लवगांचें तेल·
कास्कारिल्ले कोर्टेक्स·	कास्कारिल्ला बार्क·	
कार्श्येपत्था·	काश्यापत्थ·	बाहव्याचे शेंगातला गीर·
कास्तोर्यम·	कास्तर·	
काटेक्युएक्स्ट्राक्टम·	काटेक्यु·	काथ·
सेन्तार्यीकाक्युमिना·	सेन्तरीतोप्स·	
सीरा आल्बा·	ह्वैटवेक्स·	पांढरें मेण·
सीरा फ्लेवा·	येल्लोवेक्स·	पिंवळें मेण·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी· व आरबी·
	लालमिर्ची·	फिल्फिलेसुर्ख·
कलिजाल·	कोएला·	फह्म·
पृथ्वीका· त्रिपुटा·	इलाची·	हैल + काकिला·
मेतुल·	अंजीर·	तीन·
अजमोदा·	अजमोद·	
देवकुसुम· श्रीप्रसूनक·	लौंग·	मीखक + करन्फुल·
लवंगतैल·	लौंगकातेल·	दुह्नेकरन्फुल·
शम्याकफलसार·	अमलतास·	खियारेशंबर·
		जुंदेबेदस्तर·
खादिर·	कात·	
श्वेतमयन·	सुफेदमोम·	मुमेसुफेद·
पीतमयन·	पीलामोम·	मुमेजर्द·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सीरेव्हिश्ये फेर्मेन्तम·	येस्त·	
सीटेश्यम·	स्पेर्मासेटी·	
सिंकोने कोर्दिफोल्ये कोर्टेक्स·	येल्लो बार्क·	
सिंकोने लान्सिफोल्ये कोर्टेक्स·	पेल बार्क·	
सिंकोने ओब्लोन्जिफोल्ये कोर्टेक्स·	रेद बार्क·	
सिन्नामोमी कोर्टेक्स·	सिन्नमन बार्क·	दालचिनी·
सिन्नामोमी ओल्यम·	सिन्नमन ओईल·	दालचिनीचें तेल·
कोक्कस·	कोशिनील·	किर्मिज·
कोलचिसी रेदिक्स·	मेदोसाफ्रन·	
कोलोसिंथिदिस पल्पा·	पल्प ओफ़ कोलोसिंथ+ पल्प ओफ़ विट्टर आप्पल·	इंद्रायनाचा गीर·
कोन्यी फोल्या·	हेम्लोक लीवस·	
कोन्त्रा एर्वेरेदिक्स·	कोन्त्रा एर्वारुट·	
कोपेबा·	कोपेबा·	
कोर्यान्द्री सेमिना·	कोर्यांदर सीड्स·	धणे· कोथिंब्या·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी व आरबी·
त्वक्·दारुसिता·	दार्चिनी·+ तज·	दार्चिनी·
त्वक्तैल·	दार्चिनीका तेल·	
कृमिज·		किर्मिझे फिरंगी·
इंद्रवारुणिकासार·	इंद्रायनका गोंदा·	मगजे हिंजळ·
धान्य। धन्यक·	धनिया·	तुखमे किश्नीझ + जुळजुलान

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
कोर्न्युवा·		मृगाचें शिंग·
क्रीता·	चाक·	खडू· खडी·
क्रोसीस्तिग्मटा·	साफ्रन·	केशर·
क्युमिनीसेमिना·	कम्मिन्सीझ·	जिरें·
क्युबीबा·	जावापेप्पर+ क्युबेब्झ·	कबाब्चिनी· कंकोळ·
क्युप्रीसल्फास·	ब्ल्यूस्तोन+ ब्ल्यूविट्र्यल·	मोर्चूत·
कस्पेर्येकोर्टेक्स·	कस्पेर्याबार्क+ आंगस्चुरा-बार्क·	
सेद्रोन्येसेमिना·	क्विन्ससीझ·	मोंगली बेदाणा·
दासीरेदिक्स· दासीसेमिना·	कारटरुट· कारटसीझ·	गाजर· गाजराचेंबीं·
दिजिटेलिस फोल्या·	फोक्सग्लव्लीवस·	
डोलिकीप्युबिस·	कौइच	कुहली·
दल्कमेरे कालेस·	वुदेनैत्षेद+ बिटरस्वीट·	
एलटेर्यीपेपनेस·	वैलदक्युकंबेर·	
युफोर्बिईगम्मिरेझिना·	युफोर्ब्यम·	शेराचा चिंक·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी·व आरबी·
मृगशृंग·		
खडिका·लेखनी·	खरीमट्टी·	गिलेसुपीद·
कुंकुम· काश्मीर·	केसर·	झाफ्रान·
जीरक·	जीरा·	जीरा + कमुन·
कंकोल·	कबाब्चिनी·	कबाब·
वितुन्नक· तुत्थ·	नीलातुतिया·	तुतिया·
	बिहीदान·	तुखमे सफर्जल
गर्जर· गृंजन· गर्जरबीज·	गाजर· गाजरकाबीज·	जर्दक + जजर· तुखमे जर्दक·
कंडुरा· दुःस्पर्शा·	कवांच·	
		तर्फंद ,
वज्रक्षीर·वज्रकंटकक्षीर·	सेजका·दुध·	काव्ला + फर्फ्युन·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
फॉरैना·	ह्वीटफ्लोर·	कणीक·
फेर्रम·	ऐरन·	लोखंड·
फीलेसिसरेदिक्स·	मेलफेरनरुट·	
फीनिक्युलीसेमिना·	स्वीटफेंनलसीझ·	
गाल्बनीगम्मीरेझिना·	गाल्बनम·	
गाल्ले·	गालनत्स·	मायफळ·
जेन्श्येनेरेदिक्स·	जेन्श्यनरुट·	
ग्लिसिरिझेरेदिक्स·	लिक्करिसरुट·	ज्येष्ठीमध·
ग्रानेटीकोर्टेक्स·	पोम्ग्रानेटपील·	डाळिंबीचीसाल·
ग्युयेसीरेझिना·	ग्युयकरेझिन·	
ग्युयेसीलिग्नम·	ग्युयकवुद·	
हेमातोक्सिली लिग्नम·	लोग्वुद·	
हेल्लेबोरीफेटिदिफोल्या·	फेटिदहेल्लेबोरलीबस·	
हेल्लेबोरीनैग्रीरेदिक्स·	ब्लाकहेल्लेबोरलीवस·	काळी कुटकी·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी· व आरबी·
गोधूमपिष्ट·	गेहूंका आटा·	आरदे गंदुम·
लोह· अयस·	लोहा·	आहन + हदीद·
मधुरिका·		बाद्यान + राज्यानज·
	बरीजा·	बिर्जद·
	माजुफल·	माजु·
		गुशाद + जेन्त्याना·
यष्टी· क्रीतका·	जेठीमध·	बेखेमहक + असलुसोस·
दाडिमत्वक्·	नास्पाल·	पोस्ते अनार·
		खर्बकेसियाह·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
होर्देईसेमिना·	पेरलबार्ले·	जव· सातु·
ह्युम्युलीस्त्रोब्युली·	होप्स·	
हैड्राजेरम·	मेर्क्युरी·	पारा·
हैयोस्यमीफोल्या·	हेन्बेनलीवस·	
ईपिकाक्युआन्नेरेदिकस·	ईपिकाक्युआन्न·	
जालेपेरेदिकस·	जालप·	
जुनिपरीबाकसे·	जुनिपरबेरिझ·	
कैनो·	कैनो·	
लेपिसकाल्केर्यस·	मार्बल·	
क्रामेर्येरेदिकस·	रातनी·	
लावंड्युलेफ्लोरेस·	लावंडरफ्लोझ·	
लारीफोल्या·	बेत्रीलीवस·	
लेकेन·	ऐस्लंडमोस्स·	
लिमोनेस·	लेमंझ·	निंबू· लिंबू·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी· व· आरबी·
यव· सक्तु·	जौ·	शईर·
पारद· दिव्यरस· चपल·	पारा·	सीमाब·
		बर्गेबंग+बरकुलबंज·
		दमलेखवैन·
		संगेमर्मर·
निंबूक·	लिंबू·	लिंबू·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
लेमोनमकोर्टेक्स·	लेमनपील·	निंबूचीसाल·
लेमोनमओल्यम·	लेमन ओईल·	निंबूचें तेल·
लेनमकाथार्टिकम·	पर्जिंग फ्लाक्स·	
लेनीयुझीतातिस्सिमीसेमिना·	लिन्सीद+ कोम्मन फ्लाक्ससीद·	जवस·
मग्निश्येसल्फास·	इप्सम सालत्स·	
माल्वा·	माल्लोझ·	
मांना·	मान्ना·	
मास्तिच·	मास्तिच·	
मेळ·	हन्ने·	मध·
मेंथापिपरीटा·	पेपर्मिंट·	पुदिना·
मेंथाविरिदिस·	स्पिर्मिंट·	
मेंझेर्यिकोर्टेक्स·	मीझीर्यन·	
मोरीबाक्से·	मलबेर्रिझ·	तुतें·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी·व आरबी·
निंबूकत्वक्·	लिंबूकीछाल·	पोस्तेलिंबू·
निंबूकतैल·	लिंबूकातेल·	रोघनेलिंबू·
अतसी· उमा· क्षुमा·	आल्सिकीबीज·	तुखमेकतान+ बुजरक·
		खत्मी+ खबाजी·
		तुरंजबीन·+ तुरंगबीन·
		मुस्तकी·
मधु· माक्षिक·	मद·	शहद·+ अंगबीन·
गंधनाकुली·	पुदिन·	
तूत· तूल· ब्रह्मदारु·		शहतूत·+ तूत·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
मोस्कस·	मस्क·	कस्तूरी·
मेरिस्तिसेन्युक्लीई·	नत्मेग·	जायफळ·
मिर्री·	मिर्र·	बोळ·
ओलिबनम·	ओलिबनम·	
ओलेबे ओल्यम·	ओलिव ओईल·	
ओप्यम·	ओप्यम·	अफु·
ओपोपोनेसिसगम्मिरेझिना·		
ओरिगनम·	मार्जरम·	मर्वा·
ओवम·	एग·	आंडें·
पापावरिसकाप्स्युले·	पोपीहेड्झ·	पोस्त·
पित्रोल्यम·	मिनरलटार·	
पेमेंतेबाक्से·	आल्स्पेस + जामेकापेप्पर·	
पिपरिसलोजिंकुटस·	लोंग पेप्पर·	पिंपळी·
पिपरिशनेग्रीबाक्से·	ब्लाकपेप्पर·	मिरें·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी·व आरबी·
कस्तूरिका·सुगंधमुख्या·मृगमदा·	कस्तुरी	मुष्क·+ मिस्क·
जातीफल·	जायफळ·	जौझेबुवा·+ जौझेतैब·
बोल·गंधरस·	बोळ·	मर्र·
पालंक्या·	कंदरकुट·+ कंदर·	
	जलपाईकातेल·	रोघनेजैतून·
आफूक·अहिफेनक·मत्ताफेन·	अफीम·	अफ्युन·+ लबनुलखस्खाश·
		गावशीर+जावशीर·
मरुत्तक·मरुत्·मरु·	मर्वा·	मिर्जनजोश·
अंड·	अंडा·	बैझा·
आफूकवृक्ष·	पोस्त·	कोकनार·
भूमितैल·	मट्टीकातेल·	नफ्थ·
कणा·	पीपळ·	फिल्फिल्दराज·
मरीच·वल्लिज·	कालीमिर्ची·	फिल्फिलेअस्वद·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
पिक्स आब्यतैना·	बर्गंडीपिच·	
पिक्सलिक्विदा·	तार·	
प्लुंबीसबूकार्बोनास·	ह्वैटलेद+ सिरूस·	सफेदा·
प्लुंबी ओकूसिदमसेमिवित्र्यम·	लिथर्ज·	मुरदाड शिंग·
पोटास्सेनैत्रास·	नैतर+ साल्त पीतर:	सोरा·
पोटास्सेसुपर्टार्त्रास·	क्रीमर टार्टर·	
पोटास्सा इंप्यूरा·	ईंप्यूर पोटास्स·	
प्रूना·	प्रूंझ·	
प्टीरोकार्पीलिग्नम्	रेदसांडर्सवुद·	रक्तचंदन·
प्युलीज्यम·	पेन्नीरोयल·	
पैरिथ्रीरेदिक्स·	पेल्लितरीरुट·	अकलकरा·
क्वाश्येलिग्नम·	क्वाश्या·	
क्वेर्कस कोर्टेक्स·	ओकूबार्क·	

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी· व आरबी·
	सुफेद·	अस्फीदाज·
कंकुष्ट· कालकुष्ट·	मुर्दाशिंग·	मुर्दासिंज·
पांशुलवण· औरवर·	बाजी·	शोरा· + अक्कर·
		अलुबुखारा + ईजास·
क्षुद्रचंदन· रक्तांग·	लालचंदन·	संडलेसुर्ख + संडले अस्मर·
		आकर्करहा·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
रेझिनाफ्लेवा·	येल्लोरेझिन·	पिंवळी राळ·
राम्नीबाक्से·	बक्थोर्नेबेरिझ·	
रेइरेदिक्स·	रुबर्ब·	रेवाचिनी·
रीयदोस् पेटला·	रेदपोप्पी·	लाल पोस्त·
रिसिनी ओल्यम·	कास्तर् ओइल·	एरंडेल·
रोझेकानिनेपल्पा·	डोग्रोझपल्प·	
रोझेसेंटिफोल्येपेटला·	दामस्करोझपेटल्स·	गुलाबाचें फुल·
रोझेगाल्लिसेपेटला·	रेदरोझपेटल्स·	
रोस्मारिनीकाक्युमिना·	रोस्मरीतोप्स·	
रुब्येरेदिक्स·	मादररुट·	मंजिष्ठ·
साबिने फोल्या·	साविनलीव्झ·	
साक्करम·	श्युगर·	साखर·
साक्करमप्युरिफिकेटम·	प्युरिफैद श्युगर·	खडी साखर·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी·व आरबी·
शालनिर्यास· सर्जरस·		
	रेवंदचिनी·	रावन्द·
एरंडतैल·	रेंडीकातेल·	रोघनेबेदंजीर·
अविमुक्त·कामुक·भ्रमरोत्सव·	गुलाबकाफुल·	गुल+वर्द
विकसा·रक्तयष्टिका·रक्तांगी·	मंजिथ·	रुनास·
शर्करा·	खांड·	शक्कर+सक्कर·
खंड·	मिस्री·	नबात·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सागापीनम·		
सालेसिसकोर्टेक्स·	विल्लोबार्क·	
सांब्युसीफ्लोरेस·	एल्डरफ्लोर्झ·	
सेपोद्यूरस·	हार्दसोप·	कठीणसाबुण·
सेपोमोल्लिस·	सोल्फसोप·	मऊसाबुण·
सार्सापारिल्लेरेदिकुस·	सार्सापारिल्ला·	
सास्साफ्रासलिग्नम·	सास्साफ्रासवुद·	
सास्साफ्रासरेदिकुस·	सास्साफ्रासरुट·	
सास्साफ्रासकोर्टेकुस·	सास्साफ्रासबार्क·	
स्कामोन्येगंमीरेझिना·	स्काम्मनी·	
सिल्लेरेदिकुस·	स्किल्लुरुट·	
सेनिगेरेदिकुस·	राटलस्नेकरुट·	
सेन्नेफोल्या·	सेन्नालीवझ·	सोनामुरवी·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी·व आरवी·
	कंदल·	सक्किंज:
		अकती·
	सखत·साबुन·	साबुनेसखत·
	नरम साबुन·	साबुने नरम·
	सक्मुन्या·	महमुद + सक्मुन्या·
		इस्कील·
	सुनामुखी·	सन्ना·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सेर्पेंतेर्येरेदिकुस·	स्नेकरुट·	
सीवम·	स्युएट·	
सिमारुबेकोर्टेकुस·	सिमारुबाबार्क·	
सिनेपिससेमिना·	मस्तर्दसीड्झ·	मोहरी· राई·
सोदेम्युर्यास·	सीसाल्त·	मीठ·
सोदेसबोरास·	बोराकुस·	स्वागीरवार· सुहागीरवार·
सोदेसल्फास·	ग्लोबर्ससाल्त्स·	
सोदाईप्यूरा·	ईप्यूरसोदा·	
स्पार्शीईकाक्युमिना·	ब्रुमतोप्झ·	
स्पिरिटसरेक्टिफिकेटस·	रेक्टिफेदस्पिरिट·	
स्पिरिटसतेन्युयोर·	प्रुफस्पिरिट·	
स्पंज्या·	स्पंज·	
स्तान्निलिमात्युरा·	टिन्नफेलिंग्झ·	कथिल·
स्तेरेसिसबाल्समम·	स्तेराकुसबाल्दसम·	

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी व आरबी·
	भेरकी चर्बी·	
आसुरी·	राई·	इस्पंड + खर्दल·
सिंधुज· लवण·	लोन·	नमक·
धातुद्रावक· टंकण·	सोहागा·	बुरक·
	मुवाबादल·	अबरे मुर्द + इस्फंज·
वंग· त्रपु·	कलैकाचूर·	
		अस्तरक·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सक्सिनम·	आंबर·	
सल्फर·	सल्फर·	गंधक·
सल्फरसब्लिमेटम·	फ्लोझ्झ ओफसल्फर·	
टाबसीफोल्या·	तोबाक्कोलीवझ·	तंबाकु·
तामारिंडीपल्पा·	तामारिंडपल्प·	चिंच·
ताराकसिसीरेदिकुस·	दान्दिलैयनरुट्·	
टार्टरम·	टार्टर·	
टेरेबिंथिनाकानादेन्सिस·	कानदातर्पैतेन·	
टेरेबिंथिनाकैया·	सैप्रसर्पैतेन·	
टेरेबिंथिनावल्गेरिस·	कोम्मनतर्पैतेन·	
टेरेबिंथिने ओल्यम·		
टेरेबिंथिनावेनिता·	वेनिसतर्पैतेन·	
तेस्ते·	ऐस्तरशेल्झ·	शिंप·

संस्कृत.	हिंदुस्थानी.	फारशी. व आरबी.
	अंबर.	क़ह्रुबा + कर्णुल्बह्र.
गंधपाषाण. बलि. बलयसा.	गंधक.	गोगिर्द् + किब्रित.
	तंबाकु.	
अम्लिका. दंतशठा.	इम्ली.	तमरेहिंदी.
शुक्ति.		

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
तिग्लिईओल्यम·	ओइलओफतिग्लियम·	जेपाळाचेंतेल·
तोर्मेतिल्लेरेदिकूस·	तोर्मेतिल्लारुट·	
तोकूसिकोदेंड्रिफोल्या·	स्युमकलीवझ·	
तस्सिलेगो·	कोल्ट्सफुट·	
त्रागाकांथा·	त्रागाकांथ·	
वालीर्यनेरेदिकूस·	वालीर्यनरुट·	
वीरेत्रीरेदिकूस·	ह्वैटहेल्लेबोररुट·	
वैनम·	वेन·	दारु· सरा·
अल्मिकोर्टेकूस·	एल्मबार्क·	
युवेपास्से·	रेझिन्स·	खिसमिस·
युवेआर्सिफोल्या·	बेरबेरिलीवझ·	
जिंकम·	झिंक·	
जिंजिबरिसरेदिकूस·	जिंजररुट·	सुंठ·

संस्कृत·	हिंदुस्थानी·	फारशी·वआरबी·
जेपालतैल·	जमालगोटेकातेल·	रोघनेदंद्·
		तमूतम+समाक·
	कतीरा·	कतैयरा·
सुरा· मद्य·		
अबीजाद्राक्षा·		
विश्वा·		

याप्रकारें औषधांचीं नावें सांगीतलीं· आतां त्यांचे गुण वर्णितो·

कांहीं औषधांचे गुण सर्व शरीरावर होतात· व कांहींचे कांहीं अवयवांवर होतात· या भेदां प्रमाणें अन्य भेदही आहेत· त्यांचें तारतम्य करणें फार कामाचें आहे· जा औषधांचे गुण सर्व शरीरावर होतात· त्यांचे भेद पुष्कळ आहेत त्यांतें सांगतो· कांहीं औषधांचे गुण फार त्वरेनें होतात· व कांहींचे सावकाशीनें होतात· व कांहीं एकांचे एकामात्रें करून गुण होतात· व कांहीं एकांचे प्रतिदिवशीं देतां देतां होतात· व जा औषधांचे गुण लवकर होतात त्यांचे प्राय: लवकर जातात· व जांचे सावकाशीनें होतात त्यांचे बहुत काल राहातात· व जांचे गुण लवकर होतात तेहीं करून शरीर कार्यांचा त्वरित अधिकपणा होऊन त्वरित न्यूनपणा होतो व जांचे गुण सावकाशीनें होतात· तेहीं करून त्या कार्यांचा अधिकपणा हळु हळु होऊन सावकाशीनें दूर होतो· व न्यूनता फार होत नाहीं व जांचे गुण शरीराचे कांहीं अवयवांवर होतात· त्यांचे प्रकार पुष्कळ आहेत त्यांतें सांगतो· कांहीं औषधें भक्षित्यानंतर त्यांचे गुण पक्काशयावर होत नाहींत· आंतड्याचे एक्सहेलंत वाहिन्यांवर होतात· व कांहींचे गुण गुर्दांचे एक्सहेलंत वाहिन्यांवर होतात· व कांहींचे घर्म वाहिन्यांवर होतात· या अवयवांवर गुण करणारीं औषधें ढाळक· द्रावक· स्वेदकारी· आहेत· या प्रकारें अन्य अवयवांवर गुण करणारीं अन्य औषधें आहेत· त्या सर्वां मधून कोणतें एक देऊन अन्य उपचार झाला असतां अन्य अवयवांवर त्यांचे गुण होतात· सर्व शरीरावर व त्याचे अवयवांवर औषधांचे गुण होण्याचे प्रकार दोन आहेत· कांहीं औषधें भक्षित्यानंतर प्रथम शोषक वाहिन्यांनीं त्यांचें शोषण होऊन तीं रुधिराभिसरण मार्गाप्रत प्रविष्ट होऊन सर्व शरीरावर व तदवयवांवर गुण करतात· व कांहीं औषधें पक्काशया पासून नेर्वस द्वारा सर्व शरीरावर व तदवयवांवर गुण करतात· प्रथम प्रकारचें उदाहरण· पाऱ्याचीं औषधें घेतल्यानंतर शोषक वाहिन्यानीं शोषित होऊन लाळेचे पिंडांवर व इतर स्थळांवर गुण करतात· या प्रकारचे औषधांचे गुण जा स्थळां पासून पदार्थ उत्पन्न होतात त्या स्थळांवर प्राय: होतात व कांहीं औषधें रसाबराबर बाहेर निघतात· उदाहरण· सोरा भक्षित्यानंतर शोषक वाहिन्यानीं शोषित होऊन रुधिर वाहिन्यांप्रत प्रविष्ट होऊन गुर्दांचे सिक्रीटिंग वाहिन्यांप्रत जाऊन त्यांची क्रिया अधिक करतो तेणें करून मुतण्याचा अधिकपणा होतो व सोरा मूत्राबराबर बाहेर निघतो· द्वितीय प्रकारचे औषधांचे गुण नेर्वस द्वारा होतात· यास्तव फार लवकर होतात· शो

षक वाहिन्यां द्वारा इतके लवकर होत नाहींत· याचें कारण पक्वाशया पासून आंतड्यांत जाऊन शोषक वाहिन्यांनीं शोषित होऊन रुधिराभिसरण मार्गांत शिरल्यानंतर होतात· द्वितीय प्रकारचे औषधांचें उदाहरण· अफु· व सुरा· हीं घेतल्या नंतर तत्क्षणीं श्रम दूर होऊन रुधिराचें गमन लवकर होतें व यांचें अपरिमित प्रमाण कोणीं घेतलें असतां तत्क्षणीं इंद्रियें विकल होऊन मृत्युही येतो असें जाणावें· पूर्वोक्त दोन प्रकारचे औषधांचे गुण भक्षण केल्यानेंच होनात असें नाहीं बाह्य चर्मादिकांवर मर्दनादिक प्रयोग केला असतांही होतात· उदाहरण· अफु पातळ पदार्थाशीं मिळवून चर्मावर चोळून लावली असतां पीडा न्यून होतात· तंबाकु भिजवून किंवा वाटून पक्वाशयाचे सुमारानें बाहेर लावला असतां वमन होतें· लसून वाटून बांधला असतां रुधिराचें गमन त्वरेनें होतें· हे गुण नेर्वस द्वारा होतात· असें जाणावें· दुसर्ये प्रकारचीं उदाह० पाऱ्याचे औषधाचें चर्मावर मर्दन केलें असतां गुण होतात· या प्रमाणें अन्य औषधें करूनही गुण होतात· जखमेला औषधांचा उपचार केला असतां त्यांचें शोषण होऊन गुण होतात· हे सर्व गुण शोषक वाहिन्या द्वारा होतात· असें जाणावें· विषाचे उपद्रव नेर्वस व शोषक वाहिन्या या दोहीं करून होतात· या दोन कारणां वांचून गुण करणारीं अशीं औषधें मासनाशक अम्लनाशक अश्मरीहारक इत्यादिक आहेत असें जाणावें·

जांचे गुण सर्व शरीरावर होतात· अशीं औषधें सांगतो;

मदकारी·

अंगग्रहनाशक·

रेचक·

कोष्ठबंधक·

मदकारी व अंगग्रह नाशक यांचे गुण त्वरेनें होऊन त्वरेनें जातात·

रेचक व कोष्ठबंधक यांचे गुण सावकाशिनें होऊन बहुत काल पर्यंत राहातात·

जांचे गुण शरीराचे अवयवांवर होतात अशीं औषधें सांगतो·

वमक·

रेचक·

ऋतुद्रव·

द्रावक·

स्वेदकारी·

कफघ्न·

लालास्रावी·
नस्य·
स्फोटकारी·

पूर्वोक्त दोन कारणां वांचून गुण करणारीं औषधें सांगतो·

मांसनाशक·
अम्लनाशक·
अश्मरीहारक·
शीतकर·
द्रवकर·
मृदुकर·
स्निग्धकर·
कृमिघ्न·

या प्रकारें सर्व औषधांचे साधारण गुण वर्णिले· आतां विशेष गुणांच्या पुरस्कारें करून औषधांतें अनुक्रमें करून वर्णितो·

मदकारी·

जा औषधें करून शरीराची शक्ती आणि तदवयवांचें कार्य न्यून होतें त्यानां मदकारी ह्मणतात· यानां गुण फार आहेत· यास्तव जसा जसा गुण तसें तसें इंग्रेजी भाषेंत याचें नाम ठेविलें आहे या प्रमाणें येहीं करून निद्रा लागत्ये ह्मणोन यानां नर्कोटिक ह्मणजे निद्राकारी व पीडादूर होत्ये ह्मणोन अनोदिन ह्मणजे पीडा हारक व शरीरावयवांचें कार्य न्यून होतें ह्मणोन सेदातिव असें ह्मणतात· यांमध्यें सर्वांपेक्षां जें बलवंत आहे त्याचा मध्यम विभाग दिल्हा असतां जे परिणाम होतात त्यांतें सांगतो· नाडीचें बल अधिक होऊन पहिल्या पेक्षां जलद चालत्ये· व शरीरामध्यें रसाची उत्पत्ति पहिल्या पेक्षां अधिक होत्ये· व शरीरास बल अधिक आलें असें वाटतें व मनुष्य हर्षयुक्त आणि उन्मत्त असा दिसतो असें जाणावें· हे परिणाम बहुत वेळ राहात नाहींत कांहीं कालानंतर विपरीत परिणाम होतात त्यांतें सांगतो· नाडी औषध घेतल्या पूर्वीं जशी असत्ये तशी होत्ये· नंतर हळु चालत्ये व हस्तास नम्र होऊन फुगलेलीशी लागत्ये· व श्वासो-

श्वास मंद होतात· व घामा वांचून इतर रस न्यून होतात· पूर्वीं कांहीं पीडा असली तर न्यून होत्ये· व ग्लानी येत्ये· मनुष्य सुस्त आळशी असा होतो· चित्त स्थिर होतें· निद्रा येत्ये कांहीं काल निद्रा लागून जागृत झाल्यानंतर मनुष्य निर्बळ असा दिसतो· कधीं उह्लासे होतात· व काळजी लागत्ये· शरीर कांपतें असें जाणावें· व त्याचा मोटा विभाग दिल्हा असतां पहिले परिणाम होत नाहींत· दुसरे परिणाम होतात· व फार मोटा दिल्हा असतां मनुष्य प्रलाप करतो· अर्धांग विकल होतें· शरीर वळतें· मूर्छित पडून मृत्यु पावतो· असें जाणावें· या औषधांना वेगळे वेगळे गुण आहेत ह्मणजे कांहीं एकें करून पहिले परिणाम होत नाहींत· दुसरे परिणाम होतात· व कांहीं करून मदकारी गुण चांगले न होऊन पक्काशयास उपद्रव होतात· कांहीं करून उह्लासे होतात· व कांहीं एक रक्ताभिसरणावर मात्र गुण करतें· व कांहीं एक चित्त आणि इंद्रियें यांवर गुण अधिक करतें· यांचे गुण पक्काशया पासून सर्व शरीरावर त्वरेनें होतात· येणें करून ते नेर्वस द्वारा होतात· असें प्रसिद्ध होतें· रक्त वाहिन्या द्वारा असे जलद होत नाहींत· व अफु इत्यादिकांचें मर्दन केलें असतां आंग वळणें इत्यादिक पीडा न्यून होतात· व जा स्थलीं मर्दन करावें त्या स्थलीं गुण होऊन अन्य स्थलींही होतात· ते नेर्वस द्वारा होतात असें जाणावें· व ओल्या व्रणावर यांचें लेपन केलें असतांही गुण होतात· परंतु हृदाकडल्ये आंगास व्रणा जवळ दोरी बांधली असतां होत नाहींत· येणें करून यांचे गुण रक्त वाहिन्यांवर होतात असें जाणावें· व एका वैद्यानें लाहान जनावराला मदकारीचें अपरिमित प्रमाण दिल्हे नंतर मेलें असें पाहून त्याचें शरीर छेदन केलें· त्या वेळेस मेंदुचि शक्ति गेली हृदय स्फुरत आहे असें पाहून त्याचे फुफ्फुसांत फुंकणीनें फुंकर घातले त्या वायूचा संबंधानें रुधिर निर्मल होऊन हृदय कांहीं काल पर्यंत स्फुरत होतें· येणें करून या औषधांचे परिणाम प्रथम मेंदूवर होतात· हृदयावर तसे पुष्कळ होत नाहींत· असें फलित होतें· व कोणीं या औषधांचें अपरिमित प्रमाण भक्षिलें असतां प्रथम हृदयाचें स्फुरणें न्यून न होतां मेंदूची शक्ति जाऊन श्वासोश्वास बंद होऊन रुधिराभिसरण न्यून होत होत बंद होऊन मृत्यु येतो हें सर्वकाल स्मरणांत ठेवावें· एका वैद्यानें जनावराला विषासाठीं मदकारीचें फार मोटें प्रमाण दिल्हें बारा पळां नंतर श्वासोश्वास बंद होऊन हृदयाचें स्फुरणें राहिलें याचा प्राण श्वासोश्वासा वांचून सात पळें राहाणार नाहीं ह्मणोन त्याणें त्याचे गळ्यांत नळी घालून फुंकर घातले तेणें करून पुनः श्वासोश्वास शक्ति येऊन हृदयास पूर्ववत् स्फुरण शक्ति आली· चाळीस पळां नंतर जनावर उठून पूर्ववत् दिसलें· यास्तव कोणीं मनुष्यानें विषासाठीं मदकारीचें अपरिमि-

त प्रमाण घेतलें असतां असा उपचार करावा· कदाचित् कार्यावह होईल असें जाणावें· व एकावेळेस यांचें मोटें प्रमाण दिल्हें असतां पूर्वोक्त पहिले परिणाम स्पष्ट होत नाहींत· दुसरे परिणाम होतात· लाहान प्रमाण दिल्हें असतांच पहिले परिणाम होतात· हे परिणाम स्थीर राहावयास इछितात तर लाहान लाहान प्रमाण अल्प अल्प अवधी नंतर द्यावें· व दुसर्या परिणामा विषयीं मोटें प्रमाण मोट्या अवधि नंतर द्यावें· पहिले परिणाम व्हावयासाठीं लाहान प्रमाण ज्वर व निर्बल पण्यामुळें झालेले रोग इत्यादिकांवर देतात· तेणें करून निद्रा लागत्ये व आंगवळणें इत्यादिक पीडा दूर होतात· व यांमधून कांहीं औषधें ढाळ बहुत होत असतां त्यांचा प्रतिबंध करावयास चांगलीं आहेत· व यांमधून कांहीं औषधें अफु तंबाकु इत्यादिक यांचे गुण संवयें करून न्यून होतात यास्तव ज्यांनां यांचे भक्षणांची संवय आहे त्यानां यांचें द्यावयाचें अगत्य लागलें असतां नित्यापेक्षां यांचा अधिक भाग द्यावा· तेणें करून पूर्ण गुण होतात· व कांहीं औषधांचे गुण तसे न्यून होत नाहींत असें जाणावें· मदकारींचीं नावें सांगतो·

स्पिरिटस रेक्टिफिकेटस·
इथर रेक्टिफिकेटस·
कांफोरा· प्राकृत· कापुर·
ओप्यम· प्राकृत· अफु·
हैयोसियामि फोल्या·
बिलादोन्ने फोल्या·
दिजिटेलिस फोल्या·
टाबसी फोल्या· प्राकृत· तंबाकु·
स्त्रामोन्येसेमिना· प्राकृत· धुत्र्याचा बिया·
कोन्यी फोल्या·

या प्रकारें मदकारींचें साधारण वर्णन केलें· आतां एका एकाचें पृथक् विशेष वर्णन करितो·

स्पिरिटस रेक्टिफिकेटस·

याचा स्वच्छ करायाचा प्रकार औषधोत्पत्ति प्रकारामध्यें लिहिला आहे· हें चांगलें स्वच्छ झालें असतां स्वच्छोदका प्रमाणें दिसतें· याला उत्तम सुगंध व स्वाद तिखट आहे·

आहे· हें पाण्यांपेक्षां हलकें आहे· त्यावर घातलें असतां सर्वकाल तरतें· व जसें जसें हलकें असेल तसें तसें उत्कृष्ट जाणावें· व हें असें चपल आहे किं याचे पात्राचें तोंड बंद केलें नसतां सर्व त्वरेनें वायु मध्यें जातें· व फार सहज प्रदीप्त होतें· आणि नीलवर्ण ज्वाळा निघतात· धूर किमपि निघत नाहीं व यामध्यें वनस्पतींतले राळ· कापुर· तेल· गुळ· इत्यादिक सार पदार्थ वितळून सर्व निघतात· येणें करून व जाला लतीन भाषेंत स्पिरिटस तेन्युयोर आणि इंग्रेजी भाषेंत प्रुफस्पिरिट ह्मणतात· तेणें करून टिंक्तुरादिक उत्कृष्ट औषधें सिद्ध होतात· त्यांची सिद्ध करायाची कृति औषधोत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे· प्रुफस्पिरिट हें औषध चार भाग पाणीं तीन भाग या दोहोंचें मेलन आहे· कांहीं पदार्थांचे टिंक्तुरा विषयीं हें औषध चांगलें व कांहींचे टिंक्तुरा विषयीं प्रुफस्पिरिट चांगलें आहे असें जाणावें· याच्या मध्यम विभाग दिल्हा असतां पहिल्या पेक्षां रुधिरांचें बल अधिक होऊन गमन त्वरित होतें· व शरीराची शक्ति अधिक होत्ये· चित्त हर्षयुक्त होतें· कांहीं काला नंतर हे सर्व परिणाम न्यून होऊन मनुष्य सुस्त मंदमति असा होतो· मोटा विभाग दिल्हा असतां पहिले परिणाम त्वरेनें होऊन लवकर दूर होतात· नंतर उन्मत्तपणा होणें अघोर निद्रा लागणें इत्यादिक दुसरे परिणाम होतात अथवा पहिले परिणाम पुष्कळ होत नाहींत· दुसरेच परिणाम होतात· फार मोटा विभाग दिल्हा असतां पहिले परिणाम न होतां दुसरे परिणाम होऊन प्रायः मनुष्य त्वरेनें मृत्यु पावतो असें जाणावें· याचे गुण दुसर्या मदकारींचे गुणा प्रमाणें आहेत· परंतु अन्यापेक्षां येणें करून पहिले परिणाम अधिक होतात· यास्तव याला निर्बल पण्यांमुळें झालेल्या रोगांवर देतात· परंतु निद्रा लागणें पीडा दूर होणें इत्यादिक दुसरे परिणाम ह्वावयासाठीं कधिंही देत नाहींत· औषधार्थ बहुत करून याला एकल्याला पोटांत देत नाहींत· अग्निचा स्पर्शें करून दुःख होतें व हात पायांस आग जळत्ये त्यांचें शमन ह्वावयासाठीं व लाहानजखमें मधून रुधिर निघत असतां त्याचा प्रतिबंध ह्वावयासाठीं कधिं लावितात या प्रकारें एकल्याचा बाह्य उपचार करतात· व जाला इंग्रेजी भाषेंत वैन ह्मणतात असल्या मद्याचे गुण या औषधाचे गुणां सारिखे आहेत· परंतु तेणें करून पहिले परिणाम या सारिखे त्वरेनें होत नाहींत· सावकाशीनें होऊन कांहीं अवधि पर्यंत राहातात· यास्तव त्यालाही निर्बल पण्यांमुळें झालेल्या रोगांवर देतात असें जाणावें· व याचें प्रमाण उक्त नाहीं यास्तव जसे जसे याचे गुण चालतील तसे तसे चौकशीनें याचें प्रमाण द्यावें· व हें दिल्या नंतर नाडी पहिल्या पेक्षां चांगली हळु चालूं लागली प्रलापाचा न्यूनपणा झाला काळजी व चित्ताचा चंचलपणा दूर झाला निद्रा लागली तर हें हितावह झालें असें जाणावें· जर नाडी त्वरेनें चालूं लागली मुख आ-

रक्त झालें ताहान लागली शरीर संतप्त झालें व प्रलापाचा न्यूनपणा झाला नाहीं तर हितावह झालें नाहीं· अशीं लक्षणें झालीं असतां याचा प्रतिबंध करावा किंवा प्रमाण न्यून करावें· व या औषधा सारिखीं मद्यें फार प्रकारचीं आहेत· त्यां मधून कांहीं तुरट कोष्ठ बंधक अशीं व कांहीं गोड अन्य गुणक व कांहीं आंबट अशीं आहेत· या मुळें वेगळ्ये वेगळ्ये कार्याचे कामाचीं आहेत व फार दिवसांचे रोगें करून किंवा शरीरांतील रसाचा अधिक विसर्जनें करून निर्बलपणा झाला असतां फार उपयोगी आहेत असें जाणावें· व कोणीं मनुष्यानें दिवसान दिवस फार मद्य पान केलें असतां अजीर्ण पोट फुगणें काळिजाचे रोग इत्यादिक होतात व कोणीं एका वेळेस अति मद्य पान केलें तेणें करून उपद्रव झाले असतां वमक द्यावें· चांगलें वमन झाल्या नंतर सिर्के किंवा अन्य आंबट पदार्थ द्यावा·

येणें करून जीं औषधें सिद्ध होतात त्यांचीं नावें सांगतो·

आलकोहोल· स्पिरिटस कांफोरे· स्पिरिटस आम्मोन्ये· स्पिरिटस लवंड्युले· टिंक्त्युरा आलोएस· टिंक्त्युरा आस्साफेटिदे· टिंक्त्युरा बेंझोएनी कोम्पोसिटा· टिंक्त्युरा कास्तोरेइ· टिंक्त्युरा ग्युयेसी· टिंक्त्युरा फेर्री म्युर्याटिस· लेकोर हैड्रार्जेरी ओक्सिम्युर्याटिस· स्पिरिटस टेन्युयोर· या औषधां वांचून अन्य सर्व टिंक्त्युरें व सर्व अर्क प्रुफ स्पिरिटें करून सिद्ध होतात असें जाणावें·

इथर रेक्टिफिकेटस·

याची सिद्ध करावयाची कृति व रंगादिक औषधोत्पत्ति मध्यें उक्त आहेत· याचा गंध फार चांगला व हलकेपणा आलकोहोला पेक्षां अधिक आहे· शरीराचें कांहीं बाह्य स्थल उष्ण किंवा शीतळ व्हावयास इछितात तर हें त्या स्थलीं लावून तें स्थल हस्तानें आछादित केलें असतां उष्ण होतें· आछादित केलें नसतां शीतळ होतें· याचे गुण आलकोहोलाचे गुणां सारिखे आहेत· परंतु येणें करून पहिले परिणाम त्या पेक्षां त्वरेनें होऊन त्वरेनें दूर होतात· यास्तव त्याज पेक्षां फार कार्यां विषयीं हें चांगलें आहे असें जाणावें· दम्यावर फार उत्तम आहे· या विषयीं हें पोटांत द्यावें· आणि उष्ण पाण्यांवर हें थेंब थेंब घालून याची वाफ तोंडांत घ्यावयास सांगावी· तेणें करून दम्याची अवस्था श्वास लागणें ती प्राय: त्वरेनें दूर होत्ये· परंतु रोगाचा परिहार होत नाहीं· तशी वाफ पडशा वरही घ्यावयास सांगावी· परंतु या दोहों रोगां मध्यें मस्तकांत रुधिराचें आधिक्य असतां ही वाफ देऊं नये· कदाचित् देणें तर फार चौकशीनें द्यावी· व हें वायुगो

ळा

ळा धनुर्वायु यांवरही कामाचें आहे· दिल्यानंतर कांहीं काळ पर्यंत त्वरेनें आराम होतो· व विषूचिकेवरही द्यावें· येणें करून प्रायः वमनांचा प्रतिबंध होतो· दिल्यानंतर अर्ध घटिकेनें किंवा एक घटिकेनें हित झालें नाहीं· तर फिरून द्यावें· तसें उचकी वरही द्यावें· तेणें करून तिचा प्रतिबंध होतो· व अन्येद्युस्ज्वर आणि तृतीयक व चतुर्थकज्वर यांचे शीतावस्थेचे प्रारंभ वेळेस हें दिल्हें असतां तिचा प्रतिबंध होतो· परंतु यांचे बराबर कांहीं शूल किंवा इतर पीडा नसतां याला लादनमाशीं मिळवून द्यावें· व ज्वरा मध्यें आंग वळुं लागलें व वमन होऊं लागलें असतां द्यावें· तेणेंकरून त्यांचा प्रतिबंध होतो· व कोणांला गलबत लागून भोंवळ आणि वमन होऊं लागलें असतां हें दोन द्राम दोन औंस मद्यामध्यें घालून द्यावें· तेणेंकरून प्रायः त्यांचा न्यूनपणा होतो· व गलबतांत बसतो त्याला प्रायः अजीर्ण होतें· तें दूर व्हावयासाठीं हें चांगलें आहे· व जास्थलीं अग्नि लागून दुःख होतें त्यास्थलीं दुःखाचें शमन व्हावया विषयीं हें लावावयास चांगलें आहे असें जाणावें· याचें प्रमाण अर्ध द्रामापासून दोन द्राम पर्यंत आहे· परंतु यापेक्षां अधिक दिल्हें असतांही चिंता नाहीं· पूर्ण गुण व्हावयासाठीं हें अल्प अल्प अवधिनें द्यावें· याचें अनुपान थंड पातळ पदार्थ आहे· याला फार करून कापुराचे किंवा अफुचे औषधाशीं मिळवून द्यावें·

याचीं औषधें· **स्पिरिटस् एथरिस् सल्फ्युरिसी· स्पिरिटस एथरिस सल्फ्युरिसी कोंपोसिटस· स्पिरिटस् एथरिस् आरोमाटिकस्·**

काम्फोरा· प्राकृत· कापुर·

याची उत्पत्ति एकाच वृक्ष विशेषा पासून नाहीं अनेक सुगंध वृक्ष विशेषांपासून आहे· हा त्या वृक्षांचे काष्ठांत आणि सालींत असतो· जावा आणि सुमात्र या दोन द्वीपांमध्यें याची उत्पत्ति फार आहे· बहुत करून त्यांपासून या देशांत आणितात· याचा उत्पत्ति प्रकार सांगतो· वृक्षाचे काष्ठाचे लाहान लाहान तुकडे करून दोरीचे बारीक जाळ्यामध्यें घालितात· नंतर ज्याचा वरला भाग मृत्तिकेचा आहे· असल्या लोखंडाचा डमरु यंत्रांत पाणी घालून पाण्यांवर यंत्रांत जाळें लोंबतें बांधून यंत्राचे वरल्ये भागांत शुष्क तृण घालून यंत्र अग्निवर ठेवितात· नंतर पाण्यांचे वाफे बरोबर कापुर वरल्ये भागामध्यें तृणांवर येऊन जमतो· या प्रकारें उत्पन्न होतो· असें जाणावें· औषधार्थ स्वच्छ करायासाठीं हा वीस भाग घेऊन भाजलेल्या चुन्याचा कळ्या एक भाग त्यां बराबर डमरु यंत्रांत घालून याचें फुल काढावें·

स्वच्छ केलेल्याचे तुकडे प्रायः मोटे वर्त्तुलाकार दिवसांसारिखे असतात· व याचें तळ दोन अडीच अंगुळें जाड असतें व यामधून तेज येतें· व हस्तास स्निग्ध असा लागतो· व पाण्यांत घातला असतां तरतो· व उघडा राहिला असतां वायुमध्यें फार उडून जातो· यास्तव याचे पात्राचें तोंड च्यांगलें बंद करावें· व सहज प्रदीप्त होतो याचा ज्वाळा तेजस्वी बहुत धुरें करून युक्त अशा दिसतात· याचा रंग पांढरा गंध उत्तम व स्वाद तिखट कडुसा आहे· याचें चूर्ण आलकोहोलाचे दोन तीन बिंदू घातल्या वांचून कुटला असतां होत नाहीं· हा पाण्यामध्यें पुष्कळ विरघळत नाहीं· आलकोहोल इथर इत्यादिकांमध्यें फार चांगला विरघळतो· प्रायः याचा गोळ्या करून देत नाहींत· व याचें पाण्यांशीं मेलन करावयास इछितात तर गोंदाचे पाण्याबराबर· किंवा मग्निश्या बराबर व कुक्कुटांडांतील श्वेत पदार्थाबराबर करावें· त्यां वांचून होत नाहीं· याचें मध्यम प्रमाण दिल्हें असतां शरीर उष्ण व रुधिराभिसरण त्वरित होतें· व घर्म निघतो· कधिं चित्तही हर्षयुक्त होतें· त्यापेक्षां मोटें प्रमाण दिल्हें असतां आंगवळणें व इतर व्यथा दूर होतात· शूल न्यून होतो· निद्रा लागत्ये· अपरिमित प्रमाण दिल्हें असतां वमन भोंवळ प्रलाप आंगवळणें इत्यादिक होतात· हा मदकारीचे पहिले परिणाम व्हावयासाठीं सन्निपातज्वर सतप्तसन्निपातज्वर व उग्र गलांकुर यांवर चांगला आहे· तसा देवी दाट येऊन पुळ्या बाहेर न फुटून एकत्र होतात ते कांही चांगला आहे· व याला अफूशीं किंवा बार्काशीं मिळवून भक्षावयास दिल्हा असतां व्रणादिकांचे मांसाचे सडण्यांचे प्रतिबंधा विषयीं उत्तम आहे· व येणें करून रुधिराभिसरण फार त्वरित होत नाहीं· यास्तव पीडा काळजी इत्यादिक न्यून करावयासाठीं याला फुफुसदाह व पीडा युक्त अल्प दिवसांच्या वायू प्रमेह देवीं बराबरचें आंगवळणें उन्माद रोग यांवर सोरा आन्तिमनीचीं औषधें व अफु यांशीं मिळवून द्यावा· परंतु पूर्वीं रक्तस्रावादिक उपचारें करून त्यांचें बल न्यून केल्यावांचून देऊं नये· व कांथारिदेस मेजेर्यम पान्याचीं कांहीं औषधें हीं दिल्यानंतर पीडा होऊं लागली असतां व पत्विस्र सिह्ले करून उस्मासा किंवा क्लोमनाचे ठायीं कांहीं वाईट लक्षणें झालीं असतां तीं सर्व न्यून किंवा दूर व्हावयासाठीं हा कधिं कामाचा आहे असें जाणावें· व जा रोगामध्यें निर्बलपणा आहे त्या रोगावर याला आम्मोन्याचीं औषधें सुगंध रोचक औषधें अफु व बार्कादिक रोचकें यांमधून कोणत्या एका बराबर द्यावा· व दाहरोगावर कालोमेल· आंतिमनीचीं औषधें इत्यादिक स्वेदकारी दिजिटेलिस खारट ढालक यांमधून कोणत्या एका बराबर द्यावा· व वायुगोळा अंगग्रह व तसे अन्यरोग यांवर हिंग

वालीयेन आम्मोन्याचीं औषधें इत्यादिक अंगग्रहनाशकें व इथरादिक मदकारी यांमधून एकाशीं मिळवून द्यावा· व फुफ्फुसांचे रोगावर पल्विस्‌सिल्ले व ईपिकाक्युअंन यांशीं मिळवून द्यावा· व ज्वरामध्यें चैन पडत नाहीं तेव्हां हा दिल्हा असतां ती अवस्था दूर होऊन निद्रा लागत्ये· व घर्म निघतो असें जाणावें· याचें प्रमाण पांच ग्रेनापासून वीस ग्रेन पर्यंत आहे याला अल्प व मोठ्ये अवधीनें प्रमाणासारिखा देतात· परंतु मोठ्या प्रमाणेंकरून प्रायः वमन भोंवळ इत्यादिक होतात· यास्तव· तसा देऊं नये· पांच पांच ग्रेन दाहा दहा घटिकांचे अंतरानें द्यावा· तेणेंकरून याचे सर्व गुण होतात· फार करून याचें मिश्रण द्यावें· गोळ्या करून दिल्या असतां उह्मासे होतात· ज्वरामध्यें वमनाचा प्रतिबंध करावयासाठीं हा दोन तीन ग्रेन गोळी सारिखा करून कधिं देतात असें जाणावें· व बाह्यउपचारार्थ याला तेल आलकोहोल सिर्क यांमधून कोणत्या एकांत विरघळवून वायु पीडेचे स्थलावर मर्दन करितात· व तें मेलन लादनमाशीं मिळविलें असतां अतीसार पोटांतील शूल आंतड्याचा दाह रोग इत्यादिक रोगांविषयीं पोटावर मर्दन करावयासाठीं फार चांगलें आहे· व याचें पेज इत्यादिकांशीं मेलन करून क्षुद्र कृमिंवर चिपूनळीनें मलद्वारांत सोडिलें असतां उत्तम कृमिघ आहे· व कापुर आणि अफु यांची गोळी किडलेल्ये दांतांचे छिद्रामध्यें घातली असतां त्यांची पीडा न्यून होत्ये· व हा वीस अथवा तीस ग्रेन स्निग्धकर लबद्यामध्यें मिळवून वृषण आणि मलद्वार यांचे मध्यदेशावर लाविला असतां शिश्नाचें दुःख आणि सुजणें जें रात्रीस होतें त्याचा परिहार होतो· व आलेल्या डोळ्यानां जें औषध लावावयाचें असतें त्यामध्यें याला कधिं मिळवितात· व कोणीं याचें अपरिमित प्रमाण भक्षिलें असतां त्याचा चांगला उतार अफु आहे असें जाणावें·

याचीं औषधें· मिस्त्युरा काम्फोरे· स्पिरिटस्‌ काम्फोरे· टिंक्त्युरा काम्फोरे कोम्पोसिटा· लिनिमेन्तम काम्फोरे· लिनिमेन्‌तम काम्फोरे कोम्पोसिटम· लिनिमेन्‌तम सापोनिस·

ओप्यम·प्राकृत·अफु·

ही पोस्त झाडाचे फलाचा शुष्क चीक आहे तीं झाडें फार देशांमध्यें आहेत· परंतु माळव्यामध्यें विशेष आहेत· ही त्यांचे सर्व पदार्थांमध्यें आहे परंतु फलामध्यें फार आहे त्यापासून काढावयाची कृति सांगतो· खसफल पांढरेंसें दिसूं लागतें आणि त्याचें पुष्प आपल्ये आपण गळून पडतें अशा त्या अर्धपक्व फलाचे सालीला सूर्यास्ता-

चे वेळेस भोंवताल्या शस्त्राचे अग्रानें खालून वर पर्यंत खोल उभ्या रेषा कराव्या· अशा किं आंतील पोकळ स्थला मध्यें शस्त्र न जाई· नंतर रात्रीस दंव्हर पडतें त्यामुळें त्या रेषांतून चीक फार निघतो त्याला मोठ्या पाहांटेस कर्णी सारिख्या लाहान पदार्थानें काढून लाहान मडक्यांत किंवा नारळाचे बेल्यांत अथवा तांब्याचे पात्रांत जमवून उन्हांत ठेवून दाट होई तों पर्यंत काष्ठानें घाटावा· याला फार करून वृद्ध मनुष्य किंवा मुलें काढतात· नंतर त्याचा वड्या करून त्यांवर पोस्ताचीं किंवा तंबाकूचीं पर्णें लावून अन्य मडक्या मध्यें शुष्क होण्यासाठीं ठेवाव्या· अशी कृति जाणावी· अफूचा गंध रंग स्वाद इत्यादिक सर्वांस ठाऊक आहेत· हिचा वड्या कांहीं वर्त्तुलाकार असतात· हिचे मध्यें काथ राख इत्यादिक पदार्थ घालून अधिक वाढवितात· यास्तव हिचे परीक्षेचा प्रकार सांगतो· जी फार मृदु किंवा हलकी अथवा फुस्कुशित किंवा स्निग्ध अशी लागत्ये· व जिचा रंग फार काळा आहे· व जींत अन्य पदार्थ दिसतात· व जिचा गंध अल्प किंवा जळक्या पदार्थांचे गंधा सारिखा आहे· व जिचा स्वाद अल्प कडु किंवा गोड असा आहे· व जिची रेघ कागदावर ओढिली असतां काळी किंवा भुरी एक सारिखी दिसत्ये· ती अफू वाईट समजावी· जिला शुष्क करून चूर्ण केलें असतां पिवळें भुरें असें दिसतें ती अफू चांगली आहे असें जाणावें· ही निद्रा आणावयासाठीं व शूलादिक पीडा दूर करावयासाठीं व शरीर कार्यांची न्यूनता करावयासाठीं सर्व इतर मदकारीं पेक्षां चांगली आहे· जाला हिचे भक्षणांची सवय नाहीं त्या मनुष्याला हिचें मध्यम प्रमाण एक ग्रेन दिल्हें असतां अल्प अवधी नंतर नाडी पहिल्या पेक्षां भरून बळानें त्वरित चालत्ये· व त्यापेक्षां थोडें अधिक प्रमाण दिल्हें असतां चित्त कांहीं हर्षयुक्त होतें· शरीरकार्यें आणि चित्ताचा कल्पना अधिक होतात· व कधिं मत्त होतो· आणि बडबड करितो· हीं लक्षणें बहुत काल पर्यंत राहात नाहींत· कांहीं काला नंतर नाडी पहिल्या सारिखी चालूं लागत्ये नंतर त्या पेक्षांही तिचें बल आणि गमन न्यून होतें· परंतु प्रायः भरलेपणा तसाच असतो· व डोळ्यानां झांपण पडत्ये व पीडा असली तर मंद होत्ये· व कांहीं अवधी पर्यंत निद्रा लागत्ये· कदाचित् निद्रा न लागली तर चित्त व देह यांस सुख होऊन मनुष्य शयन स्थानावर स्तब्ध राहातो· ही अवस्था कांहीं घटिका पर्यंत राहात्ये· व ही दिल्यानंतर निर्बल पणा होत नाहीं· व चर्म उष्ण होतें· आंगाला घामाचा चिकटा येतो· शरीरांतील इतर रस निघण्यांची न्यूनता होत्ये· व प्रायः कांहीं ताहान लागत्ये· व जाला हिचे भक्षणांची सवय नाहीं तसल्या मनुष्याला पूर्वोक्त लक्षणें झाल्यानंतर प्रायः कांहीं उह्लासा किंवा कपाल शूल होतो व आंतड्याचीं आंतील पदार्थांचें प्रवा-

हण करावयाची शक्ति मंद होऊन पोट फुगतें· क्षुधा मंद होत्ये· भक्षिलें असतां कांहीं अजीर्णही होतें असें जाणावें· व ही दिल्या नंतर सर्वकाल सुगुणच होतात असें नाहीं कधीं दुःस्वप्नें फार पडतात· व चैन पडत नाहीं· डुलक्या येतात· ग्लानी भोंवळ उह्मासे इत्यादिक होतात· व हिणें करून पहिले परिणाम होतात ते अडिच घटिकां पर्यंत राहातात· दुसरे परिणाम सोळा अथवा वीस घटिकां पर्यंत राहातात· व हिणें करून घर्मा शिवाय शरीरांतील इतर सर्व रसांची उत्पत्ति न्यून होत्ये· आंतडीं व गुर्दे यांतील रसाची विशेषें करून होत्ये· पूर्वोक्तें करून प्रसिद्ध होतें किं रोगावर अफु फार उत्तम औषध आहे· परंतु हिचें फार मोटें प्रमाण दिल्हें असतां पहिले परिणाम फार अल्प होतात· नंतर नाडीचें स्फुरणें अकस्मात मंद होतें डुलक्या येऊन तत्क्षणीं अघोर निद्रा लागत्ये· मनुष्य घोरतो· व प्रलाप करतो· शीतळ घर्म येतो· श्वास लागतो· आंग वळतें· अंग विकृती होत्ये· व कधिं मृत्यूही येतो· असें जाणावें· व हिचे गुण रक्तवाहिन्यां द्वारा होत नाहींत पक्वाशया पासून सर्व शरीरावर नेर्वस द्वारा होतात· हिला संतत ज्वरामध्यें गात्र विक्षेप प्रलाप आंग वळणें इत्यादिक दूर होऊन निद्रा लागावया साठीं देतात· या विषयीं हिचें पूर्ण प्रमाण रात्रीस द्यावें· त्या लक्षणांचें प्राबल्य असलें तर दिवसासही द्यावें· व दाह रोगाचीं कांहीं लक्षणें असतां किंवा मस्तकामध्यें रुधिराचें आधिक्य असतां हिला चौकशीनें द्यावी· अथवा देऊं नये· कारण तसें असतां प्रायः हिणें करून पीडा न्यून होत नाहीं निद्रा लागत नाहीं· व दाह रोगाचीं लक्षणें अधिक होतात· व प्रलापाचें आधिक्य असून ही दिल्ही असतां उपद्रव होतो· व शरीर फार उष्ण आणि शुष्क असतां हिला देऊं नये· दिल्हि असतां त्यांचें आधिक्य होतें· व ताहान लागत्ये चैन पडत नाहीं· शरीर ओलसर असून दिल्ही असतां चैन पडतें· व निद्रा लागत्ये· यास्तव ती पहिली अवस्था उष्णोदक प्रक्षालनादिक उपचारें करून दूर किंवा न्यून करून नंतर हिला द्यावी· व हिला फार वेळेस दिल्यानें पोट फुगतें· यास्तव त्या समयीं दाळकादिक उपचार करावे· व ही अन्येद्युस ज्वर तृतीयक व चतुर्थक ज्वर यांवर चांगली आहे· त्यांचे येण्याचे पूर्वीं द्यावी· तेणें करून कधिं त्यांचें निवारण होतें अथवा न्यून येतात· ह्मणजे त्यांची उष्णावस्था न्यून होत्ये· व निद्राही लागत्ये· व ज्या समयीं बार्करेचा बराबर त्वरेनें बाहेर निघतें· त्या समयीं तें हिशीं मिळवून दिल्हें असतां त्वरेनें बाहेर न निघून त्याचे गुण होतात· यास्तव तें हिशीं मिळवून ज्वरावर अन्य औषधाचे साहाय्या साठीं देतात· व ही सर्व प्रकारचा वायूवर चांगली आहे आंन्तिमनीचीं औषधें व ईपिकाक्युअन कालोमेल इत्यादिक स्वेदकारांशीं मिळवून द्यावी· तेणें करून पीडेची फार

न्यूनता होऊन रोग्याचें बल कांहीं न्यून होत नाहीं व त्या रोगाचें प्राबल्य असून त्या बराबर ज्वर आहे तर ही एक ग्रेना पासून दोन ग्रेन पर्यंत कलोमेल चार ग्रेना पासून दाहा ग्रेन पर्यंत ईपिकाक्युअन तीन ग्रेना पासून साहा ग्रेन पर्यंत घेऊन या तिहींचें मेलन करून गुण होईल किंवा तोंड येईल तों पर्यंत प्रति दिवशीं एक दोन वेळ द्यावें· व जाचे बराबर आंगवळणें आणि जाची पीडा कांहीं कालाचे अंतरानें होत्ये असल्या वायूवर हिला कालोमेल ब्लुपिल सिंकोना इत्यादिकां मधून कोणत्या एकाशीं मिळवून द्यावी· दिल्या नंतर पोट फुगलें असतां उष्ण दाळक द्यावें· व ही जा मध्यें दाह रोगाचीं लक्षणें नाहींत असा कठिण फार दिवसांचा खोखला त्यावर चांगली आहे· रात्रीस द्यावी· तेणें करून त्याची न्यूनता होत्ये· व कधिं गुण ही होतो· व कठिण दासें करून फुप्फुसांत दाह रोगा सारिखीं लक्षणें होतात तेव्हां ही दिल्ही असतां त्या रोगाचें कारण दांस तिचा परिहार होऊन नंतर त्याचाही परिहार होतो· व हिणें करून जा दाह रोगाचे कारणाचा परिहार होत नाहीं· त्या दाह रोगाचे प्रारंभ कालीं हिला देऊं नये· दिल्ही असतां कार्यावह होत नाहीं· अपकार करत्ये· अन्य उपचारानें त्याचे बलाचें शमन करून द्यावी· व दाह रोगाचे लक्षणांचें शमन झाल्या नंतर खोखला व इतर पीडा राहिली असतां हिला द्यावी· तेणें करून त्यांची न्यूनता होऊन निद्रा लागत्ये· तशी जा देवींचे उग्रमा पूर्वीं आंगवळतें त्या देवीं मध्यें व इतर तशा रोगां मध्यें निर्बलपणा झाला असतां द्यावी· दिल्या नंतर पोट फुगलें असतां त्याचे निवारणा विषयीं अगत्या सारिखें दाळक द्यावें· व ही उग्र गलांकुरावर चांगली आहे· परंतु दाह रोगाचीं लक्षणें असतां देऊं नये· तशी निर्बल स्त्रियांचे गर्भाचा पात झाल्या नंतर गर्भाशया पासून व क्षयरोगा मध्यें फुप्फुसां पासून रुधिर फार निघतें· त्याचे व प्रदर संबंधी रुधिराचे प्रतिबंधा विषयीं शरीरांत रक्ताचें आधिक्य नसतां व त्याचें गमन त्वरित होत नसतां चांगली आहे· तशी गर्भिणी स्त्रियेची प्रसूत वेळ जवळ येऊन फुप्फुसां पासून किंवा पक्वाशया पासून रुधिर निघत असतां चांगली आहे· रक्त काढल्या नंतर द्यावी· तशी अती सारावर फार चांगली आहे· या रोगावर एकठीलाच देऊं नये· पाऱ्याचीं औषधें व स्वेदकारी यां बराबर द्यावी· तेणें करून पोटांतील मुरडादिक पीडा न्यून होऊन रेचांचा प्रतिबंध होतो व घर्म सुटतो· परंतु त्या बराबर दाह रोगाचीं लक्षणें असतां त्यांचे अन्य उपचारानें शमन केल्या वांचून देऊं नये· तीं लक्षणें असून मुरडा फार असला तर त्याचे शमना विषयीं हिजपेक्षां एक्स्त्राक्टम हेय्योस्यामी द्यावयास चांगलें आहे· हिणें करून रेचांचा अकस्मात प्रतिबंध झाला असतां एरंडेलादिक ढाळकां मधून कोणतें एक अगत्या सारिखें द्यावें· व ही पडशावर का-

माची आहे हिणेंकरून त्याचें दुःख दूर होतें परंतु त्या बराबर दाह रोगाचीं लक्षणें असतां व त्याचे प्रारंभकालीं एकलीला देऊं नये दिल्ही असतां त्याची वृद्धि होत्ये· आन्तिमनीचे कोणत्या एक औषधा बराबर किंवा कांहीं एक स्वेदकारी औषधा बराबर द्यावी· तेणेंकरून घर्मही निघतो· तशी क्षयरोगामध्यें त्याचे लक्षणांचें शमन होऊन निद्रा लागावयासाठीं चांगली आहे· व ही जाजा रोगांमध्यें आंग वळतें त्या त्या रोगांवर विशेषेंकरून चांगली आहे· व यांमधून कांहीं एक रोग केवल हिणेंकरून दूर होतात· व अपस्मारावर चांगली आहे· जा अपस्माराचें रात्रीस प्राबल्य होतें त्यावर विशेष चांगली आहे· हिणेंकरून तो रोग दूर होत नाहीं त्याचें शमन मात्र होतें· ह्मणोन त्या रोगावर हिला कस्तूर्यादिक अन्य औषधांचे साहाय्यासाठीं द्यावी· परंतु शरीरांत रक्ताचें आधिक्य असतां देऊं नये दिल्ही असतां उपद्रव होतो· व धनुर्वायुवर हिचें फार मोटें प्रमाण लाहान अवधिनें दिल्हें असतांही गुण सर्वकाल होत नाहीं· त्या पूर्वी बलवंत रेचक देऊन तें प्रमाण कालोमेलाशीं मिळवून दिल्हें असतां कधिं होतो· तसा पिसाळलेल्या कुत्र्याचा दंशेंकरून जो रोग होतो त्यावर हिचें अति मोटें प्रमाण दिल्हें असतां होत नाहीं· या रोगावर एका वैद्यानें तीस घटिकांत हिचे १८० ग्रेन दिल्हे परंतु तेंही करून किमपि गुण झाला नाहीं· व स्त्रियांचे पोटांतल्या वायुगोळ्याची अवस्था दूर करावयासाठीं हिला पोटांत द्यावी· अथवा चिपूनळीनें मलद्वारांत सोडावी· परंतु फार अगत्यावांचून देऊं नये आणि दिल्यानंतर उष्ण रेचकें करून पोटाची मुक्तता करावी· व दम्यावर अति उत्तम आहे· हिणेंकरून तो दूर होत नाहीं· त्याचें शमन मात्र होतें· या विषयीं इथर सल्फ्युरिकमाशीं मिळवून द्यावी· व कोणी पोटांतल्या शूलावर हिला रेचकाशीं मिळवून देतात· परंतु या विषयीं ही एक्स्याक्टम हेयोस्यामी प्रमाणें चांगली नाहीं व त्या बराबर दाहरोगाचें कांहीं लक्षण असतां देतां येत नाहीं· व जरीमरीवर फार चांगली आहे· हिचें पूर्ण प्रमाण सुरा सुगंध औषधें कालोमेल इत्यादिकां बराबर तो रोग दूर होई तोपर्यंत अगत्या प्रमाणें अवधिनें द्यावें· तशी संग्रहणीवर चांगली आहे हिणेंकरून रेचांचा व मुरड्याचा प्रतिबंध होतो परंतु रेचांचा अकस्मात प्रतिबंध होऊन रोगाचा कारण जो मळ तो न निघून रोगाचा फिरून उग्रम होईल अशी देऊं नये· व जेणेंकरून डाव्ये बरगड्यांत आघ होत्ये· आणि पक्काशयांत स्वादरहित पाण्यासारिखा पदार्थ उत्पन्न होऊन तोंडांत येतो· ह्मणजे तोंडाला पाणी सुटतें असा पक्काशयाचा एक रोग आहे त्याचें हिणेंकरून शमन होतें व कांहीं कारणानें पक्काशय अति हळु होऊन कठीण वमन होत असतां त्याचे प्रतिबंधाविषयीं हिला एकलीला किंवा कापुराशीं मिळवून द्यावी· व जाकालीं पित्त कठिण होऊन पित्तवाहिन्यांत जाऊन दाद्यासारिखें बसतें तेणेंकरून पित्तप्रवाह बंद

होऊन एक प्रकारची कांबिण होत्ये त्याकाळीं हिला द्यावी तेणेंकरून कांहीं हित होतें· तशी गुर्दींत सिकता जमून त्यांमधून निघून ते व क्लोमन् यांचे मध्यें जो मूत्र मार्ग आहे त्यांत जाऊन दाटूया सारिखी बसली असतां द्यावी· तेणेंकरून तो मार्ग मोकळा होऊन पीडा न्यून होत्ये· व कोणीं हिला क्लोमनांत सिकतेकरून फार पीडा होत असतां देतात· परंतु ती विषयीं ही एक्स्याक्टम हेयोस्यामी प्रमाणें चांगली नाहीं· कारण हिणेंकरून पोट फुगतें व कधिं मुतणें फार न्यून होतें आणि पूर्वीं सिकता पडत असत्ये तितकी त्या बराबर पडत्ये· तेणेंकरून दुःख फार होतें· कदाचित् देणें तर पोट न फुगे व मुतणें न्यून न होई अशी द्यावी· फुगलें असतां ढाळकेंकरून मोकळें करावें· व मुतणें न्यून झालें असतां हिचा प्रतिबंध करावा· व हिला उपदंशावर कालोमेल आणि ब्लुपिल येहींकरून रेच न व्हावयासाठीं त्यांशीं मिळवून द्यावी· व मोटा व्रण होऊन फार दुःख होत असतां त्याचें शमन व्हावयासाठीं द्यावी· व कांहीं व्रणाचें मांस सडून किंवा शरीराचे कांहीं स्थलीं मांस सडायाचा आरंभ होऊन पीडा फार होत असतां किंवा आंग फार वळत असतां द्यावी· व जेव्हां प्रसूत झाल्यानंतर रक्त फार निघूं लागतें तेव्हां ही चांगली आहे· त्याविषयीं हिचें मोटें प्रमाण द्यावें· व ही दाह रोगाचीं लक्षणें असतां कोणत्याही रोगावर व शुष्क ढांस असतां फुप्फुसांचे रोगावर व उन्माद रोगावर कांहीं कार्याविषयीं द्यावयास नीट नाहीं त्यांवांचून बहुत एक रोगांवर आंगवळणें इत्यादिक पीडा दूर होऊन निद्रा लागावयासाठीं सर्व औषधांमध्यें ही उत्कृष्ट आहे· व जा रोगांवर ही किंवा हिचें अन्य औषधाशीं केलेलें मेलन निष्फल होतें असे रोग फार थोडे आहेत· व हिचे मर्दनादिक बाह्य उपचार केल्यानें कपालशूल भोंवळ उह्मासे पोट फुगणें इत्यादिक उपद्रव न होतां मद कारि गुण होतात· हिचें तुरुस्या तेलाशीं किंवा कापुराचे तेलाशीं मेलन करून मर्दन केलें असतां किंवा हिचे टिंक्युराचें केलें असतां कार्यावह होतें· व पोटावर केलें असतां सुरडा न्यून होतो· व तशा मर्दनेंकरून स्त्रियांचे पोटांतील वायुगोळा मूत्र कृच्छ्र इत्यादिक रोग न्यून होतात· व दांत खिळी बसली असतां तोंडाचे जबड्यावर मर्दन केल्यानें हित होतें· परंतु हिचें मर्दन एकलेंच कार्यावह होत नाहीं· अन्य औषधास साहाय होतें· व दांतांस किड लागून पीडा होत असतां हिची लाहान गोळी दांतांचे किडलेल्या स्थलामध्यें घालावी· तेणेंकरून पीडेचें शमन कधिं होतें· तसें हिचें टिंक्युर गालावर चोळून लावलें असतां ही होतें· व अती सारांतला मला व रोध मूत्र कृच्छ्र व कांहीं कारणेंकरून प्रमेहाचा अकस्मात प्रतिबंध होऊन शिश्नाचे मूळा जवळ कठिण पीडा होत असतां त्या सर्वांचे शमना विषयीं हिला अन्य औषधाशीं मिळवून चिप्नळीनें मल द्वारांत सोडावी· तशी मल द्वार व मूत्र द्वार यांचे रोगांचे पीडेचे

शमना विषयीं ही सोडावी· किंवा हिचें टिंक्त्युर सोडावें·या विषयीं टिंक्त्युर अर्ध किंवा एकद्रामापेक्षां उणें घेऊनये· ही किंवा हिचें टिंक्त्युर सोडिल्यानंतर बाहेर निघालें तर साबुणाबरोबर हिची गोळी किंवा लेखणी सारिखी वळवटी करून मलद्वारांत घालावी· तेणेंकरून चिप्नळीनें सोडिल्या सारिखें हित होतें· या विषयीं हिचें प्रमाण दोन ग्रेना पासून पांच ग्रेन पर्यंत आहे· व प्रमेहामध्यें मुतायाचे वेळेस शिश्नाला फार आग जळत असतां तिचे शमना साठीं हिचा किंवा हिचे टिंक्त्युराचा थोडा भाग घेऊन शिश्नांत चिप्नळीनें सोडायाचे औषधांमधून एकाशीं मिळवून चिप्नळीनें शिश्नात सोडावा· व डोळ्यांचे कांहीं रोगा विषयीं हिचा किंवा हिचे टिंक्युराचा थोडा भाग घेऊन अन्य औषधाशीं मिळवून डोळ्यांचे आंत व बाहेर लावावा· व हिला पाण्यांशीं मिळवून त्यांत वस्त्र भिजवून व्रणावर लाविलें असतां पीडा न्यून होत्ये असें जाणावें· हिचें प्रमाण जसे गुण करायाचे असतील व जसा रोगाचा काल व जसें त्याचें प्राबल्य त्या प्रमाणें वेगळें वेगळें आहे· जाला हिचे भक्षणाची सवय नाहीं त्या मनुष्याला हिचें मध्यम प्रमाण एक ग्रेन किंवा सवा ग्रेन आहे· व कठीण पीडा दूर करावयासाठीं त्याज पेक्षां मोटें प्रमाण द्यावें· व पूर्वीं मदकारींचे साधारण वर्णनामध्यें जे पहिले परिणाम लिहिले आहेत ते व्हावयासाठीं ही पाव पाव ग्रेन लाहान अवधिनें द्यावी· व तेथें जे दुसरे परिणाम लिहिले आहेत ते व्हावयासाठीं हिचें प्रमाण एक अथवा दोन ग्रेन अगत्या प्रमाणें लांब अवधिनें द्यावें· कठीण रोगावर पीडादिक न्यून होऊन निद्रा यावयासाठीं तसें प्रमाण दिल्हें असतां चार पांच घटिकानंतर निद्रा आली नाहीं तर फिरून द्यावें· आणि रोग्याजवळ गलबला होऊं देऊं नये· व हिला प्रतिदिवशीं दिल्ही असतां सवयें करून हिचे गुण उत्तरोत्तर न्यून होतात· ह्मणजे प्रारंभकालीं जा प्रमाणानें जसे गुण होतात तसे गुण कांहीं कालानंतर त्या प्रमाणें करून होत नाहींत· याज करितां प्रतिदिवशीं देण्याचें अगत्य लागलें असतां कांहीं कालानंतर पहिल्यापेक्षां मोटें प्रमाण द्यावें· व जाला हिचे भक्षणाची सवय आहे त्या मनुष्याला अगत्या सारिखें मोटें प्रमाण द्यावें· व धनुर्वायु कुत्र्याचा दंशें करून उत्पन्न झालेला रोग इत्यादिकांवर हिचें फार मोटें प्रमाण द्यावें व निद्रा यावयासाठीं हिचें लाहान प्रमाण दिल्हें असतां निद्रा येत नाहीं· काळजी अधिक लागत्ये· व इतर लक्षणें होतात· व फार मोटें प्रमाण दिल्हें असतां उह्लासे ताहान कधिं प्रलाप इत्यादिक होतात असें जाणावें· हिचा गोळ्या करून द्याव्या अथवा हिचें टिंक्युर द्यावें त्याला इंग्रेजी भाषेंत लादनमहीं ह्मणतात· जर हिचे गुण सावकाशीनें व्हावयास इच्छितात तर हिचा गोळ्या द्याव्या किंवा चूर्ण द्यावें· त्वरेनें करूं इच्छितात तर हिचें टिंक्युर द्यावें त्याचें प्रमाण हिचे एक ग्रेनाचे स्थानीं वी-

समिनिम आहे·हिणें करून उह्मासा व कपाल शूल कधिं होतो·ते न व्हावयासाठीं हिला इथर कापुर आम्मोन्याचीं औषधें व सुगंध रोचकें यांमधून कोणत्या एका बराबर द्यावी·व पोट फुगलें असतां अगत्या सारिखें नम्र ढाळक देऊन मोकळें करावें व हिचीं औषधें पुष्कळ आहेत·त्यांचे विशेष गुण व सिद्ध करावयाची कृति प्रमाण इत्यादिक औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत·व ही मुलानां मोठ्या अगत्या वांचून कधीं ही देऊं नये·दिल्ही असतां कधिं फार उपद्रव होतात ह्मणजे भुक लागत नाहीं·जेवलें असतां जिरत नाहीं व सर्वकाल निद्रा लुशीं होतात·मोठ्या अगत्या मुळें देणें तर चौकशीनें द्यावी·कारण सर्व मुलानां हिचे गुण समान होत नाहींत·कांहीं मुलें हिचा थोड्या भागें करून मेलीं आहेत·व हिचा भक्षणें करून चित्तास हर्ष होतो·या मुळें हिला प्रति दिवशीं उत्तरोत्तर अधिक अधिक भक्षिली असतां भुक लागत नाहीं·शरीर शुष्क होतें·इंद्रियें मंद होऊन मनुष्य बुद्धि भ्रष्ट होतो·व शरीराची शक्ति आणि बुद्धि सर्व जाऊन अकालीं मृत्यु पावतो असें जाणावें·व कोणीं विषासाठीं हिचें अपरिमित प्रमाण भक्षिलें असतां जीमध्यें हालविल्यानें जागृत होत नाहीं अशी घोर निद्रा लागत्ये·व नाडी फार भरून हळु चालत्ये·तोंड तांबडें होतें·श्वासोश्वास फार लांब होतात·हीं लक्षणें त्वरेनें दूर झालीं नाहींत·तर अधिक अधिक होऊन मृत्यु येतो·अशीं लक्षणें दूर करावया साठीं सर्व औषधांपेक्षां वमक औषधें चांगलीं आहेत·परंतु त्यांमध्यें जिन्सी सल्फास मोर्चुत आम्मोन्ये सब् कार्बोनास हीं बलवंत आहेत·यांचीच योजना करावी·पहिल्यानें जिन्सी सल्फास द्यावें तेणें करून त्वरेनें वमन झालें नाहींतर मोर्चुत द्यावें·तेणें करून ही कदाचित् न झालें तर आम्मोन्ये सब् कार्बोनास द्यावें·त्यांचें वर्णन पुढें वमक औषधां मध्यें केलें होईल·त्यांचे साह्याच्यासाठीं गळ्यांत बोटें किंवा इतर पदार्थ घालित असावा तेणें करून फार वमन होतें·वमन झाल्यानंतर सिर्के लिंबूचा रस इत्यादिक आंबट पदार्थ पाण्यांशीं मिळवून प्यावयास द्यावे·आणि त्याला झोंप लागुं देऊं नये·तिचे निवारणासाठीं त्याला हालवावा किंवा शक्ति असल्यास चालवावा·सर्व लक्षणें दूर झाल्यानंतर पोट फुगलें असतां उष्ण ढाळक द्यावें·व अगत्य असल्यास रोचकादिक द्यावीं असें जाणावें·

पोस्ताचे फळाचीं औषधें सांगतो· **दीकोक्टम पापावरिस·एक्स्त्राक्टम पापावरिस·सीरुपस पापावरिस·**

अफुचीं औषधें सांगतो· **कोन्फेक्स्यो ओपीई·एक्स्त्राक्टम ओप्यी·पिल्युले सापोनिस कम् ओप्यो·पल्विस् कोर्नु अस्ती कम् ओप्यो·पल्विस् केटेकोम्पोसिटस् कम्**

म्पोसिटस्कम् ओप्यो· पल्विस् ईपिकाक्यु अन्ने कोम्पोसिटस्· टिंक्चुरा ओपीई· टिंक्चुरा काम्फोरे कोम्पोसिटा· वेनम ओपीई· पल्विस् केनो कोम्पोसिटस·

हैयोस्यामी फोल्या·

हैयोस्यमस् या नामें करून वृक्ष विशेष आहेत त्यांचीं फोल्या ह्मणजे पानें· त्या वृक्षांची उत्पत्ति या देशांत नाहीं· शाम व इतर देश त्यांमध्यें आहे· परंतु या देशांत फार करून विलायत देशामध्यें त्याचे पानांचा रांधा सिद्ध करून तोच आणितात· तसें टिंक्चुर ही आणितात· तो रांधा यांचे इतर औषधांपेक्षां चांगला आहे· त्याची सिद्ध करावयाची कृति वनस्पति औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे· तो उत्तम मदकारी आहे· त्याचे गुण अफुचे गुणां सारिखे आहेत· परंतु तेणें करून पोट फुगत नाहीं· व मूत्र घर्म मल यांचें विसर्जनही थोडें अधिक होतें· अफु करून प्रायः कपाल शूल पोट फुगणें इत्यादिक उपद्रव होतात· याज करितां तिचें अगत्य लागतें त्यासमयीं ते उपद्रव न व्हावयासाठीं तिचे ऐवजीं तो द्यावयास उत्तम आहे· त्याला जामध्यें आंग वळतें असे रोग व स्त्रियांचे पोटांतला वायु गोळा सर्व प्रकारचा वायू व अन्य पीडायुक्त रोग यांवर द्यावा· तेणें करून पीडेचें चांगलें शमन होतें· व जा रोगामध्यें पोटांत पीडा फार होऊन रेच व्हावयाचें अगत्य लागतें· त्यासमयीं त्याला इंद्रायनादिक बलवंत रेचकांमधून कोणत्या एकाशीं मिळवून द्यावा· व गुर्दांमध्यें तांबडी रेती उत्पन्न होऊन फार पीडा होत्ये· तेव्हां त्याला द्रावक व अश्मरी हारक यांबराबर द्यावा· या रोगावर अफु द्यावयास नीट नाहीं· कारण तिणें करून पोट फुगून पीडेचें आधिक्य होतें· व स्त्रीला प्रसूत वेळेस उन्माद रोग झाला असतां त्यावर अफुपेक्षां तो चांगला आहे· त्याला एकल्याला किंवा कापुराशीं मिळवून द्यावा व त्याचें प्रमाण दोन ग्रेनां पासून दाहा ग्रेन पर्यंत आहे कधिं त्याला अफुशीं किंवा एक्स्त्राक्टम कोन्यीशीं मिळवून देतात· व अतीसारामध्यें दाह रोगाचीं लक्षणें असतां पीडा न्यून व्हावयासाठीं अफु देतां येत नाहीं· कारण तिणें करून तीं लक्षणें अधिक होतात यास्तव तिचे न्यूनते विषयीं त्याला कालोमेल व स्वेदकारी यांशीं मिळवून द्यावा· व त्याचें अपरिमित प्रमाण कोणीं भक्षिलें असतां अफुचे मोट्या मानाचे उपद्रवां सारिखे उपद्रव होतात· ते दूर व्हावयासाठीं वमक देऊन वमन झाल्यानंतर आंबट पदार्थादिक द्यावे· व बाह्योपचारा विषयीं त्याचें वर्णन त्याचे उत्पत्ति प्रकारावर केलें आहे·

हैयोस्यामी फोल्याचीं औषधें· एकुस्ट्राक्टम हैयोस्यामी· टिंक्चुरा
हैयोस्यामी·

ह्येयोस्यामी·

बिह्लादोन्ने फोल्या· मु॰ अनबुथालब· त्यांचीं पानें·

बिह्लादोंना या नामें करून वृक्ष विशेष आहेत त्यांचीं फोल्या ह्मणजे पानें· त्या वृक्षांची उत्पत्ति काश्मीरादिक उत्तर देश फार्सिस्थान व आरबस्थान यां मध्यें आहे· परंतु या देशांत प्रायः विलायत देशा मध्यें त्याचे पानांचा रांधा सिद्ध करून तो आणितात· त्या वृक्षाचे सर्व अवयव विष आहेत· यास्तव कोणीं त्याचा कोणताही अवयव फार भक्षिला असतां प्रथम त्याचे शरीरावर शीतोदक घालून वमकानें वमन करवून नंतर रेचक द्यावें· रेच झाल्या नंतर सिर्कादिक आंबट पदार्थ द्यावे· त्याचा रांधा असा भयकारक आहे किं सांप्रत कालीं पोटांत देत नाहींत· नुस्ता त्याचा बाह्य उपचार करितात· त्याची सिद्ध करावयाची कृति वनस्पति औषधांचे उत्पत्ति प्रकारा मध्यें लिहिली आहे· तो रांधा आम्मोन्ये सब् कार्बोनासाशीं सम भाग घेऊन त्याशीं मिळवून चर्मावर लाविला असतां वायूची पीडा कधिं न्यून होत्ये· या विषयीं याचा प्रतिनिधि भंग आहे· तसा मलमाशीं सम भाग घेऊन त्याशीं मिळवून मूत्रद्वार आणि मलद्वार यांचे मध्यदेशीं लाविला असतां प्रमेहांतलें शिश्नाचें दुःख कधिं न्यून होतें· व त्याला पाण्यानें पातळ करून भिंवयी वर लाविला असतां अथवा नेत्रा मध्यें त्याचे चार पांच बिंदू घातले असतां एका घटिकांत नेत्रांतली बाहुली फार मोटी होत्ये· ह्मणोन वैद्य मोति बिंब दूर करावयास इच्छितात तर त्यांहीं असें करावें· तेणें करून बाहुली फार मोटी होऊन मोति बिंब चांगले दिसुं येतात· आणि त्यांची दूर करावयाची शस्त्र कृति सहज करितां येत्ये· व असे गुण ह्येयोस्यमसाचे रांध्यालाही आहेत· मोति बिंबाचा प्रारंभ प्रायः बाहुलीचे मध्यस्थलाचे समोर होऊन ते सर्व बाहुली व्यापितात· तेणें करून मनुष्य अंध होतो· तो रांधा लावल्यानें त्यांज पेक्षां बाहुली मोटी होऊन मनुष्यास दिसुं लागतें· जों पर्यंत तिचा मोटेपणा दूर होई तों पर्यंत दिसतें असें जाणावें·

बिह्लादोन्ने फोल्याचें औषध· **एक्स्त्राक्टम बेल्लादोन्ने·**

दिजिटेलिस फोल्या·

विलायत देशा मध्यें दिजिटेलिस या नामें करून वृक्ष विशेष आहेत त्यांचीं फोल्या ह्मणजे पानें· हें औषध उत्तम मदकारी आहे· परंतु येणें करून अन्य मदकारीं प्रमाणें पहिले परिणाम होत नाहींत· दुसरेच परिणाम होतात· याचे गुण नाडीवर असे आश्चर्यकारक हो-

तात किं नाडी फुगलेली आणि कठीण असून जलद चालत असतां येणेंकरून तिचा फुगलेपणा आणि कठीणपणा प्रथम दूर होऊन नंतर तिचें गमन न्यून होतें· व एका वैद्यानें या औषधें करून आपल्ये नाडीचें स्फुरणें पळामध्यें चवेचाळिसांपासून सोळापर्यंत न्यून केलें· व एका मनुष्याला वायूची पीडा होती· त्याची नाडी फुगलेली व कठीण होऊन पळामध्यें बावन्न वेळ स्फुरत असे· या औषधानें नम्र होऊन पळामध्यें चोवीस वेळ स्फुरूं लागली· व अन्य मनुष्याला क्षय रोग होऊन त्याची नाडी पळामध्यें बेचाळीस वेळ स्फुरत असे· हें औषध दिल्यानें दोन दिवसानंतर पळांत अठरावेळ स्फुरूं लागली· व येणेंकरून नाडीचें स्फुरणें न्यून झाल्यानंतर मनुष्यानें यत्किंचित् कर्म केलें असतां नाडी पुनः फार त्वरेनें स्फुरूं लागत्ये· हृत् ही त्वरेनें स्फुरूं लागतें उह्लासे होऊन मनुष्य कधिं मूर्छित ही पडतो· व जा मनुष्याला याचे गुण फार होतात त्याला अशीं लक्षणें होऊन मृत्यु ही कधिं येतो असें जाणावें· तो वैद्य या औषधानें नाडीचें स्फुरणें न्यून झाल्यानंतर अकस्मात उठला तेणेंकरून त्याचे नाडीचें स्फुरणें न्यून होऊन पळांत सोळा वेळ होत असे तें चाळीस वेळ झालें या प्रकारें दुसऱ्या बहुत लोकांचा नाडीचें ही झालें· व क्षय रोग्याला उह्लासे होऊन तो शयन स्थानापासून उठला· तेणेंकरून त्याचे नाडीचें स्फुरणें या औषधानें न्यून होऊन पळांत अठरा वेळ होत असे तें असंख्य होऊन तो मूर्छित पडला नंतर त्याला आम्मोन्यादिक औषधें दिल्यानें मूर्छा दूर होऊन नाडी निर्बल होऊन हळु स्फुरूं लागली· व एका स्त्रीला जलोदर रोग होता तिला एका वैद्यानें हें औषध दिल्यानंतर ती अकस्मात उठली· त्यामुळें मूर्छित पडून मेली· पूर्वोक्तें करून प्रसिद्ध होतें किं हें औषध फार चौकशीनें दिल्हें पाहिजे· दिल्यानंतर फार सावधपणें रोग्याची चौकशी केली पाहिजे· रोग्याला हें दिल्यानंतर पूर्वोक्ता प्रमाणें लक्षणें झालीं असतां आम्मोन्याचीं औषधें इथर व सुगंध औषधें इत्यादिक देऊन आज्ञा करावी किं शयन स्थानावर उठून बसूं नये· व कांहीं हालूं नये· स्तब्ध राहावें· व अगत्य असल्यास पक्वाशयाचे सुमारानें बाहेर ब्लिस्तर मारावें· व या औषधाचे सामान्य प्रमाणें करून अन्य मदकारि औषधा प्रमाणें निश्चेष्टपणा प्रायः होत नाहीं· व कोणीं विषासाठीं याचें अपरिमित प्रमाण भक्षिलें असतां अति कठीण उह्लासे वमन बहुत रेच शीतळ घर्म प्रलाप मूर्छा आंग वळणें इत्यादिक होऊन मृत्यु ही येतो· व याला द्रावक गुण ही आहेत ते पुढें द्रावक औषधांमध्यें लिहिले होतील· आतां मदकारी गुण सांगतो· क्षय रोगाचे प्रारंभ कालीं रुधिराचें गमन फार त्वरित होतें· त्याचा त्वरितपणा न्यून व्हावयासाठीं हें चांगलें आहे· येणेंकरून तो न्यून होऊन रोगाचे शमना विषयीं अन्य औषधाचें चांगलें साहाय्य होतें· त्याविषयीं याला कासीस व बोळ इत्यादिकांशीं मिळवून

द्यावें· व हें दाह रोगावर दिल्हें असतां अन्य औषधाचें साहाय्य करतें· परंतु अन्य उपचारा पूर्वीं देऊं नये· नंतर द्यावें· व हें फुप्फुस गर्भाशय इत्यादिक शरीरांतील स्थळां पासून रुधिर निघत असतां कामाचें आहे· गर्भाशया पासून रक्त निघतें त्या विषयीं याला अफुशीं मिळवून द्यावें· व मोठ्या धमन्यांचा एक रोग आहे· जामध्यें त्यानां सूज येऊन ती सूज रुधिराभिसरणाचे बलानें दिवसान दिवस मोठी होऊन फुटून मनुष्य मरतो· त्यावर हें अति उत्तम आहे· येणें करून रुधिराचें त्वरित गमन मंद होऊन रोगाचें बल न्यून होतें· तसें हत्कंपनावर ही चांगलें आहे· तें हत्कंपन मद्य पानाभ्यासें करून व भयादि मूलक चित्ताचा विकारें करून होत असतां विशेषें करून चांगलें आहे असें जाणावें· मदकारी गुणा विषयीं याचें टिंक्युर चांगलें आहे· द्रावक गुणास्तव याचें फाण्ट कधिं देतात व या दोहीं गुणा विषयीं याचें चूर्ण उत्तम आहे· व याचे मदकारि गुण पूर्ण व्हावयासाठीं प्रथम याचें प्रमाण अल्प द्यावें· नंतर ते गुण प्रगट होत तों पर्यंत फार सावकाशीनें अधिक करावें· परंतु नाडीचें गमन न्यून झालें असतां अधिक करूं नये· व त्याची न्यूनता फार त्वरेनें झाली असतां याचा प्रतिबंध करावा· अगत्य असल्यास कांहीं अवधी नंतर फिरून द्यावें· व उह्लासा भोंवळ इत्यादिक लक्षणें झालीं असतां विशेषें करून प्रतिबंध करावा· आणि या लक्षणांचे परिहारा विषयीं पूर्वोक्त उपचार करावे· असें जाणावें· प्रारंभ कालीं याचें टिंक्युर दाहा दाहा मिनिम दिवसांत दोन वेळ द्यावें· व एक एक दिवसाचे अंतरानें दिवसांत दोन दोन मिनिम अधिक करावें· तसें प्रारंभ कालीं याचें चूर्ण एक एक ग्रेन दिवसांत दोन वेळ द्यावें· व एक एक किंवा दोन दोन दिवसांचे अंतरानें दिवसांत पाव पाव ग्रेन चढवावे· रोग फार कठीण असल्या तर उक्त प्रमाण प्रति दिवशीं कांहीं अधिक करावें· परंतु फार चौकशीनें द्यावें·

याचीं औषधें· **ईफ्युसम दिजिटेलिस· टिंक्युरा दिजिटेलिस·**

टाबसी फोल्या· प्रा० तंबाकु·

याची उत्पत्ति या देशांत आहे· याचें रूप गंध इत्यादिक सर्वांस ठाऊक आहेत· याला मदकारी वमक द्रावक ढाळक कफघ्न लालास्रावी नस्य हे गुण आहेत· जाला याचे भक्षणाची व ओढावयाची सवय नाहीं त्या मनुष्यानें याचें ग्रहण केलें असतां फार उह्लासे वमन रुधिराभिसरण मंद निर्बलपणा निश्चेष्टपणा शीतळ घर्म निघणें व कधिं आंगवळणें इत्यादिक होतात· जाला सवय आहे· त्याला हे परिणाम फार करून होत नाहींत· कदाचित् झाले असतां अल्प होतात· याला वमक गुणास्तव कधिंही देत नाहींत· याचे व-

मकादिक गुण पुढें त्या त्या औषधामध्यें लिहिले होतील· आतां मदकारी गुण सांगतो· या विषयीं याचें फाण्ट चिप्नळीनें मलद्वारांत सोडावयाचें आहे· जेव्हां गुदग्रह फार होऊन तो अन्य उपचारानें मोकळा होत नाहीं· तेव्हां तें फाण्ट चिप्नळीनें मलद्वारांत सोडावें· तसें नाळगुत व अंतर्वृद्धिचे इतर प्रकार मूत्राघात यांवरही सोडावें· त्याची सिद्ध करावयाची कृति व प्रमाणादिक वनस्पति औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत· व दंतपीडा न्यून व्हावयासाठीं तंबाकु तोंडांत धरला असतां किंवा ओढला असतां ती कधिं न्यून होत्ये· तसा अंतरित श्वासामध्यें ओढला असतां कधिं श्वास न्यून होतो· व याचें फाण्ट दद्रु खरुज इत्यादिक चर्माचे रोगांवर लावावयाचे उपयोगी आहे· परंतु चौकशीनें लावावें· कारण तेणें करून उपद्रव होतो· व वृषणाला सूज येऊन कांहीं दिवस पर्यंत राहिली असतां याचें पान घेऊन सिर्कामध्यें भिजवून वृषणाभोंवतें लावावें· हा उपचार कधिं कार्यावह होतो असें जाणावें·

याचें औषध· **ईफ्युसमटाबसी·**

स्त्रामोन्येसेमिना·प्रा· धुत्र्याचाबिया·

धुत्र्याची उत्पत्ति या देशांत आहे· त्याचा बिया पोटांत प्रायः देत नाहींत· त्या अंतरित श्वासावर तंबाकु प्रमाणें ओढल्या असतां चांगल्या आहेत तेहीं करून या रोगाची अवस्था कांहीं न्यून होत्ये त्या विषयीं बियांचें प्रमाण एक ड्राम आहे·

त्यांचें औषध· **एक्स्त्राक्टमस्त्रामोनीई·**

कोन्यी फोल्या·

विलायत देशामध्यें कोन्यम् या नामें करून लाहान वृक्ष आहेत· त्यांचीं फोल्या ह्मणजे पानें· या देशांत त्या देशापासून हीं पानें किंवा या पानांच्या रांधा सिद्ध करून आणितात· त्याची सिद्ध करावयाची कृति वनस्पति औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे· हें औषध चांगलें मदकारी आहे· याला अफु बरोबर किंवा तिचे ऐवजीं द्यावें· जेव्हां रुधिराचें त्वरित गमन असतां पीडेचे शमना विषयीं मदकारि औषधाचें अगत्य लागतें· तेव्हां हें चांगलें आहे· ह्मणोन याला क्षयरोगावर व रक्तस्रावादिक उपचार केल्यानें पीडेचें शमन होत नाहीं व निर्बलपण्यांमुळें रक्त काढतां येत नाहीं असल्या फुफ्फुसांचे दाहरोगावर देतात· तसें शोषक वाहिन्यांचे पिंडांचे सूजेवर ह्मणजे गंडमाळादिकांवर देतात· व वाइट व्रणांमुळें निद्रा येत नसतां ती यावयासाठीं हें चांगलें आहे असें जाणावें· या पानांचें चूर्ण किंवा

रांधा देतात · व कधिं दोहोंचें मेळन करून देतात · त्या दोहोंचें प्रमाण तीन ग्रेनां पासून दाहा किंवा पंधरा ग्रेन पर्यंत आहे · त्या दोहों मधून कोणातें एक तीन किंवा पांच ग्रेन पीडेचें शमन होई तों पर्यंत प्रतिदिवशीं दोन तीन वेळ द्यावें · तेणें करून उह्मासा झाला किंवा भोंवळ आली असतां त्याच वेळेस प्रमाण न्यून करावें · व दाहरोगाचीं लक्षणें नसतां खोखला व पिंजरांतील इतर पीडा व वायूची पीडा यांवर तो रांधा दोमर्स पौदराशीं मिळवून द्यावा · मेळन प्रकार सांगतो ·

एक्स्त्राक्टम कोनीई ·	अडीच ग्रेन ·
दोमर्स पौदर ·	अडीच ग्रेन ·

या दोहोंचें मेळन करून एक गोळी करावी · अशा दोन गोळ्या आवशीस द्याव्या व कोणीं या औषधाचें अपरिमित प्रमाण भक्षिलें असतां इतर मदकारिंचे अपरिमित प्रमाणांसारिखे उपद्रव होतात त्यांचे परिहारासाठीं वमकरेचक देऊन त्यांचे गुण झाल्यानंतर आंबट पदार्थ भक्षावयास द्यावा · व बाह्यउपचाराविषयीं या पानांचा लबदा करून वाईट व्रणावर लावितात · असें जाणावें ·

यांचें औषध · एक्स्त्राक्टम कोनीई ·

अंगग्रह नाशक · इं० आन्तिस्पास्मोदिकस ·

जा औषधें करून अंगग्रह रोग दूर होतो त्या औषधानां अंगग्रह नाशक ह्मणतात · अंगग्रह नाशा विषयीं मदकारीं मधून इथर रेक्टिफिकेटस कापुर अफु हीं मदकारी चांगलीं आहेत · जशीं या मदकारीं करून शरीर कार्यें अधिक होतात · तशीं कस्तूरी आदिकरून जीं अंगग्रह नाशकें तेहीं करूनही होतात · परंतु मदकारीं प्रमाणें त्या अंगग्रह नाशकें करून निश्चेष्टपणा व शरीर कार्यांची न्यूनता होत नाहीं · जरि त्या अंगग्रह नाशकांचें न्यूनाधिक प्रमाण दिल्हें तथापि होत नाहीं · व त्या प्रकारें अंगग्रह नाशा विषयीं रेचकां मधून जिन्कीसल्फास क्युप्रीसल्फास पान्यांचीं औषधें व बार्क हीं रोचकें चांगलीं आहेत · तीं मदकारि व हीं रोचकें येहीं करून अंगग्रह नाश होतो ह्मणोन यांसही अंगग्रह नाशक ह्मणावें · अंगग्रह नाशाविषयीं रोग विशेषें करून कस्तूर्यादिक अंगग्रह नाशकें व उक्त मदकारि आणि रोचकें तीं सर्व चांगलीं आहेत असें जाणावें · अंगग्रह बहुत रोगांमध्यें होतो · व तो कांहीं रोगांचें कारणही आहे · व त्याचीं कारणें बहुत आहेत त्यांतें सांगतो · दंतोद्गम व पोटांत कृ-

मींची उत्पत्ति येहीं करून अंगग्रह होतो· तसा व्रणांत अथवा जखमें मध्यें विषादिक पदार्थ गेले असतां ही होतो· तसां निर्बल पण्या मुळें ही कधिं होतो· या अंगग्रहावर जिन्कीसल्फासादिक उक्त रोचकें द्यावीं असें जाणावें· अंगग्रहनाशकें स्त्रियांचे पोटांतील वायुगोळा अपस्मार नष्ट आर्त्तव विषूचिका उचकी हत्कंपन दमा कुत्र्याचा दंशें करून उत्पन्न रोग इत्यादिकांवर देतात· व कस्तूरी आदिकरून जीं अंगग्रहनाशकें त्यांचे गुण बहुत काल पर्यंत राहात नाहींत यास्तव तीं अल्प अल्प अवधीनें द्यावीं· वउक्त मदकारी आणि रोचकें हीं जरीं त्या गुणाविषयीं देतात तरीं या गुणाविषयीं द्यावीं असें जाणावें· कस्तूर्यादिकांचीं नावें सांगतो·

मोस्कस· प्राकृत· कस्तूरी·
कास्तोर्यम·
आस्साफेटिदे गम्मीरेझिना· प्रा॰ हिंग·
गाल्बनी गम्मीरेझिना·
वालीर्येनेरे दिकुस·
आम्मोन्ये सब्कार्बोनास·

उक्त मदकारींचीं नावें·

इथर रेक्टिफिकेटस·
काम्फोरा· प्रा॰ कापुर·
ओप्यम· प्रा॰ अफु·

उक्त रोचकांचीं नावें·

क्युप्रीसल्फास· प्रा॰ मोर्चुत·
जिन्सि ओक्सिदम·
जिन्सि सल्फास·
वाऱ्याचीं ओषधें·
सिंकोनाचे सर्व प्रकार·

या प्रकारें अंगग्रहनाशकांचें साधारण वर्णन केलें आतां एका एकाचें पृथक् विशेष वर्णन करितो·

कस्तूरी·

कस्तूरी·

हिची उत्पत्ति मृग विशेषां पासून आहे· ते मृग हिमालय पर्वताचे शिखरावर राहातात· व आपल्ये जातीच्या कळप सोडून दुसर्ये जातीचे कळपा मध्यें जात नाहींत· व ते फार भिचे आहेत· मनुष्याच्या वारा पडला असतां पळतात· यास्तव त्यानां सहज धरतां येत नाहीं· वं त्यांचीं डोकीं डुकराचे डोक्यांसारिखींशीं आहेत· पुच्छ फार लाहान आहे· व त्यांचे केशांच्या रंग वय आणि काल विशेषें करून वेगळा वेगळा होतो· व त्यांची बेंबी आणि शिश्न यांचे मध्यदेशीं अंडाकार एक कोश आहे· त्या कोशाची एक बाजू चपटी व दुसरी बाजू वर्तुलाकार शी आहे· त्याची लांबी तीन अंगुलें व रुंदी दीढ अंगुल आहे· व तो भोंवतालचे आंगापेक्षां अल्प उंच आहे· त्याला फार लाहान छिद्र आहे· त्या छिद्रा भोंवते लाहान लाहान केश आहेत· व त्याची आंतली त्वचा सूक्ष्म आहे· व त्या वर केश फार आहेत· व तो कोश मृग लाहान असतां रिकामा असतो· मृग तरुण होतो त्यासमयीं त्यामध्यें दीढ किंवा दोन ड्राम कस्तूरी पातळ उत्पन्न होत्ये· जासमयीं तो कोश कस्तूरीनें फार भरतो· त्यासमयीं मृग त्याला दगडावर घांसून व दाबून कस्तूरी बाहेर काढितो· ही कस्तूरी इतर कस्तूरी पेक्षां उत्तम आहे· व तो कोश प्रायः मृगाला जिवंत धरून कापून काढितात· नंतर त्याचें छिद्र बंद करितात· कस्तूरीची उत्पत्ति कामरूप नेंपाल काश्मीर या तीन देशांमध्यें आहे· त्यांमधून कामरूप देशाची उत्तम· नेंपाल देशाची मध्यम· काश्मीर देशाची कनिष्ठ जाणावी· कामरूप देशाची कस्तूरी प्रायः चीन देशावरून व दुसर्या दोहों देशांची बंगाल्या वरून या देशांत आणितात· असें जाणावें· कस्तूरीचे लाहान लाहान शुष्क दाणें आहेत· ते कांहीं चिकटसे गुळगुळीत आहेत· व ती फार माहाग विकत्ये· यामुळें व्यापारी लोक तीमध्यें इतर पदार्थ घालितात· यास्तव जा कोशाला शस्त्रानें रेषा केल्याशा दिसतात· त्यांतली कस्तूरी घेऊं नये· व ती पातळ असत्ये त्यासमयीं तीमध्यें कधिं रुधिर व राळादिक पदार्थ मिळवितात· यास्तव तिचे परीक्षेच्या प्रकार सांगतो· जिला प्रदिप्त केली असतां कुगंध येतो· तीमध्यें रुधिर आहे· व जी उष्ण केल्यानें पातळ होत्ये· तीमध्यें राळादिक पदार्थ आहेत· व जी पातळ न होतां प्रदिप्त होत्ये ती चांगली स्वच्छ आहे असें जाणावें· कस्तूरीच्या गंध उत्तम असून बहुत काल पर्यंत राहातो· व स्वाद कडु रंग काळा तांबडासा आहे· तिला प्रदिप्त केली असतां पांढऱ्या ज्वाला निघतात व जळल्यानंतर तिची पांढरी हलकी अशी शख होत्ये· व कस्तूरीचे अंश उकळत्ये पाण्यामध्यें कांहीं विरघळतात· त्यापेक्षां आलकोहोल व इथर यांमध्यें विशेष विरघळतात· असें जाणावें· ती उत्तम अंगग्रह नाशक आहे· तिला स्त्रियांचे पोटांतील वायुगोळा व उचकी इत्यादिकांवर ·

दिकांवर द्यावी· व संतत ज्वरामध्यें प्रलाप गात्रविक्षेप इत्यादिक लक्षणें दूर करावयासाठीं आम्मोन्याचे औषधा बराबर द्यावी· व व्रण सडूं लागला असतां त्याचे निवारणासाठींही त्याबराबर द्यावी· व विषूचिका फार भयदेणारी नसतां तिजवरही तशी द्यावी· तेणेंकरून वमनाचा प्रतिबंध होऊन मुरडा आदिकरून दूर होतात· व ती अपस्मारावर चांगली आहे· कालोमेलाशीं मिळवून दिल्ही असतां विशेष चांगली आहे· या रोगावर तिचें मोटें प्रमाण अल्प अल्प अवधीनें काहीं काल पर्यंत द्यावें· तेणेंकरून तिचे पूर्ण गुण होतात· अशी दिल्ही नसतां पूर्ण होत नाहींत असें जाणावें· तिचें प्रमाण साहा ग्रेनां पासून एक ड्राम पर्यंत आहे· तें प्रमाण पंधरा किंवा वीस घटिकांचे अंतरानें द्यावें अन्य अंगग्रह नाशका बराबर किंवा मदकारि बराबर तिचा गोळ्या करून द्याव्या· अथवा तिचें मिश्रण त्याबराबर द्यावें· किंवा ती मोदका सहित त्याबराबर द्यावी· परंतु सर्वांपेक्षां तिचा गोळ्या द्यावयास चांगल्या आहेत· व बाळांचे दांत यावयाचे वेळेस आंग वळुं लागलें असतां तिला चिपनळीनें सोडायाचे औषधाशीं मिळवून चिपनळीनें मलद्वारांत सोडावी·

तिचें औषध· **मिस्त्युरामोस्की·**

कास्तोर्यम· मु० जुन्देबेदस्तर·

उद या नामें करून जलचर असून स्थलचर असें जनावर आहे· त्या सारिखें जें जनावर त्यापासून याची उत्पत्ति आहे· तें जनावर रुस व इतर देश त्यांमध्यें असतें· त्याची लांबी दीड हात व त्याचें पुछ एक हात लांब आहे· व तें पुच्छ रुंद असून चपटें आणि खवळांनीं व्याप्त आहे· आणि त्याचा शरीरा जवळचा जो भाग त्यावर केश आहेत· व त्या जनावराचे पायांचीं नखें पांच आहेत· व दोहों दोहों नखांचे मध्यें बदकाचे पायां सारिखी त्वचा आहे· व त्याचे डोके लाहान व कर्ण लाहान असून केशांनीं व्याप्त आहेत· व त्याचे केशांचा रंग तांबडासा आहे· व त्याचें मलद्वार आणि मूत्रद्वार यांचे मध्यदेशीं अंडाकार चार कोश आहेत· त्यांमधून दोन लाहान मस्तकाकडे आहेत· त्या दोहोंमध्यें वसे सारिखा पदार्थ आहे· व दुसरे दोन पहिल्यांपेक्षां मोटे असे पुच्छाकडे आहेत· त्यांमधून एक मोटा दुसरा लाहान आहे· त्या दोहोंमध्यें तेलसर चिकट उग्रगंध असा पदार्थ दोन औंस परिमित असतो· त्याला लतीन भाषेंत कास्तोर्यम व मुसलमानीं भाषेंत जुन्देबेदस्तर ह्मणतात· त्या कोशांनां जनावराला धरून त्यांस छिद्र न होई असें कापून काढितात· नंतर त्यानां उष्णानें अथवा अग्निचे धुरानें शुष्क करितात· त्यांतला तो पदार्थ प्रथम पातळ असतो· नंतर दाट होऊन कठीण होतो· व कधिं शुष्क होऊन भुसभुशीत ही होतो· जो रुस देशाचा आहे· तो इतर देशांपेक्षां उत्तम आहे· व तो पदार्थ लाहान

कोशापेक्षां मोट्ये कोशांतला चांगला आहे· व त्या पदार्थाचे कोशानां वसे सारिख्या पदार्थीचे कोश सर्वकाल लागलेले असतात· यास्तव जा कोशानां ते कोश लागलेले नसतात· त्या कोशांतला पदार्थ घेऊं नये· असें जाणावें· या औषधाचा रंग तांबडा भुरासा आहे· काळा रंग असला तर वाईट समजावें· गंध पूर्वी सांगीतल्या प्रमाणें व स्वाद कडु आहे· भक्षणा विषयीं याचा तिरस्कार येतो· हें अंगग्रह नाशा विषयीं फार उत्तम नाहीं· नष्ट आर्त्तवा बराबर आंगवळत असतां देतात· याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून एक स्कुपल पर्यंत आहे याचा गोळ्या करून द्याव्या· व याला ऋतुद्रव गुणही आहेत· ते पुढें लिहिले होतील· त्या विषयीं याचें टिंक्चुर ऋतुद्रवाशीं मिळवून द्यावें·

याचें औषध· **टिंक्तुरा कास्तोर्ये·**

हिंग·

याची उत्पति वृक्ष विशेषांचे मूळा पासून आहे· ते वृक्ष सहा हात उंच असे फार्सि स्थानामध्यें आहेत· सूरणादिकांचे वृक्षां प्रमाणें ते प्रतिवर्षी उत्पन्न होतात· चवथ्या वर्षी त्यांचें मूळ मांडी इतकें मोटें होतें· त्या मूळाची साल काळीशी व त्यांत दुधा सारिखा पांढरा जाड उग्र गंध असा चीक आहे· तो चवथ्या वर्षी काढायास योग्य होतो· त्याचा काढावयाचा प्रकार सांगतो· जेव्हां वृक्षाचीं पर्णें गळून कांडें शुष्क होतें तेंव्हां त्या कांड्याला मूळा वरून मोडून काढितात नंतर मूळाचे भोंवतालची भूमि खणून मूळ चांगलें दिसतें करून त्यावर ऊन न पडे अशी छाया करून चाळीस दिवस पर्यंत त्याचें संरक्षण करतात· नंतर त्याचा वरला भाग आडवा कापून काप काढितात· दोन दिवस पर्यंत जो चीक येतो त्याला खरवडून काढून दुसरा काप काढितात· असें तीन वेळ करतात· नंतर मध्यें आठ दाहा दिवसांचा अवधी सोडून पुनः पूर्ववत् करतात· सर्व चीक निघाल्या नंतर मूळ वाळतें· असल्या फार मूळां पासून चीक जमवून उन्हांत शुष्क करतात· असा काढावयाचा प्रकार जाणावा· हिंगाचे खडे मोटे लाहान पांढरे तांबडे पिंगट असे आहेत· जाचे पांढरे खडे पुष्कळ आहेत· तो हिंग उत्तम जाणावा· याचा स्वाद गंध इत्यादिक सर्वांस ठाऊक आहेत· हा चांगला अंगग्रह नाशक व कफघ्न आहे· याला अंगग्रह नाशा विषयीं स्त्रियांचे पोटांतला वायुगोळा वायू करून पोटांत झालेला शूल व वातोदर व अजीर्णा बराबरला पोटांतला प्रबल वायू इत्यादिकांवर द्यावा· व कफघ्ना विषयीं दमा खोकला यांवर आन्तिमनीचीं औषधें व स्वेदकारि व इतर कफघ्नें यां मधून कोणत्या एका बराबर द्यावा· परंतु दाहरोगाचें कांहीं लक्षण असतां देऊं नये· याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत आहे· प्रायः याचा गोळ्या करून द्याव्या· त्या पूर्ण गुण ह्वावयासाठीं कांहीं अवधी पर्यंत द्याव्या· व

याला ऋतूद्भव आणि कृमिघ्न हे गुणही आहेत ते पुढें लिहिले होतील·

याचीं औषधें· **मिस्तुरा आस्साफेटिदे· टिंक्तुरा आस्साफेटिदे· स्पिरिटस आम्मोन्येफेटिदस· पिल्युले गाल्बनी कोम्पोसिटे·**

गाल्बनी गम्मीरेझिना· सु॰ बरीजा·

या विषयीं हा चीक हिंगासारिखा चांगला नाहीं· यास्तव प्राय: देत नाहींत· व याला ऋतूद्भव आणि कफघ्न हे गुणही आहेत· ऋतूद्भवा विषयीं अन्य ऋतूद्भव औषधा बरोबर देतात· याची उत्पत्ति प्रमाण इत्यादिक त्या औषधां मध्यें लिहिलीं होतील· कफघ्ना विषयीं बोळ ओशक इत्यादिकां बरोबर देतात·

वालीर्येने रेदिक्स·

हें एका लाहान झाडाचें मूळ आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· विलायत देशापासून आणितात· याचा गंध आणि स्वाद वाईट आहे· हें अंगग्रह नाशा विषयीं चांगलें आहे· याला स्त्रियांचे पोटांतला वायुगोळा अर्धशिशी व तसे अन्य रोग यांवर आम्मोन्याचीं औषधें हिंग व इतर अंगग्रह नाशकें त्यां मधून कोणत्या एकाशीं मिळवून द्यावें· याचे चूर्णाचें प्रमाण एक स्कुपला पासून एक ड्राम पर्यंत आहे· तें चूर्ण जायपत्री बरोबर किंवा दालचिनी बरोबर दिवसांत तीन वेळ द्यावें· परंतु बहुत करून याचें चूर्ण देऊं नये· याचें टिंक्तुर किंवा पाचन द्यावें· टिंक्तुर करायाची कृति वनस्पति औषधोत्पत्ति प्रकारा मध्यें लिहिली आहे· पाचन कृति सांगतो·

कुटलेलें हें मूळ·	एक औंस·
पाणी·	बारा औंस·

पाण्यां मध्यें मूळ घालून पंचवीस पळें उकळवून गाळावें· तें दोन औंस एक ड्राम टिंक्तुराशीं मिळवून असें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· व याचें चूर्ण अन्येद्युस्ज्वर तृतीयक व चतुर्थकज्वर यांवर सिंकोनाचे चूर्णा बरोबर कधिं देतात·

याची औषधें· **टिंक्तुरा वालीर्येने· टिंक्तुरा वालीर्येने आम्मोन्येटा·**

आम्मोन्ये सब्कार्बोनास·

याचा उत्पत्ति प्रकार व प्रमाण इत्यादिक धातु औषधोत्पत्ति प्रकारा मध्यें उक्त आहेत· अंगग्रह नाशा विषयीं हें इथर सल्फ्युरिकमाशीं मिळवून द्यावें· व हें कोणी भोवळ येऊन

ऊन मूर्छित पडला असतां व निर्बल मनुष्याला अम्लिका झाली असतां कडु रोचकाशीं किंवा मग्निश्याशीं मिळवून द्यावें· व जासमयीं अन्न नजिरून मलशुद्धि नहोऊन दृष्टीस विकार आणि कर्णामध्यें कांहीं शब्द होतो· त्यासमयीं हें पांच ग्रेनांपासून दाहा ग्रेनपर्यंत रोचकासहित द्यावें· व हें अंगग्रह नाशाविषयीं प्रायः बारा ग्रेनांपेक्षां अधिक देऊं नये· अधिक दिल्हें असतां उह्मासा आणि वमन होतें·

याविषयीं याचें औषध· **लेक्कोर आम्मोन्येसब् कार्बोनटिस तेंही आहे·**

इथर रेक्टिफिकेटस· कापुर अफु·

याविषयीं यांचें वर्णन मदकारि औषधांमध्यें केलें आहे·

क्युप्रीसल्फासादिक रोचकें·

यांचें वर्णन रोचक औषधांमध्यें केलें होईल·

रोचक· इंग्रेजी· तोनिक्स·

जेहीं करून निर्बलपणा दूर होऊन शरीरास शक्ति येत्ये· त्या औषधांनां रोचक ह्मणतात· त्यांमधून कांहीं औषधें प्रथम पक्काशयावर गुण करून तेथून नेर्वस द्वारा शरीरावर करतात· व कांहीं औषधें त्या आशयावर गुण करून तेथून शोषक वाहिन्यानीं शोषित होऊन रक्तवाहिन्यांद्वारा करतात· व तीं एक वेळ दिल्यानें गुण होत नाहींत· प्रति दिवशीं देतां देतां होतात· या प्रकारें दिल्हीं असतां रुधिराभिसरणाचें बल व पक्काशयाची अन्न पक्क करायाची शक्ति अधिक होऊन शरीराची शक्ति अधिक होत्ये· व शरीरांतील रस अपरिमित उत्पन्न झाले असतां न्यून होतात· व ते न्यून झाले असतां त्यांचें आधिक्यही होतें· तात्पर्य हें कीं तीं औषधें त्यांचें अति आधिक्य व अति न्यूनता दूर करून ते सुप्रकृति प्रमाणें शरीरास हितावह होतील असें करतात· त्यानां जा रोगां बराबर निर्बलपणा आहे· त्या रोगांवर द्यावीं· परंतु अगत्यापेक्षां अधिक व सुप्रकृतिमध्यें देऊं नयेत· दिल्हीं असतां उपद्रव होतात· व तीं धातु आणि वनस्पति या भेदें करून दोन प्रकारचीं आहेत· वनस्पतिंमध्यें कडु आणि सुगंध या भेदें करून दोन प्रकारचीं आहेत· कडु रोचकांचे गुण सावकाशीनें होऊन कांहीं काल पर्यंत राहातात· सुगंध रोचकांचे त्यांपेक्षां त्वरेनें होऊन त्वरेनें जातात· व सुगंध रोचकांचे गुण त्यांतील तेलसर पदार्थे करून होतात· तो पदार्थ पृथक् करून दिल्हा असतां त्यांचे गुण पूर्ण होतात· असें जाणावें·

धातु रोचकांचीं नावें सांगतो·

आर्जन्तीनैत्रास· इं· कास्तिक·
पिल्युले हैद्रार्जरी· इं· ब्लुपिल·
हैद्रार्जरी सब्म्युर्यास· इं· कालोमेल·
हैद्रार्जरी ओक्सिम्युर्यास· इं· कारोसिवसब्लिमेट·
फेर्रीसब्कार्बोनास· प्रा· लोहकीट·
फेर्रीसल्फास· प्रा॰ हिराकस· सं॰ कासीस·
टिंक्चुरा फेर्रीम्युर्यातिस·
जिन्सीसल्फास· इं॰ व्हैटविच्यल·
क्युप्रीसल्फास· प्रा॰ मोर्चुन·
लैक्वोर आर्सेनिकेलिस·
बिस्मथीसब्नैत्रास·
आसिद्मनैत्रिकम·

वनस्पतीचे कडु रोचकांचीं नावें·

कास्कारिल्ले कोर्टेक्स·
आंथेमिदिसफ्लोरेस· मु॰ बाबुन·
कालंबेरेदिक्स·
काश्येलिग्नम·
सिंकोने कोर्टेक्स·
जिन्श्येनेरेदिक्स·
कस्पेर्ये कोर्टेक्स·

सुगंध रोचकांचीं नावें सांगतो·

आरान्शी ई कोर्टेक्स· प्रा॰ नारिंगाची साल·
लीमोनम कोर्टेक्स· प्रा॰ लिंबूची साल·
सिन्नामोमी कोर्टेक्स· प्रा॰ दालचिनी·
मिरिस्तिसेन्युक्लीई· प्रा॰ जायफळ·
कार्योफिल्ली· प्रा॰ लवंगा·
काप्सिसी बाक्से· प्रा॰ मिरची·

पिपरिसनैग्रेबाकुसे·प्रा॰मिर्चें·
पिपरक्युबीबा·प्रा॰कबाबचिनी·
जिंजिबरिसरेदिकुस·प्रा॰सुंठ·
कार्दामोमीसेमिना·प्रा॰वेलदोडा·
मेंथापिपरीटा· प्रा॰पुदिना·

यांहून अन्य कडु व सुगंध रोचकें आहेत· त्यांचें सविस्तर वर्णन करायाचें अगत्य नाहीं· कारण त्यांचे गुण पूर्वींचे कडु व सुगंध रोचकांचे गुणां सारिखे आहेत· व त्यानां बहुत करून देत नाहींत· यास्तव त्यांचें नाम व प्रमाण मात्र सांगतो·

कडु रोचकांचीं नावें·

सेर्पन्तेर्येरेदिकुस·
कोन्त्राएर्वेरेदिकुस·
सिमारुबेकोर्टेकुस·
आर्तीमिश्याआब्सिंथ्यम·
सेन्तार्यीकाक्युमिना·
मारुब्यम·
मेन्यान्थेस·

यासर्वांचें प्रमाण अर्धड्राम आहे·

सुगंध रोचकांचीं नावें·

कालमीरेदिकुस·प्रा॰वेखंड·
कानेल्लेकोर्टेकुस·
पिपरिसलोंजीफक्टस·प्रा॰पिंपळी·
पैमेन्तेबाकुसे·
कार्युईसेमिना·प्रा॰ओंवा·
कोर्यान्द्रीसेमिना·प्रा॰धणें·
आनेझीसेमिना·प्रा॰शोपा·
आनीथीसेमिना·सं॰मिश्रेय·
क्युमिनीसेमिना·प्रा॰जिरें·
मेंथाविरिदिस·

प्युलीज्यम·

प्युलीज्यम·

या प्रकारें सर्वांचें साधारण वर्णन केलें आतां एका एकाचें पृथक् विशेष वर्णन करितो·

आर्जेंती नैत्रास·

याची सिद्ध करावयाची कृति धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे· हें चांगलें रोचक आहे· याला कांहीं रोगांवर देतात· व फेंफऱ्यावर याचा लौकीक फार आहे· या रोगावर याचे पूर्वी ढाळक द्यावें· तेणें करून याचे गुण चांगले होतात· याचें प्रमाण एक ग्रेनाचा आठवा भाग आहे· तें प्रमाण दिवसांत एक दोन वेळ द्यावें· आणि अगत्या सारिखें हळु हळु अधिक करून चार ग्रेन पर्यंत करावें· याचा कणिके बराबर किंवा वनस्पति औषधाचे रांध्या बराबर गोळ्या करून द्याव्या· त्यांचा करायाचा प्रकार·

आर्जेंती नैत्रास·	एक ग्रेन·
कणिक· किंवा रांधा·	दोन स्क्रुपल·

आर्जेंती नैत्रासावर पाण्याचे एक दोन बिंदू घालून विरघळवून त्या दोहोंमधून एकाशीं मिळवून आठ गोळ्या कराव्या· देत्ये वेळेस त्यांशीं कस्तूरी कापुर व अफु या तीन औषधांमधून अगत्या सारिखें एक मिळवावें· असा उपचार केला असतां फेंफऱ्यांचें बल कांहीं न्यून होऊन त्याचे येण्याचे कालामध्यें अंतर अधिक पडतें· व कधिं या उपचारें करून सुप्रकृतिही होत्ये· जर येणें करून यत्किंचित् रेच झाले तर विशेषें करून होत्ये· व हें औषध गोऱ्ये लोकांनां फार दिवस पर्यंत दिल्हें असतां त्यांचे चर्माचा रंग काळा किंवा सांवळा होतो· तो रंग दूर होत नाहीं· जन्मभर तसाच राहातो· व त्यांचे शरीराचे जा स्थलावर सूर्याचें तेज पडतें· तेथें विशेष काळा होतो· एक वैद्य ह्मणत असे किं जाला हें औषध चालु करावें त्या रोग्याला आंधेरामध्यें ठेविला असतां तसा रंग होत नाहीं हें त्याचें भाषण आजपर्यंत खरें झालें नाहीं· परंतु तशा लोकानां द्यावयाचें असल्यास तेथें राहावयास सांगावें· व हें चालु केल्या नंतर मीठ वर्ज करावें· व याचें फार मोटें प्रमाण कठीण विष आहे· तें प्रमाण कोणीं भक्षिलें असतां विषाचे नाशास्तव सर्व पदार्थांपेक्षां मीठ चांगलें आहे· तें पाण्यामध्यें विरघळवून द्यावें·

पिल्युलेहैड्राजेरी· इं· ब्लुपिल·

याची सिद्ध करावयाची कृति औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे· हें पाऱ्याचे सर्व औषधांमध्यें नम्र आहे· व पाऱ्याचे गुण सावकाशीनें व्हावयासाठीं चांगलें आहे·

येणें करून कांहीं रेच झाले असतां अफुशीं मिळवून द्यावें· अथवा प्रति दिवशीं मोठ्या पाहांटेस रेवाचिनी दोन तीन ग्रेन द्यावी· तेणें करून रेच होत नाहींत· व जानां हें तुरतें घेववत नाहीं· त्यानां गोंदाचे पाण्यांसहित पातळ पदार्थाशीं मिळवून द्यावें· जेव्हां पित्ताचे अल्प प्रवाहें करून किंवा त्याचे विकारें करून अजीर्ण होऊन प्रति दिवशीं परसाकडे होत नाहीं· व मनुष्याचें तोंड पिकुटलेलेंसें होऊन त्याला नीट झोंप लागत नाहीं· जिभेवर पाहांटेस मळ येतो· तेव्हां हें दाहा दाहा ग्रेन प्रति दिवशीं एक दोन वेळ द्यावें· या प्रकारें कांहीं दिवस पर्यंत दिल्या नंतर पित्ताचा प्रवाह नीट होऊन व त्याचा विकार दूर होऊन दिवसांत एक दोन वेळ मोंकळें परसाकडे होतें· आणि अजीर्णादिक दूर होतात· व हें फार दिवस पर्यंत दिल्हें असतां थोडा ताप येऊन नाडी त्वरेनें चालत्ये· जीभ पांढरी होत्ये· हिरड्या सुजून पांढर्या होऊन दुखूं लागतात· तोंड येऊन लाळ गळूं लागत्ये· व हीं लक्षणें अफूनें रेचांचा प्रतिबंध केला असतां विशेषें करून होतात· हीं झाल्या नंतर याचें प्रमाण अवश्य न्यून करावें· कारण तोंड फार आणिलें असतां उपद्रव होतो· व कांहीं रोग फार कठीण नसतां त्यांचे परिहारासाठीं फार दिवस पर्यंत पारा द्यावयाचें अगत्य लागलें तर पार्याचे औषधां मधून हें द्यावयास चांगलें आहे· कारण एकलें किंवा अन्य औषधाशीं मिळवून दिल्हें असतां उह्मासा वमन इत्यादिक न होतां याचे गुण खचीत होतात· व येणें करून रेच झाले असतां याचे ऐवजीं पार्याचे मलमाचें मर्दन करावें· तें औषधोत्पत्ति प्रकारामध्यें लिहिलें आहे· व हें दाहा पंधरा किंवा वीस ग्रेन एकलें तसें इतक्याचें एळ्या बोळाचें अथवा रेवाचिनीचे थोड्या भागाशीं केलेलें मेलन चांगलें रेचक आहे· हें रेचक दोन दोन किंवा तीन तीन दिवसांचे अंतरानें दिल्हें असतां जीमध्यें परसाकडे श्वेतवर्ण होतें· अशी आंतड्याची विकृति व ग्लानी तंद्रा इत्यादिक दूर होतात· व उपदंशाच्या परिहार केवळ पार्याचे औषधें करून खचीत होतो· त्यामध्यें हें नम्र आहे· ह्मणोन याला फार करून देतात· याचे गुण तोंड आल्यावांचून पूर्ण होत नाहींत· याज करितां या रोगावर तोंड येईल तों पर्यंत हें द्यावें· परंतु तोंड फार आणावयाचें अगत्य नाहीं· थोडें येईल असें द्यावें· आल्या नंतर रोगाचीं सांप्रत कालींचीं लक्षणें व त्याची पूर्वींची अवस्था पाहून त्या प्रमाणें याला द्यावें· बहुत करून याला चाळीस किंवा पन्नास दिवस पर्यंत द्यावयास पाहिजे· त्वरेनें याचा प्रतिबंध केला असतां कांहीं एक वेळेस रोग फिरून उपस्थित होतो· व रोग्याला हें दिल्यानंतर शीत लागूं देऊं नये· लागलें असतां रोगावर याचे गुण होत नाहींत· लाळेचे पिंडावर होऊन लाळ मात्र पडत्ये· तेणें करून याचे गुण पूर्ण झाले असा वैद्यास भ्रम मात्र होतो· असें जाणावें· व येणें करून रेच फार झाले असतां

याचे गुण होत नाहींत· ह्मणोन त्यांचे प्रतिबंधासाठीं याशीं अफु मिळवावी· व तोंड फार आलें असतां त्याचा परिहार करणारे उपचार पुढें लालास्त्रावी औषधांमध्यें लिहिले होतील·

कालोमेल·

याची सिद्ध करावयाची कृति व रूपादिक औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिलीं आहेत· हें औषध चांगलें आहे· याचे गुण सर्वकाल निश्चित होतात· या देशांचे सर्व प्रकारचे ज्वरांवर अति उत्तम आहे· त्यां बराबर आंतडीं काळिज प्लीहा यांची विकृति असतां विशेषें करून उत्तम आहे· बहुत करून ती विकृति व इतर उपद्रव दूर होऊन ज्वरांचा परिहार होतो· त्यांवर तोंड येईल तों पर्यंत द्यावें· व अति सारावर याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत स्वेदकारी औषधाशीं मिळवून अफु द्यावयास योग्य असल्यास ती सहित ही दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· नंतर येणें करून तोंड लौकर आलें नाहीं तर बाहेर पार्याचे मलमाचें मर्दन करावें· कारण या रोगाचें शमन दोन तीन दिवसानीं अवश्य केलें पाहिजे तोंड आल्यानंतर हा रोग निःशेष जातो· व हें काळिजाचे रोग शोषक वाहिन्यांचे पिंडांची सूज व अन्यस्थळींची फार दिवसांची सूज वायूची पीडा यांवर चांगलें आहे· बहुत करून स्वेदकारि औषधादिकां बराबर रेच न व्हावयासाठीं अफुसहित द्यावें· व धनुर्वायुवर तोंड यावयासाठीं याचें मोटें प्रमाण, द्यावें· आणि बाहेर पाऱ्याचे मलमाचें मर्दन करावें· या उपचारानें तोंड आलें असतां फार करून हा रोग दूर होतो· व अंगमर्द नाशासाठीं याला अफुशीं मिळवून द्यावें· तसें दांत खिळी बसली असतां द्यावें· तसें कुत्र्याचे दंशें करून जो रोग होतो त्यावर ही द्यावें· तेणें करून कांहीं हित होतें· व याला जलोदरावर द्रावक औषधाचे साहाय्यासाठीं आणि काळिज प्लीहा यांची विकृति दूर व्हावयासाठीं द्यावें· तेणें करून शोषक वाहिन्यांची शोषण शक्ति अधिक होऊन त्या रोगाचें पाणी चांगलें शोषितात· तसें जलत्वक् आणि जलपिंजर यांवर ही दिल्हें असतां द्रावकास साहाय्य होतें· व याचे गुण गर्भाशयावर ही होतात· ह्मणोन ऋतूद्भव औषधा बराबर त्याचे साहाय्यासाठीं कधिं देतात· व कुष्ठ दद्रु खरुज इत्यादिक चर्माचे रोगांवर कधिं देतात· आणि बाहेर पाऱ्याचे मलमाचें मर्दन करितात· असें जाणावें· याचें प्रमाण धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिलें आहे· व तेथें याचे अन्य गुण ही संक्षेपें करून लिहिले आहेत· त्यांचें सविस्तर वर्णन पुढें त्या त्या गुणांचे औषधांमध्यें केलें होईल·

याचें औषध· पिल्युले हैद्रार्जेरी सब्म्युर्यांटिस् कोम्पोसिटे·

हैड्रार्जरी ओक्सिम्युर्यास·

याची सिद्ध करावयाची कृति रूप गुण प्रमाण इत्यादिक धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिलीं आहेत·

याचीं औषधें· लैकोर हैड्रार्जरी ओक्सिम्युर्याटिस· हैड्रार्जरम प्रीसिपिटेटम् आल्बम्·

लोखंडाचीं औषधें·

हीं सर्व रोचकें आहेत· याचें साधारण वर्णन करितो· हीं दिल्यानंतर रुधिराचे गमनाचें बल अधिक होतें· अन्न चांगलें जिरतें· व शरीरांतील रसांची उत्पत्ति न्यून झाली असतां अधिक होत्ये· फार अधिक झाली असतां न्यून होत्ये· व ते अपरिमित बाहेर निघत असतां यांचे कोष्ठबंधक गुणें करून त्यांचे निघण्याची न्यूनता होत्ये· यानां जा रोगांमध्यें निर्बलपणा आहे· त्या रोगांवर द्यावीं· यांचे गुण लवकर होत नाहींत· याजकरितां यांची योजना अजीर्ण स्त्रियांचे पोटांतील वायुगोळा निर्बलपण्यामुळें नष्ट झालेलें आर्त्तव धुपणीं रुधिराचें गमन त्वरित नसतां प्रदर व पडसें गंडमाला इत्यादिक फार दिवसांचे रोगांवर करावी· परंतु दाहाचीं लक्षणें व शरीरांत रुधिराचें आधिक्य असतां करूं नये· व चित्ताचा दुःखें करून किंवा बहुत विद्याभ्यासें करून अथवा शरीराचा अपरिमित आयासें करून प्रकृतिला विकार होऊन भुक लागत नाहीं· कांहीं कार्य नीट करवत नाहीं· अल्प आयासें करून शरीर लवकर थकतें· तेव्हां हीं चांगलीं आहेत· तशीं दम्यावरही चांगलीं आहेत· परंतु याविषयीं यांमधून लोहकीट विशेषें करून चांगलें आहे· येहीं करून हा रोग एका कालींच न्यून होत नाहीं· हळु हळु न्यून होत होत दूर होतो असें जाणावें· व हीं दिल्यानंतर नाडीचें गमन त्वरित ताहान जिभेवर पांढरेपणा कपाल दुखल भोंवळ इत्यादिक उपद्रव झाले असतां यांचा प्रतिबंध करावा· व येहीं करून मुरडा उह्लासे रेच हे होऊं लागले असतां पहिल्या दोहींचे निवारणासाठीं सुगंध औषधाशीं व रेचांचे निवारणासाठीं अफुशीं मिळवून द्यावीं· व पोट फुगलें असतां एळ्या बोळें करून किंवा खारट ढाळकें करून मोकळें करावें· व यांमधून कोणतें एक वनस्पतिचे कोष्ठबंधक औषधाचे फाण्टाशीं मिळवलें असतां तें मेळून शाई सारिखें काळें होतें· व कालंबा आणि क्वाश्या या रोचकांचे फाण्टाशीं मिळवलें असतां तें मेळून काळें होत नाहीं· परंतु दोन्हीं मेळनें औषधा विषयीं चांगलीं आहेत· असें जाणावें· या प्रकारें यांचें साधारण वर्णन केलें· आतां एका एकाचें विशेष वर्णन करतो·

फेर्रीसब्कार्बोनास· प्रा॰ लोह्कीट·

याची सिद्ध करावयाची कृति धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे· याचा रंग तांबडा भुरासा आहे· याला स्वाद व गंध नाहीं· व हें पाण्यांत विरघळत नाहीं· ह्मणोन बहुत करून नुस्तें द्यावें· किंवा सुगंध रोचकाचे अथवा कटु रोचकाचे चूर्ण बरोबर द्यावें· अथवा त्यांबरोबर याचा गोळ्या करून द्याव्या· व रूदड्रवास्तव एळ्याबोळ वालीर्येन बोळ इत्यादिकां बरोबर द्यावें· याचें प्रमाण पांच ग्रेनांपासून वीस ग्रेन पर्यंत आहे· तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· निर्बलपण्यामुळें आर्त्तव नष्ट झालें असतां व प्राप्तकालीं उत्पन्न झालें नसतां त्याचे उत्पत्ति विषयीं फार चांगलें आहे· व हें दिल्यानंतर वमन उह्लासा पोटांत वायू हे उपद्रव झाले असतां यांचे परिहारासाठीं याला सुगंध औषधाशीं मिळवून द्यावें· व पोट फुगलें असतां एळ्याबोळा बरोबर द्यावें· व रेच होऊं लागले असतां अफुबरोबर द्यावें· पूर्वीं सांगीतलें किं सुगंध रोचकादिकां बरोबर द्यावें· त्यांमधून काहींचे बरोबर देण्यांच्या प्रकार सांगतो·

लोह्कीट दाहा ग्रेन दालचिनीचें मिश्रित चूर्ण पांच ग्रेन दोहोंचें मेलन करून पाहांटेस व दोन प्रहरीं द्यावें·

लोह्कीट अर्धड्राम तितका बाबुन्याच्या रांधा दोहोंना मिळवून बारा गोळ्या कराव्या त्यांमधून दोन दोन गोळ्या दिवसांत दोन तीन वेळ द्याव्या·

लोह्कीट दाहा ग्रेन वालीर्येनाचें चूर्ण अर्धड्राम दोहोंना मिळवून एक गोळी करून द्या-

व जेणें करून पीडा फार होत्ये जाचें नाम अनंतवात असा एक रोग आहे· त्याचा प्रारंभ बहुत करून डोळ्यांचे खालती होऊन तेथून मुखाचे नेर्वसांस व्यापितो· त्या रोगावर हें चांगलें आहे· अर्धड्राम किंवा एकड्राम असें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

याचीं औषधें· **फेर्रम आम्मोन्येटम· टिंक्चुरा फेर्री म्युर्योटिस·**

फेर्रीसल्फास· प्रा॰ हिराकस·

याची सिद्ध करावयाची कृति औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे· याचा रंग हिरवा स्वाद खारट तुरट असा असून वाईट आहे· व याला गंध नाहीं· हें पाण्यामध्यें चांगलें विरघळतें· वायुमध्यें कांहीं काल पर्यंत उघडें राहिलें असतां यावर पिंवळी बुरशी येत्ये· व याला फारकरून पाण्यामध्यें विरघळवून देऊं नये· याचें कारण तें पाणी त्वरेनें नासतें· हें चांगलें रोचक आहे· लोखंडाचे औषधांचे साधारण वर्णनामध्यें जे रोग लिहिले आहेत त्यावर चांगलें आहे· दिल्या

नंतर तेथें जे गुण सांगीतले आहेत· ते होतात· हें एक ग्रेन असें दिवसांत दोन वेळ द्यावें· येणेंकरून उह्मासा पोटांत शूल मुरडा यांमधून कोणता एक उपद्रव झाला आणि सुगंध औषधाचे योगानें त्याचें निवारण झालें नाहीं· तर हें बंद करून याचे ऐवजीं लोखंडाचें दुसरें औषध द्यावें· व गंडमाळांवर याला बार्कीशीं मिळवून कांहीं दिवस पर्यंत द्यावें· व आर्त्तव नष्ट झालें असतां व प्रासकालीं उत्पन्न झालें नसतां कडु रेचकाशीं किंवा बोळाशीं मिळवून द्यावें· याचा कांहीं औषधाबराबर देण्याचा प्रकार सांगतो·

हिराकस एक स्क्रुपल एक्स्त्राक्टम सिंकोने एक ड्राम दोहोंना मिळवून पंधरा गोळ्या कराव्या· त्यांमधून एक एक गोळी दिवसांत तीन वेळ द्यावी· हा प्रकार रोचका विषयीं जाणावा· ऋतूद्भवा विषयीं सांगतो·

हिराकस बारा ग्रेन एक्स्त्राक्टम जिन्शयेने एक ड्राम दालचिनीचें मिश्रित चूर्ण अर्ध ड्राम सर्वांना मिळवून अठरा गोळ्या कराव्या त्यांमधून दोन दोन गोळ्या दिवसांत तीन वेळ द्याव्या·

हिराकस एक स्क्रुपल बोळ एक ड्राम दोहोंनां मिळवून बारा गोळ्या कराव्या त्यांमधून एक एक गोळीं दिवसांत तीन वेळ द्यावी·

हिराकस पंधरा ग्रेन बोळ एक ड्राम एळ्याबोळ पंचाहात्तर ग्रेन सर्वांनां मिळवून तीस गोळ्या कराव्या· त्यांमधून दोन दोन गोळ्या दिवसांत दोन तीन वेळ द्याव्या· या प्रकारें जाणावें·

याचीं औषधें· **फेर्री सब्कार्बोनास· मिस्त्युरा फेर्री कोम्पोसिटा· पिल्युले फेर्री कोम्पोसिटे·**

टिंक्त्युरा फेर्री म्युर्याटिस·

याची सिद्ध करावयाची कृति धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे· याचा रंग हळदी सारिखा व स्वाद तुरटी सारिखा असा आहे· याला थोडा सुगंध आहे· या विषयीं याचें प्रमाण पांच मिनिमां पासून तीस मिनिमा पर्यंत आहे· याला पाण्यांशीं मिळवून दिवसांत दोन वेळ द्यावें· अजीर्णावर याचें लाहान प्रमाण मोठ्ये प्रमाणापेक्षां द्यावयास चांगलें आहे· तें प्रमाण बहुत करून कडु रेचकाचे फाण्टा बराबर द्यावें· आणि अगत्या सारिखें अधिक करावें· कारण एकाकालीं फार मोटें प्रमाण दिल्हें असतां कपाळशूळ नाडी भरून तिचें गमन त्वरित मुरडा इत्यादिक होतात· व हें दिल्यानंतर पोट फुगलें असतां तें मोकळें होई तोंपर्यंत याचे बराबर एक एक ड्राम ईप्सम सालत्स द्यावें· व येणेंकरून रेच होऊं लागले असतां एक दिवस हें बंद करून

रेवाचिनी मग्निश्याशीं मिळवून द्यावी· तेणें करून पोट स्वच्छ झाल्यानंतर याला द्यावें· व निर्बलपणा फार असून याला चौकशी वांचून दिल्हें असतां पूर्वींचे कपाल शूलादिक उपद्रव होतात· तसें कोणत्याही उपचारानें रोगाच्या परिहार करून निर्बलपणा फार केला असतां दिल्हें तर रोगाचा फिरून उद्गम होतो· व याला ऋतुद्रय आणि कोष्ठबंधक हे गुणही आहेत· पहिल्या गुणाविषयीं एक्याबोळ व वालीर्यन यांबराबर द्यावें· परंतु हें लोखंडाचे अन्य औषधाप्रमाणें चांगलें नाहीं· दुसर्या गुणाविषयीं शरीरांतून रक्त बाहेर निघत असतां कधिं देतात· व याला कृमिंवर दिल्हें असतां कांहीं एकवेळेस ते पोटांतून बाहेर पडतात· व हें गंडमाळां विषयीं फार चांगलें आहे· या रोगावर पहिल्यानें याचें प्रमाण लाहान द्यावें· नंतर तें उत्तरोत्तर अधिक करित करित पन्नास मिनिम करावें· तें पन्नास मिनिम प्रमाण दिवसांत एक वेळ किंवा दोन वेळ द्यावें· व शिश्नमार्गांत मांस नवाढतां कांहीं आटोपल्या सारिखें व ताठल्या सारिखें असें होऊन मूत्र बंद होतें· हा मूत्राघाताचा एक प्रकार आहे· याचे परिहारासाठीं पांच पांच मिनिम गुण पूर्ण होई किंवा उल्हासा होई तों पर्यंत पंचवीस पंचवीस पळांचे अंतरानें द्यावें·

जिन्सीसल्फास·

याची सिद्ध करावयाची कृति व रूपादिक धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिलीं आहेत· हें अजीर्णावर पाव पाव ग्रेन कडुरोचका बराबर दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· असें गुण पूर्ण व्हावयासाठीं कांहीं दिवस पर्यंत देत असावें· परंतु आठ दाहा दिवसांनंतर गुण कांहीं झाला नाहीं· तर प्रतिबंध करावा· कारण त्या दिवसांचे पुढें दिल्यानें हित होत नाहीं· व फेंफर्यावर हें एक एक किंवा दोन दोन ग्रेन कडुरोचका बराबर अथवा कस्तूरी कापुर इत्यादिक अंगग्रहनाशकां बराबर प्रति दिवशीं दोन तीन वेळ द्यावें· कस्तूरी कापुर यांज बराबर देण्याचा प्रकार सांगतो·

जिन्सीसल्फास दाहा ग्रेन कस्तूरी एक ड्राम कापुर एक स्क्रुपल सर्वांनां मिळवून वीस गोळ्या कराव्या· त्यांमधून दोन दोन गोळ्या दिवसांत दोन तीन वेळ द्याव्या·

व जाखोखल्यामध्यें दाहरोगाचीं लक्षणें नसून ढांस फार आहे व श्वास फार लागतो त्याजवर हें बोळ कापूर यांचे बराबर द्यावयास चांगलें आहे तसें दाहरोगाचीं लक्षणें नसून फुप्फुसांपासून कफ फार निघत असतां त्याजवरही चांगलें आहे· व हें तृतीयक चतुर्थक अन्येद्युस् ज्वर यांवर नुस्तें किंवा सिंकोना बराबर द्यावयास चांगलें आहे· त्याचे पाचना बराबर अथवा सल्फास क्वैनैने बराबर द्यावें· सल्फास क्वैनैनेचे बराबर देण्याचा प्रकार सांगतो·

जिन्सीसल्फास दोन ग्रेन सल्फास क्वैनैने सोळा ग्रेन किराइत काड्या इत्यादिक कडु

रोचकांमधून कोणत्या एकाचें फाण्ट आठ औंस कांहीं एक सुगंध रोचकाचें टिंक्चुर एक औंस सर्वांचें मेलन करून त्यामधून एक एक औंस द्यावें·

याचें औषध· **जिन्सी ओक्सिदम·**

क्युप्रीसल्फास·प्रा॰मोर्चुत·

याचीं रूपादिक सर्वांस ठाऊक आहेत· ह्मणोन सांगितलीं नाहींत· या देशांत याला पेगु देशापासून आणितात· याला कांहीं रोचक गुण आहेत· परंतु त्यां विषयीं फार करून देत नाहींत· पूर्वकालीं कोणी फेंफर्यावर देत असत· याचें प्रमाण एका ग्रेनाचा आठवा भाग आहे· तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· याचा गुलकंदादिकां बराबर गोळ्या करून द्याव्या· व पोटांत कांहीं पीडा असली तर एका एका गोळी मध्यें पाव पाव ग्रेन अफु मिळवावी· व याला अन्यही गुण आहेत· ते पुढें लिहिले होतील·

याचें औषध· **क्युप्रम आम्मोन्येटम· लेकोर क्युप्री आम्मोन्येटी·**

लैकोर आर्सेनिकेलिस·

याची सिद्ध करावयाची कृति धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारा मध्यें लिहिली आहे· यामध्यें एक सुगंध अर्क मिश्रित आहे· तेणें करून याला स्वाद रंग गंध हे येतात· हें चांगलें रोचक आहे· अन्येद्युस् तृतीयक चतुर्थक ज्वर यांवर उत्तम आहे· याचें प्रमाण चार मिनिमांपासून वीस मिनिम पर्यंत आहे· तें प्रमाण ज्वर निघाल्यानंतर दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· तो येतो त्या वेळेस देऊं नये· या देशाचे मनुष्यांनां याचें मोटें प्रमाण दिल्हें असतां सहन होतें· तसें गोर्या मनुष्यानां सहन होत नाहीं· याज करितां त्यानां प्रमाण चार मिनिमांपासून बारा मिनिम पर्यंत द्यावें· व हें दिल्यानंतर मुरडा उह्मासा इत्यादिक उपद्रव झाले असतां सुगंध रोचकाशीं अथवा अफुचे अल्प भागाशीं मिळवून द्यावें· व याला भोजना पूर्वीं देऊं नये· दिल्हें असतां पूर्वींचे मुरडादिक उपद्रव होतात· व या औषधानें फार करून पोट फुगतें· ह्मणोन त्याचे निवारणा साठीं रात्रीस दाहा ग्रेन ब्लुपिल द्यावें· अथवा अन्य नम्र ढाळकाची गोळी द्यावी· व याला कडु रोचकाचे फाण्टा बराबर किंवा पाण्यां बराबर द्यावें· पहिल्या बराबर देण्यांचा प्रकार सांगतो· किराईत कालंबा इत्यादिक कडु रोचकां मधून कोणत्या एकाचें फाण्ट दोन औंस लेक्कोर आर्सेनिकेलिस दाहा बारा मिनिम दोहोंचें मेलन करून असें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· व येणें करून डोळ्यांचा पांपण्यां आणि मुख हीं ताठलेलीं सुजलेलीं कं-

डुनें युक्त अशीं झालीं असतां व तोंडांत उष्णता दुःखहीं झालीं असतां याचें प्रमाण कांहीं न्यून करावें· व तोंड आलें असतां व पोटांत शूळ उह्मासा वमन इत्यादिक होऊन अफुचा योगानें दूर झालीं नसतां व कपाळ शूळ भोंवळ इत्यादिक लक्षणें झालीं असतां याचा प्रतिबंध करावा· तसा थोडा खोखला झाला असतांही करावा· व रुधिराचें गमन त्वरित होत असतां व फुफ्फुसांस कांहीं विकार झाला असतां याला देऊं नये· व पार्याचे औषधानें तोंड येऊन ज्वराचा प्रतिबंध होऊन तो फिरून येऊं लागला असतांही याला द्यावें· व याला अंतरित कपाळ शूळ व अर्धशिशी यांवरही द्यावें· व कोणीं कुष्ठ श्लीपद फेंफरें यांवरही देतात· तेणें करून कधिं हित होतें· व कोणीं सर्पाचा दंशें करून जीं लक्षणें होतात त्यांचें शमन व्हावयासाठीं याचें मोटें प्रमाण देतात· तेणें करून कधिं हित होतें असें जाणावें·

बिस्मथीसब् नैत्रास·

याचा उत्पत्ति प्रकार व गुणादिक धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिले आहेत·

आसिदमनैत्रिकम·

याची सिद्ध करावयाची कृति धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे याचें पाण्यांशीं मेलन केलें असतां तें रोचका विषयीं चांगलें आहे· व याला पुष्कळ पाण्यांशीं मिळवून तें पाणीं ज्वरादिकांवर प्यावयास चांगलें आहे· तसें काळिजाचे रोगावर पाऱ्याचें औषध घेतल्यानंतर चांगलें आहे· या रोगा बरोबर जलोदर असतांही चांगलें आहे· व अजीर्णा बरोबर उह्मासा वमन इत्यादिक होत असतां त्यांचें निवारण या औषधानें कधिं होतें· व हें उपदंशावरही चांगलें आहे· परंतु याजवर आणि काळिजाचे रोगावर पूर्वीं देऊं नये· पार्याचे औषधानें त्यांचें शमन करून द्यावें· तेणें करून रोचक गुण होऊन पार्याचे गुणा प्रमाणेंही कांहीं गुण होतात· हें एक ड्राम घेऊन दोन पैंट पाण्यांशीं मिळवून अगत्या सारिखें प्यावयास द्यावें· व जेव्हां निर्बल मनुष्याला उपदंश होऊन निर्बल पण्यांमुळें पार्याचें औषध देतां येत नाहीं· तेव्हां थोडें बल येई तों पर्यंत याला द्यावें· दिल्यानंतर रोग अधिक होण्यांचें विघ्न होऊन याचे रोचक गुणें करून हित होतें· व याला पार्याचे औषधा बराबर दिल्हें असतां पार्याचे गुण तोंडावर थोडे होतात· व बहुत वेळ पारा भक्षिला असतां शरीरास विकार होऊन जलोदर रोग कधिं होतो· त्याचे परिहारा विषयीं याला दिवसांत बहुत वेळ दिजिटेलिसाचे साहाय्यासाठीं द्यावें· व पायांवर लाहान लाहान व्रण होऊन ते फार

दिवस पर्यंत कधिं राहातात· त्यांचे परिहारासाठीं प्रति दिवशीं रात्रीस पांच ग्रेन ब्लुपिल आणि दिवसास याला द्यावें· ब्लुपिलें करून रेच फार होऊं लागले असतां त्याला अफुचे अल्प भागा बराबर द्यावें· त्या दोहों करून हित फार होतें· परंतु याला आणि ब्लुपिलाला एकाकाळीं बराबर देऊं नये· कारण पार्थांचा याचा विरोध आहे· यामुळें बराबर दिल्यानें दोहोंचे गुणांचा नाश होऊन तृतीय गुण उत्पन्न होऊन मनुष्याला उपद्रव होतो· व हें औषध एक भाग म्युर्याटिक आसिद दोन भाग यांचें मेळन करून त्याचा आंबटपणा सिर्का सारिखा होई इतकें पाणीं घालून त्या मेळनानें शरीर किंवा त्याचे एक दोन अवयवं धुतले असतां अथवा त्यामध्यें मनुष्याला बसविला असतां तोंडांत घेतल्या सारिखे परिणाम होतात· व आंगाला कांहीं कंड सुटत्ये· तोंड कणकल्या सारिखें होतें· रेच होऊन त्यां बराबर पित्त पडतें· हा उपचार अगत्या प्रमाणें सर्व शरीराला किंवा त्याचे अवयवाला दिवसांत एक दोन वेळ करावा· हा काळिजाचे फार दिवसांचे विकारावर चांगला आहे· असें जाणावें· व विषासाठीं कोणीं याला भक्षिलें किंवा कोणीं कोणाला दिल्हें असतां तें ओंठ हनुवटी इत्यदिक स्थलांवर पिंवळे डाग पडून कळूं येतें· त्या विषाचे नाशा विषयीं सर्व विषघ्नां पेक्षां साबुणाचें पाणीं व मग्निश्या आणि पाणीं यांचें मेळन हीं चांगलीं आहेत·

याचीं औषधें· **आसिदमनैत्रिकमदिल्युटम· आर्जेंतीनैत्रास· अंग्वेन्तमहैड्रार्जरीनैत्रटिस· हैड्रार्जरीनैत्रिकोओक्सिदम· स्पिरिटसएथरिसनैत्रिसी·**

कास्कारिल्ले कोर्टेक्स·

कास्कारिल्ला या नामें करून वृक्ष विशेष आहेत· त्यांची कोर्टेक्स ह्मणजे साल· हिला अन्य देशापासून विलायत देशांत आणून तेथून या देशांत आणितात· हिला सुगंध आहे· ही पोटांतील वायूचा नाश करून रोचक गुण करत्ये· हिचे चूर्णाचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत आहे· तें दिवसांत तीन चार वेळ द्यावें· परंतु त्यांज पेक्षां हिचें फाण्ट चांगलें आहे· त्याची सिद्ध करावयाची कृति प्रमाण हीं वनस्पति औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिलीं आहेत· तो अम्लनाशक औषधाशीं मिळवून अम्लिकें करून जें अजीर्ण होतें· त्यावर द्यावयास चांगला आहे· तसा ईप्सम सालत्स आणि सल्फ्युरिक आसिद यांशीं मिळवून अजीर्णा बराबर पोट फुगतें त्यावर चांगला आहे· व त्याला कोष्ठबंधक औषधाशीं मिळवून संग्रहणीवर द्यावा· व बार्कांशीं मिळवून अन्येद्युस तृतीयक चतुर्थक ज्वर यांवर द्यावा·

या सालीचीं औषधें·· ईन्फ्युसम कास्कारिल्ले· टिंक्च्युरा कास्कारिल्ले·

आंथे

आंथेमिदिस फ्लोरेस·

आंथेमिदिस या नामें करून झाडें आहेत· त्यांचीं फ्लोरेस ह्मणजे फुलें· यानां फार करून फार्सिस्थाना पासून या देशांत आणितात· त्या देशामध्यें एका गांवाचें नाव बाबुना आहे· त्याजवळ या फुलांची उत्पत्ति फार आहे· ह्मणोन यानां ही यवनी भाषेंत बाबुना ह्मणतात· व यांची उत्पत्ति या देशांत ही कांहीं स्थळीं आहे· हीं अजीर्णाचे सर्व प्रकारांवर चांगलीं आहेत· हीं नुस्तींच फार करून देत नाहींत· यांचीं औषधें देतात तीं वनस्पति औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिलीं आहेत·

त्यांचीं नावें सांगतो· **ईफ्युसम आंथेमिदिस· एक्स्त्राक्टम आंथेमिदिस· ओत्यम आंथेमिदिस·**

कालंबेरेदिक्स·

कालंबा या नामें करून वृक्ष आहेत· त्यांचें रेदिक्स ह्मणजे मूळ· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· अन्य देशा पासून या देशांत आणितात· याचा गंध चांगला रंग पिंवळासा आहे· या विषयीं हें उत्तम आहे· याचे चूर्णाचें प्रमाण पांच ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत आहे· तें दिवसांत तीन चार वेळ द्यावें· तें चूर्ण सुगंध औषधां बराबर किंवा लोहकीटा बराबर द्यावें· अथवा त्याचा गोळ्या करून द्याव्या· त्या करायासाठीं गोंदाचे पाण्याचें अगत्य लागत नाहीं· त्यामध्यें चिकटपणा पुष्कळ आहे· त्यामुळें नुस्त्ये पाण्यानें होतात· परंतु फार करून याचें चूर्ण देऊं नये· फाण्ट द्यावें· त्याचें प्रमाण व गुणादिक औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिले आहेत· त्याला कार्य विशेषें करून सुगंध औषधें अम्लनाशक अश्मरीहारक इत्यादिकां बराबर द्यावा· व याचें चूर्ण रेवाचिनी सल्फास पोटास्से या दोहोंशीं मिळवून गुल्मावर द्यावें·

याचीं औषधें सांगतो· **ईफ्युसम कालंबे· टिंक्युरा कालंबे·**

क्वाश्येलिग्नम·

क्वाश्या या नामें करून वृक्ष आहेत· त्यांचें लिग्नम ह्मणजे काष्ठ· त्या वृक्षांची उत्पत्ति या देशांत नाहीं· अन्य देशामध्यें आहे· तेथें त्यानां कापून त्यांचे आंतील काष्ठाचे लाहान लाहान तुकडे करून तेथून विलायत देशांत आणून नंतर या देशांत आणितात· हें चांगलें रोचक आहे· बहुत करून याचें चूर्ण देऊं नये· फाण्ट द्यावें· त्याची सिद्ध करावयाची कृति व प्रमाण हीं वनस्पति औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिलीं आहेत· तें फार करून एकलेंच देऊं नये· अन्य औषधाशीं मिळवून द्यावें· ह्मणजे अजीर्ण नष्ट आर्त्तव यांवर अम्लनाशक आणि लोखं-

डाचें औषध यांशीं व संग्रहणींवर खडी आणि सुगंध रोचक यांशीं व स्त्रियांचे पोटांतील वायु गोळ्यावर रेचक वायुनाशक वालीर्यनाचें टिंक्चुर या तिहींशीं व कांबिणेवर रेवाचिनी खारट रेचक या दोहींशीं व जलोदरावर पल्विसस्सिल्लेशीं किंवा इतर द्रावकाशीं व मदात्ययावर सल्फास जिन्सीचे लाहान प्रमाणाशीं मिळवून द्यावें· व याचे चूर्णाचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून एक ड्राम पर्यंत आहे· तें कदाचित् द्यावयाचें असल्यास दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

याचें औषध· ईप्सुमक्षारये·

सिंकोना·

हें औषध वृक्ष विशेषांची साल आहे· ते वृक्ष या देशांत नाहींत· अन्य देशांमध्यें त्यांचा खांद्या कापून त्यांची साल काढून विलायत देशांत आणून या देशांत आणितात· ते वृक्ष तीन प्रकारचे आहेत· त्यांचीं नावें सिंकोना लान्सिफोल्या सिंकोना कोर्दिफोल्या सिंकोना ओब्लोन्जिफोल्या या तिहीं मधून पहिल्या प्रकाराचे वृक्षांची साल चांगली आहे व तिलाच फार करून देतात· असें जाणावें· हें औषध फार चांगलें रोचक आहे· अन्येद्युस् तृतीयक चतुर्थक ज्वर यांवर उत्तम आहे· परंतु रेचकें करून किंवा वमकें करून पोट स्वच्छ केल्या वांचून देऊं नये· पहिल्यानें कालोमेल रेवाचिनीशीं मिळवून सर्व मळ निघून पोट स्वच्छ होई तों पर्यंत द्यावें· मग याचें एक स्क्रुपला पासून एक ड्राम पर्यंत प्रमाण ज्वर निघाल्या नंतर दाहा बारा घटिकांचे अंतरानें द्यावें· तो येतो त्यासमयीं देऊं नये· दिल्हें असतां उह्मासे होतात· व त्या प्रमाणें करून वमन झालें नसतां ज्वराचा यावयाचा काल समीप पाहून त्याज पेक्षां मोटें प्रमाण अल्प अवधिनें द्यावें· ज्वर येतां क्षणीं याचा प्रतिबंध करावा· निघाल्या नंतर फिरून द्यावें· परंतु त्या बराबर प्लीहेस व काळिंजास रोग झाला असतां देऊं नये· पहिल्यानें त्या रोगाचा परिहार पार्याचे औषधानें करावा· नंतर त्या औषधाचे योगानें ज्वर दूर झाला नसतां याला पूर्वीं सांगीतल्या प्रमाणें द्यावें· येणें करून ज्वराचा परिहार झाल्या नंतरही कांहीं दिवस पर्यंत याला प्रति दिवशीं द्यावें· नंतर एका महिन्यांत बारा दिवस ह्मणजे पुनवेचे उधाणाचे साहा दिवस व अंवसेचे उधाणाचे साहा दिवस द्यावें· या प्रकारें दिल्यानें ज्वर निःशेष जातो· व जो फार बळवंत आहे· व ज्याचे मस्तकांत किंवा अन्य स्थलांत दुःख आहे त्याचें पहिल्यानें रक्त काढून मग वमक ढाळक देऊन याला द्यावें· वमकादिकें करून पोट स्वच्छ केल्या वांचून व प्लीहा काळिज यांचा रोग असून हें दिल्हें असतां याचा गुण कांहीं होत नाहीं· व याला जांची पीडा अंतरित ज्वरा प्रमाणें कांहीं कालाचे अंतरानें होत्ये असे अर्धशिशी स्त्रियांचे पोटांतील वायु गोळा इत्यादिक अंतरित रोग यांवर द्यावें· तसें उग्र गलांकुर व देवी यांवरही द्यावें· व हें वायूचे पीडेवर चांगलें आहे·

आहे· परंतु प्रारंभ कालीं देऊं नये· पार्याचे औषधानें किंवा अन्य औषधानें त्याचें शमन केल्यानंतर द्यावें· तसें त्याची पीडा अंतरानें होत असतांही द्यावें· या विषयीं याला ओल्यमटेरेबिंथिनेशीं मिळवून दिल्हें असतां याचे गुण फार चांगले होतात· व जलोदर गंडमाला अजीर्ण फेंफरें इत्यादिकांवर हें एकलें किंवा अन्य औषधीं बरोबर द्यावें· तीं औषधें रोगा प्रमाणें वेगळीं वेगळीं आहेत· ह्मणजे जलोदर गंडमाला अजीर्ण यांवर क्षोरवंडादिकांचे औषधां बराबर व जांमध्यें आंग वळतें असें फेंफरें आदिकरून रोग यांवर वालीर्यनादिक अंगग्रह नाशकां बराबर उपदंशावर पार्याचे औषधां बराबर व मोठ्या व्रणावर आणि कांहीं कारणानें मांस सडतें त्याजवर कोन्यी एक्स्त्राक्टम अफु इत्यादिकां बराबर व रुधिराचें गमन मंद असून शरीरांत त्याचें आधिक्य नसून तें बाहेर निघत असतां आसिदम सल्फ्युरिकमा बराबर द्यावें· असें जाणावें· व आंतड्याची शक्ति फार न्यून होऊन पोट फुगत असतां त्याचे परिहारा साठीं याला द्यावें· याचीं औषधें पुष्कळ आहेत· त्यांमधून सर्वां पेक्षां बळकट खचीत गुण करणारें चूर्ण आहे· तेणें करून उह्मासा वमन होऊं लागलें असतां त्याला सुगंध रोचकादिकांशीं मिळवून द्यावें· व त्याला दुध सुरा पाणीं या तिहीं मधून कोणत्या एका मध्यें द्यावें· व तेणें करून रेच होऊं लागले असतां अफुशीं किंवा लादनमाशीं मिळवून द्यावें· रेचांचा प्रतिबंध होऊन पोट फुगलें असतां रेवाचिनीशीं किंवा पोटास्से सल्फासाशीं मिळवून द्यावें· त्या चूर्णाचें प्रमाण पूर्वीं सांगितलें आहे· परंतु वमन झालें नसतां त्याज पेक्षां उत्तरोत्तर अधिक करित करित दिवसांत एक दोन औंस होई तों पर्यंत करावें· व हें बाळानां दिल्हें असतां याचे वाईट स्वादामुळें फार करून वमन होतें· याज करितां त्यांचे ज्वरादिकांचे परिहारा साठीं याचें चूर्ण एक दोन ड्राम घेऊन तीन चार औंस गोंदाचे पाण्याशीं मिळवून पिचकारीनें मलद्वारांत सोडावें· व याचे औषधांचें प्रमाण विशेष गुण इत्यादिक त्यांचे उत्पत्ति प्रकारावर लिहिले आहेत·

याचीं औषधें· **ईफ्युसम सिंकोनें· दीकोक्टम सिंकोनें· एक्स्त्राक्टम सिंकोनें· एक्स्त्राक्टम सिंकोनें रेसिनोसम· टिंक्चुरा सिंकोनें· टिंक्चुरा सिंकोनें कोम्पोसिटा· टिंक्चुरा सिंकोनें आम्मोन्येटा·**

पूर्वींचे दुसर्‍या प्रकारचे वृक्षांचे साली पासून एक औषध सिद्ध करितात· त्याला लतीन भाषेंत सल्फास क्वैनेने ह्मणतात· हें औषध पांढरें खारट फार कडु असें आहे· उष्ण पाणीं व आलकोहोल यांमध्यें घातलें असतां विरघळतें· थंड पाण्यांत फार विरघळत नाहीं· हें ज्ञात होऊन चार पांच वर्षें झालीं· याचे आठ ग्रेनें करून सिंकोनाचे एक औंसा प्रमाणें गुण होतात· याचें प्रमाण एक ग्रेना पासून चार ग्रेन पर्यंत आहे· तें दिवसांत तीन चार वेळ द्यावें· परंतु प्रारं-

भ

भ कालीं मोटें प्रमाण देऊं नये· एक किंवा दोन ग्रेन द्यावें· गुण झाले असतां अधिक करूं नये· तितकेंच देत असावें· जर झाले नाहींत तर रोगाचे परिहाराचा प्रारंभ होई तों पर्यंत हळु हळु अधिक करावें· नंतर तेवढेंच रोगाचा परिहार होई तों पर्यंत देत असावें· एकदांच मोटें प्रमाण दिल्हें असतां पोटांत जडसें वाटतें· तान्हा लागत्ये· कपाळ दुखतें· किंवा त्या सारिखें वाटतें· नाडी भरून त्वरेनें स्फुरत्ये· जीभ पांढरी होत्ये· उह्लासे पोटांत शूल इत्यादिक उपद्रव होतात· हे उपद्रव कदाचित् याचे मध्यम प्रमाणें करून झाले असतां प्रमाण न्यून करावें· अथवा हें बंद् करावें· याचा गोळ्या करून द्याव्या· अथवा पातळ पदार्थामध्यें विरघळवुन द्यावें· गोळ्यां पेक्षां असें द्यावयास चांगलें आहे· व जा जा रोगावर बार्क चांगलें त्या त्या रोगावर हें द्यावयास चांगलें आहे· व बार्क द्यावयाचे पूर्वी जे उपचार करावयाचे लिहिले आहेत· ते याचेही पूर्वी करावे· व याला ज्वरादिकां बराबर काळिज प्लीहा यांस रोग झाला असतां देऊं नये· व यामध्यें बार्कीचे सर्व सुगुण आहेत· येणें करून उह्लासा वमन इत्यादिक होत नाहीं· याज करितां हें निर्बल मनुष्यानां व बाळानां व ज्यांनां वमन होतें त्यानां द्यावयास फार चांगलें आहे· अजीर्ण व तसे अन्य रोग यांवर हें एक एक ग्रेन दिवसांत तीन चार वेळ द्यावें·

जिन्श्येने रेदिक्स·

हें वृक्ष विशेषांचें मूळ आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· अन्य देशा पासून आणितात· हें फार चांगलें कडु रोचक आहे· व त्या विषयीं अन्य कडु रोचका पेक्षां याला फार वेळेस देतात· हें अजीर्ण व स्त्रियांचे पोटांतील वायु गोळा कांबिण नष्ट आर्त्तव जलोदर संग्रहणीं इत्यादिकांवर चांगलें आहे· जसे रोग व अगत्य त्या प्रमाणें याचे बराबर सुगंध रोचक औषधें लोखंडाचीं औषधें अम्लनाशक अश्मरीहारक खारट ढाळक द्रावक इत्यादिक योजावीं· याचें फाण्ट व रांधा द्यावा· चूर्ण फार करून देऊं नये· कदाचित् द्यावयास इच्छितात· तर दाहा ग्रेनां पासून दोन स्कुपल पर्यंत द्यावें·

याचीं औषधें सांगतो· **एक्स्त्राक्टम जिन्श्येने· ईफ्युसम जिन्श्येने कोम्पोसिटम्· टिंक्चुरा जिन्श्येने कोम्पोसिटा·**

कस्पेर्ये कोर्टेक्स·

ही वृक्ष विशेषांची साल आहे· ते वृक्ष या देशांत नाहींत· अन्य देशा पासून हिला आणितात· हिचे चूर्णाचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत आहे· तें रेवाचिनी खा-

रट ढाळक मग्निश्या खडी सुगंध रोचकें इत्यादिकां बराबर द्यावें· व तें वीस ग्रेनां पेक्षां अधिक दिल्हें असतां फार करून वमन होतें· व त्याचा स्वाद वाईट आहे· तो लुप्त व्हावयासाठीं त्याशीं दालचिनीचें मिश्रित चूर्ण मिळवावें· परंतु चूर्ण फार करून देऊं नये· फाण्ट च द्यावें· त्याचीं प्रमाणादिक त्याचे उत्पत्ति प्रकारावर लिहिलीं आहेत· व ही अजीर्णादिकांवर चांगली आहे· परंतु अन्येद्युस तृतीयक चतुर्थकज्वर यांवर देऊं नये· व जा कडु रोचकांची उत्पत्ति या देशांत नाहीं· त्यांचा प्रतिनिधि किराईत आहे असें जाणावें·

हिचें औषध· **ईफ्युसम कस्पेर्ये·**

नारिंगाची साल·

नारिंगाचीउत्पत्ति या देशांत आहे· त्याची साल कडु यतीमध्यें सुगंध तेल आहे· तें तेल दुसर्या कडु रोचकाशीं मिळवून द्यावें· अथवा तिज बराबर दुसर्या कडु रोचकाचें फाण्ट सिद्ध करून तें द्यावें· तिचा योगानें त्याचा कडु स्वाद फार लागत नाहीं· व पोटांतील वायूचा नाश होतो· व नारिंग ताहानेंचें शमन करावयास चांगलें आहे·

तिचीं औषधें सांगतो· **ईफ्युसम आरान्श्येय कोम्पोसिटम· टिंक्चुरा आरान्शीई· सीरुपस आरान्श्योरम· कोन्फेक्श्यो आरान्श्योरम·**

लिंबूची साल·

लिंबूची उत्पत्ति या देशांत आहे· त्याचे सालीचे गुण नारिंगाचे सालीचे गुणां सारिखे आहेत· व हिला त्या साली प्रमाणें द्यावी· परंतु ही साल शिळी औषधार्थ चांगली नाहीं· कारण शिळीचा सुगंध जाऊन वीर्य न्यून होतें· लिंबूचे गुण पुढें लिहिले होतील·

हिचीं औषधें सांगतो· **सीरुपस लिमोनम· ओल्यम लिमोनम·**

दालचिनी·

हिची उत्पत्ति कारकोळादिक देशांत आहे· तेथून या देशांत आणितात· जी सिंगलद्वीपांत उत्पन्न होत्ये ती दालचिनी चांगली आहे असें जाणावें· ही चांगली रोचक आहे· हिला अन्य कडु रोचकाशीं मिळवून द्यावी· हिणें करून कडु रोचकाचा कडुपणा न्यून होतो· व पोटांतील वायू मुरडा यांचें निवारण होतें· व ही सुप्रकृति मध्येंही पोटांतील वायू मुरडा यांचें निवारण करायास चांगली आहे· संग्रहणीं व अन्य रोग यांवर हिला कोष्ठबंधकादिकां बराबर द्यावी·

व हिचें तेल ही द्यावें त्यांत हिचे सर्व गुण आहेत·

हिचीं औषधें· एक्वासिन्नामोमी· स्पिरिटससिन्नामोमी· टिंक्चुरासिन्नामोमी· टिंक्चुरासिन्नामोमीकोम्पोसिटा· पल्विस्सिन्नामोमीकोम्पोसिटस· ओल्यम्सिन्नामोमी·

जायफळ·

याला पूर्वेकडल्ये द्वीपा पासून या देशांत आणितात· याचे गुण अन्य सुगंध रोचकाचे गुणां सारिखे आहेत· परंतु याला कांहीं मदकारी गुण ही आहे· याज करितां शरीरांत रुधिराचें आधिक्य असतां याला चौकशीनें द्यावें· अथवा देऊं नये· हें तीन चार ड्राम एकाकालीं दिल्हें असतां निद्रादिक लागतात असें जाणावें·

याचीं औषधें· स्पिरिटसमिरिस्तिसे· ओल्यममिरिस्तिसे·

लवंगा·

यानां पूर्वेकडल्ये द्वीपा पासून आणितात· या पोटांतील वायू व मुरडा यांचें निवारण कराया विषयीं अन्य सुगंध रोचकां पेक्षां चांगल्या आहेत· ह्मणोन यानां अन्य औषधांचे फाण्टांत आणि पाचनांत घालितात· व यांचें तेल रेचक औषधाचे गोळ्यामध्यें घातलें असतां वायूचें व मुरड्याचें निवारण होतें· व तें तेल दंतांचे पीडेवर चांगलें आहे· व यांचें फाण्ट मदात्य यावर चांगलें आहे· त्याचें प्रमाण त्याचे उत्पत्ति प्रकारावर लिहिलें आहे·

यांचें औषध· ईफ्युसमकार्योफिल्लोरम· ओल्यमकार्योफिल्ली·

मिरच्या·

या फार उत्तम उष्ण रोचक आहेत· यानां अजीर्णा सहित पोटांतील वायू व वातोदर यांवर द्याव्या· व जलोदरादिक रोगांवर लोखंडाचे औषधाचें अगत्य लागलें असतां त्याज बराबर यानां द्याव्या· व अन्येद्युस् तृतीयक चतुर्थकज्वर यांवर बार्कीबराबर द्याव्या· व ज्वरादिकांमध्यें प्रलाप अघोरनिद्रा इत्यादिक भय देणारीं लक्षणें झालीं असतां यांचा लबदा करून पायांवर बांधावा· तेणें करून फोड न येतां गुण चांगले होतात· व उग्र गलांकुर आणि तसे गळ्याचे अन्य रोग यांवर यानां पोटांत देऊन यांचा गुळण्याही द्याव्या· पोटांत द्यावयासाठीं यांचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून एक स्क्रुपल पर्यंत आहे· गुळण्यां द्यावयाचा प्रकार सांगतो· या एक ड्राम घेऊन

एक स्कुपल मिठाबराबर वाटून साहा औंस उकळल्ये पाण्यांशीं मिळवाव्या· नंतर तें पाणीं गाळून सिर्काचे अर्ध औंसाशीं मिळवून त्याचा गुळण्यां द्याव्या·

यांचें औषध· टिंक्चुराकाप्सिसी·

मिर्यें·

यांचे गुण पूर्व औषधाचे गुणां सारिखे आहेत· परंतु तितके बळकट नाहींत·

कबाबचिनी·

हिला जावा द्वीपा पासून या देशांत आणितात· हिचें चूर्ण प्रमेहावर चांगलें आहे· तें एक द्रामा पासून दोन द्राम पर्यंत पाण्यांशीं मिळवून असें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· तेणें करून चार पांच दिवसानीं त्या रोगाचें प्राय: शमन होतें· व आठ दाहा दिवसानीं त्याचा परिहार होतो· तो झाला नसतां तें बंद करावें· व त्या रोगावर तें चूर्ण फार करून कोपेबाशीं मिळवून द्यावें· देण्यांचा प्रकार सांगतो· तें एक औंस कोपेबा एक औंस दोहोंचें मेलन करून त्या मधून दोन दोन द्राम पाण्यांशीं मिळवून दिवसांत तीन वेळ द्यावें·

सुंठ·

हिची उत्पत्ति या देशांत आहे· हिणें करून पोटांतील वायू व मुरडा यांचें निवारण चांगलें होतें· ह्मणोन हिला सोनामुखी रेवाचिनी जालप इत्यादि रेचकांशीं व रोचकादिकांशीं मिळवितात· रेचकांचे चूर्णांशीं पांच ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत मिळवावी· अधिक मिळवूं नये· व हिला चावली असतां कांहीं एकवेळेस दांतांची पीडा न्यून होत्ये· व हिणें करून पित्ताचें शमन ही होतें·

हिचीं औषधें सांगतो· सीरुपसजिंजिबरिस· टिंक्चुराजिंजिबरिस·

ही जात आहे तीं औषधें· सीरुपसराम्नी· टिंक्चुरासिन्नामोमीकोम्पोसिटा· कोन्फेक्श्यो ओपीई· कोन्फेक्श्यो स्काम्मोन्ये· ईफ्युसमसेन्ने· पल्विस्‌सिन्नामोमीकोम्पोसिटस· पल्विस्काम्मोन्येकोम्पोसिटस· पल्विस् सेन्नेकोम्पोसिटस· पिल्युले· सिल्लेकोम्पोसिटे·

वेलदोडे·

यानां कार्कोळादिकां पासून आणितात· यांचे दाण्यांचें चूर्ण अन्य रोचकांचे व रेचक औषधांचे फाण्टांत घालावें· तेणें करून त्यांचा वाईट स्वाद न्यून होऊन पोटांतील वायू व मुरडा यांचें निवारण होतें·

यांचीं औषधें· टिंक्तुरा कार्दोमोमी· टिंक्तुरा कार्दोमोमी कोम्पोसिटा·

हे जांत आहेत· तीं औषधें· एक्स्त्राक्टम कोलोसिंथिदिस कोम्पोसिटम· टिंक्तुरा सिन्नामोमी कोंम्पोसिटा· टिंक्तुरा जिन्श्येने कोम्पोसिटा· टिंक्तुरा रेई· टिंक्तुरा सेन्ने· स्पिरिटस एथरिस आरोमाटिकस· कोन्फेक्श्यो आरोमाटिका· पल्विस् सिन्नामोमी कोम्पोसिटस्·

पुदिना·

याचे गुण याचे औषधांचे उत्पत्ति प्रकारावर लिहिले आहेत·

तीं औषधें· एक्वा मेंथे पिपरीटे· ओल्यम मेंथे पिपरीटे· स्पिरिटस मेंथे पिपरीटे·

कोष्ठबंधक· इं॰ आस्त्रिंजेन्त्स·

शरीरांतील रसादिक बाहेर पुष्कळ निघत असतां त्यांचा जेहीं करून प्रतिबंध होतो· त्या औषधांस कोष्ठबंधक ह्मणावें· यानां थोडा रोचक गुणही आहे· यामुळें येहीं करून बहुत रोगांमध्यें हित होतें· यांतील बहुत एकांचा स्वाद तुरट आहे· व यांतील काथा शिवाय वनस्पतिचे सर्व औषधांचे फाण्टादिकां मध्यें लोखंडाचें औषध घातलें असतां त्यांचा रंग शाई प्रमाणें काळा होतो· पूर्वकालीं समजत असत किं असा रंग त्यांचे आंत तान्निन या इंग्रेजी नामें करून एक पदार्थ आहे· तेणें करून होतो तें खोटें कारण तान्निना बराबर एक दुसरा पदार्थ फार करून असतो तेणें करून होतो· तो पदार्थ काथा मध्यें नाहीं· ह्मणोन त्याचे फाण्टादिकांचा रंग काळा होत नाहीं· त्याला इंग्रेजी भाषेंत गाल्लिक आसीद ह्मणतात· व यां मधून कांहीं औषधांचा शरीराचे ज्या स्थलाशीं संबंध होतो तें स्थल आकुंचित होतें व कांहींचा ज्याशीं संबंध होतो तें स्थल आकुंचित न होऊन त्याचे जवळचें स्थल होतें· यास्तव यानां ओल्या व्रणांवर लावलीं असतां त्यापासून रुधिर निघत असतें त्याचा प्रतिबंध होतो· व रक्तवाहिन्यांचे निर्बल पण्यांमुळें शरीरांतून रक्त निघूं लागलें असतां येहीं करून त्याचा प्रतिबंध चांगला होतो· ह्मणोन यानां प्रदरावर घा-

वीं·

वीं· व यानां नाकांत घातलीं असतां त्या पासून रक्त पडत असतें त्याचा प्रतिबंध होतो· व हीं क्षयरोगादिकांमध्यें घाम फार निघूं लागला असतां त्याचा प्रतिबंध करावयास चांगलीं आहेत· तशीं संग्रहर्णीवर रेचांचा प्रतिबंध करावयास चांगलीं आहेत· व प्रमेह ग्लीत व डोळ्यांचे कांहीं रोग यांवर ही चांगलीं आहेत· प्रमेह ग्लीत यां विषयीं यानां चिपनळीनें शिश्न द्वारांत सोडावीं· व डोळ्यांचे रोगावर लावावीं· व जेव्हां रसादिकांचे अधिक विसर्जनें करून पूर्व रोग दूर होतो· व तेणें करून शरीरांत रुधिराचें झालेलें आधिक्य न्यून होतें· तेव्हां यानां देऊं नये· हें सर्वकाल मनांत ठेवावें· व संग्रहर्णीं विषयीं या औषधानां मदकारि व खडी इत्यादिक अम्लनाशक औषधें साहाय्य होतात· म्हणजे मदकारि तीव्र रसें करून आंतड्यांत मुरडादिक पीडा होऊन त्याची गति अधिक होत्ये· त्या पीडेला न्यून करितात· व अम्लनाशक औषधें रसाचे तीव्र पण्यांचा नाश करितात· यास्तव रोग तारतम्य पाहून यांची योजना करावी असें जाणावें·

कोष्ठबंधक औषधें धातुवनस्पति या भेदें करून दोन प्रकारचीं आहेत त्यांचीं नावें सांगतो·

धातुचीं·

आसिदमसल्फ्युरिकम·
आल्युमेन· प्रा० तुरटी·
टिंक्चुराफेर्रीम्युर्याटिस·
फेर्रीसल्फास· प्रा० हिराकस·
जिन्सीसल्फास· इं० व्हैटविट्र्यल·
क्युप्रीसल्फास· प्रा० मोर्चुत·
प्लुंबी आसीटास· इं० श्युगर ओफलेद
लैकोरकाल्ड्सीस· प्रा० चुन्याचें पाणीं·

वनस्पतिचीं·

गाल्ला· प्रा० मायफळ·
केर्कसकोर्टेक्स·
हेमातोक्सिलीलिग्नम· इं० लोग्वुद·
एक्स्त्राक्टमकाटिक्यु· प्रा० काथ·
कैनो·

या प्रकारें यांचें साधारण वर्णन केलें आतां एका एकाचें पृथक् विशेष वर्ण-

न

न करतो·

आसिदम सल्फ्युरिकम·

हें औषध पूर्वकालीं कासीसा पासून सिद्ध करित असत सांप्रत कालीं तसें करित नाहींत· या प्रमाणें करतात गंधक आठ अथवा नौ भाग सोरा एक भाग दोहोंचें मेलन करावें· नंतर जा खोलीचे भोंवतालें शिसें लावलेलें व एका कोनाला मोरीचे कान्या सारिखी शिशाची नळी असून जिला एक दरवाजा आहे· तो असा किं जाचा उंबर्ठा तळा पासून एक किंवा दीड हात उंच असून जो बंद केल्यानें वायू आंत जाऊं पावत नाहीं· तशा मोठ्या खोली मध्यें सर्व तळावर एक दोन अंगुळें होई इतकें पाणीं घालावें· नंतर ती मध्यें मोटा सपाट दगड ठेवून त्यावर मृत्तिकेचें पात्र ठेवून त्यांत तें मेलन घालून प्रदिप्त करून तत्क्षणीं दरवाजा बंद करावा· नंतर त्या मेलना पासून तीव्र वाफ निघून पाण्यांशीं मिळतात· तेंहीं करून पाणीं आंबट होतें· पंधरा किंवा वीस घटिका नंतर तें मेलन सर्व जळून जातें· याज करितां दुसर्यानें तसें मेलन करून प्रदिप्त करावें· या प्रमाणें पाणीं फार आंबट होई तों पर्यंत तितक्या घटिकांचे अंतरानें पंधरा वीस दिवस करावें· नंतर तें पाणीं त्या कोनांचे नळीवाटे बाहेर शिशाचे पात्रांत येऊं द्यावें· नंतर त्याला पहिल्यानें त्या पात्रांत मंदाग्नीवर आटवून दुसर्यानें कांचेचे मोठ्ये रिटोर्टीमध्यें आटवावें· पहिल्यानें त्याचा रंग काळासा असतो· तसें दोन वेळ आटविल्यानें तें रंग रहित तेला सारिखें दाटसें होतें· तें चांगलें झालें असतां पाण्यांच्या तुला विशेष १००० असून त्याचा तुला विशेष १८४८ भरतो असें जाणावें· हें औषध मांस नाशक आहे· याला पुष्कळ पाण्यांशीं मिळविलें असतांही याचा आंबट पणा जात नाहीं· व हें उघडें राहिलें असतां ओलसर वायू लागून याचा आंबट पणा न्यून होतो· व पर्जन्याचे दिवसां मध्यें तसें राहिलें असतां एका महिन्यांत याचें वजन दुपट होतें· यास्तव याला कुपींत घालून तिचें तोंड चांगलें बंद करावें· व याला पाण्यांशीं मिळवत्ये वेळेस तें मेलन फार उष्ण होतें· यास्तव याला पाण्यांशीं मिळवणें तें थोडें थोडें सावकाशीनें मिळवावें· व मेलनार्थ त्या दोहोंचें जितकें पृथक् प्रमाण घ्यावें तितकें मेलन भरत नाहीं कांहीं न्यून भरतें· व हें चार भाग पाणीं एक भाग दोहोंनां एकदांच मिळवलीं असतां तें मेलन उकळत्ये पाण्यांपेक्षां अधिक उष्ण होऊन पात्र फुटतें· व याचें एकत्याचें प्रमाण देतां येत नाहीं· इतकें बळकट आहे· याज करितां धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारा मध्यें याचा पाण्यांशीं मेलन करायाचा प्रकार लिहिला आहे· त्या मेलनाला लतीन भाषेंत आसिदम सल्फ्युरिकम दिल्युटम ह्मणतात· व हें किंवा याचें पाण्यांशीं केलेलें मेलन कोणीं विषासाठीं अथवा न-

ककतां प्यालें असतां त्या विषाचे नाशास्तव सर्व पदार्थांपेक्षां खडी व मग्निदया या दोहोंमधून कोणतें एक पाण्याशीं मिळवून द्यावयास चांगलें आहे· तें आसिदमसल्फ्युरिकमदिल्युटम चांगलें रोचक व कोष्ठबंधक आहे· कोष्ठबंधकाविषयीं ते क्षयरोगादिकांमध्यें व निर्बलपण्यामुळें घाम फार निघूं लागला असतां त्याचा प्रतिबंध करावयास सर्व इतर पदार्थांपेक्षां उत्तम आहे· तसें फुफ्फुसांपासून कफाबराबर रक्त पडत असतां त्याचे प्रतिबंधार्थ चांगलें आहे· तसें प्रदरावरही चांगलें आहे· परंतु हा रोग प्रबल असतां अगत्यानें त्याचें मोटें प्रमाण द्यावयास पाहिजे· एका वैद्यानें या रोगावर दिवसांत एक औंस पर्यंत दिल्हें होतें· याजकरितां रोग कठीण असला तर तितकें ही द्यावें· त्याचें प्रमाण दाहा मिनिमां पासून चालीस मिनिम पर्यंत आहे· तें अगत्या सारिखें दिवसांत फार वेळ द्यावें· व रोचकाविषयीं तें अजीर्णादिकांवर चांगलें आहे· त्यांचे बराबर थोडे रेच होत असतां किंवा शरीरांतील कांहीं स्थलांतून रक्त पडत असतां अथवा घाम फार निघत असतां विशेषें करून चांगलें आहे· कडु रोचकाचे किंवा कोष्ठबंधकाचे फाण्टाशीं मिळवून द्यावें· व त्या बराबर रेचक द्यायाचें अगत्य असतां ईप्सम साल्त्स द्यावें· व तेणें करून मुरडादिक होऊं लागले असतां उष्ण सुगंध रोचकाशीं किंवा अफुशीं मिळवून द्यावें· व तें तोंड आलें असतां किंवा गलांकुर झाला असतां अथवा प्रतिजिव्हा सुजली असतां गुळण्यांचे औषधांत घालावयास चांगलें आहे· व त्याला पोटांत घेत्ये वेळेस दांतांस लागूं देऊं नये लागलें असतां दांत आंबतात असें जाणावें·

त्याचें औषध· ईफ्युसम रोझे कोम्पोसिटम·

तुरटी·

हिला चीन देशापासून या देशांत अणितात· हिचीं रूपादिक प्रसिद्ध आहेत· या विषयीं ही फार बळकट आहे· हिला संग्रहणीं प्रदर धुपणीं इत्यादिकांवर उष्ण सुगंध रोचकाशीं मिळवून द्यावी· त्याशीं मिळवून दिल्ही नसतां उह्मासे वमन इत्यादिक होतात· हिचें प्रमाण पांच ग्रेनां पासून पंधरा ग्रेन पर्यंत आहे· किंवा हिची निवळ द्यावी· तिचा सिद्ध करायाचा प्रकार सां० तुरटीचें चूर्ण दोन ड्राम घेऊन एक पैंट गाईचे कढलेल्ये दुधांत घालून कढवून दह्या प्रमाणें करावें· नंतर वस्त्रांत घालून निवळ निघेल ती घ्यावी· तिला इंग्रेजी भाषेंत आलमव्हे ह्मणतात· तिचें प्रमाण तीन अथवा चार औंस आहे· व प्रमेह ग्लीत यांवरही साहा किंवा दाहा ग्रेन घेऊन चार औंस नुसतें पाणी अथवा गुलाबाचें पाणी त्याशीं मिळवून चिपनळीनें शिश्न द्वारांत सोडावी· हें मेलन नेत्र रोगावर लावावयासही चांगलें आहे· व तोंड

आलें असतां किंवा गलांकुर झाला असतां अथवा प्रतिजिव्हा सुजली असतां ही दोन ड्राम घेऊन हिचें एक पैंट पाणीं व एक औंस खडी साखर या दोहोंशीं मेलन करून त्याचा गुळणा द्याव्या· त्या मेलनांत गुलाबाचें पाणीं घातलें असतां स्वाद चांगला लागतो· कोणीं साखरेचे ऐवजीं मध घालितात· व जा काळीं शरीरांतून रक्त पडत असतें त्याचा कांहीं उपचारानें प्रतिबंध होत नाहीं· त्या काळीं हिला व्हैट विन्यला बराबर अथवा मोर्चुता बराबर पाण्यांशीं मिळवून द्यावी· तेणेंकरून प्रतिबंध होतो असें जाणावें·

हिचीं औषधें· आल्यूमेन एक्सिकेटम· लैकोर आल्युमिनिस कोम्पोसिटस·

टिंक्तुरा फेर्रीम्युर्याटिस· व सल्फास फेर्री·

हीं दोन औषधें जशीं रोचका विषयीं द्यावयास सांगीतलीं आहेत· तशीं याविषयीं प्रदर व तसे रोग यांवर द्यावीं· रुधिराचें गमन त्वरित नसून रक्तवाहिन्यांचे निर्बल पण्यांमुळें रक्त बाहेर निघत असतां त्याचा प्रतिबंध करावयास फार चांगलीं आहेत· असें जाणावें·

जिन्सी सल्फास·

या विषयीं याला फार करून पोटांत देऊं नये· याचा बाह्य उपचार करावा· पोटांत देणें तें फार दिवसांचे संग्रहणींवर कधिं देतात· बाह्यउपचार करायाचा प्रकार सां॰ जाचा दाह दूर झाला आहे· असा प्रमेह व ग्लीत यांवर हें दोन अथवा तीन ग्रेन घेऊन एक औंस नुस्तें पाणीं अथवा गुलाबाचें पाणीं त्याशीं मिळवून चिप्नळीनें शिश्न द्वारांत सोडावें· तसें आलेल्या डोळ्यांची पीडा दूर झाल्यानंतर आरक्तपणा राहिला असतां डोळ्यांना लावावें· त्या तिहीं रोगांवर याचा त्या मानें करून गुण चांगले झाले नाहींत· तर त्याजपेक्षां याचें प्रमाण अधिक घेऊन मेलन करावें· व याचें तुरटी आणि पाणीं या दोहोंशीं केलेलें मेलन चांगलें कोष्ठबंधक आहे त्याला लतीन भाषेंत लैकोर आल्युमिनिस कोम्पोसिटस ह्मणतात· त्याचा उपचार करायाचा प्रकार धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिला आहे· व याचें एक औषध आहे जाला लतीन भाषेंत सोल्युश्यो आसिटेटिस जिन्सी ह्मणतात त्याचा सिद्ध करायाचा प्रकार सां॰ सल्फास जिन्सी एक ड्राम पाणीं दाहा औंस दोहोंचें मेलन करावें· सबासिटास प्लुंबी चार स्क्रुपल पाणीं दाहा औंस या दोहोंचें मेलन करून पूर्व मेलना-

शीं

शीं मिळवावें· त्याचा रंग पांढरा आहे· त्यांतील पांढरा गाळ तळास गेल्यानंतर वरलें स्वच्छ पाणीं कागदामध्यें गाळावें· तेंही प्रमेहादिकांवर पूर्व प्रमाणें योजावें· तें सल्फास जिन्सीचे पाण्यांपेक्षां नम्र आणि सबासिटास प्लुंबीचे पाण्यांपेक्षां बळकट आहे· व तेणेंकरून प्रमेहादिकांचा अकस्मात प्रतिबंध होत नाहीं असें जाणावें·

क्युप्रीसल्फास·

या विषयीं याला पोटांत देऊं नये· बाह्यउपचार करावा· याला तुरटी बराबर पाण्यांशीं मिळवून रक्तस्रावाचा प्रतिबंध करावयास कधिं लावितात· त्यांसहित आसिदम सल्फ्युरिकमाशीं मिळवून लाविलें असतां गुण अधिक होतो· व याचा कांहीं बाह्यउपचार मधीचे शोधन प्रकारावर ही लिहिला आहे· असें जाणावें·

प्लुंबी आसीटास·

याचीं रूपादिक याचे उत्पत्ति प्रकारावर लिहिलीं आहेत· हें बलवंत कोष्ठबंधक आहे· याचें अपरिमित प्रमाण भक्षिलें असतां फार उपद्रव होतात· व कांहीं एक वेळेस मृत्युही येतो· याला पक्वाशय आंतडीं गर्भाशय यांमधून रक्त फार पडत असतां त्याचे प्रतिबंधासाठीं द्यावें· तसें फुफ्फुसां पासून पडत असतां त्याचा प्रतिबंध पोटास्सेनेत्रास व आसिदमसल्फ्युरिकम येहीं करून झाला नसतां द्यावें· परंतु त्याचे पडण्यामुळें प्राणास भय नसतां कधींही देऊं नये· व येणेंकरून पोटांत शूल फार होतो· याजकरितां याला अफुशीं मिळवून द्यावें· व केवल येणेंकरून कांहीं एक वेळेस पक्षवायुही होतो· पोट फुगलें असतां विशेषेंकरून होतो· यास्तव हें दिल्यानंतर नम्र ढाळक द्यावें· परंतु ज्याचे नामामध्यें सल्फास शब्द आहे असें ढाळक देऊं नये· व तशा नामाचें अन्य औषध व आसिदमसल्फ्युरिकम यानांही कांहीं कारणास्तव हें चालु केल्यानंतर देऊं नये· याचें प्रमाण अर्ध ग्रेन आहे· याचा द्यायाचा प्रकार सांव्हें तीन ग्रेन घेऊन तितक्या अफुसहित गुलकंदाशीं मिळवून साहा गोळ्या करून त्यांमधून एक एक गोळी दिवसांत तीन वेळ द्यावी· व नाडी फार चालत असतां तिचे न्यूनते साठीं एका एका गोळींत अर्ध ग्रेन दिजिटेलिस घालावें· अथवा याला पाण्यांत विरघळवून लादनमासहित दिजिटेलिसाचे टिंक्चुराशीं मिळवून द्यावें· व याला फार दिवस पर्यंत देऊं नये· दिल्हें असतां पक्षवायु पोटांत शूल इत्यादिक होतात· व हें फार कठीण आहे· यास्तव याला इतर औषधें निष्फल होऊन मोटें अगत्य लागलें असतांच द्यावें· व हें औषध फार करून पोटांत देऊं नये·

देऊंनये· याचा बाह्य उपचार करावा· त्याचा प्रकार सां॰ अभिष्यंदावर हें दीढ किंवा दोन ग्रेन घेऊन एक औंस नुस्तें पाणीं अथवा गुलाबाचें पाणीं त्याशीं मिळवून लावावें· व प्रमेह आणि ग्लीत या दोहोंवर हें तीन ग्रेन घेऊन एक औंस नुस्तें पाणीं अथवा गुलाबाचें पाणीं त्याशीं मिळवून चिपूनळीनें शिश्नद्वारांत सोडावें· सोडत्या नंतर येणें करून कांहीं उपद्रव होत नाहींत· व चर्माचे दाह रोगावर हें दोन द्राम घेऊन याचें एक औंस सिर्काशीं मेलन करून त्याशीं पंधरा औंस पाणीं मिळवून त्यांत वस्त्र भिजवून लावावें· व दाहाची सूज फार झाली असतां तिजवर व बद आणि तसे अन्य रोग यांवर हें चार किंवा साहा द्राम घेऊन याचें चार औंस सिर्काशीं मेलन करून त्याशीं बारा औंस पाणीं मिळवून त्यांत वस्त्र भिजवून लावावें·

याचीं औषधें· **सीरेटम् प्लुंबी आसीटेटिस्· सीरेटम् प्लुंबी कोम्पोसिटम· लेकोर प्लुंबी सबासिटेटिस· लेकोर प्लुंबी सबासिटेटिस देल्युटस·**

चुन्याचें पाणीं

याची सिद्ध करावयाची कृति इत्यादिक धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिलीं आहेत· या विषयीं याचें प्रमाण दिवसांत एक पेंट अथवा दोन पेंट आहे· कोणीं याला मुतण्यांचा अधिकपणा दूर करावयासाठीं व संग्रहणीं आणि अजीर्ण यांवर कांहीं एकवेळेस देतात· व याला फार करून पोटांत देऊंनये· बाह्य उपचार करावा· त्याचा प्रकार सां॰ हें साहा औंस घेऊन याचें कालोमेलाचे एका द्रामाशीं चांगलें मेलन करावें· दोहोंचा योगानें मेलनाचा रंग काळा होतो· त्याला इंग्रेजी भाषेंत ब्लाकवाष ह्मणतात· त्यांतील चूर्ण तळास जातें त्याला वस्त्रानें घेऊन तें वस्त्र व्रणावर लावावें· तें मेलन शिश्नव्रणावर फार चांगलें आहे· अथवा हें साहा औंस घेऊन याचें हैड्रार्जेरी ओक्सिम्युर्यास साहा ग्रेन त्याशीं मेलन करावें· याचा रंग पिंवळा होतो· याला त्या भाषेंत येल्लोवाष ह्मणतात· यांत वस्त्र भिजवून व्रणावर लावावें· परंतु हें मेलन पूर्व मेलनां प्रमाणें चांगलें नाहीं· व याचा कांहीं बाह्य उपचार जवसांचे तेलाचे उत्पत्ति प्रकारावरही लिहिला आहे· असें जाणावें·

मायफळ·

याचा उत्पत्ति प्रकार सां॰ लाहान मक्षिका विशेष आंडीं घालावयाकरितां वृक्षविशेषांचे सालीला आपल्ये कांट्यानें टोंचून तेथें आंडीं घालितात· त्या आंड्यां भोंवता वृक्षांतील चीक निघून जमत जमत दोन तीन दिवसांनंतर पूर्ण जमून बाहेर फळासारिखा दिसूं लागतो·

लागती· त्याला मायफळ ह्मणतात· कांहीं कालानंतर त्यांतील आंड्यापासून माशी उत्पन्न होऊन मार्ग करून बाहेर निघत्ये· ती उत्पन्न झाल्या पूर्वीं जें मायफळ काढितात· तें औषधार्थ चांगलें आहे· जांत ती उत्पन्न होत्ये· तें वाईट जाणावें· याला गंध नाहीं· स्वाद अति कडु तुरटसा आहे· हें वर्त्तुलाकारसें आहे· याचा मोटेपणा वेगळा वेगळा आहे· यावर लाहान लाहान कांटे आहेत· व जाचा रंग काळसर तें चांगलें आहे· जाचा पांढरा किंवा लांबडा आहे· तें तितकें चांगलें नाहीं· व यांतील सार पदार्थ उकळतें पाणी व आलकोहोल यांमध्यें चांगला निघतो· याचे वृक्ष मुलतानादिक उत्तर देशांत आहेत· याला फारसिस्थान व शामदेश यांवरून बसराबंदरास आणून तेथून या देशांत आणितात· हें बलवंत कोष्ठबंधक आहे· परंतु याला फार करून पोटांत देऊं नये· बाह्यउपचार करावा· त्याचा प्रकार सां॰ गलांकुर झाला असतां व प्रतिजिह्वा सुजली असतां अन्य औषधांचे गुळण्यांपेक्षां याचे फाण्टाचा गुळण्या चांगल्या आहेत· फाण्ट करायाचा प्रकार सां॰ हें दोन द्राम घेऊन खलबत्यांत कुटून बारा औंस उकळत्ये पाण्यां सहित भांड्यांत घालून वर ढांपण ठेवून दाहा घटिकांपर्यंत तसेंच राहूं द्यावें· नंतर कागदामध्यें गाळून त्यांत दोन औंस कांहीं सुगंध टिंक्चुर घालून गुळण्या द्याव्या· तेहीं करून प्रायः त्यांचा परिहार होतो· व याचें पाचन प्रदर धुपणी यांवर योनिद्वारांत मुळव्याध व अर्श यांवर मलद्वारांत चिपूनळीनें सोडावयास व सर्वांवर शेकावयास चांगलें आहे· पाचन करायाचा प्रकार सां॰ हें दोन औंस घेऊन कुटून दोन पैंट पाण्यांसहित पात्रांत घालून एक पैंट राही तोंपर्यंत उकळवून गाळावें· व जा मुळव्याधीमध्यें रक्त पडत नाहीं त्या मुळव्याधीवर याचें फार बारीक चूर्ण एक द्राम घेऊन त्याचें सात द्राम मांसस्नेह त्यांशीं मेलन करून आवशीस आणि पाहांटेस लावावें· त्या रोगामध्यें पीडा फार असली तर तें चूर्ण एक द्राम घेऊन त्याचें अफूचें चूर्ण एक द्राम कापुर अर्ध द्राम मांसस्नेह एक औंस त्यांशीं मेलन करून पहिल्या प्रमाणें लावावें· व त्या विषयीं याचें दुसरें मलम सां॰

मायफळाचें चूर्ण·	दोन द्राम·
अफुचें चूर्ण·	एक द्राम·
प्लुंबी आसीटास·	दीढ द्राम·
मांसस्नेह·	दोन औंस·

सर्वांचें मेलन करून पूर्व प्रमाणें लावावें·

44461

क्वेर्कसकोर्टेक्स·

ही वृक्ष विशेषांची साल आहे· ते वृक्ष या देशांत नाहींत· हिला विलायत देशा पासून आणितात· हिचें चूर्ण फार करून देऊंनये· पाचन द्यावें· त्याचीं प्रमाणादिक त्याचे उत्पत्ति प्रकारावर लिहिलीं आहेत· व हिचा चांगला प्रतिनिधि मायफळ आहे· असें जाणावें·

हिचें औषध· दीकोक्टमक्वेर्कस·

हेमातोक्सिलीलिग्नम·

हें वृक्ष विशेषाचें काष्ठ आहे· याला अन्य देशा पासून विलायत देशांत आणून या देशांत आणितात· औषधार्थ फार करून याला देत नाहींत· याचा रांधा देतात· त्याचीं प्रमाणादिकं त्याचे उत्पत्ति प्रकारावर लिहिलीं आहेत·

त्याचें औषध· एक्स्त्राक्टम हेमातोक्सिली·

काथ·

हा खदिर वृक्षां पासून उत्पन्न होतो· ते वृक्ष या देशांत आहेत· त्यां पासून उत्पन्न करायाचा प्रकार सां॰ त्यानां कापून त्यांचें बाहेरलें पांढरें गोडें आंग टाकून त्यांतील नारिंव काष्ठाचे लाहान लाहान तुकडे करून मडक्यांत घाल्हून त्यांचेवर येई इतकें पाणीं घालावें· नंतर अर्धें राही तों पर्यंत उकळवून तो काढा गाळून मृत्तिकेचे दुसर्या उथळ रुंदट पात्रांत घाल्हून तिसरा भाग राही तों पर्यंत आटवून थंड ह्वावया साठीं एक दिवस ठेवावा· नंतर उह्नांत ठेवून दिवसांत फार वेळ घाटून दाटसा करावा· नंतर मोठ्या वस्त्रावर गोंवर्यांची राख घाल्हून त्याजवर थापावा· नंतर कापून भाग करून उह्नांनें फार शुष्क करावे· हा काळा व पांढरा या भेदें करून दोन प्रकारचा आहे· परंतु औषधार्थ फार करून पांढरा घ्यावा· या विषयीं हा पोटांत द्यावया साठीं वनस्पतिचे सर्व कोष्ठबंधकां पेक्षां फार चांगला आहे· व संग्रहणीं वर उत्तम आहे· याचे चूर्णाचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून वीस किंवा तीस ग्रेन पर्यंत आहे· तें पंधरा ग्रेन एकलें किंवा खडीचे एक स्कुपल मिश्रित चूर्णाशीं अथवा तिचे तितक्या अफु मिश्रित चूर्णाशीं मिळवून रेच झाल्या नंतर द्यावें· परंतु बहुत करून याचें फाण्ट किंवा टिंक्त्युर द्यावें· त्यांचीं प्रमाणादिक त्यांचे उत्पत्ति प्रकारावर लिहिलीं आहेत· टिंक्त्युराला खडीचे मिश्रणांशीं मिळवून द्यावें· व लादनमाचें अगत्य असल्यास त्यासही मिळवून द्यावें· तें मेलन अम्लिकें करून संग्रहणीं होत्ये तिजवर चांगलें आहे· व तोंड आलें असतां किंवा प्रतिजिह्वा सुज-

ली

ली असतां व हिड्यां मधून रक्त पडत असतां त्यांचे परिहारार्थ हा अर्ध औंस घेऊन याचें पाण्याशीं मेलन करून त्यांत सुस्वाद लागावयासाठीं उव्या सुगंध पाणी घालून त्याच्या गुळण्या घाव्या· व हा एक भाग कोळसा तीन भाग याचें मेलन चांगलें दांतवण आहे असें जाणावें·

याची औषधं· इंफ्युसम् काटिक्यु कोम्पोसिटस्· टिंक्सुरा काटेक्यु·

कैनो·

हें औषध या देशाचें नाहीं· याला अन्य देशांपासून विलायत देशांत आणून तेथून या देशांत आणितात· याची उत्पत्ति खचीत ठाऊक नाहीं· कोणी ह्मणतात काथा प्रमाणें रांधा आहे· व कोणी झाडाचा शुष्क चीक आहे असें ह्मणतात· याचा स्वाद काथाचे स्वादा प्रमाणें आहे· परंतु त्याज पेक्षां कांहीं गोड लागतो· रंग तांबडा भुरासा आहे हें पाण्यांमध्यें घातलें असतां अर्धें व आलकोहोलांत दोन तृतीयांश विरघळतें यास्त व फाण्टां पेक्षां याचें टिंक्चुर घावयास चांगलें आहे· याचीं प्रमाणादिक त्याचे उत्पत्ति प्रकारावर लिहिलीं आहेत· व याचे चूर्णाचें प्रमाण दहा ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत आहे· याचे गुण काथाचे गुणां सारिखे आहेत· ह्मणोन फार करून काथालाच देतात; याला देत नाहींत असें जाणावें·

याचें औषध· टिंक्चुरा कैनो· पल्विस् कैनो काम्पोसिटस्·

वमक· इंग्रेजी· इमेटिक्स·

जा औषधानां कुस्वाद असो किंवा नसो जेहीं करून सर्व मनुष्यांस सर्व काल वमन खचित होतें· त्या औषधांस वमक ह्मणतात· वमक घेतल्या नंतर अर्ध घटिके पर्यंत वमन होत नाहीं· नंतर होईल असें वाटतें· होत होत होतें· वमनां पूर्वी मनुष्याचें मुख पांढरें होतें· नाडी मंद चालत्ये· मनुष्यास शीतळसें वाटतें· वमन होत्ये वेळेस मुख आरक्त होतें· घाम येतो· नाडी फार जलद चालत्ये· दोन तीन वेळ वमन झाल्या नंतर प्रायः त्याचा प्रतिबंध होतो· नंतर वमन होईल असें वाटतें· ही अवस्था हळु हळु दूर होत्ये· मनुष्यास आळस येतो· कधिं झोप लागत्ये· नाडी कांहीं काल पर्यंत निर्बल होऊन हळु चालत्ये· नंतर औषध घेतल्या पूर्वीं जशी असत्ये तशी हळु हळु होत्ये· वमन होण्याचा प्रकार सां॰ पक्काशयाची गति उलटी होऊन त्यांतील पदार्थांचें प्रवाहण लाहान आंतड्यां कडे होत नाहीं· व देयक्रम आणि

पोटाच्या स्नायू यांचें आकुंचन होतें· पीलोरस द्वार बंद होऊन पक्वाशयांतील पदार्थ गलमार्गानें वर्ति येतात· जाकाळीं वमन फार होतें· तेव्हां द्युओदीनमाची गती उलटी होऊन त्यांतील पित्त इत्यादिक पदार्थ पीलोरस द्वारानें पक्वाशयांत येऊन तेही वर्ति येतात· कांहीं एक मनुष्यानें वमक थोडें घेतलें असतां वमन सहज आणि लवकर होतें· अन्य मनुष्यानें पुष्कळ घेतलें असतां वमन सहज लवकर होत नाहीं· व कांहीं रोगांमध्येंही असें आहे· तापामध्यें वमकें करून वमन सहज होतें· उन्मादादि रोगांमध्यें वमन सहज होत नाहीं· तसें अफु इत्यादिक विषांमधून कोणतें एक विष घेतलें असतां वमकें करून वमन सहज होत नाहीं· सोमलादि विषांमधून कोणतें एक घेतलें असतां वमन पुष्कळ होतें· वमक घेतल्यानंतर बहुत करून वमना पूर्वीं उह्लासा होतो· परंतु सर्व वमकें करून होत नाहीं· जिन्सीसल्फास घेतल्यानंतर कांहीं उह्लासा होत नाहीं· टार्टरइमेटिकादि वमकें करून फार होतो· तसा तंबाकु घेतल्यानंतरही फार होतो· परंतु कार्यवशात दोहों प्रकारचीं द्यावीं लागतात· उह्लासा झाल्यावांचून वमन व्हावयासाठीं जिन्सी सल्फास द्यावें· फार वमनें करून पित्तादिक काढावयास इछितात तर टार्टर इमेटिक द्यावें· नम्र वमकें करून पक्वाशयास कांहीं उपद्रव होत नाहींत· वमकें करून त्याची पचन करावयाची शक्ति कधिं अधिक होत्ये· यास्तव अजीर्ण व मदात्यय यांवर कधिं देतात· व फारवेळ दिल्हें असतां त्याची पचन शक्ति न्यून होत्ये· वमन झाल्यानंतर बहुत करून घर्म निघतो· यास्तव घर्म निघावयासाठीं वमक कधिं देतात· व वमनानंतर शोषक वाहिन्यांची शोषण करावयाची शक्ति अधिक होत्ये ह्मणोन वमक जलोदरावर व शरीराचे कांहीं अवयवाचे सूजेवर देतात· तेणें करून कधिं त्यांचा न्यूनपणा होतो· वमकें करून कधिं रेच बहुत होतात· व तें दिल्यानंतर कदाचित् वमन झालें नाहीं तर प्रायः रेच होतात· हें सामर्थ्य सर्व वमकांस समान नाहीं· कांहीं एकाला अन्यापेक्षां अधिक आहे· टार्टर इमेटिकें करून कदाचित् वमन झालें नसतां जसे रेच होतात· तसे ईपिकाक्युअनें करून होत नाहींत· जाकाळीं पक्वाशयांत अन्नादिक भक्षणीय पदार्थ व उदक सुरा इत्यादिक पानीय पदार्थ पुष्कळ जाऊन त्यांचें पचन न होऊन मनुष्यास अजीर्णादिक उपद्रव होतात· तेव्हां वमक द्यावें· तेणें करून वमन होऊन ते पदार्थ बाहेर निघून उपद्रव दूर होतात· तसें अम्लिकेवर व क्षुधा मंद झाली असतां द्यावें· जाकाळीं पित्त कठीण होऊन वाहिन्यांमध्यें जाऊन दाट्यासारिखें बसतें तेणें करून सर्व पित्ताचा निरोध होऊन त्याचा प्रवाह आंतड्यामध्यें होत नाहीं· त्याचें शोषक वाहिन्यांनीं शोषण होऊन तें रुधिराभिसरणाप्रत ये-

ऊन रुधिरा बराबर शरीराच्चे सर्व ठिकाणीं जाऊन चर्मादिकांचा वर्ण पिंवळा होतो· हा कांबिणीचा एक प्रकार आहे· तेव्हां वमक द्यावें· तेणें करून वमन झाल्यानंतर पित्ताशय व पित्तवाहिन्या यांपासून पित्ताचा प्रवाह यथास्थित आंतड्यामध्यें जाऊन कांबिण दूर होऊन चर्मादिकांचा वर्ण पूर्ववत् होतो· व वमक खोकला व श्वास यांवर कधिं देतात· पूर्वकालीं ज्वरावर वमक फार देत असत सांप्रत कालीं प्रायः फार देत नाहींत· कदाचित् दूणेंतर रात्रीस द्यावें· तेणें करून वमन झाल्या नंतर बहुत निद्रा लागते व घाम सुटतो· व मस्तका मध्यें रुधिराचें आधिक्य झालें असतां जरिं मनुष्य पुष्ट आहे· तरिं वमक देऊं नये· तसें स्त्रीस योन्यर्श व गर्भाशयाचें चलन झालें असतां व गर्भिणींचे प्रसूत होण्याचे दिवस जवळ आले असतां देऊं नये· तसें अंत्रवृद्धि झाली असतां चौकशी वांचून देऊं नये· व जो फार अशक्त आहे· त्याला वमक दिल्हें असतां वमनाच्या वेगें करून कदाचित् प्राणनाश होईल· या भयास्तव त्यालाही देऊं नये· व जेणें करून फार वमन होतें· तें वमक कांहीं रोगाचे परिहारासाठीं प्रतिदिवशीं देऊं नये· दिल्हें असतां पक्काशयाची पचन करावयाची शक्ति न्यून होऊन अन्न जिरत नाहीं· वमक औषधें पाण्यांशीं मिळवून द्यावीं· अशीं दिल्हीं नसतां वमन नीट होत नाहीं· व त्यानंतर सदैव उष्णोदक पान द्यावें· तेणें करून त्यांचे पूर्ण गुण होतात· वनस्पति व धातु या भेदें करून वमक औषधें दोन प्रकारचीं आहेत त्यांतें सांगतो·

वनस्पति·

ईपिकाक्यु अन्नेरेदिक्स·

धातु·

आंतिमोन्यमटार्टारीझेटम· इं॰ टार्टार इमेटिक·

जिन्सीसल्फास· इं॰ व्हैट विट्र्यल·

क्युप्रीसल्फास· प्रा॰ मोर्चुत·

आमोन्येसब्कार्बोनास·

ज्यांचें प्रमाण विशेषें करून वमन होतें अशीं औषधें अन्यत्र बहुत लिहिलीं आहेत· परंतु त्यांचा हा गुण मुख्य नाहीं· व या विषयीं फार करून देतही नाहींत· यास्तव एथें सांगीतलीं नाहींत· या प्रकारें सर्व वमकांचें साधारण वर्णन केलें व त्यांचीं नावेंही सांगीतलीं· आतां क्रमें करून एका एकाचें पृथक् विशेष वर्णन करतो·

ईपिकाक्यु अन्हेरेदिक्स·

हें मूळ आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· अमेरिका देशा पासून आणितात· हें एकलें कुटलें असतां याचें चूर्ण सहज होत नाहीं· यावर तेलाचे तीन चार बिंदू घालून कुटलें असतां अथवा एक दोन बदामा बराबर कुटलें असतां सहज होतें· या चूर्णाचा स्वाद कडु असून वाईट आहे· व याला गंध अल्प आहे तोही वाईट आहे· हें फार दिवस पर्यंत उघडें राहिलें असतां याचे गुण न्यून होतात· व याचे पात्रावर तेज पडलें असतां त्या तेजानेंही याचे गुण न्यून होतात· यास्तव याला कुपींत घालून कुपीचें तोंड चांगलें बंद करून तिचा भोंवतालें कागद लावून ठेवावें· हें वमना विषयीं चांगलें आहे· येणें करून पक्वाशयांतील पदार्थ युक्तिनें वर्ति येतात· वमन झाल्या नंतर मनुष्य फार निर्बल होत नाहीं· व येणें करून वाईट परिणाम कधिंही होत नाहींत· अन्न पाना दिकें करून पक्वाशय बहुत फुगला असतां हें पंधरा ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत एक औंस किंवा दोन औंस पाण्यांशीं मिळवून द्यावें· अर्ध घटिका नंतर उल्हासा होतो वमन होईल असें वाटतें या अवस्थे मध्यें उष्ण पाण्याचे घोट पुष्कळ द्यावे· तेणें करून वमन बहुत होऊन पक्वाशय स्वच्छ होतो· हें घेतल्या नंतर त्वरेनें पाण्याचे घोट दिल्हे तर चांगलें वमन न होऊन पक्वाशयांतील सर्व पदार्थ निघत नाहींत· जाकालीं अंतरितज्वराचे परिहारा साठीं किंवा तो न्यून व्हावयासाठीं वमक द्यावयास इच्छितात· तेव्हां हें पंधरा ग्रेन टार्टर इमेटिक एक ग्रेन दोहोंचें मेलन करून त्याचे प्रारंभाचे पूर्वी द्यावें· तेणें करून उल्हासा आणि वमन फार होऊन घाम पुष्कळ निघून तो येत नाहीं· किंवा न्यून येतो· व हें मेलन कांहीं एक अन्य रोगांचे प्रारंभ कालीं द्यावयास चांगलें आहे· तसें गलांकुर वलय आलेले नेत्र यांवरही चांगलें आहे· व मस्तकांत रुधिराचें आधिक्य झालें असतां अंत्र वृध्धी झालें असतां व स्त्रीचे प्रसूत व्हावयाचे दिवस जवळ आले असतां हें वमक देऊं नये· दिल्हें असतां उपद्रव होतो· व संग्रहणी अतीसार इत्यादिक रोगांवर नुस्ता उल्हासा व्हावया साठीं हें एक ग्रेना पासून चार ग्रेन पर्यंत द्यावें· तसें गर्भाशयां मधून व फुफ्फुसां मधून रुधिर निघत असतां व नाडी जलद चालत असतां द्यावें· तेणें करून उल्हासा होऊन शरीरांत रक्ताच्या प्रवाह मंद होऊन रुधिर निघण्याचा न्यून पणा होतो किंवा बंद होतें· व नाडी मंद चालते· व घाम निघावया विषयीं आणि पडसें इत्यादिकांवर कफ निघावया साठीं पाव ग्रेना पासून एक ग्रेन पर्यंत द्यावें· व हें तीन चार ग्रेन रेचकाशीं मिळवून दिल्हें असतां घाम निघतो व रेचही होतात· व हें वमक बालांना वमन व्हावया विषयीं फार उत्तम आहे·

याचीं औषधें· वैनमईपिकाक्यु अन्ने· पल्विसईपिकाक्यु अन्ने कोम्पोसिटस·

आन्तिमोन्यम् टार्टोरीझेटम· दुसरें नाम· टार्टर इमेटिक·

हें वमक रोगांवर वमनां विषयीं द्यावयास चांगलें आहे· याविषयीं हें एक ग्रेना पासून दोन ग्रेन पर्यंत देतात· परंतु बहुत करून एका काळीं इतकें देऊं नये· देण्याचा प्रकार सां०

टार्टर इमेटिक·	तीन ग्रेन·
पाणीं	चार औंस·

टार्टर इमेटिक पाण्यांमध्यें विरघळवून त्यामधून एक एक औंस वमन होई तोंपर्यंत अर्ध घटिकेचे अंतरानें द्यावें· येणेंकरून वमन फार होऊन पक्काशयांतील सर्व पदार्थ निघतात· व कांहीं एक वेळेस आंतड्यांतील पित्तादिक पदार्थही निघतात· व कांहीं एक वेळेस रेचही होतात· ज्याकालीं कांहीं रोगांमध्यें अन्य वमकें करून वमन सहज होत नाहीं· तेव्हां हें वमक द्यावें· परंतु पक्काशयास शक्ति बहुत नसतां व मनुष्य फार निर्बल असतां देऊं नये· नुस्ता उह्मासा व्हावयासाठीं हें ग्रेनाचा अष्टमांश अथवा चतुर्थांश साहा साहा घटिकांचे अंतरानें पाण्यांत विरघळवून द्यावें· असा उपचार फार रोगांवर करतात· मोठ्या अगत्या वांचून हें बालांना देऊं नये· दिल्हें असतां येणेंकरून फार उह्मासा होऊन क्षुधा नलागून निर्बलपणा प्राप्त होतो·

याचें औषध· वैनम आन्तिमोन्यी टार्टोरिझेटी·

जिन्सीसल्फास·

हें वमक फार बलवंत आहे· येणेंकरून कांहीं उह्मासा नहोतां वमन लवकर होतें· याचे गुण प्रायः खचीत होतात· यास्तव कोणीं मनुष्यानें वनस्पतीचें विष भक्षिलें असतां तें वमनें करून बाहेर निघावया साठीं हें द्यावें· तसें या सारिख्या अन्य कारणां मुळें वमन व्हावयाचें अगत्य लागलें असतां द्यावें· परंतु असल्या कारणां वांचून कधीं देऊं नये· याचें प्रमाण पांच ग्रेना पासून तीस ग्रेन पर्यंत आहे· तें तीन चार औंस पाण्याशीं मिळवून द्यावें·

क्युमी·

क्युप्रीसल्फास· प्रा·मोर्चुल·

हें वमक अति कठीण आहे· यास्तव जा समयीं मनुष्य विष भक्षितो तें विष जिन्सीसल्फासें करून बाहेर निघत नाहीं· आणि मनुष्याचे प्राणांचें भय आहे· त्या समयींच हें दाहा ग्रेन अथवा पंधरा ग्रेन दोन औंस पाण्यांशीं मिळवून द्यावें· येणें करून खचीत वमन होऊन तें बाहेर निघतें· परंतु प्राणास भय नस्तां कधिंही देऊं नये· येणें करून फार उल्लासा होत नाहीं· हें दिल्यानंतर कदाचित् वमन न झालें तर अर्ध घटिका नंतर पुनः द्यावें·

आम्मोन्येसब् कार्बोनास·

जा कालीं कोणी मनुष्य वनस्पतीचें विष भक्षितो तें विष जिन्सीसल्फास व क्युप्रीसल्फास या दोहों करून ही बाहेर निघत नाहीं· त्या कालीं हें वमक तुर्त्तें एक स्कुपल अथवा अर्ध ड्राम एक दोन औंस पाण्यांशीं मिळवून द्यावें· अथवा याचें अन्यांशीं मेलन करून द्यावें· मेलन प्रकार सां·

आम्मोन्येसब् कार्बोनास·	एक स्कुपल·
ईपिकाक्यु अन्ने पल्विस·	अर्ध ड्राम·
पुदिन्याचें पाणी·	तीन औंस·
लाल मिरचीचें टिंक्चुर·	दोन ड्राम·

सर्वांचें मेलन करावें· येणें करून प्रायः वमन होतें· :

ढाळक· दुसरें नाम रेचक· इं· काथार्टिक्स·

जा औषधें करून मळ लवकर निघून पुष्कळ निघतो· अथवा जेहीं करून ढाळ होतात· त्या औषधांस ढाळक किंवा रेचक ह्मणतात· यांना वेगळे वेगळे गुण आहेत· येहीं करून आंतडयाची गति लवकर होऊन त्यांतील पदार्थांचें प्रवाहण त्वरेनें होऊन मल विसर्जन लवकर होतें· यांमध्यें जीं खारट रेचकें आहेत· तेहीं करून आंतडयाचे रसवाहिन्यांचे मुखांतून रस अधिक निघून मळ फार आणि पातळ निघतो· एल्याबोळ व रेवाचिनी येहीं करून केवल आंतड्याची गती अधिक होऊन मलाचें विसर्जन मात्र लवकर होतें· तो नित्यापेक्षां थोडा अधिक निघतो· व पोटांतल्या जा पदार्थांशीं ढाळकांचा संबंध होतो त्यांवरच यांचे गुण होतात असें नाहीं त्यांचे जवळचे पदार्थांवर ही होतात·

तात· तेणें करून पित्त व पेंक्रियसाच्या रस इत्यादिक अधिक उत्पन्न होऊन आंतड्यामध्यें अधिक येतात· हे वेगळ्ये वेगळ्ये ढाळकें करून वेगळे वेगळे येतात· कांहीं एकें करून पित्त अधिक येतें· कांहीं करून आंव अधिक येत्ये· व कांहीं करून पाण्यां सारिखा रस अधिक येतो· व कांहीं एक रेचकाचे गुण गर्भाशयावर ही होतात· व खारट ढाळक घेतां त्यानंतर त्याचे गुण पक्काशयावर व दोहीं आंतड्यांवर होऊन कधिं एक घटिकेनेंच रेच होतो· व एळ्या बोळाचे गुण मोठ्या आंतड्यावर मात्र होतात· यामुळें त्वरेनें रेच होत नाहीं· व कांहीं रेचकें करून उल्हासा मुरडा व कधिं मलावरोध होतो· व कांहीं करून फार रेच झाले असतांही उल्हासा व मुरडा होत नाहीं· व कांहीं करून सगळा दिवस रेच होतात· व कांहीं करून दिवसांत एक दोन रेच होतात· नम्र व कठिण या भेदें करून ढाळकें दोन प्रकारचीं आहेत· नम्र ढाळकानां इंग्रेजी भाषेंत लाक्सटिव ह्मणतात· येहीं करून आंतड्यांतील नुस्त्या मलाचेंच विसर्जन होतें· व कठीणास त्या भाषेंत पर्गेटिव ह्मणतात· येहीं करून रुधिरा पासून रस अधिक उत्पन्न होऊन तोही निघतो· येणें करून यांचे गुण सर्व शरीरावर होतात असें जाणावें· रेचकें बहुत रोगांवर कामाचीं आहेत· जा कालीं मल विसर्जन नीट होत नाहीं· व पोटांतले पदार्थ फार तीक्ष्ण होतात· व कांहीं वाईट पदार्थ भक्षितात· त्या कालीं रेचक द्यावयास चांगलें आहे· व जेव्हां कांहीं रोगामध्यें सर्व शरीराचा निर्बल पणा व्हावयाचे उपचाराचें अगत्य लागतें· तेव्हां रेचक द्यावें· येणें करून तो होतो· व फार रोगांमध्यें आंतड्याची प्रवाहणा करावयाची गती न्यून होऊन पोटांत मलाचा संग्रह होतो· तो एक दोन वेळ ढाळक दिल्यानें दूर होत नाहीं· तें प्रति दिवशीं दिल्हें पाहिजे· जों पर्यंत किं मलाच्या अति कुगंध पणा दूर होई व त्याचे रंगादिक सुप्रकृति सारिखे होतील· सांप्रत अशा उपचारें करून बहुत रोग दूर होतात· पूर्व कालीं पोटांतील मलाच्या संग्रह रोगांचा कारण हें ठाऊक नव्हतें· या मुळें रोगांस गुण चांगले होत नव्हते· व ज्वरामध्यें आंतड्याची गती न्यून होऊन त्यांतील पदार्थांचें प्रवाहणा अल्प होतें· मलाचें विसर्जन नीट होत नाहीं· तो तीव्र होऊन पोटांत फार उपद्रव करतो तो बाहेर निघावयासाठीं रेचक फार कामाचें आहे· या रोगाचे प्रारंभा पासून शेवट पर्यंत पोटांत मलाच्या संग्रह होऊं देऊं नये· तें स्वच्छ राखावें· तेणें करून कांहीं निर्बल पणा होत नाहीं· व अजीर्ण नष्ट आर्त्तव वायुगोळा अपस्मार दमा इत्यादिक रोगांमध्यें आंतड्याचें गमन फार मंद होऊन मलाचें विसर्जन होत नाहीं· तेणें करून सर्व शरीरास फार व्यथा होत्ये· ती व्यथा दूर व्हावया विषयीं रेचक फार उत्तम आहे· या मधून कांहीं एक रोगांचा परिहार नुस्त्या रेचकें करूनच होतो· व उष्ण

कालीं पोटांतील पदार्थ वाईट होऊन धनुर्वायु कधिं होतो· त्याचे परिहारार्थ रेचक कामाचें· आहे· व जेणें करून क्षुधा लागत नाहीं· दिवसान दिवस शुष्क होऊन सर्व बलाचा क्षय होतो· असा एक रोग तरुण मनुष्यांस होतो· तो प्रायः पोटांतील पदार्थ वाईट झालें असतां होतो· त्यावर रेचक चांगलें आहे· व गंडमाला देवी इत्यादिक बहुत रोगांवर रेचकें कामाचीं आहेत· अतीसारावर त्यांमध्यें जें नम्र असेल तेंच द्यावें· व रेचकें करून आंतड्याचे रस वाहिन्यांची शक्ति अधिक होऊन रुधिरापासून रस अधिक उत्पन्न होऊन बाहेर निघतो· तेणें करून शरीरांतील रुधिर न्यून होऊन त्याचें बल कांहीं न्यून होतें· यास्तव रेचकें दाह रोगावर द्यावयास चांगलीं आहेत· व येहीं करून रसोत्पत्ति अधिक होत्ये या मुळें शोषक वाहिन्यांची शोषण शक्ति अधिक होत्ये· रसोत्पत्ति क्रियेचें आधिक्य झालें असतां बहुत करून शोषण क्रियेचेंही आधिक्य होतें· यास्तव रेचक दिल्यानंतर आंतड्यांत रसोत्पत्ति अधिक होऊन त्याचें शोषण अधिक होतें· या प्रकारें रेचकें करून जलोदरादिक रोगांचा परिहार होतो· रसोत्पत्ति अधिक होण्याविषयीं सर्व रेचकांमध्यें खारट रेचकें उत्तम आहेत· या रेचकें करून रस अधिक उत्पन्न होऊन बाहेर निघतो आणि मलाचा संग्रह होऊन जी व्यथा होत्ये त्या व्यथेचा परिहार होतो· यास्तव हीं अंग विकृति बहुत प्रकारचा कपाळ शूळ अघोर निद्रा उन्माद रोग व त्या प्रमाणें अन्य रोग यांचे परिहाराविषयीं द्यावयास चांगलीं आहेत· व कांहीं रोगांमध्यें दाहाचें लक्षण झालें असतां अथवा निर्बलपणा झाला असतां रेचक देणें तें चौकशीनें द्यावें· जें बळवंत असेल तें विशेष चौकशीनें द्यावें· तसें गर्भिणी स्त्रीस जी प्रसूत होत्ये तीस पंधरा दिवस पर्यंत व रजस्वलेस जाला शुळव्याध आहे त्यास फार चौकशीनें द्यावें· व रेचक फार आणि अगत्यावांचून दिल्हें असतां प्रकृति भेदें करून पोट असें हळु होतें कीं कांहीं एक मनुष्यास अल्प कारणें करून ढाळ होतात· व अन्य मनुष्याचें पोट फुगतें· व खारट रेचकें करून मनुष्य त्वरेनें निर्बल होतो याचें कारण तेंहीं करून शरीरांतील रस न्यून होतो· व जा रेचकें करून उह्लासा होतो· आणि वमन होतें त्या रेचकांचें पूर्ण प्रमाण एका वेळेस देऊं नये· लाहान प्रमाण कांहीं अवधानें द्यावें· पूर्ण प्रमाण देणें तर कांहीं उष्ण सुगंध औषधाशीं मिळवून द्यावें· तेणें करून मुरड्याचें ही निवारण होतें· व इंद्राईन सकमुन्या रेवाचिनीचा शिरा इत्यादिक रेचकें एकलीं दिल्हीं असतां रेच कधिं होतात कधिं होत नाहींत· त्यांचें अन्य रेचकाशीं अथवा परस्पराशीं मेळन करून दिल्हें असतां रेच खचित होतात· व पार्याचे औषधाचे मेळनें करून ढाळकांचें सामर्थ्य सर्व काल अधिक होतें· तसें पार्याचे मेळनाचे मर्दनें करूनही होतें· पोट फुगलें असतां

ढाळक व पार्याचें औषध यांचें मेलन फार उत्तम आहे· व एका ढाळकाचें अन्य ढाळकाशीं मेलन केलें असतां दोघांचे गुण होतात· ढाळक पातळ पदार्थाशीं मिळवून दिल्हें असतां त्याचे गुण त्वरेनें होतात· जर सावकाशीनें व्हावयास इच्छितात तर याच्या गोळ्या करून रात्रीस द्याव्या· निद्रा लागल्यानंतर गुण सावकाशीनें होतात· बहुत करून रेचक मोठ्या पाहांटेस द्यावें हें चांगलें आहे· तेणें करून मनुष्यास फार उपद्रव होत नाहीं·

नम्र रेचकांचीं नावें·

मान्ना· मु॰ तुरंजबीन·
कासियेपल्या· प्रा॰ बाहव्याचे शेंगातला गीर·
तामारिंडी पल्या· प्रा॰ चिंचेचा गीर·
रिसीनी ओल्यम· प्रा॰ एरंडेल·
सल्फर· प्रा॰ गंधक·
मग्निस्या·
मग्निस्ये सब्कार्बोनास·

कठीण रेचकांचीं नावें·

सेन्ने फोल्या· प्रा॰ सोनामुखीचीं पर्णें·
रेईरे दिक्स· प्रा॰ रेवाचिनी·
जालेपेरे दिक्स·
कोलोसिंथिदिस् पल्या· प्रा॰ इंद्राइनाचा गीर·
एलाटेरीई पेपनेस· मु॰ तर्फेदाचें फल·
आलोएस स्पिकेटे एक्स्त्राक्टम· प्रा॰ एळ्याबोळ·
स्काम्मोन्ये गम्मीरेझिना· मु॰ सक्मुन्या·
कांबोज्या· मु॰ ओसाररेवंड· प्रा॰ रेवाचिनीचा शिरा·
हैड्रार्जरी सब्म्युर्यास· इं॰ कालोमेल·
मग्निस्ये सल्फास· इं॰ ईप्सम साल्ट्स·
सोदे सल्फास· इं॰ ग्लोबर्स साल्ट्स·
पोटास्से सल्फास·
पोटास्से सुपर्टार्त्रास· इं॰ क्रीम रटार्टर·
पोटास्से टार्त्रास·

सोदाटार्टारिझेटा·इं॰ रोशेल्ड सालत्स·

जीं रेचकें चिपनळीनें मलद्वारांत सोडितात त्यांचीं नावें·

टेरेबिंथिने ओल्यम·

म्युर्यास सोदे·प्रा॰ मीठ·

टाबसी फोल्या·प्रा॰ तंबाकूचीं पानें·

या प्रकारें सर्व रेचकांचें साधारण वर्णन केलें· आतां एका एकाचें पृथक् विशेष वर्णन करतो·

मान्ना·मु॰ तुरंजबीन·

हा वृक्ष विशेषाचा शुष्क चीक आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· बसरा देशापासून आणितात· हा उष्णकाळीं वृक्षाचे कांड्यामधून आणि शाखांमधून आपल्ये आपण निघतो· अथवा त्या स्थळीं छिद्रें केलीं असतां त्यांमधून पातळ निघून जमतो· याचा रंग पांढरा अथवा श्वेत पीत मिश्रित असा आहे· याचें वजन हलकें स्वाद गोड व याला अल्प गंध आहे· हा फार नम्र ढाळक आहे· मनुष्याला एक औंस अथवा दोन औंस दिल्यानंतर रेच कधिं होतो· परंतु खचीत नाहीं· व प्रायः कांहीं मुरडा होतो· यास्तव एकत्यालाच देत नाहींत· सोनामुखीचे फाण्टाचा व अन्य कांहीं एक रेचकाचा कुस्वाद लुप्त व्हावयासाठीं त्यांशीं मिळवून देतात· निर्बल मनुष्यांनां व बालानां एकत्याला कधिं देतात· त्या विषयीं याचें प्रमाण एक ड्रामापासून एक औंस पर्यंत आहे·

हा जांत आहे तीं औषधें· कोन्फेक्शयो काश्ये· सीरुपससेन्ने·

काश्येपल्पा·प्रा॰ बाहव्याचे शेंगांतला गीर·

याची उत्पत्ति या देशांत आहे· हा बहुत करून एकला देऊं नये· अन्य रेचकाशीं मिळवून द्यावा· एकला दिल्हा असतां वमन मुरडा इत्यादिक होतात· याचें प्रमाण तीन ड्रामापासून दाहा ड्राम पर्यंत आहे·

हा ज्या औषधांत आहे तीं औषधें· कोन्फक्शयो काश्ये· कोन्फक्शयो सेन्ने·

तामारिंडी पल्पा·प्रा॰ चिंचेचा गीर·

याची उत्पत्ति या देशांत आहे· याचा स्वाद फार आंबट आहे· हा दीढ औंस किं-

वा दोन औंस भक्षिल्यानंतर कांहीं रेच होतात· फार होत नाहींत· यास्तव प्रायः एकट्याच देऊं नये· सोनामुखी इत्यादिक औषधांचे फाण्टांशीं मिळवून द्यावा· याचे योगानें त्यांचा कुस्वाद कांहीं लुप्त होतो· व रेचही अधिक होतात· हा फार पाण्यांशीं मिळवला असतां तें पाणीं ज्वरादि रोगांमध्यें प्राशना विषयीं उत्तम आहे· व जांचें फार भक्षण केलें असतां कांहीं रेच होतात· अशीं अन्य फळें अंजीर अलिबुखार इत्यादिक आहेत·

हा जांत आहे तीं औषधें· कोन्फेक्श्यो सेन्ने· कोन्फेक्श्यो काश्ये·

रिसीनी ओल्यम· प्रा॰ एरंडेल·

याची उत्पत्ति रूप इत्यादिक सर्वांस ठाऊक आहेत· ह्मणोन सांगीतलीं नाहींत· हें फार उत्कृष्ट ढाळक आहे· एक औंस किंवा दोन औंस घेतल्यानंतर पोटांतील सर्व मळ त्वरेनें निघतो· येणेंकरून पोटांत शूळ मुरडा इत्यादिक किमपी होत नाहींत· जासमयीं कांहीं रोगाचे परिहारार्थ जेणेंकरून शूळ मुरडादिक होत नाहींत· अशा रेचकाचें अगत्य लागतें तेव्हां हें द्यावें· जी स्त्री गर्भिणी आहे· व जिचे प्रसूत होण्यांचे दिवस जवळ आहेत· तिला हें रेचक द्यावयास उत्तम आहे· तसें एक मासादिक बाळांसही चांगलें आहे· तसें मुळव्याध पोटांतील शूळ अतिसार व पोटांतील दाहरोग यांवर चांगलें आहे· येणेंकरून उह्लासा आणि वमन कधिं होतें· यास्तव जाला ही अवस्था होत आहे त्याला हें देऊं नये· व जाला वमनें करून उपद्रव होतो· त्यालाही देऊं नये· हें बहुत करून सुगंध पाण्यांत द्यावें· व दाहाचें किमपि लक्षण नसतां याचे बराबर कांहीं सुगंध टिंक्चुरही द्यावें· तेणेंकरून उह्लासा याचें निवारण होतें·

सल्फर· प्रा· गंधक·

हा अन्य देशापासून या देशांत आणितात· याचे रंगादिक सर्वांस ठाऊक आहेत· ह्मणोन सांगीतले नाहींत· याचें फुल काढावयाची कृति सां॰ याला मोठ्ये यंत्रात घालून त्याची वाफ नलिका मार्गानें अन्य मोठ्या पात्रांत जाऊं द्यावी· तेणेंकरून जो गंधक तेथें जमतो त्याला गंधकाचें फुल ह्मणतात· या फुलांचा रंग पिंवळा आहे· यांत आंबट पदार्थांचा अंश असला तर हें पाण्यांत धुवावें· तेणेंकरून तो दूर होतो· हें एक ड्रामापासून तीन ड्राम पर्यंत पाकाशीं अथवा गोड पदार्थांशीं किंवा दुधाशीं मिळवून द्यावें· हें मुळव्याधीवर चांगलें आहे· या रोगावर क्रीमर टार्टराशीं अथवा मग्निशयाशीं मिळ-

वून द्यावें·व अन्य रोगावरही चांगलें आहे·खर्जेवर फार उत्कृष्ट आहे·हिचे परिहारार्थ हें पोटांत देऊन बाहेर याचें मर्दन करावें· तसें चर्माचे अन्य रोगावरही पोटांत देऊन मर्दन करावें·

गंधकाचीं औषधें· सल्फरलोटम·सल्फरप्रीसीपिटेटम· अंग्वेंतमसल्फरिस·अंग्वेंतमसल्फरिसकोम्पोसिटम·

मग्निश्या· व मग्निश्येसब्कार्बोनास·

हीं दोन औषधें एक ड्राम अथवा दोन ड्राम द्यावीं· यानां कांहीं कुस्वाद नाहीं· यास्तव लाहान बालांस द्यावयास उत्तम आहेत·या दोहोंचें सविस्तर वर्णन धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें केलें आहे·

सेन्ने फोल्या· प्रा० सोनामुरवी·

या रेचकाची उत्पत्ति या देशांत आहे·हें एकलें दिल्हें असतां ढाळ युक्तिनें होत नाहींत·व प्रायः पोटांत वायु मुरडा इत्यादिक होतात·यास्तव बहुत करून एकलें देऊं नये· अन्य रेचकाशीं मिळवून द्यावें·तेणें करून रेच खचीत होऊन त्वरेनें होतात·या विषयीं याचें फाण्ट चांगलें आहे·हें फाण्ट सिद्ध करित्ये वेळेस यामध्यें धणें सुंठ वेलदोडे इत्यादिकांमधून कोणता एक पदार्थ उष्ण व्हावया साठीं घालावा·या प्रमाणें सिद्ध करून दिल्या नंतर उष्णा पेज इत्यादिकांचें पान फार द्यावें·तेणें करून याचे गुण अधिक होऊन लवकर होतात· हें कांहीं अवधी पर्यंत राहिलें असतां वाईट होतें·व असें दिल्हें असतां मुरडा फार होतो·यास्तव सदेव कार्य समयींच सिद्ध करून द्यावें· यामध्यें चिंच व तुरंजबीन यांमधून एक पदार्थ घातला असतां याचा कुस्वाद कांहीं न्यून होतो·हें या पदार्थाशीं मिळवून अथवा नुस्तें दिल्यानंतर रेच फार न झाले तर यांत कांहीं खारट ढाळक विरघळवून हें द्यावें·सोनामुरवीचें फाण्ट व पाचन हीं दोन्हीं चिपनळीनें मलद्वारांत सोडावयास चांगलीं आहेत· या विषयीं हीं फार बलवंत व्हावयास इच्छितात तर या दोहोंमधून कोणतें एक सोडावयाचें असेल तें आठ किंवा बारा औंस घेऊन त्यामध्यें इप्समसालत्स ग्लोबर्स सालत्स मीठ यांमधून कोणता एक पदार्थ एक औंस किंवा दीढ औंस घालून मिळवावा·अथवा एरंडेल दीढ अथवा दोन औंस मिळवावें·

सोनामुरवीचीं औषधें· कोन्फेक्टयोसेन्ने·ईंफ्युसमसेन्नेकोम्पोसिटम·

म·पल्विस्‌ सेन्ने कोम्पोसिटस·टिंक्त्युरा सेन्ने·सीरुपस सेन्ने·

रेईरेदिक्स·मा·रेवाचिनी·

ही एका लाहान वृक्षाचें मूळ आहे·हिला खुतन देश व चीन देश यां पासून आणि तात·देश भेदें करून हिचे रूपाचा भेद आहे·त्यातें सां॰ खुतन देशांत जी उत्पन्न होत्ये ती यत्किंचित् वर्त्तुलाकार असून कांहीं स्थलीं जाड व कांहीं स्थलीं बारीक होत्ये·बहुत करून तिचे मध्यें छिद्र आहे·तिचा बाहेरला रंग कांहीं तांबडा कांहीं पिंवळा आहे·व तिचे आंत फार तांबड्या रेघा आहेत·त्या तिला मोडिली असतां दिसुं येतात·चीन देशांत जी उत्पन्न होत्ये ती फार करून वर्त्तुलाकार नाहीं·कांहीं लांब व रुंद आहे·तिचे मध्यें छिद्र नाहीं·तिचा जडपणा अधिक आहे·व तिचा बाहेरला रंग कांहीं पिंवळा कांहीं भुरा आहे·आंतला पिंवळा पांढरा तांबडा असा आहे·तिचे आंत रेघा नाहींत·या प्रकारें भेद जाणावा·हिचा रंग फार वाईट नाहीं·स्वाद कडु आहे·हिचे चूर्णाचा रंग पिंवळासा आहे·ही फार उत्तम ढाळक आहे·व हिला रेचक आणि कोष्ठबंधक हेही गुण आहेत·हिचें प्रमाण पंधरा ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत आहे·ही दिल्यानंतर प्रथम रेच होतात·मग कांहीं कोष्ठबंधक गुण होतो·यास्तव जा कालीं मलाचा संग्रहें करून ढाळ पातळ होऊन फार होतात·मल पडतो त्याचा रंग नित्य मला सारिखा असतो कांहीं अपूर्व होत नाहीं·व पोटांत शूल नाहीं·तेव्हां ही द्यावयास उत्तम आहे·हिला सुगंध पाण्यांशीं अथवा दालचिनीचे चूर्णा बराबर नुस्त्या पाण्यांशीं मिळवून द्यावी·हिचें अन्य ढाळकाशीं मेलन करून दिल्हें असतां ढाळ अधिक लवकर होतात·पित्त विकृति झाली असतां ही एक स्कुपल कालोमेल पांच ग्रेन त्याशीं मिळवून द्यावी·व अम्लिके मध्यें पोट फुगलें तर ही एक स्कुपल मग्निश्या एक स्कुपल किंवा अर्धद्राम मुरड्याचे निवारणार्थ सुंठ पांच ग्रेन अथवा दाहा ग्रेन सर्वांचें मेलन करून द्यावें·व हिला खारट ढाळकाशीं मिळवून देतात·परंतु याविषयीं त्यां मधून सल्फास पोटास्से चांगलें बालांस विशेष चांगलें आहे त्यानां ही पांच ग्रेन अथवा दाहा ग्रेन सल्फास पोटास्से दाहा किंवा पंधरा ग्रेन त्याशीं मिळवून द्यावी·व ही तीन ग्रेनां पासून आठ ग्रेन पर्यंत रोचक व कोष्ठबंधक आहे·जेव्हां मल शुद्धि नित्य होत नाहीं व क्षुधा लागत नाहीं तेव्हां द्यावी·या प्रमाणें अजीर्णादिकांवरही द्यावी·हिचे मध्यें चिकटपणा पुष्कळ आहे·यास्तव गोळ्या करावयासाठीं गोंदाचे पाण्याचें अगत्य लागत नाहीं·नुस्त्या पाण्यानें होतात·त्या सिद्ध करून फार दिवस ठेऊं नयेत·ठेविल्या

असतां कठीण होऊन निष्फल होतात· व ही घेतल्यानंतर मूत्राच्या रंग हिचा रंगा सारिखा कांहीं होतो·

हिचीं औषधें· ईंफ्युसमरेई· टिंक्चुरारेई· टिंक्चुरारेई कोम्पोसिटा· एक्स्त्राक्टम्‌रेई·

जालेपेरेदिक्स·

हें वेल विशेषाचें मूळ आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· अन्य दूर देशा पासून आणितात· याचे चूर्णाच्या रंग कांहीं भुरा कांहीं पिंवळा आहे· गंध वाईट स्वाद उग्र असून अल्प गोड आहे· हें बलवंत ढाळक आहे· येणें करून ढाळ पातळ होऊन फार होतात· घेतल्या नंतर प्रायः मुरडा पुष्कळ होतो· इतर उपद्रव होत नाहींत· याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून अर्धड्राम पर्यंत आहे· हें बहुत करून अन्य ढाळकाशीं मिळवून द्यावें· व हें एक विभाग क्रीमर टार्टर दोन विभाग यांचें मेलन करून एक ड्राम किंवा दीढ ड्राम दिल्हें असतां ढाळ पाण्या सारिखे पातळ होऊन फार होतात· आणि मुतण्यांच्याही अधिकपणा होतो· यास्तव जलोदरादिकांवर द्यावयास फार उत्तम आहे· या मेलनाला लतीन भाषेंत पल्विस् जालेपेकोम्पोसिटस ह्मणतात· व पोट फार फुगतें त्यावर व पोटांतल्या कृमींवर हें कालोमेलाशीं मिळवून द्यावें· दोहों करून गुण त्वरेनें होतो· व हें साधारण कार्या विषयीं सक्मुन्या सोनामुखी इत्यादिक रेचकांशीं मिळवून द्यावें· कदाचित् एकलें देणें तर याचें चूर्ण नुस्त्या पाण्यांशीं किंवा सुगंध पाण्यांशीं मिळवून द्यावें· कालोमेलादिक जड रेचकांशीं मिळवून देणें तें कांहीं दाट पदार्था मध्यें द्यावें· अथवा गोळ्या करून द्याव्या·

याचीं औषधें· एक्स्त्राक्टम जालेपे· टिंक्चुरा जालेपे·

कोलोसिंथिदिस् पल्पा· प्रा॰ इंद्राइनाचा गीर·

हा गीर एकला देत नाहींत· व बहुत करून याचा अमिश्रित रांधाही एकटा देत नाहींत· याचा मिश्रित रांधा फार उत्तम रेचक आहे· तो कालोमेलादिक रेचकांशीं मिळवून देतात· मेलन प्रकार सां॰

इंद्राइनाच्या मिश्रित रांधा·	सात ग्रेन·
कालोमेल·	तीन ग्रेन·
लवगांचें तेल·	दोन बिंदू·

खलवल्यांत·

खलबत्यांत सर्वांचें मेलन करून दोन गोळ्या कराव्या·

याचीं औषधें· एक्स्ट्राक्टम कोलोसिंथिदिस्· एक्स्ट्राक्टम कोलोसिंथिदिस् कोम्पोसिटम·

एलाटेरी इपेपनेस·

रेचांस्तव या औषधाचा रांधा देतात· देण्यांचा प्रकार व कार्य इत्यादिक त्याचे उत्पत्ति प्रकारावर लिहिलीं आहेत·

याचें औषध· एक्स्ट्राक्टम एलाटेरीई·

आलोएस् स्पिकेटे एक्स्ट्राक्टम· प्रा० एल्याबोळ·

याची उत्पत्ति कोरफडाचे गिरा पासून आहे· हा गांधीचे दुकानीं दोन तीन प्रकारचा असतो· परंतु जो सकोत्र द्वीपा पासून आणितात तो सर्वां मध्यें चांगला आहे· याचा स्वाद उग्र असून फार कडु व गंध वाईट आहे· हा फार उष्ण रेचक आहे· याचे गुण मोठ्या आंतड्यावर मात्र होतात· यास्तव अन्य रेचका प्रमाणें त्वरेनें रेच होत नाहीं· येणें करून रेच किमपि पातळ होत नाहींत· व याचे मध्यम प्रमाणां पेक्षां मोठ्या प्रमाणें करून अधिक ही होत नाहींत· व हा घेतल्या नंतर प्रायः उल्हासा होत नाहीं· व मोठ्ये आंतड्यांत येई तों पर्यंत कांहीं अपूर्व होत नाहीं· त्यांत आल्यानंतर त्याची गति कांहीं त्वरित होऊन मुरड्या वांचून मल विसर्जन लवकर होतें· जेव्हां प्रतिदिवशीं मलाचें विसर्जन होत नाहीं· तेव्हां हा द्यावयास फार उत्तम आहे· येणें करून ढाळ न होतां पोट स्वच्छ होतें· तसा कांबिण अजीर्ण गंडमाळा यांवर चांगला आहे· यांवर हा बहुत करून एकला देऊं नये· अन्य औषधाशीं मिळवून द्यावा· व याचे गुण गर्भाशयावर ही होतात· यास्तव जी रजस्वला होत नाहीं· तिला हा द्यावयास उत्तम आहे· या विषयीं लोखंडाचें औषध बोळ इत्यादिकां मधून कोणत्या एकाशीं मिळवून द्यावा· व जासमयीं उंदुकांत क्षुद्र कृमी होतात· तेव्हां ते बाहेर निघावयासाठीं हा उत्तम आहे· या क्षुद्र कृमींनां इंग्रेजी भाषेंत आस्कारिदेस ह्मणतात· हा मुळव्याधीवर व गर्भिणीस जिला प्रदर आहे तीस रजस्वलेस देऊं नये· दिल्हा असतां उपद्रव होतो· याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत आहे· पांच ग्रेन घेतल्यानंतर एक दोन वेळ परसाकडे होतें· व याचा उग्र स्वादें करून कधिं उल्हासा होतो· यास्तव सर्वकाळ याचा गोळ्या करून द्याव्या· त्या फार करून एकल्याचाच देऊं नयेत· अन्य औषधाबरावर करून द्याव्या· त्यांचा प्रकार सांगतो·

एल्याबोळ·

एल्याबोळ·	अर्धड्राम·
साबुण·	अर्धड्राम·

दोहोंना खलबत्यांत कुटून गोंदाचे पाण्यांत भिजवून बारा गोळ्या कराव्या· त्यांमधून दोन किंवा तीन द्याव्या· अथवा त्यांतल्या दोन गोळ्यांचें दोन ग्रेन कालोमेलाशीं खलबत्यांत मेलन करून दोन गोळ्या करून द्याव्या·

याचीं औषधें· पल्विस् आलोएस् कोम्पोसिटस्· पिल्युले आलोएस कोम्पोसिटे· पिल्युले आलोएस कम् मिर्री· टिंक्चुरा आलोएस· टिंक्चुरा आलोएस कोम्पोसिटा· वैनम आलोएस· दीकोक्टम आलोएस् कोम्पोसिटम·

स्काम्मोन्येगम्मीरेझिना· मु॰ सक्मुन्या·

हें औषध वेलविशेषांचा शुष्क चीक आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· शामदेशापासून आणितात· तेथें वेलाचें कांडें भूमीपासून टीचीवर कापून तेथून दुधासारिखा चीक निघतो· त्याला जमवून उन्हांत शुष्क करून औषधार्थ ठेवितात· याचे खडे लाहान आहेत· रंग कांहीं काळा कांहीं हिरवा अथवा धूसर वर्ण आहे· स्वाद कडुउग्र आहे· हें फार बलवंत रेचक आहे· अन्य रेचक दिल्यानंतर कांहीं रेच होत नाहींत· तर हें दिल्हें असतां प्राय: होतात· याचें प्रमाण पांच ग्रेनांपासून सोळा ग्रेनपर्यंत आहे· हें एकलें दिल्हें असतां फार मुरडा होतो· यास्तव फार करून एकलें देऊं नये· कालोमेलाशीं किंवा अन्य रेचकाशीं मिळवून द्यावें· तेणेंकरून तो होत नाहीं· आणि रेचही फार होतात· व हें कृमींवर व तरुण मनुष्याचे पोटांत फार आंव होत्ये तिजवर जालप आणि कालोमेल यांशीं मिळवून द्यावें· जलोदरादिकांवर क्रीम र टार्टराशीं मिळवून द्यावें· व हें एकलें देणें तर मुरड्याचे निवारणासाठीं सुगंध औषधाशीं मिळवून द्यावें· हें दिल्यानंतर प्राय: रेच लवकर होऊन फार होतात· व हें पोटांत शूल किंवा दाहाचें लक्षण झालें असतां देऊं नये·

याचीं औषधें· कोन्फेक्टयो स्काम्मोन्ये· पल्विस् स्काम्मोन्ये कोम्पोसिटस·

हें ज्यांत आहे तीं औषधें· एक्स्त्राक्टम् कोलोसिंथिदिस कोम्पोसिटम· पल्विस् सेन्ने कोम्पोसिटस·

गांबोज़्या· म्रा॰ रेवाचिनीचा शिरा·

हा वृक्षविशेषांचा शुष्क चीक आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· दक्षिणेक-

इत्ये

डल्ये किंवा पूर्वे कडल्या देशापासून आणितात· तेथें वृक्षाचे नालीला छिद्रें करतात त्या छिद्रांमधून पातळ निघतो· कांहीं अवधी नंतर शुष्क होऊन कठीण होतो· याला गंध नाहीं स्वाद थोडासा व रंग पिंवळा आहे· पाण्यानें भिजवला असतां अधिक पिंवळा होतो· हा फार बलवंत रेचक आहे· येणें करून उह्मासा वमन मुरडा इत्यादिक उपद्रव होतात· यास्तव मोठ्या अगत्यावांचून प्रायः एकलाच देऊं नये· ज्या समयीं पोट फुगतें तें अन्य रेचकें करून मोकळें होत नाहीं· तेव्हां हा अन्य औषधाशीं मिळवून द्यावा· व कृमींवर कालोमेलाशीं मिळवून द्यावा· व हा एक ग्रेनां पासून तीन ग्रेन पर्यंत घेऊन याचें तितके ड्राम क्रीमर टार्टर त्याशीं मेळून करून जलोदरादिकांवर द्यावें· तेणें करून रेच पातळ होऊन बहुत होतात· याचें प्रमाण दोन ग्रेनों पासून साहा ग्रेन पर्यंत आहे· याचा गोळ्या करून द्याव्या· व हा एक ग्रेन अन्य ढाळकाचें बल अधिक व्हावयासाठीं प्रायः त्याशीं मिळवावा·

याचें औषध· पिल्युले कांबोज्ये कोम्पोसिटे·

हैड्रार्जेरीसबम्युर्यास· इं० कालोमेल·

या विषयीं हें औषध पार्याचे सर्व औषधां मधून चांगलें आहे· याचें प्रमाण दोन ग्रेनां पासून दाहा ग्रेन पर्यंत आहे· व समय विशेषीं वीस ग्रेन पर्यंत आहे· हें बहुत करून एकलें देऊं नये· अन्य रेचकाशीं मिळवून द्यावें· अथवा याची पांच ग्रेनांची गोळी आवशीस देऊन मोठ्या पाहांटेस सोनामुखीचें फाण्ट किंवा ख्वारट ढाळक अथवा इतर द्यावें· व याचे योगानें अन्य रेचकाचे गुण अधिक होतात· व मुरडा उह्मासा इत्यादिक उपद्रव होत नाहींत· यास्तव पोट फार फुगलें असतां याशीं ओसार रेवंड सकमुन्या इंद्राइन इत्यादिकां मधून कोणतें एक मिळवून द्यावें· व याची पांच ग्रेनांची गोळी आवशीस देऊन पाहांटेस अन्य रेचक दिल्हें असतां पांच साहा रेच होतात· व प्रायः त्यांबराबर पित्त पुष्कळ पडतें· हें काळिजाचे रोग कांवीण सर्व प्रकारचा ज्वर जलोदरादिक वत्वेचे रोग कोल्ह इत्यादिक रोगांवर द्यावें· व ज्या कालीं बालांस पोटांत मलाचा किंवा आंवेचा संग्रह होऊन ज्वर वारंवार येतो· तेव्हां त्याचे परिहारा साठीं हें रेवाचिनीशीं मिळवून द्यावयास उत्तम आहे· जों पर्यंत मल व आंव निघून सुप्रकृति प्रमाणें मल शुद्धि होई तों पर्यंत द्यावें·

मग्निश्ये

मग्निइयेसल्फास·इं॰ ईप्समसाल्ट्स·

समुद्राचे पाण्यां पासून मीठ उत्पन्न केल्या नंतर जें पाणी उरतें त्या पासून हें उत्पन्न करितात· हें गंध रहित खारट अति कडु आहे· याचे रज फार बारीक असून स्वच्छ आहेत· हें सर्व खारट ढाळकां मध्यें उत्तम आहे· हें अर्ध औंसा पासून दोन औंस पर्यंत फार पाण्यांत विरघळवून द्यावें· प्राय: येणें करून मुरडा होत नाहीं· व वमनही होत नाहीं· यास्तव अन्य कुस्वाद ढाळकें करून वमन झालें असतां हें द्यावें· येणें करून प्राय: तें न होतां रेच होतात· जावेळेस आंतड्यां मध्यें फार चिकट आंव होत्ये· तेव्हां प्रथम हें देऊं नये· दिल्हें असतां आंव निघत नाहीं· नुस्ते पातळ रेच मात्र होतात· प्रथम कालोमेलादिक अन्य ढाळक आवशीस देऊन पाहांटेस हें द्यावें· तेणें करून ती आंतड्यां पासून सुटून निघत्ये· हें पाण्यांत विरघळवून त्यांत आंबट पदार्थ घातला असतां याचा कुस्वाद न्यून होतो· व याचें लाहान प्रमाण कडु रोचकाचे फाण्टाशीं मिळवून प्रतिदिवशीं दिल्हें असतां दिवसांत एक दोन रेच होतात· आणि रोचक गुण ही होतो·

याचें औषध· मग्निइयेसब्कार्बोनास·

सोदेसल्फास·इं॰ ग्लोबर्ससाल्ट्स·

याची सिद्ध करावयाची कृति धातु औषधोत्पत्ति मध्यें लिहिली आहे; हें अर्ध औंसा पासून दोन औंस पर्यंत द्यावें· याचे गुण ईप्सम साल्ट्साचे गुणा सारिखे आहेत·

पोटास्से सल्फास·

याची सिद्ध करावयाची कृति गुण व प्रमाण हीं धातु औषधोत्पत्ति मध्यें लिहिलीं आहेत·

पोटास्सेसुपर्टार्ट्रास·इं॰ क्रीमरटार्टर·

याचा सिद्ध करावयाचा प्रकार सां॰ द्राक्षांचें मद्य पिपांत ठेविल्या नंतर त्या मद्या पासून पिंपाचे आंत भोंवताला खपली सारिखा पदार्थ उत्पन्न होतो· त्याला इंग्रेजी भाषेंत टार्टर ह्मणतात· त्याचा रंग तांबडा पांढरा इत्यादिक मद्याचे रंगा प्रमाणें असतो त्याला उकळत्ये पाण्यांत विरघळवून गाळ तळास गेल्या नंतर वरला स्वच्छ पदार्थ घ्या-

वा· त्यामध्यें आंतड्यांतील पांढरा पदार्थ आणि काष्ठाची राख घालून मेलन करावें· त्यावर जो जो फेंण येतो तो तो काढून टाकावा· नंतर त्यांतील निर्मळ क्षार रजतळास बसतात· त्यांचें नाम क्रीमर टार्टर आहे· या औषधाला गंध नाहीं· याचा रंग श्वेत व स्वाद आंबट तिरवट आहे· हें पाण्यामध्यें सहज विरघळत नाहीं· हें चांगलें दाळक आहे· याचें प्रमाण दोन ड्रामा पासून साहा ड्राम पर्यंत आहे· एकलें दिल्हें असतां प्रायः पोटांत वायू मुरडा इत्यादिक होतात· यास्तव जालप गंधक इत्यादिक रेचकांशीं मिळवून द्यावें· हें जलोदरादिकांवर द्यावयास उत्तम आहे· दिल्या नंतर फार पातळ दाळ होतात· आणि शोषक वाहिन्यांची शोषण शक्ति अधिक होत्ये· जालपाशीं मिळवून द्यावें· अथवा रेवाचिनीचे शिर्षावर लिहिलें आहे त्या प्रमाणें द्यावें· परंतु त्या बराबर काळिजास रोग झाला असतां देऊं नये· व हें प्रति दिवशीं कांहीं अवधी पर्यंत दिल्हें असतां अजीर्ण बळाचा न्यूनपणा इत्यादिक होतात· ह्मणोन असें देऊं नये·

पोटास्से टार्त्रास·

याचा सिद्ध करावयाचा प्रकार गुण प्रमाण इत्यादिक धातु औषधोत्पत्ति मध्यें उक्त आहेत·

सोदा टार्टारिझेटा· ई· रोशेल्स सालत्स·

याची सिद्ध करावयाची कृति गुण प्रमाण इत्यादिक धातु औषधोत्पत्ति मध्यें लिहिलीं आहेत·

चिप्नळीचीं रेचकें·

टेरेबिंथिने ओल्यम·

जा कालीं पोट फार फुगतें तेव्हां हें एक औंसा पासून अडीच औंस पर्यंत सात आठ औंस पेजेशीं मिळवून चिप्नळीनें मळद्वारांत सोडावें· अन्य चिप्नळीचीं रेचकें निष्फळ झाल्या नंतर हें सोडिलें असतां प्रायः मल विसर्जन होतें·

म्युर्यास सोदे· प्रा· मीठ·

पूर्व कार्या विषयीं हें ही एक औंस अथवा दोन औंस सात आठ औंस पेजे-

शा मिळवून सोडावें· हें चिपूनळीचे रेचकांमध्यें नम्र आहे· याशीं गोडें तेल अथवा एक दोन औंस एरंडेल कधिं मिळवितात·

टाबसी फोल्या· प्रा॰ तंबाकुचीं पानें·

याविषयीं याचे गुणादिक वनस्पति औषधोत्पति मध्यें याचे फाण्टावर लिहिले आहेत·

ऋतूद्भव· इं॰ इमिनगोग्स·

जा औषधें करून आर्त्तव उत्पन्न होतें· त्या औषधान्नां ऋतूद्भव ह्मणतात· शारीरांचा किंवा गर्भाशयाचे रक्तवाहिन्यांचा निर्बलपणा व शारीराचा स्थूलपणा या दोन कारणां करून उत्पन्न झालेला ऋतु नष्ट होतो· व प्राप्त कालीं उत्पन्नच होत नाहीं· नवीनाचे अनुत्पत्तिचें कारण प्रायः निर्बलपणा आहे· पहिल्या कारणें करून जिची अशी अवस्था होत्ये· तिला बार्काचीं औषधें लोखंडाचीं औषधें इत्यादिक रेचकें द्यावीं· दुसऱ्या कारणें करून जिची होत्ये तिचें रक्त काढावें· अथवा ढाळक वमक इत्यादिक उपचार करावे· काळी कुटकी· एळ्याबोळ इत्यादिक औषधांचे गुण प्रथम मोठ्या आंतड्यांवर होऊन नंतर गर्भाशयावर होतात· असलीं ऋतूद्भव औषधें ऋतु नष्ट झाल्या नंतर पोट बहुत फुगतें तेव्हां अन्य ऋतूद्भवां बराबर द्यावयास उत्तम आहेत· व तो नष्ट झाल्या नंतर अंगग्रह कधिं होतो· तेव्हां अंगग्रहनाशक ऋतूद्भव द्यावें· व त्या औषधांचा गुण कधिं होतो· कधिं होत नाहीं· व प्रायः हीं बहुत दिवस पर्यंत द्यावीं लागतात· यांचीं नावें सांगतो·

कास्तोर्यम· मु॰ जुंदेबेदस्तर·
आस्साफेटिदे गम्मीरेझिना· प्रा॰ हिंग·
गाल्बनी गंम्मीरेझिना· मु॰ बरीजा·
फेरीसब्कार्बोनास· प्रा॰ लोहकीट·
फेरीसल्फास· प्रा॰ हिराकस· सं॰ कासीस·
फेर्मटार्टारिझेटम·
टिंक्चुरा फेरीम्युर्याटिस
वैनमफेरी·

हैड्रार्जेरी

हैड्राजेरीसब्म्युर्यास· इं॰ कालोमेल·
आलोएसस्पिकेटएक्स्त्राक्टम· प्रा॰ एळ्याबोळ·
रेईरेदिक्स· प्रा॰ रेवाचिनी·
हेल्लेबोरीनैग्रेरेदिक्स· प्रा॰ काळी कुटकी·

या प्रकारें सर्व ऋतुद्ध यांचें साधारण वर्णन केलें· आतां एका एकाचें पृथक् विशेष वर्णन करतो·

कास्तोर्यम·

या विषयीं हें दाहा ग्रेन किंवा वीस ग्रेन द्यावें· अथवा याचें टिंक्त्युर एक ड्राम द्यावें· परंतु हें फार करून देऊं नये· या पेक्षां अन्य औषधें द्यावयास चांगलीं आहेत·

हिंग·

याचे उत्पत्तिचें वर्णन अंगग्रह नाशक औषधां मध्यें केलें आहे· या विषयीं याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत आहे· एळ्याबोळ व लोरवंडाचें औषध यां बराबर याचा गोळ्या करून द्याव्या· अथवा याचें टिंक्त्युर एक ड्राम द्यावें·

गाल्बनीगम्मीरेझिना·

हा लाहान वृक्ष विशेषांचा चीक आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· फारसिस्थान आणि शाम या दोहों देशांत आहे· तेथें वृक्षाचे कांड्याला छिंद्रें करतात· त्या छिद्रां मधून दुधा सारिखा जमून कठीण होतो· त्यां पासून या देशांत आणितात· याचा रंग पांढरा आहे· याचें लाहान लाहान खड्यां मध्यें कांहीं भुरा चिकट पदार्थ आहे· तेणें करून ते चिकटलेले आहेत· याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून अर्ध ड्राम पर्यंत आहे· हिंगा प्रमाणें याच्या एळ्याबोळ व लोरवंडाचें औषध यां बराबर गोळ्या करून द्याव्या· परंतु हा हिंगा सारिखा चांगला नाहीं·

याचीं औषधें· पिल्युलेगाल्बनीकोम्पोसिटे· एक्स्त्राक्टम गाल्बनीकोम्पोसिटम·

लोहकीट·

लोहक्रीट· कासीस· फेरमटार्टारिझेटम· टिंक्त्युराफेरीम्युर्येटिस· वैनमफेरी· याविषयीं या पांचांचें सविस्तर वर्णन धातु औषधोत्पत्ति व रोचक यांमध्यें केलें आहे·

कालोमेल·

याविषयीं हें कधिं देतात· याचें प्रमाण एक ग्रेन अथवा दोन ग्रेन आहे· एल्याबोळ व रेवाचिनी यांबराबर याचा गोळ्या करून द्याव्या·

एल्याबोळ·

याला ढाळक गुण असून हा गुण ही आहे· यास्तव ऋतू नष्ट झाल्यानंतर पोट फुगतें तेव्हां अन्य ढाळकांपेक्षां हा द्यावयास उत्तम आहे· रेवाचिनी बोळ कालोमेल लोखंडाचें औषध इत्यादिकां बराबर याचा गोळ्या करून द्याव्या· अथवा याचें टिंक्त्युर त्यांचे टिंक्त्युराशीं मिळवून द्यावें· याचें प्रमाण दोन ग्रेनां पासून बारा ग्रेन पर्यंत आहे·

रेवाचिनी·

हें औषध प्राय: एल्याबोळाशीं मिळवून द्यावें· याचे गुण त्यासारिखे आहेत·

काळीकुटकी·

पूर्वकालीं हें औषध फार देत असत· सांप्रतकालीं प्राय: देत नाहींत· याचें कारण याचे गुण खचीत होतात असें नाहीं· व कधिं फार भयकारक होतात· याचे टिंक्त्युराचीं प्रमाणादिक वनस्पति औषधोत्पत्ति मध्यें लिहिलीं आहेत·

याचें औषध· टिंक्त्युराहेल्लेबोरीनिग्री·

मूत्रल· किंवा· द्रावक· इं॰ दैयुरेटिक्स·

जा औषधें करून मुताला अधिक होतें· त्यांना मूत्रल किंवा द्रावक· व इंग्रेजी भाषेंत दैयुरेटिक ह्मणतात· हीं औषधें फार प्रकारचीं आहेत त्यांतें सां॰

१ · पोटास्सा· पोटास्सेनैत्रास· ओल्यमटेरेबिंथिने· जुनिपरसकोम्युनिस· कांथारिदेस·

देस· यांचे गुण केवल गुर्दीचे मूत्र वाहिन्यांवर होतात व यांचे रूपादिकांचा भेद पक्काशया मध्यें किमपी होत नाहीं· जशीं तोडांत घालावीं तशीं शोषक वाहिन्यांनीं शोषिल्यानंतर रुधिराभिसरणस्थलाप्रत प्रविष्ट होऊन रुधिरा बराबर गुर्दीचे मूत्र वाहिन्यांप्रत जातात· तेणें करून गुर्दीत मूत्राची उत्पत्ति अधिक होत्ये हा एक प्रकार·

२ पोटास्से आसीटास· पोटास्से सुपर्टार्त्रास· सिल्लेरेदिकस· कोलचिसिरेदिक्स· कोपेबा· यांचेही गुण त्या वाहिन्यांवरच होतात· परंतु हीं जशीं तोडांत घालावीं तशीं गुर्दीप्रत जात नाहींत· पक्काशयांत किंवा आंतड्यांत रूपांदिकांचा भेद होऊन जातात· हा द्वितीय प्रकार·

३ पार्याचे औषधांचे गुण प्रथम शोषक वाहिन्यांवर होऊन नंतर गुर्दीवर होतात· हा तृतीय प्रकार·

४ दिजिटेलिस फोल्या· टाबसी फोल्या· येहीं करून रुधिराभिसरण मंद होऊन शोषण क्रियेचें आधिक्य होतें· हा चवथा प्रकार·

५ रेचकादिक औषधें करून सर्व शरीराची व विशेषें करून शोषक वाहिन्यांची शक्ति अधिक होत्ये· हा पांचवा प्रकार·

६ तर्फदरेवाचिनीचा शिराजालेपेरेदिकस· इत्यादिक औषधें करून आंतड्यांतल्ये एक्सहेलंत वाहिन्यांचीं क्रिया अधिक होत्ये· नंतर शोषक वाहिन्यांची क्रियाही अधिक होत्ये· हा साहावा प्रकार·

१ पहिल्या प्रकारच्या औषधें करून गुर्दीचे मूत्र वाहिन्यांची शक्ति अधिक होऊन मुतणें अधिक होतें· तेणें करून जलोदरादिकांची सूज न्यून होत्ये· यानां थंड पातळ पदार्थांचें फार पान साह्य होतें· यास्तव त्या रोगावर हीं दित्या नंतर फार पान कर अशी आज्ञा करावी·

२ दुसर्या प्रकारच्या औषधां मधून कोणतें एक घेतल्या नंतर त्यांतील एक पदार्थ पक्काशया मध्यें पृथक् होऊन तो रक्तवाहिन्यांत शिरून त्या मार्गानें गुर्दीचे मूत्र वाहिन्यांप्रत जातो· तेणें करून त्यांची शक्ति अधिक होऊन मुतणें अधिक होतें·

प्रथम प्रकारचीं व द्वितीय प्रकारचीं औषधें रेचकाशीं मिळवून दिल्हीं असतां द्रावक गुण होत नाहींत· व यांतलीं ओल्यमटेरेबिंथिने पोटास्से आसीटास पोटास्से सुपर्टार्त्रास· यांचें मोटें प्रमाण दिल्हें असतां होत नाहींत· कारण रेच होऊन तीं त्वरेनें बाहेर निघतात त्यामुळें शोषक वाहिन्यांनां अवकाश न मिळून त्यांचें शोषण नहोऊ-

न

न तीं गुर्दांप्रत जात नाहींत· यास्तव यांचा पूर्वीं कांहीं कारणें करून ढाळ होत असतां त्यांचा प्रतिबंध केल्या वांचून हीं दिल्हीं तर द्रावक गुण होत नाहींत· व हीं दिल्या नंतर मनुष्याला पांघरावयास उष्ण वस्त्र दिल्हें असतां अथवा उष्णाचा संबंध झाला असतां यांचे द्रावक गुण होत नाहींत· हीं स्वेदकारि होतात· ह्मणजे चर्माचे घर्म वाहिन्यांचे क्रियेचें आधिक्य होऊन घाम निघतो·

३ पूर्वोक्त दोन प्रकारचा औषधें करून साक्षात् गुर्दांचे मूत्र वाहिन्यांची शक्ति अधिक होऊन रुधिरांतील पातळ पदार्थ न्यून होतो· त्याचा स्थानीं तसला पदार्थ सर्व शरीरा पासून आणून रुधिराची पूर्णता करणें हें कार्य शोषक वाहिन्यांचें आहे· यास्तव त्यांची शक्ति अधिक होत्ये· साक्षात् या औषधें करून होत नाहीं· त्या प्रकारें पार्याचें औषधें करून साक्षात् शोषक वाहिन्यांची शक्ति अधिक होऊन त्या सर्व शरीरांतील पातळ पदार्थ पुष्कळ शोषून रुधिरांत नेतात त्याला रुधिरा पासून पृथक् करणें हें कार्य गुर्दांचे मूत्र वाहिन्यांचें आहे· यास्तव त्यांची शक्ति अधिक होत्ये· साक्षात् पार्याचे औषधें करून होत नाहीं· यास्तव हीं दोन प्रकारचीं औषधें जलोदरादिकांवर एका कालीं दिल्हीं असतां फार हित होतें·

४ कांहीं एक जनावराचे जखमे मध्यें विष घातलें होतें त्या विषाचें शोषण शोषक वाहिन्यांनीं लवकर केलें नाहीं· त्याचें रुधिर काढिल्या नंतर लवकर केलें· येणें करून असें प्रसिद्ध होतें किं शरीरा मध्यें रुधिराचें आधिक्य झालें असतां शोषक वाहिन्यांची शोषण शक्ति न्यून होते· तसें रुधिराचें गमन फार त्वरित होत असतां त्या वाहिन्यांची शक्ति न्यून होत्ये· यास्तव जावेळेस जलोदरादिकां मध्यें शोषक वाहिन्यांचा अशा अवस्था होतात· तेव्हां रक्त काढावें· व दिजिटेलिस द्यावें· तेणें करून रुधिराची न्यूनता व रुधिराचें गमन मंद होऊन त्या वाहिन्यांची शक्ति अधिक होऊन मुतण्याचें आधिक्य होऊन जलोदरादिकांचा परिहार होतो· या औषधें करून रुधिराभिसरण मंद होई तों पर्यंत प्रायः याचा द्रावक गुण होत नाहीं· व याचा द्रावक गुण जलोदरादिकांवर मात्र होतो· सुप्रकृतीमध्यें दिल्हें असतां रक्ताभिसरण मात्र मंद होतें· द्रावक गुण होत नाहीं· व तंबाकूचे गुण कांहीं दिजिटेलिसाचे गुणां प्रमाणें आहेत· व याचा द्रावक गुणही त्या प्रमाणें आहे परंतु या विषयीं फार करून याला देत नाहींत·

५ शोषक वाहिन्यांचे शोषण शक्तिचे न्यूनतें करून साशय त्वचेचे आशयांमध्यें व पोट पिंजर इत्यादिक शरीराचे पोकळ स्थलां मध्यें पाण्या सारिख्या पातळ पदार्थांचें सांचणें होऊन जलत्वक् जलोदर जळपिंजर जलमस्तक हे चार रोग होतात· जलत्वक् रोग प्रायः

ज्वरादि रोगें करून शरीरास निर्बळपणा आला असतां रुधिरांतील पातळ पदार्थ सिक्रीशनक्रियें करून फार पृथक होऊन होतो· या रोगावर जेहीं करून शरीराचा निर्बळपणा दूर होतो· असे रेचकादिक पदार्थांचे उपचार चांगले आहेत· एका गलबतावर फार लोक बहुत दिवस पर्यंत राहात होते त्यांनां वाईट तांदुळां शिवाय अन्य चांगलें भोजन प्राप्त होत नव्हतें· तेणें करून निर्बलपणा होऊन जलत्वक रोग झाला· कांहीं काळानंतर त्यांनां चांगलें भोजन मिळून निर्बलपणा दूर होऊन रोग दूर झाला·

६. जावेळेस रोगी निर्बळ नाहीं व जलोदरा बरोबर प्लीहा व यकृत् यांचे रोग नाहींत· त्या वेळेस या प्रकारचा औषधें करून परम आश्चर्य कारक गुण होतात ह्मणजे या औषधांचे एक दोन मात्रें करून शोषक वाहिन्यांचीं असंख्य मुख छिद्रें उघडून असें त्वरित शोषण करतात किं आठ चार घटिकांनीं जलोदराची सूज न्यून होत्ये· जलोदरा बरोबर प्लीहा व यकृत् यांचे रोग असतां पहिलीं दोन प्रकारचीं औषधें पार्याचे औषधां बरोबर अवश्य दिल्हीं पाहिजेत· त्यांवांचून ते दूर होत नाहींत· व एकदां जलोदराची निवृत्ति झाली असतां पुनः त्याचा उद्गम न होऊ यासाठीं मूत्रल रेचकाशीं मिळवून द्यावें· तेणें करून जलोदर निःशेष जातें· व सिकता आणि प्रमेह यां विषयीं मूत्रल कधिं देतात· तेणें करून मुताळा फार होऊन त्यांचा उग्रपणा न्यून होऊन पीडा कांहीं न्यून होत्ये· व हीं औषधें दिल्यानंतर शरीरास शीत संबंध व शीतोदकाचें फार पान इत्यादिक उपचार करावे· ते या औषधांस साहाय्य होतात· आणि उपद्रवही होत नाहींत· असें जाणावें· मूत्रल औषधें क्षार वनस्पति व जीवसंबंधी पदार्थ यांचीं आहेत त्यांचीं नावें सां॰

पोटास्सेसब्कार्बोनास·
पोटास्सेनैत्रास· प्रा॰ सोरा·
पोटास्से आसीटास·
पोटास्सेसुपर्टार्त्रास·
स्पिरिटस एथरिस नैत्रिसि·
ओल्यम टेरेबिंथिने·
जुनिपरी बाक्से एट काक्युमिना·
कांथारिदेस·
सिल्लेरेदिक्स·
कोल्चिसीरेदिक्स·

कोपेबा·
दिजिटेलिस् फोल्या·
टाबसी फोल्या· प्रा॰ तंबाकू·

या प्रकारें सर्व मूत्रलांचें साधारण वर्णन केलें· आतां एका एकाचें पृथक् विशेष वर्णन करतो·

पोटास्से सब् कार्बोनास·

याची सिद्ध करावयाची कृति धातु औषधोत्पत्ति मध्यें लिहिली आहे· याविषयीं हें पूर्वकालीं फार देत असत· सांप्रत कालीं फार करून देत नाहींत· कारण याला द्रावक गुण फार नाहीं· व त्वरित होत नाहीं· आणि फार दिवस पर्यंत दिल्हें असतां पक्वाशयास उपद्रव होतो· याचें प्रमाण वीस ग्रेन अथवा पंचवीस ग्रेन आहे· तें पुष्कळ पाण्यांमध्यें विरघळवून दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

याचीं औषधें· पोटास्से आसीटास· पोटास्से कार्बोनास· पोटास्से टार्त्रास· लैकोर पोटास्से· लैकोर पोटास्से सब् कार्बोनटिस· मग्निश्येसब् कार्बोनास· पोटास्से सल्फ्युरीटम· लैकोर आर्सेनिकेलिस· आलकोहोल·

पोटास्से नैत्रास· प्रा॰ सोरा·

याची उत्पत्ति बंगाल्याकडे फार आहे· तेथें ऊषर भूमिवर तवंगा सारिखा जमतो· त्याला मृत्तिकेसहवर्तमान आणून पाण्यांमध्यें विरघळवून तें पाणीं मिठाचे कोंड्यां सारिख्या कोंड्या करून त्यांमध्यें घालतात· त्यांतील पाणीं सूर्य किरणानीं आटून मिठा सारिखा सोरा जमतो· तो फार स्वच्छ नाहीं· त्याचा स्वच्छ करायाचा प्रकार सां॰ तो थंड पाण्यांत धुवावा नंतर तो दोन भाग पाणीं एक भाग त्याचें मेळन करून वर तवंग येई तों पर्यंत उकळावें· नंतर त्याला शिशाचे पात्रांत घालून शीतळ होई तों पर्यंत घाटावें· तेणें करून त्याचे सूक्ष्म रज होतात· याला गंध नाहीं· स्वाद खारट कडुसा आहे· येणें करून तोंडांत व पक्वाशयांत थंडसें भासतें· याला द्रावक गुण फार नाहीं· यास्तव जलोदरावर फार करून देत नाहींत· कदाचित् द्यावयाचा असतां अन्य औषधाशीं मिळवून देतात· याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून पंधरा ग्रेन पर्यंत आहे· तें फार पाण्यांत विरघळवून दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· याचे अन्य गुण अन्य प्रकारचे औषधांमध्यें लिहिले होतील·

याचें औषध· आसिदम्नैत्रिकम·

पोटास्से आसीटास·

याची सिद्ध करावयाची कृति व प्रमाणादिक धातु औषधोत्पत्ति प्रकारामध्यें लिहिलीं आहेत· हें पातळ पदार्थामध्यें विरघळवून द्यावें·

पोटास्से सुपर्टात्रास·

याचा उत्पत्ति प्रकार व ढाळक गुण ढाळक औषधांमध्यें पूर्वीं लिहिला आहे· आतां याचा मूत्रल गुण लिहितो· हें जलोदरावर द्रावक गुण व ढाळक गुण करायासाठीं देतात· द्रावक गुण करायासाठीं हें अर्ध औंस घेऊन आठ किंवा दाहा औंस पाण्यांत विरघळवून द्यावें· दिल्यानंतर शीतोदकाचें फार पान द्यावें· तेणें करून द्रावक गुण चांगला होतो· परंतु दोन्ही गुण होतील असें बहुत करून द्यावें· याविषयीं हें प्रथम दिवशीं अर्ध औंस देऊन दिवसान दिवस अधिक करून दिवसांत एक औंस होई तों पर्यंत अधिक करावें· गुण पूर्ण झाल्या नंतर प्रमाण स्थिर राखावें· जर एक औंस प्रमाणाच्या पूर्वींच गुण पूर्ण झाले तर तें प्रमाण तितकेंच राखावें· परंतु असें चोकशीनें द्यावें किं ढाळक गुण अधिक होऊन मनुष्य निर्बल न होई व द्रावक गुण न्यून न होई· या प्रकारें दिल्हें असतां रेच व मुतणें चांगलें होऊन जलोदरादिकांची सूज न्यून होत्ये· व कांहीं वैद्य असें ह्मणतात किं येणें करून जलोदरादि दूर झाल्या नंतर प्रायः पुनः त्यांचा उद्यम होत नाहीं· निःशेष जातात· हें औषध जलोदरावर चांगलें आहे· हें एकाकालीं पुष्कळ दिल्हें असतां कधिं उह्लासा आणि पोटांत वायू होतो· व येणें करून रेच होऊन मनुष्य निर्बळ होत असतां अनरवी देऊं नये· दुसरें मूत्रल जेणें करून रेच न होऊन मुतणें अधिक होईल तें द्यावें· व हें स्किला बराबर द्यावें· आणि येणें करून निर्बलपणा आला असतां बल यावयासाठीं लोखंडाचें व वनस्पतिचें रोचक इत्यादिक द्यावीं· व हें जलोदरादिकांवर पानास्तव चांगलें आहे· पानाचा प्रकार सो॰ एक पैंट दूध घेऊन अग्निवर ठेवून उकळूं लागतें· तेव्हां त्यांत दोन ड्राम हें औषध घालून तत्क्षणीं उतरावें· थंड झाल्या नंतर गाळून पाण्यांशीं मिळवून प्राशनार्थ द्यावें·

याचीं औषधें· फेर्रम टार्टारीझेटम· पोटास्से टार्त्रास· आंतिमोन्यम् टार्टारीझेटम्· सोदा टार्टारीझेटा·

स्पिरिटस् एथरिस् नैत्रिसि·

याची सिद्ध करावयाची कृति गुण प्रमाण इत्यादिक वनस्पति औषधोत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत· हें जलोदरावर अन्य औषधाशीं मिळवून देतात

ओल्यम टेरेबिंथिने·

हें तेल आहे याचा उत्पत्ति प्रकार सां॰ वृक्ष विशेषाचे छिद्रांमधून दाट तेलसर पदार्थ निघतो· त्याशीं थोडें पाणी मिळवून त्याचें यंत्रानें स्वच्छ तेल काढतात· हें रंगरहित आहे· याचा गंध फार उग्र व स्वाद तिखटसा आहे· याचें वजन फार हलकें व हें फार चपल आहे· सहज प्रदीप्त होतें· हें दाहा मिनिमां पासून एक ड्राम पर्यंत दिल्हें असतां मुतणें अधिक होतें· त्याविषयीं इतकें धुपणी ग्लीत प्रमेह यां रोगांवर द्यावें· तसें कधिं अश्मरीवरही द्यावें· परंतु या रोगाविषयीं याची फार चौकशी करावी· कारण यावर येणें करून कधि पीडा होत्ये· व हें सर्व प्रकारच्या वायूवर सिंकोनाचे औषधाबराबर कधिं द्यावें· या विषयीं याचें प्रमाण एक किंवा दोन ड्राम आहे· या प्रमाणें करून कधिं उह्लासा होतो· यास्तव देत्ये समयीं याशीं तांबड्या मिरचीचें टिंक्चुर कांहीं मिळवावें·

याचें औषध· लिनिमेन्तम टेरेबिंथिने·

जुनिपरी बाक्से एट काक्युमिना·

हें फळ आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· विलायत देशामध्यें आहे· या विषयीं याचीं औषधें देतात त्यांचे गुण प्रमाण इत्यादिक त्यांचे उत्पत्ति प्रकारावर उक्त आहेत·

याचीं औषधें· ओल्यम जुनिपरी· स्पिरिटस जुनिपरी कोम्पोसिटस्·

कांथारिदेस·

हे आकृतीनें पादर्‍या किड्यां सारिखे मक्षिका विशेष आहेत· रुम देशामध्यें वृक्ष विशेषाचे पर्णांवर असतात· वृक्ष हालवित्या नंतर खालती पडतात· नंतर त्यांना सिर्काचे वाफेनें मारून उन्हांत शुष्क करतात· यांचा रंग हिरवा पिंवळासा आहे· यांचें चूर्ण औषधाविषयीं फार चांगलें आहे· पोटांत दिल्हें असतां द्रावक गुण होतो· परंतु मोठ्या चोकशीनें दिल्हें पाहिजे· नाहींतर येणें करून गुर्दे क्लोमन् इत्यादिकांचे ठायीं विकृति होत्ये ह्मणजे मूत्राबराबर रुधिर पडतें· व पोट दुखतें· वमन होतें· इत्यादिक उपद्रव होतात· व फार दि

ल्हें असतां कधिं रोग प्रलाप अंगग्रह हे होतात· व कधिं मृत्युही येतो असें जाणावें · हें फार करून जलोदरादिकांवर देत नाहींत· धुपर्णी व फार दिवसांच्या ग्लीत रोग यांवर देतात· मूत्रस्राव ह्मणजे जावेळेस स्वइच्छे वांचून मूत्र बिंदु बिंदु बाहेर निघतें तेव्हां हें फार कामाचें आहे· या रोगावर याचा फार चांगला गुण होतो· या विषयीं याचें टिंक्त्युर चांगलें आहे· त्याचें प्रमाण दाहा मिनिमा पासून एक ड्राम पर्यंत आहे· चूर्णाचें प्रमाण एक ग्रेन आहे· त्याचा अफु बराबर अथवा हें योस्यमसाचे शंध्या बराबर गोळ्या करून द्याव्या व हें घेतल्यानंतर दूध पेज इत्यादिकांचें फार पान करावें· व हें पूर्ण गुण व्हावयासाठीं फार दिवस दिल्हें पाहिजे·

या विषयीं याचें औषध· टिंक्त्युराकांथारिदेस·

सिल्लेरेदिकस·

हें औषध या देशांत नाहीं· अन्य देशापासून आणितात· त्या देशांत याची उत्पत्ति समुद्रतिरींचे वाळवंटामध्यें फार आहे· याचें रूप व आकार धांप्याचे कांद्या प्रमाणें आहे हें फारकरून बहुत कार्यी विषयीं देतात· याला गंध नाहीं· स्वाद कडु आणि उग्र आहे· याविषयीं प्रायः याचें चूर्ण देतात· याचें प्रमाण एक ग्रेना पासून तीन ग्रेन पर्यंत आहे· प्रारंभकाळीं एक एक ग्रेन दिवसांत दोन वेळ दिल्हें असतां चांगलें आहे· नंतर हळु हळु अगत्या प्रमाणें अधिक करावें· जोंपर्यंत किं याचा द्रावक गुण होई अथवा उल्लासा किंवा रेच यांचा यत्किंचित् उद्गम होई· ते फार झाले असतां याचा द्रावक गुण होत नाहीं· हें जलोदरादिकांवर पार्याचे औषधाशीं मिळवून द्यावें· या प्रमाणें दिल्हें असतां याचे गुण चांगले होतात· व प्रायः असेंच देतात· या विषयीं पार्याचे औषधां मधून कालोमेल व ब्लुपिल श्रेष्ठ आहे· त्यांचें मध्यम प्रमाण घेऊन त्याशीं याला मिळवून द्यावें· अथवा एक अवशीस देऊन दुसरें पाहांटेस द्यावें· मेलन प्रकार सां॰

स्किलाचें चूर्ण·	एक ग्रेन·
कालोमेल·	पांच ग्रेन·
अफु·	अर्धा ग्रेन·

सर्वांचें मेलन करून एक गोळी करावी· अशी गोळी आवशीस आणि पाहांटेस द्यावी· येणेंकरून नींद आलें असतां कालोमेलाचे स्थानीं ब्लुपिल घ्यावें· अशा मिश्रणें करून शोषकवाहिन्यांची शोषणशक्ति व गुर्दांचे मूत्रवाहिन्यांची शक्ति अधिक होत्ये· व जावेळेस जलोदरा बराबर काळिज किंवा प्लीहा अथवा इतर पोटांतील पदार्थ यांचे रोग असता-

त

त त्यावेळेस हें मिश्रण फारउत्तम आहे·जावेळेस पार्याचे योगानें या औषधें करून रेच फार होतात आणि त्याचा प्रतिवंध अफूचा योगेंकरून होत नाहीं· त्यावेळेस हें मेलन देऊं नये·नुस्तें स्किल द्यावें·आणि बाहेर पार्याचे मलमाचें मर्दन करावें·

याचीं औषधें· आसीटमसिल्ले· ओकसिमेळसिल्ले·पिल्युलेसिल्ले कोम्पोसिटे·टिंक्त्युरासिल्ले·

कोलचिसीरेदिकस·

हें औषध या देशांत नाहीं·विलायत देशा पासून आणितात·याचे गुण द्रावक आणि मदकारी आहेत·व येणें करून कधिं रेचही होतात· याचे द्रावक गुण स्किलाचे द्रावक गुणां प्रमाणें आहेत·परंतु तितके बळकट आणि खचित नाहींत·यास्तव त्याविषयीं प्राय: देत नाहींत·व येणें करून वायूची पीडा न्यून होत्ये·हा याचा मुख्य गुण आहे·या विषयीं याचें प्रमाण शुष्क मूळाचे तीन ग्रेनां पासून नौ ग्रेन पर्यंत आहे· तें पीडेचे वेळेस द्यावें·तेणें करून प्राय: पित्ताचे शौच फार होतात· आणि रक्ताभिसरण मंद होतें·

याचीं औषधें· वेनमकोलचिसी· आसीटमकोलचिसी·

कोपेबा·

हें औषध या देशांत नाहीं· अमेरिका देशा पासून आणितात· तेथें एक वृक्ष आहे त्याचे कांड्याला कोरून मध्य पर्यंत छिद्र करून त्या छिद्रा मधून पाण्यां सारिखा रंग रहित असा रस निघतो· कांहीं काला नंतर दाट आणि पिंवळट वर्ण होतो· याचा गंध चांगला व स्वाद तिखट कडुसा आहे· व दाट पणा तेला सारिखा आहे·यामध्यें तेलाची भेळ असलीतर त्याची परीक्षा या प्रमाणें करावी·हें कागदाला लावून त्यावर अक्षर आलें असतां भेळ नाहीं आलें नसतां भेळ आहे·असें जाणावें·हें वस्तुत: द्रावक आहे·परंतु याचें मोटें प्रमाण दिल्हें असतां रेच होतात· याला बहुत दिवसां पासून ग्लीत प्रमेह धुपणीं इत्यादिक रोगांवर देतात· जावेळेस स्त्रियांचा वय परत्वें करून विटाळ जाऊन योनि मधून पुवा सारिखा कुत्सित पदार्थ निघतो· व तेथें पीडादिक होतात· त्यावेळेस हें द्यावयास चांगलें आहे· व मुळव्याधीवरही उत्तम आहे· येणें करून तत्संबंधी पीडा फार न्यून होते· व प्राय: कांहीं रेच होतात· या विषयीं एक एक ड्राम दिवसांत तीन वेळ द्यावें· याचें प्रमाण दाहा मिनिमां पासून एक ड्राम पर्यंत आहे·याला पाण्यांशीं मिळवून द्यावें·अथवा गोंदाचे पा-

ण्यांशीं किंवा आंतड्यांतील पिंवळ्ये पदार्थाशीं मिळवून पाण्यांशीं मिळवावें· प्रमेहावर हें एक एक ड्राम घेऊन एक एक ड्राम कबाब चिनीशीं मिळवून दिवसांत तीन वेळ द्यावें· व हें फार दिवस पर्यंत दिल्हें असतां पक्काशयास कांहीं उपद्रव होतात·

दिजिटेलिसफोल्या·

याचे मदकारि गुण मदकारि औषधांमध्यें लिहिले आहेत· आतां याचे द्रावक गुण लिहितो· या विषयीं हें फार बलवंत आहे· जेव्हां जलोदरादि रोगांमध्यें निर्बलपणा मुखपांढरें चर्मथंड नाडी निर्बल इत्यादिक लक्षणें आहेत· आणि त्या रोगांची सूज बोटानें यत्किंचित् चेपली असतां सहज खांच पडत्ये· तेव्हां अति उत्तम आहे· ज्या कालीं रोगी बळकट असून त्याचें मुख आरक्त आणि चर्म उष्ण शुष्क असें आहे· त्या कालीं याचा द्रावक गुण होत नाहीं· व जलोदराची सूज फार कठीण असून पोटाचें चर्म ताठतें· व अवयवांची सूज फार कठीण होऊन तिला बोटानें चेपली असतां खांच सहज पडत नाहीं· तेव्हां ही द्रावक गुण होत नाहीं· अशी अवस्था रक्त काढल्यानें· अथवा ढाळक व स्किल कालोमेल यांचें मेलन इत्यादिक दिल्यानें दूर झाली असतां याचा द्रावक गुण होतो· व येणेंकरून उह्मासा होऊं लागला असतां द्रावक गुण होत नाहीं: हें जलत्वक् जलोदर जलपिंजर यांजवर चांगलें आहे· व स्त्री प्रसूत झाल्यानंतर मांड्यांपासून पावलांपर्यंत पांढरी व पीडा युक्त अशी सूज कधिं येत्ये· तिजवर चांगलें आहे· व कोणी मनुष्य कांहीं कारणानें पुष्कळ पारा भक्षितो तेणेंकरून प्रकृतीस विकार होऊन कधिं जलोदरादिक होतात· त्यांवर हें नैत्रिक आसिदाशीं मिळवून दिल्हें असतां फार हित होतें· व जलोदराबरोबर अर्धांग काळिज प्लीहा इत्यादिकांचे रोग असतां हें गुणावह होत नाहीं· तसें जलमस्तकावर गुण करित नाहीं: या औषधाचे गुण असे आश्चर्यकारक आहेत· किं प्रायः लवकर होत नाहींत· प्रतिदिवशीं देतां देतां याचें सांचणें होऊन अकस्मात सर्व दिवसांचे गुण कधिं एकदांच होतात· झाल्यानंतर कांहीं अवधी पर्यंत तसेच राहातात· दुसर्यानें औषध देण्यांचें अगत्य लागत नाहीं· व येणेंकरून कधिं अन्य औषधांपेक्षां मुतणें फार अधिक होतें· व याचे द्रावक गुण जलोदरादिक असतांच होतात· सुप्रकृतिमध्यें होत नाहींत· येणेंकरून असें प्रकट होतें किं हें औषध घेतल्यानंतर शोषक वाहिन्यांची शक्ति अधिक होत्ये· नंतर गुर्दांचे वाहिन्यांची शक्ति अधिक होऊन मुताला फार होतें असें जाणावें· या विषयीं याचें औषध फाण्ट व टिंक्त्युर आहे· याचें चूर्ण द्यावयास इच्छिता

न तर उष्ण सुगंध औषधें स्किल व पार्याचीं औषधें इत्यादिकां बराबर त्याचा गोळ्या करून द्याव्या· प्रारंभकालीं तें चूर्ण एक एक ग्रेन दिवसांत दोन वेळ द्यावें· व दोन दोन अथवा तीन तीन दिवसां नंतर दिवसांत पाव पाव अथवा अर्धा अर्धा ग्रेन चढवावें· जों पर्यंत किं याचे गुण गुर्दांवर किंवा पक्काशयावर व नाडीवर अथवा आंतड्यांवर होत गुण झाल्या नंतर याचा प्रतिबंध करावा· परंतु कांहीं अवधी नंतर जलोदरादिकांची सूज दूर झाली नाहीं तर पुनः पूर्ववत् द्यावें· व प्रारंभकालीं टिंक्चुर दाहा दाहा मिनिम दिवसांत दोन वेळ द्यावें· नंतर अगत्या प्रमाणें दोन दोन दिवसांचे अंतरानें दिवसांत दोन दोन मिनिम अधिक करावें· व हें औषध घेतल्या नंतर पान फार करावें· या औषधाचा प्रतिबंध केल्या नंतर लोखंडाचें रोचक व अन्य रोचकादिक द्यावीं· व हें देत्ये वेळेस असें स्मरणांत ठेवावें· किं याचें मोटें प्रमाण मनुष्यास सहन होत नाहीं· व याचे गुण प्रति दिवशीं दिसुं येत नाहींत· शरीरामध्यें याचें सांचणें होऊन अकस्मात स्पष्ट होतात· तों पर्यंत ठाऊक नाहीं· किं याचे गुण कितके होतील व केव्हां होतील· यास्तव याचें प्रमाण फार सावकाशीनें अधिक करावें· व याचे गुण सात आठ दिवसानीं झाले नाहींत तर अनखी देऊं नये· दिल्हें असतां अजीर्ण होतें· यास्तव दुसरें द्रावक द्यावें· याचे टिंक्चुरा बराबर स्पिरिटस एथरिस नैत्रिसि द्यावें· तेणें करून उल्हासा आणि पोटांत वायू होत नाहीं· व याचे मोठ्ये प्रमाणें करून उपद्रव झाले असतां त्यांचे परिहारार्थ लादनम सुरेशीं मिळवून द्यावें· व पक्काशयाचा सुमार धरून पोटावर ब्लिस्तर मारावें· व सुगंधादिक औषधें द्यावीं.

याचीं औषधें· **ईंफ्युसम दिजिटेलिस· टिंक्चुरा दिजिटेलिस·**

टाबसी फोल्या· प्रा॰ तंबाकू·

याचे गुण दिजिटेलिसाचे गुणा प्रमाणें आहेत· परंतु तितके खचीत नाहींत· व सर्वकाल समान होत नाहींत· ह्मणोन याविषयीं देत नाहींत·

स्वेदकारी· इं॰ दैयाफोरेटिक्स·

जेहीं करून घाम निघतो त्यानां स्वेदकारी व इंग्रेजी भाषेंत दैयाफोरटिक ह्मणतात· कांहीं करून घर्म फार अल्प निघतो· चर्मावर दिसूं येत नाहीं व कांहीं करून पुष्कळ निघतो· अशीं स्वेदकारी इंग्रेजी भाषेंत दोन प्रकारचीं सांगितलीं आहेत· घर्माचा प्रतिबंध रुधिराचे मंद गमनें करून व कधिं त्याचे फार त्वरित गमनें करून होतो· अशीं त्याचे

प्रतिबंधाचीं कारणें अनेक आहेत· त्या त्या कारणाचीं परिहारक अशीं स्वेदकारी फार आहेत· घर्म निघण्यां विषयीं स्वेदकारींचे अनेक प्रकार आहेत त्यांतें सां०

१ उष्ण व मर्दन इत्यादिकें करून चर्मांचा एकसहेलंत वाहिन्या ह्मणजे घर्म वाहिन्या त्यांची क्रिया अधिक होत्ये· व पार्यांचीं औषधें व गंधक हीं घेतल्या नंतर यांचे रूपादिकांचा भेद न होतां रुधिरांत शिरून त्या बराबर घर्म वाहिन्यांप्रत जातात· तेणें करून घर्म निघतो· हा एक प्रकार·

२ शरीरास आयास करणें आम्मोन्याचीं बहुत औषधें ग्युयेसी गम्मिरेझिना· आलकोहोल व पुष्कळ उष्णोदक आंगावर घालणें येहीं करून रुधिराचें गमन अधिक होऊन घर्म निघतो· हा दुसरा प्रकार·

३ आंतिमनीचीं औषधें शीतोदक आंगावर घालणें रक्त काढणें खारट स्वेदकारी औषधें येहीं करून घर्म वाहिन्यांचिं छिद्रें मोकळीं होऊन घर्म निघतो· हा तिसरा प्रकार·

उष्ण येणें करून हृद् व धमन्या यांची क्रिया अधिक न होतां घर्म वाहिन्यांची क्रिया अधिक होऊन घर्म निघतो· या प्रमाणेंच उष्ण फार वेळेस घर्म काढितें· व येणें करून प्रायः स्वेदकारी औषधाचे गुण अधिक त्वकर होतात· परंतु ज्वराचे उष्णावस्थे मध्यें घर्म वाहिन्यांचीं छिद्रें बंद होऊन उष्णें करून किमपि घर्म निघत नाहीं· चर्म फार शुष्क होतें· त्या प्रकारें अन्य रोगा मध्यें चर्म फार उष्ण असून शुष्क असतां तेणें करून निघत नाहीं त्या विषयीं तृतीय प्रकारचीं स्वेदकारी चांगलीं आहेत·

पुष्कळ उष्णोदक आंगावर घालणें येणें करून तीन प्रकारचा स्वेदकारींचें साहाय्य होतें ह्मणजे तीं देऊन हें घातलें असतां येणें करून घर्म वाहिन्यांची क्रिया अधिक होत्ये रुधिराचें गमन अधिक त्वरित होतें· व त्या वाहिन्यांचीं छिद्रें मोकळीं होतात·

शीतोदक आंगावर घालणें हा उपचार ज्वराचे उष्णावस्थे मध्यें घाम निघाया विषयीं सर्व स्वेदकारीं मध्यें बलवंत आहे· परंतु हा उपचार फार दिवसांचा नाहीं· शीतोदक पान देणें हा उपचार फार दिवसां पासून करित आले आहेत· पक्वाशय व घर्म वाहिन्यां यांचा परस्पर कांहीं संबंध आहे· त्या संबंधें करून तो पानीय पदार्थ पक्वाशयांत गेल्या नंतर त्याचा स्वेदकारि गुण होतो· व त्या संबंधें करून आंतिमनीचीं औषधें आणि अन्य वमकांचें उह्मासा करणार प्रमाण हीं आपले गुण करितात·

आलकोहोल ग्युयक व इतर द्वितीय प्रकारचीं स्वेदकारी रुधिराचें गमन त्वरित करून आपले गुण करितात· हीं स्वेदकारी चौकशी वांचून देऊं नयेत· दिल्हीं अ-

सतां उपद्रव होतो· व ज्वरामध्यें उष्ण असतां व कांहीं स्थलांत दाहरोग असतां प्रायः देऊं नयेत·

खारट स्वेदकारी औषधें धातुपा बराबर रुधिराभिसरण स्थला प्रत जाऊन रुधिराचे गमनाचें बल किमपि अधिक न करून त्या मार्गानें घर्मवाहिन्यांप्रत जाऊन घर्म काढितात·

स्वेदकारी ज्वरावरच चांगलीं आहेत असें नाहीं· वायू फुफुसांचे रोग अतीसार संग्रहणीं पोटांतील दाह इत्यादिक रोगांवरही चांगलीं आहेत· यांचे गुण फुफ्फुसांचे रोगांवर फुफ्फुस व घर्मवाहिन्यां यांचे परस्पर संबंधें करून व अतीसारादिकांवर आंतड्यांच्या रसवाहिन्यां आणि त्या वाहिन्यां यांचे संबंधें करून होतात असें जाणावें· व अतीसारादिक रोग शीतें करून घर्माचा अकस्मात प्रतिबंध झाला असतां प्रायः होतात· तशीं कुष्ठ दद्रु इत्यादिक चर्माचे रोगांवरही चांगलीं आहेत· दिल्या नंतर रुधिरांत शिरून त्या बराबर रोग स्थला प्रत जाऊन गुणावह होतात· व हीं पूर्वकालीं जलोदरादिकांवर देत असत सांप्रत कालीं देत नाहींत·

घर्मामध्यें शरीराचे जो अनुपयोगी पदार्थ आहे तो निघतो· घर्म नीट निघाला नसतां तो पदार्थ निघत नाहीं· तेणें करून अश्मरी व इतर मूत्रसंबंधी रोग होतात·

स्वेदकारींचा परस्पर मेलनें करून गुण अधिक होतात ते पुढें लिहिले होतील· ज्या वेळेस स्वेदकारी देतात त्या वेळेस उष्णोदक पान व उष्ण वस्त्र पांघरायास द्यावें· याविषयीं सर्व उष्ण वस्त्रांमध्यें उर्णा वस्त्र उत्तम आहे· याचें कारण तेणें करून उष्ण सर्वकाल समान राहातें· व घर्म निघतो त्याचें शोषण होतें· यास्तव शीत लागत नाहीं· व घर्म पुष्कळ निघत असतां फार थंड पाणीं पिऊन अथवा फार शीतळ वायूमध्यें बसून त्याचा प्रतिबंध अकस्मात करूं नये· स्वेदकारी औषधें धातूचीं व वनस्पतिचीं आहेत· त्यांचीं नावें सांगतो·

लैकोर आसीटेटिस् आम्मोन्ये· दुस० स्पिरिटस् मिंदूरेरी·
सैत्रास आम्मोन्ये· इं० सालैनमिक्स्त्युर·
आम्मोन्येसबूकार्बोनास·
लैकोरसबूकार्बोनाटिस आम्मोन्ये·
हैड्रार्जरीसबूस्म्युर्यास· इं० कालोमेल·
हैड्रार्जरीसल्स्युरीटम् नैग्रम्· इं० इथ्योप्समिनिरल·
आंतिमोनीई

आंतिमोनीईसल्फ्युरीटमप्रीसिपिटेटम·
आंतिमोन्यमटार्टारीझेटम· इं॰ टार्टरइमेटिक·
वैनमआंतिमोनीईटार्टारीझेटी·
पल्विस् आंतिमोन्येलिस्· इं॰ जेमसस् पोदर्·
सल्फर· प्रा॰ गंधक·
ओप्यम· प्रा॰ अफु·
काम्फोरा· प्रा॰ कापुर·
ग्युयेसीगम्मीरेझिना·
मिझेर्यीकोर्टेक्स·
सास्साफ्रासलिग्नम् एटरेदिक्स·

या प्रकारें सर्व स्वेदकारींचें साधारण वर्णन केलें· आतां एका एकाचें पृथक् विशेष वर्णन करितो·

लैकोरआसीटेटिस् आम्मोन्ये

याच्याउत्पत्ति प्रकार धातु औषधोत्पत्ति प्रकारामध्यें लिहिला आहे· हें बलवंत नाहीं· परंतु नीट योजना करून दिल्हें असतां बलवंत होतें· येणेंकरून रुधिराचें गमन अधिक त्वरित होत नाहीं· ह्मणोन याला ज्वराचे उष्णावस्थेमध्यें देतात· तसें दाह व ज्वर सहित वायू इत्यादिक रोगांवर देतात· हें लादनमाशीं अथवा आन्तिमनीचे औषधाशीं मिळवून दिल्हें असतां याचे गुण अधिक होतात· याचीं प्रमाणादिक धातु औषधोत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत·

सैत्रास आम्मोन्ये·

लिंबूचा रस अर्ध औंस घेऊन अल्प पाण्याशीं मिळवावा· व अन्य पाण्यामध्यें पोटास्सेकार्बोनास एक स्कुपल विरघळावें· नंतर दोहोंचें मेलन करून तत्क्षणीं प्यालें असतां वमनाच्या प्रतिबंध होतो· व कांहीं घर्म निघतो· या मेलनाला इंग्रेजी भाषेंत एफेर्वसिंगड्राफ्स ह्मणतात· तसा लिंबूचा रस दोन औंस घेऊन चार औंस पाण्याशीं मिळवून त्यामध्यें वाजत नाहींसें होई तों पर्यंत पोटास्सेकार्बोनास घालून मेलन करावें· त्याला सालेनमिक्स्चुर ह्मणतात· पोटास्सेकार्बोनासाचे ऐवजीं आम्मोन्येसब्कार्बोनास घा-

ळून मेलन केलें असतां त्यालाही सालेन मिक्स्त्युर व लतीन भाषेंत सैचास आम्मोन्ये ह्मणतात· हें सालेन मिक्स्त्युर फार बलवंत नाहीं· याचें गुण अधिक व्हावयासाठीं आन्तिमनीचीं औषधें व लादनम इत्यादिकांशीं याचें मेलन करावें· याचें प्रमाण एक दोन औंस आहे तें दिवसांत बहुत वेळ द्यावें· पूर्व औषधाचे ठायीं उक्त जे रोग त्यांवर यालाही देतात·

आम्मोन्येसब्कार्बोनास·

याचा उत्पत्ति प्रकार व याचे गुण प्रमाण इत्यादिक धातु औषधोत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत·

लैक्वोरसब्कार्बोनटिस् आम्मोन्ये·

याचा उत्पत्ति प्रकार व प्रमाण इत्यादिक धातु औषधोत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत· व याचे गुण पूर्व औषधाचे गुणां प्रमाणें आहेत·

हैड्रार्जरीसब्स्युर्यास·

याविषयीं याला अफु अथवा ग्युयक इत्यादिकांशीं मिळवून वायूवर व चर्माचे बहुत रोगांवर देतात· याचें प्रमाण अगत्या सारिखें आहे·

हैड्रार्जरीसल्फ्युरीटम्नेग्रम·

याविषयीं हें चर्माचे रोग इत्यादिकांवर कधिं देतात· परंतु याचे गुण खचीत नाहींत व प्रायः देतही नाहींत· याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत आहे: तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

आन्तिमोनीईसल्फ्युरेटम्प्रीसिपिटेटम्·

याचा उत्पत्ति प्रकार गुण व प्रमाण इत्यादिक धातु औषधोत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत·

आन्तिमोन्यमटार्टारीझेटम·

याविषयीं याचें प्रमाण ग्रेनाचे आठव्ये भागां पासून पाव ग्रेन पर्यंत आहे· याला

ग्राय:

प्राय:खालचे औषधें करून देतात·

वैनम आंतिमोनी ईटार्टारीझेटी·

या विषयीं हें आंतिमनीचे सर्व औषधां पेक्षां चांगलें आहे· याचें प्रमाण दाहा मिनिमां पासून एक ड्राम पर्यंत आहे· याचे गुण सहज आणि खचित होतात· व अफु इत्यादिक औषधांच्या मेलनें करून अधिक होतात·

पल्विस् आंतिमोन्येलिस्·

याच्या उत्पत्ति प्रकार इत्यादिक धातु औषधोत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत

सल्फर· प्रा॰ गंधक·

हा दिल्या नंतर घर्म निघतो· त्याला याचा गंध येतो· व शरीरांवर रुप्याचे पदार्थ असले तर ते काळे होतात· तेणें करून प्रसिद्ध होतें कीं घर्म वाहिन्यां मधून घर्मा बराबर हा निघतो· याला चर्माचे रोग व वायू इत्यादिकांवर देतात· प्रमाण एक ड्रामा पासून तीन ड्राम पर्यंत आहे·

ओप्यम· प्रा॰ अफु·

या औषधाचे मोठ्या प्रमाणें करून घर्म कधिं पुष्कळ निघतो· परंतु तें एकलें दिल्हें असतां मदकारी गुण ही होतो· तो कधिं अनिष्ट आहे· यास्तव प्राय: एकलें देऊं नये· आंतिमनीचे औषधाशीं अथवा ईपिकाक्यु अनाशीं मिळवून द्यावें· तेणें करून अफुचा मदकारी गुण न्यून होतो· व अफुच्या योगानें त्या औषधें करून उलटी न्यून होते· या मेलनें करून स्वेदकारी गुण सर्व इतर स्वेदकारींचे गुणां पेक्षां बलवंत आणि खचीत होतात· या विषयीं आंतिमनीचे औषधां मधून वैनम् आंतिमनी ईटार्टारीझेटी चांगलें आहे· तें पंधरा अथवा वीस मिनिम घेऊन त्याशीं तितकें लादनम मिळवून, एक औंस सुगंध पाण्यांत घालून द्यावें· या मेलना पेक्षां अफुचें ईपिकाक्यु अनाशीं मेलन करावें तें उत्कृष्ट बलवंत आहे· त्याचें नाम लतीन भाषेंत पल्विस् ईपिकाक्यु अन्ने कोम्पोसिटस व इंग्रेजी भाषेंत दोंमर्सपौडर आहे· त्याची सिद्ध करावयाची कृति व प्रमाण इत्यादिक वनस्पति औषधोत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत· त्याचे पाहिल्या मानें करून

घर्म निघाला नाहीं तर अडीच घटिकां नंतर पुनः पांच अथवा सात ग्रेन द्यावें· कदाचित् तेणें करून ही निघाला नाहीं तर अनखी विभाग द्यावा· तें लागू पडल्या नंतर बहुत करून घर्म पुष्कळ निघून कांहीं घटिकां पर्यंत निघत असतो· कोणी रोगावर उत्तम बलवंत स्वेदकारी द्यावयास इच्छितात तर तें चांगलें आहे· व जा रोगावर नुस्ती अफु द्यावयास नीट नाहीं त्यावर तें चांगलें आहे· व अफु करून जितकें पोट फुगतें तितकें तेणें करून फुगत नाहीं·

काम्फोरा· प्रा॰ कापुर·

याविषयीं याला वायू ज्वराची उष्णावस्था देवी इत्यादिक रोगांवर देतात· याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून पंधरा ग्रेन पर्यंत आहे· हा एकला दिल्हा असतां याचे गुण खचीत होतात· असें नाहीं· यास्तव प्रायः याचें मिश्रण सोरा अफु आंतिमनीचीं औषधें इत्यादिकांशीं मिळवून द्यावें·

ग्युयेसी गम्मीरेझिना·

हें औषध या देशाचें नाहीं· अन्य देशामध्यें वृक्ष विशेष आहेत· त्यांचे कांड्याला छिद्रें केल्या नंतर त्यांमधून पातळ चीक निघून सूर्याचे उष्णानें शुष्क होतो· अथवा त्या वृक्षाचें लांब काष्ठ घेऊन त्याचे लांबीवर लांब छिद्र करून त्याचा एक शेवट अग्निवर ठेवतात· नंतर अग्नि संतापें करून त्यांतील चीक पातळ होऊन त्या छिद्रा वाटे वाहून पात्रांत येऊन जमतो· याचा रंग कांहीं धूसर हिरवासा आहे· राळे प्रमाणें दिसतो· गंध वाईट नाहीं स्वाद तिखट कडुसा आहे· या विषयीं याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत आहे· अथवा पंधरा पंधरा ग्रेन दिवसांत तीन वेळ द्यावें· हें उत्तम स्वेदकारी आहे· कधि क्रोनिक वायूवर देतात· व याला प्रायः अफुचें अथवा आंतिमनीचे औषधाशीं मिळवून देतात· तेणें करून स्वेदकारी गुण अधिक होतात· याच्या गोळ्या किंवा टिंक्चुर अथवा मिश्रण देतात· व टिंक्चुरा ग्युयेसी आम्मोन्येटा हें याचे अन्य टिंक्चुरापेक्षां चांगलें आहे· व प्रायः हेंच देतात· जा जा औषधामध्यें ग्युयेक आहे त्या त्या औषधाचा रंग प्रतिदिवशीं भिन्न भिन्न होतो· व ग्युयेकाचें स्पिरिटस् एथरिस् नैत्रिसिशीं मेलन केलें असतां त्याचा रंग विशेषें करून भिन्न भिन्न होतो· याचें मोटें प्रमाण दिल्हें असतां रेच होतात· व ग्युयकाचे काष्ठाचें पाचन व जामध्यें तें आहे असें सासीपारिल्लाचें मिश्रित पाचन उपदंशावर व

इतर रोगांवर चांगलें आहे· अंत्य पाचनाचें प्रमाण इत्यादिक त्याचे उत्पत्ति प्रकारावरउक्त आहेत व त्या रोगावर कधिं नुस्तें ग्युयेसी गम्मीरेझिना ही देतात·

याचीं औषधें· मिस्त्युराग्युयेसी· टिंक्त्युराग्युयेसी· टिंक्त्युराग्युयेसीआम्मोन्येटा· दीकोक्टम सार्सा पारिल्ले कोम्पोसिटम· पल्विस् आलोएस् कोम्पोसिटस्·

मिझेर्यी कोर्टेक्स· व सास्साफ्रासलिग्नम एटरेदिकूस·

हीं औषधें या देशाचीं नाहींत अन्य देशापासून आणितात· हीं एकलींच देत नाहींत· सार्सा पारिल्लाचे मिश्रित पाचनामध्यें घालतात·

कफघ्न· इंग्रेजी· इक्स्पेक्करंत्स·

ज्या औषधें करून कांठांतील व फुप्फुसांचे श्वासाशयांतील आणि फुप्फुसांचे मार्गांतील कफाचा नाश सहज होतो· त्या औषधांनां कफघ्न व इंग्रेजी भाषेंत इक्स्पेक्करंत ह्मणतात· हीं औषधें अनेक प्रकारचीं आहेत·

१ ब्लिस्तर मारणें रक्त काढणें उल्हासा करणार औषध देणें येहीं करून फुप्फुसांचे एक्सहेलंत वाहिन्यांचीं ह्मणजे कफवाहिन्यांचीं छिद्रें मोकळीं होऊन फुप्फुसांतील पदार्थ अधिक उत्पन्न होऊन श्वासाशयांतला कफ पातळ होतो हा एक प्रकार·

२ लसुन सिल्लेरेदिकूस बोळ आमोन्यकम बाल्समम् पीरुव्येनम् बाल्समम् टोल्युटेनम् हिंग हीं घेतल्यानंतर यांचें शोषक वाहिन्यांनीं शोषण होऊन रुधिरवाहिन्यांत शिरून कफवाहिन्यांप्रत येऊन त्यांचें बल अधिक करून कफाला स्वस्थानापासून ओढून बाहेर काढितात· हा द्वितीय प्रकार·

३ पदार्थांची वाफ घेणें गोंद पाक इत्यादिकांचें सेवन करणें येहीं करून कफ पिकून बाहेर निघतो· हा तिसरा प्रकार·

४ जिन्सीसल्फास व कडु रोचक येहीं करून कफवाहिन्यांनां शक्ति येऊन त्याचे अशक्तिपण्यामुळें झालेला कफ दूर होतो व नवा उत्पन्न होत नाहीं· हा चवथा प्रकार·

५ दिजिटेलिस फोल्या तंबाकु येहीं करून शोषक वाहिन्यांची शक्ति अधिक होऊन त्या कफाला जागचे जागीं शोषितात· हा पांचवा प्रकार·

६ ईपिकाक्यु अन्ने पल्विस् इत्यादिक नम्म स्वेदकारि औषधें येहीं करून घर्म निघून फुफ्फुसांतील कफादिक पदार्थ न्यून होतात· हा साहावा प्रकार·

७ रवारट ढाळकें करून पातळ रेच होऊन फुफ्फुसांतील कफादिक न्यून होतात· हा सातवा प्रकार·

८ आंमोन्याचे औषधें करून श्वासोश्वास करण्याचे स्नायुंची शक्ति अधिक होऊन तोंडावाटे कफ बाहेर निघतो· हा आठवा प्रकार·

९ वमकें करून वमन होऊन फुफ्फुसांतील पदार्थांचें चेपणें होऊन कफ बाहेर पडतो· हा नववा प्रकार·

१ कांहीं रोगांमध्यें जशीं घर्म वाहिन्यांचीं छिद्रें बंद होतात· तशीं फुफ्फुस दाह दमा व त्यांचे इतर रोग यांमध्यें कफ वाहिन्यांचीं छिद्रें बंद होतात· तीं मोकळीं व्हावयासाठीं ईपिकाक्यु अन्न व टार्टर इमेटिक यांचें उल्हासा करणार प्रमाण चांगलें आहे· तेणें करून त्या दोहों प्रकारचे वाहिन्यांचीं छिद्रें मोकळीं होतात· या प्रमाणें ब्लिस्तर व रक्तस्राव इत्यादिक उपचारें करून ही मोकळीं होतात·

२ लसुन वाटून पायांवर लाविला असतां कांहीं अवधीनंतर श्वासाला त्याचा गंध येतो· येणें करून असें प्रसिद्ध होतें कीं या प्रकारचीं औषधें शोषक वाहिन्यांनीं शोषित होऊन कफ वाहिन्यां प्रत जाऊन त्यांची शक्ति अधिक करतात· तेणें करून कफ स्वस्थानापासून सुटून बाहेर पडतो·

३ या प्रकारचे औषधांचें विशेष वर्णन वाफेचे वर्णनामध्यें लिहिलें होईल·

४ वृद्धपण्यानें अथवा रोगें करून कफ वाहिन्यांचा निर्बलपणा होऊन अगत्यापेक्षां कफ अधिक उत्पन्न होतो· ही अवस्था वृद्ध मनुष्यांचे खोकल्यामध्यें व दम्याचे एक प्रकारामध्यें होत्ये· या विषयीं जिन्सी सल्फासादिक चवथ्ये प्रकारचीं औषधें चांगलीं आहेत येहीं करून सर्व शरीराचा किंवा त्या वाहिन्यांचा निर्बलपणा दूर होऊन अधिक कफ उत्पन्न होत नाहीं व अधिक उत्पन्न झालेल्या कफाचा नाश सहज होतो· या विषयीं द्वितीय प्रकारचे औषधांमधून बहुत औषधेंही कामांचीं आहेत·

५ कफाचा अधिकपणा सर्वकाल कफ वाहिन्यांनींच होतो असें नाहीं शोषक वाहिन्यांचा निर्बलपणा झाला असतांही होतो· त्या विषयीं या प्रकारचीं दिजिटेलिस फोल्यादिक औषधें चांगलीं आहेत· येहीं करून त्या वाहिन्यानां बल येऊन कफाचें शोषण होतें·

६ शीतकालीं मुताला फार होऊन घर्म न्यून निघतो· व उष्णकालीं घर्म पुष्कळ निघून

मुताला

सुताला न्यून होतें· येणें करून असें प्रसिद्ध होतें किं शरीरांत एकरस अधिक उत्पन्न झाला असतां दुसरा रस न्यून होतो· यास्तव स्वेदकारि औषधें ईपिकाक्युअन्हे पल्विस इत्यादिक दिल्हीं असतां घर्म अधिक उत्पन्न होऊन फुप्फुसांतील कफ न्यून होतो· दम्यावर स्वेदकारिं मधून दोमर्सपोदर दिल्हें असतां फार हित होतें·

७ त्या प्रकारें खारट ढाळकें दिल्हीं असतां आंतड्यांतील पातळ रस अधिक निघून फुप्फुसांतील कफ न्यून होतो· कफवाहिन्यांचीं छिद्रें मोकळीं नसलीं तर अशा औषधें करून उपद्रव होतील ह्मणजे ती अवस्था अधिक होऊन कफ निघायाचें विघ्न होईल·

८ कांहीं कारणें करून बलाच्या न्यूनपणा होऊन रोग्याला खोकून कफ काढायाची शक्ति नाहींशी होत्ये· त्यासमयीं या प्रकारचीं औषधें चांगलीं आहेत·

९ कांहीं रोगामध्यें फुप्फुसांत कफाचें सांचणें होऊन काळजी फार लागत्ये· त्यासमयीं वमकें चांगलीं आहेत· परंतु तारतम्यानें दिल्हीं पाहिजेत· नाहीं तर कांहीं अवस्थेमध्यें तेहीं करून उपद्रव होईल· वजीं कफ काढायास साहाय्य होतात अशीं अन्य औषधें मृदुकरांमध्यें लिहिलीं होतील· पूर्वोक्त औषधांमधून कांहीं औषधें अवस्थाविशेषें करून विरुद्ध होतात· यास्तव रोग तारतम्य पाहून औषधें योजावीं· कफघ्नाचीं नावें सांगतो·

आन्तिमोन्यम टार्टारिझेटम·
ईपिकाक्युअन्हे पल्विस·
दिजिटेलिस् फोल्या·
टाबसी फोल्या· प्रा॰ तंबाकु·
सिल्लेरेदिंक्स·
आल्लिईरेदिक्स· प्रा॰ लसुन·
आम्मोन्यकम·
मिरा· प्रा॰ बोळ·
बालसमम् पीरुव्येनम·
बालसमम् टोल्युटेनम·

या प्रकारें सर्व कफघ्नांचें साधारण वर्णन केलें· आतां क्रमें करून एका एकाचें पृथक् विशेष वर्णन करतो·

आन्तिमोन्यम टार्टारीझेटम·

या विषयीं याचें औषध वेनम आन्तिमोनीई टार्टारीझेटी पातळ पदार्थांशीं मिळवून द्यावयास चांगलें आहे· त्याचें प्रमाण दाहा मिनिमां पासून अर्ध द्राम पर्यंत आहे· शुष्क पदार्थां बराबर ग्रेनाच्या अष्टमांश द्यावें· फुप्फुस दाहें करून कफ वाहिन्यांचीं छिद्रें बंद होतात· तीं मोकळीं व्हावयासाठीं हें औषध कामाचें आहे· तीं मोकळीं झाल्यानंतर कफ बाहेर निघतो· फुप्फुस दाह व दमा आणि पडसें यांचे कांहीं प्रकार व तसे रोग यांवर याचें प्रमाण साहा आठ घटिकांचे अंतरानें द्यावें· व याला स्किल व इतर कफघ्न यांचे साहाय्यासाठीं त्यांशीं मिळवून देतात·

ईपिकाक्यु अन्नेपल्विस·

याचे कफघ्न गुण पूर्व औषधाचे कफघ्न गुणां सारिखे आहेत· याचें प्रमाण पाच ग्रेना पासून तीस ग्रेन पर्यंत आहे· इतकें प्रमाण फार दिवसांचे दम्यावर देतात· व फुप्फुसांचे कांहीं रोगावर याचें औषध दोमर्स पोदर ही देतात·

दिजिटेलिस फोल्या·

दम्याचा एक प्रकार व जराकास इत्यादिक रोगांमध्यें फुप्फुसांतील शोषक वाहिन्यांची शोषण शक्ति न्यून होऊन त्या स्थलीं कफाचें सांचणें होतें· तेव्हां त्यांची शोषण शक्ति अधिक व्हावयासाठीं हें औषध द्यावें· तेणें करून कांहीं कफाचें शोषण होऊन राहालेला कफ सहज बाहेर निघतो· व श्वासोश्वासं मोकळे होतात· या विषयीं याचें प्रमाण अल्प द्यावें· फार अधिक करूं नये· ह्मणजे दिवसांत चूर्ण एक ग्रेन टिंक्युर दाहा मिनिम फाण्ट अर्ध औंस होई इतकें द्यावें· त्यापेक्षां अधिक देऊं नये·

टाबसी फोल्या· प्रा· तंबाकु·

याचे गुण पूर्व औषधाचे गुणा सारिखे आहेत· परंतु तितके चांगले नाहींत· यास्तव या विषयीं देत नाहींत·

सिल्लेपल्विस·

हें द्रावकामध्यें लिहिलें आहे· व याविषयीं उत्तम आहे· फुप्फुसांत कफाचें सांच[illegible]

झा[illegible]

झालें असतां हें चांगलें आहे· येणें करून कफवाहिन्या व शोषक वाहिन्यां यांची शक्ति अधिक होत्ये· फुफ्फुस दाहामध्यें कफवाहिन्यांचीं छिद्रें मोकळीं होत तों पर्यंत हें औषध देऊं नये· दिल्हें असतां उपद्रव होतात· ती अवस्था दूर झाल्या नंतर हें कामाचें आहे· या विषयीं याचें सिर्क औषध याचे अन्य औषधांपेक्षां चांगलें आहे· त्याचें प्रमाण अर्ध ड्राम आहे तें दिवसांत बहुत वेळ द्यावें· व याच्या गोळ्या ही या विषयीं चांगल्या आहेत· त्यांचें प्रमाण पांच ग्रेन अथवा दाहा ग्रेन आहे तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· सिर्क प्रायः पाकाशीं किंवा मृदुकर औषधाशीं अथवा त्यांचे मेलनाशीं मिळवून द्यावें हें त्या औषधांमध्यें लिहिलें होईल·

या विषयीं याचीं औषधें· **आसीटम सिल्ले· पिल्युले सिल्ले कोम्पोसिटे·**

आल्लिई रेदिक्स· प्रा॰ लसुन·

याचे गुण पूर्व औषधाचे गुणां सारिखे आहेत· परंतु तितके चांगले नाहींत· या विषयीं याला कुटून दोन तीन दिवस पर्यंत सिर्कामध्यें घालावा नंतर साखर मिळवून द्यावा·

आम्मोन्यकम· मु॰ ओषक·

हें औषध या देशांत नाहीं· फारसिस्थानां पासून आणितात· तेथें एक वृक्ष विशेष आहे· त्याचे कांड्याला छिद्र करून त्यामधून चिक निघतो· तो सूर्याचे किरणें करून व वायूचे योगें करून जमतो· याचे खडे लाहान वर्तुल आहेत· याचा रंग बाहेरल्ये आंगा पिंवळासा व आंत पांढरा आहे· व हा कठीण आहे उष्ण केला असतां मृदु आणि चिकट होतो· पातळ होत नाहीं याला गंध अल्प आहे तो फार वाईट नाहीं स्वाद कडु गोडसा आहे· पाणीं सिर्क इत्यादिकांमध्यें याचा कांहीं अंश विरघळतो· दाहाचीं लक्षणें नसतां हा उत्तम् कफघ्न आहे· याला हिंग सिल्ले पल्विस टार्टर इमेटिक ईपिकाक्यु अन यांबरोबर पाण्याशीं मिळवून किंवा याचा गोळ्या करून देतात· याचें प्रमाण इत्यादिक याचे मिश्रणांवर लिहिलें आहे·

या विषयीं याचें औषध· **मिस्त्युरा आम्मोन्यासि·** व शोथनाश विषयीं **एम्लास्त्रम् आम्मोन्यासि· एम्लास्त्रम् आम्मोन्यासि कम् हैड्रार्जीरो·**

मिर्रा· प्रा॰ बोळ·

हा या देशांत नाहीं· आरबस्थानां पासून आणितात· याचे खडे टणक पिंवळे तांबडेसे आहेत· याचा गंध चांगला स्वाद कडु तिखटसा आहे· याचे गुण ओषकाचे गुणां सारिखे आहेत· ह्मणजे दाहाचीं लक्षणें नसतां हा द्यावा· तीं असलीं तर उपद्रव होतो· याला दमा व फार दिवसांचें पडसें यांवर द्यावा· व कधिं क्षय रोगांमध्येंही द्यावा· याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत आहे· तें प्रमाण दिजिटेलिस व अफु इत्यादिकां बराबर द्यावें·

बाल्समम् पीरुव्येनम· व बाल्समम् टोल्युटेनम·

हीं दोन्हीं औषधें अमेरिका देशा पासून या देशांत आणितात· दाहाचें लक्षण नसतां हीं मृदुकर औषधांशीं मिळवून दमा पडसें खोखला इत्यादिकांवर द्यावीं·

लालास्रावी· इं॰ सियालोगोग्स·

जा औषधें करून लाळ अधिक उत्पन्न होऊन निघत्ये· त्यानां लालास्रावी ह्मणतात· त्यांचे प्रकार दोंन आहेत· सुंठ तंबाकु इत्यादिक औषधें तोडांत धरलीं असतां लाला वाहिन्यांची क्रिया अधिक होऊन लाळ अधिक उत्पन्न होत्ये· हे पदार्थ प्रायः तिखट आणि उग्र आहेत· हा एक प्रकार·

पार्याचीं औषधें पोटांत घेतल्या नंतर रुधिर वाहिन्यांत प्रविष्ट होऊन लाळ अधिक उत्पन्न करतात· हा दुसरा प्रकार·

पहिल्ये प्रकारचीं औषधें चावलीं असतां दंतांची पीडा व मस्तकांतली पीडा कधिं दूर होत्ये· व जाकाळीं जिव्हेची चलन वलन शक्ति व गळसंबंधी स्नायूंची शक्ति न्यून होत्ये· त्याकाळीं यांचेच वर्णानें कधिं हित होतें· अमिश्रित स्वच्छ पारा भक्षिला असतां त्याचे परिणाम कांहीं होत नाहींत· त्याचे औषधें करून होतात· येणें करून लालास्राव करणें हें रोगांस कांहीं हित नाहीं· परंतु तेणें करून पार्याचे गुण होतात हें प्रगट होतें· लालास्रावींचीं नावें सांगतों·

पेरिथ्रीरेदिक्स· प्रा॰ अकलकरा·

आर्मोरेस्येरेदिक्स·

जिंजिबरीसरेदिकुस· प्रा॰ सुंठ·
टाबसी फोल्या· प्रा॰ तंबाकु·
पार्याचीं औषधें·

या प्रकारें यांचें साधारण वर्णन केलें आतां विशेष वर्णन करतो·

पेरिथीरेदिकुस· प्रा॰ अकलकरा·

हें औषध अन्य देशा पासून या देशांत आणितात· याचा स्वाद तिखट उग्रसा आहे· याला पूर्वोक्त कार्यां विषयीं देतात· व हें अर्ध औंस घेऊन एक पैंट पाण्यांत घालून अर्धें राही तों पर्यंत उकळवून त्यामध्यें दोन औंस लेक्कोर आम्मोन्ये घालून त्याचा गुळण्यां प्रति- जिव्हेचे आणि टाळ्याचे सुजेवर चांगल्या आहेत·

आर्मोरेश्येरेदिकुस·

हें मूळ आहे· परंतु या देशांत नाहीं· याचे ऐवजीं शेगव्याचें मूळ चांगलें आहे· लाळस्रावा विषयीं याला पूर्वोक्ता प्रमाणें देतात· व पोटांत उष्ण व्हावयासाठीं कधिं देतात· याचें प्रमाण अर्धद्राम किंवा एक द्राम आहे·

याचीं औषधें· **ईन्फ्युसम आर्मोरेश्ये कोम्पोसिटम· स्पिरिटस् आर्मोरेश्ये- कोम्पोसिटस्·**

सुंठ·

ही अन्य औषधां प्रमाणें दंत पीडा न्यून व्हावयासाठीं देतात·

तंबाकु·

हा तोंडांत धरल्यानें किंवा ओढल्यानें लाळ अधिक उत्पन्न होत्ये· याचे या गुणें करून किंवा मदकारि गुणें करून दंत व कर्ण यांची पीडा न्यून व्हावयासाठीं याला कधिं देतात·

पार्याचे औषधें करून शरीरांतील रसाची आणि विशेषें करून लाळेची उत्पत्ति अधिक होत्ये· व त्यावेळेस प्रायः तोंडांत सूज येत्ये म्हणजे जिव्हा हिरड्या गळा इत्यादिक सुजतात· दंत हालूं लागतात· व तोंडांत गर्मी फार होत्ये· व कधिं व्रण होतात· व पार्या

चे परिणाम कधिं असे फार होतात किं तोडांतलें मांस सडतें लाळ फार दाट होत्ये· व कुगंध फार येतो व तोंड आल्या पूर्वीं हिरड्या तांबड्या होऊन सुजतात श्वासाला कुगंध येऊं लागतो· तोंड कणकल्या सारिखें होतें· नंतर पूर्वोक्त लक्षणें होतात· तीं फार झालीं असतां या प्रमाणें उपचार करावे· ह्मणजे कोष्ठबंधकाचा गुळण्यां द्याव्या· बाहेर सुजेवर लोहितकर औषधाचें मर्दन करावें· पोटाची मुक्तता करायासाठीं ढाळक द्यावें· सूज आणि पीडा फारच असली तर गुळण्यांचे औषधांत लादनम घालावें· अथवा एक ड्राम लादनम घेऊन एक औंस पाण्यांत घालून त्याचा गुळण्यां द्याव्या· रात्रीस निद्रा यावयासाठीं मदकारींचें प्रमाण द्यावें· व मोठें अगत्य असलें तर शोथनाशा विषयीं ब्लिस्तर मारावें· तोंडांत पीडा आणि व्रण फार असले तर प्लुंबी आसिटासाचा गुळण्यां द्याव्या·

नस्य· इंग्रेजी· एरैन्स·

जा औषधें करून नासिकेपासून शेंबुड किंवा पाणीं निघून नासिका मोंकळी होत्ये· त्या औषधांना नस्य ह्मणतात· हीं औषधें प्रायः तीक्ष्ण आहेत· आणि नासिकेंत घातलीं असतां आपलें कार्य करतात· कांहीं हीं चूर्ण नासिकेंत घातल्यानें हे परिणाम होतात· परंतु उग्र पदार्थांचे परिणाम इतके होत नाहींत· वेगळ्ये वेगळ्ये औषधें करून वेगळे वेगळे स्राव होतात· ह्मणजे कांहीं एकें करून स्राव फार होऊन कांहीं अवधि पर्यंत होतो· व अन्यें करून थोडा आणि लाहान अवधि पर्यंत व लाल असा होतो· व कांहीं करून उष्ण होतो· व कांहीं करून नासिकांतील त्वचेचा दाह होतो· तपकिलें करून किंवा तशा पदार्थें करून नासिकेपासून शेंबुड फार येत असला तर त्याचा अकस्मात प्रतिबंध करूं नये· केला असतां उपद्रव होईल तंबाकूचीं इतर पदार्थांचें मेलन केलें असतां तपकिलीचे अनेक प्रकार होतात· दुसरे पदार्थ मर्वा व मु॰ असारुन इत्यादिक आहेत· शेराचा चीक सर्वांपेक्षां उग्र आहे· यास्तव त्याला एकल्यालाच देत नाहींत· कारण तेणेंकरून नासिकेंत सूज आणि पीडा फार होत्ये· व तीमधून रुधिर निघतें· इत्यादिक उपद्रव होतात· त्याला कणिकेशीं मिळवून नासिकेंत घातला असतां तितके वाईट परिणाम होत नाहींत·

स्फोटकारी व लोहितकर·

जा औषधें करून स्फोट येतो त्यानां स्फोटकारी व इंग्रेजी भाषेंत एपिस्पास्तिक किं-

वा ब्लिस्तर व जेहीं करून चर्म आरक्त होतें त्यांनां लोहितकर व त्या भाषेंत रुबीफेश्यन्त ह्मणतात लोहितकरांपेक्षां स्फोटकारी बलवंत आहेत· स्फोटकारी चर्मावर लावल्यानंतर प्रथम त्याचे रक्तवाहिन्यांची क्रिया अधिक होत्ये नंतर तेणेंकरून त्या स्थलीं दाह होऊन त्याचे एक्सहेलंत वाहिन्यांपासून पातळ पदार्थ उत्पन्न होऊन क्युटिकल त्वचेचे खालती येतो· तेणेंकरून ती त्वचा चर्मापासून पृथक् होऊन स्फोट होतो· व या औषधें करून या वाहिन्यांपासून पूही उत्पन्न होतो· लोहितकर लावल्यानंतर चर्माचा दाह मात्र होतो· पातळ पदार्थ व पू उत्पन्न होत नाहीं· स्फोटकारी करून वेगळें वेगळें हित होतें· ह्मणजे:

१ शरीरांतील कांहीं स्थलांचा दाह झाला असतां त्या स्थलाचे सुमारानें बाहेर कांहीं एक स्फोटकारी लावल्यानें दाह स्थलाचे रक्तवाहिन्यांचे रक्ताचा अधिकपणा स्फोटकारी स्थलाप्रत येऊन त्यां स्थलींचा रोग न्यून होतो हा एक प्रकार·

२ रुधिरापासून पातळ पाण्यां सारिखा पदार्थ पृथक् होतो· नंतर स्फोट होतो· त्याला वनस्पति औषधोत्पत्ति मध्यें ब्लिस्तरिंग प्लास्तरावर उक्त जे उपचार ते झाले नसतां त्यांत पू उत्पन्न होतो·

३ येणें करून रुधिराभिसरणाचें बल अधिक होतें· यास्तव हें ज्वरादि रोगांवर फार कामाचें आहे· व मस्तकांत रोग होऊन प्रलापादिक होत असतां विशेष कामाचें आहे· येणेंकरून शरीराचें बल कांहीं न्यून न होऊन रोग न्यून होतो·

४ याचा पीडे करून इतर स्थलींची पीडा न्यून होत्ये· ह्मणजे कोणाला दंतपीडा होत असतां तिचे सुमारानें बाहेरल्या स्थलावर स्फोटकारी लावल्यानें ती न्यून होत्ये· व येणें करून फेंफरें इत्यादिक रोग कधिं दूर होतात· व पक्षवायूवर कामाचें आहे·

फुफ्फुस दाह व मस्तकाचे रोग इत्यादिक रोगांचें बल अन्य उपचारें करून न्यून केल्यावांचून स्फोटकारी लावलें असतां उपद्रव होतो·

लोहितकर औषधांचे गुण स्फोटकारींचे गुणां प्रमाणें आहेत· परंतु तितके बलवंत नाहींत· जेहीं करून पीडा आणि दाह हे अल्प होतात· पातळ पदार्थ उत्पन्न होत नाहीं· व स्फोटही होत नाहीं· यास्तव त्यांनां मंद रोगावर लावितात·

पोंत व त्या सारिखे अन्य उपचार त्यांचे गुण या औषधां सारिखे आहेत· परंतु ते गुण सांवकाशीनें होतात· आणि बहुत दिवस राहातात· यास्तव ते उपचार फार दिवसांचे रोगांवर करतात·

स्फोटकारी व लोहितकर याचीं नावें सांगतो·

कांथारिदेस·
सिनेपिससेमिना·प्रा० मोहर्या·
आल्लीईरेदिक्स·प्रा० लसुन·
युफोर्बीयेगम्मीरेझिना·प्रा० शेराचाचीक·
आब्यटिसरेझिना·इं० बर्गन्देपिच·
एलेमी·
लैकोर आम्मोन्ये·
लैकोर आम्मोन्येसब्कार्बोनटिस·

या प्रकारें यांचें साधारण वर्णन केलें·आतां विशेष वर्णन करतो·

कांथारिदेस·

याचीउत्पत्ति व मूत्रल गुण मूत्रल औषधांमध्यें लिहिले आहेत·परंतु हें स्फोटकारीही फार चांगलें आहे·स्फोट आणावयासाठीं यासारिखीं अन्य औषधें चांगलीं नाहींत·कारण येणेंकरून निश्चित स्फोट येतो·व अन्याप्रमाणें कांहीं व्रणही होत नाहीं·याविषयीं याचें प्लास्तर चांगलें आहे· त्याची कृति व लावण्याचा प्रकार वनस्पति औषधोत्पत्ति प्रकारामध्यें लिहिला आहे·त्याचा उपचार ज्वरामध्यें प्रलाप काळजी दृष्टीस विकार बधिरपणा इत्यादिक लक्षणांवर कामाचा आहे·व तिमिर रोगाचे परिहाराविषयीं भिंवयांवर लावितात·व फेंफरें आणि त्याप्रमाणें अन्य रोग यांविषयीं मस्तकावर किंवा रीढकावर लावतात· व नेत्रांचे बहुत रोगांविषयीं कानांचे मागल्येकडे अथवा कपाळावर किंवा कानशिलांवर लावितात·मज्जेचे दाहाविषयीं मानेवर किंवा मस्तकावर लावितात·गलांकुर व त्यासारिखे अन्य रोग याविषयीं कंठावर लावितात·क्षयरोगाविषयीं उरावर लावितात·पडसें यकृताचे रोग व फुप्फुसाचे आणि पक्काशय आंतडीं इत्यादिक पोटांतल्या पदार्थांचे दाहाविषयीं रोगाचे सुमारानें बाह्य स्थलावर लावितात·वायूवरही तसें लावितात· व फार दिवसांचे सुजेवर लावितात·ब्लिस्तर लाविल्यानंतर त्या स्थलीं पाणी उत्पन्न होतें· पू उत्पन्न करूं इच्छितात तर त्या स्थलावर या औषधाचें मलम किंवा यासारिख्या अन्य औषधाचें मलम लावावें·व कांहीं कठीण पदार्थ स्फोट स्थलावर बांधला असतांही पूउत्पन्न होतो·ब्लिस्तर लावल्यानंतर त्या स्थलांत पू उत्पन्न केला असतां गुण फार होतात· परंतु त्यापेक्षां हें चांगलें आहे·किं ब्लिस्तर लावून बरें झाल्यानंतर पुनः लावावें·जळो-

रव

रावर मोट्या अगत्या वांचून व जाचे मूत्र स्थलाचे ठायीं कांहीं रोग किंवा दुःख आहे· त्याचे चर्मावर ब्लिस्तर लावूं नये·

याचीं औषधें· एम्प्लास्त्रम कांथारिदिस्· सीरेटम कांथारिदिस्· अंग्वेन्तम कांथारिदिस्·

सिनेपिस सेमिना· प्रा॰ मोहर्या·

या लोहितकर आहेत· यानां वाटून चर्मावर मर्दन केलें असतां अथवा यांचा लबदा लावला असतां चर्माचा दाह होतो· व कधिं स्फोट ही येतो· यांचें सविस्तर वर्णन औषधोत्पत्ति मध्यें यांचे लबद्यावर केलें आहे·

याचें औषध· काटाप्लास्मा सिनेपिस·

लसुन·

याला वाटून मोहर्यांचे लबद्या सारिखा लाविला असतां तसे गुण होतात· परंतु याचा गंध वाईट आहे· ह्मणोन प्राय· लावित नाहींत·

शेरांचा चीक·

याला एकत्याला लाविला असतां वाईट व्रण होतात· यास्तव प्राय· एकत्याला लावित नाहींत· अन्य स्फोटकारीशीं मिळवून लावितात· तेणें करून त्याचे गुण खचीत होऊन लवकर होतात· अथवा तो एक भाग राळ बारा भाग यांचें मेलन चांगलें लोहितकर आहे·

आव्यटिस रेझिना·

हा राळेचा एक प्रकार आहे· वृक्ष विशेषांचे सालीला छेद केला असतां त्यामधून निघून जमतो· नंतर त्याला पाण्यामध्यें उकळवून जाडे वस्त्रानें पिळून गाळितात· शीतळ झाल्यानंतर याचा गंध चांगला तर्पन्तैनां सारिखासा आहे· रंग पिंवळा अथवा तांबडा भुरासा आहे· व हा पदार्थ फार टणक आहे· मंद उष्ण लाविल्यानें मृदु होतो· याला चर्मावर किंवा जाडे वस्त्रावर पसरून लावून ती पट्टी लावतात· तेणें करून चर्माचा अल्प दाह होतो· व त्यास्थलांतून थोडें पाणीही निघतें· स्फोट होत नाहीं· हा पदार्थ चर्माला सोडित नाहीं· व येणें करून कांही पीडाही होत नाहीं· यास्तव याची पट्टी फार दिवस पर्यंत राहूं दिल्ही असतां चिं

ता नाहीं· याला खोरखला पडसें इत्यादिकांचे परिहारास्तव उरावर लावितात· व वायू इत्यादिकांचे परिहारा विषयीं कंबरेवर लावतात· व याला फार उष्ण करून लाविला असतां याचे गुण न्यून होतात·

याचें औषध· एम्प्लास्त्रम पीसिस कोम्पोसिटम्·

एलेमी·

हा राळेचा एक प्रकार आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· अन्य देशांत वृक्षविशेष आहेत· त्यांचे सालीला छेद केला असतां त्यांमधून निघून जमतो· याचा रंग पिंवळासा आहे· गंध उत्तम आहे· याचें औषध एक मलम मात्र आहे· त्याचें नाम अंग्वेन्तम एलेमी कोम्पोसिटम् आहे·

लैकोर आम्मोन्ये· व· लैकोर आम्मोन्येस बूकार्बोनटिस्·

हीं दोन औषधें तेलाशीं मिळवून चर्मावर चोळून लावलीं असतां लोहितकर गुण चांगले होतात· हें यांचे औषधांवर लिहिलें आहे·

त्या औषधांचीं नावें सां· लिनिमेन्तम आम्मोन्ये फोर्र्थस· लिनिमेन्तम आम्मोन्येस बूकार्बोनटिस·

मांसनाशक· इं॰ एस्कारोटिकुस·

जीं औषधें शरीरास लाविलीं असतां त्या स्थलींचे मांसाचा नाश करितात· त्यांना मांसनाशक ह्मणतात· यांचीं कार्यें फार आहेत· ह्मणजे चर्माचे रोगांवरली खपली ह्मस चामखीळ इत्यादिकांचा नाश करणें व शरीरांवर कांहीं कार्यासाठीं व्रण करणें व्रणांतल्ये वाईट मांसाचा नाश करणें· इत्यादिक आहेत· व या औषधांचे अनेक भेद आहेत· ह्मणजे· कांहीं एक लाव त्यानंतर बाहेरल्ये आंगाचा नाश होतो· व कांहीं एक लावल्यानंतर बाहेरलें आंग नासून आंतलें मांसही नासतें· असें जाणावें· यांचीं नावें सांगतो·

आसिदमसल्फ्युरिकम·

आसिदमनैत्रिकम·

आसिदमम्युर्याटिकम·

आल्यूमेन एक्सिक्केटम· प्रा॰ तुरटीचीलाही·
पोटास्सा फ्यूसा·
पोटास्सा कम् काल्से·
आर्जेन्ती नैत्रास्: इं॰ कास्तिक·
क्युप्री सल्फास· प्रा॰ मोर्चुत·
ईर्यूगो क्युप्री सबासिटास· प्रा॰ जंगला·
हैड्रार्जेरी ओक्सिम्युर्यास· इं॰ कारोंसिब्सब्लिमेट·
हैड्रार्जेरी नैत्रिको ओक्सिदम· इं॰ रेद प्रीसिपिटेट्·
आर्सेनिसी ओक्सिदम· प्रा॰ सोमल·

या प्रकारें सर्वांचें साधारण वर्णन केलें आतां क्रमेंकरून विशेष वर्णन करतो·

आसिदमसल्फ्युरिकम्·

हें याविषयीं फार बलवंत आहे· परंतु पातळ आहे· यास्तव सहज लावावयास येत नाहीं· व हें अर्धड्राम घेऊन एक औंस मलमाशीं मिळवून लाविलें असतां सुगंध येत नाहीं· यास्तव खर्जेवर कधिं लावितात·

आसिदमनैत्रिकम्·

हें उत्तम मांसनाशक आहे· कांहीं स्थलावर व्रण होऊन तो प्रतिदिवशीं मांस सडवून अथवा करडल्या सारिखें खाऊन लवकर मोटा होतो· त्याचे प्रतिबंधार्थ याचा उपचार चांगला आहे· हें लावावयाचे पूर्वीं व्रणाचे भोंवतालचे स्थलावर मेंण किंवा मलम लावावें· तेणेंकरून या औषधापासून त्याचें संरक्षण होतें· नंतर वस्त्राचे बोळ्यानें याला घेऊन व्रणावर लावावें· या प्रमाणें सर्व व्रणावर लावल्या नंतर त्याचे वाईट मांसाचा नाश होतो· तें मास पहिल्यानें वरती खपळी सारिखें होऊन त्याचे खालून दुसरें मांस चांगलें येतें· व पिसाळलेलें कुत्रें चावलें असतां दंश स्थलाचे मांसाचे नाशास्तव हें चांगलें आहे· कारण हें पातळ आहे· यास्तव सगळ्या दंशस्थलामध्यें शिरून तेथील मांस नासवून विषालाही नाशिवतें· व याचें पाण्याशीं मेलन करून फार प्रकारचे व्रणावर लावितात· तेणेंकरून प्रायः हित होतें· फार दिवसांचे व्रणावर हें विशेष चांगलें आहे· हें पहिल्यानें पाणीं आंबट होई इतकें घालून लावावें· नंतर परिणामा प्रमाणें अधिक करावें· व जरी मरीवर विस्फोट करायासाठीं

ठीं याला पाण्यांचे एक दोन भागांशीं मिळवून चर्मावर लावितात·

आसिदम्म्युर्याटिकम्·

पूर्वोक्त दोन आसिदां प्रमाणें यालाही मांसनाशक गुण आहेत· परंतु याविषयीं फार करून लावीत नाहींत·

आल्यूमेन् एक्सिकेटम· मा· तुरटीचीलाही·

हिचा सिद्ध करायाचा प्रकार व गुण धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिले आहेत·

पोटास्साफ्यूसा· व पोटास्साकमकाल्से·

या दोहोंच्या सिद्ध करण्याचा प्रकार व गुण धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिले आहेत·

आर्जेन्तीनैत्रास·

याचा सिद्ध करण्याचा प्रकार व गुण धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिले आहेत·

क्युप्रीसल्फास मा· मोर्चुत·

हें चांगलें नम्र मांसनाशक आहे· व्रणाचें मांस फार उंच वाढलें असतां त्याचे नाशास्तव लावितात· व फार दिवसांचे व्रणांतलें मांस फार पांढरें आणि गुळगुळीत झालें असतां हें लावल्यानें त्याचा परिहार होऊन दुसरें चांगलें मांस येतें· व याला पाण्यांत विरघळवून शिश्नाचे ठायीं उपदंशावांचून जे अन्य व्रण होतात त्यांवर लावितात· व डोळे आल्यानंतर किंवा अन्य कारणें करून पापण्यांचे आंतल्ये आंगावर मांस वाढून डोळ्यांना पाण्याची गळ लागत्ये· व खुपतात· व दृष्टीस विकार होतो· तेव्हां त्याचे परिहारार्थ त्या स्थलावर हें चांगलें लावावें· नंतर अल्प पाण्यानें धुवून त्याजवर गोड्ये तेलाचे थेंब सोडावे· एक दोन दिवसांचे अंतरानें हा उपचार कांहीं एक वेळेस केला असतां डोळे चांगले होतात· व नासिकेमधून किंवा अन्य बाह्य स्थलापासून रक्तस्राव होत असतां याला थोडके पाण्यामध्यें विरघळवून त्यांत वस्त्र

भिजवून लावावें· परंतु अगत्या वांचून लावूं नये· व मधीचे शोधन प्रकारावर याचे कांहीं गुण लिहिले आहेत·

जंगला·

याचे गुण मर्दन औषधांमध्यें लिहिले आहेत· याला मलमाशीं मिळवून ही कधिं लाविताात·

याचें औषध· लिनिमेन्त मईरुजिनिस्·

हैड्रार्जरी ओक्सिम्युर्यास·

हें कठीण विष आहे· हें एक ग्रेन घेऊन एक औंस पाण्यांमध्यें विरघळवून उपदंशांचे चट्ट्यांवर कधिं लावावें व या मेलनाला पाण्याशीं मिळवून दद्रुवरल्या खपल्या दूर व्हावयासाठीं लावावें· व याचे कांहीं गुण याचे उत्पत्ति प्रकारावर व कोष्ठबंधकांमध्यें लिहिले आहेत·

याचें औषध· लैक्वोर हैड्रार्जरी ओक्सिम्युर्याटिस·

हैड्रार्जरीनैत्रिको ओक्सिदम·

याचा सिद्ध करण्याचा प्रकार धातु औषधोत्पत्ति मध्यें लिहिला आहे· हें चांगलें मांस नाशक आहे· याचें फार बारीक चूर्ण करून व्रणावर घालतात· व व्रणावर मुरदाड मांस वाढलें असतां त्याचा नाशास्तवही तसें घालितात· व याचे अन्य गुण याचे मलमावर लिहिले आहेत·

याचें औषध· अंग्वेन्तम हैड्रार्जरी नैत्रिको ओक्सिदी·

सोमल·

हा बलवंत मांस नाशक आहे· परंतु येणेंकरून फार भयकारक लक्षणें कधिं उत्पन्न होतात· यास्तव या विषयीं एकल्याला लावीत नाहींत· अगत्य लागलें असतां हा आठ ग्रेन पोटास्सेसब्कार्वोनास चार ग्रेन पाणीं चार औंस सर्वांचें चांगलें मेलन करून पक्ष्याचे पिसानें व्रणावर लावावें· अथवा हा एक ड्राम घेऊन बारा ड्राम मलमाशीं मिळवून वस्त्रावर पसरून पटी लावावी· तेणेंकरून वाईट मांसाचा नाश होऊन कुगंध न्यून होतो·

◆

अम्लनाशक इं॰ आन्तासिद्स·

जेहीं करून पोटांतील आंबट पण्याचा नाश होतो· त्या औषधांना अम्लनाशक ह्मणतात· जसा बाह्य आंबट पदार्थाचे अम्लपण्याचा कांहीं पदार्थाचा मेळनें करून नाश होतो· तसा या औषधांचे संयोगानें पोटांतील अम्लपण्याचा नाश होतो· या विषयीं आल्कलीनामक सर्व औषधें व एर्थ नामका मधलीं दोन औषधें मग्निश्या आणि चुना चांगलीं आहेत· या औषधें करून हा रोग न्यून मात्र होतो· सर्वथा जात नाहीं· तो जावया साठीं अन्य औषधें रेचकादिक दिल्हीं पाहिजेत· तेहीं करून पक्काशयाचा पक्क करावयाची शक्ति फिरून येऊन तो रोग सर्वथा जातो· या औषधांना अजीर्णावर आणि अम्लिके करून संग्रहणी होत्ये· तिजवर देतात· या औषधांमध्यें हा भेद आहे· किं कांहीं एकें करून रेच होतात· व कांहीं करून पोट फुगतें· व अम्लिका दूर करावयाचें यांचें सामर्थ्य वेगळें वेगळें आहे· ह्मणजे कांहीं एकाचे मोठ्या मानें करून व कांहींचे अल्प मानें करून ती दूर होत्ये· पोटास्सा सोदा चुना मग्निश्या आम्मोन्या हीं उत्तरोत्तर बळकट आहेत· परंतु यांमध्यें मग्निश्या उत्कृष्ट आहे· कारण बळकट असून नम्र आहे असें जाणावें· यांचीं नावें सांगतो·

लैक्कोर पोटास्से·
पोटास्से कार्बोनास·
पोटास्से सब्कार्बोनास·
लैक्कोर पोटास्से सब्कार्बोनटिस्·
सोदे कार्बोनास·
सोदे सब्कार्बोनास·
आम्मोन्ये सब्कार्बोनास·
लैक्कोर आम्मोन्ये सब्कार्बोनटिस·
लैक्कोर आम्मोन्ये·
लैक्कोर काल्सिस·
क्रीटा प्रीपरेटा·
मग्निश्या·
मग्निश्ये सब्कार्बोनास·

या प्रकारें सर्वांचें साधारण वर्णन केलें· आतां विशेष वर्णन करतो·

लैक्कोर पोटास्से पासून लैक्कोर आम्मोन्ये पर्यंत जीं औषधें त्यांचा सिद्ध करण्याचा

प्रकार प्रमाण व गुण इत्यादिक धातुऔषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिले आहेत·

लैकोरकाल्सिस· प्रा॰ चुन्याचें पाणी·

या विषयीं याचें प्रमाण पांच अथवा साहा औंस आहे· याला अजीर्णा बरोबर अम्लिका झाली असतां तिवर देतात· व दुधाशीं सम भाग मिळवलें असतां बालांचे संग्रहणीवर चांगलें आहे· व याला अतीसार आणि फार दिवसांची संग्रहणीं यांवर पोटांतल्ये आंत्रांचा नाश व्हावयासाठीं कधिं देतात·

क्रीटाप्रीपरेटा· प्रा॰ खडी·

ही चांगली अम्लनाशक आहे· परंतु हिणें करून पोट फुगतें· यास्तव प्रथम पोट स्वच्छ करून अम्लिके करून जी संग्रहणीं होत्ये तिजवर देतात· दिवसांत हिचें प्रमाण एक अथवा दोन ड्राम आहे· प्रायः हिचें मिश्रण देतात· हें त्याजवर सविस्तर लिहिलें आहे·

हिचीं औषधें· **मिस्त्युराक्रीते· पल्विसक्रेटेकोंपोसिटस्· पल्विसक्रेटेकोंपोसिटस्कम्ओप्यो कोन्फेक्श्यो आरोमाटिका·**

मग्निश्या· व मग्निश्येसबूकार्बोनास·

यांचा सिद्ध करायाचा प्रकार प्रमाण व गुणादिक धातुऔषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिले आहेत·

* * *

अश्मरीहारक· इं॰ लैथोन्त्रिप्टिक्स·

जीं औषधें अश्मरी होऊं देत नाहींत· व झालेल्या अश्मरीचा नाश करितात· त्या औषधांना अश्मरीहारक ह्मणतात· या औषधांचा पहिला गुण निश्चित होतो· दुसरा गुण फार करून होत नाहीं· या रोगाचे दोन प्रकार आहेत· एका प्रकारामध्यें मूत्रापासून तांबडी रेती पृथक् होत्ये· दुसर्‍या प्रकारामध्यें पांढरी रेती पृथक् होत्ये· पहिल्या प्रकारचें कारण पक्वाशयांत अथवा आंतड्यांत झालेला आंबट पदार्थ आहे· तो शोषक वाहिन्यांनीं शोषित होऊन गुर्दांप्रत जाऊन मूत्रापासून तांबडी रेती पृथक् करतो· नंतर ती क्लोमनामध्यें जात्ये कधिं मूत्राबरोबर बाहेर पडत्ये· व कधिं गुर्दांमध्येंच राहात्ये· अजीर्ण झालें असतां त्यापासून आंबट

पदार्थ कधिं उत्पन्न होतो व सुप्रकृति प्रमाणें घर्म निघाला नसतां विशेषें करून होतो. कारण घर्मा बरोबर शरीरांतील निरुपयोगी आंबट पदार्थ निघत असतां यास्तव या प्रकारची कता फार करून होत्ये. तिचे परिहारास्तव जेहीं करून अजीर्ण होत नाहीं अशीं भोजनें ाचक अम्लनाशक इत्यादि औषधें द्यावीं. व जा पदार्थें करून घर्म चांगला निघतो त्या प- ार्थांचें सेवन करावें. अश्मरीचे दुसर्ये प्रकारा बरोबर सर्वकाल आंतड्यांचा रोग असतो रसाकडे सदैव कुरंग कुगंध असें होतें. व प्रायः त्याचे बरोबर पित्ताची कांहीं विकृती असत्ये. वृद्ध मनुष्यांस तरुणां प्रमाणें मुताला चांगलें होत नाहीं तेणें करून क्रमनांत. मूत्र राहून त्या मधून पांढरी रेती कधिं. पडत्ये. व अश्मरीच्या पूर्वोक्त भेदें करून अश्मरीहारक षधें वेगळीं वेगळीं द्यावयास पाहिजेत. या प्रमाणें जाला पहिल्ये प्रकारची अश्मरी होत्ये ाला अम्लनाशक अश्मरी हारक द्यावें. व जाला दुसर्ये प्रकारची होत्ये त्याला आंबट औष- धें द्यावीं. अम्लनाशकां मधून मग्निश्या चांगलें आहे. आंबट औषधां मधून नैत्रिक किं- ा म्युर्याटिक आसीद चांगलें आहे. या औषधांचे उपचारा बरोबर ढाळक देणें कधिं अ- श्य आहे. जा वेळेस अश्मरी हारक देतात त्या वेळेस नित्य मूत्राचें अवलोकन करावें. ज- सा त्याचा भेद दृष्टीस पडेल तसा औषधाचा भेद करावा. औषधांचीं नावें सांगतो.

लैकोर पोटास्से.
पोटास्से कार्बोनास.
पोटास्से सब्कार्बोनास.
सोदे कार्बोनास.
सोदे सब्कार्बोनास.
सोदे सब्कार्बोनास एक्सिक्केटा.
मग्निश्या.
मग्निश्ये सब्कार्बोनास.
लैकोर काल्सिस प्रा॰ चुन्याचें पाणी.
सेपो डूरस् प्रा॰ कठीण साबुण.
आसिदम म्युर्याटिकम.
आसिदम नैत्रिकंस.

या प्रकारें यांचें साधारण वर्णन केलें. आतां विशेष वर्णन करतो.

लैकोर पोटास्से पासून मग्निश्ये सब्कार्बोनासा पर्यंत जीं औषधें त्यांचा सिद्ध करा-

व याच्या प्रकार प्रमाण व गुणादिक धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत·

लैक्कोरकाल्इसिस·

याविषयीं याचें प्रमाण साहा औंसा पासून एक अथवा दोन पेंट पर्यंत आहे· हें एकलें द्यावयास चांगलें नाहीं· यास्तव पोटास्सा सोदा मग्निश्या यांमधून एकाशीं मिळवून द्यावें·

सेपोयूरस्· प्रा॰ कठीण साबुण·

हें औषध सोदा व वनस्पतिचें तेल यांचें मेलन आहे· मृदु साबुण पोटास्सा व वनस्पतिचें तेल यांचें मेलन आहे· कठीण साबुणांचा रंग पांढरा आहे तो सिद्ध करायाचे वेळेस त्यामध्यें कासीसाचें पाणीं मिळवलें असतां निळा होतो· व सिद्ध होण्याची वेळ जवळ आल्यानंतर त्यामध्यें नुस्तें लोहकीट मिळवलें असतां तांबडा होतो· व तीं दोन्हीं मिळवलीं असतां निळा आणि तांबडा निरनिराळा दिसतो· याला पहिल्ये प्रकारचे अश्मरीबंर देतात· याचे मोठ्ये प्रमाणें करून कधिं फार हित होतें· परंतु नित्य दिल्हें असतां अजीर्ण होतें व तें कधिं फार दिवस पर्यंत राहातें याचें प्रमाण तीन ग्रेनां पासून अर्धा ड्राम पर्यंत आहे· कांहीं औषधाच्या गोळ्या फार दिवस ठेवायास इच्छितात तर त्यांचे पदार्थांशीं हा मिळवावा· येणें करून त्या मृदु राहातात· व पोटांत घेतल्या असतां सहज विरघळतात· व याला ढाळकाचे गोळ्यांमध्येंही त्या मृदु ह्मावयासाठीं घालितात· व सुरेचे मर्दन औषधामध्यें याला घालतात· तेणें करून तें स्निग्ध राहातें· व याला प्लास्तरामध्यें मिळवला असतां तें मृदु राहातें· व साबुण सर्वकाल सर्वदेशामध्यें मिळतो· व कोणीं धातूचें विष घेतलें असतां त्याचे परिहारासाठीं चार साहा औंस उष्ण पाण्याशीं साबुण मिळवून द्यावा· वमन झालें असतां फिरून द्यावा तेणें करून हित होतें·

याचीं औषधें· **पिल्युलेसापोनिस्कम् ओप्यो· पिल्युलेसिह्लेकोम्पोसिटे· एम्प्लास्त्रमसापोनिस्· सीरेटमसापोनिस· लिनिमेन्तमसापोनिस् कोम्पोसिटम्·**

आसिदमम्युर्याटिकम·

याचा उत्पत्ति प्रकार प्रमाण गुण इत्यादिक धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें उक्त आहेत·

आसिदमनैत्रिकम·

या विषयीं हें औषध आसिदम म्युर्योटिकमा प्रमाणें द्यावें·

शीतकर·इं॰रीफ्रिजरन्ट्स·

जा औषधें करून रुधिराभिसरण मंद होऊन शरीराचा उष्णपणा मंद होतो· त्या औषधानां शीतकर ह्मणतात· हीं औषधें दोन प्रकारचीं आहेत· ह्मणजे कांहीं बाह्यउपचाराचीं व कांहीं पोटांत द्यावयाचीं आहेत· चर्माचा किंवा त्याचे जवळचे आंतील स्थलाचा दाह झाला तर बाह्यउपचारार्थ पाणीं अथवा त्याचें खारट पदार्थांशीं केलेलें मेलन किंवा पाणीं सुरा सिर्के इत्यादिकांचें मेलन चांगलें आहे· यांत वस्त्र भिजवून लावल्यानें दाह व पीडा न्यून होते· ज्वरादि रोगांमध्यें शरीराचा उष्णपणा फार झाला असतां त्याचे शमनासाठीं पोटांत द्यावयाचीं शीतकर औषधें सांगतो·

लिमोनेस·प्रा॰ लिंबू·
आरान्शीईबाक्से·प्रा॰नारिंग·
तामारिंडीपल्पा·प्रा॰चिंचेचागीर·
आसीटम·सु॰ सिर्के·
पोटास्सेसुपर्टार्ट्रास·इं॰ क्रीमऑफटार्टर·
पोटास्सेनैत्रास·प्रा॰सोरा·

सर्व आंबट औषधानां शीतकर गुण आहेत· परंतु त्यांमधून या कार्या विषयीं लिंबुचा रस चिंच इत्यादिक चांगलीं आहेत·

या प्रकारें यांचें साधारण वर्णन केलें आतां विशेष वर्णन करतो·

लिंबू·

या फलाचे रसामध्यें सैत्रिक नामक एक आसिद आहे· त्याची पृथक् करायाची कृति धातु औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे· याचा साजुक रस फार उत्तम शीतकर आहे· त्याला पाणीं व साखर याशीं मिळवून देतात· मेलन कृति सांगतो·

लिंबुचा साजुक रस·	चार औंस·
लिंबाचे साजुक साली चा कीस·	अर्ध औंस·

खडीसाखर·	चार औंस·
उकळतें पाणीं·	तीन पैंट·

रस साल साखर पात्रांत घालून त्यांजवर उकळतें पाणीं घालून वर ढांपण ठेवावें· शीतळ झाल्या नंतर गाळावें· अगत्य असल्यास त्यामध्यें सोरा अर्ध किंवा एक ड्राम घालावा· व स्वेदकारी औषधां मध्यें सालेन मिक्स्चुर व एफेर्वेसिंग ड्रापुन्स अशीं याचीं दोन मेलनें लिहिलीं आहेत· गलबतावर किंवा अन्यस्थला मध्यें मनुष्य फार दिवस राहातो त्याला शारवादिक व चांगलें धान्य भक्षावयास मिळालें नाहिं तर त्या कारणें करून त्या मनुष्याला जाला इंग्रेजी भाषेंत स्कर्वी आणि संस्कृतांत नाविक रक्तपित्त ह्मणतात· असा एक रोग उत्पन्न होतो त्याचे परिहारा विषयीं हा फार उत्तम आहे· व त्या विषयीं शारवादिक पदार्थ चांगले आहेत· एक औंस सैत्रिक आसिद एक पैंट पाण्याशीं मिळविलें असतां एक पैंट साजुक रसा इतकें आंबट होतें·

नारिंग·

याचे ही रसा पासून सैत्रिक आसिद उत्पन्न होतें· यास्तव याला लिंबाचे रसा विषयीं देतात·

चिंचेचागीर·

हा थोड्ये पाण्यांशीं मिळवून प्यावयास दिल्हा असतां चांगला शीतकर आहे·

आसीटंस·मु·सिर्के·

याला पाणीं व साखर यांशीं मिळवून दिल्हें असतां फार शीतकर आहे· व लिंबाचा रस जा रोगांवर देतात त्यांवर याला देतात·

क्रीमरटार्टर·

हें पाण्यांशीं मिळवून दिल्हें असतां फार शीतकर आहे· मेलन प्रकार सांगतो·

क्रीमरटार्टर·	अर्ध औंस·
खडीसाखर·	चार औंस·
लिंबाची साजुक साल·	अर्ध औंस·
उकळतें पाणीं·	तीन पैंट·

सर्वांचें मेलन करावें·या मेल नाला इंग्रेजी भाषेंत ईपीयेल ह्मणतात·

सोरा·

या विषयीं याचें लाहान प्रमाण अल्प अवधिनें द्यावें·ह्मणजे पांच किंवा दाहा येन दाहा बारा घटिकांचे अंतरानें द्यावें·याला सालैन मिक्स्चुर इत्यादिकां बराबर द्यावा·

द्रवकर· इं०दिल्युएन्त्स·

ज्या औषधें करून रुधिर व शरीरांतील कांहीं इतर रस पातळ होतात त्यानां द्रवकर ह्मणतात·पाणीं व त्या सारिखे पातळ पदार्थ त्यांचे द्रवरूप गुणें करून हे परिणाम होतात·तो गुण पाण्यांचे ठायीं स्वाभाविक आहे·व इतर पदार्थांचे ठायीं पाण्यांचे योगानें आहे·यास्तव पाणींच द्रवकर आहे·त्याला सुस्वाद सुगंध आणायासाठीं त्यामध्यें अन्य स्वादिष्ठ पदार्थ घालितात·व कधिं पेज ताकादिकांची निवळ इत्यादिक द्रवकर पदार्थ देतात·ज्वरादि रोगांमध्यें ताहानेंचें शमन करायासाठीं द्रवकर फार चांगले आहेत·व जेव्हां पोटांत पित्तादिक पदार्थ तीव्र होऊन मुरडा शूल इत्यादिक उपद्रव होतात·तेव्हांही चांगले आहेत·घेतल्यानंतर पित्तादिक पदार्थांशीं मिळून त्यांचा तीव्रपणा न्यून करून ते उपद्रव न्यून करतात·दाह रोगावर यांचें फार पान कामाचें नाहीं·कारण यांचें लवकर शोषण होऊन रुधिर काढून न्यून केलें असतें तें लवकर पूर्ण होतें·यास्तव त्या रोगा विषयीं रोग्याला वेळेस घोटभर पाणीं पी अशी आज्ञा करावी·व ज्वरामध्यें हें अगत्य आहे किं त्याचे अवस्थां प्रमाणें यांचें पान करावें·ह्मणजे शीतावस्थेमध्यें उष्ण पान उष्णावस्थेमध्यें शीत पान घर्मावस्थेमध्यें मंदोष्ण पान करावें·व कांहीं रोगांमध्यें ताहानेचें शमन करायासाठीं पूर्वोक्ता प्रमाणें द्रवकर औषधें देतात·व अन्य रोगामध्यें रुधिर व शरीरांतील इतर रस यांचा पातळपणा करायासाठीं देतात·उष्ण पान स्वेदकारी औषधांस साहाय्य होतें·शीत पान मूत्रल औषधांस साहाय्य होतें·असें जाणावें·

मृदुकर·इं० दीमल्सेन्त्स·

जीं औषधें आपल्या मऊपणानें आंतील त्वचादिकानां कठीण तीव्र पदार्थांपासू-

न संरक्षितात· त्यांनां मृदुकर ह्मणतात· हीं औषधें बुळबुळीत आहेत· यांनां पडसें संग्रहणीं अतीसार प्रमेह अश्मरी इत्यादिकांवर देतात· हीं औषधें बलवंत नाहींत· त्यांचीं नावें सांगतो·

आकेश्येगम्मी·
त्रागाकांथा· मु॰ कतीरा·
लैनीयुसिटाटिस्सिमीसेमिना· प्रा॰ जवस·
ग्लिसिर्रीझेरेदिकूस· प्रा॰ ज्येष्ठीमध·
सार्सापारिह्लेरेदिकूस·
लैकेन·
आमिग्दले आमेरे· व दल्सेस· प्रा॰ कडु व गोड बदाम·

या विषयीं भक्षणीय पदार्थ सांगतो·

सागुदाणें·
साल्लमिश्री·
तवखील· मु॰ तैखुर·
गहुं·

या प्रकारें यांचें साधारण वर्णन केलें· आतां विशेष वर्णन करतो·

आकेश्येगम्मी·

हा एक गोंद आहे· याचे प्रकार फार आहेत· याची उत्पत्ति या देशांत नाहीं आरबस्थानामध्यें आहे· या देशांत याचा प्रतिनिधि बाबळीचा गोंद आहे· हा थंड व उष्ण पाण्यामध्यें विरघळतो· आलकोहोलांत विरघळत नाहीं· याचें पाणीं चांगलें मृदुकर आहे· यास्तव पडसें व फुफ्फुसांतील क्षयरोगादिक यांवर देतात· व हा कफघ्नांचे अनुपाना विषयीं उत्तम आहे· ह्मणजे हा दोन औंस पाक एक औंस पाणीं तीन औंस· या तिहींचें मेलन करून त्यामध्यें कफघ्नांचें एका दिवसाचें प्रमाण घालावें· नंतर जितके वेळ कफघ्न देत असतात तितके या मेलनांचे वांटे करून तितके वेळ तें द्यावें· व या गोंदाचे पाण्याला मलावरोध मूत्रकृच्छ्र इत्यादि रोगांवर देतात· व हा औषधें सिद्ध करायासाठीं फार कामाचा आहे· ह्मणजे चूर्णाला पाण्यांशीं भिजविणें· तेल बालसम व राळे सारिखे पदार्थ इत्यादिकांचें पाण्यांशीं मेलन करणें व गोळ्या सिद्ध करणें इत्यादिकांचे कामाचा आहे·

याचें औषध· **म्युसिलेगो आकेश्ये·**

त्रागाकांथा·

हा एक गोंद आहे· याची उत्पत्ति या देशांत नाहीं· मिसर देश व फारसिस्थान यां पासून आणितात· हा वृक्ष विशेषा पासून आपल्ये आपण उत्पन्न होऊन जमतो· याला गंध नाहीं स्वाद आंबट कडुसा आहे· पाण्यां मध्यें विरघळतो· आलकोहोल व इतर पदार्थ यांमध्यें विरघळत नाहीं· याचे गुण पूर्व औषधाचे गुणां प्रमाणें आहेत·

याचें औषध· **पल्विस्त्रागाकांथेकोम्पोसिटस्·**

जवस·

हे सर्व लोकानां ठाऊक आहेत· यांचें फाण्ट सुस्वाद पदार्थांशीं मिळवून प्रमेह पडसें व तसेंअन्य रोग यांवर कधिं देतात·

यांचीं औषधें· **ईफ्युसम्लैनीकोम्पोसिटम· ओल्यम्लैनी·**

ज्येष्ठीमध·

हिची उत्पत्ति या देशांत आहे· व बसरा देशा पासून ही आणितात· ही चांगली मृदुकर आहे हिचा स्वाद गोड आहे यास्तव अन्य औषधाशीं मिळवितात· हिचा रांधा उत्तम मृदुकर आहे त्याला पडशावर देतात· तो तोडांत घालून हळहळु विरघळूं द्यावा·

हिचीं औषधें· **एक्स्त्राक्टम्ग्लिसिरीझे· दीकोक्टम्सार्सापारिल्लेकोम्पोसिटम· ईफ्युसमलैनी· कोन्फेक्श्योसेन्ने·**

सार्सापारिल्लेरेदिक्स·

हें या देशाचें औषध नाहीं· अन्य देशा पासून आणितात· याचा प्रतिनिधि शारिवा या नामें करून या देशाचें औषध आहे· हें उपदंशावर फार चांगलें आहे· त्या विषयींच फार करून देतात· याचे गुण औषधोत्पत्ति प्रकारा मध्यें याचे औषधां वर लिहिले आहेत·

याचीं औषधें· **दीकोक्टमसार्सापारिल्ले · दीकोक्टमसार्सापारिल्लेकोम्पोसिटम· एक्स्त्राक्टमसार्सापारिल्ले · सीरुपससार्सापारिल्ले·**

लैकेन·

हें या देशाचें औषध नाहीं· अन्य देशापासून आणितात· याचें पाचन चांगलें मृदुकर आहे· यास्तव क्षयरोगावर देतात· येणें करून खोखला न्यून होऊन श्वास हीं न्यून होतो· व त्या रोगांतली संग्रहणी ही कांहीं न्यून होत्ये·

याचें औषध· **दीकोक्टम् लैकनिस·**

आमिग्दले·प्रा॰ बदाम·

हें सर्व लोकानां ठाऊक आहे· कडु व गोड या भेदें करून दोन प्रकारचें आहे· दोहोंचें तेल सारखें आहे· परंतु मृदुकरास्तव गोडच कामाचें आहे· या विषयीं त्याला पाण्यांशीं मिळवून देतात· त्याची सिद्ध् करावयाची कृति औषधोत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे·

याचीं औषधें· **ओल्यम आमिग्दले· मिस्त्युरा आमिग्दलेरम· कोन्फेक्त्योआमिग्दलेरम·**

स्निग्धकर· इं॰ एमोल्ल्येन्त्स·

जा औषधें करून चर्म स्निग्ध होऊन मृदु होतें· त्या औषधानां स्निग्धकर ह्मणतात· हीं औषधें चर्माला सूज येऊन चर्म ताणल्या सारिखें होऊन दुखतें· व कांहीं कारणें करून चर्म रुक्ष होतें· त्यां विषयीं चांगलीं आहेत· यास्तव चर्माचे दाहस्थलाचें चर्म रुक्ष झालें असतां त्यावर व चर्मावर सूज आली असतां तिवर लावितात· व या विषयीं उष्ण पाण्याची शेकणी चांगली आहे· व त्यामध्यें कडु लिंबादिकांचा पाला घातला असतां फार उत्तम आहे· कारण तेणें करून उष्णपणा कांहीं अवधि पर्यंत राहातो· व या विषयीं जवस इत्यादिकांचें पीठ पाण्यांत शिजवून त्याचा पेंड बांधावयास चांगला आहे· व या विषयीं तेल तूप वसा इत्यादिकांचें मर्दन चांगलें आहे· तें जलोदरादिकांचे सुजेवर करितात· वसा सर्व मलमाचें मुख्य द्रव्य आहे· त्या त्या मलमाचे गुण त्यांचे उत्पत्ति प्रकारावर लिहिले आहेत· व जाड तेलसर पदार्थ क्षताचें वायू पासून रक्षण करावयास चांगले आहेत· त्यांमधून जवसांचें तेल व चुन्याचें पाणी यांचें मेलन विशेष चांगलें आहे· त्या मेलनाची कृति व गुण त्या तेलाचे उत्पत्ति प्रकारावर लिहिले आहेत·

कृमिघ्न· इं॰ आन्थेल्मिन्तिक्स·

जा औषधें करून पोटांत झालेले कृमी बाहेर पडतात त्या औषधांनां कृमिघ्न ह्मणतात· हीं औषधें फार प्रकारचीं आहेत· त्यांतें सां॰ कुहिलीचीं कुसें व कथिलाचा कीस इत्यादिक पदार्थ आपल्ये तीक्ष्ण स्पर्शें करून हा गुण करतात· व रेवाचिनीचा शिरा सक्मुन्या कालोमेल ओल्यमटेरेबिंथिने इत्यादिक औषधें आपल्ये दाळक गुणें करून हा गुण करतात· व कडु औषधें आपल्ये कडुपण्यानें हा गुण करतात· कडु पदार्थ कृमींचें विष आहे· व कांहीं कृमिघ्न औषधें चिपूनळीनें मलद्वारांत सोडितात· तेणेंकरून फार हित होतें· व जा कृमिघ्न औषधें करून प्रायः ढाळ होत नाहींत· अशीं औषधें दिल्यानंतर जालप रेवाचिनीचा शिरा सक्मुन्या यांमधून कोणतें एक कालोमेलाशीं मिळवून द्यावें· कृमिघ्नाचीं नावें सां॰

हैद्रार्जरीसल्फ्युरेटमनैग्रम·
हैद्रार्जरीसब्म्युर्यास·
सल्फासफेर्री· सं॰ कासीस· प्रा॰ हिराकस·
सब्कार्बोनासफेर्री· प्रा॰ लोहकीट·
स्तान्निपल्विस· प्रा॰ कथिलाचाकीस·
ओल्यमटेरेबिंथिने·
डालिकीप्युबिस· प्रा॰ कुहिलीचीं कुसें·
ग्रानेटीकोर्टेक्स· प्रा॰ डाळिंबीचे मूळाची साल·
कांबोज्या· प्रा॰ रेवाचिनीचा शिरा·

या प्रकारें यांचें साधारण वर्णन केलें· आतां क्रमेंकरून विशेष वर्णन करतो·

हैद्रार्जरीसल्फ्युरेटमनैग्रम·

या औषधाची सिद्ध करावयाची कृति· रूप व गुण इत्यादिक औषधोत्पत्ति प्रकारामध्यें लिहिले आहेत·

हैद्रार्जरीसब्म्युर्यास· इं॰ कालोमेल·

या विषयीं लाहान मुलांना द्यावयासाठीं याचें प्रमाण एक ग्रेन किंवा दोन ग्रेन पर्यंत व अन्य मनुष्यांनां पांच ग्रेनां पासून दाहा ग्रेन पर्यंत आहे·

सल्फासफेर्री·

सल्फासफेरी· व सब्कार्बोनासफेरी·

हीं दोन औषधें या विषयीं कधिं देतात· अन्य कार्या विषयीं यांचें जें प्रमाण लिहिलें आहे तें प्रमाण या विषयीं द्यावें·

स्तान्नीपल्विस्·

या विषयीं याला पूर्वकालीं फार देत असत· सांप्रतकालीं फार करून देत नाहींत· याचें प्रमाण एक अथवा दोन द्राम आहे· तें गुळा बराबर मोठ्या पाहांटेस द्यावें· असें तीन चार दिवस देऊन बलवंत रेचक द्यावें·

ओल्यमटेरेबिंथिने·

याची स्वच्छ करावयाची कृति वनस्पति औषधांचे उत्पत्ति प्रकारामध्यें लिहिली आहे हें सर्व कृमिघ्नां पेक्षां बलवंत आहे· अन्य कृमिघ्नें करून कृमींचा नाश कधिं होतो· कधिं होत नाहीं· प्राय: येणें करून कृमीं काळेसे होऊन पोटांत मरून बाहेर निघतात· याचें प्रमाण अर्ध औंसा पासून दोन औंस पर्यंत आहे तें प्रमाण चांगले रेच होऊन कृमी बाहेर निघत तों पर्यंत प्रतिदिवशीं आवशीस व पाहांटेस द्यावें· अशा प्रमाणें करून याचे द्रावक गुण कधिंही होत नाहींत· व येणें करून मुरडा उह्मासा मलावरोध व मूत्रकृछ्र इत्यादिक कधिं होतात· यास्तव हें दिल्यानंतर पेज पुष्कळ प्यावयास द्यावी· व हें फार उष्ण आहे· यास्तव पांच साहा औंस पेजेमध्यें द्यावें· किंवा मध व गोंदाचें पाणीं यांमधून एका बराबर नुस्त्या पाण्यांशीं अथवा सुगंध पाण्यांशीं मिळवून द्यावें· व कोणीं याला पाण्यांत घालून त्यांत थोडें सुगंध तेल घालून देतात· व हें दिल्यानंतर दाहा घटिकां पर्यंत रेच झाले नाहींत तर एरंडेल द्यावें· व हें घेतल्या नंतर ढेंकरे बराबर गळ्याशीं येतें· त्याचे शमनार्थ थोडी सुरा अथवा थोडें लवंगांचें तेल घ्यावें· व मस्तकाचे रोगामध्यें प्राय: पोटांत मलाचा संग्रह असतो· तो दूर व्हावयासाठीं हें फार चांगलें आहे· त्या विषयीं याचें मोटें प्रमाण द्यावें· व अपस्मारावर ढाळकास्तव याचें पूर्ण प्रमाण चांगलें आहे· व हें दिल्या नंतर अल्पाहार करायास सांगावा· व चर्मावर फार गांधी आल्या असतां याचा प्रतिबंध करावा असें जाणावें·

कुहिलीचीं कुसें·

हें औषध या देशाचें आहे· कुहिलीला खरवडून कुसें काढून तुपामध्यें अथवा गुळाम-

ध्यें मिळवून द्यावीं· अथवा कुहिलीला अमिश्रित पाकामध्यें घालून पाक मधी प्रमाणें दाट होई तों पर्यंत सुरीनें तिर्चीं कुसें काढावीं· नंतर तीन चार वर्षांचे मुलांनां त्या पाकाचा जायफळा इतका भाग तीन चार दिवस पाहांटेस द्यावा· नंतर रेचक द्यावें· हें औषध द्यायाचे वेळेस सिद्ध करावें·

डाळिंबाचे मूळाची साल·

या सालीचे चूर्णाचें प्रमाण एक स्कुपल आहे· तें एक घटिकेचे अंतरानें असें चार वेळ द्यावें· चवथें प्रमाण दिल्यानंतर फार करून कृमीं जिवंत बाहेर पडतात· अथवा सालीचें पाचन दोन दोन औंस पूर्ववत् द्यावें· पाचनाची कृति सांगतो·

साल·	दोन औंस·
पाणीं·	दीढ पैंट·

दोहोंनां पात्रांत घालून नौ औंस राही तों पर्यंत उकळवीत असावें·

रेवाचिनीचा शिरा·

हें औषध याविषयीं कधिं देतात· याचें प्रमाण दोन ग्रेनां पासून साहा अथवा आठ ग्रेन पर्यंत आहे· तें क्रीमरटार्टराशीं मिळवून द्यावें· व अन्य कृमिघ्नें दिल्यानंतर रेचांस्तव याला कालोमेलाशीं मिळवून कधिं देतात· या प्रकारें कृमिघ्न औषधांचें विशेष वर्णन केलें· आतां संक्षेपें करून त्या कृमींचें वर्णन करतो· ते कृमीं दीर्घ क्षुद्र वर्त्तुल· या भेदें करून तीन प्रकारचे आहेत·

दीर्घ कृमीं हे फार लांब आहेत· व यांनां कांडवेली सारिखीं पेरें असून चपटे असतात· व यांचे पेराजवळचे दोहों तुकड्यांचे कांठांचा रुंदपणा व जाडपणा वेगळा वेगळा आहे· व हे कधिं पन्नास शंभर हात लांब असतात· यांचें डोचकें फार लाहान आहे· त्यामध्यें चार छिद्रें आहेत· तीं छिद्रें कधिं स्तनाग्रा सारिख्या चोहों उंच स्थलावर असतात· कधिं चोहों खोलगटामध्यें असतात· त्यांमधून त्यांचे पोषणास्तव चार वाहिन्यां पेरा पेरा प्रत जातात· व हे डोई पासून पुच्छा पर्यंत उत्तरोत्तर उतरते आहेत· व यांचें पुच्छ लांडें आहे· व पुच्छाचे ठायीं प्राय: गळा सारिखे दोन आंकडे असतात· व या कृमींचे एका एका पेरामध्यें अंडाशय आहे· त्यामध्यें असंख्य आंडीं असतात· तीं ह्यांचे बाजूंवर छिद्रें आहेत· त्यांमधून निघतात· व यांचीउत्पत्ति उद्दीजा सारिखी आपल्ये आपण आहे· व यांचा प्राण लवकर जात नाहीं· हे प्राय: लाहान आंतड्यामध्यें राहातात· कधिं पक्वाशयामध्यें ही असतात· व यांचें डोचकें प्राय: आंतड्याचे प्रारंभाकडे असतें· पुच्छ शेवटाकडे असतें· व यांचें डोचकें आंतड्याचे आंतल्ये

त्वचेला बळकट लागलेलें असतें· व औषधादिकें करून यांचें डोचकें गळून पडे तों पर्यंत गुण होत नाहीं· व या कृमींचे दोन प्रकार आहेत· ह्मणजे कांहीं एकानां ते पुच्छाचे आंकडे असतात· कांहीं एकानां नसतात· परंतु जानां नसतात ते कृमीं फार करून प्रसिद्ध नाहींत असें जाणावें· या दीर्घ कृमीनां इंग्रेजी भाषेंत तीन्या ह्मणतात· ह्मणजे नाडी सारिखे जंतू·

क्षुद्र कृमी हे वर्त्तुल असून किंचित् लांब बारीक आहेत· व यांचे दोन्ही शेवट फार सूक्ष्म सुईचे अग्रा सारिखे आहेत· यांची लांबी तिळा पासून दीढ अंगुळ पर्यंत असत्ये· व हे पांढरे बारीक सुता सारिखे दिसतात· यांचें गमन फार अपूर्व आहे· व यांनां कांहीं पदार्थाचा स्पर्श झाला असतां आखुडतात· तेणें करून पोटांत शूळ व मुरडा होतो· व बालाचे गुदा जवळ फार कंडु उत्पन्न होत्ये· कीं जिणें करून कधिं आंगवळतें· व यांवर सुर्कुत्या पुष्कळ असतात· त्या आंगठी सारिख्या रज्जूं करून झालेल्या आहेत· व यांचें तोंडा कडलें अग्र किंचित् बुंठेंसें आहे· पुच्छ लखलखीत आहे· व हे कृमीं सर्वकाल मोठ्ये आंतड्याचे खोल्यां मध्यें किंवा उंदुकामध्यें असतात· व यांचीं गुंठळीं असतात· व हे कधिं योनी मध्येंही असतात· यांनां इंग्रेजी भाषेंत आस्कारिदेस ह्मणतात·

वर्त्तुल कृमीं हे लांब वर्त्तुल गांडवळा एवढाले असतात· यांचा रंग पांढरा गुळधिवा व पांढरा काळसर असा असतो· व यांचे आंगावर क्षुद्र कृमींचे सुर्कुत्यां सारिख्या सुर्कुत्या आहेत· व हे मध्या पासून तोंडा पर्यंत व पुच्छा पर्यंत उत्तरोत्तर बारीक आहेत· व यांचे तोंडाला बारीक तीन अग्रें आहेत· त्यांचे शेवटा मध्यें एक छिद्र आहे· तीं फार तीक्ष्ण व चिमट्या सारिखीं आहेत· व आंतड्याचे आंतल्ये त्वचेला चिमळतात· व कधिं तिला टोंचतात· जावेळेस तीं अग्रें आंतड्यांतली आंव चुंफत्ये वेळेस एका मागें एक हालतात· त्या वेळेस हे कृमीं आपल्ये त्रिकोणाकार तोंडाची उघडमीट करित असतात· असें जाणावें·

हे कृमी फार करून बालाचे पोटांत व मोठ्ये मनुष्याचे पोटांतही होतात· यांचें स्थान फार करून लाहान आंतडें आहे· व हे कृमीं जानां चांगलें भोजन मिळत नाहीं व जांचे पोटांत आंव फार आहे त्यांचे पोटांत होतात· व हे कधिं फार होतात यांनां इंग्रेजी भाषेंत लम्ब्रिसी ह्मणतात· बालांचे पोटांत क्षुद्र व वर्त्तुल कृमीं होतात· मोठ्ये मनुष्याचे पोटांत दीर्घ व वर्त्तुल होतात· कृमींचे प्रकार संख्या स्थल· व मनुष्याची प्रकृति हीं जशीं असतात· तशीं कृमीचीं लक्षणें वेगळीं वेगळीं होतात· व हीं लक्षणें कृमींचींच असें खचित सांगतां येत नाहीं त्यांचें वर्णन करतो· मुखाचा रंग बदलून कधिं तांबडा कधिं पांढरा कधिं सांवळासा होतो· डोळ्यांचीं खालचीं पोटें काळसर होतात· व डोळे निस्तेज व निश्चल होऊन कोमल्या सारिखे होतात·

होतात· व डोळ्यांचीं खालचीं पोटें सुजतात· कनीनिका मोटी होत्ये· नाकांत असें कुळकुळतें किं जाचें सहन होत नाहीं व कधिं नाकामधून रक्त पडतें· कपाळ शूळ होतो· तो भोजन केल्यानंतर फार होतो· व कांहीं एक वेळेस असा होतो किं मनुष्य प्रलाप करतो· तोंडाला पाणीं सुटतें व त्याला कुगंध येतो· मनुष्य झोंपेमध्यें दांत खातो· झोंप चांगली लागत नाहीं· व लागली असतां अकस्मात डचकतो· ताहान फार लागत्ये· व फार भयाभीत होतो· व मूर्छा भोंवळ कर्णक्ष्वेड येहीं करून पीडित होतो· व कधिं कोरडी ढांस करत्ये· व श्वासोश्वास घेववत नाहीं· उचकी लागत्ये· स्वरभेद होतो· तोंडाला फेंस येतो· कधिं हृत्कंप होतो· नाडी जलद व भरून चालत्ये· व नाडीचें स्फुरणें सारखें होत नाहीं· त्वरित व हळु असें होतें· पोट फुगून गुरगुरतें· ढेंकरा उह्लासा वमन हीं होतात· व कधिं भुक अगदी लागत नाहीं व कधिं अशी लागत्ये किं दुपट खातो· व पोट फुगून शूल फार होतो· पोटांत टोंचल्या सारिखी किंवा फाडल्या सारिखी पीडा होत्ये· व ती पीडा एकास्थला पासून अन्य स्थला प्रत जात्ये· व पोटांत अन्न नसलें तर ती पीडा फार होत्ये· भोजन केल्या नंतर शांत होत्ये· कधिं पोट फुगतें· व कधिं ढाळ होतात· मूत्र गढूळ होतें· मळाला अति कुगंध येतो· कधिं अम्लिका होत्ये· व मनुष्यानें फार भोजन केलें असतां कांहीं हित होत नाहीं· तो तसाच रोडका असतो· कधिं मलद्वाराजवळ कंड अशी फार खात्ये· किं जिणें करून मनुष्य मूर्छित पडतो· व कधिं मलावरोध होतो· तंद्रा काळजी इत्यादिक होतात· हीं सर्व लक्षणें कांहीं एका मनुष्याला एका वेळेस होत नाहींत· त्यांमधून कांहीं फार करून होतात· त्यांतें सांगतो· कनीनिका मोटी होत्ये· तोंडाला पाणीं सुटतें· क्षुधा विकृत होत्ये· शरीर कृश होतें· पोट मोटें होतें· व ताठतें· काळजी अवढ्या इत्यादिक होतात· कृमीं करून जीं लक्षणें होतात तीं फार वेळेस अन्य रोग भासवितात· यास्तव उपशयानुपशयें करून किंवा अन्य लक्षणें करून अन्य रोग निश्चित झाला नसतां तीं लक्षणें कृमींचींच असें समजावें· त्यांचे वर्णनांचा शेवट कोणीं करूं इच्छिल तर होणार नाहीं· असें वाटतें·

या प्रकारें सामान्य कृमींचीं लक्षणें सांगीतलीं आतां विशेष कृमींचीं लक्षणें सांगतो·

दीर्घ कृमीं· हे झाले असतां पोटांत शूल होतो· कुशींमध्यें कांहीं प्राणीं संचार करित आहेत· असें वाटतें· व कुशी जड झाल्याशा वाटतात· पक्काशयांत टोंचल्या सारिखी किंवा खरवडल्या सारिखी पीडा होत्ये· कांहीं कालानें पोट मोटें होतें· व त्यांत थंडसें वाटतें· भुक फार लागत्ये· व पुष्कळ जेवलें असतांही मनुष्य रोडका असतो· व निर्बलपणा अधिक होतो·

होतो· मुखाचा रंग सांवळा होतो· डोळ्यांतली बाहुली मोटी होत्ये· डोळे पाण्यांनें भरून येतात· भोंवळ येत्ये ·उश्वासे होतात· शरीर कांपतें· मलद्वारा मधून लिंबाचे किंवा भोंपळ्याचे बिया सारिखे पदार्थ पडतात· ते या कृमींचे तुकडे आहेत· व या कृमींचें एक अपूर्व लक्षण नासिका शुष्क होऊन नासावंश नाठतो· व या कृमींचे आंकडे आंतड्याचे आंतल्ये त्वचेला लागलेले असतात· यास्तव कधिं हीं लक्षणें फार भयकारक होतात· असें जाणावें·

क्षुद्र कृमीं· येहीं करून मोट्या आंतड्यामध्यें आणि विशेषें करून उंदुकामध्यें मंद शूल होतो· व सर्वकाल फार कंड खात्ये· व फार तीव्र दुःख होतें· व येहीं करून आंतल्ये त्वचेचें रूप बदलतें· व हे आंवेला खातात· त्यामुळें आंव फार कमि होऊन तें स्थल कोरडें पडून फार व्यथा होत्ये· बाल व अशक्त मनुष्य यांचे पोटांत आंव फार असत्ये· यास्तव हे कृमीं फार करून त्यानां होतात· व त्यांनां निर्बलपण्यामुळें अन्य मनुष्यांपेक्षां व्यथा अधिक होत्ये असें जाणावें· व येहीं करून कोरडी ढांस लागत्ये· मनुष्य दांत खातो· नाकांत कुळकुळतें असें जाणावें·

वर्तुल कृमीं· यांचें तोंड फार तीक्ष्ण आहे· तेणें करून पोटांत विशेषें करून बेंबीचे देशांत टोंचल्या सारिखी किंवा विदीर्ण केल्या सारिखी शूलाची व्यथा होत्ये· व पोटांत गुड गुडा शब्द होतो· या प्रकारें हे भयकारक कृमीं आहेत· परंतु यांचें आंग फार सोंवळ आहे· यास्तव यानां तीव्र पदार्थांचा यत्किंचित् स्पर्श झाला असतां लाहान आंतड्यामधून मोट्ये आंतड्यांत येऊन लवकर बाहेर पडतात· व बलवंत ढाळकें करून ही बाहेर पडतात· या प्रकारें कृमींचें वर्णन केलें· आतां पूर्वी अनुक्त जीं कृमिघ्न औषधें त्यांतें सांगतो·

लसुन·
जालप·
हिंग·
सर्व प्रकारचीं तेलें·
कापुर·
एळ्याबोळ·
रेवाचिनी·
सक्मुन्या·
सोल्युश्यो आर्सेनिकेलिस·

पूर्वोक्त औषधां प्रमाणें हीं औषधें कामाचीं आहेत· या प्रकारें कृमिघ्नांचा सामान्य कृमींवर उपचार सांगीतला· आतां विशेष कृमींवर उपचार सांगतो·

दीर्घ कृमींवर उपचार·

यां विषयीं ओल्यमटेरे बिंथिने सर्वांपेक्षां उत्कृष्ट आहे· व एरंडेलही चांगलें आहे· हें आवशीस देऊन पाहांटेस रेवाचिनीचे शिर्याचें प्रमाण द्यावें· व सोल्युश्यो आर्सेनिकेलिस चांगलें आहे· याचें पूर्ण प्रमाण दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· व त्या वेळेस अगत्य असल्यास रेचकाचें प्रमाणही द्यावें· व डाळिंबीचे मूळाचे सालीचें पाचन चांगलें आहे· याचा द्यायाचा प्रकार पूर्वी लिहिला आहे· व यांवर कधिं लसुनही देतात·

क्षुद्र कृमींवर उपचार·

यां विषयीं हिंग चांगला आहे· याचें मिश्रण चिप्नळीनें मलद्वारांत सोडावें· किंवा मीठ पेजेंत अथवा दुधांत घिरघळवून त्याची चिप्नळी मारावी· किंवा एक्याबोळाची चिप्नळी मारावी· हीं तीन औषधें यांवर फार उत्कृष्ट आहेत· व कापुराचे मिश्रणामध्यें कापुर तिपट चौपट घालून त्याची चिप्नळी मारावी· किंवा एरंडेलाची मारावी· अथवा चुन्यांचे पाण्यांची मारावी· हीं तीन औषधें ही चांगलीं आहेत· व या कृमीं करून मोट्ये आंतड्यामध्यें आंवेची न्यूनता होत्ये· ती न्यूनता दूर व्हावयासाठीं स्निग्धकर व मृदुकर औषधयांचे मेलनाची चिप्नळी मारावी· व हे कृमीं कधिं उंदुकापासून लांब असतात· व कधिं लाहान आंतड्यामध्यें ही असतात· यामुळें यांचा नाश सहज आणि लवकर नुस्त्या चिप्नळीचे औषधें करून होत नाहीं त्यां विषयीं रेचक औषधें पोटांतही द्यावयास पाहिजेत· यास्तव कालोमेलाचें लाहान प्रमाण दोन तीन दिवस आवशीस द्यावें· नंतर पाहांटेस रेवाचिनी जालपाशीं किंवा सक्मुन्याशीं मिळवून द्यावी· अशा उपचारें करून हित झालें नाहीं तर ओल्यमटेरे बिंथिनें द्यावें·

वर्तुल कृमींवर उपचार·

यां विषयीं कुह्लीचीं कुसें फार चांगलीं आहेत· तीं पूर्वोक्ता प्रमाणें द्यावीं· यांचे पूर्वी एरंडेलाचें प्रमाण दिल्हें असतां हित अधिक होते· व हीं दिल्यानंतर दुसर्ये अथवा तिसर्ये दिवशीं एरंडेलाचें एक प्रमाण द्यावें· व हें औषध इतर कृमींवर ही चांगलें आहे· व यांवर कापुर विशेष कामाचा आहे· याचें मिश्रण एक औंसापासून तीन औंस पर्यंत द्यावें· हें औषध फार उत्तम आहे· कारण येणें करून या कृमींचीं· व इतर प्रकारच्या कृमींचीं आंडीं वांझीं होतात· यास्तव हें अन्य औषधाशीं मिळवून इतर प्रकारच्या कृमींवर

ही

ही द्यावें· व यांवर ओल्यमटेरे बिंथिने चांगलें आहे· पूर्वोक्ता प्रमाणें द्यावें· सर्व प्रकारचे कृमीं बाहेर निघाल्या नंतर पुनः त्यांची उत्पत्ति न होऊ या साठीं रोचकादिक औषधें द्यावीं· जेहीं करून शरीरास बल येई· व त्यां मध्ये आसिदम म्युर्याटिकम घालावें तेणें करून हित अधिक होतें असें जाणावे·

पूर्वोक्त सर्व औषधांचे शास्त्रार्थ·

औषधांचे मेलनें करून परस्परांचे गुण अधिक होतात·

जा औषधांतला सार पदार्थ त्याचे एका औषधामध्ये सर्व निघत नाहीं· आणि जें नुस्तेंही द्यावयास नीट नाहीं त्याचे वेगळ्ये वेगळ्ये औषधांचें एकत्र मेलन करून द्यावें· तेणें करून त्याचे पूर्ण गुण होतात· उदाहरण· बार्क औषधांतला सार पदार्थ त्याचे एका औषधामध्यें सर्व निघत नाहीं व तें दिल्हें असतां कधिं वमन होतें ह्मणोन त्याचें टिंत्युर पाचन रांधा यांचें एकत्र मेलन करून द्यावें· तेणें करून ज्वरादिकांवर त्याचे पूर्ण गुण होतात·

जा औषधांचे गुण सामान्य होतात· तसल्या दोन तीन औषधांचें परस्पर मेलन केलें असतां त्या मेलनाचे गुण एका औषधाचे गुणांपेक्षां द्विगुणित होतात· उदाहरण· बाह्व्याचे शेंगांतला गीर बारा द्राम दिल्हा असतां तसें तुरंजबीन चार औंस दिल्हें असतां जो रेच्चक गुण होतो त्या पेक्षां गीर आठ द्राम तुरंजबीन चार द्राम यांचे मेलनें करून द्विगुणित होतो असें जाणावें·

मदकारींचे परस्परांचे मेलनांचे गुण एका मदकारीचे पूर्ण प्रमाणांचे गुणांपेक्षां अधिक होतात·

अंगग्रह नाशकांचे मेलनांचेही अधिक होतात· तसे कडु रोचकांचे मेलनांचेही होतात· व सुगंध रोच्चकांचे मेलनांचे फार अधिक होतात· यास्तव औषधोत्पत्ति प्रकारामध्यें दालचिनीचें मिश्रित चूर्ण· नारिंगाचें मिश्रित पाचन· अफुचा मोदक· इत्यादिक मेलनें सिद्ध केलीं आहेत·

कोष्ठ बंधकांचे मेलनांचेही अधिक होतात· तसे वमकांचे मेलनांचेही होतात·

उदाहरण· टार्टर इमेटिक व ईपिकाक्युअन यांजपेक्षां यांचे मेलनाचे गुण अधिक होतात;

ढाळकांचे मेलनें करून त्यांचे दुर्गुण दूर होऊन सुगुण फार अधिक होतात· उदाहरण· इंद्राइनाचे अमिश्रित रांध्याचे गुणांपेक्षां मिश्रित रांध्याचे गुण फार उत्तम होतात· आणि येणें करून किमपी उपद्रव होत नाहींत अमिश्रितें करून फार करून होतात·

द्रावकांचे मेलनांचे गुण खचीत होऊन बलवंत होतात· तसे स्वेदकारींचे मेलनांचे गुण अधिक होतात·

कफघ्न औषधांनां फार करून एकल्यानांच देत नाहींत परस्परांचें मेलन करून देतात·

औषधाची योजना मनुष्याचे प्रकृतीच्या भेद जाणून तशी तशी करावी· भेद जाणल्यावांचून औषध देणें हा मूर्खपणा आहे· जसा कोणीं तांडेल गलबत कोणत्या बंद्रास जावयाचें आहे हें ठाऊक नसतां वारा चांगला आहे असें ह्मणतो तसा आहे·

जा औषधांचे गुण अन्य औषधाचे योगानें पक्वाशयावर किंवा अन्य अवयवावर अथवा सर्व शरीरावर सहज आणि चांगले होतात· तें औषध त्यांशीं मिळवावें· ह्मणजे·

पार्याचे औषधाशीं आंतिमनींचें औषध व अफुहीं मिळवलीं असतां त्याचे गुण सहज होतात· व उन्मादादि रोगामध्यें वमकें करून वमन होत नाहीं तेव्हां त्या औषधाशीं अफुचा अल्प भाग मिळवावा· तेणें करून प्रायः वमन चांगलें होतें· व चर्म उष्ण असून शुष्क असतां आंतिमनींचे औषधांचे किंवा अन्य बलवंत स्वेदकारी औषधाचे योगावांचून पल्विससिल्लेचे कफघ्न गुण होत नाहींत· तसें हें एकलें दिल्हें असतां बहुत करून याचे द्रावक गुणही चांगले होत नाहींत· कालोमेला बराबर किंवा पार्याचे अन्य औषधाबराबर दिल्हें असतां ते गुण चांगले होतात·

टार्टर इमेटिकाचे संयोगें करून खारट रेचकांचे गुण चांगले होतात· व अफूचे योगानें आंतिमनीचे औषधांचे स्वेदकारी गुण अधिक होतात· व ईपिकाक्युअनाचे मेलनें करून वनस्पतींचे ढाळक औषधांचे गुण अधिक होतात· उदाहरण· जालप पंधरा ग्रेन ईपिकाक्युअन दोन तीन ग्रेन या दोहोंचे मेलनें करून जालपाचे अर्ध द्रामापेक्षां रेच अधिक होतात·

ढाळकाशीं आणि द्रावकाशीं कडु रोचकाचें फाण्ट मिळविलें असतां तें त्या औष-

धांस

यांस साहाय्य होतें असें जाणावें·

जा· औषधांतील जो पदार्थ उपद्रव करतो तो त्या पासून पृथक करावा· उदाहरण कांथारिदेसाचे आंत एक पदार्थ आहे जेणें करून मूत्र कृछ्रादिक उपद्रव होतात· तो पदार्थ कांथारिदेस पाण्यांमध्यें उकळविलें असतां पाण्यांत निघून त्या पासून दूर होतो· व कांथारिदेसाचे स्फोटकारी गुण किमपी दूर होत नाहींत· तसेच राहातात· असें जाणावें

जा औषधांना दुर्गुण आहेत ते दुर्गुण जेणें करून शांत होतील असें औषध त्यांशीं मिळवावें·

उदाहरण· ग्युयक स्वेदकारी देऊन रेच झाले असतां त्याचे गुण वायूवर होत नाहींत· तसे आंतिमनीचीं औषधें आणि ईपिकाक्वुअन यांचे स्वेदकारी गुण होत नाहींत तसे पल्विस् सिल्लेचे द्रावक गुण होत नाहींत· यास्तव रेचांचे निवारणासाठीं त्यांशीं अफू मिळवावी· या प्रमाणें अन्य स्वेदकारी व द्रावक यांविषयीं जाणावें· व पुंबी आसीटास पोटांत शूल न व्हायासाठीं अफुचे लाहान प्रमाणाशीं मिळवून द्यावें· व वमकाचे गुण नुस्त्या पंक्वाशयावर होवयासाठीं त्याला लादनमाचे पांच साहा बिंदूशीं मिळवून द्यावें· तेणें करून त्याचे गुण आंतड्यावर किमपि होत नाहींत· व उष्ण सुगंध तेल अथवा टिंक्त्युर इत्यादिक पदार्थ कांहीं औषधाशीं मिळविले असतां त्या औषधा पासून मुरडा व उह्मासा होत नाहीं·

सोनामुखीचे फाण्टांत व पाचनांत खारट ढाळक मिळविलें असतां मुरड्याचें निवारण होतें· व इंद्राइनाचे मिश्रित रांध्याशीं हैय्योस्यामी एक्स्त्राक्टमाचें मेलन केलें असतां मुरडा व उह्मासा होत नाहीं·

तुरटीशीं जायफळ किंवा इतर उष्ण सुगंध पदार्थ मिळविले असतां उह्मासादिक होत नाहींत· व पार्याचे सर्व औषधें करून रेच व आंतड्यास कांहीं विकृति होत्ये· या उपद्रवांचें निवारण औषधांशीं अफू मिळवली असतां होतें· व त्याचे कारोसिव् सब्लिमेट औषधाचे उपद्रवांचें निवारण पेज व मृदुकर औषध व सार्सापारिल्लाचें मिश्रित पाचन यांचे पानें करूनही होतें· व अफू करून पोट न फुगायासाठीं तिशीं एळ्याबोळ किंवा कालोमेल मिळवून द्यावें· या विषयीं एळ्यापेक्षां त्याचें मिश्रित पाचन चांगलें आहे·

जा औषधें करून जे उपद्रव होतात त्यांचें निवारण कधीं त्याचे औषधाचे भेदें करून किंवा देण्याचे भेदें करून किंवा प्रमाणाचे भेदें करून होतें· ह्मणजे कांहीं औषधांचें पाचन दिल्हें असतां उपद्रव होतात त्याचे फाणटें करून होत नाहींत· रेवाचिनीचें

शिम्यांचें

शिऱ्याचें लाहान प्रमाण अ[illegible] अवधानें दिल्हें असतां उह्मासे होत नाहींत· अम्लिका असतां वायु पीडेवर कोलचिसिवेनम् दिल्हें तर तेणें करून उह्मासादि उपद्रव होतात त्याचे पूर्वीं किंवा बराबर मग्निश्या दिल्हें असतां होत नाहींत असें जाणावें·

जा औषधांचे गुण भिन्न प्रकारानें होतात तशा औषधांचें मेलन करावें· ह्मणजे कांहीं एक ढाळकें करून आंतड्याचे एकूसहेलंत वाहिन्यां पासून व अन्यें करून आंव उत्पन्न करणारे पिंड त्यां पासून रसाचें विसर्जन फार होतें व कांहीं ढाळकें करून आंतड्याचे जवळचे पदार्थां पासून रसाची उत्पति अधिक होत्ये अशा दोन तीन औषधांचें मेलन करून दिल्हें असतां गुण अधिक होतात· या प्रकारें स्वेदकारी इत्यादिकां विषयीं जाणावें·

भिन्न भिन्न लक्षणांचे निवारणास्तव त्या त्या लक्षणांचे निवारक औषधांचें मेलन करून द्यावें· ह्मणजे गुदग्रहा बराबर वायू करून पोटांत मुरडा असला तर ढाळक आणि अंगग्रह नाशक यांचें मेलन द्यावें·

रोगी फार निर्बल असला तर ढाळक आणि रोचक यांचें मेलन द्यावें· या विषयीं लोखंडाचीं कांहीं औषधें इथर व आम्मोन्या· हीं चांगलीं आहेत· व जलोदराचें पाणी न्यून होऊन रोग्याचें बल न्यून न होऊ यासाठीं त्या रोगावर सक्मुन्या जालप इत्यादिक ढाळकें व रोचक या दोहोंचा उपचार करावा· तसा आर्त्तव नष्ट झालें असतां ही करावा· व प्रति दिवशीं जाचें पोट फुगतें तें प्राय: पित्ताचे न्यूनते करून फुगतें याज करितां त्याला एळ्याबोळ आणि ब्लुपिल यांचें मेलन द्यावें· पहिल्या औषधें करून आंतड्याचें गमन अधिक होतें दुसर्या औषधें करून पित्ताचा प्रवाह अधिक होतो· व रेच आणि घाम हे दोन एकाकालीं व्हावयास इच्छितात तर रेचकाशीं टार्टरइमेटिक मिळवून द्यावें· व या विषयीं एळ्याबोळाचें मिश्रित चूर्णही चांगलें आहे·

संग्रहणी मध्यें आंतड्यांतील पदार्थ तीव्र होऊन अम्लिका रोग झाला असतां कोष्ठबंधक मदकारी व अम्लनाशक यांचें मेलन द्यावें· कोष्ठबंधकें करून रसाची उत्पत्ति न्यून होत्ये· मदकारी करून आंतड्याची पीडा न्यून होत्ये अम्लनाशकें करून अम्लिका दूर होत्ये·

वृद्ध मनुष्याला फार दिवस खोकला झाला असतां प्राय: फुप्फुसांत व कंठामध्यें कफाचें सांचणें होतें तें दूर व्हावयासाठीं बोळ व सल्फास जिन्सि यांचें मेलन द्यावें·

जलोदरामध्यें फार करून निर्बलपणा होतो यास्तव द्रावक रोचक यांचें मेलन द्यावें·

वें· तो फार झालातर साधारण रोचकापेक्षां सुगंध रोचकें व इथरादिक चांगलीं आहेत· त्यांचें पल्हविस् सिल्हेशीं किंवा इतर द्रावकाशीं मेलन करून द्यावें·

अन्येद्युस् तृतीयक चतुर्थकज्वर यांवर बार्की बराबर कधिं ढाळक द्यावें लागतें त्याविषयीं रेवाचिनी अथवा एळ्याबोळाचें औषध चांगलें आहे व कधिं पाऱ्याचें औषधंही चांगलें आहे·

अम्लिकेबर अम्लनाशक आणि रोचक यांचें मेलन द्यावें· अम्लनाशकें करून अम्लिका दूर होत्ये· रोचकें करून अजीर्ण दूर होतें·

नष्ट झालेल्यां आर्त्तवा बराबर अम्लिका असतां ऋतूद्भव आणि अम्लनाशक यांचें मेलन द्यावें·

अश्मरीहारक औषधांचें मदकारी औषधां बराबर द्यावयाचें अगत्य लागलें असतां तीं अफु आणि हैयोस्यमस यांबराबर द्यावयास चांगलीं आहेत· परंतु अफू करून पोट फुगतें हैयोस्यमसें करून फुगत नाहीं यास्तव अफु पेक्षां तें चांगलें आहे·

अनुपानें करून औषधांचें रूप गंध स्वाद इत्यादिक रोग्यास चांगलें वाटत असें करावें· व औषध कांहीं काल राह्यलें असतां वाईट न झालें पाहिजे यासाठीं कांहीं पदार्थ त्याशीं विरुद्ध नसेल तो मिळवावा· उदाहरण· एळ्याबोळाचे मिश्रित पाचनांमध्यें वेलदोड्यांचें मिश्रित टिंक्चुर घालतात तेणें करून तें चांगलें राहातें व मलमामध्यें थोडी खडीसाखर घातली असतां तें चांगलें राहातें· व वनस्पतिंचे फाण्टां मध्यें लवंगा ओंवा शोपा पुदिना इत्यादिक सुगंध पदार्थ घातले असतां फाण्टें चांगलीं राहातात असें जाणावें·

जांचे गुण बलवंत होत नाहींत त्यांशीं अन्य औषधांचें मेलन करून बल्वंतहोत असे करावे·

जांनां दुर्गुण आहेत ते अन्य पदार्थांचे मेलनें करून दूर करावे· व जीं अल्प मानाचीं व फुस्फुशीत आहेत यामुळें सहज देतां येत नाहींत· त्यांशीं अन्य पदार्थ मिळवून सहज देतां येत अशीं करावीं·

कालोमेलादिक जड औषधांचें पाण्यांशीं मेलन होत नाहीं यास्तव तीं जाड पदार्थांत द्यावीं· तसें राळ मिश्रित औषधांचें गोंदाचे पाण्यां वांचून नुस्त्या पाण्यांशीं मेलन होत नाहीं तीं त्यासहित द्यावीं·

जा औषधांचे संयोगें करून परस्परांचे गुणांचा नाश होतो· असल्या औषधां-

चीं

चा संयोग करूं नये· उदाहरण· पुंबी आसीटास व आसिदम सल्फ्युरिकम अथवा जा खारट औषधांचे नामामध्यें सल्फास शब्द आहे तें याचा संयोग झाला असतां दोघांचे गुणांचा नाश होतो·

कांहीं पाचनांमध्यें सुगंध पदार्थ घालायाचे असले तर पाचन सिद्ध करून उतरत्ये वेळेस घालावे· सिद्ध करत्ये वेळेस घातले असतां त्यांचे सर्व गुण उकळण्यानें वाफे बरोबर जातात· असें जाणावें·

सर्व औषधांना विशेष प्रमाण आहे· परंतु कांहीं औषधें उक्त मानापेक्षां अधिक दिल्हीं असतां गुण अधिक करित नाहींत· औषधांचे गुण प्रायः प्रमाणा सारिखे होतात· ह्मणजे कापुर पांच ग्रेन दिल्हा असतां शरीर कार्यांची न्यूनता होत्ये· आणि घाम निघतो· वीस ग्रेन दिल्हा असतां उश्वासे होतात आणि शरीर कार्यांचें आधिक्य होतें· व अफूचें मोटें प्रमाण दिल्हें असतां निद्रा येत नाहीं· व खारट ढाळफांचें मोटें प्रमाण दिल्हें असतां वमन होतें· व तुरटी एक औंस दिल्ही असतां रेच फार होतात· व आंतिमनीचे औषधांचे प्रमाणा सारिखें वमन होतें· व रेच होतात· व घाम निघतो असें जाणावें· व फार पदार्थ असे आहेत कि त्यांचे भिन्न भिन्न मार्गें करून भिन्न भिन्न गुण होतात·

पूर्वीं वय स्त्री पुरुष भेद प्रकृति बल काल संवय भोजन जाती देश रोगाचा काल विशेष प्रकृति औषधाच्या वीर्य भेद यांतें सर्वकाल जाणून औषधाचें प्रमाण निश्चित करावें·

पुरुषांपेक्षां स्त्रियांना औषधाचें प्रमाण अल्प द्यावें· व औषध कांहीं दिवस पर्यंत दिल्हें असतां प्रायः त्यांचे गुण न्यून होतात· परंतु सर्व औषधांचे होत नाहींत· वमक औषध फार दिवस पर्यंत दिल्हें असतां त्यांचे गुण न्यून होत नाहींत अधिक होतात असें जाणावें·

रोगाचे प्रारंभकालीं जितकें प्रमाण द्यावें तितकें प्रमाण कांहीं दिवसांनंतर द्यावयास सदैव नीट नाहीं कारण रोगें करून बळ न्यून होतें·

कांहीं औषधें अशीं आहेत कि मोटें प्रमाण दिल्हें असताही मध्यम प्रमाणांपेक्षां गुण अधिक होत नाहींत· उदाहरण· इपिकाक्युअनाचें मोटें प्रमाण दिल्हें असतां गुण खचीत होतो· अधिक होत नाहीं· तसें एक्याबोकाचें मोटें प्रमाण दिल्हें असतां गुण खचीत होतो· अधिक होत नाहीं· या प्रमाणें अन्य औषधेंही आहेत·

फार दिवस राहिल्यानें ज्यांचे गुण न्यून होतात तसलीं औषधें सिद्ध करून त्यांचे

बळ

बल कळायासाठीं पहिल्यानें त्यांचें प्रमाण अल्प द्यावें· नंतर हळु हळू अधिक करावें· तशीं औषधें दिजिटेलिसादिक आहेत असें जाणावें·

ढाळक औषध आवशीस किंवा मोठ्या पाहांटेस द्यावें· निद्रा लागल्या नंतर आंतड्याची गति कांहीं मंद होऊन त्या औषधाचे पूर्ण गुण होतात· तशीं म्युकक ब्लुपिल इत्यादिक औषधेंही द्यावीं· व उष्णें करून द्रावक औषधांचे गुण विपरीत ह्मणजे स्वेदकारी होतात· यास्तव त्यांना रात्रीस देऊं नये· ज्वरादिक कठीण रोगांवर ढाळक दिवसास रेच होतील असें द्यावें· तेणें करून निद्रादिकांचा भंग न होऊन रोग्याला सुख होतें· रात्रीस रेच झाले असतां उपद्रव होतो· व कांहीं औषध रोगाचे अवस्थे सारिखें द्यावें· उदाहरण· ज्वरामध्यें चर्म फार शुष्क आणि उष्ण असतें त्यासमयीं अफु दिल्ही तर उष्ण अधिक होतें· ताहान आणि काळजी लागत्ये· उष्णता न्यून होत्येवेळेस चर्म अल्प ओलसर असतें त्यासमयीं दिल्ही असतां निद्रा लागून आराम होतो असें जाणावें· व अल्प ज्वराचे परिहारार्थ वमक औषध द्यावयास इच्छितात तर रात्रीस द्यावें· याचें कारण वमन झाल्या नंतर निद्रा लागून घर्म निघून फार हित होतें· व जांचे गुण शोषक वाहिन्यां द्वारा होतात· तीं औषधें पाहांटेस द्यावीं· व स्वेदकारी औषधें अन्न सर्व जिरल्या नंतर द्यावीं· जिरत्ये वेळेस दिल्हीं असतां त्यांचे गुण होत नाहींत· व औषधाचें पुनः प्रमाण देणें तें त्याचे पूर्व प्रमाणांचे गुणांचा शेवट जवळ आला असें पाहून द्यावें· व अफू करून मदकारीचे पहिले परिणाम करावयास इच्छितात तर तिचें लाहान प्रमाण अल्प अल्प अवधीनें द्यावें· निद्रा आणावयास व शूलादिक पीडा दूर करावयास इच्छितात तर तिचें मोटें प्रमाण लांब अवधिनें द्यावें· व दिजिटेलिस पारा इत्यादिक औषधांचे गुण शरीरांत सांचून अकस्मात प्रत्यक्ष होतात· यास्तव हें स्मरणांत ठेवून तीं चौकशीनें द्यावीं·

विशेष प्रकृति ह्मणजे कांहीं एक मनुष्याला रेचक दिल्हें असतां वमन होतें· व अन्य मनुष्याला वमक दिल्हें असतां रेच होतात· व कांहीं एकांना दुध तुप दहीं मिर्चें लंवगा इत्यादिक सोसत नाहींत· व कांहीं एकानें बदाम भक्षिलें असतां चर्मावर पुरळ येतो इत्यादि प्रकारें जाणावी·

देश· उदाहरण· उष्ण देशांत पार्याचे औषधाचें मोटें प्रमाण द्यावयास चांगलें आहे· तसें शीतळ देशांत चांगलें नाहीं· अल्प दिल्हें पाहिजे असें कांहीं औषधां विषयीं जाणावें·

वय भेदें करून औषधाचें प्रमाण न्यूनाधिक करायाचा प्रकार सांगतो·

प्रौढास·	१	रूप·
एका वर्षाचास·	$\frac{१}{१२}$	द्वादशांश·
दोन वर्षांचास·	$\frac{१}{७}$	सप्तमांश·
तीन वर्षांचास·	$\frac{१}{५}$	पंचमांश·
चार वर्षांचास·	$\frac{१}{४}$	चतुर्थांश·
साहा वर्षांचास·	$\frac{१}{३}$	तृतीयांश·
आठ वर्षांचास·	$\frac{२}{५}$	दोन पंचमांश·
दाहा वर्षांचास·	$\frac{५}{११}$	पांच एकादशांश
बारा वर्षांचास·	$\frac{१}{२}$	द्व्यंश·
चवदा वर्षांचास·	$\frac{३}{५}$	तीन पंचमांश·
सोळा वर्षांचास·	$\frac{२}{३}$	दोन तृतीयांश·
अठरा वर्षांचास·	$\frac{३}{४}$	तीन चतुर्थांश·
वीस वर्षांचास	$\frac{४}{५}$	चार पंचमांश·

अतःपर साठ वर्षांपर्यंत पूर्ण प्रमाण द्यावें· नंतर पांच वर्षांचे अंतरानें विलोम प्रकारानें प्रमाण न्यून करित जावें·

औषधांचे कांहीं विशेष उपचार सांगतो·

मळद्वारांत चिपूनळीनें सोडायाचीं औषधें·

हीं फार उत्तम आहेत· बहुत कार्यांविषयीं हितावह होतात· तीं कार्यें सांगतो·

ढाळक दिल्यानंतर त्याचे गुण झाले नाहींत· तर त्याचे सोहाळ्यासाठीं ढाळक चिपूनळीनें मळद्वारांत सोडावें· व जाला वमन होत आहे व जो फार निर्बळ आहे यामुळें त्याला गळमार्गानें ढाळक देतां येत नाहीं त्याचेही मळद्वारांत सोडावें· व शरीराचा निर्बळपणा करावयाविषयीं तंबाकूचें काढ सोडायास उत्तम आहे· हें त्याजवर लिहिलें आहे· व कोष्ठबंधक गुण व्हावयासाठीं थंड पाणी तुरटीचें पाणी इत्यादिक सोडायास चांगलीं आहेत· व मुळव्याधीवरही उत्तम आहेत· व मदकारी गुण व्हावयासाठीं लादनम आणि पेज यांचें मेळन सोडायास उत्तम आहे· व पोटांतल्या

वायूचे नाश विषयीं हिंग व ओल्यमटेरेबिंथिने हीं चांगलीं आहेत· त्यांवर ही या विषयीं कांहीं लिहिलें आहे· व क्षुद्र कृमींचे नाश विषयीं एळ्याबोळादिक चांगलीं आहेत; व मृदुकर आणि स्निग्धकर गुण व्हावयासाठीं तेलादिक चांगलीं आहेत· व कांहीं कारणेंकरून अन्नादिक पोटांत गळमार्गानें जात नाहींत तेव्हां शरीराचें पालन व्हावयासाठीं दुध पेज इत्यादिक चिपनळीनें मलद्वारांत सोडावीं असें जाणावें·

चिपनळीनें सोडायासाठीं अनुपाना सहित औषध जन्मानंतर एक वर्ष पर्यंत एक औंस नंतर दाहा वर्षें पर्यंत तीन किंवा चार औंस नंतर पंधरा वर्षें पर्यंत साहा अथवा आठ औंस घ्यावें· नंतर बारा औंसापासून सोळा औंस पर्यंत घ्यावें· परंतु त्यासहित मदकारी औषध व क्षुद्र कृमींचें नाशक औषध चार औंसापेक्षां अधिक घेऊंनये· अधिक घेतलें असतां बाहेर निघतें· व अनुपानाशीं मुख्य औषध पोटांत द्यावयाचे प्रमाणापेक्षां त्रिगुणित मिळवावें असें जाणावें·

लबदा·

औषधांचें मेलन चर्मादिकांवर लावावयासाठीं लापशी सारिखें किंवा खोळ्यां सारिखें करतात त्याला लबदा ह्मणतात· वेगळ्ये वेगळ्ये औषधांचे लबद्याला वेगळे वेगळे गुण आहेत· त्यांतें सांगतो·

मोहर्यांचा लबदा स्फोटकारी आहे· व कोळशाचा लबदा चांगला मांस नाश निवारक आहे· व कोन्यम दिजिटेलिस हेयोस्यमस यांचे लबदे चांगले पीडा निवारक आहेत· व प्लुंबी आसीटासाचा लबदा चांगला शीतकर आहे· व जवसादिकांचा लबदा चांगला स्निग्धकर आहे असें जाणावें·

धूमपान·

ह्मणजे धुत्र्याचा बिया व तंबाकु इत्यादिकांचा धूर पिणें· हें दम्यावर व इतर रोगांवर चांगलें आहे· याचा प्रकार त्यांवर लिहिला आहे·

वाफ·

पीनस इत्यादिकांमध्यें बहुत पीडायुक्त खोखला होऊन कफाचें विसर्जन होत नाहीं तेव्हां उष्ण पाण्याची वाफ तोंडांत घ्यावी· अथवा सिर्क आणि उष्ण पाणी यांचे मेल-

नांची घ्यावी· तेणेंकरून हित होतें · ही वाफ गलांकुरावर ही चांगली आहे· तशी फुफुस दाहावर त्याचें बल अन्य उपचारानें न्यून झालें असतां चांगली आहे· तेणेंकरून कफाचें विसर्जन होतें· असें जाणावें· जाची वाफ घ्यायाची असेल तो पदार्थ तोटीचे झारींत घालून वर दापण ठेवून तोटीनें वाफ तोंडांत घ्यावी·

वाफारा·

कांहीं रोगांवर कांहीं औषधांचा वाफारा कामाचा आहे· त्याचा प्रकार ॰ ब्लुपिल शेणाशीं मिळवून शेण उन्हांत शुष्क करावें नंतर त्याला प्रदीप्त करून वाफारा द्यावा आणि त्यावेळेस मनुष्याला ऊर्णावस्त्र पांघरायास द्यावें· हा वाफारा ज्वर वायू इत्यादिक रोगांवर चांगला आहे· असें अन्य औषधां विषयीं ही जाणावें·

* * *

औषध कल्पना विधीचे प्रथम भागाचें शुद्धिपत्र·

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
२०	४	आसन्	आरान्
२१	७	थालव	थालब
२१	८	लोवान	लोबान
२५	१४	गोंदा	गोदा
२६	१६	बैलद	बैल्दद्
३८	८	सेटि	सेंटि
४४	१०	सेप्रसर्पेतैन	सेप्रसटपेंतैन·
४८	१	त्याचे	त्यांचे
५६	१	दिवसां	दिवशां
८२	२७	त्यावर	त्यांवर
८७	१९	पायाचे	पायांचे
८८	२२	तो	तें
८८	२२	चांगला	चांगलें·
८८	२३	तसा	तसें
८८	२४	चांगल	चांगलें
८८	२४	द्यावा	द्यावें
८८	२५	द्यावा	द्यावें·
८९	२	आंथेमिदिस	आंथेमिरा
८९	७	त्याचीं नावें	त्यांचीं नावें
८९	१७	द्यावा	द्यावें
९४	२०	जलोदारादिक	जलोदरादिक·
९८	१०	वाफ	वाफा
१०८	२०	अंत्रवृद्धि झालें	अंत्रवृद्धि झाली
११२	२८	मेलनाचे	मलमाचे·
११७	१२	रेचक	रोचक·

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
१४३	१०	कांठातील	कंठातील
१४६	११	तीसग्रेन	तीनग्रेन
१५५	१३	सुगंध	कुगंध
१६९	१५	फारउष्ण	फारतिखट
१७७	२२	कोरोसिब्	कोरोसिव्
१८०	२	मांचा	मोंचा

लतीन ·	इंग्रेजी ·
आसिदा ·	आसिद्स ·

यांचा स्वाद आंबट आहे · जा पदार्थाना इंग्रेजी भाषेंत आल्कली · एर्थ स्वर्णादिक धातुंचें ओक्सिद ह्मणतात · त्यां मधून कोणत्या एकाचें या आसिदांमधून कोणत्या एकाशीं मेलन केलें असतां दोघांचे गुण दूर होउन अपूर्व नवीन गुण उत्पन्न होतो त्या मेलनाला इंग्रेजी भाषेंत न्युत्रल्साल्त ह्मणतात · वनस्पतीचे मेलनाचा निळा · जांभळा · हिरवा · रंग आसिदाचे संयोगें करून तांबडा होतो · हीं आसिदें पुष्कळ आहेत · परंतु औषधार्थ दोन तीन कामाचीं आहेत · याना कांचेचे किंवा बिलोराचे कुपींत ठेवून जा जातीची कुपी असेल त्या जातीची गुडदी घालावी ·

लतीन ·	इंग्रेजी ·
आसिदम् आसेटिकम् दिल्युटम् ·	दिल्युटेद् आसेटिक आसिद ·

सिर्क एक गालन घेउन बिलोराचे रिटोर्टमध्यें घालून तें रिटोर्ट पात्रांत वाळु घालून ती मध्यें अर्धेसें पुरून वाळुपात्र अग्निवर ठेवावें नंतर त्या पासून नलिका मार्गानें पदार्थ येतो तो थंड बिलोरी पात्रांत धरावा · पहिल्यानें एक पैंट येतो तो टाकून मागला साहा पैंट धरावा ·

याचे गुण नुस्त्या सिर्का प्रमाणें आहेत · परंतु स्वच्छ केलेलें औषधार्थ चांगलें आहे · याचे गुण शीतकर औषधांमध्यें सांगीतले आहेत ·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
आसिदम् बेन्झोइकम ·	बेन्झोइक् आसिद ·	उदाचें · फूल ·

उद एक पौंड घेउन डमरु यंत्रांत घालून तें यंत्र पात्रांत वाळु घालून ती

मध्यें अर्धेसें पुरून तें पात्र अग्निवर ठेवावें· नंतर त्याला उष्म मानाच्या तीनशें कक्षा होत तों पर्यंत अग्नि संयोग करून फूल काढावें· नंतर हळु हळु उष्मपणा अधीक करावा· जों पर्यंत दुसरें फूल न येई· नंतर फुलाला मृदु असून जाला खळ नाहीं असल्या कागदांत घालून चेपावें तेणेंकरून त्यांतील तैलांश कागदाला जाउन फूल स्वच्छ होतें: नंतर त्याला पुनः यंत्रांत घालून पूर्ववत् फूल काढावें परंतु उष्मपणा उष्म मानाच्या चारशें कक्षां पेक्षां अधीक होउं देउं नये·

हें फूल·पांढरें व पक्ष्याचे पोटाचे लाहान पिसा प्रमाणें हलकें आहे याचा गंध उत्तम आहे· हें पूर्वकाली दाहा अथवा वीस ग्रेन कफ काढावयासाठीं देत असत · सांप्रत देत नाहींत· कापुराचे मिश्रित टिंक्त्युरामध्यें हें आहे· परंतु याचें हित फार होत नाहीं·

लतीन·	इंग्रेजी·
आसिदमसेत्रिकम्	सेत्रिकआसिद·
लिंबूचा रस·	एक पेंट·
स्वच्छ खडी·	एक औंस· अथवा रसाचा आंबटपणा दूर करावयास जितकी लागेल तितकी·
आसिदम् सल्फ्युरिकम् दिल्युटम·	नउ औंस·

लिंबाचे रसाला उष्म करून त्यामध्यें खडी थोडी थोडी घालून मिळवावी· मग गाळ तळास गेल्यानंतर वरला पातळ पदार्थ टाकावा·या गाळाला इंग्रेजी भाषेंत सेत्रट आफलैम ह्मणतात· तो गाळ उष्म पाण्यानें बहुंतवेळ धुवून शुष्क करावा· नंतर त्या शुष्क चूर्णाला आसिदम् सल्फ्युरिकम् दिल्युटमामध्यें घालून सवीसपळें पर्यंत उकळावें नंतर सगळ्याला बारीक वस्त्रामध्यें घालून पिळून गाळावें नंतर फिरून कागदामध्यें गाळावें हा गाळलेला पातळ पदार्थ मंदाग्नीवर आटवावा· जों पर्यंत किं निवाल्यानंतर त्यांत क्षार रज उत्पन्न होतील नंतर स्वच्छ करावयासाठीं त्यांना पाण्यामध्यें विरघळवून गाळून अग्निवरठेउन पूर्ववत् रज होत असें करावें याप्रमाणें दोन तीन वेळ करावें·

हें औषध स्वच्छ क्षार रजां प्रमाणें पांढरें आहे· याला गंध नाहीं स्वाद फार आंबट आणि याला आसिदाचे दुसरे गुणही आहेत· याचे गुण लिंबूचे साजुक रसा प्रमाणें आहेत· ते अन्यस्थळीं लिहिले आहेत· ह्मणोन फिरून सांगीतले नाहींत· साडेनउ द्राम हें औषध घेउन एक पेंट पाण्याशीं मिळवलें तर मे·

लन साजुक रसाप्रणें होतें आणि सालेनं मिक्स्त्युर सिद्ध करावयाचे उपयोगी पडतें

सैत्रिक आसिदाचे अम्लांशाचा नाश अम्लनाशकांचे केवढ्या विभागें करून होतो त्यांतें सांगतो·

सैत्रिक आसिद·	अम्लनाशक औषधें·	
याचे सव्वीस ग्रेन २६	आम्मोन्येसक्कार्बोनास·	एक स्क्रुपल·
याचे अठरा ग्रेन १८	पोटास्से सक्कार्बोनास·	एक स्क्रुपल·
याचे पंधरा ग्रेन १५	पोटासे कार्बोनास·	एक स्क्रुपल·
याचे बारा ग्रेन १२	सोदे सक्कार्बोनास·	एक स्क्रुपल·
याचे दाहा ग्रेन १०	सोदे कार्बोनास·	एक स्क्रुपल·

परस्परांचे मेलनेंकरून अम्लांशाचा नाश होतो·

लतीन·	इंग्रेजी·
आसिदम्म्युर्याटिकम·	म्युर्याटिक आसिद·किंवा स्पिरित्सओफसाल्त
अग्निवर फार शुष्क केलेलें मीठ·	दोन पोंड·
आसिदमसल्फ्युरिकम·	वजनानें वीस औंस·
अर्काप्रमाणें काढलेंलें पाणी·	दीढ पैंट·

दीढ पैंट पाण्यामधून अर्ध पैंट पाणी बिलोराचे रिटोर्टमध्यें घालून त्यामध्यें थोडें थोडें आसिद घालून मिळवावें· मेलन थंड झाल्यानंतर त्यांत मीठ मिळवावें· नंतर उरलेलें पाणी बिलोराचे पात्रांत घालून त्या पात्राला रिटोर्टाचे नळीशीं जोडावें· नंतर अन्य पात्रांत वाळू घालून तीमध्यें रिटोर्टाला अर्धें पुरून वाळुपात्र अग्निवर ठेवावें· नंतर रिटोर्टांतल्ये मेलनापासून नलिका मार्गानें पदार्थ त्या बिलोरी पात्रांत येतो तो अग्नीनें रिटोर्ट तांबडें होईं तों पर्यंत येउं द्यावा· या आसिदाचा तुला विशेष या प्रमाणें आहे· पाण्याचा तुला विशेष १००० असला तर याचा ११६० आहे· शंभर ग्रेन या आसिदाचे आंबटपण्याचा नाश सक्कार्बोनास् सोदेचे एकशें चोवीस ग्रेनेंकरून होतो·

हें आसिद चांगलें झालें असतां याचा रंग शुद्ध पाण्या सारिखा किंवा किंचित् पिवळट्सा असतो· येणेंकरून वनस्पति पदार्थांचा नाश होतो तसा हें

चर्मादिकांस लावलें असतां त्यांचाही नाश होतो· हें उघडें राहालें असतां यापासून पांढरी तीव्र वाफ निघत्ये· याला आसिदाचे इतर गुण आहेत· हें आसिद रोचक आहे· परंतु बहुतकरून या देशांत त्यास्तव देत नाहीत·

गुळण्याचे औषधाशीं याचें मेलन चांगलें व याची गुळणीही चांगली आहे· यास्तव अर्ध द्रामापासून दोन द्राम पर्यंत हें घेउन साहा औंस काहीं पातळ पदार्थांशीं किंवा गुळण्याचे औषधाशीं मिळवून गुळण्या देतात· वाईट गलांकुरावर अथवा त्याजनंतर काहीं व्रण असलातर त्यावर याची गुळणी चांगली आहे· कृमिघ्न औषधेंकरून कृमीचा नाश झाला असतां पुनः त्यांची उत्पत्ति न होण्याविषयीं हें आसिद चांगलें आहे· यास्तव याला उदकाशीं अथवा कडु रोचकाचे पाचनाशीं किंवा त्याचे फाराटाशीं मिळवून द्यावें· जा वेळेस मूत्रा बरोबर पांढरी रेती पडत्ये· तेव्हां ती न्यून होण्यासाठीं हें औषध चांगलें आहे· यास्तव यांत साखर घालून याला सुगंध पाण्याशीं किंवा गोंदाचे पाण्याशीं मिळवून द्यावें· बहुत रोगी लोक एक्या खोलींत किंवा त्यांचीं स्थलें जवळ जवळ असून काहीं कुगंध येऊं लागला तर त्याचा नाश होण्यासाठीं या आसिदाची तीव्र वाफ चांगली आहे· ती उत्पन्न होण्याचा प्रकार सांगतो· अग्निवर फार शुष्क केलेलें मीठ एक औंस घेउन चिनी मृत्तिकेचे पात्रांत घालून तें पात्र खोलींत ठेवून मिठावर साहा द्राम आसिदम सल्फ्युरिकम घालून खोलीचें द्वार बंद करावें नंतर त्या पात्रामधून फार तीव्र निघत्ये· पांच घटिकानंतर द्वार उघडून बाहेरचा वायु येउं द्यावा· ही वाफ अति तीव्र आहे· ह्मणोन प्रथम खोलीमधून रोगी काढून खोली रिकामी करावी·

लतीन·	इंग्रेजी
आसिदम नैत्रिकम·	नैत्रिक आसिद
अग्निवर फार शुष्क केलेला सोरा·	वजनानें दोन पौंड·
आसिंदम सल्फ्युरिकम·	वजनानें दोंन पौंड·

दोघांना बिलोराचे रिटोर्टमध्यें घालून तें रिटोर्ट अन्य पात्रांत वाळु घालून त्या मध्यें अर्धें पुरावें मग वाळुपात्र अग्निवर ठेवावें नंतर रिटोर्टमधून तांबडी वाफ निघे तों पर्यंत नैत्रिक आसिद काढावें· नंतर या आसिदाशीं पूर्ववत् सोरा शुष्क करून एक औंस मिळवावा· नंतर त्याला अन्य रिटोर्टांत घालून फिरून

आसिद काढावें· या आसिदाच्या तुला विशेष या प्रमाणें आहे· पाण्याच्या तुला विशेष· १००० असला तर याचा १५०० असतो· या आसिदाचे शंभर ग्रेनाचें ओंबट पण्याच्या नाश दोनशें बारा ग्रेन सोदे सब् कार्बोनासें करून होतो·

हें आसिद चांगलें झालें असतां याचा रंग शुद्ध उदका सारिखा किंवा किंचित् पिवळटसा असतो· याचे पात्राचें तोंड उघडें असलें तर त्या मधून पांढऱ्या तीव्र वाफा निघतात· या वाफांचे गुण आसिदाचे गुणा प्रमाणें आहेत· व उघडें राहालें असतां याला वायूचा ओलसरपणा लागून याचे गुण न्यून होतात· चर्म व मांस इत्यादिकांस हें लावलें असतां त्यांचा नाश होतो· हें चर्मास लावलें असतां त्याचा रंग पिवळा होतो· हें आसिद तेलावर घातलें असतां तेल प्रदीप्त होतें· सुगंध तेल विशेषेंकरून प्रदीप्त होतें· हें पाण्याशीं मिळवलें तर मेलनेंकरून कांहीं उष्णपणा होतो· बहुतकरून हें आसिद एकलें औषधार्थ देत नाहींत· याचे गुण पूर्वी लिहिले आहेत· कुगंधाच्या नाश करावयासाठीं याची वाफ चांगली आहे· वाफ उत्पन्न होण्याचा प्रकार सांगतो· एक औंस सोरा चिनी मृत्तिकेचे पात्रांत घालून त्यावर एक औंस आसिदम सल्फ्युरिकम घालून तें पात्र उष्णोदकानें भरलेल्या पात्रांत ठेवावें नंतर तेथून कांहीं अवधि पर्यंत वाफ निघत्ये· ही वाफ पूर्व वाफे प्रमाणें रोग्यांना फार वाईट लागत नाहीं· यास्तव रोगी खोलींत असतांच उत्पन्न करावी· खोली मोठी असली तर वाफ उत्पन्न होण्याचें एकच मोठें पात्र ठेवुं नये· लाहान लाहान दोन तीन ठेवावीं·

लतीन·	इंग्रेजी·
आसिदम नैत्रिकम दिल्युटम·	दिल्युटेद नैत्रिक आसिद·
नैत्रिक आसिद·	मापानें एक औंस·
अर्का प्रमाणें काढलेलें पाणी·	नउ औंस·

दोघांचें मेलन करावें·

हें मेलन रोचक आहे· फार पाणी घेउन मेलन केलें तर तें मेलन ज्वर इत्यादिक रोगांवर प्राशनास्तव चांगलें आहे· याचे गुण रोचकांमध्यें लिहिले आहेत·

लतीन·	
आसिदम सल्फ्युरिकम दिल्युटम·	दिल्युटेद सल्फ्युरिक आसिद·
आसिदम सल्फ्युरिकम·	मापानें दीड औंस·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी·	मापानें साडेचवदा औंस·

पाण्यामध्यें थोडें थोडें आसिद घालून मिळवावें·

हें औषध चांगलें कोष्टबंधक आहे· याचे गुण कोष्ट बंधक औषधामध्यें लिहिले आहेत·

लतीन·	इंग्रेजी·
आसिदम टार्टारिकम·	टार्टरिक आसिद·
क्रिमर टार्टर	अडीच पौंड·
उकळतें अर्काप्रमाणें काढलेलें पाणी·	तीन गाल्लन·
स्वच्छ खडी·	एक पौंड·
आसिदम सल्फ्युरिकम·	एक पौंड·

तीन गाल्लन पाण्या मधुन दोन गाल्लन पाणी घेउन त्या मध्येंक्रीमर टार्टर घालून उकळावें नंतर वाजत नाहींसें होई तो पर्यंत त्यांत थोडी थोडी खडी सावकाशीनें घालावी· नंतर गाळ तळास बसे तों पर्यंत तसेंच ठेवावें या गाळाला इंग्रेजी भाषेंत टार्ट्रेट ओफलैम ह्मणतात· मग वरलें पाणी टाकून खालच्या गाळ अर्का प्रमाणें काढलेलें दुसरें पाणी घेउन त्यांत फार वेळ धुवावा· जों पर्यंत किं त्याला दुसर्या पदार्थांच्या स्वाद लागलेला असतो तो दूर होई· नंतर तीन गाल्लनामधून राहिलेलें एक गाल्लन पाणी उकळवून त्याशीं आसिदमसल्फ्युरिकम मिळवून त्या धुतलेल्या गाळावर घालावें· मग साठ घटिका पर्यंत तसेंच ठेवावें आणि त्या अवधी मध्यें केव्हां केव्हां घाटावें· नंतर सगळ्याला गाळून पातळ पदार्थ घेउन पात्रांत घालून तें पात्र उदक भरलेल्या पात्रांत ठेवून उदक पात्र अग्नीवर ठेवावें· मग वरल्या पात्राचे तळास त्या पदार्था पासून क्षार रज उत्पन्न होत तों पर्यंत पाणी उकळवीत असावें·

हें औषध पांढरें गंध रहित फार आंबट आहे· पाण्यामध्यें सहज विरघळतें हें आसिदम सेत्रिकमाचा चांगला प्रतिनिधी आहे·· एफर्वेसिंगड्राफ्स या ना·

मे

मेंकरून एक औषध आहे तें सिद्ध करावयासाठीं हें चांगलें आहे· सिद्ध करण्याचा प्रकार · पंचवीस ग्रेन टार्टारिक आसिद तीन औंस पाण्या मध्यें विरघळवावें· आणि तीस ग्रेन सोदे कार्बोनास तीन औंस दुसर्या पाण्यामध्यें विरघळवावें· नंतर पहिल्ये पाण्यांत दुसरें पाणी घालून तत्क्षणींच प्यावें येणेंकरून ज्वरादि रोगां मध्यें उल्मासा आणि वमन यांचें निवारण होतें·

* * *

लतीन·	इंग्रेजी·
आल्केल्याएटसेलेस·	आल्कलिसआन्द्सॉल्त्स·

ज्या औषधांना हें नाम ठेवितात त्यांना जे गुण आहेत त्यांतें सांगतो· यांचा स्वाद गोमूत्राचे स्वादा प्रमाणें आहे· वनस्पतींचें मेलनांचा निळा रंग या औषधांचे संयोगें करून हिरवा होतो· याहीं करून पाण्याशीं तेलाचें मेलन होतें· व हीं पाण्या मध्यें सहज विरघळतात· आसिदांशीं यांचीं मेलनें करतात· त्या मेलनास न्युत्रलसाल्त्स ह्मणतात· वायूनें या औषधांचें रूप आकार इत्यादिक बदलतात· यास्तव त्यांना कुपींत ठेवून कुपीचें तोंड चांगलें बंद करावें·

न्युत्रलसाल्त्सां मधून बहुतांना आसिदांचे व आल्कलींचे गुण नाहींत· काहीं एकांना मात्र आहेत· त्यां मधून कोण त्यांना आसिदांचे गुण व कोण त्यांना आल्कलींचे गुण आहेत त्यांतें सांगतो· ज्या ज्या न्युत्रलसाल्तांचे नामामध्यें स्रुपर शब्द आहे त्याला त्याला आसिदाचें गुण आहेत· उदाहरण स्रुपर्टार्त्रास पोटास्से हें औषध टार्टारिक आसिद आणि पोटास्से· या दोहोंचें मेलन आहे· याला आसिदांचे गुण आहेत· यास्तव याला स्रुपर्टार्त्रास पोटास्से ह्मणतात· जर याला आसिदाचे गुण नसते तर टार्त्रास पोटास्से असेंच ह्मणते· ज्या ज्या न्युत्र लसाल्तांचे नामामध्यें सब् शब्द आहे· त्याला आल्कलींचे गुण आहेत· उदाहरण : सोदे सब् कार्बोनास याला आल्कलींचे गुण आहेत असें जाणावें· न्युत्रलसाल्त्सांचे नामेंकरून त्यांतील पदार्थ प्रसिद्ध होतात· टार्त्रास पोटास्से हें नुत्रलसाल्त· पोटास्सा व टार्टारिक आसिद या दोहोंचें मेलन आहे· कार्बोनास सोदे हें सोदा व का-

र्बोनिक आसिद या दोहोंचें मेलन आहे · न्युत्रलसाल्त्सां मधून कांहीं न्युत्रल साल्त्सें पाण्या मध्यें सहज विर घळतात · व कांहीं सहज विर घळत नाहींत सर्वांना पाण्यांत विर घळावयासाठीं उष्म सहाय लागतें बहुत करून विर घळल्येवेळेस पदार्थांच्या उष्मपणा न्यून होतो विर घळल्या नंतर त्यांना आटवल्यानें रूप न बदलतां पूर्ववत् होतात · त्यांना मंद अग्नि लावला असतां क्षार रज होतात · या रजांच्या आकार वेगळा वेगळा आहे · या रजांचें रूप वायु · उष्म · व ओलसरपणा याहीं करून बदलतें · ह्मणजे या क्षार रजां मधून काहीं रज वायू मध्यें उघडे ठेविले असतां त्याचे संबंधें करून रजांवर पांदरा पदार्थ येतो · तो उत्तरोत्तर अधिक होउन रज नाहींसे होतात · व काहीं रज वायू मध्यें उघडे ठेविले असतां वायू मधल्ये पाण्याला घेउन पाण्या सारिखे होतात · व काहीं रजांना वायू लागला असतां काहीं अपूर्व होत नाहीं · ते तसेच राहातात · जांचें रूप बदलतें त्यांना कुपींत ठेवून कुपीचें तोंड चांगलें बंद करावें · ओषधार्थ आल्कली तीन आहेत · त्यांचे विशेष ज्ञानाचें कारण सांगतो · आम्मोन्या आल्कलीचें ज्ञान तीव्र गंधें करून होतें · पोटास्सा वायु मध्यें उघडें ठेविलें असतां पातळ होतें सोदा वायु मध्यें ठेविलें असतां पूर्ववत् राहातें ·

आम्मोन्याची ओषधें ·

लतीन ·	इंग्रेजी ·
आम्मोन्येसब् कार्बोनास्	सबकार्बोनेट ओफ् आम्मोन्या ·
नव सागर ·	एक पोंड ·
शुष्क केलेली स्वच्छ खडी ·	दीड पोंड ·

दोहोंचें वेगळें वेगळें चूर्ण करावें नंतर दोहों चूर्णांचें मेलन डमरु यंत्रांत घालून तें यंत्र अन्य पात्रांत वाळू घालून त्या वाळूंत अर्धें पुरून वाळुपात्र अग्नीवर ठेवावें नंतर हळु हळु उष्मपणा अधिक करून उष्मानें यंत्र तांबडें होई तों पर्यंत फूल काढावें · हें फूल बहुत करून लोखंडाचे डमरु यंत्रानें काढितात · हें पांढरें कठिण क्षार पदार्थ आहे · याला फोडलें असतां थर असे दिसतात · पाण्याच्या तुला विशेष १०००. सहस्र असला तर · याचा तुला विशेष ९६६ नोशें सासष्ट असतो ·

हें स्वच्छ असलें तर उष्मानें सर्व उडून जातें · व हें पाण्या मध्यें विरघळतें · आलकोहोलांमध्यें विरघळत नाहीं · याचे मेलनें करून वनस्पतींचे प[illegible]दार्थांचा निळा रंग हिरवा होतो · याला सर्वकाळ कुपींत घालून कुपीचें तोंड [illegible] गलें बंद करावें · असें ठेविलें नाहीं तर याचें वीर्य जाउन सामर्थ्य न्यून होतें · [illegible] औषध अंग ग्रह नाशक · व अम्ल नाशक · व स्वेदकारी आहे · याचे मोठ्या प्रमाणें करून वमन होतें · याला वायु गोळ्यावर · अजीर्णावर अम्ल पित्तावर देतात · जेव्हां दंतोद्गमें करून अथवा अम्लिकें करून बालांना अंगग्रह रोग होतो तेव्हां ही देतात · स्वेदकारित्वास्तव याला ग्युयकाशीं मिळवून काहीं एक वेळेस क्रोनिक वायूवर देतात · काहीं कारणें करून कोणी मूर्छित पडला तर या औषधाची तीव्र वाफ नाकांत दिल्ही असतां ती अवस्था दूर होत्ये · याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत आहे · याला काहीं पातळ पदार्थाशीं मिळवून द्यावें · अथवा याच्या गोळ्या करून द्याव्या · वमकास्तव याचें प्रमाण वीस ग्रेना पासून तीस ग्रेन पर्यंत आहे · हें प्रमाण घेतल्या नंतर फार पान करावें · एक विभाग हें औषध आणि तीन विभाग वेल्ला दोन्हेच्या रांधा किंवा याचे अभावीं भंग दोघांचें मेलन करून कागदावर अथवा चर्मावर प्लास्तरा प्रमाणें पसरून लावून ती पटी लावली असतां संधी जवळची वायूची पीडा न्यून होत्ये ·

लतीन ·	इंग्रेजी ·
लेंक्कोर आम्मोन्ये ·	सोल्युशन् ओफ् आम्मोन्या ·
नवसागर · · · · · · ·	आठ औंस ·
भाजलेल्या चुन्याचा कळ्या · · · ·	साहा औंस ·
पाणी · · · · · · ·	चार पैंट ·

चार पैंट पाण्या मधून एक पैंट पाणी चुन्याचे कळ्यांवर घालून पात्रावर ढापण ठेवून अडीच घटिका पर्यंत तसेंच राहूं द्यावें · नंतर त्या मध्यें उरलेलें पाणी उष्ण करून घालावें · आणि नवसागर घालून फिरून ढापण ठेवावें · सर्वांचें मेलन थंड झाल्यानंतर गाळावें · नंतर त्याला रिटोर्टामध्यें घालून रिटोर्ट वाळू पात्रा मध्यें अर्धे पुरून वाळूपात्र अग्नीवर ठेवावें · नंतर अन्य पात्रा·

च्या उष्णपणा. उष्ण मानाच्या पंनास कक्षा पेक्षा अधिक न होई असें उपचारानें करून त्या पात्रांत रिटोर्टा मधून लेक्वोर आम्मोन्ये काढावें· पाण्याच्या तुला विशेष १००० सहस्त्र असला तर या ओषधाच्या तुला विशेष ९६० नोशें साठ असतो·

या ओषधाच्या रंग स्वच्छ पाण्या सारिखा व गंध फार तीव्र स्वाद अति उग्र आहे· हें अम्ल नाशक व लोहितकर आहे· याला पक्ष वायु वायुगोळा मूर्छा· यांवर देतात· अम्लिके वर याचा अम्ल नाशक गुण फार होतो· कोणी मूर्छित पडला असतां याची वाफ पूर्व ओषधाचे वाफे प्रमाणें द्यावी· या ओषधांत वस्त्र भिजवून चर्मावर लावलें असतां स्फोट येतो· यास्तव कधीं कामाचें आहे· कदाचित् फोड न आला तर चर्म फार आरक्त होतें· तेलाशीं याचें मेलन करतात· त्या मेलनाला इंग्रेजी भाषेंत लिनीमेन्तम आम्मोन्ये फोर्टर्यस ह्मणतात· तें चांगलें लोहितकर आहे· लोहित करांमध्यें लिहिलें आहे· पोटांत घ्यावयासाठीं या ओषधाचें प्रमाण दाहा मिनिमा पासून वीस मिनिम पर्यंत आहे· अनुपानास्तव पाणी अथवा दूध पेलाभर घ्यावें विषा साठीं कोणी मनुष्यानें हें ओषध घेतलें असतां याजवर सर्व ओषधांमध्यें विषघ्नास्तव सिर्क चांगलें आहे· हें ओषध गंधेंकरून ओळखूं येतें·

लतीन·	इंग्रेजी·
लेक्वोर आम्मोन्ये आसीटेटिस· किंवा स्पिरिटस् मिंदरेरी·	सोल्युशन् ओफ् आसीटेट् ओफ् आम्मोन्या·

आम्मोन्ये सबकार्बोनास·	दोन ओंस·
आसिदम् आसेटिकम् दिल्युटेम·	चार पैंट· किंवा लागेल तितकें·

वाजत नाहींसें होई तों पर्यंत आम्मोन्ये सबकार्बोनासावर आसिद घालून मिळवावें·

या ओषधाला गंध नाहीं· स्वाद थोडा वाईट आहे· हें चांगलें झालें असतां याचा रंग पाण्या सारिखा असतो· हें ओषध स्वेदकारी आहे· त्यास्तव एकल्याला अथवा अफु· कापूर आन्तिमनीचीं ओषधें· सोरा इत्यादिकांमधून कोणत्या एकाशीं मिळवून द्यावें· दिल्या नंतर सदैव उष्ण पान उष्ण वस्त्राचें प्रावरण

ण इत्यादिक द्यावें असें दिलें नाहीं तर घामन निघून द्रावक गुण होतो· हें ओषध शोथनाशक आहे· व येणेंकरून चर्माचे इन्फ्लूमेशनाच्या उष्मपणा दूर होतो· या कार्यास्तव या औषधांत वस्त्र भिजवून त्या रोगांवर बांधावें· बाह्य उपचारार्थ हें नेत्र रोगावर चांगलें आहे· याला फार पाण्याशीं मिळवून पिचा करीतां घालून ती पिचाकरी प्रमेहावर मूत्र द्वारांत सोडिली असतां चांगलें आहे· घाम काढावयासाठीं याचें प्रमाण अर्ध औंसापासून दोन औंस पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
लेक्कोरआम्मोन्येसबूकार्बोनटिस·	सोल्युशन्ओफ्सबूकार्बोनेटओफआम्मोन्या·
आम्मोन्येसबूकार्बोनास·	चार औंस·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी·	एक पैंट·

सबूकार्बोनासाला पाण्यामध्यें विरघळवून कागदा मध्यें गाळावें·

या ओषधाचा स्वाद आणि गंध सब्कार्बोनासा प्रमाणें आहे· गुणही त्या प्रमाणें आहेत· याचा रंग पाण्या सारिखा याचें प्रमाण अर्ध ड्रामा पासून एक ड्राम पर्यंत आहे· हें ओषध फार दिवस राहिलें असतां वाईट होतें· यास्तव एक्या वेळेस फार सिद्ध करूं नये·

पोटास्साची ओषधें·

लतीन·	इंग्रेजी·
लेक्कोरपोटास्से·	सोल्युशन् ओफ् पोटास्स·
पोटास्से सक्कार्बोनास·	एक पौंड·
भाजलेल्या चुन्याचा कळ्या	अर्ध पौंड·
उकळतें अर्काप्रमाणें काढलेलें पाणी·	एक गाल्लन·

एक गाल्लन पाण्या मधून दोन पैंट पाणी घेउन त्या मध्यें पोटास्से सक्कार्बोनास विरघळवावें· आणि उरलेलें पाणी चुन्याचे कळ्यांवर घालावें· नंतर दोहोंचें मेलन करून पात्रांत घालून पात्रावर टांपण ठेवावें· मेलन थंड झाल्यानंतर वस्त्रामध्यें गाळावें· या गाळलेल्या पदार्थामध्यें कोणतें एक आसिद घातलें असतां काहीं शब्द होउं लागला तर त्या मध्यें चुन्याचा दुसऱ्या कळ्या घालून फिरू

न गाळावें·

हें औषध नीट झालें असतां मापानें एक पेंट असेल तर वजनानें सोळा औंस भरतें· असें झालें असतां याच्या तुला विशेष पाण्याचे तुला विशेषा पेक्षां अधीक आहे· पाण्याचा १००० सहस्त्र असला तर याचा १०५६ एक सहस्त्र छपन्न असतो· या औषधाला गंध नाहीं याचा रंग पाण्या सारिखा स्वाद फार उग्र आहे· याला बोटानें दवळलें असतां हस्ताला साबुणा प्रमाणें लागतें· याशीं चर्बी अथवा तेल मिळवलें असतां साबुण उत्पन्न होतो· हें औषध द्रावक· व अम्ल नाशक· व अश्मरी हारक आहे· परंतु फार दिवस देउं नये· दिल्हें असतां भूक लागत नाहीं अन्न जिरत नाहीं व इतर उपद्रव होतात· अश्मरीहार कत्वास्तव याचा लौकिक फार आहे· त्यास्तव याचें प्रमाण दाहा बिंदू पासून चाळीस बिंदू अथवा एक ड्राम पर्यंत आहे· हें औषध तांबडी रेती पडल्यें तिजवरच कामाचें आहे· परंतु याचा स्वाद वाईट आहे· यामुळें बहुतकरून याचे ऐवजी पोटास्से सब्कार्बोनास· मग्निश्या· इत्यादिक औषधां मधून कोणतें एक द्यावें· अम्लिकें करून चर्माचे रोग होतात· त्यांचे परिहारार्थ हें औषध चांगलें आहे· या रोगांवर हें दोन ड्राम पर्यंत द्यावें· या औषधाला पेज· दूध· इत्यादिकांमधून कोणत्या एकांत· अथवा कडु रोचकाचे फांटांत किंवा त्याचे पाचनांत घालून द्यावें· पिसाळलें कुत्रें अथवा सर्प इत्यादिकानीं कोणाला दंश केला असतां वि रलेल्या मांसाचा नाश होण्या विषयीं हें औषध चांगलें आहे यास्तव याला दंश झालेल्या स्थला मध्यें घालावें·

लतीन	इंग्रजी·
लैकोर पोटास्स सब्कार्बोनटिस·	सोल्युशन् ओफ् सब्कार्बोनेट् ओफ् पोटास्स·

पोटास्से सब्कार्बोनास·	एक पौंड·
अर्का प्रमाणें काढलेलें पाणी·	बारा औंस·

पोटास्से सब्कार्बोनासाला पाण्यामध्यें विरघळवावें नंतर कागदामध्यें गाळावें·

हें औषध अम्ल नाशक व अश्मरी हारक आहे· याचे गुण पोटास्से सब्कार्बोनासाचे गुणां प्रमाणें आहेत· याचें प्रमाण दाहा मिनिमा पासून दोन ड्राम पर्यंत तें प्रमाण काहीं अनुपाना मध्यें द्यावें·

लतीन

लतीन ·	इंग्रेजी ·
पोटास्साकमकाल्से ·	पोटासविथलेम ·
लेक्वोरपोटास्से ·	तीन पैंट ·
भाजलेल्या चुन्याचा कळ्या ·	एक पौंड

लेक्वोर पोटास्से एक पैंट राहीतों पर्यंत त्याला उकळवावें नंतर कळ्यांवर पाणीं घालून विरवाव्या · नंतर दोहोंचें चांगलें मेलन करावें

मांस नाशनार्थ नुस्तें पोटास्सा फार बळकट आहे · ह्मणोन त्याचें बल न्यून होण्यासाठीं त्यांत चुना घालावा · हें औषध कुपींत घालून कुपीचें तोंड चांगलें बंद करून ठेवावें · असें ठेविलें नाहीं तर वाईट होतें ·

लतीन ·	इंग्रेजी ·
पोटास्साफ्युसा ·	फ्युझेड् पोटास्स ·
लेक्वोर पोटास्से ·	एक गालन ·

याला स्वच्छ लोखंडाचे पात्रांत घालून तें पात्र अग्नीवर ठेवावें · नंतर त्यातला पदार्थ आटून शुष्क होउन रस होई तों पर्यंत तें पात्र अग्नीवर राहु द्यावें नंतर तो रस तत्क्षणीं लोखंडाचे सांचा मध्यें ओतावा · नंतर स्वर्णादिकां सारिखी याची लगड होत्ये ·

मांस नाशनास्तव हें औषध चांगलें आहे · यास्तव याला आडसंधी व रीढक इत्यादिक स्थलांचे रोगांचे परिहारार्थ पोत घ्यावयासाठीं लावतात · जा जा स्थलीं याला लावतात त्यात्या स्थलांचे मांसाचा नाश होउन वरली मृदु खपलीशी निघून खालती व्रण होतो · लावण्याचा प्रकार सांगतो · अधी सिव प्लास्तर वस्त्रावर पसरून लावून त्या वस्त्राला जसा व्रण करावयाचा असेल तितक्या बेताचें वाटोळें एक छिद्र पाडावें · नंतर ती पटी व्रण करावयाचे स्थलावर लावून छिद्रांत हें औषध लावावें · असें लावल्यानें भोवतालचे चर्माचें संरक्षण होउन छिद्रांतल्ये मांसाचा मात्र नाश होतो · शिश्नाचे नळींतलें मांस कांहीं कारणानें वाढून नळींत अडचण झाली असतां ती अडचण दूर करावयासाठीं हें औषध चांगलें आहे · त्या स्थलीं याला लावावयासाठीं फार युक्ति केली पाहिजे ·

लतीन ·	इंग्रेजी ·
पोटास्से आसीटास · किंवा सालदेयुरेटिकम ·	आसीटेट् ओफ् पोटास्स ·

पोटास्से सब्कार्बोनास ·	दीड पौंड ·
आसिदम् आसेटिकम् फोर्त्यस ·	दोन पैंट ·
उकळतें अर्काप्रमाणें काढलेलें पाणी ·	दोन पैंट ·

प्रथम आसिद व पाणी यांचें मेलन करावें नंतर तें वाजत नाहींसें होई तों पर्यंत त्या मध्यें पोटास्से सब्कार्बोनास घालून इतर पात्रांत गाळावें नंतर तें पात्र उकळत्ये पाण्यानें भरलेल्या पात्रांत ठेवून त्यांतला पदार्थ उकळूं लागला नाहीं तों पर्यंत खालचे पात्रांतलें पाणी उकळवीत असावें · नंतर तें पात्र मंदाग्नीवर ठेवून हळु हळु अग्नी अधिक करावा · नंतर जसा जसा तो पदार्थ आटत जातो तसा तसा त्यावर तवंग येतो जो जो तवंग येतो तो तो काढून खळी वांचून कागद घेउन त्याचे दुमडी मध्यें घालून त्यांतला अर्द्रांश दूर करून शुष्क करावा ·

हें औषध उघडें राहिलें असतां फार त्वरेनें पातळ होतें हें दाळक आणि द्रावक आहे · द्रावकास्तव याला जलोदरादि रोगांवर देतात · परंतु एकल्याला देत नाहींत · दुसर्या द्रावकाशीं मिळवून देतात · यास्तव याचें प्रमाण एक स्क्रुपला पासून एक द्राम पर्यंत · तें प्रमाण कडु रोचकाचे फाराटांत अथवा कांहीं सुगंधोदकांत घालून द्यावें · दाळकास्तव याचें प्रमाण तीन द्रामां पासून साहा द्राम पर्यंत आहे परंतु त्यास्तव याला फार करून देत नाहींत ·

लतीन ·	इंग्रेजी ·
पोटास्से कार्बोनास ·	कार्बनेट् ओफ् पोटास्स ·

लेक्वोर पोटास्से सब्कार्बोनटिस एक गालन घेउन त्याला बिलोराचे अथवा चिनी मृत्तिकेचे पात्रांत घालावें नंतर त्यामध्यें आल्कलीचे गुण आहेत · ते जात तों पर्यंत त्या मध्यें कार्बोनिक आसिदाला येउं द्यावें नंतर गाळून अन्य पात्रांत गाळून तें पात्र उष्ण जल पूरित पात्रांत ठेवून वर पातळ पदार्थ राहून तळास क्षार रज उत्पन्न होत तों पर्यंत त्यांतला पदार्थ आटवावा · परंतु त्याचा उष्मपणा उष्णमानाच्या १२० कक्षां पेक्षां अधिक होउं देउं नये · नंतर क्षार रजांवरला पातळ पदार्थ काढून रज जा कागदास खळ नाहीं त्या मध्यें घालून त्यांतला आर्द्रांश दूर

करून ते शुष्क करावे· खडी व आसिदम सल्फ्युरिकम दिल्युटम या दोहोंचे मेलना पासून जो वायु निघतो त्या वायूला कार्बोनिक आसिद ह्मणतात·

बहुत करून हें औषध या प्रमाणें सिद्ध करतात· लोखंडाच्या दोन कुप्या घेउन एकया कुपी मध्यें खडी व आसिद या दोहोंचें मेळन घालून त्या मेलना पासून कार्बोनिक आसिद निघतो तो नलिकामार्गानें दुसर्‍या कुपीत लेक्कोर पोटास्से सब्कार्बोनटिस घालून ती मध्यें जाउं द्यावा· आणि दोहों कुप्यांतलें दोन पदार्थ घाटावयासाठीं त्या दोहोंना दोन छिद्रं करून त्या छिद्रांत लोखंडाची सळई घालून ते पदार्थ फार घाटावे· परंतु कुप्यांतून छिद्रांवाटे वायु बाहेर जाउं देउं नये· हें औषध अम्ल नाशक आहे· याचें प्रमाण वीसं ग्रेनां पासून चाळीस ग्रेन पर्यंत आहे· याला बहुत करून कडु रोचकाचे फाराटांत अथवा सुगंध पाण्यांत विरघळवून द्यावें· या प्रमाणें अम्लिकादि रोगावर दिल्हें असतां चांगलें आहे· हें औषध एक दोन ड्राम दिल्हें असतां मुतण्याच्या अधिकपणा होतो· व कधीं उल्हासाही होतो· या औषधें करून मूत्राचे तळास पांढरा गाळ बसूं लागला अथवा त्यावर पांढरा तरंग येउं लागला तर ती अवस्था दूर होई तों पर्यंत याचा प्रतिबंध करावा· अथवा प्रमाण स्वल्प करावें·

लतीन·	· इंग्रेजी ·
पोटास्से सब्कार्बोनास·	सब्कार्बोनेट् ओफ् पोटास्स·
पोटास्सा इम्प्युराचें चूर्ण	तीन पौंड·
उकळतें पाणी	साडेतीन पेंट·

पाण्यामध्यें पोटास्सा विरघळवून गाळावें नंतर गाळलेला पदार्थ स्वच्छ लोखंडाचे पात्रांत घालून तें पात्र मंदाग्नीवर ठेवून तो पदार्थ दाट होई तों पर्यंत आटवावा· नंतर तें पात्र अग्नीवरून उतरून त्यांतल्ये दाट पदार्थाचें क्षार चूर्ण होई तों पर्यंत तो पदार्थ दंडानें घाटावा· टार्टराला जाळून राखे प्रमाणें करावें· नंतर त्याला पाण्यांत विरघळवून वरल्या प्रमाणें कृति करून पोटास्से सब्कार्बोनास सिद्ध होतें·

हें पांढरें चूर्ण आहे· या मध्यें आल्कलीचे गुण आहेत हें उघडें राहिलें असतां पाण्या प्रमाणें पातळ होतें· हें पाण्यामध्यें विरघळतें आलकोहोलांत वि-

रघळत नाहीं· हें अम्लनाशक आहे· व याला काहीं द्रावक गुणही आहेत· वहुत करून सालेन द्राफ सिद्ध करावयासाठीं हें घेतात· सिद्ध करण्याचा प्रकार सांगतो· हें ओषध एक स्क्रुपल पाण्या मध्यें विरघळवावें आणि चार द्राम लिंबूचा रस दुसर्या पाण्याशीं मिळवावा· नंतर दोहोंचें मेलन करावें· हें मेलन ज्वरादि रोगांवर चांगलें शीत कारक आहे· अम्ल नाशकास्तव हें ओषध दुधा मध्यें द्यावें तेणेंकरून याचा कुस्वाद आणि उग्रपणा लुप्त होतो· याचे बरोबर फार उदकपान केलें असतांच याचा द्रावक गुण होतो· याचें प्रमाण अर्ध स्क्रुपला पासून अर्ध द्राम पर्यंत आहे·

लतीन	इंग्रेजी·
पोटास्से सल्फास·	सल्फेट् ओफ् पोटास्स·

नैत्रिक आसिद काढल्यानंतर रिटोर्टांत राहिलेला क्षार·	दोन पोंड·
उकळतें पाणी·	दोन गाल्लन

पाण्या मध्यें क्षार विरघळवावा· नंतर याचा आंबटपणा दूर होई तों पर्यंत या मध्यें सब्कार्बोनास पोटास्से घालावें· नंतर यावर तवंग येई तों पर्यंत याला उकळवून गाळून क्षार रज तळास बसावयासाठीं काहीं अवधी पर्यंत ठेवावें· नंतर वरला पातळ पदार्थ टाकून खालचे रज खळी बांधून कागद घेउन त्या मध्यें घालून आर्द्रता दूर करून शुष्क करावे

हें ओषध पाण्यामध्यें सहज विरघळत नाहीं· यास्तव फार करून याचें चूर्ण देतात· हें ढाळक आहे· बालाचें पोट स्वच्छ करावयासाठीं चांगलें आहे· रेवाचिनी व एळ्याबोळ याशीं मिळवून द्यावें पांडुरोगावर इतर क्षार ढाळकां पेक्षां हें उत्तम आहे· याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून साहा द्रामंपर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
पोटास्से स्कपर्सल्फास·	स्कपर्सल्फेट् ओफ् पोटास्स·

नैत्रिक आसिद काढल्यानंतर रिटोर्टांत राहिलेला क्षार·	दोन पोंड·
उकळतें पाणी·	चार पैंट·

पाण्या मध्यें· क्षार विरघळवून पाणी गाळावें· नंतर अर्धें राहीं तों

पर्यंत उकळवून क्षार रज तळास उत्पन्न होत तों पर्यंत ठेवावें· नंतर वरला पातळ पदार्थ टाकून खालचे क्षार रज खळी वांचून कागद घेउन त्या मध्यें घालून आर्द्रांश दूर करून शुष्क करावे·

हा क्षार फार आंबट आहे· व पाण्या मध्यें सहज विरघळतो· याला टाळक गुण आहेत· परंतु यास्तव फार करून देत नाहींत· याचें कारण येणेंकरून· पोटांत मुरडा होतो· याचें प्रमाण एक स्कुपला पासून दोन द्राम पर्यंत तें प्रमाण रेवाचिनीशीं मिळवून द्यावें·

लतीन	इंग्रेजी·
पोटास्से टार्त्रास·	टार्त्रेट ओफ पोटास्स·
पोटास्से सब्कार्बोनास·	सोळा ओंस·
पोटास्से स्कपर्टार्त्रास·	तीन पोंड·
उकळतें पाणी·	एक गालन·

पोटास्से सब्कार्बोनास· पाण्या मध्यें विरघळवावें नंतर वाजत नाहीं सें होई तों पर्यंत त्या मध्यें क्रीमरटार्टराचें चूर्ण हळु हळु घालून कागदा मध्यें गाळावें नंतर वर तवंग येई तों पर्यंत तो गाळलेला पदार्थ उकळवावा· मग अग्नीवरून उतरून तळास क्षार रज उत्पन्न होत तों पर्यंत ठेवून वरला पातळ पदार्थ टाकून खालचे क्षार रज खळी वांचून कागद घेउन त्यामध्यें शुष्क करावे·

हें औषध चांगलें टाळक आहे· येणेंकरून पोटांत मुरडा झाल्या वांचून रेच होतात· व याचे संयोगेंकरून अन्य टाळकांचे तीव्र गुण दूर होतात· यास्तव सोनामुखी· रेवाचिनी· जालप· इत्यादिक टाळकें याशीं मिळवून द्यावीं· त्या साठीं हें एक द्रामापासून तीन द्राम पर्यंत घ्यावें एकत्याला द्यावयासाठीं याचें प्रमाण अर्ध ओंसा पासून एक ओंस पर्यंत तें प्रमाण पाण्या मध्यें द्यावें·

सोदाचीं औषधें ·

लतीन ·	इंग्रेजी ·
सोदे कार्बोनास ·	कार्बनेट्ओफ़्सोदा ·
सोदे सब्कार्बोनास ·	एक पोंड ·
अर्काप्रमाणें कादलेलें पाणी	तीन पेंट

सोदेसब्कार्बोनास पाण्यामध्यें विरघळवावें · नंतर त्याला चिनीमत्तिकेचे पात्रांत घालून त्या मधले अल्कलीचे गुण जात तों पर्यंत त्यामध्यें कार्बोनिक आसिदाला येउं द्यावें · नंतर त्यामध्यें क्षार रज उत्पन्न होण्यासाठीं तसेंच ठेवावें रज उत्पन्न झाल्यानंतर रजांना खळी वांचून कागद घेउन त्याचे दुमडीमध्यें घालून दाबून आर्द्रांश दूर करून ते शुष्क करावे · नंतर राहालेला पातळ पदार्थ आटवून पुनः क्षार रज उत्पन्न करावे · परंतु त्या पदार्थाच्या उष्मपणा उष्णमानाच्या १२० एकशें वीस कक्षां पेक्षां अधिक होउं देउं नये · उत्पन्न केल्यानंतर ते रज पूर्वरजांप्रमाणें शुष्क करावे ·

या औषधाचे गुण सोदे सब्कार्बोनासाचे गुणां प्रमाणें आहेत · याच्या स्वाद त्या पेक्षां चांगला आहे · यांस्तव हेंच फार करून देतात · दिल्यानंतर येणेंकरून गुल्मासादि उपद्रव होत नाहींत · हें अम्ल नाशक व अश्मरी हारक आहे · याचें प्रमाण दाहा ग्रेनांपासून चाळीस ग्रेन अथवा पन्नास ग्रेन पर्यंत आहे · हें अश्मरीमध्यें मूत्राबरोबर तांबडी रेती पडत्ये तिजवरच कामाचें आहे · हेंही पूर्वोक्त प्रमाणें लिंबूचे रसाशीं किंवा टार्टारिक आसिदाशीं मिळवून देतात ·

लतीन ·	इंग्रेजी ·
सोदे सब्कार्बोनास ·	सब्कार्बनेट ओफ सोदा ·
सोदा इम्प्युराचें चूर्ण ·	एक पोंड ·
उकळतें अर्काप्रमाणें कादलेलें पाणी	चार पेंट ·

चूर्ण पाण्या मध्यें घालून तें पाणी सवा घटिका पर्यंत उकळावें नंतर गाळून दोन पेंट राही तों पर्यंत आटवावें · नंतर अग्नीवरून उतरून तळास क्षार रज उत्पन्न होण्यासाठीं तसेंच ठेवावें ते उत्पन्न झाल्यानंतर वरला पातळ पदार्थ टाकावा ·

हें औषध चांगलें अम्लनाशक व अश्मरीहारक आहे· ज्या वेळेस रोग परिहारार्थ फार दिवस पर्यंत अम्लनाशक औषध देण्याचें अगत्य लागतें तेव्हां हें पोटास्साचे औषधा पेक्षां चांगलें आहे· येणेंकरून उश्वासादि उपद्रव त्या प्रमाणें होत नाहींत· तांबडी रेती पडत्ये तिवर हें वीस वीस ग्रेन दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· याचे अनुपानास्तव कडु रोचकाच्या फाराट· बदामाचें मिश्रण· इत्यादिक उत्तम आहेत· पोटांत वायु असलानर हें अनुपानासहित सुगंध रोचकाशीं मिळवून द्यावें· हें औषध चालु केल्यानंतर मूत्रा बरोबर पांढरी रेती पडत्ये अथवा त्यावर पांढरा तवंग आला तर याचें प्रमाण न्यून करावें किंवा हें बंद करावें अम्लनाशकास्तव हें अम्लिकेवर आणि अजीर्णावर देतात· यांवर हें वीस वीस ग्रेन दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· हें गणिडावरही देतात· या रोगावर दिवसांत याचें प्रमाण दीड द्राम किंवा दोन द्राम पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
सोदेसब्कार्बोनासएक्सिकेटा·	**द्रेद्सब्कार्बनेट्ओफ्सोदा·**

सोदेसब्कार्बोनास· एक पोंड घेउन लोखंडाचे स्वच्छ पात्रांत घालून तें पात्र उकळत्ये पाण्यानें भरलेल्या पात्रांत ठेवावें· नंतर लोखंडाचे दंडानें घाटून तें चांगलें शुष्क करावें· शुष्क होई तों पर्यंत खालचे पात्रांतलें पाणी उकळचीत असावें· चांगलें शुष्क झाल्यानंतर त्याचें चूर्ण करावें

सोदेसब्कार्बोनासाच्या गोळ्या केल्या असतां त्या लवकर फुटून त्यांचे तुकडे होतात· या औषधाच्या केल्या असतां फुटून तुकडे होत नाहींत या तशाच राहातात यास्तव याच्या गोळ्या द्यावयास चांगल्या आहेत· याचे गुण नुस्त्या सब्कार्बोनासाचे गुणां प्रमाणें आहेत· याचें प्रमाण दाहाग्रेनां पासून पंधराग्रेन पर्यंत तें प्रमाण दिवसांत तीन वेळ द्यावें·

लतीन·	इंग्रेजी·
सोदेसल्फास·	**सल्फेट्ओफ्सोदा: दुसरें नाम ग्लोबर्स साल्त्स:**

म्युर्याटिक आसिद काढल्यानंतर रिटोर्टीन राहिलेला क्षार·	दोन पोंड·
उकळतें पाणी·	अडीच पैंट

पाण्यांत क्षार विरघळवावा· नंतर त्या मध्यें आसिदाचे गुण आहेत·

ते

ते दूर व्हावयासाठीं त्या मध्यें जितकें सब्कार्बोनास सोदे घालावें· लागेल तितकें घालून ते दूर करावे· नंतर वर्ति तवंग येई तों पर्यंत तो पातळ पदार्थ आटवून गाळावा· नंतर तळास क्षार रज उत्पन्न होण्या साठीं तो तसाच ठेवावा· ते उत्पन्न झाल्यानंतर वरला पातळ पदार्थ टाकून त्यांना खळी वांचून कागद घेउन त्या मध्यें घालून ते शुष्क करावे·

हें औषध चांगलें टाळक आहे· परंतु याचा स्वाद वाईट यामुळें हें बहुतकरून देत नाहींत· याचें प्रमाण अर्ध औंसापासून दोन औंस पर्यंत आहे· लिंबूचा रस· क्रीमरटार्टर· इत्यादिक आंबट पदार्थांमधून कोणत्या एकाशीं याचें मेलन केलें असतां याचा कुस्वाद न्यून होतो·

लतीन	इंग्रेजी·
सोदाटार्टारिझेटा·	टार्टारेझेदसोदा· दुसरें नाम रोशेल् सालत्स·

सोदे सब्कार्बोनास·	वीस औंस·
पोटास्से सुपर्टार्त्रासाचें चूर्ण·	दोन पौंड·
उकळतें पाणी·	दाहा पैंट·

पाण्या मध्यें सोदे सब्कार्बोनास विरघळवून त्यांत हळु हळु पोटास्से सुपर्टार्त्रास घालावें· नंतर कागदामध्यें गाळून वर तवंग येई तों पर्यंत तें आटवून तळास क्षार रज उत्पन्न होण्यासाठीं अग्नीवरून उतरून तसेंच ठेवावें· ते उत्पन्न झाल्यानंतर वरला पातळ पदार्थ टाकून खळीवांचून कागद घेउन त्यामध्यें शुष्क करावे·

याचे खडे खडी साखरेचे खड्यां प्रमाणें आहेत· याचा स्वाद ईप्सम सालत्साचे स्वादा पेक्षां चांगला आहे· परंतु याचा रेचक गुण तितका बळकट नाहीं येणेंकरून काहीं उह्मासा व मुरडा होत नाहीं यास्तव हें गर्भिणी स्त्रीस द्यावयास चांगलें आहे· याचें प्रमाण अर्ध औंसा पासून दीड औंस पर्यंत आहे· सेद्लिझ पोदर्स या नामेंकरून एक सुस्वाद नम्र टाळक आहे· त्याचा सिद्ध करण्याचा प्रकार सांगतो·

रोशेल् सालत्स·	दोन ड्राम·
सोदे कार्बोनास·	दोन स्कुपल·

दोहोंचें मेलन करून साहा औंस किंवा आठ औंस पाण्यामध्यें विरघळ

वावें नंतर त्यामध्यें पंचवीस ग्रेन टार्टारिक आसिद घालून तें तत्क्षणींच प्यावें· हें मेलन चांगलें दाळक आहे· याचा स्वाद फार चांगला आहे·

* * *

लतीन·	इंग्रजी·
टेरेएटईयेरमूसेलेस·	एथूर्सएदएर्थेसालत्स·

जा पदार्थांना इंग्रेजी भाषेंत एर्थस ह्मणतात· त्यांचें वर्णन करितो· त्या पदार्थांमधून तेज येत नाहीं ते प्रदीप्त होत नाहींत· त्यांचा रस करणें फार कठीण आहे· ते पाण्यामध्यें सहज विरघळत नाहींत; त्यांमधून जा पदार्थांचा स्वाद आल्कलीचे स्वादा प्रमाणें आहे· व जांहीं करून आसिदाचा आंबटपणा दूर होतो· व जांहीं करून वनस्पतींचे पदार्थांचा तांबडा आणि निळा रंग हिरवा होतो त्यांमधून ओषधार्थ दोन कामाचे आहेत· जे पदार्थ असे नाहींत त्यांमधून ओषधार्थ एकच कामाचा आहे· एर्थांचे आणि आसिदांचे संयोगें करून आल्कलीचे क्षार पदार्थां सारिखे क्षार पदार्थ उसन्न होतात· त्यांमधून काहीं क्षार ओषधार्थ चांगले आहेत·

आल्युमिनाचीं ओषधें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
आल्युमेनएक्सिक्केटम	ड्रैदआलम	तुरटीची लाही·

तुरटी मृत्तिकेचे पात्रांत घालून तें पात्र अग्नीवर ठेवावें· नंतर तिचा रस होउन तो खत खतूं लागला नाहीं तों पर्यंत उष्णपणा अधिक करावा·

नंतर हा पदार्थ सिद्ध होतो· हा पांदरा निस्तेज हलका· फुसफुशीत· असा पदार्थ आहे· याचें चूर्ण व्रणाचें मांस वाढतें त्याचा नाश होण्यासाठीं लावतात व कधीं पोटांनही देतात· परंतु फार करून देत नाहींत·

लॅतीन ·	इंग्रेजी ·
लेंक्वोर आल्युमिनिस् कोंपोसिटस् ·	कोंपोंड सोल्युशन् ओफ् आलम् ·

प्राकृत ·
तुरटीचें मिश्रित पाणी ·

तुरटी	अर्ध औंस ·
सल्फास जिन्सी	अर्ध औंस ·
उकळलें पाणी	दोन पैंट ·

दोन पदार्थ पाण्यामध्यें विरघळवून तें पाणी कागदामध्यें गाळावें ·

हें औषध बळकट कोष्ठबंधक आहे · परंतु बाह्य उपचारार्थ मात्र कामाचें आहे · उपचार करण्याचा प्रकार सांगतो · हें पाण्याशीं मिळवून याची चिपनळी ग्लीता आणि धुपणी या दोन रोगांवर मूत्र द्वारांत सोडावी · हें गोंदाचें मेलनाशीं मिळवलें असतां रोग स्थलावर चांगलें राहातें · · · मेलन प्रकार सांगतो ·

तुरटीचें मिश्रित पाणी	साहा ड्राम ·
पाणी	साहा औंस ·
गोंदाचें मेलन	अर्ध औंस ·

सर्वांचें मेलन करावें · हें ग्लीतावर चांगलें आहे · धुपणीवर देण्यासाठीं यांत तुरटी अधीक घालावी · डोळे आले असतां त्यांचे जवळचे स्थलाचें रक्त काढून त्यांवर या औषधांचें मेलन लावावें · तें मेलन सांगतो ·

तुरटीचें मिश्रित पाणी	अर्ध औंस ·
नुस्तें पाणी अथवा गुलाबाचें पाणी	साडेपाच औंस ·

दोहोंचे मेलन करावें · हें भलत्या वेळेस लावलें असतां उपद्रव होतो ·

चुन्याचीं औषधें ·

लॅतीन ·	इंग्रेजी ·	प्राकृत ·
काल्क्स ·	लेम् ·	चुना ·

संगे मर्मर एक पौंड घेउन त्याचे लाहान लाहान तुकडे करून कुटून मुशीमध्यें घालून मूस अति तीव्र अग्नीवर अडीच घटिका पर्यंत ठेवावी अथवा त्यांतील का-

र्बनिक

बेनिक आसिद सर्व निघून त्यांत आसिदम आसेटिकम दिल्युटम घातलें असतां काहीं शब्द होत नाहीं तों पर्यंत ठेवावी ·

लतीन ·	इंग्रेजी	प्राकृत ·
काल्क्सेटस्तिस् ·	लैमफ्रामशेल्स ·	शिंपीचा चुना

शिंपी पासूनही पूर्ववत् चुना सिद्ध होतो ·

बहुंतकरून औषधार्थ नुस्ता चुना पोटांत देत नाहींत · अन्य औषधें सिद्ध करावयासाठीं फार कामाचा आहे · भट्टीचा चुनाही या कार्यास उत्तम आहे ·

लतीन ·	इंग्रेजी ·	प्राकृत ·
लैक्कोरकाल्सिस् ·	लैमवाटर	चुन्याचें पाणी

चुना	अर्ध पौंड ·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी	बारा पैंट ·

चुन्यावर पाणी घालून दोहोंचें चांगलें मेलन करावें · नंतर पात्रावर टोपण ठेवून साडेसात घटिका पर्यंत तसेंच राहूं द्यावें · नंतर चुन्या वरलें पाणी कुपींत घालून काहीं तळींचा चुनाही घालून कुपीचें तोंड चांगलें बंद करून ठेवावें नंतर अगत्या प्रमाणें चुन्या वरलें स्वच्छ पाणी काढावें

हें औषध रोचक · अम्ल नाशक · कृमिघ्न · व कोष्ठ बंधक आहे · याचे कोष्ठ बंधक गुण कोष्ठबंधक औषधांमध्यें लिहिले आहेत · परंतु हें बहुत करून पोटांत देत नाहींत · बाह्यउपचारार्थ देतात ·

लतीन ·	इंग्रेजी ·
म्युर्यासकाल्सिस ·	म्युर्येट ओफ लैम ·

आम्मोन्येसकार्बोनास काढल्यानंतर राहिलेला क्षार ·	दोन पौंड ·
पाणी	एक पैंट

क्षाराला · पाण्या मध्यें विरघळवून तें पाणी कागदामध्यें गाळावें · नंतर तें आटवून शुष्क क्षार करावा · तो झाल्यानंतर त्याला कुपींत घालून कुपीचें तोंड चांगलें बंद करावें ·

हें औषध कधीं गंडमाळांवर देतात · याचें प्रमाण एक ग्रेना पासून चार

ग्रेन पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
लेक्कोरकाल्सिसम्युर्याटिस·	सोल्युशन्‌ओफ्‌म्युर्येट्‌ओफलैम·

म्युर्यासकाल्सिस·	दोन ओंस·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी	तीन ओंस·

क्षाराला पाण्यामध्यें विरघळवून तें पाणी कागदामध्यें गाळावें·

यां ओषधाला रंग व गंध नाहीं याचा स्वाद वाईट आहे· हें गंडमाला व गणिड यांवर चांगलें आहे· याचें प्रमाण वीस मिनिमांपासून एक द्रामपर्यंत तें प्रमाण दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· हें हळु हळु अधिक करून दिवसांत चार द्राम पर्यंत द्यावें· याचे अनुपानास्तव दध अथवा पाणी चांगलें आहे· हें फार दिवसपर्यंत द्यावयास पाहिजे· येणेंकरून उम्हासा किंवा वमन होउं लागलें तर हें लादनमाशीं मिळवून द्यावें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
क्रीटाप्रीपरेटा·	प्रीपेर्ड्‌चाक·	खडीचाशोधन प्रकार·

खडी एक पौंड घेउन तिचर थोडें पाणी शिंपून खलून फार बारीक करावी नंतर ती पाण्यानें भरलेल्या मोट्या जल पात्रांत घालून घाटावी· अल्प अवधानंतर वरलें गढूळ पाणी दुसर्या पात्रांत घालून चूर्ण तळास बसे तों पर्यंत ठेवावें· नंतर वरलें पाणी टाकून खालचें चूर्ण शुष्क करावें·

ही अम्ल नाशक व कोष्टबंधक ओषधांमध्यें लिहिली आहे· ही अम्लिकेवर आणि संग्रहणीवर चांगली आहे· हे गुण हिचे मिश्रणामध्यें लिहिले आहेत· हिचें प्रमाण दिवसांत एकद्राम किंवा दोन द्राम आहे· हिचें फार बारीक चूर्ण व्रणावर घालतात· तेणेंकरून वाईट पूचें शोषण होउन भोंवतालचे चर्माचें त्यापासून संरक्षण होतें तसें अग्नीचे संबंधें करून चर्म विकृत होतें त्यावर हें घालून वर्ती लबदा बांधितात· तेणेंकरून नवें चर्म लवकर उत्पन्न होतें·

मग्निश्याचीं औषधें·

लतीन·	इंग्रेजी·
मग्निश्या·	मग्निश्या·

मग्निश्येसबूकार्बोनास चार औंस घेउन मुशींत अथवा दुसऱ्या पात्रांत घालून अति तीव्र अग्नीवर पांच घटिका पर्यंत अथवा त्यांत आसिदम आसेटिकम् दिल्युटम घालून काहीं शब्द होत नाहीं तों पर्यंत ठेवावें·

हें बहुतकरून चाळणी मध्यें चाळावें लागतें · हें पाण्या मध्यें विरघळत नाहीं याला गंध व स्वाद नाहीं याचा रंग पांढरा व हें फार हलकें आहे· याचे गुण मग्निश्येसबूकार्बोनासाचे गुणां सारिखे आहेत· व याचें प्रमाणही तसेंच आहे· परंतु हें बहुतकरून तृतीयांशानें न्यून करून द्यावें· याचीं अनुपानादिक त्यासारिखींच आहेत · मग्निश्येसबूकार्बोनासें करून कधिं पोटांत वायु होउन पोट फुगतें या औषधें करून असें होत नाहीं या साठीं बहुत करून हें देतात·

लतीन·	इंग्रेजी·
मग्निश्येसबूकार्बोनास·	सबूकार्बनेट् ओफ मग्निश्या·
ईप्समसालत्स·	एक पौंड·
पोटास्सेसबूकार्बोनास·	नौ औंस·
पाणी·	तीन गाल्लन·

तीन गाल्लन· पाण्या मधून तीन पेंट पाण्यामध्यें पोटास्सेसबूकार्बोनास विरघळवून गाळावें आणि पांच पेंट पाण्यामध्यें ईप्समसालत्स विरघळवून गाळावें· नंतर ईप्समसालत्साचे पाण्यामध्यें उरलेलें पाणी घालून तें उकळवावें· आणि उकळत्ये वेळेस· पोटास्सेसबूकार्बोनासाचें पाणी घालून फार घाटावें · नंतर वस्त्रामध्यें गाळून वस्त्रावरलें चूर्ण उकळत्ये पाण्यानें फारवेळ धुवावें · नंतर तें खळी बांधून कागद असेल त्यावर ठेवून उष्ण मानाच्या दोनशें कक्षांपर्यंत उष्णानें शुष्क करावें·

हें चूर्ण पांढरें गुळगुळीत · फार हलकें आहे· याला गंध व स्वाद नाहीं · हें पाण्यामध्यें थोडें विरघळतें · यावर आसिद घातलें असतां शब्द होतो · हें चांगलें अम्लनाशक आहे· बालाला किंवा अन्य मनुष्याला अम्लिका झाली असतां तियर हें

चांगलें आहे· मुखरोग जाला मुसलमान छारू आणि निनान्व ह्मणतात· त्याचे बरोबर ज्वर असो किंवा नसो त्या रोगावर हें अति उत्तम आहे· तसें बालांचे दंतोग्रम वेळेस ज्वर आला असतां त्यावरही चांगलें आहे· पोटांत अम्लिका असून हें एकलें दिल्हें असतां टाळक गुण होतो· ती नसून हें एकलें दिल्हें तर· येणेंकरून टाळक गुण होत नाहीं· याचें कारण आंबट पदार्थाचे संयोगें करून याला टाळक गुण उत्पन्न होतो· अम्लिके बरोबर शौच मोकळे होत नाहींत· तेव्हां खडी पेक्षां अथवा दुसर्या अम्ल नाशका पेक्षां रोग परिहारार्थ हें चांगलें आहे· आंबट पदार्थाचें संयोगानें या औषधें करून पोटांत वायु होउन पोट फुगलें असतां याचा चांगला प्रतिनिधी मग्निश्या आहे· तें द्यावें तेणेंकरून असें होत नाहीं मूत्रा बरोबर तांबडी रेती पडत्ये तिवर अन्य सर्व औषधांपेक्षां हें औषध उत्तम आहे· येणेंकरून उल्लासादि उपद्रव होत नाहींत म्हणोन हेंच फार करून देतात· यास्तव याचें प्रमाण वीस ग्रेन अथवा तीस ग्रेन तें प्रमाण दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· रोग फार दिवसांचा नसला अथवा फार कठीण झाला नाहीं तर प्रायः या औषधें करून रेती उत्पन्न होण्याचा प्रतिबंध होउन गुर्दातील पीडा दूर होत्ये· मूत्रा बरोबर पांटरी रेती पडत्ये· तिवर हें औषध आणि अन्य सर्व अम्ल नाशक औषधें देउं नयेत· दिल्हीं असतां ती अधिक उत्पन्न होत्ये· प्रतिदिवशीं मग्निश्या देण्याचें अगत्य लागलें तर साहा साहा दिवसां नंतर कांहीं दुसरें टाळक द्यावें· याचें कारण कधिं मग्निश्याचा सांठा आंतड्या मध्यें होतो· अम्लिकेकरून मुखावर किंवा अन्य स्थलावर पुरळ आला असतां हें औषध चांगलें आहे· अम्ल नाशकास्तव याचें प्रमाण अर्ध द्रामा पासून दोन द्राम पर्यंत आहे· हें औषध पूर्वींचि सर्व रोगाविषयीं दुध नुस्तें पाणी स्कगंध पाणी कडुरोचकाचा फाराट यां मधून कोणत्या एकांत घालून द्यावें· अजीर्ण असलें तर फाराटा मध्येंच द्यावें· एक द्राम हें औषध पाण्याशीं मेळवून त्यांत अर्ध औंस निंबूचा रस घालून तत्क्षणीं प्यालें असतां सुस्वाद नम्र टाळक आहे· यांत दोन द्राम ईप्सम साल्त्स विरघळविलें तर याचें बल अधिक होतें परंतु स्वाद तितका चांगला राहात नाहीं·

* * *

लतीन·	इंग्रेजी·
मेटाल्ला एट एयेरम सेलेस·	मेटल्स एंद थेर साल्ट्स

सुवर्णादि धातूंना इंग्रेजी भाषेंत मेटल्स ह्मणतात· वायु वस्तुतः अमिश्रित पदार्थ नाहीं या मध्यें दोन तीन प्रकारचे वायु आहेत त्यां मधून एक उत्तम आहे· तो श्वासोश्वासेंकरून फुफ्फुसांत जातो आणि जें रुधिर अभिसरणेंकरून शरीर कार्याचे अनुपयुक्त झालें असतें त्याला आपल्ये संयोगेंकरून शरीर कार्याचे उपयोगी करतो· व तेणेंकरून अग्नीला दहन शक्ति येत्ये· या वायूला इंग्रेजी भाषेंत ओक्सिजेन ह्मणतात· हा सुवर्णादि धातूंशीं मिळून त्यां पासून उष्मानें व इतर पदार्थाचे संयोगानें जे पदार्थ उत्पन्न होतात· त्यांना इंग्रेजी भाषेंत ओक्सिद ह्मणतात· ते उत्पन्न झाल्यानंतर त्यांचे ठायीं सुवर्णादि धातूंचेंरूप व कठीणपणा इत्यादिक नाहींत ते मृत्तिके प्रमाणें होतात· त्यांचें वजन सुवर्णादि धातूंचे वजनां पेक्षां अधिक आहे· सुवर्णादि धातूंशीं ओक्सिजनांचे जसे वेगळे वेगळे भाग मिळतात· तसे ओक्सिदांचे वर्ण वेगळे वेगळे आहेत· उदाहरण· लोखंडाचीं ओक्सिदें कृष्ण आणि तांबडीं आहेत· सुवर्णादि धातूं मध्यें जे औषधाचे कामाचे आहेत· त्यांतें सांगतो··

आन्तिमनी· आर्सेनिक· तांबें· पारा· झिंक·
रुपें· बिस्मथ· लोखंड· शिसें· कथिल·

या सर्वांचे गुण दुसर्या पदार्थांचे संयोगावांचून काहीं होत नाहींत· लोखंडाचा कीस पोटामध्यें काहीं आंबट पदार्थ नुस्ता दिल्हा तर याचे गुण होत नाहींत· तो निष्फल होतो· आसिदाशीं सुवर्णादि धातूंचीं मेलनें होत नाहींत· त्यांचे ओक्सिदांचीं होतात· हीं मेलनें दोहों प्रकारानें होतात· ओक्सिदावर आसिद घालून मिळवावें· हा एक प्रकार अथवा सुवर्णादिकांवर आसिद किंवा त्यांचें मेलन घालावें· तेणेंकरून ओक्सिद उत्पन्न होउन आसिदाशीं मिळतें या मेलनांस इंग्रेजी भाषेंत मेट्टलिक साल्ट्स ह्मणतात· न्युत्रल् साल्ट्सां प्रमाणें या मधून जां मध्यें आसिदाचे गुण आहेत त्यांचे नामाशीं सुपर् शब्द आणि जां मध्यें ओक्सिदाचे गुण आहेत· त्यांचे नामाशीं सब् शब्द लावतात· उदाहरण· सब्कार्बोनास् फेरी· हें लोखंडाचें ओक्सिद आणि कार्बोनिक आसिद या दोहोंचें मेलन आहे· जां मध्यें त्या दोहोंचे

गुण नाहींत त्यांशीं ते शब्द योजित नाहींत · उदाहरण · सल्फास्फेरी हें [illegible] ओक्सिद व आसिदम सल्फ्युरिकम या दोहोंचें मेलन आहे · याला संस्कृतांमध्यें कासीस व प्राकृतामध्यें हिराकस · ह्मणतात · ओक्सिदें आणि त्यांचीं आसिदाशीं मेलनें फार बलवंत औषधें आहेत · या मेलनांमधून काहीं मेलनें उघडीं ठेविलीं असतां पूर्ववत् राहात नाहींत · यास्तव तीं सदेव कुपींत घालून कुपीचें तोंड चांगलें बंद करून ठेवावीं · स्वर्णादि धातूंशीं आणि त्यांचे ओक्सिदाशीं गंधकाचें मेलन होतें अशा मेलनाचें साधारण नाम इंग्रेजी भाषेंत सल्फ्युरेट आहे · धातु विशेषें करून याचें विशेष नाम ठेवतात · उदाहरण · हैद्रार्जरीसल्फ्युरेटम् रुब्रम् हें पारा व गंधक यांचें तांबडें मेलन आहे · याला हिंगुळ म्हणतात · अशीं मेलनें औषधार्थ फार करून चांगलीं नाहींत · यांचे गुण सर्वकाल निश्चित होतात असें नाहीं यास्तव याचें प्रमाण द्यावयास सहज येत नाहीं प्रायः अन्य औषधें सिद्ध कराक्यासाठीं कामास येतात ·

आन्तिमनीचीं औषधें ·

लतीन · इंग्रेजी ·

आन्तिमोनीईसल्फ्युरेटम्प्रीसिपिटेटम · प्रीसिपिटेटेड्सल्फ्युरेट्ओफ्आन्तिमनी ·

सुर्म्याचें चूर्ण ·	दोन पौंड ·
लेक्षोर पोटास्से ·	चार पैंट ·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी ·	तीन पैंट ·
आसिदम सल्फ्युरिकम् दिल्युटम ·	लागेल तितकें ·

स्कुर्मा लेक्षोर पोटास्से व पाणी या तिहींचें मेलन करून मंदाग्नीवर साडेसात घटिका पर्यंत घाटून उकळावें आणि त्या वेळेस पहिल्या इतकें राहावयांसाठीं अर्काप्रमाणें काढलेलें पाणी थोडें थोडें सदेव आंत घालीत असावें · नंतर दुहेरी वस्त्रामध्यें लरेनें गाळून त्यांतलें चूर्ण तळास जावयासाठीं उष्ण आहे तों त्यांत आसिदम्सल्फ्युरिकम दिल्युटम थोडें थोडें सावकाशीनें टिबकवावें · नंतर चूर्ण उष्ण पाण्यानें फारवेळ धुवून शुष्क करून फार बारीक करावें · ·

हें औषध स्वेदकारि व कफघ्न आहे · याचें मोटें प्रमाण वमक आहे · याचे लाहान प्रमाणें करून घाम व कफ निघतो · सांप्रतकालीं बहुत करून घाम निघण्यासाठींच देतात · त्यास्तव याचें प्रमाण अर्धग्रेना पासून चार ग्रेनपर्यंत तें प्रमाणं अकु·

हेन्बेन · पाऱ्याचीं औषधें यां मधून कोणत्या एकाशीं मिळवुन चर्माचे रोगावर आणि क्रोनीक वायूवर द्यावें · त्या वेळेस या औषधाचे साहाय्यासाठीं सासों पारिल्लाचें पाचन दिवसांत एक पैंट द्यावें · आणि चोकशीनें शीन निवारण करावें · व त्या वेळेस आंबट पदार्थ भक्षावयास देउं नये · दिल्हा असतां येणेंकरून वमन होतें ·

लतीन ·	इंग्रजी ·
आन्तिमोन्यमटार्टारीझेटम ·	टार्टर इमेटिक ·
वेत्रम आन्तिमोनी इचें फार बारीक चूर्ण ·	एक पोंड ·
क्रीमर टार्टर ·	एक पोंड ·
उकळतें अर्काप्रमाणें काढलेलें पाणीं	एक गालन ·

वेत्रम आन्तिमोनीई आणि क्रीमर टार्ट या दोहोंचें चांगलें मेलन करून थोडें थोडें सावकाशीनें अर्का प्रमाणें काढलेल्या पाण्यांत घालून दंडानें सर्वकाळ घाटून तें ३७ सततीस पळें पर्यंत उकळवून ठेवावें · थंड झाल्यानंतर गाळून आटवून क्षार रजउ सन्न.करावे ·

हें औषध पांढरें आहे · याला गंध नाहीं · याच्या स्वाद थोडा तुरटी सारिखा आहे · हें पाण्यामध्यें विरघळतें · आलकोहोलांत विरघळत नाहीं · हें औषध वामक · स्वेदकारि · कफघ्न व लोहितकर आहे · याचे फार लाहान भागांचे संयोगें करून रेचकाचे गुण अधिक होतात · वामकास्तव याचें प्रमाण एक ग्रेन अथवा दोन ग्रेन आहे · परंतु या विषयीं हें अर्ध अर्ध ग्रेन अडीच घटिकांचे अंतरानें दिल्हें असतां चांगलें आहे · असें तीन चार वेळ दिल्या नंतर वमन होउन पक्काशय स्वच्छ होतो · उल्हासा होण्या साठीं पावपाव ग्रेन आठ दाहा घटिकांचे अंतरानें द्यावें · घर्म निघण्या साठीं हें एक ग्रेनाचे आठव्ये भागा पासून पावग्रेन पर्यंत द्यावें · कफ निघावया साठीं हें एक ग्रेनाचे सोळाव्ये भागा पासून आठव्ये भागा पर्यंत · औषक स्किल कापूर · इत्यादिकां मधून कोणत्या एकाशीं मिळवून साहा साहा घटिकांचे अंतरानें द्यावें · याच्या फार लाहान भाग व कालोमेल या दोहोंचें मेलन चर्माचे काहीं रोगांवर चांगलें आहे · हें दोन द्राम अथवा तीन द्राम चार्वी एक औंस यांचें मेलन चांगलें लोहितकर आहे · चर्मावर या मेलनाचें मर्दन केलें असतां फार पुरळ येतो · प्राय: याचें मर्दन बहुत रोगांवर कामाचें आहे · उरावर केलें असतां फुफ्फुसाचे रोगावर विशेष कामाचें आहे · कदाचित् याचे मर्दनें करून पुर

ळ आला नाहीं तर याशीं एक द्राम खडी साखरेचें चूर्ण मिळवून केलें असतां येतो·

लतीन	इंग्रेजी·
वैनम् आन्तिमोनीईटार्टारीझेटी·	टार्टर इमेटिक वैन·
टार्टर इमेटिक·	एक स्कुपल·
उकळलें अर्का प्रमाणें काढलेलें पाणीं·	आठ औंस·
रेक्टिफेद स्पिरिट·	दोन औंस·

पाण्यामध्यें टार्टर इमेटिक विरघळवून गाळावें· नंतर त्यामध्यें स्पिरिट घालावें·

या औषधाचे एक एक औंसामध्यें दोन दोन ग्रेन टार्टरइमेटिक आहे· हें दाहा मिनिंमापासून एक द्राम पर्यंत दिल्हें असतां घाम निघतो· या विषयीं याचें साहाय्य करणार सालेन द्राफ उष्णोदक पान इत्यादिक चांगलीं आहेत· याचे एक दोन द्रामें करून उह्मासा होतो· आणि अर्ध औंसें करून वमन होतें· सर्वकाळ स्मरणांत ठेवावें किं आन्तिमोनीचे औषधांचे गुण सर्व मनुष्यांस समानच होत नाहींत कांहीं मनुष्यास फार उग्र होतात· ह्मणजे तेहीं करून सुगुण न होतां फार वमन मूर्छा· इत्यादिक दुर्गुण होतात· त्यांचें निवारण होण्या साठीं सर्व औषधां पेक्षां अफु व उष्ण सुगंध औषधहीं चांगलीं आहेत·

लतीन·	इंग्रेजी·
पल्विस् आन्तिमोन्यलिस्·	आन्तिमोन्यल् पोदर् दुसरें नाम जेमसस् पोदर्
सुर्म्याचें चूर्ण·	एक पौंड·
मृगाचे शिंगाचे तुकडे·	दोन पौंड·

या दोन पदार्थांचें मेलन करावें तें मेलन मोटी मुस पांढरी होई तों पर्यंत उष्ण करून ती मध्यें घालून त्या मधून फार वाफ येई तों पर्यंत सदैव ढवळून राहूं द्यावें· नंतर मुशींत राहिलेल्या पदार्थांचें चूर्ण करून पुनः दुसऱ्या मुशींत घालून अग्नीवर ठेवून मूस पांढरी होई तों पर्यंत उष्ण हळु हळु अधिक करून पांच घटिका पर्यंत तसेंच राहूं द्यावें· नंतर मुशींत राहिलेल्या पदार्थाचें फार बारीक चूर्ण करावें·

हें ओषध पांढरें आहे· याला स्वाद व गंध नाहीं हें पाण्यामध्यें विरघळत नाहीं हें खेदकारी आहे· याचें मोठें प्रमाण दिल्हें असतां वमन आणि रेच होतात· जेव्हां घाम निघून पीडा न्यून करावयास इच्छितात· तेव्हां हें ओषध अफूशीं मिळवून द्यावें· आक्युट वायूवर हें कालोमेलाशीं आणि चर्माचे काहीं रोगावर कालोमेल व ग्युयक या दोहोंशीं मिळवून द्यावें· याचें प्रमाण दोन ग्रेनांपासून आठ ग्रेन पर्यंत आहे· याच्या गोळ्या करून द्याव्या· अथवा नुस्तें द्यावें· याचे गुण सर्वकाल निश्चित होतात असें नाहीं· याचा चांगला प्रतिनिधी टार्टर इमेटिक आहे· याचे आठग्रेनांचे स्थानीं टार्टर इमेटिक ग्रेनाचा अष्टमांश अथवा चतुर्थांश द्यावें;

रुप्याचें ओषध·

लतीन	इंग्रेजी·
आर्जन्ती नेत्रास·	नैत्रेट ओफ शिल्वर· दुसरें नाम कास्टिक·
रुपें	एक औंस·
आसिदम नेत्रिकम	एक औंस·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी	दोन औंस·

आसिदम नेत्रिकम् पाण्याशीं मिळवून पात्रांत घालावें· नंतर त्यांत रुपें घालून तें पात्र उष्ण वाळूचे पात्रांत ठेउन रुप्याचा रस करावा· नंतर उष्णपणा हळु हळु अधिक करून तो शुष्क करावा नंतर शुष्क पदार्थ मुशींत घालून मुस मंदाग्नीवर ठेवून त्याचा पुनः रस करावा तो रस उकळून त्यांतील पाण्याचा सर्व अंश दूर होई तो पर्यंत तसाच ठेवन सांच्यामध्यें ओतावा·

या ओषधाची लांगड लेखणी सारिखी वाटोळी याचा रंग धूसर आहे· याला गंध नाहीं· याचा स्वाद अति उग्र आहे· हें चर्मास किंवा केशांस लावलें असतां त्याचा रंग काळा होतो· हें रोचक व मांस नाशक आहे· याचे रोचक गुण रोचक ओषधां मध्यें लिहिले आहेत· त्यास्तव हें कापूर· आफु· व कस्तुरी· या मधून एकाशीं मिळवून द्यावें· प्रमाण एक्या ग्रेनाच्या आठवा भाग आहे· तें प्रमाण दिवसांत एक दोन वेळ द्यावें· आणि अगत्या प्रमाणें अधिक करावें· मांस नाशक गुण सांगतो· चामखीळ शिश्न मार्गांतील वाढलेलें मांस· व शिश्नावर उपदंशोंकरून नवे उत्पन्न झालेले चट्टे· यांचे नाश विषयीं हें फार चांगलें आहे· यास्तव या

च्या शेवट सळईचे शेवटा सारिखा करून पाण्यांत भिजवून त्या स्थळांवर लावावी· पोटास्सा प्रमाणें हें पातळ होत नाहीं यास्तव लावावयासाठीं त्यापेक्षां हें उत्तम आहे· हें कोठंरव्रण· नाडीव्रण व त्याप्रमाणें अन्यरोग यावरही चांगले आहे· हें दोन ग्रेन· एक औंस पाण्याशीं मिळवून लाहान चिपनळीनें त्या व्रणांत मारावें· व हें मेलन दंतां पासून हिरड्या सुटून त्यां मधून कधिं रक्त निघतें· असल्या हिरड्यांचे रोगांवर व ज्या रोगाला मुसलमान धारु म्हणतात· असला जो बालाच्या मुखरोग त्या सारिखा प्रौढ मनुष्याचे मुखांत झाला असतां त्यावर गुळण्यांस्तवही चांगलें आहे· कदाचित् या मेलनाचे गुळण्यानीं पहिल्या रोगाचा परिहार झाला नाहीं तर हें औषध एक द्राम एक औंस पाण्याशीं मिळवून पक्षी याचे पिसानें रोगस्थळावर लावावें· पहिल्या मेलनाच्या गुळण्या तोंड फार येतें त्यावरही चांगल्या आहेत यांहीं करून त्यांतील व्रणांचा परिहार होतो·

आर्सेनिकाचीं औषधें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
आर्सेनिकम आल्बम् सब्लिमेटम्·	सब्लेम्द व्हैट् आर्सेनिक·	सोमलाचें फुल·

सोमलाचें चूर्ण करून मुशींत घालून वर्ति दुसरी मुस जोडून मुस अग्नीवर ठेवून त्याचें फुल काढावें·

हि कृति सोमल स्वच्छ होण्यासाठीं आहे· तो चांगला स्वच्छ झाला असतां अग्नी संयोगानें सर्व उडतो· याचे वाफेच्या गंध लसूना सारिखा आहे· हा वस्कतः कठीण विष आहे· परंतु याची नीट योजना केली असतां श्रेष्ठ औषधही होतो· यास्तव ज्वर व्रण इत्यादिकांवर देतात· परंतु ज्याचें नाम लेंकोर आर्सेनिकेलिस् असें येणें करून मिश्रित एक औषध आहे· तेंच बहुत करून द्यावें त्या औषधाचे एक औंसा मध्यें हा चार ग्रेन आहे·

लतीन ·	इंग्रेजी ·
लैकोरआर्सेनिके लिस् ·	आर्सेनिकल सोल्युशन ·
सोमलाचे फुलाचें फार बारीक चूर्ण · · ·	चौसष्ट ग्रेन ·
सब्कार्बोनास पोटास्से · · · · · ·	चौसष्ट ग्रेन ·
स्पिरिटस् लवंड्युले कोम्पोसिटस · · ·	चार द्राम ·
अर्काप्रमाणें काटलेलें पाणी · · · ·	एक पैंट ·

सोमलाचें फुल · पोटास्सेसबुकार्बोनास् व पाणी हे तीन पदार्थ बिलोराचे पात्रांत घालून फुल विरघळे तों पर्यंत उकळावें · पातळ पदार्थ थंड झाल्यानंतर त्यामध्यें स्पिरिटस लवंडयुले कोम्पोसिटस घालावें · नंतर सर्व एक पेंट होई इतक्या बेताचें त्यांत अर्काप्रमाणें काटलेलें पाणी दुसरें घालून सर्व एक पेंट करावें

हें औषध रोचक आहे · याचें प्रमाण चार मिनिमां पासून वीस मिनिम पर्यंत आहे · रोचक औषधामध्यें लिहिलें आहे ·

बिस्मथाचें औषध ·

लतीन	इंग्रेजी ·
बिस्मथी सब्नैत्रास · · ·	सब्नैत्रेट् ओफ् बिस्मथ ·
बिस्मथ · · · · · · · · ·	एक औंस ·
आसिदम् नैत्रिकम् · · · · ·	दीड औंस ·
अर्काप्रमाणें काटलेलें पाणी · · · ·	तीन पेंट ·

तीन पेंट पाण्यामधून साहा द्राम पाणी नैत्रिक आसिदाशीं मिळवून त्यामध्यें बिस्मथ विरघळवून गाळावें गाळलेल्या पदार्थाशीं उरलेलें पाणी मिळवून चूर्ण तळांस बसे तों पर्यंत ठेवावें · नंतर वरलें पाणी टाकून खालचें चूर्ण खळीं वांचून कागद घेउन त्यामध्यें घालून मंदोष्मानें शुष्क करावें ·

हें चूर्ण बारीक व पांढरें आहे · याला गंध व स्वाद नाहीं · हें रोचक आहे · अजीर्णाबरोबर पक्काशयास दुःख असतां अथवा त्यांत स्वाद रहित पाणी उत्पन्न होउन तोंडांत येत असतां ह्मणजे तोंडाला पाणी सुटलें असतां हें औषध चांगलें आहे · याचें प्रमाण चार ग्रेन हें प्रमाण दिवसांत तीन वेळ द्यावें व हळु हळु

अधिक करून बारा ग्रेन पर्यंत करावें · याच्या सर्वकाळ गोळ्या द्याव्या ·

तांब्याचीं औषधें ·

लतीन	इंग्रेजी ·
क्युप्रम् आम्मोन्येटम ·	आम्मोन्येटेद् कोप्पर ·
मोरचुत ·	अर्ध औंस ·
आम्मोन्येसकार्बोनास ·	साहा ड्राम ·

हे दोन पदार्थ बिलोराचे खलांत शब्द न होई तों पर्यंत एकत्र खलावे · नंतर खललेला पदार्थ खळी वांचून कागद घेउन त्या मध्यें घालून मंदोष्णानें शुष्क करावा ·

या औषधाचा रंग निळा आहे · याचा गंध आम्मोन्याप्रमाणें व स्वाद तिखट आहे · हें रोचक आहे · याला पूर्वकाली फेंफच्यावर देत असत सांप्रतकालीं देत नाहींत · याचें प्रमाण एक ग्रेना पासून चार पांच ग्रेन पर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें · याचा गोळ्या करून द्याव्या ·

लतीन ·	इंग्रजी ·
लेकोरक्युप्री आम्मोन्येटी ·	सोल्युशन् ओफ् आम्मोन्येटेद् कोप्पर ·
क्युप्रम् आम्मोन्येटम ·	एक ड्राम ·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणीं ·	एक पैंट ·

क्युप्रम् आम्मोन्येटम पाण्यामध्यें विरघळवून कागदामध्यें गाळावें ·

हें औषध बाह्य उपचारार्थ चांगलें आहे · फार दिवसांचे व्रणावर काहीं मळकट पदार्थ उत्पन्न झाला असतां तो दूर होण्यासाठीं हें चांगलें आहे · नेत्रांत फूल पडलें असतां हें पाण्याशीं मिळवून नेत्रांत घालावें · येणेंकरून कधिं हित होतें

लोखंडाचीं औषधें

लतीन	इंग्रेजी·
फेर्रम आम्मोन्येटम·	आम्मोन्येटड् ऐरन·
लोहकीट	एक पौंड·
आसिदम्म्युर्याटिकम·	एक पौंड·
नवसागर	एक पौंड·

लोहोकिटावर आसिदमम्युर्याटिकम घालून शब्द न होई तों पर्यंत राहूं द्यावें· नंतर कागदामध्यें गाळून शुष्क होई तों पर्यंत आटवावें· या शुष्क पदार्थाला नवसागराशीं मिळवून डमरु यंत्रांत घालून तें यंत्र अति तीव्र अग्नीवर ठेवून फूल काढावें· नंतर फुलाचें चूर्ण करावें·

हें औषध रोचक असून रजस्वला होण्या साठी चांगलें आहे· याला पूर्वकालीं फार वैद्य देत असत· सांप्रत फार देत नाहींत याचें कारण याचे गुण सर्वकाल खचित होत नाहींत· याचें प्रमाण तीन ग्रेनां पासून पंधरा ग्रेन पर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
फेर्रीसबकार्बोनास·	सबूकार्बनेट ओफ् ऐरन·	लोहोकीट·

कासीस·	आठ औंस·
सोदेसबूकार्बोनास·	साहा औंस·
उकळतें पाणी·	एक गाल्लन·

कासीस· व सोदेसबूकार्बोनास हे दोन पदार्थ पृथक् पृथक् चार पैंट पाण्यामध्यें विरघळवावे नंतर दोहोंचें मेलन करून त्यांतील चूर्ण तळास बसे तों पर्यंत ठेवून वरलें पाणी टाकून खालचें चूर्ण उष्ण पाण्यानें धुवावें नंतर तें खळी वांचून कागद घेउन त्या मध्यें घालून मंदोष्णानें शुष्क करावें·

हें औषध चांगलें रोचक आहे· व रजस्वला होण्यास्तव ही चांगलें आहे· याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत तें प्रमाण दिवसांत दोन वेळ द्यावें· याच्या गोळ्या करून द्याव्या· अथवा नुस्तें किंवा मिश्रणा मध्यें अथवा एळूया बोळ·

बोळ· वाल्यिन · कडुरोचक · व स्फगंध रोचक · या मधून एकाशीं मिळवून द्यावे · याचें सविस्तर वर्णन रोचक व इतर औषधां मध्यें लिहिलें आहे ·

लतीन ·	इंग्रेजी ·	संस्कृत ·	प्राकृत ·
फेर्रीसल्फास ·	सल्फेट ओफ् ऐरन ·	कासीस ·	हिराकस ·

लोखंड ·	वजनानें आट औंस ·
आसिदम सल्फ्युरिकम ·	वजनानें आठ औंस ·
पाणी	चार पैंट ·

बिलोराचे पात्रांत आसिदम् सल्फ्युरिकम पाण्याशीं मिळवून त्या मध्यें लोखंड घालावें · मग बुडबुडे येतात ते राहिल्यानंतर तो पदार्थ कागदामध्यें गाळावा · नंतर तो शीतळ होऊन त्या पासून तळास क्षार रजां सारिखा पदार्थ उत्पन्न होई असा आटवावा नंतर वरला पातळ पदार्थ टाकून खालच्या पदार्थ खळी बांन्धून कागद घेउन त्यावर **शुष्क करावा** ·

हें औषध रोचक असून रजस्वला होण्यासाठीं उत्तम आहे · व हें कृमिघ्नही आहे · येणेंकरून पोटांतल्या कृमीच्या नाश होतो · परंतु या विषयीं पोटांत देत नाहीत · लोखंडाचे औषधां मध्यें हें उत्तम आहे · याचें प्रमाण एक ग्रेन तें प्रमाण दिवसांत दोन वेळ द्यावें · बहुतकरून औषक · रेवाचिनी · बोळ कडुरोचकाच्या रांधा इत्यादिकां मधून एकाशीं याचा गोळ्या करून द्याव्या · अथवा कडु रोचकाचें फाराटांत विरघळवून द्यावें · याचें सविस्तर वर्णन रोचक औषधांमध्यें लिहिलें आहे ·

लतीन	इंग्रेजी ·
फेर्रम्टार्टारीझेटम् ·	टार्टरिझेड् ऐरन ·

लोखंडाच्या कीस ·	एक पौंड ·
क्रीमर टार्टराचें चूर्ण ·	दोन पौंड ·
अर्का प्रमाणें काढलेलें पाणी ·	पांच पैंट अथवा लागेल तितकें

कीस व क्रीमरटार्टर हे दोन पदार्थ एकत्र खलावे · नंतर खलेला पदार्थ बिलोराचे उथळ पात्रांत घालून वर एक पैंट पाणी घालून वीस दिवस पर्यंत उघडा ठेवावा आणि प्रति दिवशीं घाटावा · व अगत्या सारिखें अर्का प्रमाणें का

टलेलें

ढलेलें पाणी घालून सदैव ओलसर राखावा· नंतर त्या पात्रांतील सगळा पदार्थ चार पेंट अर्काप्रमाणें काढलेल्या पाण्या मध्यें ३८ पळें पर्यंत उकळवून गाळावा· गाळलेला पदार्थ पात्रांत घालून तें पात्र उकळलेल्या पाण्यानें भरलेल्या पात्रांत ठेवून शुष्क होई तों पर्यंत आटवावा· नंतर त्याचें चूर्ण करून कुपींत घालून कुपीचें तोंड चांगलें बंद करावें·

हें औषध रोचक आहे· याचे गुण लोखंडाचें अन्य औषधांचे गुणासारिखे आहेत· याचा स्वाद चांगला आहे· यणेंकरून प्राय: उल्लासा होत नाहीं· यास्तव बालांना व जा लोकांना लोखंडाचे अन्य औषधें करून उल्लासा होतो त्यांनां देतात· जा जा रोगावर लोखंडाचीं अन्य औषधें चांगलीं आहेत· त्या त्यां रोगांवर हें उत्तम आहे· कोणी ह्मणतात कि याला द्रावक गुणही आहे· यास्तव हें द्रावक औषधा बरोबर यावयास चांगले आहे· याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून अर्ध द्राम पर्यंत आहे· हें मिश्रणा मध्यें द्यावें अथवा याचा गोळ्या करून द्याव्या· नुस्तें व अन्य चूर्णांशीं मिळवून देउं नये· याचें कारण उघडें राहून वायूंतला ओलसरपणा लागून लवकर पातळ होतें·

लतीन·	इंग्रेजी·
लेघोरफेरीआल्कालीनी·	लोल्युशान् ओफ् आल्कलीन ऐरन·
लोखंड·	अडीच द्राम·
नैत्रिक आसिद·	दोन औंस·
अर्काप्रमाणेंकाढलेलें पाणी·	साहा औंस·
लेघोर पोटास्से सब्कार्बोनटिस·	साहा औंस·

आसिद व पाणी या दोहोंचें मेलन करून लोखंडावर घालावें· नंतर मेलना मधून बुडबुडे येतात ते बंद झाल्या नंतर वरला आंबट पदार्थ घेउन थोडा थोडा सावकाशीनें लेघोर पाटास्से सब्कार्बोनटिसामध्यें घालून त्याचा रंग भुरा आरक्त मिश्रित होउन काहीं शब्द न होई तों पर्यंत तें घाटावें· नंतर पंधरा घटिका पर्यंत ठेवून वरला पातळ पदार्थ घ्यावा·

यांचे गुण सर्वकाल खचीत होत नाहींत· यास्तव हें कधींही देत नाहींत·

लतीन	इंग्रेजी
टिंक्युरा फेर्री आम्मोन्येटी ·	टिंक्युर ओफ् आम्मोन्येटेड् ऐरन ·
फेरम आम्मोन्येटम ·	चार औंस ·
प्रुफ स्पिरिट ·	एक पैंट ·

हे दोन पदार्थ काहीं अवधी पर्यंत कुपींत ठेवून गाळावे·

याचे गुण फेरम् आम्मोन्येटमाचे गुणां सारिखे आहेत·

लतीन ·	इंग्रेजी ·
टिंक्युरा फेर्री म्युर्याटिस ·	टिंक्युर ओफ् म्युर्येट् ओफ् ऐरन् ·
लोहोकीट ·	अर्ध पौंड ·
आसिदम् म्युर्याटिकम् ·	एक पैंट ·
रेक्टिफेद स्पिरिट ·	तीन पैंट ·

लोहोकीट बिलोराचे पात्रांत घालून त्यावर आसिद घालून तीन दिवस पर्यंत ठेवावें मध्यें कधिं कधिं हलवावें· नंतर गाळ तळास बसावयां साठीं काहीं अवधी पर्यंत तसेंच राहूं द्यावें नंतर वरला स्वच्छ पदार्थ घेउन त्यामध्यें स्पिरिट घालावे·

लोखंडाचें हें औषध फार उत्तम आहे· याचे गुण रोचक व कोष्टबंधक यां मध्यें लिहिले आहेत· व हें रजस्वला होण्यास्तवही चांगलें आहे·

लतीन ·	इंग्रेजी ·
वीनम फर्री ·	वैन ओफ् ऐरन ·
लोखंडाचा कीस ·	एक द्राम ·
क्रीमर टार्टराचें चूर्ण ·	साहा द्राम ·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी ·	दोन पैंट किंवा लागेल तितकें
प्रुफ स्पिरिट ·	वीस औंस ·

लोखंड व क्रीमरटार्टर हे दोन पदार्थ एकत्र खलावे· खललेला पदार्थ बिलोराचे उथळ पात्रांत ४२ दिवस पर्यंत उघडा ठेवावा· आणि प्रति दिवशीं दंडाने घाटून अर्काप्रमाणें काढलेलें पाणी कधिं घालून सर्वकाळ ओलसर राखावा· नं-

तर मंदोष्णानें शुष्क करून त्याचें चूर्ण करावें · तें चूर्ण तीस औंस अर्काप्रमाणें काढलेल्या पाण्याशीं मिळवून गाळावें · नंतर त्यांत सिरिद घालावें ·

या औषधाचा स्वाद लोखंडाचे इतर औषधांचे स्वादापेक्षां चांगला आहे · बहुतकरून याला विटाळशी होण्यासाठीं व बालांचे गंडमालावर देतात · याचें प्रमाण एक द्रामापासून साहा द्राम पर्यंत तें प्रमाण दिवसांत दोन तीन वेळ द्यावें ·

पाऱ्याचीं औषधें ·

लतीन	इंग्रेजी ·	प्राकृत ·
हेद्राजरम् कम् क्रीटा ·	मेर्क्युरी विथ चाक ·	पाऱ्याचें खडी मिश्रित चूर्ण
स्वच्छ पारा ·		वजनानें तीन औंस ·
स्वच्छ खडी ·		पांच औंस ·

पाऱ्याचें रूप काहीं दिसत नाहींसें होई तों पर्यंत पारा खडीशीं चांगला खलावा ·

पाऱ्याचें हें औषध फार मृदु आहे · यास्तव बालांना द्यावयास उत्तम आहे · व गुल्मावर आणि चर्माचे रोगांवर देतात · याचें प्रमाण पांच ग्रेनांपासून तीस ग्रेनपर्यंत तें प्रमाण काहीं दाट पदार्थाशीं मिळवून दिवसांत एक दोन वेळ द्यावें ·

लतीन ·	इंग्रेजी ·
हेद्रार्जरी नैत्रिको ओक्सिदम ·	रेड्प्रीसिपिटेट
स्वच्छ पारा	वजनानें तीन पौंड ·
आसिदम् नैत्रिकम ·	वजनानें दीड पौंड ·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी ·	दोन पैंट ·

घिलोराचे पात्रांत सर्वांचें मेळन करून सर्व पारा वितळून पाणी उडून पांढरा पदार्थ राही तों पर्यंत आटवावें · नंतर पांढऱ्या पदार्थाचें चूर्ण करून फार उथळ पात्रांत घालून मंदाग्नीवर ठेवून त्यामधून तांबडी वाफ निघून बंद होई तों पर्यंत उष्णपणा हळु हळु अधिक करून उतरावा ·

या औषधाचा रंग तांबडा आहे · हें व्रणादिकांचे मांसाचे नाशाविषयीं

मात्र कामाचें आहे· याचें फार बारीक चूर्ण करून त्यांवर घालावें· याचे दुसरे गुण याचे मलमावर लिहिले आहेत·

लतीन	इंग्रेजी·
हेद्रार्जरी ओक्सिदम् सिनीर्यम·	ग्रे ओक्सिद् ओफ् मेर्क्युरी·
कालोमेल·	एक औंस·
चुन्याचें पाणी·	एक गाल्लन·

चुन्याचे पाण्यामध्यें कालोमेल घालून तळास चूर्ण बसे तों पर्यंत उकळावें· नंतर तें चूर्ण अर्का प्रमाणें काढलेल्या पाण्यांत धुवून शुष्क करावें·

पाऱ्याचें हें औषध नम्र आहे· परंतु याचे गुण सर्वकाल खचित होत नाहींत· यास्तव बहुत करून पोटांत देउं नये· दुसरें नम्र औषध ब्लुपिल अथवा पाऱ्याचें खडी मिश्रित चूर्ण द्यावें· याचें प्रमाण एक ग्रेना पासून तीन ग्रेन पर्यंत आहे· याचा गोळ्या करून द्याव्या हें पाऱ्याचा धुर द्यावयासाठीं कामाचें आहे·

लतीन	इंग्रेजी·
हेद्रार्जरी ओक्सिदम् रुब्रम·	रेड् ओक्सिद ओफ् मेर्क्युरी·
स्वच्छ पारा·	वजनानें एक पौंड·

ज्याचें तळ फार रुंद आणि ग्रीवा फार लांब मुख फार लाहान असल्या बिलोरी पात्रांत पारा घालून उष्ण मानाच्या ६०० साहाशें कक्षां पर्यंत उष्ण करून तांबडा खपली सारिखा होई तों पर्यंत ठेवावा· नंतर त्याचें फार बारीक चूर्ण करावें·

हें औषध फार बळकट आहे· परंतु येणेंकरून प्रायः वमन रेच इत्यादिक होतात· यास्तव सांप्रतकाळीं देत नाहींत· पोटांत द्यावयासाठीं याचें प्रमाण ग्रेनाचे आठव्ये भागा पासून एक ग्रेन पर्यंत आहे· तें अफू बरोबर द्यावें· हें ही रेड्प्रीसिपिटेट सारिखें मांसाचे नाशा विषयीं कामाचें आहे·

लतीन	इंग्रेजी
हैड्रार्जरी ओक्सिम्युर्यास·	ओक्सिम्युर्येट ओफ् मर्क्युरी· दुसरें नाम· कार्रोसिवसब्लिमेट·

स्वच्छ पारा· . . . . वजनानें दोन पौंड·

आसिदम् सल्फ्युरिकम· . . . . वजनानें तीन औंस·

अग्नीवर फार शुष्क केलेलें मीठ· . . . . . चार पौंड·

पारा व आसिदम् सल्फ्युरिकम बिलोराचे पात्रांत घालून त्याचें मेलन शुष्क होई तों पर्यंत आटवावें· या मेलनाला सल्फेट ओफ् मेर्क्युरी ह्मणतात· हें थंड झाल्या नंतर मिठाबरोबर चिनी मृत्तिकेच्या खलबत्यांत खलून बिलोराचे डमरु यंत्रांत घालून उष्ण हळु हळु अधिक करून फुल काढावें·

हें पांढरें गंधरहित तेजस्वी आहे· याचा स्वाद फार उग्र आहे· याला पूर्व कालीं फार वैद्य देत असत· सांप्रत फार देत नाहींत· याचें कारण हें चौकशी वांचून दिल्हें असतां येणें करून पोटांत शूळ· बहुत रेच इत्यादिक उपद्रव होतात· याचें अफूशीं किंवा लादन माशीं मेलन करून दिल्हें असतां हें उपद्रव न्यून होतात· व केवळ या औषधें करून झालेल्या त्या उपद्रवांचा नुस्ती अफू व लादनम येंही करून परिहार होतो· हें मेलन उपदंशाचे परिहार्थ तोंड आणावयासाठीं कधीं देतात· परंतु पूर्वोक्त उपद्रव होतात यास्तव यावर द्यावयास नीट नाहीं· कुष्ट इत्यादिक चर्माचे कठीण रोगांवर देतात· याचें प्रमाण एक्या ग्रेनाच्या आठवा भाग आहे· तें प्रमाण दिवसांत एक दोन वेळ पाण्यांत अथवा आलकोहोलांत विरघळवून द्यावें· बहुतकरून याचे बरोबर सार्सापारिल्लाचें मिश्रित पाचन बार्कीचें पाचन इत्यादिक औषधां मधून कोणतें एक द्यावें· हें बाह्यउपचारार्थ चर्माचे रोगांवर कामाचें आहे· हें एक ग्रेन अथवा दोन ग्रेन एक औंस बदामाचे मिश्रणाशीं मिळवून रोग स्थळावर लावावें· परंतु लावत्येवेळेस औषधाचा हस्त डोळ्यांस लागुं देउं नये· लागला असतां डोळे येतात लावल्यानंतर याप्रमाणें रोग्यासही सांगावें· कोणी विषासाठीं हें घेतलें असतां यावर सर्व औषधांमध्यें विषघ्नास्तव कोंबड्याचे आंड्यांतील पांढरा पदार्थ व पाणी यांचें मेलन चांगलें आहे·

लतीन	इंग्रेजी
लैकोरहैड्राजॅरीओक्सिम्युर्याटिस·	सोल्युशन्ओफ्कारोसिवसब्लिमेट·

कारोसिवसब्लिमेट·	आठ ग्रेन·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी·	पंधरा औंस·
रेक्टिफेद्स्पिरिट·	एक औंस·

पाण्यामध्यें कारोसिव सब्लिमेट विरघळवून त्यामध्यें स्पिरिट घालावें·

या औषधाचे एक औंसामध्यें सब्लिमेट अर्धग्रेन आहे· उपदंशावर पोटांत द्यावयासाठीं याचें प्रमाण अर्धड्रामा पासून दोन ड्राम पर्यंत आहे· तें प्रमाण दोन तीन औंस पेजेमध्यें अथवा जवसांचे पाचना मध्यें द्यावें· हें एक औंस पाणी दोन औंस यांचें मेलन खरूज व ती प्रमाणें अन्य रोग यांवर बाह्यउपचारार्थ चांगलें आहे·

लतीन	इंग्रेजी
हैड्रार्जरमप्रीसिपिटेटम्आल्बम्	व्हैटप्रीसिपिटेटेद्मेर्क्युरी·

ओक्सिम्युर्येट ओफ् मेर्क्युरी·	अर्ध पौंड·
नवसागर·	चार औंस·
लैकोरपोटास्सेसब्कार्बोनटिस·	अर्धपैंट·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी·	चार पैंट·

पाण्यामध्यें· प्रथम नवसागर विरघळवून ओक्सिम्युर्येट ओफ मेर्क्युरी विरघळवावें· नंतर त्यामध्यें लैकोर पोटास्से सब्कार्बोनटिस घालावें· चूर्ण तळास बसल्यानंतर वरला पातळ पदार्थ टाकून चूर्ण स्वादरहित होईतों पर्यंत धुवून शुष्क करावें·

हें औषध खरूज व ती प्रमाणें अन्य रोग यांवर चांगलें आहे· मलमामध्यें मिळवून लावावें मलमामध्यें याचें मेलन लिहिले आहे· हें पोटांत देतनाहींत·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
हैड्रार्जरमप्युरिफिकेटम·	प्युरिफैद्मेर्क्युरी·	स्वछपारा·

पारा लोखंडाचे रिटोर्टांत घालून रिटोर्ट अग्नीवर ठेवून पारा काढावा· येणेंकरून पारा स्वछ होतो· जो पारा दुसर्या धातूशीं मिश्रित असतो तो निस्तेज मळकट असा दिसतो· स्वछ पाऱ्यासारिखा त्याचा चंचळपणा नाहीं त्याला बिलोराचे कुपींत घालून कुपी हालवली असतां मळकट होत्ये· स्वछ पाऱ्याचें वजन पाण्याचे वजनापेक्षां अधिक आहे· पाण्याचा तुलाविशेष· १००० सहस्त्र असला तर याचा १३५४० तेरा सहस्त्र पांचशें चाळीस असतो··

लतीन	इंग्रेजी·
हैड्रार्जरीसबम्युर्यास·	कालोमेल
स्वछपारा· · · · · · · · · · ·	वजनानें चार पौंड·
आसिद्मूसल्फ्युरिकम· · · · ·	वजनानें तीस औंस·
मीठ· · · · · · · · · · · · ·	दीढ पौंड·
नवसागर· · · · · · · · ·	आठ औंस·

चार पौंड पाऱ्यामधून दोन पौंड पारा आसिदाबरोबर बिलोराचे पात्रांत घालून त्याचें मेलन शुष्क होई तों पर्यंत उकळवीत असावें· शुष्क होउन थंड झाल्यानंतर त्याला उरलेल्या दोन पौंड पाऱ्याबरोबर दगडाचे खलांत घालून त्याचें पूर्ण मेलन होई तों पर्यंत चांगलें खलावें नंतर त्यामध्यें मीठ घालून पाऱ्याचें रूप काहींही दिसत नाहीं असें होई तों पर्यंत पुनः चांगलें खलावें· नंतर त्या मेलनाला डमरु यंत्रांत घालून तें यंत्र अन्य पात्रांतल्ये उष्ण वाळूवर ठेवून वाळु पात्र अग्नीवर ठेवावें· नंतर यंत्राचे खालचे पात्रांतून वरल्या पात्रांत पांढरा पदार्थ धुरासारिखा येउन जमतो· त्या पदार्थाचें चूर्ण करून चाळणीमध्यें चाळावें· नंतर एक गाळन उकळत्ये पाण्यामध्यें नवसागर विरघळवून त्यांत चाळलेलें चूर्ण घालून चांगलें मिळवून तळास जाई तों पर्यंत तसेंच ठेवावें· नंतर वरलें पाणी टाकून खालचें चूर्ण स्वछ पाण्यानें चांगलें धुवावें· जों पर्यंत कीं धुतले

त्या पाण्यांत एधाआमोन्ये घालून काहीं अपूर्व दिसत नाहीं नंतर तें शुष्क करून फार बारीक करावें· बारीक झाल्यानंतर त्याला अल्प पाण्यांत भिजवून उदक भरलेल्या पात्रांत घालून चांगलें ढवळावें· अल्प कालानंतर वरलें गढूळ पाणी अन्य पात्रांत घालून त्यांतील चूर्ण तळास बसे तों पर्यंत ठेवावें नंतर वरचें पाणी टाकून खालचें चूर्ण शुष्क करून बारीक करावें·

हें औषध पांढरें व स्वाद गंधरहित आहे· हें पाण्यामध्यें विरघळत नाहीं· यामध्यें कधिं कार्बोसिवसब्लिमेटाची थोडी भेळ असल्ये यास्तव· पाण्यांत चांगलें धुवून स्वछ करावें· त्याचे परीक्षेचा प्रकार सांगतो· हें चुन्याचे पाण्याबरोबर खलून याचा शुद्ध कृष्ण वर्ण झाला असतां यांत त्याची भेळ नाहीं कृष्ण पीत मिश्रित वर्ण झाला असतां भेळ आहे असें जाणावें· हा एक प्रकार· अथवा हें पाण्यामध्यें घालून पाणी फार उकळवून गाळावें थंड झाल्या नंतर यामध्यें कुक्कुटांडांतील पांढऱ्या पदार्थाचें फार पाण्याशीं मेलन करून थोडकें घालावें· तेणेंकरून तें पाणी त्याची भेळ असतां पांढरेंसें होतें· भेळ नसतां तसेंच स्वछ राहातें· हें औषध पाऱ्याचे सर्व औषधामध्यें उत्तम आहे· व अन्य सर्व औषधांपेक्षां बहुत कामाचें आहे· याला गुण बहुत आहेत हें बहुत रोगांचे परिहारा विषयीं व काहीं रोगांचे शमना विषयीं कामाचें आहे· उपदंशावर हें अफूशीं मिळवून द्यावें तेणेंकरून रोगाचा परिहार खचित होतो· तसें अफूशीं मिळवून अतीसार· काळिजाचे रोग· ज्वर· वायु· जरीमरी· चर्माचे रोग इत्यादिकांवर द्यावें· त्याप्रमाणें कुत्र्याचे दंशेंकरून उत्पन्न रोग· फेंफरें· धनुर्वायु· यांवरही कधिं द्यावें· रेचकास्तव व कृमिघ्नास्तव हें बहुत करून एकलें देउंनये दुसऱ्या औषधाशीं मिळवून द्यावें· अथवा रात्रीस हें देउंन मोट्या पांहांटेस सोनामुखीचा फाराट किंवा खारट ढाळक द्यावें· अथवा या दोहोंचें मेलन करून द्यावें· रेचकासाठीं व उपदंशावर याचें प्रमाण एक ग्रेना पासून तीन ग्रेन पर्यंत आहे· त्याचा गोळ्या करून द्याव्या· रेचका विषयीं अफूसहित देण्याचें अगत्य लागलें असतां अफूसहित द्यावें· रेचकास्तव याचें प्रमाण पांच ग्रेनांपासून दाहाग्रेन पर्यंत आहे· अतीसार· जरीमरी ज्वर इत्यादिक कठीण रोगांवर याचें प्रमाण दाहा ग्रेनांपासून एक स्कुपल पर्यंत तें प्रमाण दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· हे रोग फार भयकारक असले तर कधिं अर्धड्राम किंवा एक ड्राम ही द्यावें· भयकारक रोगावर मोठें प्रमाण घेतल्या नंतर प्रायः पोटांत मुरडा व रेच होत नाहींत· व बहुत

करून वमनाचा हा प्रतिबंध होतो· बालांचे रोगांवर हें औषध श्रेष्ठ आहे· परंतु यां वर प्रौढ मनुष्यां प्रमाणें याचें सामर्थ्य फार नाहीं· हें जड आहे· यास्तव पातळ पदार्थामध्यें देऊं नये नुसतें घ्यावें अथवा गोळ्या करून घ्याव्या·

लतीन·	इंग्रेजी·
हैड्रार्जरीसल्फ्युरेटमूनैग्रम·	ब्लाक्सल्फ्युरेटओफ्मेर्क्युरी·
	दुसरें नाम इथ्योप्समिनिरल·

स्वच्छ पारा·	वजनानें एक पौंड·
गंधकाचें फुल·	एक पौंड·

पाऱ्याचें रूप कांहीं ही दिसत नाहीं सें होई तोंपर्यंत पारा फुलाशीं खलावा·

हें औषध कृमीवर व कधिं चर्माचे काहीं रोगावर देतात परंतु याचे गुण खचीत होतात असें नाहीं आणि लवकर ही होत नाहींत· यास्तव फार करून देऊं नये याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत आहे· तें दिवसांत दोन तीन वेळ घ्यावें;

लतीन·	इंग्रेजी·
हैड्रार्जरी सल्फ्युरेटमरुब्रम·	रेदसल्फ्युरेट्ओफमेर्क्युरी·
प्राकृत·	दुसरें नाम वेर्मिल्यन·
हिंगुळ·	

स्वच्छ पारा·	वजनानें चाळीस औंस·
गंधकाचें फुल·	आठ औंस·

अग्नीवर फुल पातळ करून त्याशीं पाऱ्याचें मेलन करावें· नंतर तें मेलन जेव्हां फुगावयास लागतें तेव्हां तत्क्षणीं अग्नीवरून उतरून त्याचे पात्रावर बळकट झांपण ठेवून तें प्रदीप्त न होई असें करावें नंतर त्याचें चूर्ण करून डमरु यंत्रांत घालून हिंगुळ काढावा·

हा काढावयासाठीं डमरु यंत्राचें तोंड आणि ग्रीवा हीं रुंद असावीं रुंद नसलीं तर यांचेठायीं हिंगूळ जमून त्याचें यंत्राचे वरल्ये पात्रांत जाण्याचें विघ्न होऊन यंत्र फुटतें· याचें रूप सर्व लोकांस ठाउक आहे यास्तव सांगितलें नाहीं

पूर्वकालीं हा दाहाग्रेनांपासून तीसग्रेनपर्यंत पोटांत देत असत सांप्रतकालीं पोटांत देत नाहींत· याचा धुर कधिं उपदेश रोग्याला देतात·

शिशाचीं औषधें·

लतीन·	इंग्रेजी·
प्लूंबीआसीटास·	आसेटेट्‌ओफ्‌लेद· दुसरें नाम श्युगरओफ्लेद·

सुफेद·	एक पौंड·
आसिदम आसेटिकम फोर्श्यस·	एक पैंट·
उकळतें अर्कप्रमाणें काढलेलें पाणी·	दीढ पैंट·

आसिद· व पाणी यांचें मेलन करून त्यांमध्यें थोडें थोडें सावकाशीनें सुफेद घालून त्यांतील आसिदाचे सर्व गुण दूर होतात; तोंपर्यंत उकळवावें· नंतर कागदामध्यें गाळून वर्त्तितवंग येई तोंपर्यंत आटवून तळांस क्षार रज उत्पन्न व्हावयासाठीं तसेंच ठेवावें· नंतर वरला पातळ पदार्थ टाकून रज स्वळी वांचून कागद घेऊन त्यावर शुष्क करावें·

हें औषध पांढरें आहे· याचा स्वाद खारट असून काहीं गोड तुरट असा आहे· याला अल्प गंध आहे· हें बहुत करून पोटांत देऊं नये· कदाचित द्यावयाचें असलें तर फार चौकशीनें अफूशीं मिळवून द्यावें· त्यासाठीं याचें प्रमाण अर्धग्रेन आहे· तें प्रमाण दिवसांत एक दोन वेळ द्यावें· याच्या गोळ्या करून द्याव्या· हें बाह्य उपचारार्थ चांगलें आहे· त्या विषयीं हें पाण्यामध्यें विरघळवावें· पाण्यामध्यें प्रथम सिर्क थोडें थोडें घालून नंतर हें घातलें असतां चांगलें विरघळतें जसा रोग असेल तसें हें न्यूनाधिक विरघळवावें· याचे गुण कोष्ठबंधक औषधांमध्यें सविस्तर लिहिलें आहेत·

लतीन·	इंग्रेजी·
लैकोरप्लूंबीसबासीटेटिस·	सोल्युशनओफ्सबासेटेटओफ्लेद· दुसरें नाम गुलार्डएक्स्ट्राक्ट·

मुरदाडशिंग·	दोन पौंड·
आसिदम आसेटिकम दिल्युटम·	एक गालन·

या दोन पदार्थांचें मेलन करून सदैव घाटून साहा पैंट राही तोंपर्यंत उकळवावें.

कळंयावें· नंतर त्यांतील गाळ तळास जावयासाठीं कांहीं अवधीपर्यंत तें ठेवून गाळावें·

या औषधाचें पाण्याशीं मेलन करतात त्या मेलनाला गुलार्ड्स वाटर ह्मणतात· तें मेलन चांगलें शीतकर शोथ नाशक व कोष्ठबंधक आहे· चर्माचे इन्फ्लमेशनावर आणि चर्मास अग्नि लागून व तप्त पदार्थ लागून दुःख होतें त्यावर चांगलें आहे· त्यांत वस्त्र भिजवून त्या स्थलांवर लावावें·

लतीन·	इंग्रेजी·
लैक्कोरप्लंबीसबासीटेटिसदैल्युटस·	दैल्युटेदसोल्युशन्ओफ़सबासेटेटओफलेद·

गुलार्ड्स एक्स्त्राक्ट·	एक ड्राम·
अर्कप्रमाणें काढलेलें पाणी·	एक पैंट:
प्रुफस्पिरिट·	एक ड्राम·

सर्वांचें मेलन करावें·

यामध्यें प्रुफस्पिरिट निष्कामाचें आहे· जसा रोग असतो तसे हे पदार्थ मेलनाविषयीं न्यूनाधिक घेऊन औषध नम्र व बळकट करतात यास्तव रोगाचे अवलोकना वांचून याचें उक्तमान घेऊन मेलन सिद्ध करून ठेऊं नये·

झिंकाचीं औषधे·

लतीन·	इंग्रेजी·
कालामिनाप्रीपरेटा·	प्रीपेरेद कालामिन·

कालामिना पात्रांत भाजावें नंतर त्याला खलून फार बारीक करून खडी प्रमाणें शोधून स्वच्छ करून शुष्क करावें·

हें बारीक चूर्ण व्रणावर घालावें·

लतीन·	इंग्रेजी·
जिन्सीओक्सिदम·	ओक्सिदओफ़झिंक·

जिन्सीसल्फास·	एक पौंड·
लैक्कोरआम्मोन्ये·	एकपैंट अथवा लागेल तितकें·
अर्कप्रमाणें काढलेलें पाणी	एक पैंट·

पाण्यामध्यें जिनूसीसल्फास विरघळवावें· नंतर त्यांतील चूर्ण तळास जावयासाठीं त्यांत लैक्कोर आम्मोन्ये लागेल तितकें घालावें नंतर वरला पातळ पदार्थ टांकून खालचें चूर्ण पाण्यांत फार वेळ धुवून उष्ण वाळूचे उष्ण पाण्यानें शुष्क करावें·

हें औषध पांढरें आहे याला गंध व स्वाद नाहीं हें पाणी व आलकोहोल यांमध्यें विरघळत नाहीं आसिदामध्यें सर्व विरघळतें· हें रोचक व अंग ग्राहनाशक आहे· याला फेंफरें व त्या सारिखा अन्य रोग यांवर कधिं पोटांत देतात· त्यासाठीं याचें प्रमाण एक ग्रेना पासून साहाग्रेनपर्यंत आहे तें दिवसांत एक दोन वेळ द्यावें· हें बहुत करून बाहेर लावतात· जा कार्या विषयीं लावतात तें कार्य याचे मलमावर लिहिलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
जिनूसीसल्फास·	सलफेटओफझिंक दुसरें नामव्हैटवीट्र्यल·

झिंकाचे लाहान लाहान तुकडे·	चार औंस·
आसिदमूसल्फ्युरिकम·	वजनानें साहा औंस·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी	चार पैंट·

बिलोराचे पात्रांत तुकडे घालून त्यांवर आसिदम व पाणी घालावें· तेणें करून तुकड्यांचा रस होतो रस होत्ये वेळेस शब्द होतो तो बंद झाल्यानंतर पातळ पदार्थ कागदामध्यें गाळून वर्तितवंग येई तोंपर्यंत आटवून क्षार रज उत्पन्न व्हावयासाठीं काहीं अवधीपर्यंत तसाच ठेवावा त्या पासून तळास क्षार रज उत्पन्न झाल्यानंतर वरला पातळ पदार्थ टाकून रज शुष्क करावे·

या औषधाचा रंग पांढरा व स्वाद आंबट तुरट असा आहे· याला गंध नाहीं हें पाण्यामध्यें सहज विरघळतें· हें रोचक व कोष्ठबंधक व वमक आहे· वमका विषयीं याचें वर्णन वमक औषधांमध्यें सविस्तर केलें आहे· त्या विषयीं याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून वीस अथवा तीस ग्रेन पर्यंत आहे· रोचकास्तव याचें प्रमाण पाव ग्रेना पासून दोन ग्रेन पर्यंत आहे· तें दिवसांत दोन वेळ द्यावें·

गंधकाचीं

गंधकाचीं औषधें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
ओल्यमसल्फ्युरेटम·	सल्फ्युरेटेदओइल·	गंधकाचें तेल·

स्वच्छ गंधक·	दोन औंस·
ओल्यमआलीवे अथवा त्याचे ऐवजीं गोडें तेल·	एक पैंट·

लोखंडाचे मोठ्ये पात्रांत तेल उष्ण करून त्यामध्यें थोडा थोडा गंधक घालून फार घाटून दोघांचें चांगलें मेलन करावें·

या मेलनाचा रंग भुरा व याला कुगंध आणि कुस्वाद फार आहे याला सांप्रत कालीं देत नाहींत· पूर्वकालीं पडसें खोकला इत्यादिक रोगांवर देत असत·

लतीन·	इंग्रेजी·
पोटास्सेसल्फ्युरेटम·	सल्फ्युरेटओफपोटास्स·

स्वच्छ गंधक·	एक औंस·
पोटास्सेसबूकार्बोनास·	दोन औंस·

हे दोन पदार्थ मुशींत घालून वर ढांपण ठेवून मुस अग्नीवर ठेवावी· दोहोंचें चांगलें मेलन झाल्यानंतर उतरावी·

हें औषध शुष्क असतां याला कुगंध येत नाहीं उघडें राहून वायूंतला ओलसरपणा लागून ओलें झालें असतां किंवा पाण्यानें ओलें झालें असतां कुगंध येतो याचा स्वाद कडू असून फार उग्र व रंग भुरा आहे· चर्मास लावलें असतां चर्माचा रंग भुरा होऊन काहीं अवधी पर्यंत तसाच राहातो· याचें प्रमाण दोन ग्रेनां पासून पांच ग्रेन पर्यंत आहे· याचा साबुणा बरोबर गोळ्या करून चर्माचे काहीं रोगांवर द्याव्या· व त्या वेळेस सार्सापारिल्लाचें पाचन ही द्यावें· हें अर्ध ड्राम एक औंस मलमाशीं मिळवून कधिं खर्जेवर लावतात· परंतु याचे गुण गंधकाचे मलमापेक्षां अधिक होत नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सल्फरलोटम·	वाशदसल्फर·	गंधकाचा शोधन प्रकार·

गंधकाचें फुल एक पौंड घेऊन त्यावर उकळतें पाणी घालावें तेणें करून

फुलामध्यें काहीं अम्लांश असतो· तो दूर होतो नंतर तें शुष्क करावें·

याचे गुण व प्रमाण इत्यादिक गंधका प्रमाणें आहेत·

लतीन·	इंग्रेजी·
सल्फरप्रीसिपिटेटम·	**प्रीसिपिटेटेड्सल्फर·**
गंधकाचें फुल ·	एक पौंड·
भाजलेल्या चुन्याचा कळ्या ·	दोन पौंड·
पाणी ·	चार गालन

पाण्यामध्यें फुल व कळ्या घालून तें पाणी उकळवून कागदामध्यें गाळावें त्यांतील चूर्ण तळास जावयासाठीं त्यामध्यें म्युर्यटिक आसिद लागेल तितकें घालून तळास जाई असें करावें नंतर तें चूर्ण पाण्यानें फार वेळ धुवून स्वादरहित करावें·

हें औषध काहीं पांढरें आहे· याचे गुणादिक गंधका प्रमाणें आहेत दोहोंचे रंगाचा मात्र भेद आहे· हें चांगलें झालें असतां उष्णेंकरून सर्व उडतें·

धातुऔषधोत्पत्तिचें शुद्धिपत्र

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
३	२२	अमीनें	अग्नीनें
४	१०	फाराट	या शब्दाचेस्थानीं सर्वत्र नपुंसक लिंगक फांटशब्द
१०	११	इंग्रेजी	लतीन
१२	१६	कुर्ते	कुत्रें
१२	१७	विरलेल्या	विषारलेल्या
१२	२०	लोल्युशान्	सोल्युशान
१४	२४	गाकून	घालून
१५	९		अम्लनाशक व अश्मरीहारक
१६	१		अम्लनाशक व अश्मरीहारक
१७	७		रेवाचिनीशीं किंवा कडुरोचकाचें फांटाशीं
१९	१०	गणिडा	गंडि
२४	७	गणिड	गंडि
२४	१०	दध	दूध
२४	१८	कोष्ठबंधक	
२९	१५	वामक	वमक
३१	१९	ठेवन	ठेवून
३७	१६	लोल्युशान्	सोल्युशान्
३९	१८	ओफ्सिदम	ओक्सिदम
४१	४	तीन	तीस
४१	१५	परिहार्थ	परिहारार्थ

लतीन	इंग्रेजी	संस्कृत
वेजितेबिल्या	वे[illegible]बल्स	वनस्पति

जाजाठिकाणी वनस्पति असतात आणि जाजा भूमीचेठायीं आपल्ये आपण उगवतात त्या त्या स्थळापासून आणून संग्रह करावा परंतु पर्जन्य आणि दैंव्हर पडत नाहीं असे शुष्क दिवस पाहून आणाव्या प्रतिवर्षी आणाव्या जुंन्या असतील त्या टाकून द्याव्या त्या कामाच्या नाहींत·

जा वेळेस झाडाचीं पर्णे गळतात आणि नवा अंकुर फुटला नाहीं त्या वेळेस भूमी खणून मूळ काढावें प्रायः असेंच काढतात·

जा वेळेस साल आंतल्ये काष्ठापासून सहज सुटल्ये त्या वेळेस काढावी·

जा समयीं पुष्पें प्रफुल्लित आहेत आणि बीं पिकलें नाहीं ते समयीं पर्णे काढावीं·

पुष्पें प्रफुल्लीत होतील तेव्हां काढावीं·

झाडावर फळांतलें बीं पिकतें आणि त्यामधून गळुं लागलें नाहीं तेव्हां फळ काढून संग्रहीं ठेवावें काहींएक वेळेस फळ नासून बीं वाईट होतें ह्मणोन फळ काढल्या नंतर परीक्षा करून टिकाजोगें असल्यास फळ ठेवावें टिकाजोगें नसलें तर त्याच वेळेस बीं काढून ठेवावें·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
वेजितेबिल्यम प्रीपेरेश्यो	प्रीपारेशनओफवेजितेबल्स	वनस्पतिचांगल्या राहाण्याची कृति

वनस्पति आणल्या नंतर जा औषधार्थ ओल्या उक्त नाहींत त्या पातळ पसरून रंग भेद नहोतां मंदाग्नीनें अथवा मंदोष्णानें त्वरेनें शुष्क करून चांगल्ये पात्रांत घालून उत्तम स्थळीं ठेवाव्या त्यांस ओल्सर वायू आणि तेज लागूं देउं नये·

औषधार्थ ओलीं मुळें जीं उक्त आहेत तीं शुष्क वाळू मध्यें ठेवावीं जंगली पियाजाचे बाहेरली शुष्कसाल काढून टाकून पातळ आडवे काप काढून शुष्क करावे·

जामध्यें गीर आहे असें फळ पिकलेलें नसलें किंवा पिकून शुष्क जाहालें तर मृदु होण्या साठीं ओल्सर ठिकाणीं ठेवावें· मृदु जाहाल्या नंतर अश्वकेशांचे

चाळणींत घालून खालती रस पडेल तो मंदाग्नीवर ठेवून घाटून कढवावा· नंतर तो रस अन्य पात्रांत घालून तें पात्र उदक भरलेल्या भांड्यांत ठेवून तें भांडें रस नीट दाट होईल तों पर्यंत चुलीवर ठेवावें·

बाहव्याच्या शेंगा कुटून त्यांवर उकळतें पाणी घालावें तेणेंकरून गीर सुटतो· तो गीर घट्ट चाळणींत चोळून गाळावा नंतर बारीक चाळणी मध्यें घालून फिरून गाळावा· मग तो गीर पात्रांत घालून तें पात्र उदक भरलेल्या भांड्यांत ठेवून तें भांडें चुलीवर ठेवून गीर दाट होईल तों पर्यंत तसेंच राहूं द्यावें·

फळ साजूक ओलें किंवा पिकलेलें आहे तर त्याचा गीर अथवा रस चाळणी मध्यें चोळून गाळून काढावा कढवून काढूंनये·

अफूमध्यें इतर पदार्थ शिरलेले असतील ते सर्व पदार्थ फार सावकाशीनें काढून आणि तीचे संबंधाचे नसतील ते विशेषें करून काढून निर्मळ करावी गोळ्या करावया साठीं अफू मृदु राहूं द्यावी· बुकणीकरण्या साठीं अफू शुष्क होण्याची कृती सांगतो· अफू पात्रांत घालून तें पात्र जलपूरित भांड्यांत ठेवून तें भांडें अफू शुष्क होउन क्षीण होईल तोंपर्यंत अग्नीवर ठेवावें·

गोंद राळ मिश्रित जे पदार्थ त्यांनां इंग्रेजी भाषेंत गमरेजिन ह्मणतात· ते पदार्थ· हिंग· बोळ· ओशक· सकमुन्या· व इतर· हे पदार्थ स्वच्छ असतील ते विकत घ्यावे· असे न मिळाले आणि अनिर्मल दिसतात· तर त्यांनां उदकांत मृदु होतील तों पर्यंत कढवावे· मग जाड वस्त्रांत घालून पिळून रस काढावा तो रस वर पाणी येई व तळास राळ सांचे तों पर्यंत तसाच ठेवावा· नंतर तें वरचें पाणी अन्य पात्रांत घालून· तें पात्र जलपूरित भांड्यांत ठेवून तें भांडें तसलें पाणी दाट होईल तों पर्यंत अग्निवर ठेवावें· नंतर त्या बरोबर ती राळ मिळवून अल्पकालानंतर उतरावें·

जे गमरेजिन उष्णेंकरून त्वरेनें पातळ होतात· त्यांचा स्वच्छ करण्याचा प्रकार सांगतो· जनावराचे शरीरांत त्वचेची पिशवी असत्ये त्या पिशवींत ते पदार्थ घालून ती पिशवी उकळत्ये पाण्यांत पदार्थ मृदु होतील तों पर्यंत ठेवावी· मग ते पदार्थ जाड वस्त्रांत घालून पिळावे· स्वच्छ पदार्थ खालीं पडतो गाळ वस्त्रांत राहातो·

लतीन्	इंग्रेजी	प्राकृत
ओल्याईक्स्प्रेस्सा	ईक्स्प्रेस्तदओइल्स	निष्पीडणेंकरून तेलकाढावयाची कृति

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
ओल्यमआमिग्दलेरम्	आमंदओइल	बदामाचें तेल

कडू बदामांतल्या अथवा गोड बदामांतल्या बिया काढून शीत पाण्यामध्यें चोवीस घटिका पर्यंत भिजत घालाव्यां मग कुटून काहीं उष्ण नलागतां घाण्यानें अथवा त्या प्रमाणें काहीं पदार्थानें तेल काढावें·

जर बिया निर्मळ आहेत तर पाण्यांत घालण्याचें अगत्य नाहीं त्यांना कुटून काहीं उष्ण नलागतां घाण्यानें अथवा त्याप्रमाणें काहीं पदार्थानें तेल काढावें·

बियांचें जें वजन असेल त्याचें अर्धें तेल निघतें· तेल प्रथम काहीं गढूळ दिसतें गाळ तळास गेल्यानंतर स्वच्छ होतें जर चांगलें स्वच्छ होतनाहीं तर तें उष्ण ठिकाणीं ठेवून जाड कागदामध्यें गाळावें· येणेंकरून स्वछ होतें दोन प्रकारचे बदामामधून तेल समान निघतें· तेल काढून गाळ राहातो तो हस्त धुवावया साठीं चांगला आहे तेणेंकरून हस्त फार मृदू होतात·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
ओल्यमलीनी	लिन्सीदओइल	जवसांचें तेल

जवस कुटून काहीं उष्ण नलागतां पूर्ववत् तेल काढावें·

हें तेल पोटांत घेतलें असतां काहीं रेच होतात· परंतु त्याचागंध आणि स्वाद वाईट आहे ह्मणोन प्रायः पोटांत देत नाहींत·

चर्मास अग्नि संबंध अथवा तप्त पदार्थ संबंध जाहाला असतां तज्जन्य दुःखावर चांगलें आहे· त्यावर चुन्याचे पाण्याशीं अथवा ओल्यमटेरेबिंथिनेशीं मिळवून लावतात· प्रथम मेलनाचें नाम इंग्रेजी भाषेंत कारनओइल त्याची सिद्ध करण्याची कृती सांगतो·

जवसांचें तेल · · · · · · · · · ·	दीढऔंस·
चुन्याचें पाणी · · · · · · · · ·	तीनऔंस

दोहोंचें मेलन करावें·

द्वितीय मेलन सिद्ध करण्याची कृती

जवसांचें तेल	चार औंस·
ओल्यमटेरेबिंथिने	दोन औंस·

दोहोंचें मेलन करून त्या दुःखावर लावावें·

मनुष्याला तें दुःख जाहालें तर प्रथम औषध तत्क्षणीं लावावें नलावलें तर फार पीडा होउन मोठा स्फोट येईल· तें औषध लावलें असतां गूण त्वरित होउन तितका स्फोट येत नाहीं·

जवसांचें तेल लबद्या मध्यें घालतात· तेणें करून तो बहुत काळ पर्यंत मृदु राहातो किंवा जवस कुटून उदक सहित कढवून लबदा करतात· तो फार चांगला होतो आणि बहुत अवधि पर्यंत मृदु राहातो·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
ओल्यमरिसिनी	कास्तरओइल	एरंडेल

एरंडाचे बीजांची बाहेरली त्वचा काढून कुटून उष्ण नलागतां त्याचें तेल काढावें·

हें तेल फार उत्तम ढाळक आहे ढाळक औषधांमध्यें याचे गुण लिहिले आहेत या तीन तेलां शिवाय अन्य तीन तेलें औषधास्तव कामाचीं आहेत त्यांतें सांगतो एक तैलाचें नाम इंग्रेजी भाषेंत ओलयम ओलीवे हें तैल या देशांत नाहीं याजकरितां बहुत कार्यविषयीं याचा प्रतिनिधी गोडें तेल आहे द्वितीय तैल ओल्यम तिग्लिई ह्मणजे जेपाळाचें तैल· हें तेल फार बळकट रेचक आहे· तृतीय तैल· ओल्यम मिरिस्तिसे ह्मणजे जायफळाचें तेल· हें तेल लोण्यासारिखें आहे औषधास्तव फार कामाचें नाहीं एक मलमा मध्यें मात्र सुगंध येण्यासाठीं घालतात· हीं साहा तेलें पाण्यामध्यें मिळत नाहींत आलकोहोल आणि इथर यांमध्यें थोडीं मिळतात· पोटांत घ्यावयासाठीं हीं तेलें बाभळींचे गोंदाचें पाणी आणि कुक्कुटांडांतला तांबडा पदार्थ यां सहित उदका बरोबर मिळवितात· मेलनास्तव गोंदाचें पाणी दाट घेउंनये· प्रथम· गोंदाचे पाण्यामध्यें लाल पदार्थ सहित तेल थोडें थोडें घालून मिळवावें· नंतर त्या मेलना मध्यें थोडें थोडें पाणी घालून मिळवावें·

हीं तेलें बहुत दिवसांनंतर दाट आणि चिकट होतात· व औषधास्तव चांगलीं नाहींत·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
ओल्यादिस्तिलेटा	दिस्तिल्लेद ओइलस्	अर्कप्रमाणें काढलेलीं तेलें त्यांचीं नावें
लतीन	इंग्रेजी	प्राकृत
ओल्यम आनिसी	आनिसीद ओईल	शोपांचें तेल
ओल्यम आंथिमिदिस्	कामोमैल ओइल	
ओल्यम कार्युई	करावे ओइल	ओव्याचें तेल
ओल्यम जुनिपरी	जुनीपर ओइल	
ओल्यम लवंड्युले	लावंडर ओइल	
ओल्यम मिंथेपिपरीटे	पेप्परमिंट ओइल	पुदिन्याचें तेल
ओल्यम मिंथेवीरिदिस्	स्पिर्मिंट ओइल	
ओल्यम ओरीगनी	मार्जोरम् ओइल	मर्व्याचें तेल
ओल्यम पिमेन्ते	पीमेन्ता ओइल	
ओल्यम प्युलीजीई	पेन्नेरोयल ओईल	
ओल्यम रोस्मारिनी	रोस्मारे ओइल	

यांची काढावयाची कृती सांगतो·

शोपा आणि ओंवा आंथिमिदिस्· लवंड्युलेचीं पुष्पें· जुनिपरी· पिमेन्तेचीं फळें· रोस्मारीचीं व अन्याचीं पत्रें· या सर्वांचें अर्जन करून पृथक् पृथक् ठेवावीं· या पदार्थांमधून जाजा पदार्थाचें तेलाचें अगत्य लागेल त्यावेळेस तोतो पदार्थ नलिका यंत्रामध्यें घालून वरती पाणी· त्या पदार्थांवर येईल तितकें घालावें मग अग्नीवर ठेवून अर्काप्रमाणें तेल काढावें·

ओंवा मिंथेपिपरिटे· मिंथेवीरिदिस्· पिमेन्ते· प्युलीजीई· यांचे तेलाबरोबर जें पाणी येतें तें कार्यास्तव ठेवावें चांगलें आहे·

या तेलांप्रमाणें अन्य तेलें आहेत· तीं बाजारामध्यें सिद्ध असतात· तेथून विकत आणितात· यास्तव त्यांचा सिद्ध करण्याचा प्रकार सांगितला नाहीं त्यांचीं नावें सांगतो·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
ओल्यम कायापुटे	कायपुटा ओइल	
ओल्यम कार्योफिल्ली	क्लोव ओइल	लवंगांचें तेल
ओल्यमसिन्नामोमी	सिन्नामन ओइल	दालचिनीचें तेल
ओल्यम लीमोनम	लेमन ओइल	लिंबूचें तेल

ओल्यमआनीसी· हें तेलचांगलें व अन्य उष्ण तेलांपेक्षां नरम आहे· यास्तव बाळांचे औषधा मध्यें घालतात· तेणेंकरून वायू व मुरडा यांचें निवारण होतें·

ओल्यम आंथिमिदिस्· या तेलाचा स्वाद चांगला नाहीं याजकरितां· वैद्य प्रायः पोटांत देतनाहीं· याचेगुण अन्य सुगंध तेलांप्रमाणें आहेत·

ओल्यम कार्युई· हें तेल चांगलें उष्ण आहे· याला बहुत करून रेचक· औषधाचे गोळ्यांमध्यें मुरड्याचे निवारणासाठीं घालतात· यास्तव काहीं· एकवेळेस रेचकाचे बुकणीमध्येंही घालतात·

ओल्यमजुनिपरी· यां तेलाला द्रावक गुण आहेत· ह्मणोन द्रावक· औषधाचे गोळ्यांमध्यें त्याचे एक अथवा दोन मिनिम घालतात· तेणेंकरून वायू व मुरडा यांचें निवारण होतें· आणि द्रावक गुणही अधीक होतो·

ओल्यमलावंडयुले· पूर्वकालीं औषधास्तव या तेलाचा लौकीक फार होता परंतु सांप्रत सुगंध येण्यासाठीं मात्र औषधांत घालतात· कोणी गंधकाचे मलमामध्यें त्याचा कुगंध दूर होण्यासाठीं घालतात·

ओल्यममिंथेपिपरीटे· हेंतेल उष्ण सुगंध औषध आहे व सर्व अन्य तेलांपेक्षां चांगलें याचा स्वाद उष्णलागून मग कांहीं शीतसा वाटतो·

याचीं कार्यें बहूत आहेत· त्यांतें सांगतो· वायु आणि मुरडा यांचे निवारणा साठीं गोळ्यांमध्यें घालतात· व दावक औषध घेतल्यानंतर मुरडा होउं लागला असतां अथवा औषध घेतल्या वांचून होउंलागला असतां हें औषध पाण्यामध्यें अथवा साकरेमध्यें द्यावें चांगलें आहे·

विषूचिकेवर ही हें औषध अफु किंवा अन्य मदकारी आणि उष्ण पदार्थ यांशीं मिळवून देतात· मिळवण्यास्तव याचें प्रमाण पांच बिंदु अथवा दाहा बिंदु·

ओल्यममंथेविरिदिस· या तेलाचे गुण पुदिन्याचे तेलाप्रमाणें आहेत· परंतु याचा स्वाद तितका चांगला नाहीं व याला मोल त्या पेक्षां अधिक पडतें· ह्मणोन बहुत

करून देतनाहीं·

ओल्यम ओरीगनी· ह्मणजे मर्व्याचें तेल· ओल्यमपिमेन्ते· ओल्यमप्युलीजीई· या तीन तेलांचे गुण अन्य सर्व तेलांप्रमाणें आहेत·

पूर्वोक्त सर्व तेलांमधून दोहों तिहीं मध्यें कापूर आहे व पात्रांत तेल ठेवून फार दिवस जाहाल्यानंतर तळास जाउन बसतो· तीं तेलें आलकोहोल आणि इथरसल्फुरिकस यांमध्ये चांगलीं मिळतात· या मेलनाला इंग्रेजी भाषेंत ईसन्स ह्मणतात·

काहीं एक वेळेस गांधीलोक त्या तेलांमध्यें अन्य स्वस्ततेल ठकवावया साठीं घालतात त्यांची परीक्षा या प्रकारें करावी· जा तेलाची खूण कागदावर करून तो कागद अग्नीजवळ ठेवून तेल उडून जाउन थोडा डागमात्र राहून त्यावर अक्षर आलें असतां तें तेल चांगलें आणि पूर्ववत् करून मोटा डाग राहून अक्षर आलें नाहीं तर त्या तेलामध्यें अन्य स्वस्त तेलाची भेळ आहे असें निश्चित समजावें·

या तेलां प्रमाणें काहीं तेलें आहेत तीं मात्र दमनें करून निघतात· ह्मणजे निंबूचें तेल आणि नारिंगाचें तेल· हीं तेलें फळाचे सालीचे लाहान छिद्रांत राहातात·

लतीन
ओल्यमसक्सिनी

मुसलमानी
कहरुबाचें तेल

कहरुबा नलिका यंत्रांत घालून· तें यंत्र उष्ण वाळूचे पात्रांत ठेवून तें पात्र अग्नीवर ठेवून उष्ण हळु हळु अधिक करावें· तेणेंकरून आंबट पाण्या सारिखा पदार्थ आणि तेल व ज्यांत तेल राहातें असा काहीं खारट पदार्थ हे तीन पदार्थ देगडींत येतात· नंतर तसल्या तेलाला दोन तीन वेळ नलिका यंत्रांत घालून पहिल्या प्रमाणें अग्नीवर ठेविल्यानंतर स्वच्छ होतें·

सांप्रत औषधास्तव हें तेल फार देत नाहींत काहीं एक वेळेस लोहितकर औषधाशीं मिळवितात·

लतीन
ओल्यमटेरेबिंथिनेरेक्टिफिकेटम·

ओल्यम टेरेबिंथिने एक पैंट· पाणी चार पैंट या दोहोंस नलिकायंत्रांत घालून· उष्ण लावून तेल काढावें·

या तेलाचें कार्य अन्यठिकाणीं लिहिलें आहे· या मध्यें कापुर चांगला विरघळतो·

व याच्या

व याचा कषाय चांगला लोहितकर आहे·

लतीन	इंग्रेज़ी	प्राकृत
एक्के दिस्तिलेटे	दिस्तिल्लेदवाटर्स	अर्कप्रमाणें काढलेलीं पाण्यें

पाण्यामध्यें पदार्थाचे तेलाचा केलेला जो कषाय त्याप्रमाणें बहुत करून हीं उदकें आहेत· यांमधून काहीं उदक उष्ण होण्यासाठीं चांगलें· व काहीं उदक सुगंध येण्यासाठीं चांगलें आहे· जावेळेस पदार्थ साजुक ओले आहेत· तेव्हां शिव्यें शुष्क पदार्थापेक्षां द्विगुणित घ्यावयास पाहिजेत· दोहों करून पाणी समानच होतें· परंतु बहुत करून शुष्क पदार्थाचें पाणी अन्यांपेक्षां चांगलें आणि त्याला सुगंध अधीक येतो· व बहुत दिवसपर्यंत चांगलें राहातें·

हीं उदकें फार दिवसानंतर प्रायः वाईट होतात· वाईट न होण्यासाठीं त्यांत थोडकें आलकोहोल घातल्यानें काहींसें संरक्षण होतें· यास्तव हीं उदकें फार सिद्ध करूं नयेत थोडीं थोडीं अगत्याप्रमाणें सिद्ध करावीं· पूर्वींचीं वाईट टाकावीं·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्वादिस्तिलेय	दिस्तिल्लेदवाटर	अर्कप्रमाणें पाणी काढावयाची कृती·

दाहा गालन पाणी म्हणजे ऐशी पैंट शुंडायंत्रांत घालून अग्नीवर ठेवावें· प्रथम चार पैंट जें येतें तें टाकून मग चार गालन येतें तें कार्यास्तव ठेवावें·

असें पाणी बिलोराचे कुपींत सदैव ठेवावें·

यापुढें जीं अन्य उदकें आहेत त्यांचे एक एक गालनांत पांच औंस प्रुफस्पिरिट घालावें· तेणेंकरून तीं सडत नाहींत·

पाण्यामध्यें काहीं अनुपयुक्त पदार्थ सदैव आहे· त्याला वरल्याप्रमाणें करतांतें· तर अनुपयुक्त पदार्थ शुंडायंत्रांत राहून उत्कृष्ट स्वछ पाणी वर्तीयेउन अन्यपात्रांत सांचतें प्रथम पाणी येतें त्यामध्यें काहीं एकवेळेस अनुपयुक्त पदार्थ असतो म्हणोन तें टाकावें· पाण्याची परीक्षा याप्रमाणें करावी· आलकोहोलामध्यें काहीं साबुण मिळवून तें अर्कप्रमाणें काढलेल्या वरल्या पाण्यांत घालावें· तेणेंकरून काहीं भिन्नरूप होत नाहीं· चांगल्ये कूपोदकामध्यें घातलें असतां तें थोडकें पांढरें होतें· क्षारोदकामध्यें घातलें असतां फार श्वेत होउन काहीं पांढरा गाळ तळास जातो·

अर्कप्रमाणें काढलेल्या पाण्याचा स्वाद चांगला लागत नाहीं फार उष्णोदका प्रमाणें लागतो· व कांहींएक वेळेस शुंडायंत्रें करून कांहीं गंधही येतो· तथापि चिंता नाहीं·

बहुत औषधें विरघळा साठीं या उदकाचें अगत्य नाहीं परंतु नैत्रासअर्जेंति· स्वासिटासप्लम्बी· म्युर्यासहैड्रार्जेरी· व इतर हीं विरघळासाठीं त्याचें विशेष अगत्य आहे· व जा वेळेस नेत्ररोगा साठीं कांहीं औषध पाण्यामध्यें मिळवलें पाहिजे· तेव्हां ही अगत्य आहे· अथवा पुढें सांगायाचें जें पाणी· तें त्यास्तव घालावें·

लतीन	इंग्रेजी
एक्वाआनिथि	दील्लवातर

आनिथीचें बीज· एक पोंड तें कुटून त्यावर इतकें पाणी घालावें कीं काढल्या नंतर अग्नीचा गंध आणि स्वाद नयेई· एक गाल्लन काढावें·

हें उदक फार लाहान बाळांना वायु उत्पत्ति आणि उचकी यांचे निवारणास्तव देतात· या कार्या विषयीं सर्व सुगंध उदकांपेक्षां श्रेष्ठ आहे· या विषयीं याचें प्रमाण एक ड्राम अथवा दोन ड्राम तें अगत्या प्रमाणें द्यावें· या पाण्यामध्यें खारट दाळक चांगलें मिळतें· तसें मग्निश्या ही मिळतें·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्वाकार्युई·	कारावेवातर	ओंव्याचें पाणी

ओंवा· एक पोंड तो कुटून शुंडायंत्रांत घालून त्यावर्ती इतकें पाणी घालावें कीं काढल्या नंतर अग्नीचा गंध आणि स्वाद नयेई· मग एक गाल्लन पाणी काढावें·

याचे गुण वरल्या उदका प्रमाणें आहेत· याचा स्वाद त्याजपेक्षां उत्तम ह्मणोन फार कार्याचें आहे·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्वासिन्नामोमी·	सिन्नामनवातर·	अर्कप्रमाणें दालचिनीचें पाणी काढावयाची रीति·

दालचिनी· एक पोंड ती कुटावी अथवा दालचिनीचें तेल वजनानें पांच स्क्रुपल· दालचिनी पाण्यामध्यें साठ घटका पर्यंत भिजत घालावी· नंतर तीवर अथवा तिचे तेलावर इतकें पाणी घालावें कीं· काढल्या नंतर अग्नीचा गंध व स्वाद नयेई· तीचें

पाणी एक गाल्लन काढावें·

हें पाणी बहुत सुस्वाद व सुगंध आहे· यांत दालचिनीचा गोडपणा आणि तिखटपणा ही आहे· ह्मणोन कुस्वाद पदार्थांचे अनुपाना विषयीं चांगलें हें उष्णकारी आहे· याकरितां कांहींएक वेळेस आणि कांहीं कारणास्तव· याशीं नुसतें पाणी मिळविलें पाहिजे· तेणेंकरून सुस्वाद नजातां उष्णपणा न्यून होतो·

लतीन	इंग्रेजी	संस्कृत
एक्वाफिनीक्युली	फेन्नलवातर	मधुरिकोदक

मधुरिकेचें बीज· एक पौंड तें कुटून त्यावर पूर्ववत् पाणी घालावें· एक गाल्लन मधुरिकेचें पाणी काढावें··

हें पाणी औषधास्तव चांगलें नाहीं ह्मणोन बहुतकरून सिद्ध करीत नाहींत·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्वामेंथेपिपरिटे·	पेप्पर्मिंटवातर·	पुदिन्याचें पाणी

पुदिन्याचीं शुष्क पर्णें· दीड पौंड· अथवा ओलीं पर्णें तीन पौंड· किंवा पुदिन्याचें तेल· वजनानें तीन ड्राम· या तीन पदार्थांमधून एक पदार्थावर पूर्ववत् पाणी घालावें· पुदिन्याचें पाणी एक गाल्लन काढावें·

हें उदक फार कामाचें व उष्ण आहे· परंतु दिल्हें असतां कांहीं उष्ण·करीत नाहीं याचा स्वाद आणि गंध फार उत्तम आहे ह्मणोन त्याला कुस्वाद पदार्थां बरोबर देतात· ते पदार्थ सोनामुखी·रेवाचिनी· व इतर· हें एक औंस अथवा दोन औंस दिल्हें असतां याचे उष्णपणें करून· पोटांतला वायु आणि मुरडा यांचा परिहार होतो·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्वामंथेविरिदिस्·	स्पिर्मिंटवातर·	

मिंथेविरिदिसाचीं शुष्कपर्णें· दीड पौंड अथवा ओलीं पर्णें तीन पौंड किंवा त्याचें तेल वजनानें तीन ड्राम· या तिहींमधून एक पदार्थावर पूर्ववत् पाणी घालावें· त्याचें पाणी एक गाल्लन काढावें·

याचें कार्य आणि गुण पुदिन्याचे पाण्या प्रमाणें आहेत· परंतु याचा स्वाद

आणि गंध तितका चांगला नाहीं·

लतीन	इंग्रेजी
एक्वापिमेन्ते	पिमेन्तावातर

पिमेन्तेचें फल· अर्ध पौंड पाणी एक पैंट· फळ कुटून पाण्यामध्यें सात घटिका पर्यंत भिजत घालावें· नंतर त्याजवर पूर्ववत् पाणी घालावें· त्याचें पाणी एक गाळून कादावें·

हें पाणी खारट ढाळकाचे अनुपाना विषयीं उत्तम आहे· व फार दिवस पर्यंत याचा सुगंध चांगला राहातो·

लतीन	इंग्रेजी
एक्वाप्युलिजीई	पेन्नेरायलवातर

पेन्नेरायलाचीं शुष्कपर्णें· दीद पौंड· अथवा ओलीं पर्णें तीन पौंड· किंवा त्याचें तेल वजनानें तीन ड्राम· या तीन पदार्थां मधून एक पदार्थावर पूर्ववत् पाणी घालावें· त्याचें पाणी एक गाळून कादावें·

याचीं कार्यें व गुण पुदिन्याचे उदका प्रमाणें आहेत·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्वारोजे	रोजवातर	गुलाबाचें पाणी

गुलाबाचीं पुष्पें· आठ पौंड· त्याजवर पूर्ववत् पाणी घालावें· त्याचें पाणी एक गाळून कादावें·

या पाण्याला फार सुगंध आहे· आणि नेत्ररोगावर फार उत्तम यास्तव· सल्फासजिंसि· सबासिटा सलंबी· वइतर· यांशीं मिळवितात· या उदकाचे पात्राचें तोंड बंद करून शीतस्थळीं ठेवावें· असें नठेवलें तर वाईट होतें·

लतीन	इंग्रेजी	संस्कृत
ईन्फ्युजा	ईन्फ्युजोन्स	फाराट

शीतोदकांत अथवा उष्णोदकांत वनस्पतीचे पदार्थ घालून अग्नि संयोग नकरितां काहीं काळ तसेंच ठेवून जें त्यांचें पाणी काढून घेतात· त्याला हें नाम ठेवितात· सांप्रत सर्व फाराटाची सिद्धता उकळत्ये पाण्यांतच करितात· बहुत करून त्यांना मृत्तिकेचें अथवा कथिलाचे पात्रांत वर ढांकण ठेवून सिद्ध करितात· धातूचे पात्रामध्यें उष्णपणा बहुत काळ पर्यंत राहातो ह्मणोन· त्यांतील फाराट मृत्पात्रांतल्ये फाराटापेक्षां बळकट· आणि कडू होतो·

ज्या वनस्पतींचे आंतले पदार्थ पाण्यामध्यें चांगले सहज वितळतात· आणि ज्यांचे गुण उकळण्यानें न्यून अथवा वाईट होतात· त्यांचे हे प्रकार सिद्ध करावयास नीट आहेत; परंतु फार बळकट औषधाचे फाराट करीत नाहींत· यास्तव कीं फाराटाचें बळ सर्व काळ समानच होतनाहीं· एक्या वेळेस सिद्धकरण्याचे स्वल्प अंतरें करून न्यूनाधिक होतें· काहीं एक वेळेस फाराट शीतोदकांत सिद्ध करितात· परंतु त्याचे गुण उष्णोदकाचे फाराटा प्रमाणें होत नाहींत· स्वादमात्र त्यापेक्षां चांगला लागतो·

फाराट सिद्ध करण्याचा प्रकार सांगतो· वनस्पतींना कुटून· अथवा· बारीक कापून पात्रांत घालून· त्यांजवर उकळलेलें पाणी घालून पात्रावर ढांकण ठेवून अग्रिम कथित काल पर्यंत तसेंच ठेवून मग कागदामध्यें अथवा· वस्त्रामध्यें गाळून घ्यावें·

जेव्हां चूर्णाचा फाराट सिद्ध करितात· तेव्हां तो अगत्य पूर्वक कागदामध्यें गाळावा· अन्यामध्यें गाळला असतां गढूळ पडतो·

बहुतकरून सर्व फाराट दोन तीन दिवसानंतर वाईट होतात· याजकरितां कार्य समयींच सिद्ध करावे· सोनामुखी· जिन्‌श्यन्· कालंबा· व इतर· यांचे फाराट विशेषेंकरून वाईट होतात· परंतु त्यांत टिंक्चुर किंवा काहीं खारट पदार्थ घातला असतां काहीं अधिक कालपर्यंत चांगले राहातात·

उष्णें करून त्यांचें बळ अधीक होतें· यास्तव असें करावयास इछितात· तर सिद्ध करित्ये वेळेस फाराट पात्र अग्नीजवळ अथवा· सूर्य किरणा मध्यें ठेवावें·

लतीन	इंग्रेजी	आकृत
ईफ्युसम् आंथेमिदिस्·	ईफ्युशन् ओफ कामोमेल·	गु॰ बाबुना याञ्चा फाराट·

आंथेमिदिसाचीं पुष्पं·	दोन ड्राम·
उकळतें पाणी	अर्धपैंट·

पात्रांत पुष्पें घालून वर पाणी घालून पात्रावर ढांपण ठेवून चोवीस पळें तसेंच राहूं द्यावें· नंतर गाळावें·

हा फाराट थंड करून दिल्हा असतां रोचका विषयीं उत्तम आहे· ह्मणोन अजीर्णावर व इतर रोगांवर देतात· यास्तव याचें प्रमाण एक अथवा· दोन औंस तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

उष्ण दिल्हा असतां उल्लासा होतो· व यास्तव काहींएक वेळेस· वमकाचे साहाय्या साठीं वमकानंतर देतात·

लतीन	इंग्रेजी
ईफ्युसम् आर्मोरेश्ये कोंपोसिटम्·	कोंपौंड ईफ्युशन् ओफ होर्सरादिश·

आर्मोरेश्याचें साजुक मूळ·	एक औंस·
कुटलेल्या मोहर्या·	एक औंस·
आर्मोरेश्ये स्फिरिटस् कोम्पोसिटस्·	एक औंस·
उकळतें पाणी·	एक पैंट·

मूळ आणि मोहर्या पात्रांत घालून वर पाणी घालून ढांपण ठेवून पांच घटिका पर्यंत तसेंच ठेवून मग गाळावें· नंतर त्याशीं स्फिरिटस् आर्मोरेश्ये कोम्पोसिटस् मिळवावें·

वैद्य पूर्वकालीं हें औषध पक्षवायू व तत्सदृश अन्य रोग यांवर देत असत· त्यास्तव याचें प्रमाण एक औंसा पासून तीन औंस पर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ देत· सांप्रत॰कालीं या औषधाला प्राय: देतनाहींत· कारण त्याला गुण फार नाहींत· आणि निश्चित होतात· असें ही नाहीं· यास्तव·

लतीन इंग्रेजी

ईफ्युसम् आरान्श्येकोम्पोसिटम· कोम्पौंड ईफ्युशन् ओफ ओरंजपील·

प्राकृत

नारिंगत्वक् मिश्रित फाराट·

नारिंगाची शुष्क साल·	दोन ड्राम·
लिंबूची साजुक साल·	एक ड्राम·
कुटलेल्या लवंगा·	अर्ध ड्राम·
उकळतें पाणी·	अर्ध पैंट·

हे सर्व पदार्थ पात्रांत घालून वर दांपण ठेवून चाळीस पळें तसेंच ठेवून मग गाळावें·

हें औषध उत्तम रोचक आहे· याचें प्रमाण एक औंसा पासून चार औंस पर्यंत तें प्रमाण दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

जा वेळेस अजीर्ण होउन पोटफुगतें तेव्हां हें औषध ईसमसालत्स व अमोन्य व कडुरोचकाचें टिंक्युर यांचे अनुपाना विषयीं चांगलें आहे·

लतीन इंग्रेजी

ईफ्युसम कालंबे· ईफ्युशन् ओफ कालंबा

कालंबाचे मूळाचे काप·	दोन ड्राम·
उकळतें पाणी·	अर्धपैंट·

हे दोन पदार्थ पात्रांत घालून· वर दांपण ठेवून पांच घटिका पर्यंत तसेंच ठेवून मग गाळावें·

कालंबाचे गुण रोचका मध्यें लिहिले आहेत· व देण्यासाठीं याचा हा प्रकार उत्तम आहे·

जा वेळेस बाळांस दंतोद्गम समयीं प्राय: फार शौच होतात· तेव्हां त्यांना न्यून करावयास हा फाराट उत्तम आहे· या कार्या साठीं याचे दोन तीन ड्राम एक· अथवा दोन ग्रेन रेवाचिनी तिशीं मिळवून द्यावें·

जेव्हां स्त्री गर्भिणी जाहाल्यानंतर त्या अवस्थेमध्यें उमासा आणि वमन होतें· तेव्हां त्यांचे न्यूनीकरणा विषयीं हा फाराट उत्तम आहे·

या फाराटांत

या फारादांत लोखंडाचें औषध घातलें असतां त्याना रंग काळा होतनाहीं याजकरितां कोणी रजस्वला होण्यासाठीं लोखंडाचें औषध· आणि कडु रेचक हीं एकत्र मिळवून द्यावयास इछितात· तर या फारादांत घालून द्यावीं· हा त्यांचे अनुपानाविषयीं उत्तम आहे·

याचें प्रमाण दीढ औंसा पासून तीन औंस पर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावे·

हा फारांट फार त्वरेनें खंवट होतो· ह्मणोन कार्यास्तव प्रतिदिवशीं सिद्ध करून द्यावा·

लतीन·	इंग्रेजी	प्राकृत
ईफ्युसम कार्योफिलोरम्·	ईफ्युशन् ओफ क्लोवस·	लवंगांचा फाराट·

कुटलेल्या लवंगा·	एक ड्राम·
उकळतें पाणी·	अर्ध पैंट

हे दोन पदार्थ· पात्रांत घालून वर ढांपण ठेवून पांच घटिका पर्यंत तसेंच ठेवून मग गाळावें·

जा वेळेस अजीर्ण होउन पक्काशयामध्यें फार शीत होतें· अथवा त्यांत कुरुंबतें तेव्हां एक दोन औंस हा फाराट दिवसांत एक दोन वेळ द्यावा· फार उत्तम आहे· याशीं अमोन्येसब् कार्बोनास मिळवून दिल्हें असतां हीत अधीक होतें·

मेलन कृती सांगतो··

अमोन्येस कार्बोनास्·	साहाग्रेन·
लवंगांचा फाराट·	दोन औंस·

दोहोंचें चांगलें मेलन करून मध्यान्हि आणि रात्रीस द्यावें· त्या लक्षणाबरोबर· पोट फुगलें तर याचे बरोबर दिवसांत ईस्नमसालत्साचे एक दोन ड्राम द्यावे· असल्या रोगामध्यें पथ्याची फार चौकशी करावी· नकेली तर औषध निष्फळ होईल·

लतीन	इंग्रेजी
ईफ्युसम् कास्कारिल्ले·	ईफ्युशन् ओफ कास्कारिल्ला·

कास्कारिल्लाची कुटलेली साल·	अर्ध औंस·
उकळतें पाणी·	अर्ध पैंट·

हे दोन पदार्थ

हे दोन पदार्थ· पात्रांत घालून वर दांपण ठेवून पांच घटिका पर्यंत तसेंच ठेवून मग गाळावें·

हा फाराट उत्तम सुगंध रोचक आहे· व अजीर्णावर आणि फार शौच जाहाल्या नंतर चांगला आहे· याचें प्रमाण दीड औंसा पासून तीन औंस पर्यंत तें दिवसा मध्यें दोन तीन वेळ द्यावें·

लतीन	इंग्रेजी
ईफ्युसम् काटिक्यु कोम्पोसिटम्·	कोम्पौंड ईफ्युशन् ओफ काटिक्यु·

प्राकृत

काथाचा मिश्रित फाराट

खैराचा काथ·	अडीच ड्राम·
कुटलेली दालचिनी·	अर्ध ड्राम·
उकळतें पाणी·	अर्ध पैंट·

हे सर्व पदार्थ पात्रांत घालून वर दांपण ठेवून अडीच घटका पर्यंत तसेंच ठेवून मग गाळावें

हा फाराट चांगला कोष्ठबंधक आहे· जेव्हां फार शौच होतात आणि त्यांचे बरोबर आंव अथवा रुधिर पडत नाहीं व काळिजास रोगही नाहीं तेव्हां तत्प्रतिबंधार्थ उत्तम आहे·

याचें प्रमाण एक औंसापासून तीन औंस पर्यंत तें प्रमाण आठआठ घटिका नंतर अथवा पातळ रेचानंतर द्यावें·

लतीन·	इंग्रेजी
ईफ्युसम् सिंकोने·	ईफ्युशन् ओफ बार्क·

सिंकोने लान्सी फोल्ये कोर्टिक्स·	अर्ध औंस·
उकळतें पाणी·	अर्ध पैंट·

दोन पदार्थ पात्रांत घालून वर दांपण ठेवून पांच घटिका पर्यंत तसेंच ठेवून मग गाळावें·

सिंकोनाचें हें औषध बळवंत नाहीं· परंतु घेतल्या नंतर प्रायः उल्हासा होतना-

हीं

हीं· ह्मणोन अजीर्णावर देतात·

याचें प्रमाण एक औंसा पासून तीन औंस पर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

ज्या वेळेस या औषधें करून अथवा सिंकोनाचे अन्य औषधें करून उल्हासा होतो· तेव्हां त्यांचे स्थानीं बहुत करून सल्फास कैनिन देतात·

लतीन	इंग्रेजी·
ईन्फ्युसम् कस्केर्ये·	**ईन्फ्युशन् ओफ कस्केर्या**
कस्केर्याची कुटलेली साल·	दोन ड्राम·
उकळतें पाणी·	अर्ध पैंट·

हे दोन पदार्थ· पात्रांत घालून वर ढांपण ठेवून· पांच घटिका पर्यंत तसेंच राहुं देऊन मग गाळावें·

हा फाराट चांगला रोचक आहे· याचें प्रमाण एक औंसा पासून दोन औंस पर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

बहुत करून याला दालचिनी· लवंग· नारिंगाची साल· व इतर· यांशीं मिळवून देतात· तेणेंकरून हीन अधीक होतें·

लतीन	इंग्रेजी·
ईन्फ्युसम् दिजिटेलिस·	**ईन्फ्युशन् ओफ फोक्सग्लव्·**
दिजिटेलिसाचीं शुष्क पर्णे·	एक ड्राम·
दालचिनीचा अर्क·	अर्ध औंस·
उकळतें पाणी·	अर्ध पैंट·

पात्रांत उदक आणि पर्णें घालून वर ढांपण ठेवून दाहा घटिका पर्यंत तसेंच ठेवून मग गाळावें नंतर त्यांत स्पिरिटस् सिन्नामोमी घालावें·

दिजिटेलिसाचे गुण द्रावकामध्यें सविस्तर लिहिले आहेत· या फाराटाचें प्रमाण दोन ड्राम तें दिवसांत दोन वेळ द्यावें·

लतीन·	इग्रेजी
ईंफ्युसमजिन्श्येने कोम्योसिटम्·	कोम्पोंड ईंफ्युशन् ओफ जिन्श्यन्·

जिन्श्यनाचें कापलेलें मूळ·	एक ड्राम·
नारिंगाची शुष्कसाल·	एक ड्राम·
निंबूची साजुक साल·	दोन ड्राम·
उकळतें पाणी·	बारा औंस·

हे सर्व पदार्थ पात्रांत घालून वर ढांपण ठेवून अडीच घटिका पर्यंत तसेंच राहूं देउन मग गाळावें·

हा फाराट चांगला रोचक आहे· व बहुत रोगांवर अन्य औषधां बरोबर देतात· ह्मणजे अजीर्णावर आणि रजस्वला स्रवेळेस होण्यासाठीं लोखंडाचे औषधा बरोबर व जलोदरावर पल्विससिले व इतर औषधा बरोबर देतात· याचें प्रमाण दोन औंस तें दिवसांत दोन वेळ घावें·

लतीन	इग्रेजी
ईंफ्युसमलिनी कोम्योसिटम्·	कौंपौंड ईंफ्युशन ओफ लिन्सीद्·

प्राकृत·

जवसांचा मिश्रित फाराट·

कुटलेले जवस·	एक औंस·
कापलेली ज्येष्ठीमध·	अर्ध औंस·
उकळतें पाणी·	दोन पैंट·

हे तीन पदार्थ पात्रांत घालून वर ढांपण ठेवून तें पात्र अग्नीजवळ ठेवून दाहा घटिका पर्यंत तसेंच राहूं देउन मग गाळावें·

याचा स्वाद चांगला नाहीं ह्मणोन प्रायः देत नाहींत जेव्हां पडसें होतें तेव्हां हा फाराट कामाचा आहे· याचें प्रमाण दोन औंस तें प्रमाण दिवसांत बहूत वेळ घावें·

लतीन

लतीन	इंग्रेजी
ईफ्युसम काश्ये·	ईफ्युशन ओफ काश्या·

काश्याचें कापलेलें काष्ठ·	एक स्कुल·
उकळतें पाणी·	अर्ध पैंट·

हे दोन पदार्थ· पात्रांत घालून वर टांपण ठेवून पांच घटिका पर्यंत तसेंच राहूं देउन मग गाळावें·

काश्याचे गुण रोचकामध्यें लिहिले आहेत· याचा फाराट क्लेटविनीअल् आणि लोखंडाचें औषध यांचे अनुपाना विषयीं उत्तम आहे·

याचें प्रमाण एक औंसा पासून तीन औंस पर्यंत· तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
ईफ्युसम रेई·	ईफ्युशन ओफ रुबर्ब	रेवाचिनीचा फाराट

रेवाचिनीचें कापलें मूळ·	एक ड्राम·
उकळतें पाणी·	अर्ध पैंट·

दोन पदार्थ· पात्रांत घालून वर टांपण ठेवून पांच घटिका पर्यंत तसेंच राहूं देउन मग गाळावें·

हा फाराट रेवाचिनीचे चूर्णाप्रमाणें बळवंत नाहीं ह्मणोन रेवाचिनी देण्याचें फार अगत्य लागलें असतां याला देउनये· नम्रदाळकारत्व मात्र उत्तम आहे· याचें प्रमाण एक औंसापासून चार औंसपर्यंत आहे·

लतीन	इंग्रेजी
ईफ्युसम रोजे कोम्पोसिटम्·	कोम्पौंड ईफ्युशन् ओफ रोजेस·

प्राकृत

गुलाबपुष्पमिश्रित फाराट·

गुलाबाचीं शुष्क पुष्पें·	अर्ध औंस·
आसिदम सल्फ्युरिकम दिल्युटम·	तीन ड्राम·
खडीसाखर·	दीड औंस·
उकळतें पाणी·	अडीच पैंट·

बिलोराचे· पात्रांत गुलाबाचीं पुष्पें व उदक घालून त्याशीं आसिदम् सल्फ्युरिकमदिल्युटम्

कमडिल्युटम् मिळवून वर टांपण ठेवून सवा घटिका पर्यंत तसेंच राहूं देउन गाळून मग साकर त्यांत घालून मेळन करावें·

हा फाराट क्षयरोगामध्यें क्षयकारक घर्मांचा प्रतिबंध करावयास बहुत उत्तम आहे· यास्तव याचें प्रमाण दिवसांत दोन औंसांपासून साहा औंस पर्यंत आहे·

गलांकुर व त्याप्रमाणें अन्यरोग यांवर रूस्वाद गुळण्यास्तव चांगला आहे· या फाराटाला बहुतकरून इप्समसालत्स· सल्फास कैनिने· फटकी· सोरा· व इतर· हा औषधांचें अनुपानासाठीं देतात·

लतीन	इंग्रेजी
ईफ्युसम सेन्ने कोम्पोसिटम्·	कोम्पौंड ईफ्युशन ओफ सेन्ना·

प्राकृत

सोनामुखीचा मिश्रित फाराट·

सोनामुखीचीं पर्णे·	दीड औंस·
काप काढलेली सुंठ·	एक ड्राम·
उकळतें पाणी·	एक पैंट

सर्व पदार्थ· पात्रांत घालून वर टांपण ठेवून अडीच घटिका पर्यंत तसेंच राहूं देउन मग गाळावें·

सुंठीचे ऐवजीं एक ड्राम लवंगा आंत घालावयास चांगल्या आहेत· कारण तेंहींकरून फाराट तीन चार दिवस पर्यंत चांगला राहातो· आणि स्वादही चांगला लागतो· यास्तव याला एकल्याला देतात तेव्हां त्याचें प्रमाण तीन औंस अथवा चार औंस परंतु बहुत करून त्यांत अन्य औषध घालून देतात· याप्रमाणें एक ड्राम टार्त्रासूपोटास्से अथवा तीन ड्राम ईप्समसालत्स आंत घालून· त्यासहित फाराटाचे दोन औंस पुरे करून देतात·

हा फाराट सदैव ताजूक घावा· दोन तीन दिवसांचा शिळा दिल्हा असतां तेणें करून फार मुरडा होतो·

लतीन	इंग्रेजी
ईफ्युसमसिमारुबे	ईफ्युशनओफसिमारुबा

सिमारुबाची कुटलेली साल	अर्ध ड्राम
उकळतें पाणी	अर्ध पैंट

हे दोन पदार्थ पात्रांत घालून वर टांपण ठेवून पांच घटिका पर्यंत तसेंच ठेवून मग गाळावें

हा फाराट कडु कोष्ठबंधक आहे संग्रहणीवर आणि अतीसारावर व अजीर्णावर प्रायः देत नाहींत काहीं एक वेळेस देतात याचें प्रमाण दोन औंस तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें याजबरोबर लादनम अथवा स्कंधरोचक दिल्हें असतां हीन अधीक होईल

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
ईफ्युसमटाबसी	ईफ्युशनओफटोबाक्को	तंबाकूचा फाराट

तंबाकूचीं पत्रें	एक ड्राम
उकळतें पाणी	एक पैंट

दोन पदार्थ पात्रांत घालून वर टांपण ठेवून अडीच घटिका पर्यंत तसेंच राहूं देउन मग गाळावें

पिचकारी औषधास्तव या फाराटाचा उपयोग आहे तोंडांत ध्यावयाचा नाहीं घेतला असतां तेणेंकरून फार वमन होतें या भयास्तव देत नाहींत पिचकारी औषधास्तवही भयकारक आहे ह्मणोन फार चौकशीनें द्यावा आणि मोटया अगत्या वांचून देउनये याला मूत्रकृछ्र नालगूत व त्याप्रमाणें रोग यांवर देतात

प्रथम हा फाराट अर्ध पैंट देउन गुण आला नाहींतर पुनः अर्ध पैंट द्यावा

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
म्युसिलाजिनेस	म्युसिलेजिस	गोंदाचें मेलन

पाण्याशीं गोंदाचें मेलन करितात त्याला हें नाम ठेवितात व गोंदाचे मेलना प्रमाणें अन्यपदार्थ दिसतो त्या पदार्थालाही हें नाम ठेवितात

बाबळीचे गोंदांचें मेलन गोळ्या करावयास फार उत्तम आहे· व इतर कार्या-सही चांगलें आहे· ह्मणजे तेणेंकरून तेल व त्याप्रमाणें पदार्थ· पाण्याशीं चांगला मिश्रित होतो·

म्युसिलेगो आमिली पिचकारीचे औषधामध्यें अफू व तीप्रमाणें पदार्थ यांचें चांगलें मेलन करतें·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
म्युसिलेगोआकेश्ये·	म्युसिलेजओफगम्यआरबिक·	बाबळीचेगोंदाचेंमेलन·

बाबळीचे गोंदाची बुकणी·	चार औंस·
उकळतें पाणी·	अर्ध पैंट·

गोंदावर· थोडें थोडें पाणी घालून दोहोंचें चांगलें मेलन होई तोंपर्यंत· खलावें·

याचें प्रमाण अर्ध औंस अथवा एक औंस तें दिवसांत बहुत वेळ द्यावें· बहुतकरून हें मेलन खोकल्याचें मिश्रण औषधाचें अनुपान आहे·

कफघ्न औषधामध्यें लिहिलें आहे· याला अफूशीं किंवा अन्यमदकारी औषधाशीं मिळवून संग्रहणीवर व मूत्रकृछ्रावर देतात·

लतीन	इंग्रेजी
म्युसिलेगोआमिली·	म्युसिलेजओफस्तार्च·

आमिलम·	तीन ड्राम·
पाणी·	एक पैंट·

आमिलमावर थोडें थोडें पाणी घालून दोहोंना खलून मग चांगलें मेलन होई तोंपर्यंत कढवावें

हें मेलन पिचकारीचे लादनम औषधाचे अनुपानाविषयीं उत्तम आहे·

लतीन	इंग्रेजी	संस्कृत
दिकोक्टा·	दिकोकशन्स·	पाचन

जा औषधांचे गुण पाण्यांत उकळल्या वांचून चांगले निघत नाहींत त्याचा

फाराट करणें नीट नाहीं पाचनच करावें· उकळणें करून औषधांचे गुण चागले निघून तें पाचन औषधास्तव चांगलें होतें· जा औषधांचे गुण उकळणें करून वाफे बरोबर बाहेर जातात· त्यांचें पाचन करूनये फाराटें करून जांचे गुण निघत नाहींत आणि उकळल्यानें वाईट ही होत नाहींत तें पदार्थ पाचन करावयास उत्तम आहेत· बहुतकरून औषधास्तव फाराटापेक्षां पाचन बलवंत आहे· वनस्पतीचे पदार्थ शुष्क असलेतर त्यांग्रा यत्किंचित् कुटून पाचन करावें· ओले असले तर त्यांना कापून लाहान लाहान तुकडे करून करावें· तेणें करून त्यांतील सार अंश चांगला निघतो· आणि फार उकळण्याचें अगत्य ही लागत नाहीं· पात्रावर दांपण ठेवून त्यांत वायू शिरूं देउं नये· पाचन सदैव त्वरेनें सिद्ध करावें· फार उकळल्यानें औषध निष्फळ होतें· आणि कदाचित् विकार ही करतें· यास्तव जा वेळेस पाचनांत सुगंधादिक पदार्थ घालण्याचें अगत्य आहे तेव्हां पाचन सिद्ध करून उष्ण आहे तोंच त्यांत सुगंधादिक पदार्थ घालून· वर दांपण ठेवून कांहीं शीत होई तोंपर्यंत तसेंच राहूं देउन मग गाळण्यामध्यें गाळावें· परंतु बहुत करून उष्णआहे तोंच गाळावें· कारण शीत झाल्यानंतर औषधांचा सार अंश निघतो तो तळास जाउन गाळत्ये वेळेस गाळण्यामध्यें तसाच राहातो· खालती पडत नाहीं· गाळल्या नंतर देत्ये वेळेसही हालवून सारखें करून द्यावें· पाचन एक दोन दिवसांनी वाईट होतें· ह्मणोन प्रतिदिवशीं सिद्धकरून द्यावें·

लतीन	इंग्रेजी
दीकोक्टम आलोएस कोम्पोसिटम·	कौंपौंड दीकोकशन ओफ आलोएस·

प्राकृत

एळ्याबोळाचें मिश्रित पाचन·–

ज्येष्ठीमधीचा रांधा·	अर्ध औंस
पोटास्सेस कार्बोनास·	दोन स्क्रुपल·
एळ्या बोळाची भुकणी·	एक ड्राम·
बोळाची भुकणी·	एक ड्राम·
केशर·	एक ड्राम
वेलदोड्यांचें मिश्रित टिंक्चुर·	चार औंस·
पाणी·	एक पैंट·

वेलदोडयांचे मिश्रित टिंक्चुरा वाचून सर्व पदार्थ पात्रांत घालून बारा औंस राही तों पर्यंत उकळवून मग गाळावें. नंतर त्यांत वेलदोडयांचें मिश्रित टिंक्चुर घालावें.

हें पाचन फार चांगलें आहे. सकार्बोनास पोटास्से करून एळ्याचें चांगलें मिश्रण होउन तळास जातनाहीं. ज्येष्टीमधीचे रांध्यानें एळ्याचा कुस्वाद लुप्त होतो. बोळ एळ्यास साहाय्य भूत होतो. केशराचा स्वाद आणि गंध उत्तम आहे. ह्मणोन तें घालतात. वेलदोडयांचे मिश्रित टिंक्चुरेंकरून पाचन कांहीं दिवस पर्यंत चांगलें राहातें. आणि तेणेंकरून उत्सासा व मुरडा यांचेंही निवारण होतें. जर उष्ण रोचक व दाळक पाहिजेतर हें पाचन फार चांगलें आहे. ज्याला अफूचे भक्षणाची संवय आहे त्याचें अफूनें पोट फुगलें असतां तें मोकळें करावयास हें फार उत्तम आहे जर येणें करून चांगले दाळ होउन पोटस्वछ होतनाहीं तर त्याचे बरोबर सोनामुखीचें पाचन अथवा टिंक्चुर द्यावें. तेणेंकरून त्याचें बळ अधिक होतें व तद्योगानें स्वादही फारवाईट होतनाहीं. या पाचनाचें प्रमाण एक औंसापासून दीढ औंस पर्यंत आहे. अजीर्णा बरोबर अम्लिका आहे तर हें फार श्रेष्ठ आहे. येणें करून अम्लिका दूर होत्ये. आणि पक्काशय व आंतडें यांस शक्तिही अधिक येत्ये. या कारणास्तव याचें अर्ध औंस प्रमाण रूगधोदका बरोबर अथवा कडुरोचकाचे फाराटा बरोबर प्रतिदिवशीं मोठ्या पाहांटेस द्यावें.

लतीन	इंग्रेजी
दीकोक्टम सिंकोनें.	दीकोकूशन ओफ बार्क.
सिंकोनालान्सीफोल्याची कुटलेली साल.	एक औंस.
पाणी.	एक पैंट.

हे दोन पदार्थ पात्रांत घालून वर ढांपण ठेवून पंचवीस पळें पर्यंत उकळवून मग उष्ण आहे तोंच गाळावें.

सिंकोनाचे गुण रोचकामध्यें लिहिले आहेत त्याचे पाचनाचें प्रमाण एक औंसापासून दोन औंस पर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें. हें रोचकास्तव उत्तम आहे. ज्वराचे परिहारा साठीं सिंकोनाचें पाचन चांगलें बळकट नाहीं त्याचे इतर औषधांचे अनुपाना विषयीं चांगलें आहे. या पाचनाचें म्युर्याटिक आसिदा बरोबर

मेलन केलें असतां त्याचा गुळण्या चांगल्या आहेत· यास्तव फार तोंड आल्यानंतर देतात व इतर कार्यासही देतात·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
दीकोकृटम सेदोन्ये·	दीकोक्शन् ओफ क्विन्स सीड्स·	मोगलीबेदाण्याचें पाचन·

मोगली बेदाणा	दोन ड्राम·
पाणी	एक पैंट

हे दोन पदार्थ पात्रांत घालून मंदाग्नीवर ठेवून पंचवीस पळें पर्यंत उकळवून मग गाळावें·

हें पाचन गोंदाचे पाण्याप्रमाणें आहे· व गुणही त्याप्रमाणें आहेत· हें एक दिवसानंतर वाईट होतें यास्तव सर्वकाळ साजूक द्यावें

लतीन	इंग्रेजी
दीकोकृटम दल्कामेरे·	दीकोक्शन् ओफ बुदिनेट शेड्

दल्कामेरेकालेस·	एकऔंस·
पाणी	दीड पैंट·

दोहोंना पात्रांत घालून एक पैंट राही तोंपर्यंत उकळवून मग गाळावें·

हें पाचन चांगलें औषध नाहीं व येणेंकरून गुण निश्चित होतात असेंही नाहीं· याला कांहीं मूत्रल गुण आणि कांहीं मदकारी गुण आहेत· याला कुष्ट व तत्सदृश अन्य चर्मरोग यांवर देतात· याचें प्रमाण अर्धऔंसापासून एकऔंस पर्यंत तें प्रमाण दिवसांत दोनतीन वेळ द्यावें· बहुतकरून याला सुगंध रोचकाचे टिंक्चुराशीं मिळवून देतात·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
दीकोकृटम होर्डेई·	दीकोक्शन ओफ बार्ले·	जवांचें पाचन·

जव·	दोन औंस·
पाणी·	साडेचार पैंट·

प्रथम शीतोदकानें जव स्वच्छ करावे· नंतर त्यांजवर अर्धपैंट पाणी घालून अल्पावधिपर्यंत उकळवून मग तें पाणी टाकून उर्वरित चारपैंट पाणी उकळवून त्यांजवर घालावें नंतर दोनपैंट राही तोंपर्यंत उकळवून मग गाळावें·

हें पाचन आणि गोदुग्ध यांचे समान विभागांचें मेलन बाळांचे पोषणासाठीं चांगलें

लें आहे परंतु या कार्यास्तव तें नाजुक द्यावें· शिळें दिल्हें असतां तेणेंकरून बहुत शोच होतील· हें पाचन इतर औषधांचे अनुपाना विषयीं उत्तम आहे·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
दीकोक्टमहोर्डेईकोम्प्योसिटम·	कोंपौंडदीकोक्शनओफबार्ले·	जवांचेंमिश्रितपाचन·

जवाचें पाचन	दोन पैंट·
अंजिराचे काप	दोन औंस·
ज्येष्टीमधीचें कापून कुटलेलें मूळ	अर्ध औंस·
खिस्मीस	दोन औंस·
पाणीं	एक पैंट·

सर्व पदार्थ पात्रांत घालून दोन पैंट राही तोंपर्यंत उकळवून मग गाळावें·

या पाचनाचे गुण पूर्व पाचना प्रमाणें आहेत· परंतु त्याजपेक्षां याचा रुस्वाद अधिक ह्मणोन बहुतकरून यालाच इतर औषधांचे अनुपानासाठीं देतात· तसें त्यांत सोरा व इतर पदार्थ घालून गुळणीसाठीं देतात· जेव्हां कोणाला ज्वर अथवा इन्फ्लमेशनाचा काहीं प्रकार अथवा प्रमेह किंवा अश्मरी आहे तेव्हां रोग्याचे इछेप्रमाणें या पाचनाचें पान द्यावें·

लतीन	इंग्रेजी
दीकोक्टमलैकनिस·	दीकोक्शनओफऐस्लंडमोस्स·

लेकन	एक औंस·
पाणी	दीढ पैंट·

दोन पदार्थ पात्रांत घालून एक पैंट राही तोंपर्यंत उकळवून मग गाळावें·

या पाचनाचें प्रमाण अर्धऔंसापासून दोनऔंसपर्यंत तें दिवसांत तीनवेळ द्यावें क्षयरोगावर चांगलें आहे परंतु त्याचे वाइट स्वादामुळें मनुष्याला प्रायः घेववत नाहीं·

लतीन	इंग्रेजी
दीकोक्टममाल्वेकोम्प्योसिटम·	कोम्पौंडदीकाक्शनओफमाल्लो·

शुष्क माल्वा·	एक औंस·
मु॰ बाबुना· इंग्रे॰ कामोमैल याचीं शुष्क पुष्पें·	अर्ध औंस·
पाणीं	एक पैंट·

पात्रांत घालून अर्धघटिकेपर्यंत उकळवून मग गाळावें·

हें पाचन पोटांत घ्यावयाचें नाहीं पिचकारीचे औषधाशीं मेलन करावयास चांगलें आहे· आणि कोणाला आघात जाहाला असतां तें स्थळ शेकावयास चांगलें आहे·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
दीकोक्टमपापावेरिस्·	दीकोक्शनओफपोपेहेद्स·	पोस्ताचेंपाचन·

पोस्ताचे फळाचे काप· · · · · · · · · ·	चार औंस·
पाणी · · · · · · · · · · · · ·	चार पैंट·

दोन पदार्थ पात्रांत घालून चाळीसपळें पर्यंत उकळून गाळावें·

हें पाचन शेकावयासाठीं चांगलें आहे· जेव्हां दुःखयुक्त सूज आहे अथवा व्रणांतून काहीं विकृत पूनिघून भोवतालचें चर्म आरक्त होउन फार दुखतें तेव्हां यापाचनाची शेकणी द्यावी·

लतीन	इंग्रेजी
दीकोक्टम केर्कस·	दीकोक्शन्ओफओक्बार्क·

केर्कस कोर्टेक्स· · · · · · · · ·	एक औंस·
पाणी · · · · · · · · · · · ·	दोन पैंट·

दोनपदार्थ पात्रांत घालून एक पैंट राही तोंपर्यंत उकळून गाळावें·

हें पाचन पोटांत घ्यावयाचे आणि बाह्यउपचाराचे कामाचें आहे· पोटांत घेतलें असतां रोचक गुण आणि कोष्ठबंधक गुण होतो· यास्तव संग्रहणीवर नम्र ढाळक दिल्या नंतर देतात· देण्याचा प्रकार सांगतो·

अफूचा मोदक· · · · · · · ·	एक ड्राम·
दीकोक्टम केर्कस· · · · · · ·	साडेपांच औंस·
कापुराचें मिश्रित टिंक्त्युर· · · · ·	अर्ध औंस·

सर्वांचें मेलन करून त्यामधून दोन औंस दिवसांत तीनवेळ द्यावें· अथवा ढाळ जाल्यानंतर द्यावें या पाचनाचें एक औंस अथवा दोन औंस प्रमाण अंतरित ज्वराचे परिहारासाठीं देतात· परंतु त्याचे गुण सिंकोनाचे गुणाप्रमाणें होतनाहींत· याला एकल्याला अथवा इतर औषधाशीं मिळवून गलांकुरावर आणि तत्सदृश रोगावर गुळणी स्तव देतात· धुपणीवर व गर्भपात झाल्यानंतर धुपणीप्रमाणें रोग जाहाला असतां त्यावर· व गर्भाशयामधून त्यास्थळींचे रक्तवाहिनीचे निर्बळपणेंकरून रुधिर निघुं लागलें असतां त्यावर याची पिचाकरी योनीद्वारांत सोडितात· व याची शेकणी अर्शु आणि मुळव्याध यांवर देतात·

लतीन

लतीन	इंग्रेजी
दीकोकृटम सार्सापारिल्ले·	दीकोकृशन ओफ सार्सापारिल्ला·

सार्सापारिल्लाचे मुळाचे काप·	चार औंस·
उकळतें पाणी·	चार पैंट·

पात्रांत काप व पाणीं घालून वर ढांपण ठेवून तें पात्र अग्नीजवळ दाहा घटिकापर्यंत ठेवावें नंतर त्यांतून काप काढून चांगले कुटून पुनः त्या पात्रांतल्या पाण्यांत घालून पूर्ववत् पांच घटिकापर्यंत अग्नीजवळ ठेवावें· मग दोन पैंट राही तोंपर्यंत उकळवून गाळावें·

दिवसांत याचें प्रमाण एक पैंट आहे· जेव्हां उपदंश रोगामध्यें अस्थि अथवा· पीरयोस्तयम किंवा संधी यांस सूज येउन व्यथा होत्ये व गळ्यामध्यें व्रण होतो· चर्मावर पुरळ येतो व इतर पीडा होत्ये तेव्हां हें पाचन कामाचें आहे जेव्हां व्रण होउन मनुष्याची प्रकृति फार वाईट होत्ये आणि तो बरा होत नाहीं तेव्हांही कामाचें आहे· जा काळीं हें औषध घेतल्यानंतर निर्बळपण्यामुळें घर्म पुष्कळ निघतो· तेव्हां याचे बरोबर आसिदम्‌ सल्फ्युरिकम्‌ दिल्युटमाचें लाहान प्रमाण द्यावें·

लतीन	इंग्रेजी
दीकोकृटम सार्सापारिल्ले कोम्पोसिटम्‌·	कोम्पौंड दीकोकृशन ओफ सासपारिल्ला·

सार्सापारिल्लाचें उकळतें पाचन·	चार पैंट·
सास्साफ्रासाचे मूळाचे काप·	एक औंस·
गुयेकमाचें कापलेलें काष्ठ·	एक औंस·
ज्येष्ठीमधीचें कुटलेलें मूळ·	एक औंस·
मेंजेर्येईरेदिक्साची साल·	तीन ड्राम·

सर्व पदार्थ भाड्यांत घालून चाळीस पळें पर्यंत उकळवून गाळावें·

दिवसांत याचें प्रमाण चार औंसांपासून एक पैंट पर्यंत आहे या पाचनाला कोलिकवायु· कठिण चर्मरोग· मोठा व्रण· पिंडाचे काहीं रोग· यांवर देतात· परंतु त्याचा उत्कृष्ट गुण उपदंशावर होतो· तसा पुष्कळ पारा घेतल्यानंतर मनुष्याची प्रकृति वाईट झाली असतां होतो· येणें करून अन्य औषधां पेक्षां हीन अधीक होतें·

लतीन	इंग्रेजी
दीकोक्टमसेनगे·	**दीकोकूशनओफसेनग·**

सेनागाचें मूळ·	एक औंस·
पाणी·	दोन पैंट·

हे दोन पदार्थ· पात्रांत घालून एक पैंट राही तों पर्यंत उकळवून गाळावें·

याचें प्रमाण एक औंसापासून तीन औंसपर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· याला पूर्वकालीं क्रोनिक वायूवर देत असत परंतु सांप्रत कालीं फारकरून देतनाहींत·

लतीन	इंग्रेजी
दीकोक्टमअल्मी·	**दीकोक्नओफएल्मबार्क·**

एलमाची कुटलेली साजुक साल·	चार औंस·
पाणी·	चार पैंट·

दोन पदार्थ पात्रांत घालून दोन पैंट राही तों पर्यंत उकळवून गाळावें·

या पाचनाचें प्रमाण चार औंसांपासून साहा औंसपर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· याला काहीं द्रावक गुण आहेत· व पूर्वकालीं चर्माचे रोगावर देत असत सांप्रत काळीं बहुतकरून देतनाहींत·

लतीन	इंग्रेजी
दीकोक्टमबेरेत्री·	**दीकोकूशनओफव्हैट हेल्लेबोर**

बेरेत्रीचे मूळाची बुकणी·	एक औंस·
पाणी·	दोन पैंट·
रेक्टिफैदस्पिरिट·	दोन औंस·

बुकणी व उदक पात्रांत घालून एक पैंट राही तों पर्यंत उकळवून गाळावें· मग शीन जाल्यानंतर त्यांत स्पिरिट घालावें·

हें पाचन पोटांत द्यावयाचें नाहीं बाह्योपचारा विषयीं चर्माचे काहीं रोगावर चांगलें आहे· हें बळकट कठीण औषध आहे· यास्तव याचा उपचार करणें तो फार चौकशीनें करावा·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्स्ट्राक्टा·	एक्स्ट्राक्ट्स·	रांधे

यांची सिद्धकरावयाची कृति· सांगतो· कषाय उथळ पात्रांत घालून तें पात्र जा भांड्यांत उकळतें पाणी आहे त्या भांड्यांत पाण्यावर ठेवावें मग तें पाणी वरल्या पात्रांतला कषाय गोळ्या करायोग्य दाट होई तों पर्यंत उकळवीत असावें· आणि सिद्ध होण्याचा समय समीप आला ह्मणजे काहीं पदार्थानें सर्वकाळ फार चौकशीनें घाटीत असावें· जे रांधे मृदु आहेत· त्यांवर थोडें रेक्टिफेद स्पिरिट शिंपावें·

याकृतीनें झाडांचे रस व वनस्पतींचें पाचन व फाराटव टिंक्चुर: यांना पृथक् पृथक् दाटकरून जे पदार्थ सिद्ध होतात· त्यांना तें नाम ठेवतात· रांध्यांमधून काहीं मध्यें गोंद आहे व काहीं मध्यें राळ आहे याप्रकारें सारवर· व तान्निन इत्यादिक आहेत· व काहीं मध्यें खारट पदार्था सारिखा पदार्थ आहे रांधे सिद्ध करावयासाठीं जामध्यें वनस्पतींतलें सार पदार्थ चांगले वितळून मिळतात· त्यापदार्थांमध्यें केलेले कषाय घ्यावे· जांत वितळून मिळतात ते पदार्थ दोन आहेत· पाणी व आलकोहोल पाण्यामध्यें गोंद· सारवर· व तान्निन· इत्यादिक वितळून मिळतात· आलकोहोलामध्यें राळ वितळत्ये· व पाण्यांत वितळणारे जे पदार्थ ते यांतही वितळतात· त्यांमधून यांत गोंद मात्र वितळत नाहीं· पाणी आणि आलकोहोल या दोहोंमध्यें केलेल्या कषायाचे राध्यांचें भेदेंकरून ज्ञान व्हावयासाठीं इंग्रेजी भाषेंत त्यांना पृथक् नाम ठेविलें आहे· त्यानें सांगतो· एकाचें वाटरी एकस्ट्राकूट· प्राकृत पाण्याचा रांधा· ह्मणजे पाण्यांत केलेल्या कषायाचा रांधा· दुसऱ्याचें स्पिरिच्युअस एक्स्ट्राकूट· प्राकृत स्करेचा रांधा· ह्मणजे स्करेंत केलेल्या कषायाचा रांधा· या प्रकारें दोहोंचीं दोन नावें आहेत· जेव्हां पाण्याचा रांधा सिद्ध करण्याचें अगत्य आहे· तेव्हां पूर्वीं वनस्पतीचे शुष्कपदार्थ चांगले कुटून पाण्यांत घालून पाचना प्रमाणें सिद्ध करावें· मग उष्ण आहे तोंच गाळावे· यांचें कारण उष्णामध्यें वनस्पतींचे पदार्थ वितळतात ते उदकाशीं मिळून असतात· शीत झाल्या नंतर ते पदार्थ उदकाला सोडून तळास बसतात· आणि गाळत्ये वेळेस खालीं नपडतां गाळण्यांत तसेच राहातात· यास्तव त्या पदार्थांचा रांध्यामध्यें प्रवेश नहोउन त्याचे गुण न्यून होतील· गाळल्यानंतर त्याला रुंद उथळ पात्रांत घालून तें पात्र जा भांड्यांत उकळतें पाणी आहे त्या भांड्यांत पाण्यावर ठेवावें· मग तें भांडें अग्नीवर ठेवून त्यांतलें पाणी· वरल्या उथळ पात्रांतलें पाचन दाट होई तों पर्यंत उकळवावें·

कळवावें· रांधे गोळ्या करावयासाठीं मृदु आणि बुकणी करावया साठीं शुष्क कठीण करावें· केल्यानंतर मृदु आणि कठिण रांहावया साठीं चिनी मृत्तिकेचे लाहान करंड्यांत ठेवावे· आणि अगत्यावांचून उघडे राहूं देउंनयेत्· रांधे सिद्ध करायासाठीं लोखंड तांबें व मृत्तिका यांचीं पात्रें चांगलीं आहेत· रांध्यांवर रेक्टिफेद स्पिरिट शिंपणें कामाचें नाहीं त्वरेनें शुष्क होतात यास्तव· रांधे चांगले सिद्ध करून शुष्कस्थळीं ठेविले असतां त्यांवर केनशी येत नाहीं· अशा स्थळीं ठेविले नाहींततर येईल· ज्या वनस्पति पदार्थामध्यें राळ आहे ते पदार्थ पाण्यांत घालले असतां त्यांतली राळ वितळून निघत नाहीं यास्तव त्यांच्या करेंत कषाय करून रांधा करावा· वनस्पतीचें टिंक्चुर नलिका यंत्रांत घालून राधा करावा· यंत्रामध्यें रांधा सिद्ध होतो· अर्क वर येउन अन्य शीत पात्रांत घट्ट होतो· रांधे औषधार्थ चांगले आहेत· ज्या वेळेस पक्वाशयावर त्यांचे गुण सावकाशीनें करावयास इछितात· तेव्हां त्यांची गोळी द्यावी· अन्य वेळेस उदकाशीं अथवा स्गंधोदकाशीं मेळून करून द्यावें· हे रांधे पाचन आणि फाराट यांचे प्रतिनिधी विषयीं उत्तम आहेत· व काहीं औषधांचे साजुक रसांचेही प्रतिनिधी आहेत·

लतीन एक्स्त्राकृटम् आकोनीटी

इंग्रेजी एक्स्त्राकृट ओफ आकोनैट·

आकोनैटाचीं साजुक पर्णे एक पैांड त्यांना दगडाचे खलांत घालून वर थोडें पाणीं शिंपून चांगलीं कुटून पिळून रस काढावा· मग जो रस पात्रांत घालून तें पात्र ज्या भांड्यांत उकळतें पाणी आहे त्यांत पाण्यावर ठेवून तें भांडें अग्नीवर ठेवावें· नंतर त्यांतलें पाणी वरल्या पात्रांतला रस दाट होई तोंपर्यंत उकळवीत असावें·

हें औषध चांगलें नाहीं याचे गुण सर्वकाळ समान होतनाहींत· यास्तव त्याचा भरवंसा धरूनये·

लतीन एक्स्त्राकृटम आलोएस प्युरिफिकेटम·

इंग्रेजी प्युरिफैद एक्स्त्राक्ट ओफ आलोएस्·

प्राकृत एळ्याबोळाचा स्वछ रांधा·

एळ्याचें चूर्ण·	एक पैांड·
उकळतें पाणी·	एक गाल्लन·

चूर्ण व पाणी· पात्रांत घालून तें पात्र तीन दिवस अग्नीजवळ ठेवून मग गाळावें· गाळ तळास बसल्या नंतर वरलें स्वछ घेउन अन्य पात्रांत घालून तें पात्र जा भांड्यांत उकळतें पाणी आहे त्यांत पाण्यावर ठेवून पूर्व रांध्या प्रमाणें दाट होई तों पर्यंत त्या भांड्यांतलें पाणी उकळवीत असावें·

या रांध्याचें गुण एळ्या प्रमाणें आहेत· व याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून पंधरा ग्रेन पर्यंत आहे· याच्या गोळ्या करून देतात· येणेंकरून मोकळे शौच होतात·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्स्त्राक्टम आंथेमिदिस·	एक्स्त्राक्ट ओफ कामोमैल·	मु॰ बाबुना त्याचा रांधा

बाबुन्याचीं शुष्क पुष्पें·	एक पौंड·
पाणी·	एक गाल्लन·

हे दोन पदार्थ पात्रांत घालून चार पैंट राही तों पर्यंत उकळवून मग उष्ण आहे तोंच गाळावें· नंतर त्याचा रांधा पूर्व रांध्या प्रमाणें सिद्ध करावा·

या रांध्याचें प्रमाण पांच ग्रेना पासून दाहा ग्रेन पर्यंत तें प्रमाण दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· तो चांगला रोचक आहे· व सल्फास जिन्सि· रेवाचिनी इत्यादिक औषधांचे अनुपाना विषयीं उत्तम आहे·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्स्त्राक्टम बेल्लादोन्ने·	एक्स्त्राक्ट ओफ् नैटसेद्·	मु॰ अनबुथालबत्याचा रांधा·

अनबुथालबाचीं साजुक पर्णे एक पौंड· तीं दगडाचे खलबत्यांत वर थोडें पाणी शिंपून चांगलीं कुटावीं नंतर रस काढून पात्रांत घालून पूर्व रांध्या प्रमाणें रांधा सिद्ध करावा·

या रांध्याचे गुण मद्कारी मध्यें लिहिले आहे·

लतीन	इंग्रेजी
एक्स्त्राक्टम् सिंकोनें·	एक्स्त्राक्ट ओफ बार्क·

सिंकोनालान्सिफोल्याची कुटलेली साल·	एक पौंड·
पाणी·	एक गाल्लन·

भांड्यांत सालीवर पाणी घालून साहा पेंटराही तों पर्यंत उकळून उष्णआहे तोंच गाळावें· पुनः गाळून राहिलेल्या चोथ्यावर तितकें पाणी घालून तितकें राहीं तों पर्यंत उकळून उष्णाच गाळावें· याप्रमाणें तो चोथा पुनः दोनवेळ उकळावा· नंतर तीं चार पांचनें एकत्र मिळवून त्याचा रांधा पूर्व रांध्याप्रमाणें सिद्धकरावा· हा रांधा गोळया करावयासाठीं मृदु आणि चूर्ण करावयासाठीं कठिण करून ठेवावा·

याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत आहे· याच्या गोळया द्याव्या अथवा सुगंधोदकाशीं मेलन करून द्यावें· याचे गुण सिंकोनाचे गुणांप्रमाणें आहेत· जेव्हां सिंकोनाचे चूर्णकरून उल्हासा अथवा वमन होतें· तेव्हां त्याचे ऐवजीं हें औषध द्यावें· येणेंकरून असाउपद्रव होतनाहीं·

लतीन	इंग्रेजी
एकूस्त्राकूटम् सिंकोने रेसिनोसम·	रेसिनसू एक्स्त्राक्ट ओफ बार्क·

सिंकोने लान्सिफोल्याची कुटलेली साल· · · · · दोन पोंड·

रेक्टिपेद स्पिरिट· · · · · · · · · · · · · · एक गाल्लन

दोहोंनां पात्रांत घालून चारदिवस पर्यंत ठेवून मग गाळावें· नंतर त्या टिंक्चुराला नलिका यंत्रांत घालून तें यंत्र जा भांड्यांत उकळतें पाणी आहे त्यांत ठेवून तें भांडें अग्नीवर ठेवून त्यांतलें पाणी उकळावें· या उष्णेंकरून यंत्रामधून अर्क वर्ती येउन अन्य शीनपात्रांत जाउन घट्ट होतो· आणि यंत्रामध्यें राहालेल्या पदार्थाचा रांधा सिद्ध होतो· याचा दाटपणा नीटजाल्यानंतर भांडें अग्नीवरून उतरून तो काढावा·

हा रांधा पूर्व रांध्यापेक्षां उत्तम व बलवंत आहे· याचें प्रमाण दाहा ग्रेनांपासून तीस ग्रेनपर्यंत आहे· जेव्हां उल्हासें करून अथवा वमनें करून सिंकोनाचें चूर्ण मनुष्याला घेववत नाहीं तेव्हां हा रांधा कामाचा आहे· याच्या गोळया अथवा याला सुगंधोदकाशीं मिळवून देतात·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्स्त्राक्टम कोलोसिंथिदिस·	एक्स्त्राक्ट ओफ कोलोसिंथ·	इंद्राइनाचा रांधा·

इंद्राइनाचा गीर· · · · · · · · · · · · एक पौंड·

पाणी· · · · · · · · · · · · · · · · · एक गाल्लन·

हे दोन पदार्थ पात्रांत घालून चार पैंट राही तों पर्यंत उकळवून मग उष्ण आहे तोंच गाळून अन्यपात्रांत घालून त्याचा रांधा इतर रांध्यां प्रमाणें सिद्ध करावा·

मनुष्याला हा रांधा एकला दिल्हा असतां प्रायः पोटांत मुरडा होतो· कालोमेलाशीं मिळवून दिल्हा असतां तितका होत नाहीं· याचें प्रमाण पांच ग्रेना पासून वीस ग्रेनपर्यंत आहे·

लतीन — इंग्रेजी

एक्स्त्राक्टम कोलोसिंथिदिस् कोम्पोसिटम· कोम्पौंड एक्स्त्राक्ट ओफ कोलोसिंथ

प्राकृत

इंद्राइनाचा मिश्रित रांधा··

इंद्राइनाचा गीर·	साहा औंस·
एळ्या बोळाची बुकणी	बारा औंस·
सक्मुन्याची बुकणी	चार औंस·
वेलदोड्याचे दाण्याची बुकणी·	एक औंस·
कठीण साबु	तीन औंस·
प्रुफस्पिरिट·	एक गालन·

इंद्राइनाचा गीर प्रुफस्पिरिटामध्यें घालून, उष्ण स्थळीं चार दिवस ठेवून मग गाळावें· नंतर त्याशीं एळ्या· सक्मुन्या व साबु या तिहींचें मेलन करून त्याचा रांधा पूर्व रांध्याप्रमाणें सिद्ध करावा आणि सिद्ध होण्याचा समय समीप आला ह्मणजे त्यांत वेलदोड्यांचे दाण्यांची बुकणी घालून मिळवावी·

हा रांधा फार उत्तम रेचक आहे· जा वेळेस रेवाचिनीला अथवा अन्य नम्र रेचकाला बलवंत करावयास इछितात· तेव्हां त्याशीं याचें मेलन करावें· मेलनें करून त्याला अधीक बल येतें हा रांधा आणि कालोमेल यांचे मेलनाची गोळी फार उत्तम ढाळक आहे· या रांध्याचें प्रमाण पांच ग्रेना पासून दाहा ग्रेन अथवा पंधरा ग्रेन पर्यंत आहे· हा रांधा व कालोमेल यांचे मेलनापेक्षां नम्र ढाळक पाहिजे तर कालोमेलाचे स्थानीं मेलनार्थ ब्लुपिल घ्यावें· वायूत्पत्तीचे निवारणासाठीं त्यांत उष्ण सुगंध तेलाचे एक दोन बिंदु सर्वकाळ घालावे·

लतीन

लतीन	इंग्रेजी।
एक्स्त्राक्त्म कोनीइ·	एक्स्त्राक्त ओफ हेम्लोक·

हेम्लोकाचीं साजुक पर्णें एक पौंड· घेउन वर थोडें पाणी शिंपून दगडाचे खलांत चांगलीं कुटून पिळून रस काढून त्याक्षणींच पात्रांत घालून त्याचा रांधा पूर्वरांध्याप्रमाणें सिद्ध करावा·

हा रांधा मदकारी आहे· याचें प्रमाण तीन ग्रेनापासून दाहा ग्रेन पर्यंत अथवा पंधरा ग्रेन पर्यंत आहे· याला गंडमाळा उपदंश व इतर रोग· यांचे वाईट व्रणावर देतात· व काहीं एक वेळेस हेम्लोकाचीं पर्णें कुटून लबद्यांत घालून तो लबदा व्रणावर लावतात·

लतीन	इंग्रेजी
एक्स्त्राक्त्म एलातेरीई·	एक्स्त्राक्त ओफ एलातेर्यम्·
प्राकृत	
मु॰ तर्फद याचा रांधा·	

पिकलें तर्फद कापून त्याचा रस हळु पिळून काढावा मग त्याला सूक्ष्म केशाचे चाळणींत गाळून बिलोराचे पात्रांत घालून तळास दाट पदार्थ आउन वर निवळ येई तोंपर्यंत ठेवून मग वरली निवळ टाकून खालचा दाट पदार्थ नम्र उष्णें करून शुष्क करावा·

हें औषध फार बलवंत दाळक आहे· परंतु याचे गुण सर्वकाळ आणि सर्व मनुष्यांस समान होत नाहींत· याला पोटांतल्ये जळोदरावर अन्य सर्व औषधं देउन निष्फळ जाल्यानंतरच देतात· असें भयंकारक आहे· आणि त्या रोगावर मात्र देतात· परंतु त्याचे बरोबर यकृतास अथवा प्लीहेस रोग झाला असतां देत नाहींत· देण्याचा प्रकार सांगतो·

तर्फदाचा रांधा· · · · · · · ·	दोन ग्रेन·
खडीसाकरेचें चूर्ण· · · · · · ·	एक ड्राम दोन ग्रेन·

दोन पदार्थ एकत्र मिळवून त्याचे सोळा विभाग करावे· त्यामधून एक एक विभाग फार रेच होतील तोंपर्यंत आठ आठ घटिका नंतर द्यावा· तेणेंकरून फार पातळ रेच होउन काहीं एक वेळेस जळोदराची सूज अकस्मात न्यून होत्ये हें औषध

भयकारक आहे· यास्तव मोट्ये अगत्या वांचून कधिंही देउं नये·

लतीन	इंग्रेजी
एक्स्त्राक्टमजिन्श्येने·	एक्स्त्राक्टओफजिन्श्यन्·

जिन्श्येनाचे मूळाचे काप·	एक पोंड·
उकळतें पाणी·	एक गाल्लन·

हे दोन पदार्थ· पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवावे··मग तें पात्र अग्नीवर ठेवून चार पैंट राही तों पर्यंत उकळवून उष्ण असतांच गाळून त्याचा रांधा पूर्वरांध्यां प्रमाणें सिद्ध करावा·

हा रांधा फार उत्तम रोचक आहे· याचे गुण बाबुन्याचे रांध्याप्रमाणें· आहेत· याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें· याला बहुत करून कासीस वबोळ या दोहोंशीं मिळवून देतात· मेलन प्रकार सांगतो·

कासीस·	पंधरा ग्रेन·
बोळाचें चूर्ण·	एक ड्राम·
एक्स्त्राक्टम्जिन्श्येने·	एक ड्राम·

तिहींचें मेलन करून तीस गोळ्या कराव्या· त्याचें प्रमाण दोन गोळ्या तें प्रमाण दिवसांत दोन वेळ द्यावें·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एक्स्त्राक्टम्ग्लीसिरीसे·	एक्स्त्राक्टओफलिकरिस्·	ज्येष्ठीमधीचा रांधा·

ज्येष्ठीमधीचे मूळाचे काप·	एक पोंड·
उकळतें पाणी·	एक गाल्लन·

हे दोन पदार्थ पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवावे· मग तें पात्र अग्नीवर ठेवून चार पैंट पाचन राही तों पर्यंत उकळवून उष्ण असतां गाळून त्याची रांधा पूर्व रांध्यां प्रमाणें **सिद्ध करावा·**

या रांध्याचा स्वाद गोड आहे· यास्तव त्याशीं कडू औषधें मिळवून देतात· मेलनें करून एळया बोळादिक औषधांचे मिश्रित पाचनाच्या कडुस्वाद कांहीं न्यून होतो· हा रांधा एकला तोंडांत धरला असतां पडशाचा खोकला कांहीं बरा होतो·

लतीन·	इंग्रेजी·
एक्स्त्राकूटमहेमातोक्सिली·	एक्स्त्राकूट ओफ लोग्वुद·

लोग्वुदाचें चूर्ण	एक पौंड·
उकळतें पाणी	एक गालन·

हे दोन पदार्थ पात्रांत घालून साठ घटिकापर्यंत ठेवावे मग तें पात्र अग्नीवर ठेवून चार पैंट पाचन राही तों पर्यंत उकळवून उष्ण असतां गाळून त्याचा रांधा पूर्व रांध्यां प्रमाणें सिद्ध करावा·

हा रांधा उत्तम कोष्ठबंधक आहे· याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत आहे· याचें द्रुत करून दालचिनीचे अथवा पुदिन्याचे सुगंधोदकाशीं मेलन करून संग्रहणीवर देतात· या औषधें करून शौचांचा रंग लाल होतो·

लतीन·	इंग्रेजी·
एक्स्त्राकूटमहुम्पुली·	एक्स्त्राकूट ओफ होप्स·

होप्स·	चार औंस·
उकळतें पाणी	एक गालन·

दोन पदार्थ भांड्यांत घालून चार पैंट पाचन राही तों पर्यंत उकळवून उष्ण असतां गाळून त्याचा रांधा पूर्व रांध्या प्रमाणें सिद्ध करावा·

या रांध्याचे गुण निश्चयें करून होतात असें नाहीं यास्तव प्रायः देत नाहींत· याला कांहीं रोचक व काहीं मदकारी गुण आहेत· याचें प्रमाण पांच ग्रेनां पासून वीस ग्रेन पर्यंत आहे· याच्या गोळ्या द्याव्या· अथवा याचें सुगंधोदकाशीं मेलन करून द्यावें·

लतीन·	इंग्रेजी·
एक्स्त्राकूटमहेयोस्यामी·	एक्स्त्राकूट ओफ हेन[illegible]न·

हेन्बेनाचीं साजुक पर्णें एक पौंड घेऊन वर थोडें पाणी शिंपून दगडाचे खलांत चांगलीं कुटून रस काढून त्याचा रांधा पूर्व रांध्यां प्रमाणें सिद्ध करावा·

हा रांधा उत्तम मदकारी आहे व अफूचा चांगला प्रतिनिधी आहे· जेव्हां अफू करून कांहीं रोगामध्यें पोट फुगतें तेव्हां विशेष चांगला आहे· याचें प्रमाण

दोन ग्रेनां पासून पांच अथवा दाहा ग्रेन पर्यंत आहे· काहीं ठाळक औषधें करून पोटांत मुरडा अथवा शूळ होऊं लागला असतां त्यांचा प्रतिबंध करावयास हें औषध उत्तम आहे· व याचें ठाळक औषधाशीं मेलन केलें असतां तेणें करून हे उपद्रव न होतां ठाळक गुण ही चांगला होतो· क्लोमनांत अथवा मूत्र मार्गांत काहीं पीडा अथवा रोग असतां त्यांचे दूरी करणाविषयीं या औषधाचें द्रावकाशीं किंवा अन्य औषधाशीं मेलन चांगलें आहे· मनुष्याला खोखला किंवा फुप्फुसांत अल्प व्यथा आहे· तर हें औषध फार चांगलें आहे· येणें करून व्यथा न्यून होऊन रात्रीस निद्रा ही लागत्ये· या रांध्याचें उदकाशीं मेलन करून भिंवई वर लावलें असतां किंवा नेत्रांमध्यें चार पांच बिंदु घातले असतां एक घटिके नंतर नेत्र कनीनिका फार मोटी होत्ये· यास्तव वैद्य शस्त्रानें मोतिबिंब रोग दूर करावयास इच्छितात· तर हें औषध फार उपयोगी आहे· व नेत्रांचे अन्यरोगां वर ही उत्तम आहे·

लतीन·	इंग्रेजी·
एक्स्त्राक्टम्जालेपे·	एक्स्त्राक्टओफजालप्·
जालपाचे मूळाची बुकणी·	एक पौंड·
रेक्टिफैदस्पिरिट·	चार पैंट·
पाणी·	एक गाल्लन·

बुकणी स्पिरिटामध्यें घालून चार दिवस पर्यंत ठेवून वरलें टिंक्चुर काढून गाळावें· नंतर खालचा गाळ उदकांत घालून दोन पैंट पाचन राही तों पर्यंत उकळवून उष्ण असतां गाळावें· मग टिंक्चुराला नलिका यंत्रांत घालून तें यंत्र अग्नीवर ठेवावें· त्यांतून अर्क वर्त्तियेऊन अन्य शीत पात्रांत जाऊन घट्ट होतो· आणि यंत्रांत रांधा दाट होतो· दाट झाल्या नंतर काढावा मग तें पाचन भांड्यांत घालून काहीं दाट होई तों पर्यंत तें भांडें अग्नीवर ठेवावें मग त्यांतून काढून त्या टिंक्चुराचें दाट पदार्थाशीं चांगलें मेलन करावें· नंतर तें मेलन पुनः पात्रांत घालून तें पात्र ज्या भांड्यांत उकळतें पाणी आहे· त्यांत पाण्यावर ठेवून तें भांडें अग्नीवर ठेवावें· नंतर त्यांतलें पाणी वरल्या पात्रांतलें मेलन पूर्व रांध्यां प्रमाणें दाट होई तों पर्यंत उकळवीत असावें·

या रांध्याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून एक स्क्रुपल पर्यंत आहे· केवळ याचें -

प्रमाण दिल्हें असतां प्रायः पोटांत मुरडा आणि शूळ होतो· यास्तव वैद्य कालोमेल एल्या बोळ ओसाररेवंड व सक्मुन्या इत्यादिक ढाळकाशीं मिळवून देतात· दाहाग्रेन हा रांधा आणि पांच ग्रेन साबुण दोन एकत्र मिळवून तीन गोळ्या करून रात्रीस देऊन प्रातःकाळीं सोनामुखीचें पाचन अथवा काहीं खारट रेचक दिल्हे असतां चांगले रेच होतात· जेव्हां कालोमेल किंवा· इट्राईन घावयास इच्छित नाहींत तेव्हां हा उपचार कामाचा आहे·

लतीन·	इंग्रेजी·
एक्स्राक्टमलाक्तुसे·	एक्स्राक्टओफलेत्युस·

लेत्युसाचीं साजुक पर्णें एक पौंड घेऊन वर थोडें पाणी शिंपून दगडाचे खलांत चांगली कुटून रस काढून त्या रसाचा रांधा पूर्व राध्याप्रमाणें **सिद्ध करावा·**

हा रांधा चांगलें औषध नाहीं जसें अफूचे स्थानीं हैयोसियामस देतात· तसें पूर्वकालीं तीचे स्थानीं या रांध्याला देत असत· परंतु सांप्रत कालीं देत नाहींत· याचें कारण हा हैयोसियामसा प्रमाणें चांगला नाहीं· आणि याचे गुण निश्चित होतात असें नाहीं· याचे प्रमाण दाहाग्रेन आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
एक्स्राक्टमओप्यी·	एक्स्राक्टओफओप्यम·	अफूचा राधा·

अफु·	सोळा औंस·
पाणी·	एक गालन·

अफूचे लाहान लाहान भाग करून त्यांवर थोडें पाणी घालून तीस घटिकापर्यंत ठेवून नम्र झाल्या नंतर उरलेलें पाणी थोडें थोडें वर घालून चांगलें मेलन करावें मग त्याला गाळ तळास जाई तों पर्यंत ठेवून वरलें हलुच गाळून घेऊन त्याचा रांधा पूर्व रांध्यां प्रमाणें· **सिद्ध करावा·**

याचें प्रमाण आणि हीत अफू प्रमाणें आहे·

लतीन

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
एकुस्त्राकुटमपापावेरिस·	एकुस्त्राकुटओफपोप्पी	पोस्ताचा रांधा

बीजा वांचून कुटलेलें पोस्ताचें फल·	एक पौंड·
उकळतें पाणी	एक गालन·

दोन पदार्थ पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवून मग तें पात्र अग्नीवर ठेवावें· नंतर चार पैंट राही तों पर्यंत उकळवून उष्ण असतां गाळून त्याचा रांधा पूर्व रांध्यां प्रमाणें सिद्ध करावा·

या रांध्याचे गुण अफू प्रमाणें आहेत· परंतु अफू करून कपाळ शूळ व उह्लासा इत्यादिक वाईट परिणाम जे होतात ते येणें करून होत नाहींत· यास्तव जा समयीं काहीं रोगामध्यें मस्तकांत पीडा अथवा अपूर्व अवस्था आहे· तेव्हां या औषधाला द्यावें· याचें प्रमाण चार ग्रेनां पासून दाहा ग्रेन पर्यंत आहे· याचा गोळ्या करून घाव्या· काहीं एक वेळेस निद्रा यावयासाठीं या औषधाला हैयोसियामसाशीं मिळवून देतात·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत
एकुस्त्राकुटमरेई·	एकस्त्राक्टओफरुबार्ब·	रेवाचीनीचा रांधा·

रेवाचीनीचे मूळाची बुकणी·	एक पौंड·
प्रुफस्पिरिट·	एक पैंट·
पाणी·	सात पैंट·

सर्व पदार्थ पात्रांत घालून मंद उष्णांत चार दिवस ठेवून मग गाळून गाळ तळास जाई तों पर्यंत ठेवावें नंतर वरले स्वच्छ घेऊन अन्य पात्रांत घालून ते पात्र जा भाड्यांत उकळतें पाणी आहे त्यांत पाण्यावर ठेवून तें भांडें अग्नीवर ठेवावें· नंतर त्यांतलें पाणी वरल्या पात्रांतलें पूर्व रांध्यां प्रमाणें नीट दाट होई तों पर्यंत उकळीत असावें·

ढाळ कास्तव या रांध्याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून तीस ग्रेन पर्यंत आहे· परंतु हा फार श्रेष्ठ नाहीं· या पेक्षां रेवाचीनीचा फाराट उत्तम आहे·

लतीन

लतीन·	इंग्रेजी·
एक्स्त्राकूटमसार्सापारिल्ले·	एक्स्त्राक्टओफसार्सापारिल्ला·

सार्सापारिल्लाचे मूळाचे काप·	एक पौंड·
उकळतें पाणी·	एक गाल्लन·

हे दोन पदार्थ पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवून मग तें पात्र अग्नीवर ठेवावें· नंतर चार पैंट पाचन राही तों पर्यंत उकळवून मग उष्ण असतां गाळून त्याचा रांधा पूर्व रांध्या प्रमाणें सिद्ध करावा·

हा रांधा नीट झाला असतां याचे गुण सार्सापारिल्लाचे पाचना प्रमाणें आहेत· परंतु बहुत करून तसा चांगला होत नाहीं याचें प्रमाण दाहा ग्रेनां पासून एक ड्राम पर्यंत आहे· प्रायः याचा गोळ्या अथवा याचें सार्सापारिल्लाचे पाचनाशीं मेलन करून देतात· सार्सापारिल्लाचें पाचन त्याचे सर्व इतर औषधा पेक्षां चांगलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
एक्स्त्राक्टमस्त्रामोनीई·	एक्स्त्राक्टओफथोर्नआपल·	धुत्र्याचा रांधा·

धुत्र्याचें बीज·	एक पौंड·
उकळतें पाणी·	एक गाल्लन·

दोन पदार्थ पात्रांत घालून वर ढांपण ठेवून तें पात्र दाहा घटिकापर्यंत अग्नीजवळ ठेवावें· नंतर त्यांतून बीज काढून दगडाचे खलब त्यांत कुटून पुनः पाण्यांत घालून चार पैंट राही तों पर्यंत उकळवून उष्ण असतां गाळून त्याचा रांधा पूर्व रांध्याप्रमाणें सिद्ध करावा·

हा रांधा चांगलें औषध नाहीं यास्तव बहुत करून देत नाहींत· एक बैद्यानें काहीं क्रोनिक रोगामध्यें फार पीडा होत होती ती दूर करावयास हें औषध एक ग्रेनाचें आठव्ये विभागा पासून एक ग्रेन पर्यंत दिल्हें वायूचे काहीं प्रकारावर हें औषध श्रेष्ठ आहे· परंतु याचें मोटें प्रमाण वाईट विष आहे· यास्तव द्यावयास चांगलें नाहीं·

लतीन·	इंग्रेजी·
एक्स्त्राक्टमटाराक्सिसि·	एक्स्त्राक्टओफदांडिलयन·

दांडिलयनाचें कुटलेलें साजुक मूळ·	एक पौंड·
उकळतें पाणी·	एक गाल्लन·

हे दोन पदार्थ पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवावे नंतर तें पात्र अग्नीवर ठेवून चार पैंट पाचन राही तों पर्यंत उकळवून उष्ण असतां गाळून त्याचा रांधा पूर्व रांध्यां प्रमाणें **सिद्ध करावा**·

जेव्हां मनुष्याचे फुप्फुसास रोग आहे आणि त्याचे बरोबर यकृतास ही काहीं रोग आहे तेव्हां बहुत करून पारा घावयास नीट नाहीं तेणें करून फुप्फुसाचा रोग अधीक होतो यास्तव· अशा अवस्थेवर हा रांधा घावा· याचे काहीं गुण काळिजा वर होतात· आणि येणें करून फुप्फुसाचा रोग ही अधीक होत नाहीं· याचें प्रमाण अर्ध द्राम तें दिवसांत तीन चार वेळ घावें· प्रायः याचें सुगंधोदकाशीं मेलन करून देतात· काहीं एक वेळेस अजीर्णावर आणि चर्माचे काहीं रोगावर देतात· परंतु दिल्या नंतर पथ्याची चौकशी फार अगत्यानें करावी· याचें कारण या औषधाचा लोकीक पथ्यें करून अधीक झाला आहे· स्वकीयें करूनच झाला नाहीं व पथ्य केल्यानें हित ही फार होतें· यास्तव·

---

* * *

लतीन·	इंग्रेजी·	संस्कृत·
मिस्त्युरे·	मिक्स्त्युर्स·	मिश्रण·

औषधाचें पाण्याशीं मेलन करून जे पदार्थ सिद्ध होतात त्यानां हें नाम ठेवतात· बहुत करून साखरेचे पाकें करून अथवा गोंदाचे उदकें करून पदार्थाचें पाण्याशीं मेलन होतें· जा पदार्थामध्यें साखर अथवा गोंद आहे· त्या पदार्थाचें उदकाशीं मेलन करावयासाठीं त्यांचें अगत्य नाहीं त्या पदार्थाचे आंतल्ये साखरेनें आणि गोंदानें उदकाशीं त्यांचें मेलन होतें· अशा मिश्रणाला इंग्रेजी भाषेंत ईमलशन् ही ह्मणतात· कापुराचे मिश्रणा शिवाय सर्व अन्य मिश्रणें कार्य समयींच सिद्ध करावीं· त्यांचें कारण दोन तीन दिवसां नंतर वाईट होतात· आणि त्यांतला काहीं पदार्थ तळास बसून पुनः त्याचें मिश्रण सहज होत नाहीं यास्तव मिश्रणें सिद्ध करावयासाठीं जड पदार्थ घेऊं नये· घेतला असतां तळास बसून निष्काम होईल· व मिश्रण करायासाठीं वनस्पतींचें चूर्ण अर्धद्रामा पेक्षां व मोदक दोन स्कुपलां पेक्षां व रांधा एक स्कुपला पेक्षां अधीक घेऊं नये·

लतीन

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
मिस्त्युराआम्मोन्यासी·	मिक्स्त्युरओफआम्मोन्यक·	मु॰ओषकयाचें मिश्रण·

ओषक·	दोन ग्राम·
पाणी·	अर्धपैंट·

ओषकावर थोडें थोडें पाणी घालून चांगलें पूर्ण मेलन होई तों पर्यंत खलावें·

हें मिश्रण दुधा प्रमाणें दिसतें याचे सिद्धते साठीं ओषक चांगलें स्वच्छ पाहून घ्यावें· काहीं एक वेळेस असल्या दुग्ध सदृश मेलनाला लाक् ह्मणजे दुग्ध ह्मणतात· हें ओषध कफ काढावया विषयीं उत्तम आहे· जा वेळेस शुष्क खोखला होतो तेव्हां ही त्यां बरोबर इन्फ्लमेशनाचीं लक्षणें नसतां किंवा नाडीचें गमन त्वरित होत नसतां चांगलें आहे· जेव्हां वृद्ध मनुष्याला खोखला होऊन त्याचे फुफ्फुसांत फार कफ· झाला असतां तो सहज वर्त्ति येत नाहीं· तेव्हां हें औषध त्याचे बरोबर इन्फ्लमेशन झालें नसतां. चांगलें आहे· जा समयीं तरुण स्त्रीस पूर्ववित् रोग आहे· आणि त्या बरोबर तीर· जस्वला नीट सुवेळेस होत नाहीं· तेव्हां हें ओषध कफ काढावयासाठीं चांगलें आहे· याचें प्रमाण अर्ध औंसापासून· एक औंस पर्यंत आहे· बहुत करून याला बदामाचें मिश्रण वस्क्विल विनेगरया दोहोंशीं किंवा ईपिकाक्युअनाशीं मिळवून देतात· हें मिश्रण व बदामाचें मिश्रण यांचें मेलन स्क्विल्विनेगर आणि ईपिकाक्युअन यांचें चांगलें अनुपान आहे· पहिल्या मेलनाची कृति सांगतो·

ओषकाचें मिश्रण·	साहा ड्राम·
बदामाचें मिश्रण·	साहा ड्राम·
स्क्विल्विनेगर·	अर्ध ड्राम·

सर्वांचें मेलन करून दिवसांत तीन-चार वेळ घ्यावें·

द्वितीय मेलन कृति सांगतो·

ओषकाचें मिश्रण·	एक औंस·
कापुराचें मिश्रण·	अर्ध औंस·
ईपिकाक्युअनाचें चूर्ण·	दीढ ग्रेन·
कापुराचें मिश्रित टिंक्चुर·	एक ड्राम·

सर्वांचें मेलन करून दिवसांत दोन वेळ घावें· काहीं एक वेळेस कापुराचे मिश्रणाचे ऐवजी स्पिरिटस् मिंदरेरी घातलें असतां चांगलें आहे·

लतीन

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
मिस्त्पुरा आमिग्दालेरम·	आमंडमिक्स्तुर·	बदामाचें मिश्रण·

बदामाचा मोदक · · · · ·	दोन औंस·
पाणी· · · · · · ·	एक पैंट·

खलबत्यांत मोदक घालून त्यावर थोडें थोडें पाणी घालून चांगलें मेलन होई तों पर्यंत खलून मग गाळावें·

हें औषध दुधा प्रमाणें दिसतें ज्वरामध्यें दाह न्यून कारक औषधाचें उराचे रोगामध्यें कफघ्न औषधाचें व इतर औषधांचें हें चांगलें अनुपान आहे· याचें प्रमाण दोन औंसांपासून आठ औंस पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
मिस्त्पुरा आस्साफेटिदे·	मिक्स्तुर ओफ अस्साफेटिदा·	हिंगाचें मिश्रण·

हिंग · · · · · ·	दोन ड्राम·
पाणी · · · · · ·	अर्ध पैंट·

हिंग खलबत्यांत घालून त्यावर थोडें थोडें पाणी घालून चांगलें मेलन होई तों पर्यंत खलावा·

बहुत करून हिंगाच्या गोळ्या करून देतात· परंतु त्या पेक्षां हें मिश्रण बलवंत आणि येणें करून गुण त्वरेनें होतो· वायु गोळ्यावर विशेष होतो· याचे मिश्रणास्तव नुस्तें पाणी चांगलें नाहीं· पुदिन्याचें पाणी अथवा अन्य सुगंध पाणी असावें· याचें प्रमाण अर्ध औंसा पासून एक औंस अथवा दीढ औंस पर्यंत आहे· त्यांत आमोन्ये कार्बोनास किंवा इथर सल्फुरिकस घातलें असतां गुण अधीक होतो· जेव्हां पोटांत वायु अथवा कृमी करून किंवा बालाचे दंतोद्गमें करून· अंग ग्रह आहे· तेव्हां हें मिश्रण पिचा करीत दिल्हें असतां चांगलें आहे· यास्तव अर्ध पैंट हें घ्यावें· आणि उदकाचे ऐवजीं पेज घ्यावी·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
मिस्त्युराकाम्फोरे·	काम्फरमिक्स्त्युर·	कापुराचें मिश्रण·

कापुर·	अर्धड्राम·
रेक्टिफेदस्पिरिट·	दाहा मिनिम·
पाणी·	एक पैंट·

प्रथम कापूर स्पिरिटाशीं खलबत्त्यांत खलावा· नंतर त्यावर थोडें थोडें पाणी घालून चांगलें खलून मग गाळावें·

यांत फार कापूर नाहीं परंतु तें इतर मदकारीचे अनुपानासाठीं फार उत्तम आहे· त्याचें प्रमाण एक औंस अथवा दोन औंस तें प्रमाण तीन तीन घटिकानंतर देतात·

लतीन·	इंग्रेजी·
मिस्त्युराकोर्नुअस्ती·	मिक्स्त्युऑफबर्न्त्हार्त्स्होरन्·

या औषधाचा सिद्ध करण्याचा प्रकार लिहिला आहे· परंतु तें औषध निष्कामाचें आहे· याजकरितां एथे तत्प्रकार लिहिला नाहीं·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
मिस्त्युराक्रीते·	चाकमिक्स्त्युर·	खडीचें मिश्रण·

स्वच्छ खडी·	अर्ध औंस·
खडी साखर·	तीन ड्राम·
बाबळीचे गोंदाचें चूर्ण·	अर्ध औंस·
पाणी·	एक पैंट·

सर्वांचें चांगलें मेलन **करावें**·

हें औषध चांगलें आहे· उत्तम सुस्वाद होण्यासाठीं यांत पुदिन्याचें पाणी अथवा त्यासारिखें दुसरें पाणी घालावें· फार शौच होऊं लागलें असतां अथवा त्या बरोबर कांहीं अम्लिका असतां हें फार श्रेष्ठ आहे· याचें प्रमाण एक औंस अथवा दोन औंस तें तीन तीन घटिका नंतर· अथवा ढाळ झाल्यानंतर द्यावें बहुत करून याला लादनम आणि काथाचें टिंक्स्तुर याशीं मिळवितात·

मेलन प्रकार सांगतो·

खडीचें मिश्रण·	दाहा औंस·
दालचिनीचें टिंक्त्युर·	एक औंस·
काथाचे टिंक्त्युर·	दीढ औंस·
लादनम·	तीस मिनिम·

सर्वांचें मेलन करावें त्याचें प्रमाण एक औंस तें पूर्ववत् द्यावें·

लतीन· इंग्रेजी·

मिस्त्युराफेरीकोम्पोसिटा· **कोम्पौंडमिक्स्तुरओफऐरन्·**

प्राकृत·

कासीसाचें मिश्रितमिश्रण·

बोळाचें चूर्ण·	एक ड्राम·
पोटास्सेसक्कार्बोनास·	पंचवीस ग्रेन·
गुलाबाचें पाणी·	साडेसात औंस·
कासीसाचें चूर्ण·	एक स्कुपल·
जायफलाचा अर्क·	अर्ध औंस·
खडीसाखर·	एक ड्राम·

बोळाचे चूर्णाला जायफळाचा अर्क आणि पोटास्सेसक्कार्बोनास यां बरोबर चांगलें खलावें· नंतर त्यांत प्रथम गुलाबाचें पाणी व साखर या दोहोंना घालून मग कासीसाला घालून पुनः खलावें· चांगलें मेलन झाल्यानंतर त्याला बिलोराचे कुपींत ठेवून तीचें तोंड बळकट बंद करावें·

हें मिश्रण नीट झालें असतां याचा रंग हिरवा आहे· कुपींत ठेविल्या नंतर त्यांतला कांहीं पदार्थ तळास बसला तर कुपी हालवली असतां पुनः तो मिश्रित होतो· हें फार चांगलें रोचक आहे· व बहुत वैद्यांचे मतें लोखंडाचे अन्य सर्व औषधांपेक्षां हें श्रेष्ठ आहे· जर घेतल्या नंतर पोटांत शीतळ वाटतें अथवा मुरडा उत्पन्न होतो· तर याचे सर्व प्रमाणां बरोबर जायफळाचा अर्क एक ड्राम द्यावा· तेणें करून दूर होतो· प्रथम घेतल्या नंतर कांहीं एक वेळेस पोट फुगतें परंतु एक दोन दिवसा नंतर प्रायः असें होत नाहीं· याचें प्रमाण एक औंस किंवा दोन औंस तें दिवसांत दोन वेळ द्यावें

लोखंडाचें औषध देण्याचें अगत्य लागलें असतां हें मिश्रण फार श्रेष्ठ आहे · याला रजस्वला होण्याचा प्रतिबंध झाला असतां अथवा सुवेळेस होत नाहीं तर देतात· तसें वायुगोळ्यावर व इन्फूमेशनाचीं लक्षणें झालीं नसतां क्षयरोगावर देतात· व जसें रोचकामध्यें लोखंडाचे औषधावर लिहिलें आहे· तसें या औषधाला देतात·

लतीन·	**इंग्रेजी**
मिस्त्युराग्युएसी·	**ग्युयकमिक्स्त्युर·**

ग्युयकाचें गम्मरेजिन·	दीढ ड्राम·
खडीसाखर·	दोन ड्राम·
बाबळीचे गोंदाचें पाणी·	दोन ड्राम·
दालचिनीचें पाणी·	दोन ड्राम·

प्रथम ग्युयकाचें गम्मरेजिन साखरे बरोबर खलावें नंतर बाबळीचे गोंदाचे पाण्या बरोबर खलावें· त्या वेळेस दालचिनीचें पाणी थोडें थोडें घालून **मिळवावें·**

ज्या वेळेस केवळ ग्युयकाला द्यावयास इच्छितात· तेव्हां हें मिश्रण उत्तम आहे याचें प्रमाण अर्ध औंसापासून दोन औंसपर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ देतात· बहुतकरून ग्युयकाचा हा प्रकार देत नाहींत·

लतीन·	**इंग्रेजी·**	**प्राकृत·**
मिस्त्युरामोस्की·	**मिक्स्त्युर ओफ मस्क·**	**कस्तूरीचें मिश्रण·**

कस्तूरी·	एक ड्राम·
बाबळीचे गोंदाचें चूर्ण·	एक ड्राम·
खडीसाखर·	एक ड्राम·
गुलाबाचें पाणी·	साहा औंस·

कस्तूरी प्रथम साखरेशीं नंतर गोंदाशीं खलावी· नंतर गुलाबाचें पाणी थोडें थोडें घालून चांगलें मेलन **करावें·**

कस्तूरीचे गुणाप्रमाणें या मिश्रणाचे गुण आहेत· त्याचें प्रमाण दोन औंस तें तीन तीन अथवा चार चार घटिकानंतर देतात·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत
स्पिरिटस·	स्पिरित्स्·	अर्क·

आलकोहोल वसुरेशीं वनस्पतींतल्ये सार पदार्थांचें मेलन यांना व मेलनापासून यंत्रानें पदार्थ काढतात· त्याला अर्क ह्मणतात·

काहीं अर्क मेलनें करून सिद्ध होतात· व काहीं अर्क काहीं दिवसानंतर होतात· काहीं अर्क पदार्थांचें मेलन करून नलिका यंत्रांत घालून त्यामधून काढतात· अर्क स्वच्छ व अक्षय आहेत· त्यांत प्रायः फार सुगंध तेल आहे· आणि नीट झाले असतां त्याना अग्नीच्या काहीं स्वाद व गंध येत नाहीं· अमिश्रित आलकोहोल सुगंध तेलापेक्षां चंचल आहे यामुळें यंत्रामधून त्या बरोबर तेल वर्त्ति येत नाहीं· यास्तव मिश्रित आलकोहोल अथवा प्रुफ स्पिरिट घ्यावयास पाहिजे· अर्कें करून कुस्वाद औषधांचा कुस्वाद आणि कुगंध लुप्त होतो· उह्मासा इत्यादिकांचें निवारण होतें·

लतीन·	इंग्रेजी·
आलकोहोल·	आलकोहोल·

रेक्टिफेद स्पिरिट·	एक गालन·
सब्कार्बोनेट ओफ पोटास्स्·	तीन पौंड·

सब्कार्बोनेट ओफ पोटास्स् एक पौंड घेऊन उष्ण मानाच्या तीनशें कक्षा होत तोंपर्यंत उष्ण करून स्पिरिटामध्यें घालून बहुत वेळ ढवळून साठ घटिकापर्यंत ठेवून वरलें स्पिरिट काढून घ्यावें· नंतर उरलेल्या सब्कार्बोनेट ओफ पोटास्साला पूर्ववत् तीनशें कक्षां पर्यंत उष्ण करून त्या स्पिरिटामध्यें घालावें मग नलिकायंत्रांत घालून तें यंत्र उष्ण पाण्याचे भांड्यांत ठेवून तें· भांडें अग्नीवर ठेवून पाणी उकळावें· अन्य शीत पात्रांत आलकोहोल येतो त्याला कुपींत घालून तीचें तोंड चांगलें बंद करून ठेवावा· पाण्याच्या तुला विशेष १००० असतां आलकोहोलाच्या तुला विशेष· ८१५ असतो·

सब्कार्बोनेट ओफ पोटास्स आणि पाणी यादोहोंचा जो संबंध आहे· त्यातें सांगतो· वायुमध्यें काहीं पाणी आहे तर सब्कार्बोनेटामध्यें शिरतें· हें ही पाण्यामध्यें सहज मिळतें· आलकोहोलामध्यें मिळत नाहीं यास्तव· आलकोहोलांत पाणी असलें तर त्याचे मेलनें करून पृथक् होतें या प्रमाणें रेक्टिफेद स्पिरिटामध्यें त्याचा पहिला विभाग घात· त्यानंतर स्पिरिटाचे दोन भाग होऊन वर्त्ति आलकोहोल पुष्कळ येतो· आणि खालती स-

ब्कार्बोनेट

सब्कार्बोनिट ओफपोटास्स व पाणी हीं मात्र राहातात· मग वरला आलकोहोल घेऊन त्यामध्यें उरलेलें सब्कार्बोनिट ओफपोटास्स घालून आज्ञे प्रमाणें कढवावें· आलकोहोलाचें हीत व कार्य मदकारी औषधांमध्यें लिहिलें आहे· हा औषधें सिद्ध करावयासाठीं फार कामाचा आहे·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसआम्मोन्ये·	**स्पिरिटओफआम्मोन्या·**

प्रुफस्पिरिट·	तीन पेंट·
नवसागर·	चार औंस
सब्कार्बोनिट ओफपोटास्स·	साहा औंस·

सर्वांचें मेलन करून नलिका यंत्रांत घालून तें यंत्र मंदाग्नीवर ठेवून मेलनापासून दीढ पेंट अर्क शीत पात्रांत काढावा·

हा अर्क विशेष रंग रहित स्वच्छ उदका प्रमाणें आहे· याचा स्वाद फार तिखट आहे· व गंधहीं त्या प्रमाणें आहे· बहुत करून इतर औषधांचे सिध्यर्थ कामास येतो·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसआम्मोन्येआरोमाटिकस्·	**आरोमाटिकस्पिरिटओफआम्मोन्या·**

कुटलेली दालचिनी·	दोन ड्राम·
कुटलेल्या लवंगा·	दोन ड्राम·
लिंबूची साल·	चार औंस·
सब्कार्बोनिट ओफपोटास्स·	अर्ध पौंड·
नवसागर·	पांच औंस·
रेक्टिफेदस्पिरिट·	चार पेंट·
पाणी·	एक गाल्लन·

सर्वांचें मेलन करून नलिका यंत्रांत घालून तें यंत्र अग्नीवर ठेवून त्यापासून साहा पेंट अर्क शीत पात्रांत काढावा·

हा अर्क चांगलें उष्ण औषध आहे· येणें करून ग्लानी· तंद्रा व पोटांतला वायु यांचें निवारण चांगलें होतें· याचें प्रमाण अर्धड्रामापासून एक ड्राम पर्यंत तें उदकांत किं-

वा

वा कापुराचे मिश्रणामध्यें द्यावें· हा इथराशीं व इफ्ममसालत्साशीं चांगला मिश्रित होतो· म्हणोन याला ढाळकांचे कषायामध्यें पोटांत वायु व मुरडा यांचे निवारणास्तव घालतात·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसआम्मोन्येफेटिदस·	**फेटिदस्पिरिटओफआम्मोन्या·**

स्पिरिटसआम्मोन्ये·	दोन पैंट·
हिंग·	दोन औंस·

हिंगावर स्पिरिट घालून तीस घटिकापर्यंत ठेवून मग दोहोंना नलिकायंत्रांत घालून तें यंत्र मंदाग्नीवर ठेवावें नंतर त्यां पासून दीढ पैंट अर्क शीत पात्रांत काढावा·

या औषधाला या प्रमाणें सिद्ध करणें कांहीं कामाचें नाहीं असें औषध स्पिरिटस आम्मोन्ये आणि हिंगाचें टिंक्त्युर यांचे मेलनें करून होतें यास्तव· याचें प्रमाण एक ड्राम आहे· बहुत करून वायु गोळ्यावर व तत्सदृश रोगावर देतात·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसआम्मोन्येसक्सीनेटस·	**सक्सीनेटदस्पिरिटओफआम्मोन्या अथवा ओदेलुस्·**

मुस्तकी·	तीन ड्राम·
रेक्टिफेदस्पिरिट·	नौ ड्राम·
ओल्यमलवंड्युले·	चवदा मिनिम·
कहरुबाचें तेल·	चार मिनिम·
लिक्कोरआमोन्ये·	दाहा औंस·

स्पिरिटामध्यें· मुस्तकी घालावी· ती विरघळल्यानंतर वरलें स्वच्छ टिंक्त्युर घेऊन त्यांत अन्य सर्व पदार्थ घालून हालवून त्याचें चांगलें मेलन करावें·

या औषधाचें प्रमाण दाहा मिनिमां पासून अर्धड्राम पर्यंत आहे· तें पाण्यांत किंवा कापुराचे मिश्रणामध्यें देतात· मनुष्याला सर्पानें दंश केला असतां असें प्रमाण अर्ध अर्ध घटिकानीं विषाची लक्षणें दूर होतील तोंपर्यंत द्यावें या कार्यावर त्याचा लौकीक फार आहे·

लतीन

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
स्पिरिटमआनीसी·	स्पिरिटओफआनीसीद·	शोपांचा अर्क·

कुटलेल्या शोपा·	अर्धपौंड·
प्रुफस्पिरिट·	एक गालून·
अग्नीचा स्वाद व गंध न येई इतकें·	पाणी·

सर्व पदार्थ पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवावे नंतर त्यांना नलिका यंत्रांत घालून तें यंत्र मंदाग्नीवर ठेवून त्यां पासून एक गालून अर्क शीत पात्रांत **काढावा·**

हा अर्क उष्ण रोचक आहे· येणें करून पोटांतल्या वायूचें चांगलें निवारण होतें· याचें प्रमाण अर्ध ड्रामा पासून अर्ध औंस पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटस आर्मेरिश्येकोम्पोसिटस·	कोम्पौंडस्पिरिटओफहोर्सरादिश·

साजुक व काप काढलेलें आर्मेरिश्ये रेदिक्स·	एक पौंड·
नारिंगाची शुष्क साल·	एक पौंड·
कुटललें जायफळ·	अर्ध औंस·
प्रुफस्पिरिट·	एक गालून·
अग्नीचा स्वाद व गंध न येई इतकें·	उदक·

सर्व पदार्थ पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवावे· नंतर त्यांना नलिका यंत्रांत घालून तें यंत्र मंदाग्नीवर ठेवून त्यां पासून एक गालून अर्क शीत पात्रांत **काढावा·**

हें औषध कामाचें नाहीं· सांप्रत याला कोणी ही देत नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
स्पिरिटस काम्फोरे·	स्पिरिटओफकाम्फर·	कापुराचा अर्क·

कापूर·	चार औंस·
रेक्टिफेदस्पिरिट·	दोन पैंट·

कापूर विरघळे असें दोहोंचें चांगलें मेलन करावें·

पोटांत द्यावयासाठीं याचें प्रमाण पांच विंदू किंवा वीस विंदू आहे तें दोन तीन औंस पाण्यामध्यें द्यावें· परंतु या प्रमाणें प्रायः देत नाहींत· येणें करून मर्दनादि

बाह्य उपचार करितात· याचें गोडें तेल व इतर पदार्थ यांशीं मेलन करून त्याचें वायु पीडेचे ठिकाणीं मर्दन करितात· व त्याला सडलेल्या स्थलावर ही लावतात·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
स्पिरिटसकार्युई·	स्पिरिटओफकारावे·	ओंव्याचा अर्क·

कुटलेला ओंवा · · · · ·	दीढ पौंड
प्रुफस्पिरिट · · · · ·	एक गाल्लन·
अग्नीचा स्वाद व गंध न येई इतकें · ·	पाणी·

सर्व पदार्थ पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवावे· नंतर त्यांना नलिकायंत्रांत घालून तें यंत्र मंदाग्नीवर ठेवून त्यांपासून एक गाल्लन अर्क थंड पात्रांत काढावा·

याचे गुण शोपांचे अर्काप्रमाणें आहेत· व प्रमाण ही तसेंच आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
स्पिरिटससिन्नामोमी·	स्पिरिटओफसिन्नामन·	दालचिनीचा अर्क·

दालचिनीचें तेल· · · · ·	वजनानें पांच स्क्रुपल·
रेक्टिफेदस्पिरिट · · · ·	साडेचार पैंट·

नलिकायंत्रांत तेल घालून स्पिरिट घालावें· नंतर त्यावर पाणी अर्काला अग्नीचा स्वाद व गंध न येई इतकें घालावें· मग तें यंत्र मंदाग्नीवर ठेवून एक गाल्लन अर्क शीत पात्रांत काढावा·

ग्लानीवर व तत्सादृश अवस्थेवर हा चांगला उष्ण रोचक आहे· येणें करून पोटांतल्या वायूचें निवारण होतें· याचें प्रमाण एक ड्रामापासून चार ड्राम पर्यंत आहे· तें काही अनुपानामध्यें देतात·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसकोलसिसीआम्मोन्येटस·	आमोन्येटेदस्पिरिटओफमेदोसाफ्रन·

मेदोसाफ्रनाचें कुटलेलें बीज· · ·	दोन औंस·
स्पिरिटसआम्मोन्येआरोमाटिकस· · ·	एक पैंट·

दोहोंना पात्रांत घालून चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

हें औषध फार कामाचें नाहीं याचे गुण मेदोसाफ्रनाचे गुणा प्रमाणें आहेत याचें प्रमाण अर्धद्रामापासून एक द्राम पर्यंत तें पाण्यामध्यें देतात·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसजुनिपरीकोम्पोसिटस·	**कोम्पौंडस्पिरिटओफजुनिपर·**

जुनिपराचें कुटलेलें फळ·	एक पौंड·
कुटलेला ओवा·	दीढ औंस·
मधुरिकेचें कुटलेलें बीज·	दीढ औंस·
प्रुफस्पिरिट·	एक गाल्लन·
अर्काला अग्नीचा स्वाद व गंध न येई इतकें·	पाणी·

सर्व पदार्थ पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवावे· नंतर त्याना नलिकायंत्रांत घालून तें यंत्र मंदाग्नीवर ठेवून त्यांपासून एक गाल्लन अर्क शीत पात्रांत **काढावा·**

हा अर्क नम्र द्रावक आहे· परंतु यास्तव एकल्यालाच देत नाहींत· उष्ण आहे म्हणोन उष्मासा व मुरडा यांचें निवारण करावयासाठीं इतर द्रावक औषधांशीं मिळवून देतात· दिजिटेलिसाचे फाराटा बरोबर अथवा· क्रीमरटार्टरा बरोबर दिल्हा असतां फार कामाचा आहे· याचें प्रमाण एक द्रामापासून अर्ध औंस पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटस्लवंडुले·	**स्पिरिटओफलवंडर्**

लवंडाचीं साजुक पुष्पें·	दोन पौंड·
रेक्टिफेद्स्पिरिट·	एक गाल्लन·
अर्काला अग्नीचा स्वाद व गंध न येई इतकें·	पाणी·

सर्व पदार्थ पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवावे· नंतर त्याना नलिकायंत्रांत घालून तें यंत्र मंदाग्नीवर ठेवून त्यांपासून एक गाल्लन अर्क अन्य शीत पात्रांत **काढावा·**

प्रायः याला अन्य औषधांत सुगंध यावयासाठीं घालतात·

लतीन·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसलवंड्युलेकोम्पोसिटस्·	कोम्पौंडस्पिरिटओफलवंडर्·

स्पिरिटस्लवंड्युले·	तीनपेंट·
स्पिरिटस्रोस्मारिनी·	एकपेंट·
कुटलेली दालचिनी·	अर्धऔंस·
कुटलेलें जायफळ·	अर्धऔंस·
कापलेलें रक्त चंदनाचें काष्ठ·	एक औंस·

सर्वपदार्थ पात्रांत घालून वर ढांपण ठेवून चवदा दिवस पर्यंत ठेवावे· नंतर गाळावे·

कोणी मूर्छित पडला व कोणाला ग्लानि किंवा· तंद्रा अथवा· कोणाचे पोटांत वायु किंवा मुरडा आहे· तर सर्वांचा परिहार करावयास हा अर्क चांगला आहे· याचें प्रमाण अर्धड्रामापासून दोन ड्राम पर्यंत आहे· याला पूर्व कार्यासाठीं रेचकाचे फाराटाशीं मिळवून देतात·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
स्पिरिटस्मेंथेपिपरीटे·	स्पिरिटओफपेपरमिंट·	पुदिन्याचा अर्क·

पुदिन्याचें तेल·	वजनानें साडेसाहा स्क्रुपल·
रेक्टिफेद स्पिरिट·	साडेचारपेंट·

नलिका यंत्रांत तेल घालून स्पिरिट घालावें· मग त्यावर अर्क काढल्या नंतर त्याला अग्नीचा स्वाद व गंध न येई इतकें पाणी घालावें· नंतर तें यंत्र मंदाग्नीवर ठेवून एक गालन अर्क थंड पात्रांत काढावा·

या अर्कें करून मुरडा आणि पोटांतला वायु यांचें निवारण होतें· व याला त्यांचे निवारणासाठीं ढाळक औषधाशीं मिळवून ही देतात· याचें प्रमाण अर्धड्रामापासून चारड्राम पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसमेंथेविरिदिस·	स्पिरिटओफस्पिर्मिंट·

स्पिर्मिंटाचें तेल·	वजनानें साडेसाहास्क्रुपल·
रेक्टिफेदस्पिरिट·	साडेचार पेंट·

पुदिन्याचे अर्काप्रमाणें कृति करून थंड पात्रांत एक गालन अर्क काढावा·

याचे गुण पुदिन्याचे अर्का प्रमाणें आहेत· व प्रमाणही तसेंच आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
स्पिरिटसमिरिस्तिसे·	स्पिरिटओफनत्मेग·	जायफळाचा अर्क·

कुटलेलें जायफळ · · · ·	·दोन औंस·
प्रुफस्पिरिट· · · · ·	·एक गालन·
अर्काला अग्नीचा स्वाद व गंध न येई इतकें·	·पाणी·

सर्व पदार्थ पात्रांत घालून साठ घटिका पर्यंत ठेवावे· नंतर त्यांना नलिकायंत्रांत घालून तें यंत्र मंदाग्नीवर ठेवून त्यां पासून शीत पात्रांत एक गालन अर्क काढावा·

याचे गुण पुदिन्याचे अर्का प्रमाणें आहेत· व प्रमाणही तसेंच आहे·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसपीमेंटे·	स्पिरिट·

पीमेंटाचे कुटलेलें फळ · · · ·	·दोन औंस·
प्रुफस्पिरिट· · · · ·	·एक गालन·
अर्काला अग्नीचा स्वाद व गंध न येई इतकें	पाणी·

जशी जायफळाचा अर्क काढावयाची कृती लिहिली आहे· तशी कृती करून अर्क **काढावा**·

याचें प्रमाण व गुण त्या प्रमाणें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसप्युलिजीई·	स्पिरिटओफपेनेरोयल·

ओल्यमप्युलिजीई · · ·	·वजनानें सात स्कुपल·
रेक्टिफैदस्पिरिट· · · ·	·साडेचारपैंट·

नलिका यंत्रांत तेल घालून स्पिरिट घालावें मग त्यावर अर्क काढल्यानंतर त्याला अग्नीचा स्वाद व गंध न येई इतकें पाणी घालावें· नंतर तें यंत्र मंदाग्नीवर ठेवून त्यापासून एक गालन अर्क थंड पात्रांत **काढावा**·

याचे गुण पुदिन्याचे अर्का प्रमाणें आहेत· व प्रमाण ही त्या प्रमाणें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसरोस्मारीनी·	स्पिरिटओफरोस्मेरे·

ओल्यमरोस्मारीनी·	वजनानें एक औंस·
रेक्टिफैदस्पिरिट·	एक गाल्लन·

पेन्नेरोयलाचे अर्का प्रमाणें कृती करून एक गाल्लन अर्क शीत पात्रांत काढावा·

हा अर्क अन्य औषधास सुगंध आणावयासाठी मात्र कामास येतो· जाला हंगरीवाटर ह्मणतात· तें स्पिरिटस् लवंड्युले आणि स्पिरिटस् रोस्मारीनी या दोहोंचे मेलन आहे· स्पिरिटस् रोस्मारीनी ओदे कोलोनामध्यें ही आहे·

रेक्टिफैद स्पिरिटें करून सिद्ध झाले त्या अर्कांचा अनुक्रम·

स्पिरिटसआम्मोन्येआरोमाटिकस्·
कापुराचा अर्क·
दालचिनीचा अर्क·
स्पिरिटस् लवंड्युले·
स्पिरिटसरोस्मारीनी·

प्रुफस्पिरिटें करून सिद्ध झाले त्या अर्कांचा अनुक्रम·

स्पिरिटस आम्मोन्ये·
शोपांचा अर्क·
स्पिरिटसआर्मोरिश्ये कोम्पोसिटस·
ओंव्याचा अर्क·
स्पिरिटस् जुनिपरी कोम्पोसिटस·
पुदिन्याचा अर्क·
स्पिरिटसमेंथेविरिदिस·
जायफळाचा अर्क·
स्पिरिटसपीमेंटे·
स्पिरिटसप्युलिजीई·

* * *

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्चुरे·	टिंक्चुर्स·

वनस्पतींतल्या सार पदार्थ तसे श्वापदांचे आंगांतले पदार्थ गुल्या आलकोहोलांत व प्रुफस्पिरिटामध्यें घालून वितळून त्यांशीं मिश्रित होऊन जे पदार्थ सिद्ध होतात त्यांस हें नाम ठेवितात. वनस्पतींतलें गोंद राळ साखर कापूर सुगंध तेल व [illegible] इत्यादिक पदार्थ आलकोहोलांत वितळतात. यांमधून काहीं पदार्थ प्रुफस्पिरिटामध्यें ही वितळतात. व गम्फरेजिनयामध्येंच वितळतें. श्वापदाचे आंगांतल्या पदार्थांचीं टिंक्चुरें फार नाहींत. व त्यांचे गुण ही वनस्पतींचे टिंक्चुरां प्रमाणें आहेत. राळ एकल्या आलकोहोला वांचून वितळत नाहीं यास्तव ती वितळावयासाठीं आलकोहोलच घेतला पाहिजे. इतर पदार्थां विषयीं बहुत करून प्रुफस्पिरिट चांगलें आहे. आलकोहोलांत राळ कापूर व सुगंध तेलें यांचें टिंक्चुर करून त्याशीं पाणी मिळवलें असतां हे पदार्थ तळास बसतात. प्रुफस्पिरिटांत यांचें टिंक्चुर करून त्याशीं मिळवलें असतां प्रायः काहीं अपूर्व होत नाहीं पहिल्या प्रमाणेंच राहातें. टिंक्चुरें बहुत दिवस पर्यंत ठेविलीं असतां फाराट आणि पाचन या प्रमाणें वाईट होत नाहींत त्यांच्या पात्राचें तोंड चांगलें बंद केलें तर बहुत वर्षे प्रथम दिवसा प्रमाणें राहातात. टिंक्चुर सिद्ध करावयाची कृती सांगतो. शुष्क पदार्थ घेऊन त्यांचें चूर्ण करून त्याला मोठ्या कुपींत घालून वर आलकोहोल किंवा प्रुफस्पिरिट घालून तीचें तोंड चांगलें बंद करावें आणि तिला प्रतिदिवशीं तीन चार वेळ हालवीत जावें. त्याचे सिद्ध होण्याचे दिवस पूर्ण झाल्यानंतर कागदामध्यें गाळून अन्य कुपींत घालून तिचें तोंड चांगलें बंद करून ठेवावें. सर्व टिंक्चुरें कुपींत घालून तीचें तोंड चांगलें बंद करून तिला फार वेळ हालवून सिद्ध करावीं.

लतीन	इंग्रजी	प्राकृत
टिंक्चुरा आलोएस	टिंक्चुर ऑफ आलोस	एळयाबोळाचें टिंक्चुर

एळयाचें चूर्ण	अर्ध औंस
जेष्टीमधाचा रांधा	दीड औंस
पाणी	एक पैंट
रेक्टिफैड स्पिरिट	चार औंस

सर्वांना चवदा दिवस पर्यंत कुपींत ठेवून मग गाळावें.

बहुत करून या टिंक्चुरापेक्षां एळयाचें मिश्रित पाचन चांगलें आहे. याचें प्रमाण दोन ड्राम पासून एक औंस पर्यंत आहे. याला सुगंध औषधांशीं किंवा इतर [illegible]-

शी

शीं मिळवून देतात·

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्तुराआलोएस कोम्पोसिटा·	कोम्पौंड टिंक्तुर ओफ आलोएस·

प्राकृत·
एळ्या बोळाचें मिश्रित टिंक्तुर·

एळ्याचें चूर्ण	तीन औंस·
केशर	तीन औंस·
बोळाचें टिंक्तुर	दोन पैंट·

सर्वांना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

ज्या ज्या कार्यांवर एळ्या बोळ चांगला त्या त्या कार्यांवर हें टिंक्तुर चांगलें आहे· रजस्वला होण्यासाठीं लोखंडाचे औषधा बरोबर विशेष चांगलें आहे· याचें प्रमाण एक ड्राम अथवा दोन ड्राम आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
टिंक्तुराआस्साफेटिदे·	टिंक्तुर ओफ आस्साफेटिदा·	हिंगाचें टिंक्तुर·

हिंग	चार औंस·
रेक्टिफेद स्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत कुपींत ठेवून मग गाळावें·

याचे गुण हिंगाचे गुणां प्रमाणें आहेत· प्रमाण एक ड्राम आहे· याचें पाण्याशीं मेलन केलें असतां तें मेलन पांढरें होतें·

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्तुरा आरान्सीई·	टिंक्तुर ओफ ओरंजंपील·

प्राकृत·
नारिंगाचे सालीचें टिंक्तुर·

नारिंगाची भाजुक साल	तीन औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

याचें रोचकाचे स्वादाशीं आणि पाचनाशीं मेळन चांगलें आहे· तेणें करून रोचक गुण अधीक होतो· आणि सुगंधाचा ही अधिकपणा होतो.

लतीन· इंग्रेजी·

टिंक्चुराबेंजोयनीकोंपोसिटा· कोम्पौंडटिंक्चुरओफबेंजोइन·

प्राकृत·

उदाचें मिश्रित टिंक्चुर·

ऊद·	तीन औंस·
स्तोरकसबाल्सम·	दोन औंस·
टोलुबाल्सम·	एक औंस·
एळ्याबोळ·	अर्ध औंस·
रेक्टिफैदस्पिरिट·	दोन पैंट.

सर्वांना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

याला काहीं एक वेळेस फ्रैयर्सबाल्सम ह्मणतात· याला व्रणावर व जखमेवर लावतात·

लतीन· इंग्रेजी·

टिंक्चुराकालंबे· टिंक्चुरओफकालंबा·

कालंबाचे मूळाचे काप·	अडीच औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

हें टिंक्चुर चांगलें कडुरोचक आहे· याचें प्रमाण तीन किंवा चार ड्राम तें उदकांत देतांत· यांत लोखंडाचें औषध घातलें असतां त्याचा रंग कमी होत नाहीं·

लतीन·	इंग्रेजी·
टिक्त्युराकाम्फोरेकोम्पोसिटा·	कम्पौंड टिंक्त्युर ओफ काम्फर किंवा पारिगोरिक् एलिक्सिर

प्राकृत·

कापुराचें मिश्रित टिंक्त्युर·

कापूर·	दोन स्क्रुपल·
अफूचें चूर्ण·	एक ड्राम·
उदाचे फुल·	एक ड्राम·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

सर्वांना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

पडशावर व ढासेवर व कांहीं इन्फ्लमेशन नसतां दम्यावर हें औषध उत्तम आहे· याचें प्रमाण एक ड्रामापासून तीन ड्राम पर्यंत तें रात्रीस द्यावें· तेणें करून ढासेचा न्यूनपणा होतो·

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्त्युरा कांथारिदिस·	टिंक्त्युरओफस्पानिषफ्लैस·

कांथारिदिसाचें चूर्ण·	तीन ड्राम·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें

पोटांत घेऊन याचे गुण होतात· ते द्रावकामध्यें लिहिले आहेत· बाहेर लेपन करण्याविषयीं चांगलें लोहित कर आहे· तेणें करून वायूची पीडा न्यून होते·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
टिंक्त्युरा कापसिसी·	टिंक्त्युर ओफ कापसिकम·	लालमिर्चीचें टिंक्त्युर·

लालमिर्ची·	एक औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें

अजीर्ण वगैरे पोटांत फार वायु झाला असतां हें टिंक्त्युर उत्तम आहे· याकरितां याचें प्रमाण दाहा बिंदूपासून अर्ध ड्राम पर्यंत आहे· दोन ड्राम या औषधाचें आठ औं-

स

सपेज किंवा तितकें उदक याशीं मेलन केलें असतां तें गुळण्यासाठीं फार उत्तम आहे· गळ्यांत उपदंशावांचून आपल्ये आपण व्रण झाला असतां विशेष चांगलें आहे·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
टिंक्चुराकार्दामोमी·	टिंक्चुर ओफ कार्दामम·	वेलदोड्यांचें टिंक्चुर·

कुटलेलें वेलदोड्याचें दाणे	तीन औंस·
प्रुफस्पिरिट	दोन पैंट·

दोन पदार्थ चवदा दिवस पर्यंत कुपींत ठेवून मग गाळावे·

हें टिंक्चुर उष्ण रोचक आहे याला हाळकांत किंवा कडु रोचकाचे फांटांत घालून देतात· तेणें करून मुरडा आणि पोटांतला वायु यांचें निवारण होतें याचें प्रमाण एकड्राम किंवा दोनड्राम आहे·

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्चुराकार्दामोमीकोम्पोसिटा·	कोम्पोंडटिंक्चुर ओफकार्दामम्·

प्राकृत·

वेलदोड्यांचें मिश्रित टिंक्चुर·

वेलदोड्यांचे कुटलेले दाणे·	दोन ड्राम·
कुटलेला ओंवा	दोन ड्राम·
कुटलेली दालचिनी	अर्ध औंस·
कुटलेलें किर्मिज·	दोन ड्राम·
बेदाणा·	चार औंस·
प्रुफस्पिरिट	दोन पैंट·

सर्वांना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

या टिंक्चुराचा गुण व प्रमाण वेलदोड्यांचे अमिश्रित टिंक्चुरा प्रमाणें आहे· व याचा रंग त्यापेक्षां उत्तम आहे·

लतीन	इंग्रेजी
टिंक्चुरा कास्कारिल्ले	टिंक्चुर ओफ कास्कारिल्ला

कास्कारिल्याचे साली चें चूर्ण	चार औंस
प्रुफ स्पिरिट	दोन पैंट

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

हें टिंक्चुर निःकामाचें आहे यास्तव कधींही देत नाहींत·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
टिंक्चुरा कास्तोर्यै	टिंक्चुर ओफ कास्तर	जुदीबेदस्तराचें टिंक्चुर

जुदीबेदस्तराचें चूर्ण	दोन औंस
रेक्टिफेद स्पिरिट	दोन पैंट

दोहोंना सात दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

याचे गुण जुदीबेदस्तरा प्रमाणें आहेत· प्रमाण अर्ध ड्रामा पासून दोन ड्राम पर्यंत आहे·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
टिंक्चुरा काटेक्यु	टिंक्चुर आफ काटेक्यु	काथाचें टिंक्चुर

काथाचा रांधा	तीन औंस
कुटलेली दालचिनी	दोन औंस
प्रुफ स्पिरिट	दोन पैंट

सर्वांना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

हें टिंक्चुर फार उत्तम कोष्ठबधक आहे· याला बहुत करून खडीचे मिश्रणाशीं मिळवून देतात ज्या समयीं फार विकृती न होतां बहुत शौच होतात तेव्हां दिवसांत दोन वेळ एक ड्राम किंवा दोन ड्राम हें औषध कडू रोचकाचे फांटामध्यें किंवा पोर्तवैनामध्यें दिल्हें असतां चांगलें आहे

लतीन	इंग्रजी
टिंक्चुरा सिंकोने	टिंक्चुर ओफ बार्क

सिंकोने लान्सिफोल्ये कोर्टिकसाचें चूर्ण	सात औंस
प्रुफस्पिरिट	दोन पैंट

दोहोंना चवदा दिवसपर्यंत ठेवून मग गाळावें

एक द्राम किंवा दोन द्राम हें औषध दोन औंस फाणटात किंवा तिक्तक्या पाचनांत घालतात तेणें करून त्याचें हीत अधीक होतें

लतीन	इंग्रजी
टिंक्चुरा सिंकोने आम्मोन्येटा	आम्मोन्येटेड टिंक्चुर ओफ बार्क

सिंकोने लान्सिफोल्ये कोर्टिकसाचें चूर्ण	चार औंस
स्पिरिटस आम्मोन्ये आरोमाटिकस	दोन पैंट

दोहोंना दाहा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें

हें टिंक्चुर फार कामाचें नाहीं याचें प्रमाण एक किंवा दोन द्राम आहे

लतीन	इंग्रजी
टिंक्चुरा सिंकोने कोम्पोसिटा	कोम्पौंड टिंक्चुर ओफ बार्क

सिंकोने लान्सिफोल्ये कोर्टिसाचें चूर्ण	दोन औंस
नारिंगाची शुष्क साल	दीड औंस
कुटलेलें सेर्पन्टेर्येरेडिक्स	तीन द्राम
केशर	एक द्राम
किर्मिजाचें चूर्ण	दोन स्क्रुपल
प्रुफ स्पिरिट	वीस औंस

सर्वांना चवदा दिवसपर्यंत ठेवून मग गाळावें

या टिंक्चुराचा स्वाद आणि गंध वरल्या दोन टिंक्चुरांपेक्षा चांगला आहे त्याचें प्रमाण एका द्रामापासून तीन द्रामपर्यंत आहे

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
टिंक्त्युरासिन्नामोमी·	टिंक्चुरओफसिन्नामन·	दालचिनीचें टिंक्चुर·

कुटलेली दालचिनी·	तीन औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

हें टिंक्चुर फार चांगलें उष्ण रोचक आहे· व रोचक आणि कोष्ठबधक यांस फार अनुकूल आहे· प्रमाण एक ड्राम पासून तीन ड्राम पर्यंत आहे·

लतीन	इंग्रेजी
टिंक्त्युरासिन्नामोमीकोम्पोसिटा·	कोम्पोंद टिंक्चुर ओफ सिन्नमन·

प्राकृत·

दालचिनीचें मिश्रित टिंक्चुर·

कुटलेली दालचिनी·	सहा ड्राम·
वेलदोड्यांचे कुटलेले दाणे·	तीन ड्राम·
मिऱ्यांचें चूर्ण·	दोन ड्राम·
सुंठीचे काप·	दोन ड्राम·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

सर्वांना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

हें टिंक्चुर दालचिनीचें अमिश्रित टिंक्चुरापेक्षां उष्ण आहे· याचें प्रमाण एक ड्राम किंवा दोन ड्राम आहे·

लतीन	इंग्रेजी
टिंक्त्युरादिजिटेलिस·	टिंक्चुरओफफोक्सग्लोव·

दिजिटेलिसाचीं शुष्कपर्णें	चार औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

याचे गुण दीपकामध्यें लिहिले आहेत· त्याचें प्रमाण दाहा मिनिम तें दिवसांत दोनवेळ द्यावें आणि अनुभवाप्रमाणें हळु हळु अधीक करावें· त्याचीं चांगलीं अनुपानें

बहुत

वहुत आहेत त्यांतें मांगतों वहुत पाचनें फाराट टिंक्स्युर सोलेनमिकस्च्युर काफूर मिक्स्युर वइतर

लतीन	इंग्रेजी
टिंक्त्युराजिनश्येनकाम्पोसिटा	कांस्पोंडटिंक्स्युरऑफजिनश्यन
जिनश्यनाचे मुळाचे काप	दोन औंस
नारिंगाची शुष्क साल	एक औंस
वेलदोड्यांचे कुटलेले दाणे	अर्ध औंस
प्रुफस्पिरिट	दोन पैंट

सर्वांना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें

हें टिंक्त्युर फार उत्तम कडु रोचक आहे याचें प्रमाण एक ड्राम किंवा दोन ड्राम आहे हें औषध सर्व आम्लिदोस चांगलें अनुकूळ आहे

लतीन	इंग्रेजी
टिंक्त्युराग्युयसी	टिंक्स्युरऑफग्युयक
ग्युयकाचें चूर्ण	अर्धपौंड
रेक्टिफेकटस्पिरिट	दोन पैंट

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें

ग्युयकाचे गुण स्वेदकारी औषधामध्यें लिहिले आहेत त्याचें टिंक्स्युर द्यावयास इच्छितात तर प्रथम त्याला म्युसिलेजाशीं किंवा अंड्यांतले लालपदार्थाशीं मिळवून मग पाण्याशी मिळवून द्यावें तेणें करून ग्युयक तळास बसत नाहीं असें न मिळवलें तर तळास जाऊन बसते याचें प्रमाण एक ड्राम किंवा दोन ड्राम आहे

लतीन	इंग्रेजी
टिंक्त्युराग्युयसी आम्मोन्येटा	आम्मोन्यटेडटिंक्स्युरऑफग्युयक
ग्युयकाचें चूर्ण	चार औंस
स्पिरिटस आम्मोन्ये आरोमाटिकस	दोड पैंट

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें

याचें प्रमाण एक ड्राम किंवा दोन ड्राम आहे· याचें वरल्या टिंक्चुरा प्रमाणें पाण्याशी मेळन करावें हें वायुवर उत्तम आहे· खेदकारी औषधा बरोबर दिल्हें असतां विशेष चांगलें आहे· बहुतकरून याला वार्कोशी मिळवून देतात·

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्चुराहेलेबोरीनिग्री·	टिंक्चुरऑफब्लाकहेलबोर·

प्राकृत·

काळीकुटकीचें टिंक्चुर·

काळीकुटकीचे काप·	चार औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

येणें करून रेच होतात· यास्तव रजस्वला होण्यासाठीं देतात· परंतु हें चांगलें औषध नाहीं याचे गुण निश्चयें करून होतात असें नाहीं· याचें प्रमाण चाळीस बिंदू पासून एक ड्राम पर्यंत आहे सांप्रत काळीं याला प्रायः देत नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्चुराह्युमली·	टिंक्चुरओफहोप्स·

होप्स·	पांच औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

हें टिंक्चुर निकामाचें आहे गुण निश्चित होत नाहींत यास्तव·

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्चुराहेओस्यामि·	टिंक्चुरओफहेन्बेन·

हेन्बेनाची शुष्कपर्णें·	चार औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

हें टिंक्चुर लाउडनमाचा चांगला प्रतिनिधि आहे· याचें प्रमाण एक ड्राम आहे·

येणें करून काहीं कफाचें छळ होत नाहीं व पोट ही फुगत नाहीं मनुष्याला जर रेच होत असतां या औषधाला द्यावयास इच्छितात तर त्या[illegible]मानें दोहा बिंदूशी मिळवून द्यावें असें न दिल्हें तर रेचां बरोबर त्वरित बाहेर निघून त्याचे गुण काहीं होत नाहींत

लतीन·	इंग्रजी·
टिंक्तुराजालेपे·	टिंक्तुर ऑफ जालप·
जालपाचें चूर्ण·	आठ औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

एक ड्राम किंवा दोन ड्राम हें टिंक्तुर अन्य ढाळकांशीं मिळवून देतात· तेणें करून याचा ढाळक गुण अधीक होतो· परंतु येणें करून काहीं एक वेळेस मुरडा होतो·

लतीन·	इंग्रजी·
टिंक्तुराकैनो·	टिंक्तुर ऑफ कैनो·
कैनोचें चूर्ण·	तीन औंस·
रेक्तिफैद स्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

याचे गुण काथाचे टिंक्तुराचे गुणांप्रमाणें आहेत परंतु तितके चांगले नाहींत· याचें प्रमाण· एक ड्राम किंवा दोन ड्राम आहे·

लतीन·	इंग्रजी·	प्राकृत·
टिंक्तुरा मिर्रे·	टिंक्तुर ऑफ मिर्र·	बोळाचें टिंक्तुर·
बोळाचें चूर्ण·		चार औंस·
रेक्तिफैद स्पिरिट·		तीन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

बहुत करून हें टिंक्तुर पोटांत द्यावयाचें नाहीं· गुळण्याचे औषधामध्यें घालतात· तेणें करून त्याचा गुण अधिक होतो· एक औंस अथवा दोन औंस हें टिंक्तुर त्या औषधाचे एक पैंटांत किंवा दोन पैंटांत घालतात· हें बहुत दिवसांचे व्रणावर

लावण्यासाठीं

त्याशी रक्तासाठीं फार कामाचें आहे

लतीन	इंग्रजी	प्राकृत
टिंक्चुरा ओपीई	टिंक्चुर ऑफ ओपियम किंवा लादनम	अफूचें टिंक्चुर

अफूचे चूर्ण	अडीच औंस
प्रुफस्पिरिट	दोन पैंट

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें

हें टिंक्चुर अफूच्या औषधांमध्यें फार चांगलें आहे. ज्या समयीं अफूचें अगत्य लागतें तेव्हां हें फार उत्तम आहे व अफूचे मोठें प्रमाणें करून त्वरेनें गुण करावयास इच्छितात किंवा अफूचें फार लाहान प्रमाण अल्पावधिनें द्यावयास इच्छितात. तेव्हां विशेष चांगलें आहे. बहुत करून याचें प्रमाण दाहा मिनिमा पासून एक ड्राम पर्यंत आहे परंतु काहीं एक रोगावर याचें फार मोठें प्रमाण द्यावयास पाहिजे तो रोग धनुर्वायु याचर मनुष्याला एक्या दिवसांत साडे पाच औंस औषध दिल्हें होतें. सर्व आसिडें करून याचे गुण अधिक सुखकारक होतात. व चर्मावर याचें मर्दन केलें असतां काहीं मदकारी गुण होतात. व हा उपचार काहीं रोगावर चांगला आहे. त्याचें सिर्काशीं मेळन करून मर्दन केलें असतां हीन अधीक होतें

लतीन	इंग्रजी	प्राकृत
टिंक्चुरा रेई	टिंक्चुर ऑफ रुबर्ब	रेवाचिनीचें टिंक्चुर

कांपलेली रेवाचिनी	दोन औंस
वेलदोड्याचे कुटलेले दाणे	अर्ध औंस
केशर	दोन ड्राम
प्रुफस्पिरिट	दोन पैंट

सर्वांना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें

हें टिंक्चुर एक ड्राम किंवा दोन ड्राम कडु रेचकाशीं किंवा सुगंध रेचकाशीं मिळवलें असतां फार चांगलें आहे. येणें करून त्याचे हीन अधीक होतें. अर्ध औंस हें टिंक्चुर एक औंस पुदिन्याचें पाणी यांत मेळन नम्र उष्णदाळक आहे. व हें दाळक काहीं एक वेळेस फार श्रेष्ठ आहे. मनुष्याचे पोटांत फार वायु झाल्या असतां विशेष चांगलें आहे

लतीन

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्तुरारेई कांम्पोसिटा	कोम्पौंड टिंक्तुर आफ रूबर्ब

प्राकृत

रेवाचिनीचें मिश्रित टिंक्तुर·

कापलेली रेवाचिनी	दोन औंस
जेष्टमधीचें मूळाचे काप	अर्ध औंस
सुंठीचे काप	दोन ड्राम
केशर·	दोन ड्राम·
प्रुफस्पिरिट·	एक पैंट
पाणी	बारा औंस·

सर्वांना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

याचे गुण वरल्या टिंक्तुराचे गुणा प्रमाणें आहेत· दाळकास्तव· याचें प्रमाण साहा ड्राम व रेचकास्तव एक ड्रामा पासून तीन ड्राम पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्तुरासिल्ले·	टिंक्तुर ओफ स्क्विल्स·
स्क्विलाचें मूळ·	चार औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

या टिंक्तुराचे तीस मिनिमामध्यें एक ग्रेन स्क्विल आहे· स्क्विलाचे गुण सांगितले याचे गुण आहेत· बदामाचें मिश्रण ओशकाचें मिश्रण व म्युसिलेज इत्यादिक औषधें यांची चांगली अनुपानें आहेत· फार दिवस स्वरभेद झाला तर उदकामध्यें या टिंक्तुराचे तीन बिंदू रात्रीस आणि पहांटेस दिल्हे असतां उत्तम आहे· तेणेंकरून कांहीं एक वेळेस त्यास गुण होतो·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
टिंकृत्युरासेन्ने·	टिंकृत्युरओफसेन्न·	सोनामुखीचें टिंकृत्युर·

सोनामुखीचीं पर्णे·	तीन औंस·
कुटलेला ओवा·	तीन ड्राम·
वेलदोड्याचे कुटलेले दाणे	एक ड्राम·
बेदाणा·	चार औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पेंट·

सर्वांना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

हें टिंकृत्युर एक ड्राम किंवा दोन ड्राम अन्य द्रावकाशीं मिळवलें असतां उत्तम आहे· येणें करून त्याचे गुण अधिक होतात· अर्ध औंस· अथवा एक औंस हें टिंक्चुर व सुगंधोदक याचें मेलन चांगलें उष्ण रेचक आहे· सोनामुखीचे पाचना प्रमाणें येणें करून रेचझाल्या पूर्वी उल्हासा होतो· ज्या मनुष्याला सुरा पानाची संवय आहे· त्याणें फार पान केल्या नंतर पोट फुगलें असतां हें टिंकृत्युर चांगलें रेचक आहे·

लतीन·	इंग्रेजी·
टिंकृत्युरासेर्पन्तेरये·	टिंकृत्युरओफविर्जिन्यिन्स्नेकरूट·

सेर्पन्तेरयाचें मूळ·	तीन औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पेंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

एक ड्राम किंवा दोन ड्राम हें टिंक्चुर दोन औंस बार्कीचे पाचनामध्यें घातलें असतां याचे योगें करून त्याचे गुण अधिक होतात· याला एकल्याला द्यावयास इच्छितात तर एक ड्राम किंवा दोन ड्राम द्यावें

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्चुरावालीर्येने·	टिंक्चुरओफवालीर्यन·

वालीर्यनाचें मूळ·	चार औंस·
प्रुफस्पिरिट·	दोन पेंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

वालीर्यनाचे गुणां प्रमाणें या टिंक्तुराचे गुण आहेत· प्रमाण एक ड्राम किंवा दोन ड्राम आहे·

लतीन·	इंग्रेजी·
टिंक्तुरावालीर्यनेआम्मोन्येटा·	आम्मोन्येटदटिंक्तुरओफवालीर्यन·

वालीर्यनाचें मूळ·	चार औंस·
स्पिरिटसआम्मोन्येआरोमाटिकस·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

वरल्या टिंक्तुरापेक्षां हें टिंक्तुर बलवंत आहे· याचें प्रमाण व गुण त्या सारिखे आहेत· याचें अनुपान दुग्ध· पेज· वइतर आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
टिंक्तुराजिंजिबरिस·	टिंक्तुरओफजिंजर·	सुंठीचें टिंक्तुर·

सुंठीचे काप·	दोन औंस·
रेक्टिफ़ैदस्पिरिट·	दोन पैंट·

दोहोंना चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

हें टिंक्तुर फार चांगलें-उष्ण रोचक आहे· येणें करून पोटांत वायु आणि मुरडा यांचें निवारण होतें· ह्मणोन याला टाळकाशीं मिळवून देतात याचें प्रमाण एक ड्रामापासून तीन ड्राम पर्यंत आहे·

टिंक्तुरांचा अनुक्रम·

रक्टिफैदस्पिरिटें करून सिद्ध झालेल्यांचा·

टिंक्तुरा आलोएस·
टिंक्तुरा आस्साफेटिदे·
टिंक्तुरा बेंझोयनी कांम्पोसिटा·
टिंक्तुरा कास्तोरेई·
टिंक्तुरा फेरीम्युर्याटिस·

प्रुफस्पिरिटें करून सिद्ध झालेल्यांचा·

टिंक्तुरा आरांशीई·
टिंक्तुरा कालम्बे·
टिंक्तुरा काम्फोरेकोम्पासिटा·
टिंक्तुरा काझिसि·
टिंक्तुरा कार्दामोमी·

टिंक्तुरान्युयनी
टिंक्तुरामिर्र
टिंक्तुराजिंजिबरीस

टिंक्तुराकार्डामोमीकोम्पोसिटा
टिंक्तुराकास्कारिल्ले
टिंक्तुराकाटेचु
टिंक्तुरालकोनि
टिंक्तुरासिन्नामोमी
टिंक्तुरासिन्नामोमीकोम्पोसिटा
टिंक्तुरादिजिटेलिस
टिंक्तुराजेनश्येनेकोम्पोसिटा
टिंक्तुराहेलेबोरीनिग्रा
टिंक्तुराहुम्युली
टिंक्तुराहयोस्यामि
टिंक्तुराजालापे
टिंक्तुराकेनो
टिंक्तुरालिट्टे
टिंक्तुराओपीई
टिंक्तुरारेई
टिंक्तुरारेईकोम्पोसिटा
टिंक्तुरास्किल्ले
टिंक्तुरासेन्ने
टिंक्तुरासेर्पन्तेरीई
टिंक्तुरावालीर्येनी

* * *

लतीन
एथेर्या

इंग्रेजी
प्रीपारेशन्स आफ एथर

आसीद आणि आलकोहोल यांचे मेलना पासून किया विशेषेंकरून जे पदार्थ उत्पन्न होतात त्या पदार्थांचें नाम ईथर्स आहे या सर्वांचे काही गुण समान आहेत परंतु भिन्न भिन्न आसीदा प्रमाणें काही वेगळे वेगळे गुण होतात ही सर्व फार चपल आहेत

यास्तव· याना कुपींत घालून तिचें तोंड चांगलें बंद करून ठेवावें·

लतीन·	इंग्रेजी
इथर्सल्फ्युरिकस·	सल्फ्युरिकइथर्·
रेक्टिफेदस्पिरिट·	वजनानें दीढ पौंड·
सल्फ्युरिक्आसीद·	वजनानें दीढ पौंड·

रेक्टिफेद्स्पिरिटाला बिलोराचे रिटोर्टींत घालून त्यावर थोडें थोडें आसीद घालून दोहोंचें चांगलें मेलन होई तों पर्यंत हालवावें परंतु त्याचा उष्णपणा-उष्ण मानाचा १२० कक्षांपेक्षां अधीक होऊं देऊं नये· मग पात्रांत वाळू घालून तिला उष्णमानाचा दोनशें कक्षांपर्यंत उष्ण करून तीमध्यें तें रिटोर्ट अर्धें पुरावें नंतर त्यांतला पदार्थ त्वरेनें उकळून इथर वर्त्तीयेऊन थंड पात्रांत जातें तें पात्र सदैव थंड राखावें या पात्रांत रिटोर्टापासून बाफ येत असल्ये ती त्वरेनें घट्ट झाली नसतां हें पात्र फुटतें यास्तव या पात्राला नलिका मार्ग करून यांतील पदार्थ दुसर्या पात्रांत जाई अशी युक्ती करावी· जों पर्यंत थंड पात्रामध्यें इथरा खालीं कांहीं इतर पदार्थ तळास बसे तों पर्यंत इथर येऊं द्यावें· नंतर रिटोर्टांतल्या पदार्थाशीं बारा औंस दुसरें रेक्टिफेदस्पिरिट मिळवून पुनः पूर्ववत् इथर काढावें·

लतीन·	इंग्रेजी·
इथररेक्टिफीकेटस·	रेक्टिफेदइथर·
इथरसल्फ्युरिकस·	चवदा औंस·
पोटास्साफ्यूसा·	अर्ध औंस·
एक्वादिस्तिलेटा·	अकरा औंस·

प्रथम दोन औंस पाण्यांत पोटास्सा विरघळवून मग त्यामध्यें इथराला घालून त्यांचें चांगलें मेलन होई तोंपर्यंत हालवावें· नंतर सर्व मोटूये रिटोर्टमध्यें घालावें· नंतर अन्य पात्रांत वाळू घालून तिला उष्ण मानाचा १२० कक्षां पर्यंत उष्ण करून तीमध्यें तें रिटोर्ट अर्धें पुरावें· नंतर बारा औंस इथर अन्य थंड पात्रांत येऊं द्यावें· नंतर तें इथर नउ औंस पाण्यामध्यें घालून चांगलें हालवून पाणी खालीं जाई तोंपर्यंत ठेवावें मग वरलें रेक्टिफेद इथर घेऊन कुपींत घालून तीचें तोंड चांगलें बंद करून ठेवावें·

इथररेक्टिफीकेटस स्वच्छोदकासारिखें आहे· याचा स्वाद फार तिखट व हें उष्ण आहे·

आहे· हें असें चपल आहे किं एक्या कुपींतून दुसऱ्या कुपींत घाळतांना तितक्या अवकाशांत काहीं न्यून होतें व सहज प्रदीप्त होतें· यास्तव दिवा जवळ असतां एक्या कुपींतून दुसऱ्या कुपींत घालूं नये हें मदकारी आणि अंग ग्रह नाशक आहे याचे मदकारी गुण आलकोहोला प्रमाणें आहेत· परंतु ते त्वरेनें होऊन त्वरेनें जातात· ज्या वेळेस ज्वरामध्यें उल्हासा किंवा गात्रविक्षेप अथवा त्या प्रमाणें लक्षणें आहेत तेव्हां त्यांचा न्यूनपणा करावयासाठीं इथर कामाचें आहे· व दम्यावर ही फार कामाचें आहे यास्तव पोटांत देतात· आणि उष्ण पाण्या बरोंबर याची वाफ तोंडांत घेतात· तेणें करून दम्याची अवस्था न्यून होत्ये· वाफें करून पडशाचा खोखला ही न्यून होतो· वाफ घेतात ती एकदांच फार घेऊं नये· फार घेतली असतां मस्तक फिरूं लागून त्यांत शूळ उत्पन्न होतो· वायु गोळा· धनुर्वायु· व उचकी यांवर कामाचें आहे· तसें विषूचिकेमध्यें वमनाचा प्रतिबंध करावयासाठीं उत्तम आहे येणें करून मळमळ लागून वमन होऊं लागलें असतां काहीं एक वेळेस त्याचा ही प्रतिबंध होतो· या औषधें करून अन्येद्युसज्वर आणि तृतीयकज्वर यांची शीतावस्था न्यून होत्ये· पोटांत घ्यावयासाठीं याचें प्रमाण अर्धड्रामापासून दोन ड्राम पर्यंत आहे· याचें एकदां प्रमाण देऊन हीत झालें नाहीं तर त्वरेनें पुनः द्यावें· मनुष्याचे कर्णांत फार पीडा होत असतां या औषधाचे दोन तीन बिंदू कर्णांत घातल्यानें प्रायः तिचें निवारण होतें·

लतीन· इंग्रेजी·

ओल्यम् इथीरयम्· इथीर्यल ऐल·

इथरसल्फ्युरिकस काढल्या नंतर उष्ण न्यून करून फिरून अर्क काढावा जों पर्यंत रिटोर्टांतल्या पदार्थावर कृष्ण फेण येई· नंतर अग्नीवरून रिटोर्टाला त्वरेनें उतरून त्यांतल्ये पदार्थावर पाणी घालावें तें इतकें घालावें किं तेलासारिखा पदार्थ वर्त्ति येऊन तरे मग तो वरला पदार्थ घेऊन त्यांत आसीडाचा काहीं अंश न राही इतकें चुन्याचें पाणी त्यावर घालून फार हालवावें· नंतर ओल्यम इथीरयम वेगळें होतें·

हें एकलेंच औषधास्तव कामाचें नाहीं अन्य औषध सिद्ध करावयासाठीं कामाचें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसइथरिसआरोमाटिकस्·	**आरोमाटिकस्पिरिटओफइथर्·**

कुटलेली दालचिनी·	तीन ड्राम·
वेलदोड्यांचे दाण्याचें चूर्ण·	दीड ड्राम·
मिर्यांचें चूर्ण·	एक ड्राम·
सुंठीचे काप·	एक ड्राम·
स्पिरिटसइथरिससल्फ्युरिसी·	एक पैंट·

सर्वांना बिलोराचे कुपीत घालून तिचें तोंड चांगलें बंद करून चवदा दिवस पर्यंत ठेवून मग गाळावें·

याचे गुण केवळ स्पिरिटसइथरिससल्फ्युरिसी प्रमाणें आहेत प्रमाण ही तसेंच आहे· व याचा स्वाद त्यापेक्षां अधीक चांगला आहे·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसइथरिसनैत्रिसि·	**स्वीटस्पिरित्सओफनैटर्**

रेक्टिफैदस्पिरिट·	दोन पैंट·
नैत्रिकआसीद·	वजनानें तीन औंस·

स्पिरिटावर थोडें थोडें आसीद घालावें· सर्व घातल्यानंतर चांगलें ढाळवावें परंतु त्याचा उष्णपणा उष्णमानाचा १२० कक्षा पेक्षां अधीक होऊं देऊं नये· नंतर मंदाग्नी लावून चोवीस औंस काढावें·

स्वीटस्पिरित्सओफनैटर स्वच्छ पाण्या प्रमाणें आहे· याला गंध फार उत्तम आहे व स्वाद तिखट गोड असा लागतो हें औषध द्रावक आणि भ्रम अंगग्रह नाशक आहे· घेतल्यानंतर स्वेदकारी औषधा प्रमाणें पथ्य केलें असतां स्वेदकारी ही आहे· याचें प्रमाण अर्ध ड्रामां पासून एक ड्राम पर्यंत आहे द्रावकास्तव याला पोटासे आसीटास· सोरा· स्क्विल· दिजिटेलिस· इत्यादिक द्रावकांमधून कोणत्या एकाशी मिळवून देतात या औषधें करून उष्णासा व वायुशान्ति यांचें निवारण होतें यास्तव जा द्रावकें करून हे उपद्रव होतात तें द्रावकाशी मिळवून द्यावें·

लतीन

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसइथरिससल्फ्युरिसी·	**स्पिरिटओफसल्फ्युरिकइथर्·**

इथररेक्टिफिकेटस·	अर्धपैंट·
रेक्टिफैदस्पिरिट·	एकपैंट·

दोहोंचें चांगलें मेलन करावें·

याचे गुण इथररेक्टिफिकेटसाचे गुणां प्रमाणें आहेत· परंतु त्या प्रमाणें बलवंत नाहीं याचें प्रमाण एक ड्रामां पासून तीन ड्राम पर्यंत आहे· तोंडांत· किंवा कंठांत थोडें इन्फ्लमेशन झालें असतां एक ड्राम हें औषध साहा औंस पेज व थोडी साखर यांचे मेलनाचा गुळण्या चांगल्या आहेत·

लतीन·	इंग्रेजी·
स्पिरिटसइथरिससल्फ्युरिसीकोम्पोसिटस·	**कोम्पौंडस्पिरिटओफसल्फ्युरिकइथर·**

स्पिरिटसइथरिससल्फ्युरिसी·	एकपैंट·
ओल्यमइथीर्यम·	दोन ड्राम·

दोहोंचें चांगलें मेलन करावें·

याचे गुण स्पिरिटस इथरिस सल्फ्युरिसीप्रमाणें आहेत· प्रमाण ही तसेंच आहे· दोहोंचा स्वाद मात्र समान नाहीं· निद्रा यावयासाठीं लादनम दिल्यानें काहीं उह्मासा होऊं लागला असतां तो या औषधें करून न्यून होतो· यास्तव वैद्य त्याचे निवारणास्तव लादनमा बरोबर या औषधाला देतात·

◆

लतीन·	इंग्रेजी·
वैना·	वैन्स·

पूर्वकालीं फार औषधांचें वैनाशीं ह्मणजे मद्य विशेषाशीं मेलन करीत असत· सांप्रत कालीं त्याशीं करीत नाहींत प्रुफस्पिरिट आणि पाणी यांचे मेलनाशीं करतात· या मेलनाला वैननाम ठेवितात परंतु या मध्यें वैनाचा लेश ही नाहीं·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
वैनमआलोएस	**वैनओफआलोएस**	**एळ्याबोळाचें वैन**

एळ्याबोळ	आठ औंस
कानेलाचा बार्क	दोन औंस
प्रुफस्पिरिट	चार पैंट
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी	चार पैंट

स्वच्छ पाटव्यें रेती बरोबर एळ्याचें चूर्ण करून मग कानेलाचें चूर्ण करावें. नंतर दोहोंचें मेलन करून त्याजवर प्रुफस्पिरिट आणि पाणी घालावें. चवदा दिवस पर्यंत तसेंच ठेवून त्या दिवसांमध्यें कधि चांगलें हालवून मग गाळावें.

हें औषध चांगलें उष्ण रोचक आणि ढाळक आहे. रोचकास्तव याचें प्रमाण एक द्राम किंवा दोन द्राम ढाळकास्तव अर्ध औंसापासून दोन औंस पर्यंत आहे.

लतीन	इंग्रेजी
वैनमकोल्चिसी	**वैनओफमेडोसाफ्रन्**

वाळक व कापलेलें कोलचिसीरदिकूस	एक पौंड
प्रुफस्पिरिट	चार औंस
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी	आठ औंस

चवदा दिवस पर्यंत सर्वांना एकत्र ठेवून मग गाळावें.

या औषधाचे गुण कोलचिकमाचे गुणा प्रमाणें आहेत. प्रमाण अर्ध द्रामापासून दीड द्राम पर्यंत आहे. त्याला बहुत करून सिंकोनाचे काढ्याशीं अथवा कडु रोचकांचे फांटाशीं मिळवून देतात. तेणें करून उष्मासा होऊं लागला असतां त्याचे निवारणासाठीं मग्निशया उत्तम आहे.

लतीन	इंग्रेजी
वैनमईपिकाक्युअन्हे	**ईपिकाक्युअन्हवैन**

ईपिकाक्युअनाचें कुटलेलें मूळ	दोन औंस
प्रुफस्पिरिट	बारा औंस
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी	वीस औंस

सर्वांना चवदा दिवस पर्यंत एकत्र ठेवून मग गाळावें·

हें औषध फार कामाचें आहे· ईपिकाक्युअनाचें लाहान प्रमाण येणें करून चांगलें द्यावयास येतें· हें वमनकारक व उत्तम आहे· लाहान मुलांसाठीं विशेष उत्तम आहे· यांत थोडकी साखर घालून एक ड्राम किंवा दोन ड्राम अर्धअर्ध घटिका नंतर वमन होई तों पर्यंत द्यावें· याचें दाहा मिनिमापासून वीस मिनिम पर्यंत प्रमाण घाम व कफ काढावयासाठीं फार श्रेष्ठ आहे· ह्मणोन खोकला· संग्रहणी· अतीसार· इत्यादिक रोगांवर देतात·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
वैनमओपाई·	वैनओफओप्यम्·	अफूचें वैन·

अफूचा राधा	एक औंस·
कुटलेली दालचिनी·	एक ड्राम·
कुटलेल्या लवंगा·	एक ड्राम·
प्रुफस्पिरिट·	साहा औंस·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी·	साहा औंस·

सर्वांना आठ दिवस पर्यंत एकत्र ठेवून मग गाळावें·

या औषधाचें प्रमाण लाडनमाचे प्रमाणा सारिखें आहे· येणें करून काहीं कपाळ शूळ व इतर उपद्रव होत नाहींत ह्मणोन काहीं एक वेळेस पोटांत देतात· नेत्ररोग गेल्या नंतर काहीं पीडा नसून आरक्तपणा राहिला असतां या औषधाचे दोन तीन बिंदू दिवसांत दोन वेळ नेत्रांत घातल्यानें तो दूर होतो·

लतीन·	इंग्रेजी·
वैनमवीरेत्रि·	वैनओफव्हैट हेलेबोर·

व्हैटहेलेबोराचे मूळाचे काप·	आठ औंस
प्रुफस्पिरिट·	एक पैंट·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी·	दीड पैंट·

सर्वांना चवदा दिवस पर्यंत एकत्र ठेवून मग गाळावें·

याचे गुण कोलचिकमाचे वैनाचे गुणा प्रमाणें आहेत परंतु वकून करून त्या-

ला

ला देत नाहीत· याचें प्रमाण पांच बिंदू पासून वीस बिंदू पर्यंत आहे

लतीन·	इंग्रेजी	मुसलमानी
आसेटिका·	विनगर्स·	सिर्का·

पूर्वकाली अशी औषधे फार सिद्ध करीत असत· आतां दोन मात्र सिद्ध करीतात· असें औषध फार दिवस पर्यंत चांगलें राहत नाहीं· त्वरेनें सडतें· यांत प्रुफस्पिरिट घातलें असतां ही सडतें· ह्मणोन एक्या वेळेस फार सिद्ध करूनये· आणि सिद्ध केल्या नंतर बिलोराचे कुपींत घालून तीचें तोंड चांगलें बंद करून ठेवावें·

लतीन·	इंग्रेजी·
आसीटम् कोलचिसी·	विनेगर ओफ मेडोसाफ्रन·

मेडोसाफ्रनाचे माजूक मूळाचे काप·	एक औंस·
आसिदम आसिटिकम् दिल्युटम	एक पैंट·
प्रुफस्पिरिट·	एक औंस·

मेडोसाफ्रनाचे मूळाचे काप आणि आसिदम् या दोहोंना बिलोराचे कुपींत घालून तीचें तोंड बंद करून तीन दिवस पर्यंत गढुं देऊन मग पिळून रस काढून गाळ तळास जाई तों पर्यंत एक्या ठिकाणी ठेवावा· नंतर वरला स्वच्छ रस घेऊन त्यांत प्रुफस्पिरिट घालावें·

हें औषध स्रावक आहे याला जलोदरावर व जल पिंजरावर देतात· परंतु स्क्विल प्रमाणें चांगलें नाहीं आणि त्या प्रमाणें याचा विश्वास ही येत नाहीं ह्मणोन फार करून देत नाहीत· याचें प्रमाण अर्ध ड्रामा पासून दोन ड्राम पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
आसिटम सिल्ले·	स्क्विल विनेगर·

स्क्विलाचें शुष्क मूळ·	एक पौंड·
आसिदम आसेटिकम दिल्युटम	साहा पैंट·
प्रुफस्पिरिट·	अर्ध पैंट·

स्क्विलाचें मूळ आणि आरिदम या दोहोंला बिलोराचे पात्रांत घालून वर टांगण ठेवून तें पात्र मंद उन्हामध्यें साठ घटिकापर्यंत ठेवावें मग पिळून रस काढून त्यांतला गाळ तळास बसे तोंपर्यंत ठेवावा· नंतर वरला स्वच्छ रस घेऊन त्याचें प्रुफस्पिरिटाशीं मेळन करावें·

स्क्विलाचें हें औषध चांगलें आहे· कफ काढावयासाठीं विशेष चांगलें आहे· यास्तव दमा खोकला· पडसें इत्यादिक रोगांवर देतात· याचें प्रमाण अर्ध ड्राम तें दिवसांत पांच साहा वेळ द्यावें बहुत करून याला अन्य कफघ्न औषधाशीं मिळवून देतात· या पेक्षां फार मोटें प्रमाण दिल्हें असतां वांती होत्ये· परंतु हें औषध वमनास्तव प्रायः देत नाहींत द्रावकास्तव ही फार करून देत नाहींत द्यावयास दुछितात· तर एक ड्राम किंवा दोन ड्राम दुसर्या द्रावकाशीं मिळवून द्यावें· काहीं दिवसानंतर स्क्विलविनेगर गढूळ होतें परंतु तेणें करून गुणाचा न्यूनपणा होत नाहीं या देशांत स्क्विल नाहीं यास्तव हें औषध सिद्ध करावयासाठीं स्क्विलाचे मूळाचे ऐवजीं धाप्याचा कांदा ज्याला मुसलमान जंगली पियाज म्हणतात तो घ्यावा या कांद्याचे या औषधें करून कफ मात्र निघतो इतर गुण होत नाहींत· कफ काढावयासाठीं याचें प्रमाण स्क्विलाचे औषधासारिखें आहे·

* * *

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत
मेल्लिटा·	हनेस·	मधुमिश्रित औषधें·

या औषधांना फार पातळ न केलें असतां उत्तम आहे आणि काहीं दिवसपर्यंत चांगलीं राहातात· पूर्वकालीं अशीं औषधें फार होतीं परंतु सांप्रत असल्या बहुतांचें फार अगत्य नाहीं म्हणोन तीन चार मात्र सिद्ध करितात· प्रथम मधीचा शोधन प्रकार सांगतों·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
मेळदेस्युमेटम·	क्लारिफैद हन्ने·	मधीचा शोधनप्रकार·

मध पात्रांत घालून तें पात्र ज्या भांड्यांत पाणी उकळत आहे त्यावर ठेवून ती पातळ करावी· नंतर वर फेण येईल तो काढून टाकावा·

येणें करून फेणामध्यें थोडकेसें मेण व हलके पदार्थ वर्त्ति येतात· इतर

जड पदार्थ तळास बसतात· याप्रकारें करून मध नीट स्वच्छ केला असतां तिचा स्वाद आणि गंध चांगला राहातो· स्वच्छ करावयासाठी तीमध्यें पाणी घालूं नये· या स्वच्छ मधीला गुळण्यांचे औषधामध्यें घालितात· आणि तीमध्यें चाटण औषधें करितात· व जा वेळेस उपदंश न होतां इतर कारणें करून टाळ्यामध्यें व्रण होतो· तेव्हां अर्ध औंस मधीशीं पांच ग्रेन किंवा दाहा ग्रेन मोरचुत घेऊन त्याचें अथवा तितक्या व्हैट विट्र्यलाचें मेलन करून पक्षी याचे पिसानें दिवसांत चार पांच वेळ व्रणावर लावितात·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
मेळबोरेसिस·	**ह्नेओफबोरक्स·**	**सोहागक्षाराचें मधुमिश्रित औषध·**

सोहाग क्षाराचें चूर्ण·	एक ड्राम·
स्वच्छ मध·	एक औंस·

दोहोंचें चांगलें मेलन करावें·

हें औषध पोटांत घ्यावयाचें नाहीं· गुळण्याचे औषधांमध्यें घालतात· यांच्यानें औषधें करून मनुष्याचें तोंड आलें असतां येणें करून फार हीत होतें· कांहीं एक वेळेस सोहागाचेंच गुळण्यासाठीं औषध करितात· या प्रमाणें·

सोहाग क्षार·	अर्ध औंस·
गुलाबाचें पाणी	तीन औंस·
स्वच्छ मध किंवा खडी साखर·	एक औंस·
पाणी·	बारा औंस·

सर्वांचें चांगलें मेलन करावें· अगत्याप्रमाणें त्यांत बोळाचें टिंक्चुर घालून गुळण्या द्याव्या· बाळाचा मुखरोग जाला मुसलमान छारु किंवा निनान्व ह्मणतात· त्या रोगावर हीं दोन्ही औषधें चांगलीं आहेत·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
मेळरोसे·	**ह्नेओफरोजेस·**	**गुलाबाचें मधुमिश्रित औषध·**

गुलाबाचीं शुष्क पुष्पें·	चार औंस·
उकळतें पाणी·	तीन पैंट·
स्वच्छ मध·	पांच पौंड·

पुढें पाण्यामध्यें पंधरा घटिका पर्यंत ठेवावी नंतर तें पाणी गाळून त्याचें मधाशीं मेळन करून पात्रांत घालून तें पात्र ज्या भांड्यांत पाणी उकळत आहे त्यांत ठेवून त्यांतलें पाणी वरच्या पात्रांतलें मेळून नीट दाट होई तोंपर्यंत उकळवीत असावें·

हें औषध गुळण्यांचे औषधांमध्यें घातलें असतां त्याचा स्वाद चांगला लागतो आणि रंग लाल होतो· याचें आसिदाशीं मेळन करून त्यांत घातलें असतां विशेष लाल होतो·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
ओक्सिमेळसिम्प्लेक्स·	सिंपल्ओक्सिमेळ·	मु॰ सिर्क्यानें मधुमिश्रित औषध·

स्वच्छमध	दोन पौंड·
आसिदमआसिटिकमदिल्युटम	एक पैंट·

दोहोंना बिलोराचे पात्रांत घालून तें पात्र मंदाग्नीवर ठेवून दाटपणा नीट होई तों पर्यंत उकळवीत असावें·

पडशामुळें मनुष्याचे गळ्यांत काहीं सूज दुःख किंवा व्रण झाला असतां याचें पाण्याशीं मेळन करून त्याच्या गुळण्या घाव्या या फार चांगल्या आहेत ज्वरामध्यें किंवा इतर रोगामध्यें त्या मेळनाचें पान ही चांगलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
ओक्सिमेळसिल्ले·	ओक्सिमेळओफस्किल·

स्वच्छमध·	तीन पौंड·
स्किलविनेगर·	दोन पैंट

दोहोंना बिलोराचे पात्रांत घालून तें पात्र मंदाग्नीवर ठेवून दाटपणा नीट होई तों पर्यंत उकळवीत असावें·

हें औषध कफघ्न आहे· याचें प्रमाण अर्ध ड्रामापासून दोन ड्राम पर्यंत आहे· हें सुगंधोदकाशीं मिळवून द्यावें असें न दिल्हें तर येणें करून उल्हासा होईल· याचे गुण स्किलाचे इतर औषधांचे गुणा प्रमाणें आहे·

* * *

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सिरुपी·	**सिरप्स·**	**पाक·**

साखरेचें पाण्याशीं मेळन करून अग्नीवर कढवून जे पदार्थ सिद्ध होतात त्यांस हें नाम ठेवतात· ते मिश्रित आणि अमिश्रित या भेदेंकरून दोन प्रकारचे आहेत· बहुत करून मिश्रित पाक औषधांचा कुस्वाद व कुगंध न्यून करायाकरितां योजिले आहेत पाक सिद्ध करावयासाठीं सदैव खडी साखर घ्यावी· कदाचित् रद्दी साखर घेतली असतां तिचा पाक या प्रमाणें स्वच्छ करावा· कोंबड्याचे आंड्यांतल्ये श्वेत पदार्थाचें पाण्याशीं मेळन करून तें साखर आणि पाणी यांचे मेळनामध्यें घालून उकळावें उकळल्यें तेंव्हेस त्या श्वेत पदार्थाचे योगानें सर्व अनिर्मळ पदार्थ जमून त्या बरोबर फेणासारिखे वर्ति येतात· ते काढून टाकावे· पाक शीतस्थळीं ठेवावे· त्या स्थळावांचून अन्यस्थळीं वाईट होतात·

ज्या स्थलाचा उष्णपणा उष्णमानाचा ५५ कक्षांपेक्षां कधींही अधीक होत नाहीं त्या स्थळीं पाक **ठेवावे·**

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सिरुपससिम्प्लेक्स·	**सिम्पलसिरप·**	**अमिश्रित पाक·**

खडी साखर·	अडीच पौंड·
पाणी·	एक पैंट·

पात्रांत पाणी घालून तें पात्र ज्या पात्रांत पाणी उकळत आहे त्यांत ठेवून त्यामध्यें साखर घालून पातळ करावी· नंतर तें पात्र उतरून साठ घटिका पर्यंत ठेवावें मग वरला फेण टाकून तळास गाळ बसला असला तर त्यावरून हळुच स्वच्छ पाक काढावा· पाकांमध्यें थोडकें सल्फास पोटासे घातलें असतां वाईट होत नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·
सिरुपसआलथेई·	**सिरपओफमार्श्मालो**

मार्श्मालोचें साजूक कुटलेलें मूळ·	अर्ध पौंड·
खडीसाखर·	दोन पौंड·
पाणी·	चार पैंट·

अर्धे राहीं तोंपर्यंत मूळ पाण्यामध्यें उकळावें· शीत झाल्या नंतर चोथा

ढून

कून पाचन गाळावें. मग गाळ तळास जावया करितां साठ घटिका पर्यंत ठेवून तो तळास गेल्या नंतर वरला स्वच्छ पदार्थ घेऊन त्यांत साखर घालून नीट दाट होई तों पर्यंत तें उकळवीन असावें·

हें औषध निकामाचें आहे· आणि लवकर सडतें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सिरुपसआरान्श्योरम·	**सिरप ओफ ओरंजेस·**	**नारिंगाचा पाक·**

नारिंगाची साजुक साल·	दोन औंस·
खडी साखर·	तीन पैंट·
उकळतें पाणी·	एक पैंट·

साल पाण्या बरोबर पात्रांत घालून त्यावर ढांपण ठेवून तीस घटिका पर्यंत तसेंच राहूं द्यावें· नंतर वरला फाराट अन्य पात्रांत घालून त्यामध्यें साखर घालावी·

हा पाक फार चांगला नाहीं याचा प्रतिनिधि· दोन औंस नारिंगाचें टिंक्चुर एक पैंट अमिश्रित पाक यांचें मेलन आहे· औषधाला सुस्वाद आणावयासाठीं हा उत्तम आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सिरुपसक्रोसी·	**सिरपओफसाफ्रन·**	**केशराचा पाक·**

केशर·	एक औंस·
उकळतें पाणी·	एक पैंट·
खडी साखर·	अडीच पौंड·

केशर पाण्या बरोबर पात्रांत घालून त्यावर ढांपण ठेवून तीस घटिका पर्यंत तसेंच राहूं द्यावें· नंतर फाराट गाळून त्यांत साखर घालून दोहोंचें मेलन करावें·

हा पाक सुरंग व सुगंध आणावयासाठीं मात्र कामाचा आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सीरुपसलीमोनम्·	**सिरप ओफ लेमन्स·**	**लिंबूचा पाक·**

लिंबूचा गाळलेला रस·	एक पैंट·
खडी साखर·	दोन पौंड·

अमिश्रित पाका प्रमाणें कृति करून हा पाक सिद्ध **करावा**·

या पाकास चांगला सुस्वाद आहे· याचें पेजेशीं मेलन केलें असतां तें प्राशनास्तव उत्तम आहे·

लतीन·	**इंग्रेजी·**	**प्राकृत·**
सीरुपसमोरी·	**सिरपओफमल्बेरिस·**	**तुत्यांचा पाक·**

तुत्यांचा गाळलेला रस·	एक पेंट·
खडी साखर·	दोन पौंड·

अमिश्रित पाका सारिखी कृति करून हा पाक सिद्ध **करावा**·

या पाकाचे गुण लिंबूचे पाका प्रमाणें आहेत· व कार्य ही तसेंच आहे· दोहोंमध्यें हें मात्र अंतर कीं त्याला रंग नाहीं याला रंग आहे·

लतीन·	**इंग्रेजी·**	**प्राकृत·**
सीरुपसपापावरिस·	**सिरपओफपोप्पी·**	**पोस्ताचा पाक·**

पोस्ताचे बीजावांचून कुटलेलें शुष्क फळ·	चवदा औंस·
खडी साखर·	दोन पौंड·
उकळतें पाणी·	अडीच गालन·

पाण्यामध्यें फळ घालून साठ घटिका पर्यंत ठेवावें· नंतर दोहोंना पात्रांत घालून तें पात्र जा पात्रांत पाणी उकळत आहे· त्यांत ठेवून एक गालन कषाय राही तों पर्यंत उकळवून चोंथा बळकट पिळून गाळावा· नंतर तो कषाय दोन पेंट राही तों पर्यंत पुनः उकळवून उष्ण असतांच गाळावा· मग गाळ तळास जावया करितां तीस घटिका पर्यंत ठेवून तो तळास गेल्या नंतर वरला स्वच्छ कषाय घेऊन एक पेंट राही तों पर्यंत फिरून उकळवावा· नंतर त्यामध्यें साखर घालून अमिश्रित पाका प्रमाणें कृति करून पाक सिद्ध **करावा**·

हा पाक मदकारी आहे· याचें प्रमाण एक ड्रामापासून एक औंस पर्यंत आहे· याला वय पाहून देतात· परंतु हें औषध चांगलें नाहीं कारण याचे गुण सर्वकाल समान होत नाहींत यास्तव· मोठ्या कारणामुळें बालाना अफूचें औषध देण्याचें अगत्य लागलें तर लादनम द्यावें·

लतीन·	इंग्रेजी·
सीरुपसराम्नी·	**सिरपओफबक्थोर्न्·**

बक्थोर्नाचे साजुक फळाचा रस·	चार पैंट·
सुंठीचे काप·	अर्ध औंस·
पीमेन्ताचे फळाचें चूर्ण·	अर्ध औंस·
खडी साखर·	साडेतीन पौंड·

बक्थोर्नाचा रस गाळ तळास जावया करितां तीन दिवस पर्यंत ठेवून गाळावा· नंतर एक पैंट रस घेऊन त्या मध्यें सुंठीचे काप आणि पीमेन्ताचें चूर्ण घालून तो मंद उष्मांत दाहा घटिका पर्यंत ठेवून गाळावा· नंतर उरलेला रस दीढ पैंट राही तों पर्यंत उकळवून दोहोंचें मेलन करावें· मग त्यांत साखर घालून अमिश्रित पाकासारिखी कृती करून पाक सिद्ध **करावा**·

हा पाक बळवंत टाळक आहे· याचें प्रमाण अर्ध औंस किंवा एक औंस आहे· परंतु त्याला बहुत करून देत नाहीत·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सीरुपसरेयदोस·	**सिरपओफरेदपोप्पी·**	**लालपोस्ताचा पाक·**

लालपोस्ताचीं साजुक पुष्पें·	एक पौंड·
उकळतें पाणी·	एक पैंट दोन औंस·
खडी साखर·	अडीच पौंड·

पाण्याला पात्रांत घालून तें पात्र जा पात्रांत पाणी उकळत आहे त्यांत ठेवून त्यांतलें पाणी उकळूं लागल्या नंतर त्यामध्यें थोडिं थोडिं पुष्पें घालून चांगलीं मिळवून उकळवीत असावें· मग पात्र उतरून तीस घटिकापर्यंत ठेवावें· नंतर चांथा पिळून कषाय गाळून गाळ तळास बसे तों पर्यंत ठेवावा· तो तळास बसल्यानंतर वरला स्वच्छ कषाय घेऊन त्यांत साखर घालून अमिश्रित पाकासारिखी कृति करून त्याचा पाक सिद्ध **करावा**·

हा पाक सुरंग आणावयाचे मात्र कामाचा आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सीरुपसरोजेस·	सिरपओफरोजेस·	गुलाबपुष्पांचा पाक·

गुलाबाचीं शुष्क पुष्पें·	सात औंस·
उकळतें पाणी·	चार पैंट·
खडी साखर·	साहा पौंड·

गुलाबाचीं पुष्पें पाण्यामध्यें तीस घटिका पर्यंत ठेवावीं· नंतर फाराट गाळून पात्रांत घालून तें पात्र जा पात्रांत पाणी उकळत आहे त्यांत ठेवून अडीच पैंट फाराट राही तों पर्यंत उकळवावा· नंतर त्यांत साखर घालून अमिश्रित पाकाप्रमाणें कृति करून पाक सिद्ध **करावा**·

हा पाक सुरंग आणावयासाठीं मात्र कामास येतो आसिदें करून याचा रंग अधिक तांबडा होतो· आल्कली करून हिरवा किंवा पिंवळा होतो·

लतीन·	इंग्रेजी·
सीरुपससार्सापारिल्ले·	सिरपओफसार्सापारिल्ला·

सार्सापारिल्लाचे मूळाचे काप·	एक पौंड·
उकळतें पाणी·	एक गाल्लन·
खडी साखर·	एक पौंड·

कापसाठ घटिका पर्यंत पाण्यामध्यें घालून ठेवावे· मग अग्नीवर ठेवून चार पैंट पाचन राही तों पर्यंत उकळवून उष्ण असतां गाळून त्या मध्यें साखर घालून नीट दाट होई तों पर्यंत पुनः उकळवून पाक सिद्ध **करावा**·

हा पाक फार कामाचा नाहीं· कांहीं एक वेळेस याला सार्सापारिल्लाचे पाचनाशीं मिळवून देतात· याचे गुण त्या प्रमाणें आहेत· दिवसांत याचें प्रमाण दोन औंसापासून चार औंस पर्यंत आहे·

लतीन

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सिरुपससेन्ने·	**सिरपओफसेन्ना·**	**सोनामुखीचा पाक·**

सोनामुखीचीं पर्णे·	दोन औंस·
मधुरिकेचें कुटलेलें बीज·	एक औंस·
शीर्खिस्त·	तीन औंस·
खडी साखर·	एक पौंड·
उकळतें पाणी·	एक पैंट·

पाण्यामध्यें पर्णे आणि मधुरिकेचें बीज घालून मंद उष्णांत अडीच घटिका पर्यंत ठेवावें· नंतर गाळून त्यामध्यें शिर्खिस्त व साखर घालून नीट दाट होई तों पर्यंत उकळवून पाक सिद्ध **करावा·**

या मध्यें ढाळक गुण आहे· बहुत करून हा बाळाना देतात· इतर मनुष्यांस प्रायः देत नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·
सीरुपसटोल्युटेनस·	**सिरपओफटोलु·**

बाल्समओफटोलु·	एक औंस·
उकळतें पाणी·	एक पैंट·
खडी साखर·	दोन पौंड·

बाल्सम पाण्यामध्यें घालून पात्रावर ढांपण ठेवून सवा घटिका पर्यंत घाटून उकळवावें· शीत झाल्यानंतर गाळून त्यांत साखर घालून अमिश्रित पाका प्रमाणें कृतिकरून पाक सिद्ध **करावा·**

हा पाक सुस्वाद आणावयासाठीं मात्र कामाचा आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सीरुपसजिंजिबरिस·	**सिरपओफजिंजर·**	**सुंठीचा पाक·**

सुंठीचे काप·	दोन औंस·
उकळतें पाणी·	एक पैंट·
खडी साखर·	दोन पौंड·

सुंठीचे काप पाण्यामध्यें घालून दाहा घटिका पर्यंत ठवावे· नंतर गाळून त्यांत सारवर घालून अमिश्रितं पाकासारिखी कृति करून पाक सिद्ध करावा·

हा पाक उष्ण व वायु नाशक आहे· याला गेचकाच फाराटामध्यें घालून देतात

* * *

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
कोन्फेक्क्श्योनेस·	कोन्फेक्शन्स·	मोदक·

बनस्पतींचे साजुक पदार्थ आणि खडी साखर यांनां एकत्र कुटून जीं औषधें सिद्ध करितात· त्यांनां हें नाम ठेवितात· तीं औषधें फार बलवंत नाहींत· परंतु बलवंत औषधांचे अनुपानाविषयीं उत्तम आहेत· तीं मृदु राहावयासाठीं सदैव चिनी मृत्तिकेचे करंड्यांत ठेवावीं·

कठीण झालीं असतां मृदू होण्यासाठीं त्यांवर पाणी शिंपावें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
कोन्फेक्श्यो आमिग्दलेरम्·	कोन्फेक्शन ओफ आमन्ड्स·	बदामाचा मोदक·

गोड बदामाचे गोळे·	एक औंस·
बाबळीचे गोंदाचें चूर्ण·	एक ड्राम·
खडी साखर·	अर्ध औंस·

गोळे पाण्यामध्यें भिजत घालून त्यांची साल काढावी· नंतर सर्व पदार्थ एकत्र कुटून चांगलें मेलन **करावें**·

हें औषध बदामाचें मिश्रण सिद्ध करावयासाठीं फार चांगलें आहे· याचे लाहान विभागाचें पाण्याशीं मेलन करून बदामाचें मिश्रण त्वरेनें सिद्ध होतें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
कोन्फेक्श्योआरोमाटिका·	**आरोमाटिककोन्फेक्शान·**	**सुगंध मोदक**

दालचिनी·	दोन ओंस·
जायफळ·	दोन ओंस·
लवंगा·	एक ओंस·
वेलदोड्याचे दाणे·	अर्ध ओंस·
शुष्ककेशर·	दोन ओंस·
स्वच्छ खडी·	सोळा ओंस·
खडीसाखरेचें चूर्ण·	दोन पौंड·
पाणी·	एक पैंट·

सर्व शुष्क पदार्थ एकत्र कुटून फार बारीक चूर्ण करावें· नंतर त्यांत थोडें थोडें पाणी घालून चांगलें मेलन **करावें·**

याचा स्वाद उत्तम व याला उत्तम सुगंध आहे· हा एक स्कुपला पासून एक ड्राम पर्यंत मिश्रणाशीं मिळवून देतात· येणें करून पोटांतल्या वायूचा नाश होतो· उसासा दूर होतो· व प्राय: वांतीचा ही प्रतिबंध होतो· बहुत दिवस पाऱ्याचें औषध घेतल्या नंतर वांती होऊं लागली असतां विशेषें करून होतो· बहुत करून याला कापुराचे मिश्रणाशीं मिळवून देतात·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
कोन्फेक्श्योआरांश्योरम्	**ओरंजकोन्फेक्शान·**	**नारिंगाचा मोदक·**

साजुक नारिंगाची बाहेरली किसलेली साल·	एक पौंड·
खडी साखर·	तीन पौंड·

साल दगडाचे खलांत काष्ठाचे बत्त्यानें कुटावी· मग साखर घालून दोहोंचें चांगलें मेलन होई तों पर्यंत पुन: **कुटावें·**

रोचक चूर्ण घ्यावयासाठीं हें औषध चांगलें अनुपान आहे·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
कोन्फेक्श्योकास्ये	**कोन्फेक्शनओफकाश्या**	**बाहव्याचा मोदक**

बाहव्याचे शेंगांतला गीर	अर्ध पौंड
शीर्खिस्त	दोन औंस
चिंचेचा गीर	एक औंस
गुलाबाचा पाक	अर्ध पैंट

शीर्खिस्त कुटून पाका बरोबर पात्रांत घालून तें पात्र जा पात्रांत पाणी उकळत आहे त्यांत ठेवून पातळ करावें· नंतर त्यांत दोन गीर· घालून नीट दाट होई तोंपर्यंत उकळवीत **असावें**·

हें औषध नम्र दाळक आहे याचें प्रमाण एक ड्रामापासून एक औंसपर्यंत आहे·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
कोन्फेक्श्योओपीई	**कोन्फेक्शन्‌ओफओप्यम**	**अफूचा मोदक**

अफूचें चूर्ण	साहा ड्राम
मिऱ्यांचें चूर्ण	एक औंस
सुंठीचें चूर्ण	दोन औंस
ओंव्याचें चूर्ण	तीन औंस
गम्‌ट्रागाकांथाचें चूर्ण	दोन ड्राम
अमिश्रित पाक	एक पैंट

पाकाला उष्ण करून त्यामध्यें अफूचें चूर्ण खलावें· मग त्यांत अन्य चूर्णें घालून चांगलें मेळन **करावें**·

या मोदकाचे छत्तीस ग्रेनांमध्यें अफूचा एक ग्रेन आहे· हें औषध संग्रहणीवर· कोनिक वायूवर· व जामध्यें इन्फ्लेमेशनाची लक्षणें होत नाहीत· असा शूळ वायू करून पोटांत होऊं लागला असतां त्यावर कामाचें आहे याचें प्रमाण दाहा ग्रेनांपासून एक ड्राम पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
कोन्फेक्त्र्योपिपरिसनिग्री·	कोन्फेक्शान्ओफब्लाक्पेप्पर·	मिऱ्यांचा मोदक·

मिऱ्यें·	एक पौंड·
एलेकाम्पेनह्मणजे रासन्यांचें मूळ·	एक पौंड·
मधुरिकेचें बीज·	तीन पौंड·
मध·	दोन पौंड·
खडीसाखर·	दोन पौंड·

सर्व शुष्क पदार्थ एकत्र कुटून त्यांचें फार बारीक चूर्ण करावें· नंतर त्यांत मध· घालून चांगलें मेलन होई तोंपर्यंत **खलावें**·

हा मोदक उष्ण औषध आहे· याचें प्रमाण एक ड्राम किंवा दोन ड्राम आहे·

लतीन·	इंग्रेजी·
कोन्फेक्श्योरोझेकानैने·	कोन्फेक्शान्ओफदोगरोज·

रोझेकानैनेपल्या·	एक पौंड·
खडीसाखरेचें चूर्ण·	वीस औंस·

पल्याला पात्रांत घालून तें पात्र उष्ण जल पूरित पात्रांत ठेवून उष्ण करावें· नंतर त्यांत थोडी थोडी साखर घालून मेलन होई तोंपर्यंत चांगलें **खलावें**·

हें औषध अन्य औषधांचे अनुपानासाठीं मात्र कामाचें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
कोन्फेक्श्योरोझेगालिसे·	कोन्फेक्शान्ओफरेदरोझेस·

प्राकृत·

गुलाब पुष्पांचा मोदक ह्मणजे गुलकंद·

गुलाबाचीं पुष्पें·	एक पौंड·
खडीसाखर·	तीन पौंड·

पुष्पें दगडाचे खलबत्त्यांत कुटावीं· मग त्यांत साखर घालून चांगलें मेलन होई तोंपर्यंत पुनः **कुटावें**·

हें औषध चांगलें आहे आणि फार दिवस पर्यंत चांगलें राहातें अन्य औष·

ध घ्यावयासाठीं चांगलें अनुपान आहे· व औषधाच्या गोळ्या सिद्ध करावयासाठीं ही उत्तम आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
कोन्फेक्शियोरुटे·	**कोन्फेक्शनओफरु·**	**मु॰सातरीच्याचा मोदक·**

सातरीचीं शुष्क पर्णं·	दीड औंस·
ओंवा·	दीड औंस·
लारीवाक्स	दीड औंस
कदल·	अर्ध औंस·
मिरें	दोन ड्राम·
स्वच्छमध	सोळा औंस·

सर्व शुष्क पदार्थ पृथक् पृथक् कुटून फार बारीक चूर्ण करावें· नंतर सर्वांस एकत्र करून त्यांत मध घालून चांगलें मेलन **करावें**·

हा मोदक निष्कामाचा आहे·

लतीन·	इंग्रेजी·
कोन्फेक्शियोस्काम्मोन्ये·	**कोन्फेक्शनओफस्काम्मने·**

प्राकृत·

मु॰सक्मुन्यान्याचा मोदक·

सक्मुन्याचें चूर्ण·	दीड औंस·
कुटलेल्या लवंगा·	साहा ड्राम·
ओंव्याचें तेल·	अर्ध ड्राम·
गुलाबाचा पाक·	मेलनार्थ जितका लागेल तितका·

सर्व शुष्क पदार्थ एकत्र कुटून फार बारीक चूर्ण करावें· नंतर त्यांत थोडा थोडा पाक व तेल घालून खलून चांगलें मेलन **करावें**·

हें औषध बलवंत ढाळक आहे· परंतु बहुत करून हें देत नाहींत· याचें प्रमाण अर्ध ड्रामापासून एक ड्राम पर्यंत आहे·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
कोन्फेकूश्योसेन्ने	**कोन्फेकूशन्ओफसेन्ना**	**सोनामुखीचा मोदक**

सोनामुखीची पर्णे	आठ औंस
अंजीर	एक पौंड
चिंचेचा गीर	अर्ध पौंड
बाहव्याचे शेंगांतला गीर	अर्ध पौंड
अलुबुखाराचा गीर	अर्ध पौंड
धणें	चार औंस
जेष्ठीमधीचें मूळ	तीन औंस
खडीसाखर	अडीच पौंड

सोनामुखीचीं पर्णें आणि धणें यांना एकत्र कुटून चाळणीनें दाहा औंस चूर्ण चाळावें. नंतर चाळून उरलेला पदार्थ व अंजीर व जेष्ठीमध या तिघांना चार पैंट पाण्यामध्यें घालून अर्धे राहे तो पर्यंत उकळवावें नंतर पाचनाला गाळून पात्रांत घालून तें पात्र ज्या पात्रांत पाणी उकळत आहे त्यांत ठेवून त्यांतलें पाणी वरल्या पात्रांतलें पाचन उकळून दीड पैंट राही तो पर्यंत उकळवीत असावें. मग त्यांत पाक सिद्ध होण्यासाठीं साखर घालावी नंतर दोन गीरांचा थोडा थोडा भाग घालून मिळवावा. मग पूर्वीचें चूर्ण घालून सर्वांचें चांगलें मेलन **करावें**.

हें औषध फार उत्तम नम्र दाळक आहे. याचें प्रमाण एक ड्रामा पासून चार ड्राम पर्यंत किंवा एक औंस पर्यंत तें रात्रीस देतात. बहुत करून पोट फुगलें असतां त्याचे निवारणास्तव हें चांगलें आहे. तसें गर्भिणी स्त्रीस ही उत्तम आहे. हें कोणाला एकलें दिल्हें असतां बळकट लागू पडत नाहीं. तर अन्य औषधाशीं मिळवून द्यावें.

* * *

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
पल्वरेस	**पौदर्स**	**चूर्णें**

औषधें या प्रकारें करून द्यावयास सुलभ आहेत. परंतु ज्या औषधांना कुस्वाद फार आहे व जीं ओकसर होतात व जीं फार चपल आहेत व जीं औषधें हलके वजनाचीं आहेत व ज्यांचें पाण्याशीं मेलन सहज होत नाहीं त्या औषधांना या प्रकारें क-

रून देऊं नये. चूर्णांचें औषधांचें चांगलें मेलन होण्यासाठीं त्यांना एकत्र करून कुटून चाळणी मध्यें चाळून पुनःकुटून चांगलें मेलन करावें. आणि तीं सिद्ध झाल्यानंतर बीलोरा चे कुपीत घालून तीचें तोंड चांगलें बंद करून तिला अंधकारयुक्त स्थलाचे ठायीं टेवून अगत्या वांचून फार हालवूं नये. याचें कारण चूर्णांत फार जड पदार्थ असतात. ते खालतीं जातात. यास्तव व ज्यांचें प्रमाण एक ड्रामापेक्षां अधीक आहे तीं औषधें या प्रकारानें देऊं नयेत. अन्य प्रकारानें द्यावीं व जड पदार्थांचें चूर्ण वं साळ मिश्रित चूर्ण पाकांमध्यें किंवा मधीमध्यें द्यावें. इतर चूर्णें पाणी दूध इत्यादिकांमध्यें द्यावीं.

लतीन — इंग्रेजी

पल्विस्आलोएस्काम्पोसिटस्. कोम्पोंडपोदरओफआलोएस्.

प्राकृत.

एळ्याबोळाचें मिश्रित चूर्ण.

एळ्याबोळ.	दीड औंस.
ग्युयकाचें गम्मरेजिन.	एक औंस.
दालचिनीचें मिश्रित चूर्ण.	अर्ध औंस.

प्रथम एळ्याचें आणि ग्युयकाचें चूर्ण करावें. मग दोन चूर्णें दालचिनीचें मिश्रित चूर्णाशीं चांगलीं घोटून **मिळवावीं**.

ज्या वेळेस ढाळक आणि स्वेदकारी यांचें मेलनाचें अगत्य लागतें तेव्हां हें चूर्ण कामास येतें. याचें प्रमाण दाहा ग्रेनांपासून वीस ग्रेनपर्यंत आहे. सांप्रतकालीं याला फारकरून देत नाहींत.

लतीन — इंग्रेजी

पल्विससिन्नामोमीकोम्पोसिटस्. कोम्पोंडपोदर्ओफसिन्नामन्.

प्राकृत.

दालचिनीचें मिश्रित चूर्ण.

दालचिनी.	दोन औंस.
वेलदोड्यांचे दाणे.	दीड औंस.
सुंठ.	एक औंस.
मिऱ्यें.	अर्ध औंस.

सर्वांचें फार बारीक चूर्ण करून चांगलें मेळन करावें·

हें चूर्ण उष्ण व सुगंध आहे· अजीर्ण व वायु यांचे निवारणास्तव चांगलें आहे· बहुत करून बार्क व लोहकीट इत्यादिक औषधांचे अनुपानासाठीं; किंवा त्यांचा उष्णपणा अधिक होण्यासाठीं मात्र हें पांचग्रेन किंवा दाहाग्रेन त्यांशीं मिळवून देतात· प्रायः याला गोळ्यांशीं मिळवून देत नाहींत· तसें मिश्रणाशीं देत नाहींत· मिश्रणाला सुगंध यावयासाठीं त्यांशीं सुगंध मादक मिळवतात·

लतीन·	इंग्रेजी·
पल्विस्कोन्त्राएर्वेकोम्पोसिटस्·	**कोम्पोंडपोदरओफकोन्त्राएर्वा·**

कोन्त्राएर्वाचे मूळाचें चूर्ण	पांच औंस·
स्वच्छ खडी	दीड पौंड·

दोहोंचें बारीक चूर्ण करून **मिळवावें·**

याला रोचक गुण आणि स्वेदकारी गुण आहेत· परंतु त्याला प्रायः देत नाहींत त्याचें प्रमाण दाहा ग्रेनापासून चाळीस ग्रेनपर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
पल्विस्कोर्नुअस्तीकम्‌ओप्यो·	**पोदरओफ्‌बर्न्तहार्त्सहोर्न्‌विथ्‌ओप्यम्**

अफूचें चूर्ण	एक ड्राम·
बर्न्तहार्त्सहोर्न्	एक औंस·
किर्मिज	एक ड्राम·

सर्वांचें फार बारीक चूर्ण करून चांगलें **मिळवावें·**

या चूर्णांत दाहा ग्रेनामध्यें एक ग्रेन अफू आहे· त्यागान तेणें करून अफूचें फार लाहान प्रमाण द्यावयास सहज येतें·

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
पल्विसक्रेटेकोम्पोसिटस्	**कोम्पौंडपोदर्ओफ्चाक**	**खडीचें मिश्रित चूर्ण**

स्वच्छ खडी	अर्धपौंड
दालचिनी	चार औंस
तोर्मेन्तिल्लरदिक्स	तीन औंस
बाभळीचा गोंद	तीन औंस
मिर्यें	अर्ध औंस

सर्वांना पृथक् पृथक् कुटून फार बारीक चूर्ण करून सर्व चूर्णांचें एकत्र मेलन करावें.

हें औषध चांगलें अम्लनाशक व कोष्ठबंधक आहे. दालचिनी व मिर्यें येहीं करून याला उष्णपणा येतो. संग्रणीवर रेवाचिनी दिल्यानंतर हें द्यावयास चांगलें आहे. याचें प्रमाण दाहा ग्रेनांपासून तीस ग्रेन पर्यंत आहे. बहुत करून याला सुगंधोदकांशीं मिळवून देतात.

लतीन	इंग्रेजी	प्राकृत
पल्विस्क्रेटेकोम्पोसिटसकम्ओप्पियो	**कोम्पौंड्पोदर्ओफ्चाकविथ्ओप्यम**	**खडीचें अफुमिश्रित चूर्ण**

खडीचें मिश्रित चूर्ण	साडेसाहा औंस
अफूचें चूर्ण	चार स्कुपल

दोहोंचें मेलन करावें.

याचे दोन स्कुपलामध्यें एक ग्रेन अफु आहे. यास्तव संग्रहणीवर हें अधीक कामास येतें. याचें प्रमाण एक स्कुपला पासून एक ड्राम पर्यंत आहे. दंतोद्गम समयीं प्रायः बहुत शौच होतात. त्यांचे परिहारासाठीं हें उत्तम आहे.

लतीन·	इंग्रेजी·
पल्विस्ईपिकाक्युअन्हेकोम्पोसिटस्	कोम्पौंड्पोदर्ओफ्ईपिकाक्युअन·
	द्वितीयनाम दोमर्सपोदर·

ईपिकाक्युअनाचें चूर्ण·	एक ड्राम·
अफूचें चूर्ण·	एक ड्राम·
पोटास्सेसल्फासाचें चूर्ण·	एक औंस·

सर्वांचें मेलन करावें·

हें चूर्ण फार बलवंत स्वेदकारी आहे· याचें प्रमाण पांच ग्रेना पासून वीस ग्रेनपर्यंत आहे· प्रायः याला पाण्याशीं मिळवून देतात· हें घेतल्या नंतर उष्णोदकाचें फार पान करावें· परंतु त्वरेनें करूं नये· एक घटिकानंतर करावें· त्वरेनें केलें असतां उल्हासा होतो किंवा वमन होतें याचे दाहा ग्रेनामध्यें एक ग्रेन अफु आहे·

लतीन·	इंग्रेजी:
पल्विस्कैनोकोम्पोसिटस्·	कोम्पौंड्पोदर्ओफ्कैनो·

कैनो·	पंधरा ड्राम·
दालचिनी·	अर्ध औंस·
कठीण अफु·	एक ड्राम·

तिघांचें पृथक् चूर्ण करून सर्वांचें मेलन करावें·

हें चूर्ण कोष्ठबंधक असून मदकारी आहे· हें संग्रहणीवर कामाचें आहे· याचें प्रमाण दाहा ग्रेना पासून वीस ग्रेन पर्यंत याचे एक स्क्रुपलामध्यें एकग्रेन अफु आहे·

लतीन·	इंग्रेजी·
पल्विस्स्कामोन्येकोम्पोसिटस्·	कोम्पौंड्पोदर्ओफ्स्काम्मनी·

प्राकृत·

मुसलमानी: सक्मुन्या त्याचें मिश्रित चूर्ण·

सक्मुन्या·	दोन औंस·
जालपाचा कठीण गाभा·	दोन औंस·
सुंठ·	अर्ध औंस

तियांचें

तिघांचें निराळें चूर्ण करून सर्वांचें मेलन करावें·

हें चूर्ण बळकट दाळक आहे· याचें प्रमाण दाहा ग्रेनापासून वीसग्रेन पर्यंत आहे· जलोदरावर आणि पोटांतल्या क्रमीवर देतात·

लतीन·	इंग्रेजी·
पल्विस्‌सेन्नेकोम्पोसिदस·	**कोम्पोंड्‌पोदर्‌ओफसेन्ना·**

प्राकृत·

सोनामुखीचें मिश्रित चूर्ण·

सोनामुखीचीं पर्णें·	दोन औंस·
क्रीमरटार्टर्	दोन औंस·
सक्मुन्या·	अर्ध औंस·
सुंठ·	दोन ड्राम·

सक्मुन्या पृथक् कुटून फार बारीक चूर्ण करावें· नंतर अन्य सर्व पदार्थ एकत्र कुटून फार बारीक चूर्ण करून दोन चूर्णांचें मेलन करावें·

हें चूर्ण दाळक आहे· परंतु याला फार करून देत नाहींत· याचें प्रमाण एक स्क्रुपला पासून एक ड्राम पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·
पल्विस्‌ट्रागाकांथेकोम्पोसिटस·	**कोम्पोंड्‌पोदर्‌ओफट्रागाकांथ·**

गम्‌ट्रागाकांथाचें चूर्ण·	दीढ औंस·
बावळीचे गोंदाचें चूर्ण·	दीढ औंस·
कलप·	दीढ औंस·
खडीसाखर·	तीन औंस·

कलप आणि साखर एकत्र कुटून बारीक चूर्ण करावें· नंतर त्यांत ट्रागाकांथाचें व बावळीचे गोंदाचें चूर्ण घालून सर्वांचें मेलन करावें·

हें चूर्ण कालोमेल इत्यादिक जड औषधांचे चूर्णांचे अनुपानास्तव चांगलें आहे· खोकला· प्रमेह· मूत्रकृच्छ्र· अतीसार· यांवर याचें पाण्याशीं मेलन करून प्यावयास देतात· याचें प्रमाण अर्ध ड्रामापासून तीन ड्राम पर्यंत आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
पिल्युले·	पिलूस·	गोळ्या·

औषधांचा लाहान वर्तुळाकार पदार्थ करतात· त्यांना हें नाम ठेवितात· ज्या औषधाना फार कुस्वाद किंवा कुगंध आहे· व जीं जड वजनाचीं आहेत· तीं औषधें या प्रकारानें घावयास चांगलीं आहेत· गोळ्या सिद्ध करावयासाठीं प्रथम कठीण पदार्थांचें चूर्ण करून त्यांत मृदु पदार्थ घालावे· तेणें करून चिकटपणा नीट आला नाहीं· व औषधें मृदु नाहीत· तर पाक किंवा गोंदाचें मेळन घालावें· गोंद राळ मिश्रित पदार्थां मधून काहीं पदार्थ कुटल्या नंतर असे मृदु होतात· किं त्यांच्या गोळ्या सिद्ध करावयासाठीं अन्य पदार्थांचें अगत्य लागत नाहीं जे पाकानें व गोंदाचे पाण्यानें वळत नाहींत असे वनस्पतीचे फार रस भरीत पदार्थ आहेत· त्यांच्या गोळ्या सिद्ध करावयासाठीं त्यांमध्यें साबुण घालावा· तेणें करून त्या सिद्ध होतात· ज्यांचें प्रमाण लाहान असे धातुचे पदार्थ आहेत· त्यांच्या गोळ्या त्यांशीं राध्याचें किंवा मोदकाचें मेळन करून किंवा कणीक मिळवून सिद्ध कराव्या· तेणें करून त्यांचें लाहान प्रमाण सहज घावयास येतें· पदार्थ फार शिथिल होऊन गोळ्या रेळूं लागल्या तर त्यामध्यें जेष्ठीमधीचें थोडें चूर्ण घालून कराव्या· त्या चूर्णे करून त्यांना कठीण पणा मात्र येतो· गुणाचा न्यूनाधीकपणा होत नाहीं गोळ्या करावयासाठीं औषध कुटून मळून मोठा गोळा करून चिनी मृत्तिकेचे पात्रांत घालून त्याचें तोंड कातड्यानें चांगलें बांधून ठेवावा· आणि अगत्या प्रमाणें तो ओल्सर करावा· सिद्ध करण्याचे वेळेस गोळ्याची लांब वळवटी करून इच्छे प्रमाणें शस्त्रानें तिचे भाग करून त्यांच्या बोटानें गोळ्या कराव्या· आणि परस्पर न चिकटोत यासाठीं काहीं मग्निच्या किंवा कलप यांवर ठेवून फिरवाव्या· जड पदार्थां शिवाय इतर पदार्थांची गोळी पांच ग्रेनापेक्षां अधिक करूं नये· आणि एक्या वेळेस पुष्कळ सिद्ध करूं नयेत· यांचें कारण फार कठीण होऊन पोटांत विरघळत नाहींत· यास्तव·

लतीन·	इंग्रेजी·
पिल्युलेआलोएसकोम्पोसिटे·	**कोम्पोंडआलोएटिक्पिल्स·**

प्राकृत·

एळ्याबोळाचा मिश्रित गोळ्या·

एळ्यांचें चूर्ण·	एक औंस·
जिन्ट्यनाचा रांधा·	अर्ध औंस·
ओंव्याचें तेल·	चाळीस मिनिम·
अमिश्रित पाक·	लागेल तितका·

सर्वांना एकत्र कुटून चांगलें मेलन करून मोटा गोळा **करावा·**

कार्यसमयीं त्याचा गोळ्या कराव्या या गोळ्या चांगल्या आहेत· यांचें प्रमाण दाहाग्रेन किंवा पंधराग्रेन ह्मणजे दोन गोळ्या किंवा तीन गोळ्या आहे·

लतीन·	इंग्रेजी·
पिल्युलेआलोएसकम्मिर्रा·	**पिल्सओफ्आलोएस्विथमिर्र·**

प्राकृत·

एळ्याबोळाचा मिश्रित गोळ्या·

एळ्याबोळ·	दोन औंस·
केशर·	एक औंस·
बोळ·	एक औंस·
पाक·	लागेल तितका·

एळ्या व बोळ याना पृथक् कुटून बारीक चूर्ण करावें· नंतर त्या दोन चूर्णांना व केशराला एकत्र करून त्यांवर पाक घालून कुटून चांगलें मेलन करून· गोळा **करावा·**

कार्यसमयीं त्याचा गोळ्या कराव्या· या गोळ्या ढाळकास्तव चांगल्या आहेत· अजीर्णा बरोबर पोट फुगलें असतां त्यावर· वायुगोळ्यावर· कांविळेवर· व ऋतु प्रतिबंध मुक्त करावयासाठीं कामाचा आहेत· शेवटल्ये कार्यासाठीं या कासीसाशीं किंवा अन्य लोखंड औषधाशीं मिळवून द्याव्या· यांचें प्रमाण दाहाग्रेन किंवा पंधराग्रेन आहे·

लतीन·

पिल्युलेकाम्बोज्येकोम्पोसिटे·

इंग्रेजी·

कोम्पौंडगाम्बोजपिल्स·

प्राकृत·

मुसलमानी· ओसाररेवंडयाचा मिश्रित गोळ्या·

ओसाररेवंडाचें चूर्ण·	एक द्राम·
एळ्याबोळाचें चूर्ण·	दीड द्राम·
सुंठीचें चूर्ण·	अर्ध द्राम·
कठीणसाबुण	दोन द्राम·

प्रथम सर्व चूर्णांचें एकत्र मेलन करावें· नंतर त्यांत साबुण घालून चांगलें कुटून मोटा गोळा **करावा**·

या गोळ्या बळवंत ढाळक आहेत· याचें प्रमाण दाहा ग्रेना पासून वीस ग्रेन पर्यंत आहे· याना कठीण गुद ग्रहावर देतात· यावर काहीं एक वेळेस कालोमेलाशीं मिळवून देतात·

लतीन·

पिल्युलेफेर्रिकोम्पोसिटे·

इंग्रेजी·

पिल्सओफऐरन्‌विथमिर्‌·

प्राकृत·

कासीसाचा बोळ मिश्रित गोळ्या·

बोळाचें चूर्ण·	दोन द्राम·
सोदेसब्‌कार्बोनास·	एक द्राम·
कासीस·	एक द्राम·
साखर·	एक द्राम

प्रथम बोळाला सोदेसब्‌कार्बोनासाशीं घोंटून त्यांत कासीस घालून फिरून घोंटावें नंतर त्यांत साखर घालून कुटून चांगलें मेलन करून गोळा **करावा**·

या गोळ्यांचे गुण कासीसाचे मिश्रित मिश्रणाचे गुणां सारिखे आहेत· यांचें प्रमाण दाहा ग्रेना पासून एक स्कुपल पर्यंत तें दिवसांत दोन तीन वेळ द्यावें·

लतीन· इंग्रेजी·

पिल्युलेगाल्बनीकोम्पोसिटे· कोम्पोंड्पिल्‌सओफगाल्बनम्‌

प्राकृत·

मुसलमानी बरीजायाचा मिश्रित गोळ्या·

बरीजा·	एक औंस·
बोळ·	दीड औंस·
कन्दल·	दीड औंस·
हिंग·	अर्ध औंस·
पाक·	लागेल तितका·

सर्वांना चांगलें कुटून पाक घालून मळून मोटा गोळा **करावा**·

या गोळ्या ऋतु प्रतिबंध मुक्त करावयासाठीं व वायु गोळ्यावर व असल्या अन्य रोगावर कामाच्या आहेत याचें प्रमाण दाहा ग्रेनापासून वीस ग्रेन पर्यंत आहे· तें बहुत करून रात्रीस देतात·

लतीन· इंग्रेजी· प्राकृत·

पिल्युलेहैड्रार्जरी· मेर्क्युरियल्पिल्‌स·किंवा ब्लुपिल्‌स· पाऱ्याचागोळ्या·

स्वच्छ पारा·	दोन ड्राम·
गुलकंद·	तीन ड्राम·
जेष्ठीमधीचें चूर्ण·	एक ड्राम·

पाऱ्याचें रूप· काहींही दिसत नाहीं असें होई तों पर्यंत तो गुलकंदाशीं खलावा· नंतर त्यांत जेष्ठीमधीचें चूर्ण घालून कुटून सर्वांचें मेलन करून मोटा गोळा **क**रावा·

या गोळ्यांचे तीन ग्रेनामध्यें एक ग्रेन पारा आहे· गुलकंदाचे स्थानीं काहीं एक वेळेस पाक· मध· गोंदाचें मेलन· साबुण· व इतर· यांमधून कोणता एक पदार्थ घालतात· गोळ्या सिद्ध करावयासाठीं पारा फार दिवस खलला पाहिजे· जा वेळेस खलून खलून कांचेवर त्याचें रूप काहीं ही दिसत नाहींसें होतें· तेव्हां समजावें कीं गोळ्या करावयास योग्य झाला उपदंश रोगावर बहुत करून पाऱ्याचे औषधामधून या गोळ्या देतात· येही करून पाऱ्याचे अन्य औषधा प्रमाणें फार शोच होत नाहींत· याचें प्रमाण साहा

ग्रेन किंवा आठ ग्रेन आहे· तें प्रमाण तोंड येईल तों पर्यंत प्रतिदिवशीं दोन वेळ द्यावें त्यापेक्षां अधीक दिल्हें असतां प्रायः फार शौच होतात· येही करून फार शौच होऊं लागले· तर· याचें प्रमाण अफूशीं मिळवून द्यावें याचें एक स्कुपल किंवा अर्ध ड्राम प्रमाण एक्या वेळेस दिल्हें तर शौच होऊन· पोट साफ होतें·

लतीन·	इंग्रेजी·
पिल्युले हैड्रार्जरी सब्युरयटिस् कोम्पोसिटे·	कोम्पोंड् कालोमेल पिल्स·

प्राकृत·

[illegible] कालोमेलयाचा मिश्रित गोळ्या·

कालोमेल·	दोन ड्राम·
आन्तीमोनी ईसल्फ्युरेटम् प्रीसिपिटेटम्·	दोन ड्राम·
ग्युयक	अर्ध औंस·
रेक्टिफेद स्पिरिट·	अर्ध औंस·

प्रथम कालोमेल आन्तीमोनी ईसल्फ्युरेटमाशीं खलावें· नंतर त्यांत ग्युयकाचें चूर्ण घालून मिळवावें· नंतर रेक्टिफेद स्पिरिट घालून घोटून चांगलें मेलन करून मोटा गोळा करावा·

या गोळ्या प्लूमर वैद्य बहुत देत असे यास्तव त्याना इंग्रेजी भाषेंत प्लूमरपिल्स ह्मणतात· या गोळ्या कुष्टावर आणि चर्माचे रोगावर चांगल्या आहेत· यांचें प्रमाण पांच ग्रेनापासून दाहा ग्रेन पर्यंत आहे· तें प्रमाण पाहांटेस आणि रात्रीस देतात·

लतीन·	इंग्रेजी·
पिल्युले सापोनिस कम् ओप्यो·	कोम्पोंड ओप्यम् पिल्स·

प्राकृत·

अफूचा साबुण मिश्रित गोळ्या·

अफूचें चूर्ण·	अर्ध औंस·
कठीण साबुण·	दोन औंस·

दोहोंना चांगलें कुटून सारखें मेलन करून मोटा गोळा करावा·

याचे पांच ग्रेनामध्यें एक ग्रेन अफु आहे· याचे गुण अफू प्रमाणें आहेत· व प्र-

माण ही अफुसारिखें आहे· साबुणाच्या गोळ्या सिद्ध करण्या विषयीं मात्र उपयोग आहे·

लतीन·	इंग्रेजी·
पिल्युलेसिल्लेकोम्पोसिटे·	**कोम्पोंड्स्क्विलपिल्स·**

साजुकस्क्विळाचें चूर्ण·	एक ड्राम·
सुंठीचें चूर्ण·	तीन ड्राम·
कठीण साबुण·	तीन ड्राम·
ओषकाचें चूर्ण·	दोन ड्राम·

सर्व चूर्णांचें चांगलें मेलन करून त्यांत साबुण घालून चांगलें कुटून पाक लागेल तितका घालून मळून मोटा गोळा **करावा·**

याना खोस· दमा· व पडसें· यांवर कफ काढावयासाठीं देतात· आणि जलोदरावर द्रावकास्तव काल्लोमेल व दिजिटेलिस यांशीं मिळवून देतात· यांचें प्रमाण पांच ग्रेन किंवा दाहा ग्रेन आहे· तें दिवसांत तीन चार वेळ द्यावें·

लतीन·	इंग्रेजी·
प्रीपारेटाएक्सआनिमालिबस·	**प्रीपरेशन्सफ्राम्आनिमल्स·**

प्राकृत·

ओषधार्थ पशूचे पदार्थांचा सिद्ध करण्याचा प्रकार·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
एदिप्सप्रीपरेटा·	**प्रीपेर्डलार्ड·**	**वसास्वच्छकरावयाचा प्रकार·**

साजुक वसेचे लाहान लाहान तुकडे करून त्यांना मंदाग्नीवर पातळ करून वस्त्रामध्यें गाळावें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
कोर्नुअस्ताम·	**वर्न्हार्ट्सहार्न·**	**मृगाचेशिंगाचाजाळण्याचा प्रकार·**

विस्तवामध्यें शिंगाचे तुकडे सर्व पांढरे होतील तों पर्यंत जाळावे· नंतर

काढून त्याचें चूर्ण करून औषध खडीचे औषधा प्रमाणें सिद्ध करावें·

ओषधार्थ हें कामाचें नाही· परंतु अफु व इतर औषधांशीं मिळवतात· तेणें करून त्याचें लाहान प्रमाण द्यावयास सहज येतें·

लतीन·	इंग्रेजी·
स्पंजाअस्ता·	**बर्न्तस्पंज·**

स्पंजाचे लाहान तुकडे करून चांगले कुटावे त्यांतला सर्व मळ निघाल्या· नंतर· लोखंडाचे पात्रांत घालून वर ढांपण ठेवून तें पात्र विस्तवामध्ये ठेवावें जोंपर्यंत स्पंज कृष्ण वर्ण आणि कुफ्फुरित होईल· नंतर पात्रांतून काढून फार बारीक चूर्ण करावें·

हें चूर्ण गणिड व गंडमाला यांवर उत्तम आहे· याचें प्रमाण एक ड्रामापासून तीन ड्राम पर्यंत आहे· हें बहुत करून दालचिनीचें चूर्ण व मध· यांशीं मिळवून द्यावें· हें मेलन तोंडांत घालून हळु हळु विरघळूं द्यावें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
तेस्तेप्री.परेटे·	**प्रीपेर्ड्शेल्स·**	**मु॰ कालंबायाचा औषधार्थ सिद्ध करण्याचा प्रकार·**

कालंबाला उकळत्ये पाण्यांत स्वच्छ करून इतर पदार्थ असतील ते काढून टाकावे· नंतर त्याचें चूर्ण खडीचे चूर्णा प्रमाणें सिद्ध **करावें·**

याचे गुण खडीचे गुणां सारिखे आहेत· व प्रमाण ही तीचे प्रमाणा सारिखें आहे· ह्मणजे दाहा ग्रेना पासून दोन ड्राम पर्यंत·

लतीन·	इंग्रेजी·
एम्प्लास्त्रा·	**प्लास्तर्स·**

जे पदार्थ कठीण असून शरीराचे उष्णानें पातळ होत नाहीत· आणि लावल्या नंतर शरीराला सोडीत नाहीत· चिकटून राहातात· त्याना हें नाम ठेवतात· यांत बहुत करून राळ· वमेण· व· तेल: इत्यादिक पदार्थ असलात· हीं नीट सिद्ध होऊन

शीतळ झाली असतां हस्ताला लागत नाहींत· उष्ण करून पसरून लावावयास सहज येतात· या प्रमाणें लावल्या नंतर पटीला कांहीं तडा पडत नाहीं· आणि मृदूपण्यामुळें पटी वाकडी तिकडी लावावयास येत्ये· हीं फार दिवस पर्यंत ठेविलीं असतां कठीण होतात· यास्तव पुनः मृदु होण्यासाठीं यांना अग्नीवर उष्ण करून यांत थोडें तेल घालून मिळवावें· यांची मोटी वळवटी करून संरक्षणास्तव भोवताले कागद लाऊन ठेवावी· आणि कार्य समयीं ती उष्ण करून मोट्ये कागदावर किंवा चर्मावर अथवा वस्त्रावर पसरून लावावी· हीं औषधें बहुत कामास्तव चांगलीं आहेत· यांमधून कांहीं एकांना लोहितकर व स्फोटकारक गुण आहे यास्तव त्या कार्यासाठीं त्यांना लावतात· व कांहीं एकांना व्रणाचा ओलसरपणा राहावयासाठीं लावतात·

लतीन·	इंग्रेजी·	मुसलमानी·
एम्प्लास्त्रम् आम्मोन्यासी·	आमोन्यक् प्लास्तर·	ओषकाचें प्लास्तर·

स्वच्छ ओषक·	पांच औंस·
आसिदम् आसेटिकम्·	अर्ध पैंट·

आसिदामध्यें ओषक पातळ करावें· नंतर त्या मेळनाला लोखंडाचे पात्रांत घालून तें पात्र ज्या पात्रांत पाणी उकळत आहे त्यांत ठेवून घाटून आटवून नीट दाट करावें·

या प्लास्तराला गंडमाळांचे सूजेवर लावतात· व कांहीं एक वेळेस डोईचे खवड्यावरही लावतात· तेणें करून कधीं हीत होतें·

लतीन·	इंग्रेजी·
एम्प्लास्त्रम् आमोन्यासीकम् हैड्रार्जरो·	आमोन्यक् प्लास्तर विथ् मेर्क्युरी·

प्राकृत·

मु॰ ओषक व पारा यांचें प्लास्तर·

स्वच्छ ओषक·	एक पौंड·
स्वच्छ पारा·	तीन औंस·
गंधकाचें तेल·	एक ड्राम्·

प्रथम तेलामध्यें पारा खलावा जों पर्यंत त्याचें रूप दिसत नाहींसें होई नं-

तर ओषकाला पातळ करून थोडें थोडें त्यांत घालून सर्वांचें मेलन **करावें**·

ओषकें करून पाण्याचें हीत फार अधीक होतें· व तेणें करून प्लास्तर चर्मावर लावल्यानंतर त्यापासून सुटत नाहीं· हें प्लास्तर चांगलें शोथ नाशक आहे· हें कठीण गांठ व बद यांवर लावलें असतां फार हीत होतें· तसें फार पारा भक्षिल्यानंतर पीरयोस्तयमावर जी सूजयेत्ये तींवर आणि उपदंशें करून अस्थींवर सूजयेत्ये जिला इंग्रेजी भाषेंत नोद ह्मणतात· तिवर लावलें असतां हीत होतें·

लतीन·	इंग्रेजी·
एम्प्लास्त्रम कांथारिदिस·	**ब्लिस्तरिंग प्लास्तर·**
कांथारि दिसाचें फार बारीक चूर्ण·	एक पौंड·
मेणाचें प्लास्तर·	दीढ पौंड·
स्वच्छ वसा·	अर्ध पौंड·

वसा व प्लास्तर हीं एकत्र अग्नीवर पातळ करावीं· नंतर अग्नीवरून उतरून दाट होण्याचा समय जवळ आला ह्मणजे त्यांत कांथारि दिसाचें चूर्ण हलु हलु पहिरून. **मिळवावें**·

हें प्लास्तर मृदु आहे यास्तव पसरून लावावयासाठीं याला उष्ण करण्याचें अगत्य लागत नाहीं· व उष्ण केल्यानें याचे गुण उणे होतात· हें उत्तम स्फोटकारी आहे· व स्फोट आणावयासाठीं सर्व इतर औषधांपेक्षां श्रेष्ठ आहे· कामाचे वेळेस या प्लास्तराला हस्तानें मृदु करून चर्माचा किंवा जाड कागदाचा तुकडा जितकें पीडास्थल असेल तितका कापून त्यावर कांठाजवळचें भोंवतालचें स्थल सोडून आंगठ्यानें पसरून एकसारखें लावावें· नंतर कांठा जवळच्या स्थलावर रेसिनेचें एम्प्लास्त्र लावून पटी लावावी· रेसिनेचे प्लास्तरें करून चर्मापासून पटी सुटत नाहीं· या प्रमाणें पटी· लावल्यानंतर चांगला स्फोट तीस घटिकानी येतो· तो आल्यानंतर पटी कादून त्यास छिद्र करून सर्व स्थलावर केळीचें साजुक पर्ण बांधावें· या प्रमाणें प्रतिदिवशीं दोन वेळ पर्ण बांधल्यानें तीन चार दिवसानंतर स्फोट शुष्क होतो· ब्लिस्तर लावल्यानंतर काहीं एक वेळेस मूत्रकृछ्र व मूत्राघात होतो· किंवा मूत्राबरोबर काहीं रुधिर पडतें· यास्तव त्यांचे निवारणासाठीं पेज· दूध· गोंदाचें मेलन· इत्यादिकांमधून कोणत्या एकाचें फार पान द्यावें· दिल्यानंतर ही त्यांचा उद्भव झाला तर खालचे पोटाला उष्ण पाण्याची शेकणी द्यावी· किंवा

उष्ण पाण्यांत मनुष्याला बसवावा· हे दोन उपचार निष्फळ झाले तर चिपुनळींत चाळीस विंदू किंवा पन्नास बिंदू लादनम घालून ती मलद्वारांत सोडावी· जावेळेस मस्तकाचे केश काढून त्यावर ब्लिस्तर लावतात· व अन्य स्थलावर लावून बहुत काल पर्यंत राहूं देतात· तेव्हां विशेषें करून ती वाईट लक्षणें उत्पन्न होतात· ज्याला ज्वरामध्यें प्रलाप किंवा दृष्टीस विकार अथवा बधिर पणा आहे· त्याचे मस्तकावर ब्लिस्तर लावावें· तसें ज्याला पक्षवायु आहे त्याचे मस्तकावर किंवा रोग स्थला जवळ लावलें असतां फार हीत होतें· व शरीराचें आंतल्ये ठिकाणीं इन्फ्लुमेशन रोग झाला तर बाहेर लावावयासाठीं तें सदैव कामाचें आहे· लावल्या नंतर रोग आंतल्या स्थलांतून निघून बाहेरचा चर्मावर येतो· अन्य रोगावांचून पोटांत इन्फ्लुमेशन झालें किंवा अन्य रोगामध्यें त्या स्थलांत झालें तर ब्लिस्तर फार कामाचें आहे परंतु रोगाचे प्रारंभ वेळेस लाऊं नये· रुधिर काढल्या नंतर ढाळक व अन्य उपचार केल्या नंतर लावावें· प्रथम लावलें असतां रोगाचें शमन काहीं न होतां त्याची अवस्था ठाऊक होत नाहीं याचें कारण असल्या रोगाचे लक्षणाचें ज्ञान पोटाचे स्पर्शें करून होतें· ब्लिस्तरें करून बाहेरलें चर्म दुःख युक्त होऊन स्पर्श सहन होत नाहीं· असला रोग गेल्या नंतर जेव्हां पोटांत काहीं दुःख राहातें किंवा आग जळस्ये तेव्हां तें ब्लिस्तर फार कार्यावह होतें· जलोदरावर मोठ्या अगत्या वांचून व ज्याचे मूत्र स्थलाचे ठायीं काहीं रोग किंवा दुःख आहे त्याचे चर्मावर ब्लिस्तर लाऊं नये· बालाचे चर्मावर· व काहीं एक वेळेस अन्य मनुष्याचे चर्मावर ब्लिस्तर लावल्या नंतर कधीं व्रण होतो तो झाला तर त्यावर लबदा लावून दिवसांत बहुत वेळ उष्ण पाणी व दुध यांचे मेलनानें तो धुवावा व दोन तीन दिवस पर्यंत काहीं कडु रेचकाचें प्रमाण द्यावें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
एम्प्लास्त्रम्सीरे·	वेक्स्प्लास्तर·	मेणाचें प्लास्तर·

पिंवळें मेण·	तीन पौंड·
स्वच्छ वसा·	तीन पौंड·
पिंवळी राळ·	एक पौंड·

सर्वांना पातळ करून चांगलें मेलन **करावें**·

याला सांप्रत काळीं कंचा ही कार्यास्तव लावीत नाहींत· पूर्वकाळीं ब्लिस्तरिंग प्लास्तर लावून काढल्या नंतर स्फोटांत पू उत्पन्न होण्यासाठीं त्यावर हें लावलें होतें ते·

णें करून फार दुःख झालें ह्मणोन आतां त्यास्तव लावीत नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
एम्प्लास्त्रमक्युमिनी·	क्युमिनप्लास्तर·	जिऱ्यांचें प्लास्तर·

जिरें·	तीन औंस·
धणें·	तीन औंस·
लारीबाक्से·	तीन औंस·
पिक्सआरिदा·	तीन पौंड·
पिंवळें मेण·	तीन औंस·

पिक्स व मेण ही एकत्र पातळ करावी नंतर अन्य पदार्थांची चूर्णें करून एकत्र मिळवून त्यांमध्यें घालून **मिळवावी·**

हें प्लास्तर उष्ण शोथ नाशक आहे· याला फार दिवसांचे सूजेवर लावतात· तेणें करून काहीं एक वेळेस हीत होतें· व जेव्हां पोटामध्यें काहीं शीतसें वाटतें· किंवा वायु उत्पन्न होतो· तेव्हां त्याचे परिहारासाठीं याला पोटावर लावतात·

लतीन·	इंग्रेजी·
एम्प्लास्त्रमगाल्बनीकोम्पोसिटम्·	कोम्पौंड्गाल्बनमप्लास्तर·

मुसलमानी·

बरीजाचें मिश्रित प्लास्तर·

स्वच्छ बरीजा·	आठ औंस·
मुरदाड शिंगाचे प्लास्तर·	तीन पौंड·
तर्पन्तिन·	दाहा द्राम·
आब्र्यदिसरेजिनाचें चूर्ण·	तीन औंस·

बरीजा व तर्पन्तिन यानां एकत्र पातळ करून त्यामध्यें रेजिनाला घालून मिळवावें·नंतर मुरदाड शिंगाचे प्लास्तराला मंदाग्नीवर पातळ करून त्यामध्यें घालून सर्वांचें मेलन **करावें·**

गंडमालांचे फार दिवसांचे गांठीवर व संधीजवळचे बहुत दिवसांचे स्थीर दुःखावर हें लावलें असतां चांगलें आहे· फार दिवसांचे सूजेला पिकवावयासाठीं व

मोटा केस्तूड फुटल्यानंतर त्याचे भोंवतालचे स्थलावर कांहीं कठीण सूज राहिली असतां तीचे शमनास्तव हें चांगलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
एम्प्लास्त्रमहैड्रार्जरी·	**मेर्क्युर्यल्प्लास्तर·**	**पाऱ्याचें प्लास्तर·**

स्वच्छपारा·	तीनऔंस·
गंधकाचें तेल·	एक ड्राम·
मुरदाडशिंगाचें प्लास्तर·	एक पौंड·

पाऱ्याचें रूप कांहीं ही दिसत नाहींसें होई तों पर्यंत तो तेलाशीं खलावा· नंतर मुरदाड शिंगाचें प्लास्तर पातळ करून थोडें थोडें त्यांत घालून चांगलें मेलन **करावें·**

हें प्लास्तर बलवंत शोथनाशक आहे याचे गुण ओषकाचे पारा मिश्रित प्लास्तराचे गुणांप्रमाणें आहेत·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
एम्प्लास्त्रम्ओपीई·	**ओप्यम्प्लास्तर·**	**अफूचें प्लास्तर·**

अफूचें चूर्ण·	अर्ध औंस·
अब्यटिसरेजिना·	तीन औंस·
मुरदाड शिंगाचें प्लास्तर·	एक पौंड·
पाणी·	अर्धपैंट

प्लास्तर पातळ करून त्यांत अफु· रेजिन व पाणी घालून सर्वांचें मेलन करावें· नंतर मंदाग्नीवर नीट दाट **करावें·**

हें प्लास्तर फारकामाचें ओषध नाहीं याला कांहीं एक वेळेस वायूचे दुःख युक्त स्थलावर लावतात·

लतीन·	इंग्रेजी·
एम्प्लास्त्रम्पीसिस्कोम्पोसिटम·	कोम्पौंड्पिचप्लास्तर·

पिक्सआरिदा·	दोन पौंड·
अब्यटिसरेजिना·	एक पौंड·
पिंवळीराळ·	चार औंस·
पिंवळें मेण·	चार औंस·
जायफळाचें पिळून काढलेलें तेल·	एक औंस·
गोडें तेल·	दोन औंस·
पाणी·	दोन औंस·

पिक्स राळ मेण या तिघाना एकत्र पातळ करून त्यामध्यें प्रथम अब्यटिसरेजिना नंतर जायफळाचें तेल मग गोडें तेल व पाणी घालावें· नंतर सर्वांचें चांगलें मेलन करून एक्या पात्रांत घालून तें पात्र जा पात्रांत पाणी उकळत आहे· त्यांत ठेवून त्यांतलें पाणी प्लास्तर नीट दाट होई तों पर्यंत उकळवीत असावें·

हें प्लास्तर उष्ण लोहितकर आहे· परंतु फार कामाचें नाहीं·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
एम्प्लास्त्रम्प्लम्बी·	लेदप्लास्तर·	मुरदाडशिंगाचें प्लास्तर·

मुरदाडशिंगाचें फार बारीक चूर्ण·	पांच पौंड·
गोडें तेल·	एक गाल्लन·
पाणी·	दोन पैंट·

सर्वांना पात्रांत घालून तें पात्र मंदाग्नीवर ठेवावें· नंतर मुरदाडशिंग व तेल यांचा अन्य प्लास्तराप्रमाणें दाटपणा होई तों पर्यंत वाटावें· दाट झाल्यापूर्वी त्यांतलें सर्व पाणी आटून गेलें तर त्यांत थोडें उकळतें पाणी घालावें·

उकळत्ये पाण्या वांचून अन्य पाणी घातलें तर सर्व कडकडून उतून अग्नीमध्यें जाईल· या प्लास्तराला बहुत करून अन्य प्लास्तरांमध्यें घालतात· एकल्यालाच फार करून लावीत नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
एम्प्लास्त्रम् रेसिने·	प्लास्तर ओफ रेसिन्·	राळेचें प्लास्तर·

पिंवळ्या राळेचें चूर्ण·	अर्ध पौंड·
मुरदाडशिंगाचें प्लास्तर·	तीन पौंड·

मुरदाडशिंगाचे प्लास्तराला मंदाग्नीवर पातळ करून त्यांत राळेचें चूर्ण घालून मिळवावें·

याला इंग्रेजी भाषेंत अधीसिव प्लास्तर आणि स्तिकींग प्लास्तर ह्मणतात· याला बहुत करून वस्त्रावर पसरून लावतात· काहीं एक वेळेस अन्य प्लास्तराचे पटीचे कांठावर लावतात· जसें किं ब्लिस्तरिंग प्लास्तरावर लिहिलें आहे· हें प्लास्तर जखमेवर लावावयासाठीं चांगलें आहे· लावण्याचा प्रकार सांगतो· या प्लास्तराला वस्त्रावर पसरून लावून त्या वस्त्राचे दोन अंगुलें रुंदीचे लांब तुकडे कापावे· ते तुकडे जखमेचे भोंवतालचे स्थलाचे केश काढून तिचे दोन कांठ जवळ करून एक्या कांठावरून दुसऱ्या कांठावर लावावे· आणि दोन दोन तुकड्यांचे मध्यें अंतर राहूं द्यावें· तेणकरून पू निघण्याचें विघ्न होत नाहीं· जखम लाहान असली तर तितक्या रुंद तुकड्यांचें अगत्य नाहीं व हें व्रणावरही चांगलें आहे· पायांवर गुढघ्यांखालीं फार दिवसांचा व्रण असला तर त्यावर विशेष चांगलें आहे· लावण्याचा प्रकार सांगतो· याला वस्त्रावर पसरून लावून त्याचे तुकडे दोन तीन अंगलें रुंद असून पाद भोंवते पुरून चार पांच अंगुलें अधीक राहात इतक्या लांबीचे कापावे· नंतर त्यांमधून एक पटी घेऊन व्रणा बाहेरलें दीढ अंगुल खाळचें स्थल सांपडवून तीचे दोन शेवट बळकट धरून हळु हळु ताणून व्रणाकडल्ये आगास येत अशी लावावी· वउरलेले शेवट एकांवर एक चढवावे· दुसरी पटी प्रथम पटीचे कांठावरून पूर्ववत् व्रणावर लावावी· या प्रमाणें अन्य पट्या व्रण व्यापून त्याचे वरल्ये बाजूचें तीन अंगुलें चर्म आच्छादित होई तों पर्यंत लावाव्या· नंतर त्यांवर वस्त्राची घडी ठेवून पटी पायांचे बोटा पासून गुडघ्यां पर्यंत बांधावी· नंतर सर्वांना शीतोदकानें भिजवावे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
एम्प्लास्त्रम् सापोनिस्·	सोप प्लास्तर·	साबुणाचे प्लास्तर·

कठीण साबुणाचे काप·	अर्ध पौंड·
मुरदाडशिंगाचें प्लास्तर·	तीन पौंड·

प्रथम प्लास्तराला पातळ करून त्यामध्यें साबुणाचे काप घालावे· नंतर प्लास्तराला नीट दाटपणा होई तों पर्यंत **कढवावें**·

हें प्लास्तर शोथ नाशक आहे याचे गुण पार्याचे प्लास्तरा प्रमाणें आहेत· परंतु तितकें बळकट नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·
सीरेटा·	**सीरेत्स·**

यांत मेण व तेल आहे यांचा मृदुपणा प्लास्तरां पेक्षां अधिक आणि मलमापेक्षां न्यून असा आहे· ही उष्ण केल्यावांचून वस्त्रावर सहज पसरून लावावयास येतात· याना वस्त्रावर पसरून लावून पटी व्रणावर लावतात· आणि ती दिवसांत दोन वेळ बदलतात· ही सदैव नाजूक लावली पाहिजेत· यास्तव या देशांत कार्यसमयीं याना सिद्ध करतात·

लतीन·	इंग्रेजी·
सीरेटम्कलामिने·	**सीरेटओफ्कालामेनकिंवाटर्नर्ससीरेट·**

कालामिनाप्रीपरेटा·	अर्धपोंड·
पिंवळें मेण·	अर्धपोंड·
गोडें तेल·	एक पैंट·

अग्नीवर मेणाला पातळ करून त्यांशी तेल मिळवावें· नंतर अग्नीवरून उतरून दाट होण्याचा समय जवळ आला असें पाहून त्यांत कालामिना घालून थंड होई तों पर्यंत **घाटावें**·

याला काहीं एक वेळेस टर्नर्ससीरेट ह्मणतात· काहीं आघातें करून चर्माचें कोत्रोटें निघालें· व अग्नीचा किंवा तप्त पदार्थाचा चटका लागला व व्रण उथळ असला तर त्यांवर लावावयास हें चांगलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
सीरेटम्कांथारिडिस·	**सीरेटओफ्कान्थारिडीस·**

कांथारिडिसाचें फार बारीक चूर्ण·	एक ड्राम·
सीरेटम्सीटेशीई·	साहा ड्राम·

उष्णानें सीरेट मृदु करावें· नंतर त्यांत कांथारिडिसाचें चूर्ण घालून चांगलें **मिळवावें·**

ब्लिस्तराची पटी काढल्यानंतर त्या स्थलांत पू उत्पन्न करावयास इछितात· तर बहुत करून हें चांगलें आहे· परंतु कांहीं मनुष्यांस हें लावल्यानंतर मूत्राघातादिक पीडा उत्पन्न होतात·

लतीन·	इंग्रेजी·
सीरेटमसीटेशीई·	**स्पर्मासेटिसीरेट·**

स्पर्मासेटि·	अर्धऔंस·
पांढरें मेण·	दोन औंस·
गोडें तेल·	चार औंस·

स्पर्मासेटि व मेण या दोहोंना एकत्र पातळ करून त्यांत तेल घालून शीतळ होई तों पर्यंत काष्ठानें **घाटावें·**

हें सीरेट चांगलें शीतळ व मृदु आहे· याची पटी व्रणावर लावावयास चांगली आहे·

लतीन·	इंग्रेजी·
सीरेटम्प्लुंबीआसीटेटिस·	**सीरेट्ओफ्आसीटेट्ओफलेद्·**

प्लुम्बीआसीटाचें चूर्ण·	दोन ड्राम·
पांढरें मेण·	दोन औंस·
गोडें तेल·	अर्धपैंट·

प्रथम अर्धपैंट तेलामधून सात औंस तेल घेऊन त्यामध्यें मेणाला पातळ करावें· नंतर आसीटास प्लुम्बीला उरलेल्या तेलाशीं मिळवून तें थोडें थोडें त्या पातळ मेणांत घालून चांगलें मेळन होई तों पर्यंत काष्ठानें **घाटावें·**

याचे गुण सीरेटम् कालामिनेचे गुणांसारिखे आहेत· परंतु त्यापेक्षां हें अधिक शीतळ आहे· जांवर तें लावावयास चांगलें त्यांवर हें ही लावावयास चांगलें आहे· उथळ व्रणा भोंवतें इन्फ्लमेशन असलें तर त्या व्रणावर लावावयास त्यापेक्षां हें फार चांगलें आहे

लतीन·	इंग्रेजी·
सीरेटम्प्लुम्बीकोम्पोसिटम·	**कोम्पोंड्लेदसीरेट·**

लेक्कोर पूंबीस बासीटेटिस·	अडीच औंस·
पिंवळें मेण·	चार औंस·
गोडें तेल·	नऊ औंस·
कापुर·	अर्ध ड्राम·

अग्नीवर मेणाला पातळ करून त्यांशीं नऊ औंस तेलामधून आठ औंस तेल मिळवावें· नंतर अग्नीवरून त्याचा दाट होण्याचा समय जवळ आला असें पाहून त्यांत लेक्कोर प्लंबीस बासीटेटिस थोडें थोडें घालून शीतळ होई तों पर्यंत काष्ठानें चांगलें घाटावें· नंतर उरलेल्या तेलांत कापुराला वितळवून तें त्यांशीं **मिळवावें·**

याला गुलार्ड्सीरेटही ह्मणतात· याचा गुण व कार्य पूर्व सीरेटाप्रमाणें आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सीरेटम्रेसिने·	**रेसिन्सीरेट·**	**राळेचें सीरेट·**

पिंवळी राळ·	एक पौंड·
पिंवळें मेण·	एक पौंड·
गोडें तेल·	एक पैंट·

राळ व मेण हे दोन पदार्थ मंदाग्नीवर एकत्र पातळ करावें· नंतर त्यांत तेल मिळवून उष्ण असतां वस्त्रामध्यें **गाळावें·**

हें सीरेट थोडें उष्ण आहे येणें करून व्रणावरली ओलसर खपली दूर होत्ये व त्यांत पू उत्पन्न होतो यास्तव फार दिवसांचे मळकट व्रणावर चांगलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
सीरेटमसाबेने·	**साबेन्सीरेट·**

साबेनाची कुटलेली साजुक पर्णे·	एक पोंड·
पिंवळें मेण·	अर्धपोंड·
स्वच्छ वसा·	दोन पोंड·

मेण व वसा या दोहोंना एकत्र पातळ करून त्यामध्यें साबेनाची पर्णे उकळवावीं· नंतर वस्त्रामध्यें **गाळावें·**

ब्लिस्तर लावल्या नंतर त्या स्थळांत पूउत्पन्न करावयासाठीं हें सीरेट चांगलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सीरेटमसपोनिस·	**सोप्सीरेट·**	**साबुणाचें सीरेट·**

कठीण साबुण·	आठ औंस·
पिंवळें मेण·	दाहा औंस·
मुरदाडशिंगाचें चूर्ण·	एक पोंड·
गोडें तेल·	एक पैंट·
सिर्क·	एक गालन·

मुरदाडशिंगाचें चूर्ण व सिर्क हे दोन पदार्थ मंदाग्नीवर कढवावे· आणि त्यांचें चांगलें मेलन होई तोंपर्यंत घाटावें नंतर त्यांत साबुण घालून घट्ट होई तोंपर्यंत पूर्ववत् कढवावें· नंतर तेलामध्यें मेण पातळ करून त्यांत घालून सर्वांचें मेलन करावें·

हें सीरेट शीतळ करावयास चांगलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
सीरेटमसिम्प्लुक्स·	**सिम्पल्सीरेट·**	**अमिश्रितसीरेट·**

गोडें तेल·	चार औंस·
पिंवळें मेण·	चार औंस·

मेणाला पातळ करून त्यामध्यें तेल घालून चांगलें **मिळवावें·**

हें

हें स्पर्मासेटि सीरेटा प्रमाणें आहे· कांहीं औषध व्रणावर लावावया[illegible]च्छितात तर तें या सीरेटाशीं मिळवून लावावें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
अंग्वेन्ता·	ऐन्तमन्त्स·	मलमें·

सीरेटापेक्षां मलमें मृदु आहेत· यांचा दाटपणा लोण्याप्रमाणें आहे· हीं फार दिवस पर्यंत चांगलीं राहात नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तमकांथारिदिस·	ऐन्तमन्तओफ्क्यानिथ्रूक्रेस·

कांथारिदिसाचें फार बारीक चूर्ण·	दोन औंस·
अर्काप्रमाणें काढलेलें पाणी·	आठ औंस·
राळेचें सीरेट·	आठ औंस·

पाण्यामध्यें कांथारिदिसाचें चूर्ण घालून पाणी अर्धें राही तों पर्यंत उकळावें नंतर गाळून त्याचें सीरेटाशीं मेलन करून तें पात्रांत घालून· तें पात्र जळपूरित अन्य पात्रांत ठेवून तें पात्र अग्नीवर ठेवावें नंतर त्यांतलें पाणी वरल्या पात्रांतलें मेलन नीट दाट होई तों पर्यंत **उकळावें·**

ब्लिस्तर लावल्यानंतर त्या स्थलांत पू उत्पन्न करावयास इच्छितात· तर हें मलम चांगलें आहे· कांथारिदिसाचे सीरेटें करून अश्मरी अथवा मूत्राघात होतो· येणें करून होत नाहीं·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तमसीटेसिई·	स्पर्मासिटीऐन्तमन्त·

स्पर्मासिटी·	साहा ड्राम·
पांढरें मेण·	दोन ड्राम·
गोडें तेल·	तीन औंस·

मंदाग्नीवर सर्व पदार्थ एकत्र पातळ करून शीतळ होत तोंपर्यंत चांग-

लें

ले घाटावें·

हें मलम त्वरेनें सडतें यास्तव कार्य समयीं सदैव नवें करावें· आघातें करून किंवा स्फोटकारि लावल्यानंतर चर्म निघालें असतां त्यावर लावावयास हें मलम चांगलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तम्एलेमीकोम्पोसिटम·	**कोम्पौंडऐलेमीऐन्तमन्त·**

एलेमी·	एक पौंड·
ओल्यमटेरेबिंथिने·	दाहा औंस·
स्वच्छवसा·	दोन पौंड·
गोडेंतेल·	दोन औंस·

एलेमी व चर्बी हे दोन पदार्थ मंदाग्नीवर एकत्र पातळ करावे· नंतर उतरून तत्क्षणीं यांशीं तेल व ओल्यमटेरेबिंथिनें मिळवून ते वस्त्रामध्यें गाळावें·

हें मलम अल्प उष्ण आहे· पूचा अधिकपणा करावयासाठीं चांगलें आहे· या कार्यास्तव याला व्रणावर लावतात·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तमहैड्राजरीफोर्ट्यस·	**स्त्रोंगमेर्क्युर्यलऐन्तमन्तकिंवाब्लुऐन्तमन्त·**

प्राकृत·

पाऱ्याचें मलम·

स्वच्छपारा·	दोन पौंड·
स्वच्छ चर्बी·	चोविस औंस·

चोवीस औंस चर्बी मधून दोन अथवा तीन औंस चर्बी घेऊन तिशीं पारा खलावा जोंपर्यंत त्याचें रूप कांहीं ही दिसत नाहीं असें होई· नंतर त्याशीं उरलेल्या चर्बीचें चांगलें मेलन करावें·

हें मलम चांगलें सिद्ध करावयासाठीं खलन्याचा आयास फार दिवस चौकशीनें केला पाहिजे· सिद्ध होतें तेव्हां याचा रंग निळा असतो· या मलमाचें चर्मावर मर्दन केल्यानें पाऱ्याचे फार गुण शरीरांत शिरून रोगाचें शमन होतें· यास्तव एक ड्रा-

मापासून अर्ध औंस पर्यंत हें मलम घेऊन याचें दिवसांत दोन वेळ मांड्यांवर मर्दन करतात· तसें मनुष्याचे पोटांत किंवा काळिजास रोग झाला तर त्याचे पोटावर करतात ज्या स्थलावर या मलमाचें मर्दन करणें तें त्या स्थलाचे प्रथम लोम काढून करावें· असे केलें नाहीं तर लोमांचे मुळां भोंवता प्रथम दिवशींच फार पुरळ येतो· दोन तीन·दिवसानंतर मर्दनाचे स्थलावर पुरळ आला तर तें स्थल सोडून अन्य स्थलावर मर्दन करावें· या प्रमाणें एक स्थल सोडून अन्य स्थलावर मर्दन करतां करतां काही दिवसानंतर तोंड येतें· पोटांत पाऱ्याचें अन्य औषध घेऊन तोंड आलें नाहीं तर याचे मर्दनें करून येतें· यास्तव उपदंश· काळिज· व प्लीहा यांचा रोग· अतीसार फार प्रकारचा ज्वर· जलोदर· इत्यादिक रोगावर करतात· पोटांत पाऱ्याचें अन्य·औषध न देऊन याचें मर्दन केलें असतां रेचांचा उपद्रव होत नाहीं· पोटांत पाऱ्याचें अन्य औषध देऊन याचें मर्दन केलें तर तें त्या औषधास फार साहाय भूत होऊन त्वरेनें तोंड आणवितें· व या मलमाचें मर्दन बद झालें असतां व आबूसार्बेन्त वाहिन्याचे पिंड सुजले असतां त्या वाहिन्यांचे प्रारंभाकडे करतात· वायुमध्यें संधीचे सूजेवर व इन्फ्लमेशन स्थलावर लिंपें करून कठीण सूज येत्ये· तीवर शोथ नाशास्तव याचा लेप देतात·

लतीन· — **इंग्रेजी·**

अंग्वेन्तमहैड्रार्जरीमीश्यस· — **मैल्दमेर्क्युर्यलऐन्तमन्त·**

प्राकृत·

पाऱ्याचें मिश्रित मलम·

पाऱ्याचें मलम·	एक पौंड·
स्वच्छ चर्बी·	दोन पौंड·

दोहोंचें चांगलें मेलन करावें·

बहुत करून याचें मर्दन व लेपन करीत नाहींत· कांहीं एकवेळेस उपदंशान व्रणावर याची पटी लावतात·

लतीन·	इंग्रेजी
अंग्वेन्तमहेद्रार्जरीनैत्रटिस·	**सित्रिनऐन्तमन्त·**

स्वच्छ पारा·	एक औंस·
नैत्रिक आसिद·	अकरा द्राम·
स्वच्छ चर्बी·	साहा औंस·
गोडें तेल·	चार औंस·

प्रथम पारा आसिदामध्यें पातळ करावा· हें मेळन दोहोंचे संयोगेंकरून उष्ण होतें उष्ण आहे तों हें चर्बी व तेल याना एकत्र पातळ करून त्यांशी **मिळवावें·**

हें मलम फार उत्कृष्ट आहे· पामा व दद्रु इत्यादिक चर्मरोगांचें फार कामाचें आहे· हें फार दिवसांचे व्रणावर लावलें असतां त्यावरला मळासारिखा पदार्थ निघतो· हें एकलें लावलें असतां फार उष्ण होऊन बहुत पीडा होत्ये· यास्तव चर्बीशीं अथवा अमिश्रित सीरेटाशीं मिळऊन लावावें· कोथावर व पापण्यामधून पुष्कळ पू निघतो असल्या नेत्ररोगावर ही हें कामाचें आहे· यास्तव याला अथवा चर्बीशीं याचें मेळन करून त्याला मृदु करून कलमानें किंवा पिसानें पापण्याना लावावें·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तमहेद्रार्जरीनैत्रिकोओक्सिदी·	**ऐन्तमन्तओफ्नैत्रिकोओक्सिदओफ्मर्क्युरी· किंवा रेदप्रीसिपिटेट्ऐन्तमन्त·**

रेदप्रीसिपिटेटाचें चूर्ण·	एक औंस·
पांढरें मेण·	दोन औंस·
स्वच्छ चर्बी·	साहा औंस·

चर्बी व मेण याना एकत्र पातळ करून त्यांत रेदप्रीसिपिटेटाचें फार बारीक चूर्ण घालून चांगलें **मिळवावें·**

हें मलम फार चांगलें आहे· बहुत दिवसांचे व्रणांचे उपयोगी आहे· लावण्याचा प्रकार सांगतो· याला वस्त्रावर पसरून लावून व्रण इतका तुकडा काढून त्यावर पट्टी लावावी· नंतर स्पर्मासेटीचें मलम वस्त्रावर पसरून लावून पूर्व पट्टीचें बाहेरलें कांठ चर्म आच्छादित होई इतका त्याचा तुकडा कापून पूर्वपट्टीवर ही पट्टी लावावी· तान-

रोगावर सेव्हिन ऐन्समेंत कामाचें त्यावर हेंही कामाचें आहे· त्यामलमाप्रमाणें लावावें· व नेत्राचे पुष्पक रोगावर ही उत्कृष्ट आहे·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तमहैड्रार्जरीप्रीसिपिटेटिआल्बी·	ऐन्तमन्तओफ्व्हैटप्रीसिपिटेटद्मेर्क्युरी·

हैड्रार्जरमप्रीसिपिटेटमआल्बम्·	एकड्राम·
स्वच्छ चर्बी·	दीढ औंस·

मंदाग्नीवर चर्बीला पातळ करून त्यांत हैड्रार्जरम्प्रीसिपिटेटम्आल्बम् घालून चांगलें मिळवावें·

हें मलम दद्रु व पामा व खरूज यांवर फार चांगलें आहे· हें बालांस ही लावावयास चांगलें आहे· व हें उवांचे नाशाविषयीं ही चांगलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तमपीसिस्निग्रे·	पिच्चऐन्तमन्त·

पिक्सनिग्रा·	नउ औंस·
पिंवळें मेण·	नउ औंस·
पिंवळी राळ·	नउ औंस·
गोडें तेल·	एक पैंट·

सर्वांना एकत्र पातळ करून वस्त्रामध्यें गाळावें·

हें मलम फार कामाचें नाहीं व बहुत करून देत ही नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तमपीसिस्लिक्विदे·	टार्ऐन्तमन्त·

टार्·	एक पौंड·
स्वच्छ चर्बी·	एक पौंड·

दोहोंना एकत्र पातळ करून वस्त्रामध्यें गाळावें·

हें मलम खवड्यांवर चांगलें आहे· व याला पामावर ही लावतात·

लतीन·	इंग्रेजी·	मुसलमानी·
अंग्वेन्तमसाम्ब्युसी·	एल्दर्फ्लोवर्एन्तमन्त·	अकतीचें मेलम·

अकतीची पुष्पें·	दोन पौंड·
स्वच्छ चर्बी·	दोन पौंड·

पुष्पें कुरकुरीत होत तों पर्यंत चर्बीमध्यें शिजवावीं· नतर सर्व वस्त्रामध्यें गाळावें·

याचे गुण अमिश्रित सीरेटाचे गुणा प्रमाणें आहेत· याला फार करून देत नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
अंग्वेन्तमसल्फरिस·	सल्फर्एन्तमन्त·	गंधकाचेंमलम·

गंधकाचें फुल·	तीन औंस·
स्वच्छ चर्बी·	अर्ध पौंड·

दोहोंचें मेलन करावें·

हें मलम खरजेवर चांगलें आहे बहुत करून याचें रात्रीस मर्दन करतात· ओल्यम लवंड्युले करून किंवा लिंबुचे तेलें करून गंधकाचा कुगंध लुप्त होतो· व हिंगळें करून याचा रंग ही लुप्त होतो·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तमसल्फरिसकोम्पोसिटम·	कोम्पौंडसल्फरएन्तमन्त·

प्राकृत·

गंधकाचें मिश्रित मलम·

गंधकाचें फुल·	अर्धपौंड·
विरेत्रीरेदिक्साचें चूर्ण·	दोन औंस·
सोरा·	एक ड्राम·
मृदुसाबुण·	अर्ध पौंड·
स्वच्छ चर्बी·	दीढ पौंड·

सर्वांचें चांगलें मेलन करावें·

हे

हें ही खरजेवर चांगलें आहे परंतु येणें करून पीडा व उलपणा काहीं एक वेळेस फार होतो· व येणें करून उवांचा ही नाश होतो·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तमविरेत्री·	व्हेटहेल्लेबोर्‌ऐन्तमन्त·

विरेत्रीरेदिक्साचें चूर्ण·	दोन औंस·
स्वच्छ चर्बी·	आठ औंस·
लिंबूचें तेल·	वीस मिनिम·

सर्वांचें मेलन करावें·

हें मलम खरजेचें नाशक आहे· येणें करून काहीं कुगंध येत नाहीं ह्मणोन कोणी लावतात· परंतु फार चांगलें नाहीं· यास्तव बालांचे खरजेवर लाउं नये· त्यांचे खरजेवर या पेक्षां अंग्वेन्तम हैड्रार्जरी प्रीसिपिटेटी आल्बी अधिक चांगलें आहे· व त्याचा कुगंध ही येत नाहीं·

लतीन·	इंग्रेजी·
अंग्वेन्तमजिन्सी·	झिंकऐन्तमन्त·

जिन्सी ओक्सि[illegible]	एक औंस·
स्वच्छ च[illegible]	साहा औंस·

दोहोंचें मेल[illegible]रावें·

हें मलम चांगलें आ[illegible] याला काहीं कोष्ठबंधक गुण आहेत· स्त्रीचे स्तनावरलें चर्म निघालें असतां त्या स्थलावर याला लावतात· स्तनपानसमयीं हें चांगलें धुवून काढावें बालांचे तोंडांत जाउं देउं नये· व हें मस्तकाचे दद्रुवर चांगलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
लिनिमेन्ता·	लिनिमेन्‌स·	मर्दनें·

यांचा दाटपणा तेलाप्रमाणें आहे ह्मणोन चर्मावर याचें मर्दन सहज कर-

तां येतें यांचे गुण प्रायःसीरेट व मलमें यांचे गुणांपेक्षां अधीक बळकट आहेत· यांचे मर्दनें करून दुःख दूर होतें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
लिनिमेन्तमएरुजिनिस·	**वेर्दिग्रिस्‌लिनिमेन्त·**	**जंगल्याचें मर्दन·**

जंगल्याचें चूर्ण·	एक औंस·
सिर्क·	सात औंस·
स्वच्छ मध·	चवदा औंस·

जंगल्याला सिर्काशी मिळवून पातळ करून वस्त्रामध्यें गाळून त्यांत मध घालून सर्व नीट दाट होईतों पर्यंत **कढवावें**·

हें औषध फार चांगलें नाहीं याचे गुण मोरचुत व मध यांचे मेलना प्रमाणें आहेत· हें मेलन मधीचे शोधन प्रकारावर सांगीतलें आहे·

लतीन·	इंग्रेजी·
लिनिमेन्तमआम्मोन्येफोर्ट्यस·	**स्त्रोंगलिनिमेन्तओफ आम्मोन्या·**

लैक्कोर आंमोन्ये·	एक औंस·
गोडें तेल·	दोन औंस·

दोहोंना एकत्र करून चांगलें मेलन होईतों पर्यंतह्यालवावें·

हें औषध साबुणा प्रमाणें पांढरें दिसतें हें फार उत्तम लोहितकर आहे· गुलांकुर रोग झाला असतां याला बनातीचे वस्त्रावर लावून तें वस्त्र गळ्या भोंवतें लावतात· तेणें करून हीत होतें· हें वायुसंबंधी संधीचे पीडेवर ही फार उत्तम आहे· पीडेचे स्थलावर याचें मर्दन करतात· हें कापुराचे मिश्रणाशी किंवा एकुस्त्राकूटम बेल्लादोन्नेशी मिळवलें असतां याचे गुण अधिक होतात· या औषधांत लैक्कोर आम्मोन्याचा अर्धभाग घातला असतां बहुत एक रोगांवर त्याचे पूर्ण गुण होतात·

लतीन·	इंग्रेजी·
लिनिमेंतमआम्मोन्येसब्कार्बोनटिस·	**लिनिमन्तओफकार्बोनेटओफआम्मोन्या·**

लैक्कोरआम्मोन्येसब्‌कार्बोनटिस·	एक औंस·
गोडें तेल·	तीन औंस·

दोहोंना एकत्र मिळवून चांगलें मेलन होई तोंपर्यंत हालवावें·

याचे गुण पूर्व ओषधा प्रमाणें आहेत परंतु तितके बळकट नाहींत·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
लिनिमेन्तमकाम्फोरे·	कांफरलिनिमन्त·	कापुराचें मर्दनिऔषध·

कापुर·	अर्ध औंस·
गोडेंतेल·	दोन औंस·

तेलामध्यें कापुर विरघळवावा·

हें ओषध वायूचे पीडेवर फार चांगलें आहे· याचें मर्दन पीडायुक्त स्थलावर करतात· तसें पिंडाचे सूजेवर लचक भरून सूजयेत्ये तीवर चर्माचा चेंदा होतो त्यावर आघातें करून चर्म दुखतें त्यावर करतात· कापुरें करून शोषक वाहिन्यांची शोषण शक्ति अधिक होत्ये· परंतु मर्दनावांचून होत नाहीं· लिनिमेन्तमआम्मोन्ये फोर्र्यसामध्यें गोड्येतेलाचे ऐवजी हें ओषध घातलें असतां त्याचे फार गुण होतात तिमिर रोगाचा प्रारंभ झाला असतां दोन औंस हें औषध घेऊन याचें अर्ध औंस लेक्कोरपोटास्सेसब्कार्बोनटिसाशीं मेलन करून रात्रीस आणि पाहांटेस· पायप्यावर लावावें·

लतीन·	इंग्रेजी·
लिनिमेन्तमकांफोरेकोम्पोसिटम·	कोम्पोंड्कांफरलिनिमंत·

प्राकृत·
कापुराचें मिश्रित मर्दन औषध

कापुर·	दोन औंस·
लेक्कोरआमोन्ये·	साहा औंस·
स्पिरिटसलवंड्युले·	एक पैंट·

लेक्कोर आंम्मोन्याचें स्पिरिटाशीं मेलन करावें नंतर त्याला बिलोराचे रिटोर्टीत घालून मंदाग्नीवर ठेवून त्या मधून अन्य पात्रांत एक पैंट काढावें· नंतर त्यामध्यें कापुर विरघळवावा·

हें औषध लचकेवर· आघातावर· व वायूचे पीडेवर फार श्रेष्ठ आहे· अफूचें मर्दन करावयास इछितात तर दीढ औंस हें ओषध घेऊन याशीं अर्ध औंस लादन-

म मिळवून करावें· पोटांतला सुरडा दूर करावयासाठीं याचें मर्दन उत्तम आहे· व बाळाना ही लादनमाचे मर्दनापेक्षां याचें मर्दन चांगलें आहे· याचे गुण पूर्व औषधा प्रमाणें आहेत· यांत तेल नाहीं यामुळें चर्मास मिळमिळी लागत नाहीं इतकामात्र विशेष आहे· याचे मर्दने करून चर्म आरक्त झालें तर मर्दन करूं नये· लेपन करावें·

लतीन· इंग्रेजी· प्राकृत·

लिनिमेन्तमहैड्रार्जरी· मेर्क्युर्यललिनिमन्त· पाऱ्याचें मर्दन औषध·

पाऱ्याचें मलम·	चार औंस·
स्वच्छ चर्बी·	चार औंस·
कापुर·	एक औंस·
रेक्टिफैद्स्पिरिट·	पंधरामिनिम·
लैक्कोर आमोन्ये·	चार औंस·

प्रथम स्पिरिटाशीं कापुर खलावा· नंतर चर्बी व मलम यांशीं खलावा मग त्यांत थोडें थोडें लैक्कोर आमोन्ये घालून **मिळवावें**·

हें औषध उष्ण व चांगलें शोथनाशक आहे· उपदंशेंकरून अस्थीमध्यें पीडा होऊं लागली किंवा आब्सार्बेन्त वाहिन्याचे पिंडावर सूज आलीतर त्यांवर याचें मर्दन चांगलें आहे· तसें कांहीं कारणें करून फार दिवस सूज राहाली असतां व जलोदरावांचून कांहीं ठिकाणीं पाण्याचा संचय झाला असतां चांगलें आहे· या कार्यास्तव प्रातःकाळीं आणि रात्रीस याचे एक ड्रामाचें मर्दन करावें मर्दनें करून हें औषध फार जिरवलें असतां त्वरेनें तोंड येतें·

लतीन· इंग्रेजी

लिनिमेन्तम्सापोनिस्कोम्पोसिटम्· कोम्पौंड्सोपलिनिमन्त·

प्राकृत·

साबुणाचें मिश्रित मर्दन·

कठीणसाबुण·	तीन औंस·
कापुर·	एक औंस·
स्पिरिटसरोस्मारिनी·	एक पैंट·

पात्रांत स्पिरिट घालून त्यामध्यें कापुर पातळ करावा· नंतर त्यांत साबुण घालून पातळ होई तों पर्यंत तें पात्र उष्ण वालुमध्यें **ठेवावें**·

काही एकठायीं वायुसारिखी पिडा· किंवा वायूची पीडा· होऊं लागली असतां या औषधाचें मर्दन चांगलें आहे· याचें अन्य मर्दन औषधाशीं किंवा टिंक्तुरालिट्टेशीं मेलन केलें असतां तें चांगलें उष्ण लोहितकर होतें व लादनमाशीं याचें मेलन केलें तर तें पूर्व पीडेवर उत्तम आहे· तेणें करून सूज दूर होऊन पीडा न्यून होत्ये· पक्षवायूवर व फार दिवसांचे वायुपीडेवर टिंक्तुरालिट्टेशीं याचें मेलन चांगलें आहे· त्यातें सांगतो·

साबुणाचें मिश्रित मर्दन·	एक औंस·
टिंक्तुरालिट्टे·	एक औंस·

दोहोंचें मेलन करून मर्दन करावें·

त्या रोगाची फार पीडा होऊं लागली असतां ती न्यून होण्यासाठीं लादनमाशीं याचें मेलन चांगलें आहे· त्यातें सांगतो·

साबुणाचें मिश्रित मर्दन·	तीन औंस·
लादनम·	एक औंस·

दोहोंचें मेलन करून मर्दन करावें·

ती न्यून व्हावयास दुसरें मेलन सांगतो·

कापुराचे मिश्रित मर्दन·	दोन औंस·
लादनम·	एक औंस·

दोहोंचें मेलन करून मर्दन करावें·

लतीन·	इंग्रेजी·
लिनिमेन्तम्टेरेबिंथिने·	**टर्पन्तिन्लिनिमन्त·**

राळेचें सीरेटं·	एक पौंड·
ओल्यमटेरेबिंथिने·	अर्ध पैंट·

सीरेटामध्यें ओल्यमटेरेबिंथिने घालून **मिळवावें**·

हें औषध फार चांगलें आहे· अग्निसंयोगें करून किंवा तप्त पदार्थसंयोगें करून जें दुःख होतें· त्यावर याचें लेपन केल्यानें फार हीत होतें· तें जवसाचे तेला-

वर सांगीतलें आहे· वायूचे पीडेवर आणि पक्षवायूवर याचें मर्दन करतात· टिंक्त्युरालिट्टेशी अथवा लेक्कोरआम्मोन्याशी याचें मेलन करून मर्दन केलें तर हित अधिक होतें·

लतीन·	इंग्रेजी·	प्राकृत·
काटाप्लास्मटा·	काटाप्लाजमस·किंवापोल्टिसेस·	लबदे·

ही औषधें कार्यसमर्थी सिद्ध करावीं· ही दोन मात्र सांगीतलीं आहेत·

लतीन·	इंग्रेजी·
काटाप्लास्माफेर्मेन्टि·	येस्तकाटाप्लूजम्·

कणीक·	एक पौंड·
खमीर·	अर्धपैंट·

दोहोंचें मेलन करून तें फुगेल तोंपर्यंत उष्णठायीं **ठेवावें**·

व्रण व जखम यांचें मांस सडतें त्यावर हा लबदा चांगला आहे· येणेंकरून कुगंध न्यून होऊन नवें मांस त्वरेनें येतें· व्रणाला काहीं ही कुगंध येत असला तर तो येणेंकरून न्यून होतो·

लतीन·	इंग्रेजी·
काटाप्लास्मासिनेपिस·	मस्तर्दपोल्टिस· अथवा सिनपिजम्·

प्राकृत·
मोहर्यांच्या लबदा·

मोहर्यांचें चूर्ण·	अर्धपौंड·
जवसांचें चूर्ण·	अर्धपौंड·
उष्ण केलेलें सिर्क·	अगत्याप्रमाणे·

सर्वांचें मेलन करून लबदा **करावा**·

हा लबदा बहुत उष्ण लोहितकर आहे· याला वस्त्रावर पसरून लावून ती पटी पायांचे तळव्यावर लावतात· येणेंकरून फार त्वरेनें हीत होतें· ह्मणोन अंगविकृतीवर आणि काहीं प्रकारचे ज्वरामध्यें प्रलाप न्यून होण्यासाठीं लावतात· याचे लोहितकर

गुण फार त्वरेनें होतात· व काहीं एक वेळेस स्फोट ही येतो· कोणी वैद्य फार उग्र होण्यासाठी यामध्यें लसून घालतात·

ज्या औषधांमध्यें अफु· आन्तिमोनी· आर्सिनिक· व पारा· हीं औषधें आहेत· त्यांमध्यें यांचा भाग केवढा आहे· त्यातें अनुक्रमें करून **सांगतो·**

	अफु·	
ल० इं० प्रा०	कोन्फेक्श्योओपीई· कोन्फेक्शानओफओप्यम· अफूचा मोदक·	याचे छत्तीस ग्रेनामध्यें अफु एक ग्रेन आहे·
ल० इं० प्रा०	पिल्युलेसापोनिस्कम्ओप्यो· कोम्पौंड्ओप्यम्पिल्स· अफूचा साबुमिश्रित गोळ्या·	यांचे पांच ग्रेना मध्यें अफु एक ग्रेन आहे·
ल० इं०	पल्विस्कोर्नुअस्तीकम्ओप्यो· पौदर्ओफबर्न्तहार्त्सहोर्न्विथओप्यम·	याचे दाहा ग्रेनामध्यें अफु एक ग्रेन आहे·
ल० इं० प्रा०	पल्विस्क्रेटेकोम्पोसिटसकम ओप्यो· कोंपौंडपौदर्ओफचाकविथओप्यम· खडीचें अफुमिश्रित चूर्ण·	याचे दोन स्कुपलामध्यें अफु एक ग्रेन आहे·
ल० इं०	पल्विस्ईपिकाक्युअन्हेकोंपोसिटस· कोंपौंडपौदर्ओफईपिकाक्युअन्न·	याचे दाहा ग्रेनामध्यें अफु एक ग्रेन आहे·
ल० इं०	पल्विस्कैनोकोंपोसिटस· कोंपौंडपौदर्ओफकैनो·	याचे एक स्कुपलामध्यें अफु एक ग्रेन आहे·

ल॰	टिंक्त्युराओपीई·	याचे एकुणीस मिनिमामध्यें अफु एक ग्रेन आहे·
इं॰	टिंक्त्युरओफ ओप्यम·	
प्रा॰	अफूचें टिंक्त्युर·	
ल॰	टिंक्त्युराकाम्फोरेकोम्पोसिटा·	याचे अर्ध औंसामध्यें अफु एक ग्रेन आहे·
इं॰	कोम्पोंड टिंक्त्युर ओफ कांफर·	
प्रा॰	कापुराचे मिश्रित टिंक्त्युर·	

अंतिमोनी·

ल॰	वैनमअंतिमोनीईटार्टारीझेटी·	याचे एक औंसामध्यें टार्टरइमेटिकाचे दोन ग्रेन आहे·
इं	आंतिमोन्यलवैन·	

पारा·

ल॰	हैद्रार्जरम्कम्क्रेटा·	याचे तीन ग्रेनामध्यें पाऱ्याचा एक ग्रेन आहे·
इं॰	मेर्क्युरी विथ चाक·	
ल॰	लैक्वोरहैद्रार्जरीओक्सिम्युर्यटिस·	याचे दोन औंसामध्यें ओक्सीम्युर्यटाचा एक ग्रेन आहे·
इं॰	सोल्युशनओफकारोसिवसब्लिमेट·	
ल॰	लिनिमेन्तमहैद्रार्जरी·	याचे साहा ड्रामामध्यें पाऱ्याचा एक ड्राम आहे·
इं॰	मेर्क्युर्यललिनिमन्त·	
प्रा॰	पाऱ्याचें मर्दन·	
ल॰	पिल्युलेहैद्रार्जरी·	यांचे तीन ग्रेनामध्यें पाऱ्याचा एक ग्रेन आहे·
इं॰	मेर्क्युर्यलपिल्स·	
प्रा॰	पाऱ्याचा गोळ्या·	
ल॰	पिल्युलेहैद्रार्जरीसब्म्युर्यटिसकोंपोसिटे·	यांचे चार ग्रेनामध्यें कालोमेलाचा एक ग्रेन आहे·
इं॰	कोंपोंडकालोमेलपिल्स·	

ल॰	अंग्वेन्तमहैद्रार्जरीफोर्श्यस·	याचे दोहो द्रामामध्यें पाऱ्याचा एक द्राम आहे·
इं॰	स्त्रोंगमेर्क्युर्यल्ऐन्तमंत·	
प्रा॰	पाऱ्याचें मलम·	
ल॰	अंग्वेन्तमहैद्रार्जरीमित्यस·	याचे साहा द्रामामध्यें पाऱ्याचा एक द्राम आहे·
इं॰	वीकरमेर्क्युर्यल्ऐन्तमन्त·	
प्रा॰	पाऱ्यांचें मिश्रित मलम·	

आर्सिनिक·

ल॰	लैक्वोरआर्सेनिकेलिस·	याचे एक औंसामध्यें स्वच्छ सोमलाचे चार ग्रेन आहेत·
इं॰	आर्सिनिकलसोल्युशान·	

* * *

॥ ॥औषधोत्पत्तिः समाप्ता·॥ ॥

LIBRARY OF THE BOMBAY BRANCH OF THE ROYAL ASIATIC SOCIETY

ग्रंथ शेष ।

ग्रंथशेष·

पूर्वोक्त दोहों लबद्यां शिवाय अन्य लबदे ही औषधार्थ चांगलें आहेत· त्यांचा उत्पत्ति प्रकार सांगतो·

तुरटीचा लबदा·

तुरटीचें चूर्ण कोंबड्यांचे दोहों आंड्यांतील श्वेत पदार्थाशीं चांगलें मिळवून खव्यासारिखें करावें· हा लबदा अभिष्यंद रोगाचे कांहीं प्रकारावर चांगला आहे· ह्मणजे जेव्हां डोळ्यांमधून फार पातळ पू पडतो तेव्हां याला दुहेरी पातळ वस्त्राचे आंत घालून डोळ्यांवर बांधावा·

जवसांचा लबदा·

जवसांचें पीठ अर्ध पौंड घेऊन दीढ पैंट उकळत्ये पाण्यांशीं चांगलें मिळवावें· अथवा तें पीठ उकळत्ये पाण्यांशीं मिळवून खव्या सारिखें करावें· हा लबदा फार चांगला स्निग्धकर आहे· याला चपटा करून यावर थोडें गोडें तेल लावून बांधावा· इन्फ्लमेशनादिकांचे पीडेचे शमना विषयीं चांगला आहे· व कांहीं एक वेळेस पाण्यांचे ऐवजीं पोस्त्याचें पाचन घेऊन हा लबदा करतात· जास्थलीं हा बांधावयाचा आहे तें स्थल पूर्वी त्या पाचनानें शेकून नंतर बांधावा·

कोळशांचा लबदा·

अगत्या प्रमाणें जवसांचा पातळ लबदा घेऊन तो नीट घट्ट होई तोंपर्यंत त्याशीं कोळशाचें चूर्ण मिळवावें· हा लबदा व्रणाचा व इतर स्थलीचें सडलेल्या मांसाचा दुर्गंध व कुरंग दूर करावयास चांगला आहे· त्या स्थलांवर बांधावा·

गाजराचा लबदा·

साजुक गाजर घेऊन पाण्यांत उकळवून मृदु करून वाटावें· हा लबदा व्रणाचा दुर्गंध व पीडा यांचे शमना विषयीं त्याजवर बांधावयास चांगला आहे· तसा भोंपळ्याचा लबदा ही चांगला आहे· या दोहों लबद्यांशीं कोळशाचें फार बारीक चूर्ण मिळविलें असतां हित अधिक होतें·

वनस्पतिऔषधोत्पत्तिचेंशुद्धिपत्र·

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध·	शुद्ध·
३	६	चोवीस	तीस·
४	४	लावावे	लावावें·
४	९	किंवा	व·
४	१७	इंग्रेजी	लतीन·
४	१७	ओलयम	ओल्यम·
५	१७	मर्वांचें	सर्वांचें·
७	१८	देगडींत	घागरींत·
८	११	कांहींसें	काहीं एकांचें·
८	१४	दिस्तिलेय	दिस्तिलेटा·
१०	२१	एकामंथे	एकामिंथे·
१२	२	फाराट	या शब्दाचेस्थानीं सर्वत्र नपुंसक लिंगक फांट शब्द·
२९	१०	दीकोकून	दीकोकूशन·
३१	१७	जोरस	तोरस·
३२	२२	आहे	आहेत·
३५	८		लबयांत घालून किंवा लबदा करून·
३८	१	गळक	ढाळक·
३८	३	ठाळक	ढाळक·
३८	३	ठाळक	ढाळक·
३८	७	निप्रा	निद्रा·
४१	२६	मृळ	मूळ·
४२	२३		व एक औंस·
४७	१०	दोनड्राम	आठ औंस·
४८	२६		त्याचा उक्त·
४९	७	प्रुफस्पिरिट	रेक्टिफेदस्पिरिट·
५०	१६	रेक्टिफेदस्पिरिट	आलकोहोल·
५५	११		स्पिरिटओफपिमेंटा·

वनस्पतिऔषधोत्पत्तिचें शुद्धिपत्र·

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध·	शुद्ध·
५७	१	श्वापदाचे	प्राण्यांचे·
५७	३	गोंद	गोंदा वांचून·
५७	५	श्वापदाचे	प्राण्यांचे
५७	२७	ठाळकाशीं	ढाळकाशीं·
६२	३	माळीचें	साळीचें·
६३	६	·	औषध सिंकोणाचे·
६८	१२	·	औंस हें·
७८	१३	साह्य	दाहा·
८४	८	पेंट	पोंड·
९३	१९	·	सुंठीचें चूर्ण साहा ड्राम·
१०१	१५	·	एक्या बोळाचा बोळ·
१०४	१०	अर्धऔंस	अर्धड्राम
१०६	१०	गणिड	गंडि·
११०	५	धणें	ओंवा·
११६	१२	·	अग्निवरून उतरून·
११९	१२	गाळावें	गाळावे·
१२३	१	मेलन	मलम·
१२३	५	फुप्फुशीत	फुस्फुर्शीत·
१२५	२७	गुलांकुर	गलांकुर·
१२७	४	मदनें	मर्दनें·
१२८	१२	रोगाची	रोगांची

00044461

Digitized with financial assistance from

Hermès India

a project facilitated by the Rotary Club of Bombay

on 10 August, 2018